# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०.७.२०००.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०.७.२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक १९.७.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता बोलावण्यांत आली होती. सदरची सभा तहकुब करून दिनांक २०.७.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्रीमती.सोनावणे यमुना
४ श्रीमती.ज्योती कालानी
५ श्री.ढेणवाल बनवारी
६ श्री.वाघे शामु
७ श्रीमती. वेलकर सुरेखा
८ श्री. यादव नरेश
९ श्री. सोनावणे राजू
१० श्रीमती.दासानी मिनु
११ श्रीमती.पवार पंचशीला
१२ श्री.टाले प्रमोद
१३ श्री. आढाव रामभाऊ
१४ श्रीमती. बगाडे सुनिता
१५ श्री. भांडे भगवान
१६ श्री. ठाकुर सेवलदास
१७ श्री. वनवारी किशोर
१८ श्री.तेजी कैलास
१९ श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई
२० श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१ श्री. पमनानी ईश्वर
२२ श्रीमती वसीटा बेबी
२३ श्रीमती मटाई जोनिता
२४ श्री.चौधरी राजेंद
२५ श्री.लांडे पांडूरंग

२६ श्रीमती. ससाने लक्ष्मी
२७ श्री. मोरे भानजी
२८ श्रीमती. राजवानी सुनिता
२९ श्री. वारिंगे पंढरीनाथ

३१ श्री.पारवानी रामचंद

३२ श्री. तलरेजा विनोद
३३ श्री. पुरस्वानी जमनादास
३४. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३५. श्री.बहरानी ठाकुरदास
३६. श्री जाधव सुरेश
३७. श्री. मोरे भिमसेन
३८ श्री.चव्हाण रमेश
३९ श्री. महाडीक प्रकाश
४०. श्रीमती.बनवारी मोना
४१ श्रीमती.करोतिया मालती.
४२ श्री. मनसुलकर सुभाष
४३ श्रीमती.नाईक यशास्विनी
४४ श्रीमती.साधवानी जया
४५ श्रीमती.कुंदनानी लविना
४६ श्रीमती.गजवानी कांता
४७ श्रीमती.वलेचा पदमा
४८ श्री.केणी जयकुमार
४९ श्री.आयलानी कुमार
५० श्री.अचनानी पम्मीकुमार
५१ श्री.जयप्रकाशभाटीया
५२ श्री.माखिजा प्रकाश
५३ श्री.पंजाबी नारायण
५४ श्री.किरनानी गोदुमल
५५ .श्री.सचदेव गिरधारी
५६ श्री.केसवानी किशोर
५७ श्रीमती इंदिरा भठीजा.

३०. श्रीमती टेकचंदानी चंद्रा ५८ श्रीमती.पन्ना वारिंगे.



१. श्री.भुल्लर राजेंद्रसिंह २ श्री.चौधरी गणेश ३. श्री. रामदास उमाप ४. श्रीमती मोकल सिमा ५. श्रीमती. रूपचंदानी भगवंती ६ श्री.वाधवा गिरधारी ७. श्री.शामसुंदर रोहडा ८ श्रीमती.जेस्वानी आशा ९ श्रीमती. राजानी भारती १०. श्री.राजानी नरेंद्र ११ श्रीमती.राधवानी आशा १२. श्री. रामरख्यानी मोहनदास १३श्री.ब्रहरानी गोप १४. श्री.जग्यासी राजू,१५ श्री.पंजाबी लाल हे सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

सर्वप्रथम वंदेमातरम् म्हणून सभेची सुरवात ४.३० वाजता करण्यांत आली.

श्री.सेवलठाकुर, श्री.वाघे शामु व श्रीमती. इंदिरा भठीजा हया सन्माननिय सदस्यांनी महासभा हजेरी पत्रकावर स्वाक्षरी केल्यानंतर ४.३१वा. महासभेतून बाहेर निघुन गेले.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ प्रश्नोत्तरे....
प्रश्न क्र.४७५ श्री.बी.बी.मोरे यांचा आहे.

<u>प्रश्न</u> :- प्लॉट क. ५८५,गुजराथी पाडा, कुर्ला कॅम्प हा प्लॉट क्रिडांगणांसाठी राखीव असतांना त्याची खोटी सनद काढून तो हडप केला जातो, त्यावर महापालिकेने आतापर्यंत काय कारवाई केली?

<u>उत्तर</u> :-सदर भुखंड आरक्षणाखाली नाही कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-सभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी मी पुढील प्रमाणे एक शोक प्रस्ताव ठेवतो. सतत मुसळधार पावसामुळे घाटकोपर येथे दरड कोसळून बळी गेलेल्यांसाठी तसेच पाटणा येथील नागरी भागात विमान कोसळून झालेल्या अपघातात मृत पावलेल्या लोकांना श्रध्दांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे उभे राहून मौन पाळूया.

मा.महापौर :- ठिक आहे.

<u>शोक प्रस्ताव :-</u>

<u>प्रस्तावना</u> :-

गेल्या चार दिवसात पडलेल्या मुसळधार पावसामुळे घाटकोपर येथे मोठया प्रमाणात दरड कोसळल्याने ५० ते ६० झोपडया ढिगा-याखाली सापडून अनेक लोक मृत्युमुखी पडले.

तसेच पाटणा येथे विमानाला आग लागून नागरी विभागात विमान कोसळल्याने त्यात अनेक व्यक्तींना मृत्यूला सामोरे जावे लागले.

तरी वरील मृत्युमूखी पडलेल्या कुटुंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होत असून, हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करण्यासाठी तसेच दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ८(अ) दिनांक :-२०.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री. बी.बी.मोरे.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रामभाऊ आढाव.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुसळधार पावसात दरड कोसळून बळी गेलेल्या तसेच विमान कोसळून झालेल्या अपघातातील मृत व्यक्तींना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करीत आहे.

तसेच मृतव्यक्तींच्या कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सर्वांनी दोन मिनिटे, उभे राहून मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरेः-मा. महापौर, या सभागृहात लक्षवेधी दिली आहे. ती लक्षवेधी वाचुन दाखवा, दाखल करा, ती समजवा त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरू करा.

मा.महापौर :- आपली लक्षवेधी व इतर सदस्यांनीही लक्षवेधी दिली आहे. ती आम्ही प्रश्नोत्तरे झाल्यावर वाचू व नंतर निर्णय घेऊ.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- मा.महापौरजी, १९ तारखेची सभा स्थगित करून २० तारखेला ठेवली कारण सांगितले की उच्च न्यायालयात आयुक्तांचे जाणे जरूरीचे होते तर माझे असे म्हणणे आहे आजची सभा तहकुब करून दुसरी तारीख ठेवाल तर बरे होईल.

मा.महापौर :- आपण आजची सभा तहकुब करू इच्छिता.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी, मी खालील प्रमाणे सभा तहकुब करणेसाठी प्रस्ताव मांडत आहे.

काल १९ तारखेची सभा तहकुब करून २० तारखेला घेत आहात. सभा तहकुब होण्यासाठी जो कार्यसूची दिली त्यात लिहिले की, मा. आयुक्त उपलब्ध नाही म्हणुन १९ तारखेची सभा २० तारखेला ठेवत आहोत. प्रथम मला सचिव व आयुक्तांनी हि माहिती द्यावी की, सभा तहकुब महापौर करू शकतात की सभेमध्ये आलेले बहुसंख्य महानगरपालिका सदस्य इथे उपस्थित झाल्यावरत्त्यांच्या सर्वानुमते सभा तहकुब होते. आयुक्त नाही म्हणून, सभा नाही. कायद्यात अशी तरतुद आहे की, उपायुक्त सभा चालवू शकतात. आज कालची सभा तहकुब आयुक्त नाही, म्हणुन झाली, आज भाजपा पक्षाचे आमचे सहयोगी काही कारणास्तव उपस्थित नाही. कालची सभा आयुक्त नाही म्हणून तहकुब झाली, तशी आजची सभा नियम १(म) (अ) मध्ये लिहीले आहे. त्या आधारे मा.शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांना याच्यावर कार्यवाही करण्यासंबधी यांना जे महाराष्ट्र शासनाने आदेश दिले त्याचे विरूध्द निषेध करण्यासाठी म्हणुन आजची सभा तहकुब करावी. अशी माझी विनंती आहे. त्यासाठी नियमात पण लिहिले आहे की, पिठासिन प्राधिका-याने सभेच्या कार्यसुचीवरील कामकाज चालवण्यासाठी म्हणुन आसन ग्रहण केल्यानंतर, कोणत्त्याही वेळी, पालिका सदस्यास नियम २(ट) मध्ये निर्देशिलेल्या कारणा व्यतिरिक्त इतर कोणत्त्याही कारणावरून त्याच दिवशी नंतरच्या वेळेपर्यंत किंवा इतर कोणत्त्याही दिवसापर्यंत सभा तहकुब करण्याबददलचा ठराव मांडता येईल, आणि असा ठराव मांडता येईल आणि असा ठराव, सभेच्या कार्यसूची वरील इतर कोणत्त्याही कामकाजाचा अग्रक्रमाने घेता येईल, त्याचप्रमाणे कामकाज सुरू होण्यापूर्वी आमचा स्थगन प्रस्तावास अग्रक्रम देऊन आजची सभा कृपया महाराष्ट्र शासनास निषेध करण्यासाठी म्हणून तहकूब करण्यात यावी. अशी आमची विनंती आहे कारण, हिंदुहृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे, हे हिंदुचे मसीहा आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याचे शासनाने आदेश दिले आहे. हे उल्हासनगर शहर आहे. आमचे सिंधी भाई हे फक्त हिंदु म्हणुन त्यांना घर-दार सोडून पाकिस्तान मधून इथे यावे लागले. अशा हिंदु रक्षणकर्ता मा.बाळासाहेब ठाकरे त्यांच्यावर कार्यवाही होत आहे. म्हणुन उल्हासनगर महापालिकेत चालणारी ही सभा निषेध म्हणुन तहकूब कराल अशी अपेक्षा आहे म्हणुन माझा पुढील प्रमाणे प्रस्ताव आहे.

<u>प्रस्तावः-</u>

सुचकाचे नाव :- श्री.प्रकाश महाडिक.

अनुमोदकाचे नाव :- श्री. भिमसेन मोरे.

महाराष्ट्र राज्य शासनाचे मा.उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ, यांनी नुकतीच माननीय हिंदुहृदय सम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे विरूध्द भारतीय दंड संहिता कलम १५३ (अ) अन्वये खटला भरण्यासाठी जी परवानगी दिली आहे,त्या निषेधार्थ आजची सभा इतर कोणत्त्याही दिवसा पर्यंत तहकुब करण्याबददल प्रस्ताव मांडत आहे.

तसेच सभेत उपस्थित असलेल्या व मतदान करणा-या पालिका सदस्यापूढे सभा तहकुब करण्याबददल ठराव मतास टाकणे बाबत प्रस्तावित करीत आहे.

*मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे* :- सन्माननिय महापौरजी, आजचे सदनातील सर्व सदस्य, मी आपण सर्वांना विनंती करू इच्छितो, की मा. बाळासाहब ठाकरे यांच्यावर जी कार्यवाही होणार आहे. त्या निषेधार्थ सभा तहकुब करण्याचा जो विचार मांडला त्यास आमचा विरोध आहे कारण.....



*मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे* :- मा.महापौर, यांचा एक नेता तिथे पाठिंबा देत आहे, हे कोणत्त्या गटाचे आहेत.

*मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे* :- मला बोलू दया, तुम्ही बोललात?

*मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी* :- मा. महापौरजी...

*मा.महापौरः-* त्यांना बोलू तर दया.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

*मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी* :- मा.महापौर, आपणाकडून आज्ञा घेतली आहे, बी.बी.मोरे कडून नाही.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी* :- मोरे साहेब, एक मिनिट.

*मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे* :- मला बोलू दया ना किशोर? सन्माननिय सदस्य महाडीक यांनी जो विचार मांडला आहे. त्याला माझा का विरोध आहे, याचे स्पष्टीकरण मी देतो. महासभा यासाठी बोलावली जाते. शहराच्या विकासाच्या कामाविषयी चर्चा करण्यासाठी महासभा बोलावली जाते. आज बाळासाहेब ठाकरेवर कार्यवाही होत आहे. उद्या आमच्या रामदास आठवले व इतर कुणावरही कार्यवाही झाली तर, काय महासभा बंद करणार निषेध करणार. सर्वात मोठा प्रथम कायदा, कायदयाचे ते पालन करत नाही, त्यामुळे जी कार्यवाही होत आहे, त्यासाठी महापालिका बांधील नाही. मी विचार करतो की, व्यक्तीपेक्षा कायदा मोठा असतो तो मुददा इथे नाही आणला पाहीजे आणि हे जे महासभेचे एका महिन्यानंतरचे कामकाज चालते, ती सभा झालीच पाहिजे, ती तहकुब होण्यास माझा विरोध आहे.

*मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक* :- आम्ही सभा तहकुब व्हावी म्हणून बोलत आहे. १९ तारखेची सभा तहकुब करून २० तारखेस ठेवली. आयुक्त उपस्थित राहणार नव्हते म्हणुन, तहकुब करून दोन दिवसानंतर ठेवा हिच आमची विनंती आहे.

*मा.सदस्य श्री.किशोर वनवारी* :- एक मिनिट....

*मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक* :- किशोरजी, माझे पूर्ण नाही झाले आहे. आजच्या वृत्तमानसामध्ये बी.बी.मोरेचे जे स्वतःला आर.पी.आय. चे गटनेते समजतात ते कोणत्त्या गटाचे आहे. ते आम्हाला माहीत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान ज्या राज्यात......

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

*मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे* :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर आमचे आहेत.

*मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी* :- ते फक्त तुमचे आहेत का? आमचे नाही.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :- वर्तमानपत्राचे इकडे विषय काढला जात नाही. तुम्हाला माहित नाही का?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.



मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :-नंदलाल समितीच्या अहवालामध्ये कोणावर किती केस होणार हे माहित पडेल, आणि कायदयामध्ये कोण कोण सारखे आहे हे दुनियेला माहित पडणार आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- मा.महापौरजी, मोरे साहेब बसा.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- आयुक्त नसेल तर, उप-आयुक्तांना अधिकार आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा.महापौरजी, १९ तारखेची महासभा ही २० तारखेला ठेवण्यात आली, तेव्हा विपक्ष नेता....

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- आमचा लुक आऊट आहे. आम्ही ते बघू हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- तुमचा कसा लुक आऊट आहे . बाबासाहेब आंबेडकर तुमचे आहे का? आमचे नाही?

इकडे परत सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- होऊ दया म्हणतात अपमान गटनेता आहात तरी, बाबासाहेबांचा अपमान होऊ दया. हे म्हणण्याचा अधिकार तुम्हाला नाही आहे. मोरे, ज्यांच्यामुळे खुर्च्या उबविता ना, त्यांच्यासाठी अनुदगार काढू नका. तुम्ही सभा तहकुब करायला पाहिजे होती या विषयावर....

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महासभेमध्ये आज फक्त दोनच जण बोलणार का? दुस-यांना पण बोलण्याची संधी द्या. मा.महापौर, आज १९ तारखेची सभा २० तारखेस जेव्हा ठेवली तेव्हा विपक्ष नेता भाभी सुनिता राजवानींना आपण विचारले, उपमहापौरांना फोन करून विचारले, आपल्या कॅबिन मध्ये सभा होती, याचे कारण हे की, जेव्हा पण आयुक्त साहेब नसतात, तेव्हा महासभेचे सदस्य म्हणतात की आयुक्त नसताना उपायुक्तांना बसवितो, त्यांना निर्णय देण्याचा काही अधिकार नाही, आयुक्त पाहिजेत, आयुक्तांनी सांगितले की १९ तारखेला उच्च न्यायालयात महत्त्वाचे काम आहे. तुम्ही ठरवा मला मान्य आहे. तर आम्ही आयुक्त सभेत उपस्थित रहावे ही गोष्ट लक्षात ठेऊन आम्ही, विपक्षनेता, उपमहापौर प्रकाश माखिजा यांची सहमती घेऊन सभा एक दिवसासाठी स्थगन केली, राहिला प्रश्न भिमसेन मोरे साहेब लक्षवेधी विषयी बोलले ५ लक्षवेधी स्थगित सभेत घेता येणार की नाही , त्यापैकी २ कोणती घेता व हा मुददा तर प्रश्नोत्तर नंतरचा आहे. हा मुददा नंतर घेतला पाहिजे होता, आम्हाला सर्व पक्षीय नेतांचा आदर आहे. कुणावरही टिका न करता जे कायदयात बसते ते बोलावे, टिका करण्यात काही अर्थ नाही. कृपया सभेचे वातावरण शांत ठेवा, सभा चालू ठेवा. प्रश्नोत्तरे झाल्यावर महापौर निर्णय घेतील. कोणती

लक्षवेधी घेतील काणती नाही, स्थगन सभेत घेऊ शकता की नाही. श्री. प्रकाश मारिवजा गटनेता यांनी महापौरांना फोन केला...

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक</u> :- ते उपस्थित नाही त्यांचे नाव घेऊ नका ते विरोध करायला हजर नाही. कोणत्त्याही गैरहजर सदस्यां विषयी बोलणे उचित नाही.

--७--

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- त्यांनी फोन केला महापौरांना मी चुकीचे नाही बोलत. मला पण अर्धातासापूर्वी फोन आला ते सांगत आहे. त्यांची डोंबिवलीला बैठक आहे. त्यांनी उपमहापौर,महापौरांना पण सांगितले आहे. मला पण सांगितले की, आमचे नेतागण आले. महत्त्वाची बैठक डोंबिवलीत सुरू आहे. मिटिंगला नाही येऊ शकणार म्हणुन असे न समजले जावे की विरोध आहे , जर कुणाला कुठे जायचे असेल तर जरूरी नाही. त्यांनी सभेत उपस्थित रहावे. कुणी ५ महिने येत नाही ६ व्या सभेस आला तरी चालते तर मेहरबानी करून सभा शांतता पूर्वक चालवली तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- सन्माननिय महापौरजी जसे की, सांगितले लक्षवेधी स्थगित केलेल्या सभेमध्ये आणली जात नाही. बहुतेक करून आम्ही पाहिले आहे की, सभा स्थगित होतच असते. लक्षवेधी सुचनेचा अर्थ हा असतो की, त्याचवेळी त्यावर दखल घेतली पाहिजे जर आपण म्हणता स्थगन झालेल्या सभेत लक्षवेधी घेतली जात नाही. माझ्या मते ते चुकीचे आहे. सर्वात प्रथम हे स्पष्ट करते की, आपण जे १९ तारखेविषयी बोललात की, मी आपणांस सहमती दिली. २० तारखेस सभा ठेवा हे चुकीचे बोलत आहात, मी आपणांस नव्हते सांगितले आपण म्हणालात कर्मचारी नाही म्हणुन २० तारखेस ठेवत आहे. मी म्हणाले होते की, सभा ठेवणे न ठेवणे आपल्या अधिकारात आहे. मला मंजुर नाही आहे असे म्हणून निघून गेले. मेहरबानी करून सभागृहास दिशाभूल करू नका आणि दुसरा मुददा किशोर वनवारी म्हणतात की,अर्धातासापूर्वी प्रकाश माखीजांचा फोन आला होता कि, डोंबिवलीत सभा आहे. पण प्रकाश माखीजा भाजपाचे गटनेता आहेत. ते असे नाही म्हणाले यांना की,आमचा विरोध नाही. सभा आहे, ते हजर नाहीत ही वेगळी बाब आहे. परंतु अर्धातास फोनचा जे उल्लेख करत आहेत. बी.जे.पी गटनेत्त्यांनी त्यांना असा काही अधिकार नाही दिला की, माझ्या विषयी बोला. मी सभेत गुंतलो आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- जसे आता सभागृह नेता म्हणाले की, ५ लक्षवेधी आल्यात, त्यापैकी दोन घेणार ते पण प्रश्नोत्तरे तास झाल्यावर......

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- लक्षवेधी चा मुद्या आला कुठे अजुन?

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- एक मिनिट मला तेच म्हणायचे आहे.

<u>मा.महापौर</u> :- सुभाष जी, त्यांना बोलू दया, मी उत्त्तर देतो.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :-महाडिक, तुम्ही काय म्हणालात त्याच्याशी आमचे देणे घेणे नाही.
<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- कोण काय बोलतो, त्याच्याशी आमचे देणे घेणे नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती.जया साधवानी</u> :- महापौरजी, आपण सभा चालविण्याचा निर्णय घेतला की नाही? सभा घेणार आहात ना? मग प्रश्नोत्तरे सुरू करा मग का उशीर करता?

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- महापौर, आपण का उत्त्तर देत नाही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी</u>:- आपण सभा तहकुब करीत नाही, तर सुरू करा.



<u>मा.सदस्य श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- आपण आपले मत दया,दबावाखाली महासभा नाही चालवू शकत. आपण आपला निर्णय दया.

<u>मा.महापौर</u> :- माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, सदनात एक एक करून सर्वांनी बोलावे. एकत्र सर्व बोलले तर मी उत्तर नाही देऊ शकणार.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- एक सदस्य किती वेळा बोलणार, हे पण ठरवा.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-सभागृह नेताच, शिस्त नाही पाळत तर कसे होणार?
मा.सदस्य श्रीमती जया साधवानी हया सायंकाळी ४.४०वा. महासभेतून बाहेर निघुन गेल्या.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- एक सदस्य किती वेळा बोलणार.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- त्यांनी मला परवानगी दिली आहे. तुम्ही त्यांचे वकील नाही. मा.महापौर जसे सभागृह नेता म्हणाले ७ लक्षवेधी पैकी २ घ्यायच्या असतात हा नियम आहे तो मला माहित आहे. पण त्यांना हा नियम माहित नाही की, त्यांच्या व कॉंग्रेस गट नेते सुभाष मनसुलकरांच्या माहितीसाठी सांगतो मी हा स्थगन प्रस्ताव आणला आहे. मा. बाळासाहेब ठाकरेच्या अटकेच्या निषेधार्थ असा माझा स्थगन प्रस्ताव आहे, व स्थगन प्रस्ताव कधी आणला जातो हे कायद्यात लिहिले आहे. पिठासन अधिका-यांने सभेचे कामकाज चालविण्यापूर्वी आसन ग्रहण केल्यावर,आपण पिठासन अधिकारी आहात, आपण बसल्यानंतर कोणत्त्याही वेळी, पालिका सदस्य नियम २ (ट), मध्ये निर्देशिलेल्या व्यतिरिक्त कोणत्त्याही कारणास्तव त्याच दिवशी किंवा नंतर इतर कोणत्त्याही सभेच्या कामकाजापूर्वी यास अग्रकम देण्यात येईल. अग्रकम यासच म्हणतात, मी जो स्थगन प्रस्ताव आणला तो सभा तहकुबी साठी आणला आहे. तर आजची सभा तहकुब करा अशी या प्रस्तावाच्या माध्यमाने विनंती आहे. दुसरी गोष्ट,१९ तारखेची सभा आज घेत आहे. आयुक्तांचे गैरहजेरीचे कारण सांगितले. मागच्या सभेत उप-आयुक्त श्री.सोनाळे साहेबांनी जी माहिती दिली की आयुक्तांच्या खुर्चीवर बसल्यानंतर मला अधिकार नाही. सभागृहास निर्णय दयायचा, सचिव व आयुक्तांना मी विचारतो, नियमात स्पष्ट लिहिले आहे की त्या खूर्चीवर बसल्यानंतर त्यांना आयुक्तांचे अधिकार आहेत. कलम ४९ मध्ये असे लिहिले की, नगरपालिकेतील उपायुक्तांना वा सहआयुक्ताने आयुक्तांच्या आदेशाच्या अधीन राहून आयुक्त आपले कर्तव्य व अधिकार देखील वेळोवेळी
त्याच्यावर सोपवतील असे अधिकाराचा वापर केला पाहीजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत परंतु आयुक्त नगरपालिकेतील आयुक्त वा सहाय्यक आयुक्त यांचेकडे कर्तव्ये व अधिकार वेळोवेळी सोपवतील. ते महापालिकेस कळविले पाहिजे. व दुसरे लिहिले आहे. नगरपालिका आयुक्ताने किंवा नगरपालिका सहाय्यक आयुक्ताने आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ही सर्व प्रयोजनासाठी आयुक्ताने पार पाडली आहेत व केली आहेत. असे मानले जाईल. तर याप्रमाणे आयुक्त नसताना सभा तहकुब करण्याचे काही कारण नव्हते. उप-आयुक्त सभा चालवू शकतात. एवढया शुल्लक कारणावरून कालची

सभा तहकुब झाली. तर आज एवढया मोठया माणसासाठी हि सभा तहकुब व्हावी हि माझी विनंती आहे.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- सन्माननिय महापौर...मा.सदस्या श्रीमती सुनिता रजवानी :- ... निर्णय देऊ दया ना.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-कोणता निर्णय? मी त्याविषयी बोलू इच्छितो.

--९--

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- उपायुक्तांना अधिकार आहेत की, नाही हे पण स्पष्ट करा. नाहीतर नेहमी नेहमी हि समस्या येत राहील. आुयकतांच्या गैरहजेरीत उपायुक्त बसले तर ,त्यांना अधिकार आहे की, नाही ते सांगा.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- सन्माननिय महापौरजी हा जो स्थगन प्रस्तावाचा वांरवार उल्लेख केला आहे. जेव्हा बंद होता तेव्हा सर्व उल्हासनगर शहर बंद होते. निषेध असा पण होतो व तसा पण होतो. कोणत्त्याही पक्षाने बंदला विरोध नाही केला. १०० टक्के बंद यशस्वी झाला, तोच निषेध असतो. जसे बी.बी.मोरे साहेब म्हणाले, की महिन्यातून एकदा महासभा येते त्यात शहराच्या विकासाची कामे आणली जातात,म्हणुन हे उचित नाही. कारण हा निर्णय महाराष्ट्र शासनाचा आहे. आमची उल्हासनगर महानगरपालिका महाराष्ट्र शासनाच्या वरचढ नाही. महाराष्ट्र शासनाच्या नियमाचे पालन करून सर्वांना वागायचे आहे. माझ्या मते आमचे जे सहयोगी आहेत. शिवसेना नगरसेवक उपमहापौर यांनी या प्रस्तावास स्थगित करावे. तर चांगले होईल, कारण बंद च्या वेळेस आम्ही सर्व सोबत होतो. तोच निषेध झाला. १ ते ५ कॅम्पमध्ये शहरात दुकान वा वाहन सुरू नव्हते, म्हणुन या सभेची कार्यवाही शांततेने चालवावी अशी मी महापौरांना विनंती करीत आहे.

मा.महापौर :- कुणी बोलू इच्छितो?

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- महापौर साहेब जर स्थगन प्रस्ताव नाही मानत तर, ठराव मतदानासाठी टाका.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- मा.महापौरजी, जसे की आपल्या सत्तेपूर्वी आमची सत्ता होती. दोन वर्षे आपण विरोधी पक्ष होता तेव्हा आम्ही आपणास भरपूर संधी दिली होती. बोलण्यास जेव्हापासून आपण सत्तेत आहात तेव्हापासून आपण बोलण्याची संधी आम्हाला देत नाही. हे मानतो की, मतदान घेतले तर तुम्ही जिंकालच. परंतु आम्ही जनप्रतिनिधी आहोत जनतेस माहित पडले पाहिजे की, आम्ही त्यांच्यासाठी भांडत आहोत. प्रत्त्येक वेळी आपण त्यांना जास्त बोलू देता, आम्हाला नाही? असे का? याचा अर्थ आपण सत्ताधारींना आत्मविश्वासच नाही आहे. विश्वास नाही की तुम्ही जिंकू शकाल. आम्ही कमी संख्या असून देखील समजायचे हारलो, असे कसे समजायचे हारलो.

मा.महापौर :- मागील १४ महिन्यापासून ज्यापण सभा झाल्या, त्यात इतिवृत्तातुन माहित पडेल की, विपक्षांना जास्त संधी दिली गेली आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- नाही दिली. जेव्हा आपण संधी दिली आपले सत्ताधारी पक्षाचे सदस्य मध्येच उठून बोलतात का हे समजत नाही.

मा.महापौर :- यु कॅन टेक अप द होल रेकॉर्ड, व्हीडीओ कॅसेट, पाहून आपणास माहिती पडेल विपक्ष जास्त बोलतो.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- ऐका, महापौरजी, आम्ही एक वाक्य बोलल्यावर सुभाष मनसुलकरजी व बी.बी.मोरे उठून विरोध करतात. तर ही बोलण्याची संधी नाही देत आपण.

मा.महापौर :- असे काही नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपण फक्त मला वाक्य बोलण्याची संधी देत आहात. आताच पहा मोरे कसे बोलतात. सत्ताधारी पक्षास, विश्वास आपल्या युतीवर, विश्वास आहे की, जिंकु तर आम्हाला बोलू का देत नाही.



आम्ही जनतेचा आवाज आहोत. ॲपोझिट पार्टी इज ऑल्वेज वॉच डॉग फॉर द रूलिंग पार्टी. आम्हाला संधी तर दिली पाहिजे बोलायची.

मा.महापौर :- या सभेत सर्वांना बोलण्याचा समान अधिकार आहे. तो सदस्य विपक्ष चा असो वा सत्ताधारी चा त्यात काही फरक नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- म्हणजे एकाच वेळी १० जणांनी बोलायचे असे झाले ना?

मा.महापौर :- एकावेळी एक जण बोलेल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- मग जेव्हा आम्ही बोलतो तेव्हा तुमचा सत्ताधारी पक्ष आमच्यावर असे आक्रमण करतो.

मा.उपमहापौर :- मा.महापौर, बोलू मी?

मा.महापौर :- हो, बोला ना.

मा.उपमहापौर :- मनसुलकर जी, महापौरांची परवानगी घेतली आहे, मागच्या वेळेस तुमचा गैरसमज झाला होता, परवानगी नाही घेतली, मी घेतली आता. महापौरांचा अपमान वगैरे तसे काही नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रथम मी आढाव साहेबांचे धन्यवाद मानतो. त्यांनी आता सभागृहासमोर परवा जे बंद होते ते उल्हासनगर मध्ये पाळले. त्यांचे अभिनंदन करून आभार मानतो. परवा महाराष्ट्र शासनाने बाळासाहेब ठाकरेंना अटक करण्याचे जे आदेश दिले होते. त्याविरूध्द शिवसेनेने बंद चे आयोजन केले होते. शिवसेना बी.जे. पी ने त्यास उल्हासनगर च्या सर्व व्यापारी वर्गाने व नागरिकाने समर्थन दिले होते. आता आमचे आढाव जी म्हणाले, की सर्व पक्षाने सहकार्य दिले. व्यापारी वर्गाचे मी आभार मानतो. जसे आढावजी म्हणाले की, सर्व पक्ष बंद मध्ये शामील होते. त्यासाठी सर्व पक्षास मी धन्यवाद देतो की, सर्व पक्ष हे मानतात की, महाराष्ट्र शासन जे करते ते चुकीचे आहे. सर्वांच्या ते लक्षात आले म्हणून तर समर्थन दिले, बरोबर आढावजी?

मा.महापौर:- एक मिनिट.

मा.उपमहापौर :- मला बोलू दया. मी नेहमीच ऐकतो, फक्त पाच मिनिटे ऐका.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- माझ्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, एकदा बंद पाळला तर दुस-यांदा काय गरज?

मा.महापौर :- माझे उपमहापौरांना निवेदन आहे की, पक्षा बाबत न बोलले तर योग्य होईल.

मा.उपमहापौर :- मी कोणत्त्या पक्षाचे नाव नाही घेतले. आढाव साहेब म्हणाले की, सर्व पक्षाने समर्थन दिले होते. उल्हासनगर मध्ये एक ते पाच कॅम्प बंद होते, एक पण दुकान उघडे नव्हते, म्हणजे महाराष्ट्र शासनाने जी कार्यवाही केली त्यास सर्व पक्षाचा निषेध होता. मी असे नाही म्हणत वारंवार निषेध झाला पाहिजे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-मी गटनेता म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेत आर.पी.आय चा विरोध दर्शविला होता.



मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- बी.बी.मोरे कोणत्त्या गटाचे आहेत. ते त्यांनी प्रथम स्पष्ट करावे. आठवले गटाचे आहेत की, गवई गटाचे ते स्पष्ट करा आधी मग गटनेता बना.

मा.उपमहापौर :- हे असे करतात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण, काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौर :- श्री.चौधरी उपमहापौरांना बोलू दया.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-कृपया उपमहापौरांचा अपमान नका करू, प्लीज.

मा.उपमहापौर :- मोरे साहेब, तुम्ही म्हणता विरोध केला, आढाव म्हणतात निषध केला मला तुम्ही परत आढावांचे नाव घ्यायला लावता ना? तुम्ही गटनेता आहात म्हणजे आम्ही नक्की काय समजायचे. जे आढाव साहेब बोलले तेच मी बोलतो.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- माझा उददेश वेगळया प्रकारचा होता की, एकदा निषेध झालेला आहे परत निषेध होऊ नये. या दृष्टीकोनातून बोलत आहे. माझा मुददा वेगळा होता.

मा.उपमहापौर :- तेच मी म्हणतो, निषेध झाला आहे. शिवसेने ने ज्या भावना मांडल्या त्यास उल्हासनगरच्या जनतेने प्रतिसाद दिला.
काही सदस्य :- हिंदीत सांगा.

मा.उपमहापौर :- हिंदीत बोलू, ठिक आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मराठी शिका.

मा.उपमहापौर :- जनतेने निषेधास उत्त्कृष्ठ प्रतिसाद दिला, जसे प्रकाश महाडिक जे म्हणाले की महाराष्ट्र शासनाने अब्बु आजमी व मा.बाळासाहेब ठाकरे यांची तुलना केली. एक देशद्रोही आहे, एक देशप्रेमी आहे. दोघांना एका तराजूत ठेवून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. जनतेने आपले कर्तव्य केले होते, आमचे नगरसेवकांचे पण कर्तव्य आहे, भावना आहेत, आपली भावना आम्ही महापौरांसमोर मांडली, त्यास स्विकारणे, न स्विकारणे किंवा जसे महाडिक म्हणाले यावर मतदान घ्या, हिंदुत्त्व मुदयाबाबत व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रति जो आदर आहे ते प्रकट करण्याची वेळ नाही आली पाहिजे. असे नाही वाटले पाहीजे की, त्यांच्या विषयी आदर नाही आहे अशी संधी, वेळ नाही आहे म्हणून मी महापौरांना विनंती करतो की, जसे १९ तारखेस आयुक्त नसल्याने सभा पोस्टपॉन्ड केली. अन ऑफिशियली अशी सभा स्थगित नव्हती. प्रकाश महाडिक ने विचारले असे करू शकतो

का. तेव्हा महापौर म्हणाले मी उपमहापौरांना पण विचारले, सभा ठेवायचा त्यांचा अधिकार आहे, मी त्यांना नाही म्हणू शकत नाही. पर्सनल लेवलने, याचे उत्तर विधी अधिकारी देतील. जसे महाडिक ने प्रस्ताव ठेवला माझ्यामते तो स्विकार केला पाहीजे. कारण उल्हासनगर च्या सर्व जनतेची भावना ही आहे की, महाराष्ट्र शासनाने जे पाऊल उचलले ते चुकीचे आहे. म्हणुन प्रस्ताव स्विकारावा हि माझी विनंती आहे.

<u>मा.महापौर</u> :- सदनात श्री.प्रकाश महाडिक व श्री.भिमसेन मोरे यांचे तर्फे सभेस स्थगन करण्याचा जो प्रस्ताव आला आहे त्याविषयी मी नंतर बोलेन, त्याआधी



महाडिकांनी १९ तारखेची सभा २० ला घेण्याचे कारण विचारले. मी त्यांना सांगु इच्छितो की, जेव्हा जेव्हा आयुक्त सदनात उपस्थित नव्हते तेव्हा सदनातील सन्माननीय सदस्यांनी नेहमी यासंबंधी हरकत घेतली आहे की, उपायुक्त बसतात त्यांना काय अधिकार आहे? दोन-तीन सभेत असे आढळले की, उपायुक्त उपस्थित राहिल्यानंतर सदनातील सदस्यांना जे समाधान मिळाले पाहिजे ते, मिळत नाही. त्यांच्या प्रश्नाचे व हरकतीचे हे आयुक्तांना अनुभवले आहे. मी पण अनुभवले आहे. सदनातील सर्व सदस्यांनी अनुभवले आहे. ही गोष्ट लक्षात ठेवली म्हणून आयुक्तांनी सांगितले की काही महत्त्वाच्या याचिकेची उच्च न्यायालयात तारीख सुनावणी आहे. या याचिका शहर व महानगरपालिकेच्या आहेत. जर १९ तारखे ऐवजी २० ला सभा ठेवाल तर मी उपस्थित राहीन. १९ ला जरी ठेवली तरी हजर राहीन असे त्यांचे म्हणणे होते, पण माझे मुंबई उच्च

न्यायालयात जाणे व जे महानगर पालिकेचे वकील आहेत. त्यांना समजावणे जरूरीचे आहे. तुम्ही जसा निर्णय घ्याल त्याप्रमाणे मी स्वतः उपस्थित राहीन. मला पण असे वाटले की, मुंबई उच्च न्यायालयात ज्या याचिका आहेत. तिथे आयुक्त जाऊन उल्हासनगर महानगरपालिकेच्या वकीलांना नीट त-हेने समजवतील तर जे निर्णय होतील ते शहराच्या महानगरपालिकेच्या हितात होतील. म्हणून मी आमचे सहयोगी, वेगवेगळया पक्षांच्या नेतागणांशी विचार विमर्श करून नंतर विपक्ष नेता, उप महापौर व भाजपा चे गटनेता यांना पण मी विचारले ते पण हो म्हणाले ठिक आहे. तसे पण सर्व सदस्यांची ही इच्छा असते की, आयुक्तांनी सदनात उपस्थित रहावे. हे एकमत मी घेतले व त्यानंतर सभा एका दिवसासाठी पोस्टपॉन्ड केली. ही स्थगन सभा नाही आहे. हि फ्रेश सभा आहे. एक दिवस पोस्टपॉन्ड करून दुस-या दिवशी ठेवली. सभा स्थगन करून दुस-या वेळेस ठेवण्याचा जो प्रस्ताव आहे त्यासंबंधी मी असे म्हणेन की, मा.बाळासाहेब ठाकरे हे फक्त महाराष्ट्राचे वरिष्ठ नेता नाही तर भारताचे ते वरीष्ठ नेता आहे, त्यातून एक आहे. देशाचे जे वरिष्ठ नेता आहे ज्यांच्याविषयी आम्हाला आदर आहे. त्यातून हे एक आहे, परंतु हा कायदयाचा मामला आहे. महाराष्ट्र शासनाने जो निर्णय घेतला त्यात आम्ही हस्तक्षेप नाही करणार. तरी पण सदनाचे जे मत आहे. तो आजच्या सभेला स्थगन करण्याचे नाही आहे. आणि तसे पण यासाठी शहर एक दिवस बंद होते. उपमहापौर म्हणाले सर्व पक्षाने सहयोग दिला. मी त्या संबंधी नाही बोलू इच्छित कारण असे अनेक राजकीय पक्ष आहेत. त्यांचे वेगळे मत आहेत, जी कार्यवाही महाराष्ट्र शासन करत आहे त्यासंबंधी सदनात चर्चा करणे योग्य नाही. आजची सभा स्थगित न करावी असे माझे म्हणणे आहे. सदनाची कार्यवाही पूर्ववत सूरू राहील.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी, जर स्थगन प्रस्ताव पारित नाही करायचा तर, खेदाने म्हणावे लागते आपण मतदान घ्या. जर बहुमताने होते जसे कायदयात लिहिले आहे, जर बहुमताने निषेध मान्य नाहि होत तर.. ....

मा.महापौर :- हे पहा महाडिक जी, उपमहापौरांचा जो सल्ला आहे, मतदान न घेतले जावे. त्यांच्याशी मी सहमत आहे.

मा.उपमहापौर :- महापौरजी, मी असे म्हणालो की, मतदान घेण्याची वेळ न येवो म्हणून विनंती केली होती, मत न घेतले जावे असे नाही म्हणालो.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- महापौर साहेब, हिंदु हृदय सम्राट मा. बाळासाहेब ठाकरेंना तुम्ही म्हणालात देशाचे नेते आहेत. आज जी महासभा ठवली त्यात काही महत्त्वाचे विषय नाही आहे त्यांना तुम्ही देशाचे नेते म्हणता, शहराचे प्रथम नागरिक असे म्हणतात, तर सभा तहकुब केली. निषेधार्थ काय अडचण येणार आहे. सभेत विषय पण महत्त्वाचे नाहीत, महत्त्वाचे विषय असते तर सभा घेतली असती. महापौरजी, तुम्ही त्यांना राष्ट्राचे नेते म्हणाले, महाराष्ट्राचे नाही. हिंदु हृदय सम्राट सिंधी भाषिकांचे आवडते नेते आहेत कारण बाळासाहेब ठाकरे जेव्हा उल्हासनगर मध्ये येतात तेव्हा म्हणतात सच्चे हिंदु सिंधी भाषिक आहेत. याचा अभिमान तर पाहिजे तुम्हाला. सभा तहकुब करा.



मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- मोरे तुम्ही महापौरांना मोहात नका टाकु?

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :- जसे महाडिकजी, म्हणाले की, हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंवर महाराष्ट्र शासनाने कार्यवाही केली त्याच्या निषेधार्थ ही सभा तहकुब झाली पाहिजे. या व्यतिरिक्त दुस-या दिवशी ठेवली पाहीजे. आपल्या भाषणात ते हे पण म्हणाले की, ते हिंदुचे मसीहा आहे. माझे ते मसिहा नाहीत. प्रत्येक पक्षाचे ते मसीहा नाहीत. असतील ते मसीहा शिवसेनाचे व इतर कोणाचे. उल्हासनगर महानगरपालिकेची सभा महिन्यातून एकदा होते त्यात शहराचे प्रत्येक मुददे येतात. शहराच्या विकासासाठी, भवितव्यासाठी जे मुददे येतात, प्रत्येक सदस्य प्रश्न विचारतात प्रश्नाचे उत्तर मिळतात महिन्यातून एकदा आणि ही बाब कायदयाची आहे जसे आपण म्हणालात कायदयापूढें व्यक्ती मोठी नसते. कायदा सर्वात श्रेष्ठ आहे मी हे म्हणेल या प्रस्तावाकडे न जाता सभा पूर्ववत चालू ठेवावी. आमच्या सदस्यांनी प्रश्न विचारले त्याचे उत्तर मिळाले पाहिजे, प्रत्येक सदस्याचे प्रभागातील लोक टिव्हीवर प्रश्न पहात असतील, कुणी पाण्यासंबंधी विचारतो, कुणी सफाईसाठी विचारतो. आमचे सदस्य त्यावर काय काय बोलतात हे जनता पाहते. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, सभा पूर्ववत सुरू करावी विषय पत्रिकेचा विषय घ्यावा.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-मा. महापौरजी, प्रत्येकानी आपआपले विचार प्रकट केले तरी पण मी आपणास विनंती करते की, उपमहापौर व महाडिक साहेब म्हणाले वोटींग करा, प्लीज वोटींग करा.

मा.महापौर :- माझी इच्छा आहे मतदान होवू नये. सदनाचे मत आहे सभा स्थगित नाही झाली पाहीजे. मतदान नाही झाले तर चांगले होईल.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- प्रत्येकाचे विचार आपण ऐकले आपण म्हणता मतदान न होवो,वोटिंग यासाठी होते की, कोणाला कोणासाठी कितपत आदर आहे, श्रध्दा व प्रेम आहे.

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :- मा.महापौरजी, हा सभेचा विषय नाही, मतदान घेण्याची गरज नाही.

श्री.प्रकाश माखिजा व श्री.रामचंद्र पारवानी ५.०५ वाजता सभागृहात आले.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी:- कायदयात मतदान तरतुद नाही का? कृपया सचिवांना विचारा.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- नियमात स्पष्ट लिहिले आहे की, पिठासिन अधिका-यास चर्चेशिवाय ठराव मतदानास टाकता येतो. मतदान घ्यावेच लागेल. सभा तहकुब करा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. पदमा वलेचा व मोना वनवारी हया सायं. ५.१५ वा.महासभेतून बाहेर निघुन गेल्या.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- मा.महापौरजी, आमचे भाजपा चे सदस्य व्यस्त आहेत म्हणून आमचे पण हेच म्हणणे आहे की, ही सभा तहकुब करावी दोन दिवसासाठी सुभाष मनसुलकरजी, असे म्हणतात. की ही महासभा जनतेसाठी होते. प्रश्नोत्तरे झाली पाहिजेत. प्रश्नोत्तरे करणारे आम्हीच आहोत ना? विपक्ष आम्ही विनंती करतो दोन दिवस सभा स्थगित करा.



मा.महापौर:- मी परत एकदा सदनाला निवेदन करतो, मेहरबानी करून वोटींग न घेतले जावे. सदनाचे मत आहे आजच्या सभेची कार्यवाही चालू ठेवावी.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी:- आपले मत असे आहे तर, आमचे मत असे आहे की, आपण आमचे मनाच्या गोष्टी समजा, वोटींगची जर तरतुद आहे तर सचिवांना सांगायला सांगा. जर तशी तरतुद नसेल तर वोटींग नाही करणार. हा सभेचा विषय नाही स्थगन प्रस्ताव आहे.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे:- मा.महापौरजी, सचिव साहेबांना बोलू दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- हा विषय नाही मतदान घ्यायला.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी :- मोरे तुम्हाला महानगरपालिका नियम माहित आहे का? महानगरपालिका नियम माहित नाही आले सांगायला.

मा.सचिव :- सभा स्थगन चा जो प्रस्ताव आहे, कुणीपण दिला असो त्यासाठी मत घेणे जरूरी आहे. बहुमताने निर्णय होईल.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक /श्री.राजेंद्र चौधरी / मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- (टेबल वाजवत) ऐका बी.बी.मोरे ऐका.

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :- मा.महापौरजी, स्थगन प्रस्ताव लेखी आला आहे का? प्रश्नोत्तरे विषय चालू होणेपूर्वी लेखी दिले का?

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- सुभाषजी, तुम्हाला नियम माहित नाही.

मा.सदस्या श्रीमती.ज्योती कालानी :- मा.महापौरजी, सर्वात प्रथम हे सांगा की, ज्या पाच लक्षवेधी आल्या आहेत त्या आपण दाखल केल्या का? कोणती दाखल केली कोणती नाही. मतदान कसे घेता आपण?

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- स्थगन प्रस्ताव आहे हा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सचिव</u> :- कृपया लक्ष दया. मी माहिती देतो. जेव्हा एकदा सभा सुरू होते तेव्हा कुणाला लक्षवेधी किंवा निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या निश्चित प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून स्थगन प्रस्ताव किंवा श्रध्दांजली प्रस्ताव असो आणु शकत नाही. प्रश्नोत्तर तासात नाही आणू शकत. कृपया लक्ष दया यांचा जो स्थगन प्रस्ताव आहे. तो चर्चा करण्यासाठी नाही आहे, सभा तहकुब करण्यासाठी आहे. तो केव्हाही आणू शकतात. जर चर्चा करायची असती तर प्रश्नोत्तर तासांनंतर आणला जातो. दुसरी गोष्ट एकदा प्रश्नोत्तर विषय वाचल्यानंतर एका नंतर एक सदस्य उठून चर्चा करतात हे प्रश्नोत्तरा नंतर झाली पाहिजे हे नियमाच्या विरूध्द आहे जो पर्यंत प्रश्नोत्तर तास संपत नाही. त्याशिवाय इतर विषय नाही आणले पाहिजे. मी दोन प्रकारचे प्रस्ताव सांगितले. एक स्थगन प्रस्ताव असा असतो. सभा तहकुब करण्यासाठी प्रस्ताव असतो तो केव्हाही आणू शकतात. जर सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करायची असेल तर प्रश्नोत्तरानंतर स्थगन प्रस्ताव आणला जातो.

<u>मा.महापौर</u> :- प्रस्ताव मतदानासाठी ठेवू का?



<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-</u> मा.महापौर आम्ही विनंती केली, उपमहापौर, महाडिक यांनी विनंती केली आहे. आमची विनंती मान्य केली जावी.

<u>मा.महापौर</u> :- मी सभेचे मत घेऊ इच्छितो. स्थगित करण्यासाठी सभेची संमती हवी.

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः-</u>मा.महापौरजी ठीक आहे. विचारा नंतर मतदानाला घ्या.

<u>मा.सदस्य श्री.देवंदसिंह खेमाणी</u> :- मा.महापौरजी.....

<u>मा.महापौर</u> :- जे सदस्य सभा तहकूब करू इच्छितात. यांनी हात वर करावे.

<u>मा.महापौर</u> :- जे सदस्य सभा स्थगन करण्याच्या विरोधात आहे. त्यांनी हात उचलावे.

सदर ठराव मतास टाकल्यावर त्यावेळी उपस्थित असलेल्या मतदान करणा-या पालिका सदस्यांनी पुढील प्रमाणे ठरावाच्या बाजुने किंवा ठरावाच्या विरूध्द हात वर उचलून मत दर्शविली.

| <u>प्रस्तावाच्या बाजुने--अनुकुल मत</u> | <u>प्रस्तावाच्या बाजुने--प्रतिकुल मत</u> |
|---|---|
| १ श्रीमती सोनावणे यमुना | १ श्रीमती ज्योती कालानी |
| २ श्रीमती वेलकर सुरेखा | २ श्री.ढेणवाल बनवारी |
| ३ श्री.भांडे भगवान | ३ श्री.यादव नरेश |

४ श्री.तेजी कैलास
४ श्रीमती मिनू दासानी
५. श्री.बोडारे धनंजय
५ श्रीमती पंचशिला पवार
६ श्री.चौधरी राजेंद
६ श्री.टाले प्रमोद
७ श्री.लांडे पांडुरंग
७ श्री आढाव रामभाऊ
८ श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
८ श्रीमती बगाडे सुनिता
९ श्रीमती राजवानी सुनिता
९ श्री. किशोर वनवारी
१० श्री.वारिंगे पंढरीनाथ
१० श्रीमती लुंड लक्ष्मीबाई
११ श्री.रामचंद पारवानी
११. श्री.खेमाणी देवेंदसिंह
१२ श्री मोरे भिमसेन
१२ श्री.प्रमनानी इश्वर
१३ श्री.चव्हाण रमेश
१३ श्रीमती.वसिटा बेबी
१४ श्री प्रकाश महाडिक
१४ श्री मोरे भानजी
१५ श्री.भाटीया जयप्रकाश
१५ श्रीमती.टेकचंदानी चंद्रा
१६ श्रीमती.नाईक यशस्विनी
१६ श्री.गुप्ता प्रभुनाथ
१७ श्री.प्रकाश माखिजा
१७ श्रीमती.मालती करोतिया
१८ श्री.बहरानी ठाकूरदास
१९ श्री.सुभाष मनसुलकर
२०. श्रीमती.कुंदनानी लविना
२१ श्रीमती कांता गजवानी
२२ श्री.केणी जयकुमार
२३ श्री.पंजाबी नारायण
२४ श्री.हरदास माखीजा



खालील ५ सदस्य तटस्थ होते :-

१ श्री. पम्मीकुमार अचनानी.
२ श्री.राजु सोनावणे.
३ श्री.सुरेश जाधव.
४ श्री.कुमार आयलानी.
५ श्री.जमनु पुरस्वानी

(१७ सदस्य अनुकुल ,२४ सदस्य प्रतिकूल व पाच तटस्थ.)

(मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.३४२ / २००० बाबत दिलेल्या आदेशानुसार मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे यांचे मतदान अधिकारावर स्थगन आदेश दिला असल्याने त्यांचे मत मोजणीत घेतले जाणार नाही.)

(मत घेतेवेळी मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा गेट जवळ उभे होते म्हणून त्यांचे मत धरण्यात आले नाही.)

मा.महापौरः- सदरच्या प्रस्तावा विरूध्द बहूसंख्याने पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्रमांक :- ८ (ब) दिनांक :-२०.७.२०००

हि महासभा दिनांक २०.७.२००० रोजी ची महासभा इतर कोणत्त्याही दिवसा पर्यंत सभा तहकूब करण्या बददल ठरावास विरोध करित आहे. व सदर सभेतील कार्यसूचीवरील कामकाज तसेच चालू राहील असे निश्चित करित आहे.

बहूसंख्याने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्व साधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.महापौर :- सभेची कार्यवाही चालू राहील.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- सभा त्याग करा.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी:- या मुददयाविरूध्द १० मिनिटासाठी सभा त्याग करीत आहोत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- एक मिनिट.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

इकडे विपक्ष पक्ष, शिवसेना, भाजपा जिंदाबाद तर सत्ताधारी पक्ष,कॉंग्रेस आर.पी.आय अपक्ष युतीचा विजय असो असा घोषणा देत होते व विपक्ष सदस्य ५ ३२ वा. सभा त्याग करून निघुन गेले.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- मा.महापौर, दोन मिनिटे, आजच्या महासभेत जी पण आतापर्यंत चर्चा झाली ती, इतिवृत्तातून काढली जावी. दुसरे प्रश्नोत्तराचा जो तास होता तो १ तास संपला. तो इथेच संपवून कार्यसूचीचे इतर विषय घेऊन सभा समाप्त करावी. ही विनंती आहे इतर विषय घ्यावे.



मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- नाही, नाही, प्रश्नोत्तरे चालू ठेवावी. त्यांची प्रश्नोत्तरे निघून जातील. त्यांना परत संधी नाही मिळाली पाहिजे. प्रश्नोत्तरे सूरूच ठेवा त्यांचे प्रश्न होऊन जाऊ दया.

मा.महापौर :- प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. माझ्याकडे पाच लक्षवेधी आल्या आहेत त्यातील तीन लक्षवेधी सुचना श्री.बी.बी.मोरे यांची असून त्यांनी ती मागे घेतली आहे. तसेच दोन लक्षवेधी विपक्ष पक्षांच्या सदस्यांच्या असून ते सभेत नसल्यामुळे त्या घेतल्या जाणार नाही सचिव साहेब विषय क्र.२ वाचा.
मा.सचिव :- विषय क्र.२ वाचून दाखवितात.
मागील सभेचे दिनांक १९.६.२००० सह ३०.६.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करण्याबाबत.
उपस्थित सत्ताधारी सदस्य :- पास.पास असा आवाज देत होते.

मा.महापौर :- सदरचे इतिवृत्त संमत करण्यात येत आहे. असे मी घोषित करतो.
मा.सचिव :- विषय क्र.३ वाचून दाखवत असतानाच....
उपस्थित सत्ताधारी सदस्य :-पास.पास असा आवाज देत होते.
मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पारित झाला असे मी घोषित करतो.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या टाऊन हॉल व तरण तलाव पटयाने देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर कॅम्प नं.३ मध्ये तयार करण्यात आलेल्या सेंट्रल हॉस्पिटल जवळील टाउन हॉल व महानगरपालिका मुख्य कार्यालयामागील तरण तलाव बाजूच्या मोकळया जागेसह महानग्रपालिकेच्या मालकीची मिळकत असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

१. टाऊन हॉल :- उल्हासनगर महानगरपालिकेने टाऊन हॉल चे बांधकाम व इतर सिव्हिल काम अंदाजे १० वर्षे अगोदर पूर्ण केलेले आहे. परंतु टाऊन हॉल मध्ये प्रेक्षकां करिता बसण्यासाठी खूच्या ,फर्निचर ,वातानुकूलित यंत्रणा ,फलोरिंग व विद्युतिकरण इत्त्यादी कामी निधी अभावि महानगरपालिकेने केलेले नाहित.

२. तरणतलाव :- सन १९७० मध्ये महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाचे बांधकाम करण्यात आले त्यावेळी तरणतलाव सुध्दा बनविण्यात आलेला आहे. सदर तरण तलाव बनवून ३० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. तरण तलावाच्या टाइल्स,फिल्टरेशन व संबंधित सर्व मशिनरी निकामी झालेल्या आहेत. सध्या तरण पूर्णपणे बंद असल्यामुळे त्याचा जनतेस कोणताही लाभ होत नाही. तरण तलावाजवळ महापालिकेच्या मालकीचा मोकळा भुखंड असून सदर भुखंडाचे निधि अभावी काही विकास संभव नाही.

वरिल सर्व योजना कार्यान्वित करून त्याचा जनतेस लाभ मिळवुन देण्यासाठी महानगरपालिकेला फार मोठया प्रमाणवर निधी उभारण्याची आवश्यकता आहे. परंतु महानगरपालिकेची सध्याची स्थिती लक्षात घेता ते निकट च्या काळात संभव दिसत नाही म्हणून प्रशासनातर्फे वरील तिन्ही योजना बिल्ट ऑपरेट व ट्रान्स्फर (बुलिट ,ऑपरेट ॲन्ड ट्रान्स्फर) तत्त्वावर देण्याचा प्रस्ताव तयार केला असून त्याची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे देत आहे

१. ठेकेदारास वरिल प्रत्त्येक योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रत्त्येकी कमीत कमी दोन कोटी रूपये खर्च करून योजनेचा मुळ उद्येश म्हणजे तरण तलावात पोहण्याची व्यवस्था करणे तलावाच्या लगतच्या मोकळया जागेवर व्यायाम शाळा बांधणे, टाऊन हॉल मध्ये नाटयांसमारंभ करणची सोय करणे आवश्यक राहिल.



२. महानगरपालिकेच्या मुळ उद्देश साध्य झाल्यानंतर दोन कोटी रकमेतून शिल्लक राहिलेल्या किंवा अतिरिक्त रक्कम खर्च करून ते सदर परिसरात जनतेसाठी जास्त सुखसुविधा देऊ शकतात.

३. जो ठेकेदार जास्त सुविधा देऊन योजनेवर जास्त खर्च करण्यास तयार असेल त्याची निविदा स्विकारण्यात येईल.

४. ठेकेदार सदर जागेचा उपयोग लग्न समारंभ,अद्यायवत हॉटेल बार सह, जाहिरात,प्रवेश फी,सभासद फी इत्त्यादी स्वतःच्या मर्जी नुसार आकारून निधी उपलब्ध करू शकतो.

५. ठेकेदाराने विद्युत,टेलीफान,कर्मचारी व त्याचा पगार,विमा,सुशोभिकरण देखभाल व दुरूस्ती इत्त्यादी प्रकारच्या दैनंदिन खर्च स्वतः करावयाचा आहे.

६. ठेकेदारास प्रत्येक योजना दीड वर्षाच्या आत कार्यान्वित करणे बंधनकारक राहिल.

७. सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर बिल्ट ऑपरेटर व ट्रान्सफर (बुलिट आपरेट ॲन्ड ट्रान्सफर) पध्दतीने पुढिल तीस वर्षासाठी ठेकेदाराच्या ताब्यात राहिल.

८. तीस वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर योजना (मालमत्ता मशिनरी व इतर साधन सामुग्री इत्यादी सह ) महानगरपालिकेस १ रूपया विक्रीकरार करून सुस्थितीत हस्तांतरीत करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.

९. प्रत्येक योजनेपोटी ठेकेदारास परवाना फी म्हणून महानगरपालिकेस पहिल्या ५ वर्षासाठी प्रत्येक वर्षी ३ लाख (तीन लाख) व त्यापुढिल प्रत्येक ५ वर्षाचे टप्प्यात १० टक्के वाढ करून रक्कम महानगरपालिकेस अदा करणे बंधानकारक राहिल.

१०. ठेकेदार जर योजना राबविण्यासाठी असमर्थ ठरला तर त्यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. योजना राबविल्यानंतर जर ठेकेदार परवाना फी देण्यास दिरंग्राई करीत असेल किंवा विहित केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असेल तर त्याचा करार रद्द करण्यात येऊन तयार करण्यात आलेल्या सर्व साधन सामुग्री स्वतःच्या ताब्यात घेईल.

मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार वरिल उल्लेख करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्तेच्या भाडयाने देण्याचे व परवाना फी ठरविण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेकरिता सार्वजनिक बांधकाम समिती कडे सादर.

सार्वजनिक बांधकाम समिती ठराव कं:-३ दिनांक:-३/७/२०००

सुचकाचे नाव :-श्री किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :श्रीमती.कांता गजवानी



ही सार्वजनिक बांधकाम समिती वरिल प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या टाऊन हॉल व तरण तलावाच्या बाजुला असलेल्या मोकळया जागेसह तरण तलाव या स्थावर मालमत्ता उपरोक्त प्रयोजनासाठी विकसित करणे कामी ३० वर्षाच्या कालावधीसाठी आयुक्त ठरवतील अशा अटीव शर्ती वर महासभेच्या आधिन राहून बिल्ट ऑपरेट ॲन्ड ट्रान्सफर या तत्त्वावर वर नमुद केलेल्या परवाना फी वर भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
सार्वजनिक बांधकाम समिती
उल्हासनगर महानगरपालिका

-----------------------------------------------------------------

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ९ <u>दिनांक</u> :-२०.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीम. लविना कुंदनानी.

ही महासभा सार्वजनिक बांधकाम समितीचा दिनांक ३.७.२००० रोजीचा ठराव क्र.३ कायम करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>मंजुर</u>

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे विपक्ष सदस्य परत ७.३६ वा.सभागृहात आले व सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.महापौर</u> :- सचिव जी, पुढचा विषय वाचा.

<u>मा.सचिव</u>:- विषय क्र.४ वाचत असतानाच...

<u>उपस्थित सत्ताधारी पक्षः-</u> पास.पास असा आवाज देत होते.



इकडे सर्व विपक्ष सदस्य महापौरांच्या मंचाजवळ आले. व प्रश्नोत्तरे झालीच नाही तर विषय कसे पास करता हे चुकीचे आहे असे म्हणत होते.

<u>मा.महापौर</u> :- सदरचा प्रस्ताव पारित झाला असे मी घोषित करतो.

<u>विषय</u> :- श्री.करतार मोटवानी कनिष्ठ अभियंता उल्हासनगर महानगरपालिका यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा अन्वये प्रस्तावित अपराधासाठी खटला भरणेस <u>मंजुरी देणे बाबत.</u>

---------------------------------------------

<u>प्रस्तावना :-</u>

ज्या अर्थी श्री.करतार मंगालाल मोटवानी, कनिष्ठ अभियंता,उल्हासनगर महानगरपालिका, हे सन १९७८ ते दिनांक २८.११.९६ पर्यंत कनिष्ठ अभियंता, म्हणून उल्हासनगर नगरपालिका / महानगरपालिका येथे सरकारी नोकर म्हणून काम करीत होते. म्हणून ते भा.उं.वि.सं सन १८६० चे कलम

२१ व लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम २ (क) प्रमाणे सरकारी नोकर आहेत. व सदर कालावधीत त्यांनी शासकीय नोकर म्हणून काम करीत असतांना खालील प्रमाणे गैरकृत्य केलेली आहेत.

ज्या अर्थी फिर्यादी श्री. सुभाष अप्पाजी खेर्रे तत्त्कालीन पो. उप.अधि. ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी चौकशी अंती उपलब्ध साक्षीदारांच्या जबाबा वरून व कागदोपत्री उपलब्ध झालेल्या पुराव्या वरून दि.२८.११.९६ रोजी उल्हासनगर पोलिस स्टेशन येथे सरकारतर्फे फिर्याद दाखल केलेली आहे. सदर गुन्हयातील आरोपी १) श्री.मोतीराम झमटमल खत्री, रा.उल्हासनगर २)श्री. दुल्होनूमल झमटमल खत्री५ ३)श्री.किशनचंद परशराम पहूजा ४)श्री. हीराम गिधनदास लोहाना उर्फ लासी ५)श्रीमती पूष्पाबाई हीराराम लोहाना उर्फ लासी ६) श्री.विनायक अनंत जोशी तत्त्कालीन दूय्यम निबंधक उल्हासनगर ७)श्री.व्दारकानाथ गोविंद निजाई तत्त्कालीन दूय्यम निबंधक उल्हासनगर (सध्या सेवानिवृत्त) ८) श्री.रणजित जयसिंगराव घोरपडे तत्त्कालीन एकत्रीकरण अधिकारी,ठाणे. ९)श्री.हिरामण मोहन बैसाणे रेंन्ट कलेक्टर,प्रशासक कार्यालय,उल्हासनगर १०)श्री. वसंत अर्जुन कदम तत्त्कालीन सहाय्यक प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत, छावणी क्र.२ ११)श्री.एम.बी.आठवले तत्त्कालीन पी.ए. कम असिस्टंट ॲडमीनीस्ट्रेटर,छावणी क्र.२ (सध्या सेवा निवृत्त) १२)श्रीमती सुगंधा बाळया कौसीक,तत्त्कालीन अव्वल कारकून सहाय्यक प्रशासक,छावणी क्र.२ १३)श्री. सुदाम नामदेव गवई,तत्त्कालीन सहाय्यक प्रशासक,छावणी क्र.२ १४)श्री.रमेशचंद राजाराम कापडे, तत्त्कालीन सर्व्हेअर सहाय्यक प्रशासक,छावणी क्र.२ १५)श्रीमती. रेश्मा किशोर पमनानी, लिपिक, उप-विभागीय अधिकारी, कार्यालय, उल्हासनगर १६)श्रीमती हिरू दौलत बेहरानी तत्त्कालीन अव्वल कारकून उप विभागीय अधिकारी कार्यालय उल्हासनगर १७)श्री. गोपाळ धावरदास राजवानी १८)श्रीमती सुनिता गोपाळ राजवानी १९)श्री.मुलचंद सोनेसर २०)श्री.मधु वेडोमल भंबानी २१)श्री.महेश्च किशनदास लालवानी. २२)राजकुमार डेटामल खेमानी २३)श्री.राजेश गवालदास रूपचंदाणी २४)श्री.करतार मंगालाल मोटवानी कनिष्ठ अभियंता,उल्हासनगर नगरपालिका २५) श्री.मोहन गणपतराव राऊत तत्त्कालीन नगररचनाकार उल्हासनग्र नगरपालिका, २६)श्री. भगिरथ गोविंद तूमडे तत्त्कालीन तहसिलदार, व विशेष अधिकारी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग, उल्हासनगर नगरपालिका,(सध्या मयत ) २७)श्री.हरदास सन्मुखदास माखिजा, तत्त्कालीन टी.पी.डी. चेअरमन. उल्हासनगर नगरपालिका २८)श्री.प्प्पू उर्फ सुरेश कलानी, तत्त्कालीन नगराध्यक्ष उल्हासनगर नगरपालिका २९)श्री. नामदेव महादू गायकवाड,तत्त्कालीन नगररचाकार,उल्हासनगर नगरपालिका ३०)श्री. पुरूषोत्तमदास ठाकूरदास मलाराजानी ३१)श्री.विजय पोटूमल बूटाणी



३२)श्री. निर्मल टिल्लूमल होतचंदाणी यांनी नोव्हेंबर,१९८६ ते जुन १९९६ या कालावधीज यु.नं.३८ प्लॉट नं ७०५,सीट नं.-६१ सेक्शन ७ (ब),उल्हासनगर .२ या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या ५,९३४० <u>१/९</u> चौ. यार्डक्षेत्रफळाची जागा नधिकृतपणे बळकावण्याच्या इराधाने व महाराष्ट्र शासनाने नुकसान व्हावे व आप-आपला व एकमेकांना आर्थिक फायदा व्हावा या इराधाने गुन्हेगारी स्वरूपाचा कट करून सदर कट तडीस नेण्यास एकमेकास बेकायदेशिर पणे मदत करून व सहाय्य करून सदर जागे बाबतची बनावट व बेकायदेशिर दस्त ऐवज तयार करून ते खरे असल्याचे भासवून महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या यु.नं३८, सीट नं.६१ प्लॉट नं. ७०५ सेक्शन (७(ब) ),उल्हासनगर कॅम्प नं.२ येथील ५,३३४. १ / ९ चौ. यार्ड जागा प्रथम श्री.चेतनदास झमटमल खत्री, श्री.मोतीराम झमटमल खत्री, श्री दूल्होनूमल खत्री, या त्यानंतर श्री. किशनचंद परसराम पहूजा व त्यांचे नंतर श्री. हरीराम गिधनदास लोहाना श्रीमती पुष्पाबाई हरीराम लोहाना,श्रीमती तूलशीबाई झामनदास लोहाना श्रीमती ईश्वरीबाई गिधनदास लोहना, व शेवटी गोपाळदास थावरदास राजवानी, श्रीमती सुनिता गोपाळदास राजवानी, यांचे

नावे दर्शविण्यासाठी बनावट व बेकायदेशिर दस्त ऐवज तयार करून ते खरे असल्याचे व कायदेशिर असल्याचे भासवून सदर जागेवर त्यांचा कब्जा असल्याचा व सदर जागा त्यांचे मालकीची असल्याची सदर दस्त ऐवजावरून दर्शवून सदर जागेवर ३४,००० चौ.फुट क्षेत्रफळाचे १ अधिक ४ माळयांच्या (ए" विंग व "बी" विंग ) अशा दोन इमारती बांधण्यासाठी एकमेकास मदत व सहाय्य करून महाराष्ट्र शासनाच्या सदर मालकीच्या प्लॉटवर बेकायदेशिर कब्जा व अतिक्रमण करून ताब्यात घेतला व महाराष्ट्र शासनाचे आर्थिक नुकसान करून आप-आपला आर्थिक फायदा करून घेतलेला आहे. व आप-आपला आर्थीक फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला आहे त्याच प्रमाणे श्री.विनायक अनंत जोशी दूय्यक निबंधक, श्री.व्दारकानाथ गोविंद निजाई, दुय्यम निबंधक श्री. रणजित जयसिंगराव घोरपडे एकत्रीकरण अधिकारी, ठाणे तसेच श्री. हिरामन मोहन बैसाणे निलंबित रेन्ट कलेक्टर, व श्री.वसंत अर्जुन कदम सहाय्यक प्रशासक,छावणी क्र.२ श्री.एम.बी.आठवले श्री.पी.ए. कम असिस्टंट ॲडमीनीस्ट्रेटर, छावणी क्र.२ ,श्रीमती सुगंधा बाळया कौसीक, प्लॉट अव्वल कारकून, छावणी क्र.२ श्री.सुदाम नामदेव गवई,सहाय्यक प्रशासक, श्री.रमेशचंद राजाराम कापडे, सव्हेअर,श्रीमती रेश्मा किशोर पमनानी लिपिक, श्रीमती हिरू दौलत बेहरानी प्लॉट अव्वल कारकून,श्री करतार मंगालाल मोठवानी कनिष्ठ अभियंता,श्री मोहन गणपत राऊत नगररचनाकार, श्री. भगिरथ गोविंद तूमडे,तहसिलदार,श्री हरदास सन्मुखदास माखीजा टी.पी.डी. चेअरमन, श्री.पप्पू उर्फ सुरेश कलानी नगराध्यक्ष, श्री. नामदेव सहादू गायकवाड नगररचनाकार, यांनी त्यांना लोकसेवक म्हणून मिळालेल्या पदांचा व अधिकारांचा गैरवापर करून लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार न पाडता आपला आर्थिक फायदा करून घेण्याचे उददेशाने व शासनाचे नुकसान करण्याच्या इराधाने वर नमुद बनावट कागदपत्र व बेकायदेशीर कागदपत्र लबाडीने व भ्रष्ट मार्गाने तसेच सार्वजनिक हिताकडे दुर्लक्ष करून तयार केले व सदर बनावट बेकायदेशीर कागदपत्र लबाडीने बनविण्यासाठी एकमेकास तेसच वर नमुद इतर व्यक्तींना मदत केलेली आहे तसेच लोकसेवक म्हणून त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या व त्यांचे नियंत्रणाखाली असलेल्या वर नमुद शासकीय मालमत्तेची अप्रमाणिकपणे सर्व व्यक्तींनी आप-आपसांत संगनमत करून अफरातफर करून महाराष्ट्र शासनाने २६,७९,०००/-रू. चे नुकसान केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उल्हासनगर.२, यु.नं.३८, सीट.नं.६१ प्लॉट नं.७०५ या जागेचे बेकायदेशीर मिळविण्यात आलेले कागदपत्र खरे असल्याचे भासवून दि.३०.१.९५ रोजी गोपाळदास थावरदास राजवानी यांचे नावे पॉवर ऑफ ॲटनी होल्डर म्हणून श्रीमती सुनिता गोपाळ राजवानी यांनी उल्हासनगर नगरपालिकेकडे सदर जागेवर बांधकाम करण्यास परवानगी मिळणेबाबत विहीत नमुन्यातील अर्ज श्री.भंवानी यांचे मदतीने सादर केला व सदर अर्जासोबत इमारतीचे प्लॅन सादर केले, सदर प्लॅनवर सुरवातीस श्री. राजकुमार खेमानी आर्कीटेकट यांनी सहया केल्या होत्त्या, त्या दरम्यान त्यांचा परवाना रदद झाल्यानंतर सदर जुन्या



प्लॅनवरील आर्कीटेक्ट श्री.खेमानी यांच्या असलेल्या सहया व शिक्के खोडून त्यावर आर्कीटेक्ट श्री.राजेश रूपचंदाणी यांनी त्यांचे स्टॅम्प व सहया मारून फॉर्म
ऑफ सूपरविजन व विहित नमुन्यातील अर्जावर आर्कीटेक्ट म्हणून त्यांनी सहया केल्या सदर बांधकाम परवानगी मिळण्याबाबतचे प्रकरणे टाऊन प्लॅनींग विभागात प्राप्त झाल्यानंतर टाऊन प्लॅनर श्री.मोहन राऊत व कनिष्ठ अभियंता, श्री करतार मंगालाल मोटवानी यांनी सदर प्लॅनस व अर्जामध्ये आढळून आलेल्या गंभीर स्वरूपाच्या त्रुटीकडे दुर्लक्ष करून सदर त्रुटीप्रमाणे अर्ज व बांधकामाचे प्लॅनस नामंजुर करणे आवश्यक असतांना, तसे न करता वर नमुद आर्कीटेक्ट श्री.लालवानी श्री.सोनेसर तसेच श्री.रूपचंदाणी यांचे मदतीने पुन्हा नवीन प्लनर (पूर्वीचेच प्लॅनस परंतू केवळ मोजमापे कमी

अधिक दर्शाविली) असे सादर करून घेऊन व त्याबाबत आढळून आलेल्या त्रुटीकडे म्हणजे पूर्वी सादर करण्यात आलेल्या व नव्याने सादर करण्यात आलेले प्लॅनस् एकच आहेत. केवळ आर्कीटेक्ट श्री.खेमानी यांच्या सहया व शिक्के खोडून त्या ऐवजी श्री.राजेश रूपचंदाणी यांच्या सहया व शिक्के आहेत. असे आढळून आल्यानंतर देखील त्याकडे दुर्लक्ष करून श्री.मोटवानी कनिष्ठ अभियंता व श्री राऊत टाऊन प्लॅनर यांसी दि.१५.५.९५ रोजी प्रशासक,कार्यालय,उल्हासनगर या कार्यालयाचे नावाने श्री. भंबानी यांचेकडून खोटे व बेकायदेशिर सीडी.व्हेरीफीकेशन पत्र मिळवून सदर पत्रे १५.५.९५ रोजी प्राप्त होणे पूर्वीच श्री.राऊत टाऊन प्लॅनर यांनी श्री.भंबानी यांचेकडून दि. ३०.३.९५ रोजी २,५००/- रू.लाच स्विकारून दि.१०.५.९५ रोजी मुख्याधिकारी यांचे वतीने कमेन्समेंट,सर्टीफिकेटवर व प्लॅनवर सही करून ते दि.१२.५.९५ रोजी भंबानी यांचे ताब्यात दिले त्यावेळी मुख्याधिकारी म्हणून कार्यभार पहाणारे तहसिलदार श्री.भगिरथ तुमडे यांनी सदर फाईल मध्ये असलेली बनावट कागदपत्रे व त्याचप्रमाणे आढळून आलेल्या त्रुटींबाबत पुर्तता झाली किंवा नाही याची खात्री न करता तसेच बनावट सिडी. व्हेरीफीकेशनचे पत्रात सीडी.चा नंबर २१९० असा असताना व प्रत्यक्षात सि. डी.मध्ये २१९४ असा नंबर असतांना त्याची खात्री न करता बेकायदेशिरपणे दि.१६.५.९५ रोजी श्री. गोपाळदास राजवानी यांचे नावे वर नमुद जागेवर बांधकाम करण्या बाबतची परवानगी दिली व सदर बांधकाम परवानगीच्या आधारे श्री.पुरूषोत्तम मूलराजानी श्री.विजय बूटानी व श्री.निर्मल होतचंदानी यांनी सदर जागेवर १२३३.८६ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम करण्यास परवानगी दिली असतांना त्या ठिकाणी ३४,००० चौ.फुट.(३,७७७ चौ.मी.) बांधकाम करून १ अधिक ४ माळयांची (ए) व (बी)विंग असलेली इमारत बांधली व अशा प्रकारे सदर महाराष्ट्र शासनाचे जागेवर वर नमुद केल्याप्रमाणे इमारत बांधल्याने महाराष्ट्र शासनाचे २६,७९०००/-रू चे नुकसान केलेले आहे. सदर गुन्हयातील खाजगी इसम आरोपीत यांनी बनावट कागदपत्रीचे आधारे आपला हक्क प्रस्थापित केलेला असून सदर गून्हयातील सरकारी नोकर आरोपीतांनी बेकायदेशीर व भ्रष्टाचारी मार्गाने व लबाडीने सदर खाजगी इसम यांना सहाय्य केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उल्हासनगर पोलिस स्टेशन गु.नोंद क्र. २०१ /९६ भा. द.वि.सं.कलम १२०, (ब), १०९,४६५,४६६,४६७,४६८,४७१,४७७, (अ), ४०९,४२०,२०१ तसेच लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३ (१)(क)(ड)सह १३(२) प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयाचें तपासाचे कागदपत्रांचे अवलोकन व खात्री करून आम्ही अभिप्राय देतो की, वरील कृत्याप्रमाणे प्रस्थापित होणा-या गुन्हयांसाठी श्री. करतार मंगालाल मोटवानी, कनिष्ठ अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका, यांचे व इतर आरोपींचे विरूध्द सार्वजनिक न्यायाचे हिताचे दृष्टीकोनातून मा.न्यायालयात खटला भरावयास पाहीजे व सदर खटला दाखल करणेस व न्यायाधिशांना दखल घेण्याकरीता, लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१)(क)प्रमाणे मंजुरी आवश्यक आहे.



<u>महासभा ठराव क्रं.</u> १० <u>दिनांक</u> :- २०.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.बी.बी.मोरे

अनुमोदकाचे नावः- श्री.सुभाष मनसुलकर.

ही महासभा वरील गून्हयांचे संदर्भात उल्हासनगर महानगरपालिका म्हणून श्री.करतार मंगालाल मोटवानी, कनिष्ठ अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांना महापालिकेच्या सेवेतुन काढून टाकणेस सक्षम आहे. त्याचप्रमाणे हया महासभेस अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत म्हणून श्री. करतार मंगालाल मोटवानी, कनिष्ठ अभियंता उल्हासनगर महानगरपालिका यांचेवर वर नमुद केलेल्या कृत्यामुळे प्रस्तावित होणा-या अपराधासाठी भारतीय दंड विधान संहिता कलम १२०, (ब), १०९ ,४६५ ,४६६ ,४६७ ,४६८ ,४७१ ,४७७, (अ), ४०९ ,४२० ,२०१ तसेच लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७ ,१३ (१)(क)(ड)सह १३(२) प्रमाणे सक्षम न्यायालयात खटला भरण्यासाठी मंजुरी देत आहे.

तसेच सदरच्या ठरावाची. अंमल बजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेले संपूर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहित असुन संबंधित प्राधिका-यांना मंजुरीचे आदेश कळविणे ही त्यांची जबाबदारी राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.महापौर :- सचिव जी, पुढचा प्रश्न वाचा.

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचत असताना.

सत्ताधारी पक्ष :- पास- पास

मा.सदस्या श्रीमती सुरेखा वेलकरः- छगन भुजबळ.....

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, प्रश्नावर चर्चा करायची आहे.

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पारित झाला असे मी घोषित करतो.

विषय :-श्रीमती.शशी किशनचंद ओचानी लिपिक उल्हासनगर महानगरपालिका यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदान्वये प्रस्तावित अपराधासाठी खटला भरणेस मंजुरी देणबाबत.



प्रस्तावना :-

ज्या अर्थी श्रीमती शशी किशनचंद ओचानी,लिपिक हया दिनांक १/४/१९८२ रोजी उल्हासनगर महानगरपालिका लागल्या असून दिनांक १५/११/१९९१ ते दिनांक ८/२/२००० या कालावधित उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागात लिपिक या पदावर काम करीत होत्त्या. म्हणुन त्या लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम २ (क)प्रमाणे लोकसेवक होते व आहेत. सदर कालावधीत त्यांनी लोकसेवक

म्हणून नोकरी करीत असताना खालील प्रमाणे भ्रष्ट व अवैध कृत्य केल्याचे आरोप आहेत.

१. तक्रारदार श्री अशोक माधवदास पारधानी,रा.६०७,सेक्शन १७,कॅम्प नं.३,उल्हासनगर,जिल्हा ठाणे यांनी शहनशहा टॉवर मधील ६०७ बी विंग हा फलॅट बिल्डर श्री.दिलीप राममोहनदास खेमानी,रा.उल्हासनगर यांचेकडून दिनांक
२०/२/९८ रोजी ३,४६,२००/- रूपयास त्यांनी व त्यांचे व त्यांची पत्नी सौ. मिरा माधवदास पारवानी,यांचे नावे खरेदी केली असल्याने सदर फलॅटचे खरेदीखत त्यांचे दोघांचे नावे करण्यात आलेले आहे. सदरचा फलॅट त्यांची पत्नी सौ.मिरा माधवदास पारवानी यांचे नावावर होण्यासाठी बिल्डर श्री.दिलीप रामरख्यानी यांनी दिनांक १८/३/९८ रोजी त्यांना पॉवर ऑफ ॲटर्नी दिलेली आहे.त्यांची नोंद डोंबिवली येथे दिनांक २९/३/९८ रोजी नोटरीकडे नोटरी करून त्यांनी घेतलेली आहे.

२. दिनांक ३०/६/९९ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेचे उपायुक्त कर निर्धारक व संकलन यांचे कडून श्री. माधवदास पारवानी यांना उपरोक्त नमुद फ्लॅट चे नाव होल्डर शहनशहा टॉवर, ६वा माळा फ्लॅट नं.६०७ बी विंग या नावावर फ्लॅटची घरपट्टी रूपये १३,९७१ रूपयाची पावती मिळाली. त्यांचे वरील फ्लॅटबाबत धारक या सदरील तक्रारदास श्री पारवानी व त्यांची पत्नी सौ.मिरा पारवानी यांचे नाव लागणे आवश्यक असल्याने ते दिनांक ३/२/२००० रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यालयात सुमारे १० वाजता जावून कर कार्यालयातील लिपिक सौ.रशी किशनचंद ओचानी यांना त्यांचेवरिल कामासंदर्भात भेटून त्यांच्याकडे चौकशी केली असता,सौ.रशी ओचानी यांनी तक्रारदार डॉ.श्री.पारवानी यांना अर्जकरून त्या अर्जाची प्रत त्यांच्या कडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार डॉ.पारवानी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेत तसा अर्ज देवून सदर अर्जाची छायांकित प्रत सौ.रशी ओचानी यांचेकडे दिली त्यासोबत वरिल फ्लॅटची ॲग्रीमेंटची छायांकित प्रत,पॉवरऑफ ॲटर्नीची प्रत त्यांनी सोबत जोडली त्यावेळी सौ.रशी ओचानी या तक्रारदार पारवानी यांना म्हणाल्या तुमचे नाव रेकॉर्ड ला लावणे कठिण आहे कारण तुम्ही फ्लॅट खरेदी केलेले ॲग्रीमेंट दुसाराम निबंधकाकडे रजिस्टर केलेले नाही. परंतु जर तुमचे काम करायचे असेल तर तुम्हाला

३. चहा पाणी म्हणुन दोन ते तीन हजार रूपये खर्च करावे लागतील,म्हणजे तुमचे काम पूर्ण करून देइन. तेव्हा तकरदार डॉ. पारवानी,रशी ओचानी यांना काहितरी कमी करा असे म्हणाले असता,सौ.रशी ओचानी या तक्रारदार पारवानी यांना म्हणाल्या कि तुम्ही दिनांक ७/२/२००० रोजी कार्यालयात येताना काही रक्कम घेवून या,तुमचे काम करून देईन,असे म्हणून लाचेच्या रकमेची मागणी केली.

४. दिनांक ७/२/२००० रोजी बारा वाजेच्या दरम्यान तक्रारदार डॉ. पारवानी हे सौ.रशी ओचानी यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन भेटले असता



५. तक्रारदार डॉ.पारवानी यांचेकडिल फ्लॅट संदर्भातील कागदपत्र पाहुन फ्लॅटचे टॅक्स पोटी १३,९७१ रूपये तसेच नोटीस फी आणि व्याज एकूण १४,४३८ रोख असावे लागतील आणि चहापाणी म्हणून तीन हजार रूपये वेगळे दयावे लागतील असे सांगुन सदरचे टॅक्स ची रक्कम व्याजासह १४,४३८ रूपये व काम करून

देण्यासाठी चहापाणी म्हणुन तीन हजार रूपये अशी रक्कम दिनांक ८/२/२००० रोजी दुपारी ११.०० ते १३.०० वाजेच्या दरम्यान त्यांचे कार्यालयात आणुन देण्यास सांगुन सौ.राशी ओचानी यांनी वरील रक्कम स्विकारण्याचे कबुल केले.

६. त्यानुसार ठाणे ॲन्टीकरप्शन ब्युरो च्या अधिका-याकडून सापळा रचण्यात येऊन दिनांक ८/२/२००० रोजी दुपारी १२.१० वाजता तकारदार डॉ.पारवानी व पंचश्री रामचंद्र मेश्राम असे सौ.राशी किशनचंद ओचानी लिपिक यांना त्यांची उल्हासनगर महानगरपालिकेचे टॅक्स विभागात जावून भेटले असता सौ.राशी किशनचंद ओचानी लिपिक

७. यांनी पंचसाक्षीदार श्री.रामचंद मेश्राम यांचे समक्ष तकारदार श्री. पारवानी यांचेकडे त्यांचे व त्यांच्या पत्नीचे नाव महापालिकेत कर विभागातील रेकॉर्ड वर लावणे कामी तीन हजार रूपये पुन्हा लाचेची मागणी स्वतःसाठी करून ती स्विकारीत असताना रंगे हात पकडण्यात आलेली आहे त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम (सन १९८८ चा ४९) ७ अन्वये दंडनिय अपराध केल्याचा आरोप आहे.

८. त्याअर्थि सौ.राशी किशनचंद ओचानी लिपिक कर निर्धारत विभाग उल्हासनगर महानगरपालिका जिल्हा ठाणे यांनी अधिकाधिक भ्रष्ट व अवैद्य साधनांनी अगर अन्यथा लोकसेवक म्हणून स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून स्वतः करीता आर्थिक फायदा मिळविला म्हणून त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे (१९८८ चा ४९) कलम १३ (१) (ड सह १३) २ अन्वये दंडनिय अपराध दाखल झालेल्या गुन्हयाचे तपासाचे कागदपत्र अवलोकन व खात्री करून आम्ही अभिप्राय देतो की वरील कृत्यामुळे प्रस्तावित होणा-या गुन्हयामधिल आरोपी सौ.राशी किशनचंद ओचानी लिपिक कर निर्धारक विभाग उल्हासनगर महानगरपालिका यांचे विरूध्द सार्वजनिक न्यायाचे हिताचे दृष्टीकोनातुन न्यायालयात खटला भरण्यासाठी व न्यायाधीशांना दखल घेण्यासाठी लाचलूचपत प्रतिबंधक कायदा, सन १९८८ चे कलम १९ (१) (क) प्रमाणे मंजुरीची परवानगी मिळणेस प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव कं</u> :-११ <u>दिनांक</u> :-२०.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री.बी.बी.मोरे.

अनुमोदकाचे नाव :- श्री.सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील गुन्हयाचे संदर्भात सौ.राशी किशनचंद ओचानी. लिपिक कर निर्धारण विभाग यांना महानगरपालिकेच्या सेवेतून काढून टाकण्यास सक्षम आहे. त्याचप्रमाणे या महासभेस अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत. म्हणून सौ.राशी किशनचंद ओचानी, लिपिक कर निर्धारण विभाग उ.म.पा.यांचेवर वर नमुद केलेल्या कृत्यामूळे प्रस्तावित होणा-या अपराधासाठी लाचलूचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १९ (१) (क)अन्वये न्यायालयात खटला भरण्यासाठी मंजुरी देत आहे.

तसेच सदरच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेले संपुर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहित असून संबंधित प्राधिका-यांना मंजुरीचे आदेश कळविणे ही त्यांची जबाबदारी राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**मंजुर**

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.उपमहापौर व रमेश चव्हाण :-सचिव साहेब हे काय चालले आहे.

मा.सचिव :- ठराव पारित घोषित करण्याचे अधिकार पिठासिन अधिकारींना आहे. तुम्ही त्यांना विचारा.
मा.महापौर :- सचिव जी पुढचा विषय वाचा.
मा.सचिव :- विषय क्र.६ वाचुन दाखवित असतानाच...
सत्ताधारी सदस्य :- पास पास असा आवाज देत होते..

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पारीत झाला असे मी घोषित करतो.

विषय :- डॉ.श्री.आर.डी.लांजेवार ,सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सभेत प्रतिनियुक्ती वरिल नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर महानगरपालिकेने तयार केलेल्या आस्थापना सूचीमध्ये सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी पदनामाची एकूण तीन पदे प्रस्तावित केली आहेत. त्यापैकी एका पदावर प्रतिनियूक्तीवर अधिकारी पाठविणेबाबत या महानगरपालिके तर्फे शासनाकडे विनंती केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय कमांक. मवेश१९९९ / ३८०१ / प्र.क्र. १०७० / सेवा३ दिनांक ९ डिसेंबर १९९९ अन्वये डॉ. आर. डी.लांजेवार यांची सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी पदावर या महापालिके कडे शासनानी नमुद केलेल्या अटी व शतीच्या अधिन राहून नेमणुक केलेली आहे.

डॉ.आर.डी.लांजेवार हे या महापालिकेत सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी या पदावर दिनांक३.१.२००० रोजी रूजु झालेले आहेत.

मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार डॉ.आर.डी.लांजेवार यांच्या नेमणुकीस शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यास कार्योत्तर

मंजुरी घेणे आवश्यक आहे. मान्य असल्यास सोबतची प्रस्तावना उल्हासनगर महानगरपालिका महासभे पुढे मान्यतेसाठी ठेवणेस अनुमती मिळावी.

महासभा ठराव क्र. १२ दिनांक :-२०.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.सुभाष मनसुलकर.

हि महासभा उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे डॉ.आर.डी.लांजेवार, सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी यांच्या प्रतिनियुक्ती वरील नेमणुकीस
शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अनुसार डॉ.आर.डी.लांजेवार,सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी यांच्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी शासनास विनंती करण्यात यावी.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.महापौर :- सचिव जी, पुढचा विषय वाचा.

मा.सचिव :- विषय क्र.७ वाचुन दाखवित असतानाच...

उपस्थित सत्ताधारी सदस्यः- पास पास असा आवाज देत होते.

विपक्ष सदस्य :- विषयांवर चर्चा करायची आहे.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः-मा. महापौरजी, हे चुकीचे होत आहे. तुम्हा लोकांची दादागिरी चालू आहे.

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पारित झाल्याचे मी घोषित करीत आहे.

विषय :- श्री.व्ही.डब्लु.भिवापुरकर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत प्रतिनियुक्ती वरील नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका अस्तीत्त्वात आल्यानंतर महापालिकेने तयार केलेल्या आस्थापना सुचीमध्ये कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य)सार्वजनिक बांधकाम विभाग पदनामाचे एक पद प्रस्तावित केली आहे. त्यावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविणे बाबत या महापालिकेतर्फे शासनाकडे विनंती केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन आदेश क्र. पीओजी /११९९ /सीआर२३५ /(९)/सेवा१/दिनांक२० नोव्हेंबर १९९९ अन्वये श्री.व्ही.डबलू भिवापुरकर यांची कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य)पदावर या महापालिकेकडे शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून नेमणुक केलेली आहे.

श्री.व्ही.डबलू भिवापुरकर हे या महापालिकेत कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य)सार्वजनिक बांधकाम विभाग या पदावर दिनांक ६.१२.९९ पासून रूजू झालेले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार श्री.व्ही.डबलू भिवापुरकर यांच्या नेमणुकीस शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यास कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे. मान्य असल्यास सोबतची प्रस्तावना उल्हासनगर महानगरपालिका महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस अनुमती मिळावी.

<u>महासभा ठराव क्र. :-</u> १३ <u>दिनांक</u> :-२०.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुभाष मनसुलकर.

हि महासभा उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे श्री.व्ही.डब्लु भिवापूरकर कार्यकारी अभियंता यांच्या प्रतिनियुक्ती वरील नेमणुकीस शासनाने नमुद केलेल्या अटी व शतीच्या अधिन राहून कार्योत्तर मंजुरी देत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अनुसार श्री.व्ही.डब्लू भिवापुरकर कार्यकारी अभियंता यांच्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे कामी शासनास विनंती करण्यात यावी.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>मंजुर</u>

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u> विषय क्र.८ वाचुन दाखवत असतानाच.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- पास पास.

--२९--

सत्ताधारी सदस्य :- पास पास असा आवाज देत होते.

विपक्ष सदस्य हरकत घेत होते. पण विपक्ष पक्ष व सत्ताधारी पक्षाच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव मी पारीत झाल्याचे घोषित करतो.

विषय :- मराठी फिल्म-फेस्टिव्हल करिता दिलेली अंशदान रक्कम रूपये १०लाख यास कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

दिनांक ३०.४.२००० रोजी दादोजी कोंडदेव स्टेडियम ठाणे येथे मराठी फिल्म फेस्टिव्हल २००० चे आयोजन करण्यात आले होते. मराठी चित्रपट निर्माता, निर्देशक अदाकार, इत्यादी यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार मार्फत विविध प्रकारचे प्रोत्साहन देण्यात येत असून सदर कार्यक्रम विविध एजेन्सीज मार्फत (स्पॉन्सर) आयोजन करण्यात आले होते.आ
योजित करण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी मा.वसंतराव डावखरे, उप-सभापती, महाराष्ट्र राज्य, विधान परिषद यांनी त्यांचे दिनांक १०.४. २००० चे पत्र व प्रत्यक्ष भेट देऊन मा.आयुक्त व मा. महापौर उल्हासनगर महानगरपालिका यांना रक्कत रूपये १०,००,०००/-(१०लाख फक्त) अनुदान देण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती.

मराठी चित्रपटास प्रोत्साहन देण्याकरिता मा.उपसभापती, महाराष्ट्र राज्य विधान परिषद यांचे विनंती नुसार मा.आयुक्त व मा.महापौर यांच्या संमतीने कार्यक्रमाची तातडी लक्षात घेऊन रूपये १०लाख दिनांक १८.४.२००० रोजी अदा करण्यात आलेले आहेत. कार्यक्रमासाठी अदा करण्यात आलेली रक्कम रूपये १० लाख यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार कार्योत्तर मंजुरी साठी महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १४ दिनांक :- २०.७.२०००.

सुचकाचे नाव :- श्री.रामभाऊ आढाव.

अनुमोदकाचे नाव :- श्री. जयकुमार केणी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मराठी चित्रपट निर्माता, निर्देशक,अदाकार इत्यादी यांना प्रोत्साहन देणे कामी महाराष्ट्र राज्यसरकार मार्फत दिनांक ३०.४.२००० रोजी दादोजी कोंडदेव स्टेडियम, ठाणे येथे आयोजित केलेल्या मराठी फिल्म फेस्टिव्हल करिता उल्हासनगर महानगरपालिके



तर्फे दिलेल्या अंशदान / अनुदान रक्कम रूपये १० लाख यास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- हे ठिक नाही ही दादागिरी चालू नाही देणार.

मा.महापौर :- सभा संपली.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, हे काय चालले आहे.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी:- हे, चुकीचे आहे. कायदयाच्या कार्यकक्षेत नाही बसत. १ तासाचा प्रश्नोत्तर तास असतो.

इकडे विपक्ष सदस्य महापौरांच्या मंचावर येऊन बोलत होते. सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सचिव :- कृपया राष्ट्रगीतावर लक्ष द्या.
जन गण मन राष्ट्रगीत म्हणून मा.महापौर श्री.हरदास माखीजा यांनी सभा ५.३८ वाजता संपविल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :- १९.७.
२०००

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३०.६.२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.६.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता बोलावण्यांत आली होती. सदरची सभा तहकूब करून दिनांक ३०.६.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर -- श्री हरदास माखीजा.

२) मा.उपमहापौर -- श्री.धनंजय बोडारे.

३ श्रीमती.सोनावणे यमुना
४ श्रीमती.ज्योती कालानी
५ श्री.ढेणवाल बनवारी
६ श्री.उमाप रामदास
७ श्रीमती. वेलकर सुरेखा
८ श्री. यादव नरेश

९ श्री. सोनावणे राजू
१० श्रीमती.दासानी मिनु
११ श्रीमती.पवार पंचशीला
१२ श्री.टाले प्रमोद
१३ श्री. आढाव रामभाऊ
१४ श्री. बगाडे सुनिता
१५ श्री. भांडे भगवान

१६ श्री. ठाकुर सेवलदास
१७ श्री. वनवारी किशोर
१८ श्रीमती.रूपचंदानी भगवती
१९ श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई
२० श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१ श्री. पमनानी ईश्वर
२२ श्रीमती वसीटा बेबी
२३ श्रीमती मटाई जोनिता
२४ श्री.चौधरी राजेंद
२५ श्री.लांडे पांडूरंग

मोहनदास

३१ श्री.पारवानी रामचंद

३२ श्री. तलरेजा विनोद
३३ श्री.रोहडा श्यामसुंदर
३४. श्री. गुप्ता प्रभुनाथ

३५. श्री.बहरानी ठाकुरदास
३६. श्री जाधव सुरेश
३७. श्री. मोरे भिमसेन
३८ श्री.चव्हाण रमेश
३९ श्री. महाडीक प्रकाश
४०. श्रीमती.वनवारी मोना
४१ श्रीमती.जेस्वानी आशा
४२ श्री. मनसुलकर सुभाष

४३ श्रीमती.नाईक यशस्विनी
४४ श्रीमती.राजानी भारती
४५ श्रीमती.कुंदनानी लविना
४६ श्रीमती.गजवानी कांता
४७ श्रीमती.भठिजा इंदिरा
४८ श्री.केणी जयकुमार
४९ श्री.आयलानी कुमार
५० श्री.अचनानी पम्मीकुमार
५१ श्रीमती राधवानी आशा
५२ श्री.माखिजा प्रकाश
५३ श्री.रामरख्यानी

२६ श्रीमती. ससाने लक्ष्मी
२७ श्री. मोरे भानजी
२८ श्रीमती. राजवानी सुनिता
२९ श्री. वारिंगे पंढरीनाथ
३०. श्री.वाधवा गिरधारी
५४. श्री जग्यासी राजू
५५ श्री किश्नानी गोदुमल
५६ श्री.सचदेव गिरधारी
५७. श्री.पंजाबी लाल
५८ श्री.केसवानी किशोर



२. श्री.भुल्लर राजेंद्रसिंह २ श्री.चौधरी गणेश ३ .वाघे शामु ४ श्रीमती मोकल सिमा ५. श्री तेजी कैलास ६ श्रीमती.टेकचंदानी चंदा ७. श्री. पुरस्वानी जमनादास ८ श्रीमती.करोतिया मालती ९ श्रीमती.साधवानी जया १०. श्री भाटीया जयप्रकाश ११ श्री.राजानी नरेंद १२ श्रीमती.वलेचा पदमा १३. श्रीमती.वारिंगे पन्ना १४. श्री. पंजाबी नारायण १५ श्री.बहरानी गोप हे सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्वप्रथम वंदेमातरम् म्हणून सभेची सुरवात करण्यांत आली.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ वाचून दाखवितात, प्रश्नोत्त्तरे.....

<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे</u> :-मा.महापौरजी.....

<u>मा.महापौर</u> :- आज सभागृहात मा.आयुक्त शिंदे उपस्थित नाही कोणत्त्या तरी ट्रेनिंग मध्ये गेले आहे त्यांच्याजागी उपायुक्त श्री.कमलेश सोनाळे यांना प्राधिकृत केले आहे.मी सोनाळे साहेबांना सांगीन येथे मंचावर बसावे. श्री.कमलेश सोनाळे आयुक्त स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे</u> :- आमच्या महापालिकेच्या कर्मचा-यांचे निधन झाले आहे त्यांना श्रध्दांजली वाहून सभा सुरू करावी हे योग्य होईल.

<u>मा.महापौर</u> :- त्याबरोबर मी सदनाला सांगु इच्छितो की उल्हासनगर जिल्ह्याचे कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस डॉ. जयराम लुल्ला यांच्या वडीलांचे निधन २ दिवसापूर्वी झाले त्यांना पण श्रध्दांजली दिली जाईल. त्यांची पगडी आज आहे ५.३० वाजता हरी किर्तन दरबारात सुरू होईल. सदनाचे कित्त्येक सदस्य जाणार आहेत. म्हणून माझे निवेदन आहे सभेची कार्यवाही लवकरात लवकर सुरू करीत आहेत. ५.१५ पर्यंत सभा संपवायची आहे. कारण दोन आयटम सर्व संमतीने सर्व पक्षीय सभा घेऊन वगळण्याचा ठरले आहे. प्रश्नोन्तरे व इतिवृत्त कायम करून लवकर केले तर बरे होईल पगडीला जाता येईल.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

<u>शोक प्रस्ताव:-</u>
<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत आरोग्य विभागात कार्यरत असणारे कर्मचारी श्री.प्रकाश ढिलोर (सफाई कामगार) दक्षता पथक प्रमुख व अत्त्योंदय कामगार परिषदेचे अध्यक्ष असून दिनांक २७/६/२००० रोजी त्यांची निर्घृणपणे हत्त्या झाली.

उल्हासनगर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणिस डॉ.जयराम लूल्ला यांचे वडील श्री.नेभनदास नवनमल लुल्ला यांचे दिनांक २८/६/२००० रोजी निधन झाले.

सदर कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करण्यासाठी तसेच दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहेत.

--३--

सर्वसाधारण महासभा ठराव क्रं:- ७ क दिनांक :-३०/६/२०००

सुचकाचे नाव :- श्री. भिमसेन मोरे.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.प्रकाश ढिलोर व श्री.नेभनदास लुल्ला यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.

तसेच मृत व्यक्तींच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर:-

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-मी कधीही विषयाला सोडून बोलत नाही व ना बोलू इच्छित एका मिनिटात समस्येकडे आपले लक्ष वेधू इच्छितो आपल्या शहरात तशी पण पाण्याची टंचाई आहे. काही दिवसापूर्वी २३ जुनपुर्वी एक पत्र आले होते महानगरपालिकेत बिल वगैरे नव्हते भरले ४ करोड रूपये,म्हणून पाण्यात कपात करण्याचे पत्र पाठवले होते. शासना तर्फे व एम.आय.डी.सी.तर्फे पाण्याची समस्या शहरात जास्त वाढली आहे. मला लक्षात आहे यापूर्वी पण एम.आय.डी.सी वाले पाण्याची कपात करायचे मला लक्षात आहे त्यावेळचे लिलाधर डाके मंत्री होते. फोन करून महापौर कपात थांबवायचे व पूर्ववत पाणी वितरण व्हायचे आज माझा महापौर या नात्याने आपणास आग्रह आहे. मला हे माहित आहे की आपले

अधिकारी व कनिष्ठ अभियंता एम.आय.डी.सी. वाल्यांकडे गेले होते पण ते भेटले नाही आज सकाळी पण जाणार होते. माझी विनंती आहे महापौर या नात्त्याने आपण आपल्या स्तरावर एम.आय.डी.सी.बरोबर प्रयत्न करा जी कपात पाण्याची झाली आहे ती तरी री-स्टोर होईल.

मा.महापौर :- श्री.लाल पंजाबींनी जी सुचना सदनात दिली.मी सांगु इच्छितो पाण्याच्या कपाती संबंधी जे पत्र आले होते फॉर नॉन पेमेंट ऑफ ॲरीअर्स ४ करोड रूपये चे आम्ही आयुक्तांना त्वरीत पेमेंट दयायला सांगितले होते. १५ टक्के कपातीचे जे पत्र दिले होते ते नाही झाले पाहिजे १करोड चा चेक एम.



आय.डी.सी.ला देण्यात आला होता व १५ टक्के कपात होणार होती ती नाही झाली नेहमी प्रमाणे पाण्याचा पुरवठा करण्यात आला होता अशी वैयक्तिक
माहिती मला दिली गेली होती त्यानंतर ही वारंवार पाण्याचे जे मोर्चे येतात त्यावरून असे समजते की काहीतरी चुक होत आहे मी संबंधित सभापती व
अभियंत्यांना विचारले होते त्यांचे हे म्हणणे होते की अन ऑफिशली कपात ५ एम.एल.डी. ची पाले कनेक्शन वा शहाड वॉटर्स वर्क्स तर्फे होत आहे. आम्ही गंभीरतेने याची दखल घेतली आहे.शासनाला पाण्याची समस्या दूर करणे विषयी आग्रह करण्याची जी बाब आहे त्यासंबंधी मी सदनाला सांगु इच्छितो की २३ महिन्यापूर्वी जे अधिवेशन सुरू होते राज्य सरकारचे त्यावेळी आम्ही संबंधित मंत्रींना भेटलो व कमीत कमी १० एम. एल.डी तरी पाणी वाढवून मिळावे अशी विनंती केली त्यांनी आम्हाला आश्वासनही दिले आहे की ते संबंधित अधिकारीही सभा घेतील व उल्हासनगर मधील पाण्याची समस्या दूर करतील कमीत कमी १० एम. एल.डी. वाढवून मिळेल. मी परत तसा त्यांच्याशी संपर्क साधेन.

मा.सदस्य लाल पंजाबी :- कमीत कमी आता आपण एम.आय.डी.सी. वाल्यांनी जी कपात केली आहे ती पूर्ववत करा तर बरे होईल. आपण स्वत: लक्ष दया.

मा.सचिव :- प्रश्न क्र.४६४, ४६५ श्रीमती.यशस्विनी लवू नाईक यांचा आहे. त्या उपस्थित नाहीत म्हणून त्यांचे प्रश्न व त्यांची उत्तरे यांची आजच्या कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न:- ४६४:- अस्थायी पदे निर्माण केल्यानंतर ती पदे कीती कालावधी पर्यंत अस्तित्त्वात ठेवली जातात.
अ. ५ एप्रिल १९९७ पासून अशा पदांवर आज पर्यंत किती नेमणुका झाल्या आहेत.
ब) अशा प्रकारे अस्थायी पदावर नेमणुक केलेले किती लोक सेवेत आहेत.
क)अशा प्रकारे नेमणुक झालेले कर्मचारी आपले २४० दिवस भरून घेण्याकरिता कामगार न्यायालयाकडून स्थगन आदेश (स्टे)आणुन कीती लोक सेवेत आहेत.

उत्तर :- १)शासनाच्या मंजुरी अथवा नामंजुरी बाबत अंतिम निर्णय होईपर्यन्त.
अ) दिनांक ५ एप्रिल १९९७ पासून आतापर्यंत एकूण दहा नेमणुका झाल्या आहेत.
ब) अशा प्रकारे अस्थायी पदावर नेमणुक केलेले एकूण ५६० लोक सेवेत आहेत.

क) अशा प्रकारे नेमणुक केलेल्या कर्मचारी त्यांना सेवेतुन कमी करू नये म्हणून सगन आदेश कोर्टाकडून प्राप्त करून घेतात. त्यांची सख्या १० आहे.२४० दिवस भरून घेण्याकरिता कोणीही स्थगन आदेश आणलेले नाहीत.

प्रश्न ,४६५ :-१)हिराघाट येथील बोट क्लब ही मालमत्ता महापालिकेच्या मालकीची आहे का?

२) असल्यास आता पर्यंत त्याची दुरूस्ती का करण्यात आली नाही?

३) बोट क्लब येथे बोटी चालवणे तसेच बगीचा लग्न समारंभाकरिता भाडयाने देण्यात येत असे, आता हे का देत नाहीत? नव्याने भाडेपट्टी वर देण्यासाठी आपण काय उपाययोजना केली आहे.

उत्तर :- १) होय.

२) महानगरपालिकेच्या खाजगी करणातून बोट क्लब चालविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

३) खाजगी करणाच्या प्रकीयेमध्ये ही उपाय योजना शामिल असेल.



मा.सचिव :- प्र.क्र४६६ हा श्री.जमनादास पुरस्वानी यांचा आहे ते सभेस उपस्थित नाही, तरी त्यांच्या प्रश्नोत्तराची आजच्या कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न :- १) एक लाख से अधिक टॅक्स किती प्रॉपर्टी पर बाकी है?

२) शहर के दस ऐसे लोगों के नाम व प्रॉपर्टी का पता महासभा में जाहीर करे जिनमें ऊपर सबसे अधिक टॅक्स बाकी है.

३) वह कब तक वसूली करेंगे?

उत्तर :- १)एक लाख से अधिक टॅक्स ६० प्रॉपर्टी पर बाकी है।

२) इसकी यादी साथ में जोड दी गई है.

३) वसुली चालू है ,डिमांड नोटीस और व्हॉरंट निकाला गया है। इसके बाद मालमत्ता जब्त करने की या निलामी की कार्यवाही जल्द ही की जाएगी।

मा.सचिव :- प्रश्न क्र. ४६७ श्री. नारायण पंजाबी यांचा आहे. ते उपस्थित नाही तरी कार्यवृत्तात नोंद करण्यात आहे.

प्रश्न क्र४६७ :-१) इन जनरल बॉडी मिटिंग ऑन द क्वशचन ऑफ श्री.महाराज भुल्लर हॅनेबल मेयर हेल्स ऑर्डस फॉर द रिमूव्हल ऑफ श्री.जी. आर गर्जे डी.वाय.एमसी, सी.यु.सी फॉर व्हीच ऑन द डे ॲज ॲक्टींग कमीशनर श्री.जे.एम.ढाकरे रिस्पॉडेड ॲन्ड ॲपुव्ह फॉर द रिमुव्हल ऑफ डी. वाय.एमसी, सी.यु.सी डीडायेक्ट इफेक्ट.

प्र.१ अ)ॲज अबव्ह द सजेशन ऑफ हॅनेबल मेयर टील अप टू डेट हॅज बीन कॅरीड ऑर ऑदरवाइज? प्लीज स्पेसिफाय.

प्र.१ ब) इफ डी.वाय.एमसी, सी,यु,सी हॅज बीन रीमुव्ह वाईड इन्स्ट्रक्शन ऑफ जी.बी दॅन ? व्हाय द चेंबर इज इन युज ॲन्ड द ऑथर्टी ऑफ द सिग्नेचर बीन युटीलाइज.

प्र.१ क) ॲज पर द ऑर्डर ऑफ डी.वाय.एम.सी (एच.क्यू) श्री.ए.एस.कांबळे वाज ट्रांन्सफरड टू इनकोचमेंट सेक्शन दॅन व्हाय ही हॅज बीन अलोटेड ॲन्ड ॲज अ बीट मुकादम कॅम्प नं.५ इन द ऑथर्टी ऑफ डी.वाय.एम.सी. सी.यु.सी बीयींग अ क्लास फोर इम्पलॉई? प्लीज स्पेसिफाय.

प्र.१ ड)श्री. शिवकुमार सारस्वत वॉज रिलीव्ह इमीजीऐटली ऑन सिसिप्ट ऑफ ऑफीस ऑर्डर श्री.विजयकुमार अहिरराव हॅज बीन वर्कींग इन

इनक्रोचमेंट डिपार्टमेंट टील नाऊ व्हाय ही हॅजबीन नॉट रिलीव्ह? ऑन व्हाट कंडीशन ही हॅज बीन हेल्ड अप?
प्र.१इ) हॅज ॲन्ड व्हेन आस्क टू श्री. विजय आहिरराव इन रिस्पेक्ट टू ॲनी कंस्ट्रक्शन इन हीज ज्युरिडीकेशन द रिप्लाय इज दे आर ॲज पर प्लान ॲन्ड व्हीथ लिगलीटी थ्रू ॲज ऑन टूडे देअर आर व्हेरीयस इलिगल कंन्स्ट्रक्शन इन प्रोग्रेस फॉर एग्जाम्पल नियर गोपाल डॉ.क्लीनीक ॲन्ड ऑल्सो ऑन धोबीघाट टीयर बेडर वर्क इज गोइंग ऑन ऑन व्हीच नो रिपोर्ट हॅज बीन सबमिटेड.

<u>उत्तर :-</u> द चार्जेस ऑफ डेप्युटी कमीशनर (सीयुसी)असाइन टू श्री.व्ही. आर गर्जे हॅज बीन वीथड्रोन वाईड ऑफीस ऑर्डर नंबर यु.एम.सी / <u>जन. /इएसटी/१६१</u> दि. १६.२.२००० धीस क्वशन इज ऑलरेडी ॲनसर्ड ॲन्ड व्हेल डिसकसड इन जी.बी. मीटींग.
१ अ) सजेशनस फुलफील्ड.
१ब) श्री. गर्जे इज नॉट अक्युपाईन द पोस्ट ऑफ डी.वाय.कमीशनर (सीयुसी)बट ही हॅज असाईन द वर्क ऑफ असीस्टंट कंन्ट्रोलर अनअथराइज्ड कंन्स्ट्रक्शन ॲन्ड ही इज युझिंग द चेंबर ॲज डायरेक्टेड बाय द कमीशनर.



१.क) श्री कांबळे नाऊ ट्रान्सफर्ड टू इस्टेट डिपार्टमेंट ही नेव्हर असाईन द डयूटी ऑफ बीट मूकादम उल्हासनगर ५.
१ ड)ही व्हील बी रिलिव्ह आफटर कंप्लीशन ऑफीस पेंडींग वर्क्स.
१ इ)ही इज डायरेक्टेड टू व्हीजीट द साईट फॉर व्हीच प्लान इज ॲपुव्ह वीथ ज्यू.इंजिनियर ऑनली देन ॲन्ड देन ही हॅड रिपोर्टेड.
<u>मा.सचिव :-</u> प्रश्न कं४६८ हा श्री.प्रमोद टाले यांचा आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> ठिक आहे.

<u>प्रश्न:-</u> १)प्र. क्र.१४ मध्ये सफाई कामगार सध्या किती आहेत?
२)प्रभागामध्ये मागील वर्षी १९९९-२००० साली किती सफाई कामगार काम करीत होते? महिला सफाई कामगार व पुरूष सफाई कामगार किती?
३) प्रभागीतील सफाई कामगारांची बदली करण्यात आली आहे का? केली असल्यास कुठल्या कामाने बदली झाली,त्याजागी नविन कुठली माणसे आली?
४) सध्या सफाई करण्यासाठी सदर कामगार पुरेसे आहेत का?

<u>उत्तर:-</u> १) सध्या १६ सफाई कामग्रार कार्यरत आहेत.
२) मागील वर्षी ऐवढेच कामग्रार कार्यरत आहेत. आठ महिला व आठ पुरूष कामगारांचा समावेश आहे.
३) होय. प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आलेल्या कामगाराच्या जागेवर खालील कामगार देण्यात आलेले आहेत.१)श्रीमती.सुमन लक्ष्मण २) श्रीमती.माया दादू ३)श्री रतन श्यामजी ४)उत्तम नाना ५)श्री देवा रतन.
४) सध्या सफाई करण्यासाठी असलेले कामगार आवश्यकते नुसार पुरेसे आहेत.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न कं४६९ व ४७० श्री जमनु पुरस्वानी यांचा आहे ते उपस्थित नसुन कार्य वृत्तात त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र४६९ :-१)उल्हासनगर महानगरपालिका में गाडी पार्कींग के लिये कितने प्लॉट आरक्षित है?
२) वहांपर महानगरपालिका का पार्कींग स्थान बनाने का क्या प्रोग्राम है?
३) क्या किसी पार्कींग के प्लॉटपर किसी बिल्डरने सनद निकाली है क्या?
४) पे और पार्क सिस्टम कब तक चालू होगा?
५) अगर कोई पार्कींग का प्लॉट किसी ने हडप कर लिया है तो उस पर क्या कार्यवाही होगी, अब तक क्या कार्यवाही हुई है?

उत्तर :- १) ५
१) शहाड रेल्वे स्टेशन जवळ उल्हासनगर१
२) फर्निचर बाजार उल्हासनगर२
३)रेडक्रॉस सोसा. चे बाजुला उल्हासनगर२
४) शिवाजी चौक चे बाजुला उल्हासनगर३
५) विठ्ठलवाडी स्टेशन जवळ उल्हासनगर३

२) बहुतांश भुखंड अतिक्रमणाने व्यापलेले असल्यामुळे आजमितीस वरील जागेवर वाहनतळे बसविण्याचा कार्यक्रम नाही.
३) या कार्यालयास अद्याप अशी सनद प्राप्त झाली नाही.
४)भुखंडावरील अतिक्रमणचे निर्मूर्लन झाल्यानंतर.
५)या संबंधीची माहिती अद्याप या कार्यालयास उपलब्ध नाही चौकशी केल्यानंतरच काही कार्यवाही करता येईल.

--७--

प्रश्न कं४७०:-१)डॉल्पिन होटल के सामने का प्लॉट जिस चीजके लिए आरक्षित है ।
२) क्या वहॉ से आरक्षण हटा दिया गया है ।

३) अगर नही तो वहॉपर कंम्पाऊंन्ड वाल लगाने का परमिशन कैसे दिया गया ?
४) अगर हॉ तो वह अबप्लॉट किसके अंडर में है ।
५) इस प्लॉटवर आरक्षण तक्तीकब तक लगेगी ।
६) क्या इसकी भी जाली सनद बन गई है ।

उत्तर :- १) आरक्षण नाही.
२)प्रश्न उदभवत नाही.
३) सध्या स्थितीत जागेचा मालकी हक्क चार (४)सोसा.च्या नावावर आहे. तसेच मालमत्ता रजिस्टर उतारा ४ सोसा.च्या नावावर आहे. सदर भुखंड मंजुर विकास योजनेनुसार रहीवासी विभागात समाविष्ठ आहे. त्यामुळे कुंपन भित घालण्याची परवानगी देण्यात आली.
४) सोसायटीचा नावावर आहे.
१)मुलीधाम को.ऑ.हॉ.सोसायटी.
२)शांतीसागर को.ऑ.हॉ.सोसायटी.
३)लक्ष्मीसागर को ऑ.हॉ.सोसायटी.
४)राधासागर को.ऑ.हॉ.सोसायटी.
५)आरक्षित जागा नसल्याने बोर्ड लावण्याचा प्रश्न उदभवत नाही.
६) सनद खोटी असल्याचे दिसुन येत नाही. कारण सनद पडताळणी अहवाल एस.डी.कार्यालयाकडून प्राप्त झालेला आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र४७१ श्री.प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र.४७१ :-१) प्रभाग क्र.१४ मध्ये भरत नगर,नागसेन नगर, आम्रपाली, पंचशिल विभाग, साईबाबा नगर, येथे नळाला पाणी किती वर्षापासून येत नाही?
२) नळाला पाणी येण्यासाठी आपण काय उपाय योजना केल्या?
३)वर उल्लेख केलेल्या विभागात भरमसाठ आलेले पाणी बिल माफ करणेबद्दल आपली काय पॉलीसी आहे?
४)येथील तमाम जनतेला होत असलेल्या मानसिक, शारिरीक, आर्थिक त्रासाबद्दल महानगरपालिका काय कारवाई करणार आहे.

उत्तर :-१) प्रभाग क्र.१४ मधील आम्रपाली, पंचशिल,साईबाबा नगर येथे नियमित व पुरेश्या प्रमाणांत पाणी पुरवठा होत आहे. परंतु भरत नगर व नागसेन नगर हा विभाग वितरण व्यवस्थेच्या टोकाला वसलेला भाग असल्यामुळे मागिल कांही वर्षापासून या विभागात अपुरा व अनियमित पाणी पुरवठा होत आहे. या विभागात पाण्याची टंचाई भासत असल्याने महानगरपालिके तर्फे टूंकरने पाणी पुरवठा करणेत येत आहे, सिंटेक्स पाण्याचे टाक्याही बसविण्यांत आल्या आहेत. तसेच बोरींग खोदण्यांत येऊन त्यावर जेट पंप बसवून पाणी पुरवठा करण्यांत येत आहे.
२) नागसेन नगर येथे पाणी पुरवठा करणेचे दृष्टीने कालीमाता चौक,कुर्ला कॅम्प४ येथुन २" व्यासाची पाण्याची जी.आय.जलवाहिनीव्दारे तेथे पाणी पुरवठा करण्याची तजविज या कार्यालयामार्फत करण्यांत आली आहे. भरत नगर या भागाकरिता ६" व्यासाची अेम.अेस.ची मुख्य जलवाहिनी खासदार निधीतून (अंदाजे खर्च रू.१२,७६,०००/-)टाकण्याचे काम महानगरपालिकेतर्फे सुरू असून सदर काम प्रगतीपथावर आहे. सदरचा प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने वरील प्रयत्न करणेत आले आहेत.



३)भरत नगर व नागसेन नगर येथील ग्राहकांना पाणी बिलांची आकारणी कमीत कमी दराने केली आहे. येथील ग्राहकांनी पाण्याची बिले ३ ते ४ वर्षापासून भरली नसल्यामुळे आज ती भरमसाठ दिसत आहे. वरील विभागाात अपुरा व अनियमित पाणी पुरवठा होत असल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिके तर्फे टॅक्टरव्दारे व सिंटेक्स टाक्यांव्दारे पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. त्यामुळे पाणी बिल माफ करण्याचा प्रयत्न येत नाही.
४) वरील विभागात पुरेसा व नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत वरीलप्रमाणे प्रश्न.क्र.२ प्रमाणे उपाययोजना करण्यांत येत आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- या महापौर साहेब आयुक्त साहेब उप महापौर साहेब सदन मध्ये असलेले सन्माननिय सदस्य मी मागील ३ महिन्यांपूर्वी प्रश्न विचारले होते, पाणी पुरवठा संदर्भात नळाला पाणी येण्यासाठी तुम्ही काय काय उपाय योजना केल्या आणि विशेष करून प्र. क्र.१४ च्या परिस्थितीची कल्पना येण्यासाठी दुसरा प्रश्न विचारला होता, भारतनगर,नागसेन नगर,आम्रपाली पंचशील नगर, साईबाबा नगर येथे नळाला किती वर्षापासून पाणी येते. उत्तरे दिली आहेत या प्रश्नावर मी तिसरा प्रश्न विचारला होता वर उल्लेख केलेल्या विभागामध्ये भरमसाठ आलेली पाणी बिले माफ करण्याबद्दल महापालिकेचे काय धोरण आहे असे प्रश्न विचारले ४ था प्रश्न मी विचारला येथील तमांम जनतेस होत असणा-या मानसिक शारिरीक, आर्थिक होणा-या त्रासाबद्दल महापालिका काय कार्यवाही करणार आहे हे साधे छोटे छोटे प्रश्न विचारले आहेत. मला त्याची गोलमाल उत्तरे मिळाली आहेत मी या महानगरपालिकेला विनंती करू इच्छितो की त्यांनी मला या प्रश्नांची योग्य ती उत्तरे दयावी. आज या प्रश्नांच्या पाठीमागची पार्श्वभुमी अशी आहे. माझा प्रभाग जवळपास १० हजार वस्तीचा आहे, ३००० वस्तीचे भारतनगर आहे प्रत्त्येक विभाग २०००,१००० वस्तीचे असताना गेल्या १० वर्षापासून माझ्या प्रभागात पाणी येत नव्हते. परंतु आमच्या महापालिकेने भरमसाठ बिले पाठवली आहेत कुणाचे २५,०००/- चे कुणाला १० कुणाला ५

हजाराचे बिले पाठविली आहेत. जिथे दहा वर्षापासुन नळाला बिलकुल पाणी येत नव्हते. तिथे तुम्ही १० ,१० ,१५ हजाराची बिले पाठविली आहेत. नंतर जेटपंप व टॅक्टर तुम्ही पुरविलेत टॅक्टरचे पाणी किती दुषित होते याचा महापालिकेने विचार केला आहे का? या टॅक्टरखाली भारतनगर मधील सुनिता इंगळे नावाची चिमुरडी पोरगी चिरडली गेली प्र.क्र.१६ मध्ये बॅंकेचा इंगळे नावाचा मॅनेजर पाणी भरताना नेला गेला याची भरपाई महानगरपालिका काय करणार आहे. मोर्चे काढावे लागले आंदोलने करावी लागली. लोकांना मानसिक त्रास झाला, शारिरीक त्रास झाला याची जबाबदारी कुणाची आहे तेवढे करून सुध्दा जर आमच्या नळाला पाणी येत नसेल तर आम्ही बिले का भरावी याचे महापालिकेने आयुक्त साहेबांनी आमचे येथे निश्चित पणे विनंती राहिल की, हि सर्व बिले एक तर पूर्णपणे माफ करावी, नाहीतर योग्य ती चौकशी समिती त्याच्यावर नेमण्यात यावी. तसेच आयुक्तांनी सर्वांना समाधान वाटेल असे निवेदन दयावे ही अपेक्षा आहे.

<u>श्री.धुत कार्यकारी अभियंता (पा.पु.वि):-.</u> मा. महापौर साहेब मी धुत कार्यकारी अभियंता पा.पु.वि. प्र.क्र.१४ मध्ये भरतनगर,नागसेन नगर, आम्रपाली, पंचशिल विभाग साईबाबा नगर यात पाणी यायचे नाही. परंतु खासदार फंडातुन निधी उपलब्ध करून तेथे एक एम.एस पाईप लाईन टाकून लालचक्की बुस्टर पासून आता तिथे पाणी पुरवठा सुरू आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> धुत साहेबांनी हे कबुल केले की तीथे पाणी येत नव्हते तर बील का पाठवले? अधिकार काय आहेत? मला वाटते महापौरांनाही माहित आहे. आमचे उपमहापौर पण तेथे येऊन गेलेले आहेत त्यांना निश्चित पणे माहित आहे की भर पावसात आमच्या येथील बायका हंडयाने नाला क्रॉसकरून गुडघ्या एवढया पाण्यात जाऊन अंबरनाथ मधुन पाणी विकत



आणत होते. तिथे जर पाणीच नसेल नळाला तर तुम्हाला बिल पाठविण्याचा अधिकार काय? माझी निश्चितपणे ही विनंती आहे की तिथली बिले माफ करावी व त्याच्या पुढची पाण्याची बिले घ्यावी.

<u>काही सदस्य :-</u> हिंदीमध्ये बोला.....

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> हींदी मला जमत नाही तरी पण मी बोलू इच्छितो, आमच्या विभागात पाणी मिळतच नव्हते कार्यकारी अभियंता ने आता सांगितले की पाणी येतच नव्हते मग आम्ही का बिल भरावे?

<u>श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि ):-</u> कायदयामध्ये पहावे लागेल की काय तरतुद आहे. कोणतेही कनेक्शन ऑन रेकॉर्ड असते तो पर्यंत बिल जातच असते, प्रश्न हा आहे पाणी न येण्याचा....

<u>म.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> महानगरपालिकेने बिना पाण्याची बिले पाठवायची का?

<u>म.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :-</u> माफ करा बिल, प्रमोद टाले तुम्ही ठराव आणा, आमचे अनुमोदन आहे, माफ करू.....
मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आम्ही सहकार्य देऊ.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> हा जो प्रश्न विचारला आहे, तो माझ्या प्रभागा पुरता आहे पुर्ण शहरासाठी नाही.

__मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-__ शहरात जिथे जिथे पाणी येत नाही तुम्ही प्रस्ताव आणा आम्ही पाठिंबा देऊ. तुम्ही रूलिंग पक्षाचे सदस्य आहात, प्रस्ताव आणा.

__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-__ मा.महापौर जी मला वाटते, यांना वाटते यांचे पण माफ होईल म्हणून साथ देत होते.

__मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-__ सदनाला व आयुक्तांना माझी विनंती आहे की माझ्या प्रभागात खरोखर पाणी नव्हते तिथली बिले माफ करण्यात यावी जर ती झाली तर बाकीच्या प्रभागासाठी तुम्ही काय ते बघा.

__मा.महापौर :-__ आमचे पाणी पुरवठ्याचे जे सन्माननिय सदस्य आहेत,श्री. रमेश आढाव ते आता सदनात आले, त्यांनी श्री. प्रमोद टाले चा जो प्रश्न उठविला आहे त्याचे उत्तर तुम्ही दया.

__मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-__ मा.महापौर, सभापती......

__मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-__चुप बसा आता आम्हाला उत्तर दयायला सांगितले आहे परमीशन मला मिळाली आहे, तुम्ही गप्प बसा माझ्या नंतर जे बोलायचे आहे ते बोला मी इकडे सदनात महापौर, आयुक्त सा़ो, उपमहापोर, सचिव, सर्व सभागृहाचे गटनेता, विपक्ष नेता व सर्व पदाधिकारी अधिकारी व आमचे सर्व नगरसेवक बंधु हा जो प्रश्न प्रमोद टाले ने उठविला, १ एप्रिल२००० पासून त्यांच्या प्रभागात जो प्रभावित एरीया होता, ज्यांना ९ ,९ ,१० ,१० वर्षे पाणी मिळत नव्हते त्यांच्यासाठी पाण्याची व्यवस्था केली गेली आहे आणि ७५ ते ८० टक्के त्यांना चांगल्या त-हेने पाणी मिळत आहे. काही जागांवर अजूनही समस्या आहेत ती सोडविण्याचा प्रोग्राम महापालिका अधिकारी करत आहेत. आम्ही सर्वांना माहिती देऊ इच्छितो की या दोन महिन्यात कुठे पाणी भरपूर आहे तर कुठे पाणी कमी हे मी पण मानतो. पण



या उर्वरित कालखंडात आम्ही सर्व प्रभागात पाणी वितरण व्यवस्था समान कशी होईल ते ही प्रयत्न झोनींग सिस्टम च्या माध्यमाने करत आहोत. महापालिकेचे अभियंता, उप अभियंता ते प्रयत्न करीत आहेत. आता बिल माफीच्या ठरावासाठी सर्व पक्षीय संगठन बैठक असेल त्यावेळी उप महापौर व विपक्ष नेता त्यांना बोलावून हे ठरवू की बिल माफ करू शकतो का नाही करू शकत? महाराष्ट्र शासनाला सबसीडी देणेबाबत अपिल करू शकतो का यावर विचारविमर्श करून पुढील महासभेत तो विषय आणला तर खुप चांगले होइल. आमचे परम मित्र प्रमोद टाले यांनी खासदार निधीतून बारा लाख रूपये काढून त्यांच्या प्रभागात जी पाण्याची व्यवस्था केली सुधारणा केली त्याची आम्ही प्रशंसा करतो व असेच ते महापालिकेला सहकार्य देत राहतील अशी अपेक्षा करतो. बिल माफीचा ठराव सर्व संमतीने महासभेत आणता येईल. संगठन सभेमध्ये निर्णय घेऊन. त्यासही ते सहकार्य करतील अशी अपेक्षा ठेवतो धन्यवाद.

__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-__ स.महापौरजी प्रमोद टाले यांनी खुप चांगल्या त-हेने प्रश्न विचारला आहे. त्यांचे म्हणणे हे आहे की, त्यांच्या प्रभागात पाणी येत नसुन सुध्दा दहा ते पंधरा हजाराची बिले पाठविली आहेत. जे कधी नळातून पाणी नाही प्यायले, एक हंडा पण त्यांना पाणी मिळाले नाही ते इतका पैसा नाही भरू शकत, इतका दंड त्यांना लागू करू नये. काही कन्सीडर केले पाहिजे हे त्यांचे म्हणणे आहे. मी सदन व सभापती समोर हे आणु इच्छितो की, आज महाराष्ट्र सरकारचे जे मंत्रिमंडळ आहे महाराष्ट्रात जो शेतकरी वर्ग आहे त्यांच्या शेतात जर विज व पाणी नाही आले तर बिल जात नाही. महाराष्ट्र सरकार कमीटी तर्फे ते माफ केले जाते.

ज्यात-हेने ते करतात तसे करावे माझा दुजोरा आहे. हा प्रमोद टालेंच्या प्रभागाचाच प्रश्न नाही प्रभाग क्र.१६ मध्ये पण हीच समस्या आहे. ब-याच प्रभागात ही समस्या आहे. सभापतीनी सांगीतले की कोऑर्डीनेशन सभेमध्ये ठरवावे. मी म्हणतो तसा ठराव आणावा व आजच्या महासभेतच पास केला जावा. ज्या ज्या लोकांना वीज पाणी नाही मिळाले त्या लोकांशी काहीतरी कंन्सीडर केले पाहिजे. टालेनी जसे सांगीतले की काही लोक पाण्यामुळे मेले त्याविषयी आम्हाला खेद आहे. माझे महापौरांना सदनाला निवेदन आहे की त्यांच्या साठी काहीतरी कंन्सिडर करावे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा.महापौर जी आता जो प्रमोद टालेंनी प्रश्न केला आहे, महापालिका शासनाशी संबंधित असते त्यासाठी खोलात जावे लागेल की कुणाच्या प्रभागात पाणी येते कुणाच्या नाही कायद्यात ते बसते का? त्यासाठी सल्ला घ्यावा कायद्याने बील माफ करू शकतो का? असे नाही आज एक सदस्य बोलतो पाणी येत नाही, उद्या दुसरा सदस्यही उठून बोलेल माझ्या प्रभागात पाणी येत नाही तर कायद्याने आपण काय करू शकतो हा विचार केला तर बरे होईल. आज ६७ करोड कर्ज आहे, उद्या डबल होईल सर्व सदस्य जर असे बोलत राहीले की माझ्या प्रभागाचे बिल माफ करा तर? लिगली काय होऊ शकते जसे लाल पंजाबी ने सांगीतले की यावर्षि पाण्याची अडचण फार आहे. उल्हासनगर १ ते ५ मधील सर्व प्रभागात पाण्याची खुप कमतरता आहे. पाणी विभागापासून कोणी समाधानी नाही. जसे श्री आढाव म्हणाले,काही प्रभागात पाणी दिले गेले, काही प्रभागात ५ नंबर मध्ये पाणी बंद केले आम्ही अपील केले होते पूर्वी कुर्ला कॅम्प मध्ये टॅंकर जायचे ते आता ५ नंबर मध्ये पाठवा. मी मा.सदस्य लाल पंजाबीना त्यांच्या प्रभागातच ओरडताना पाहिले. धुत साहेबांशी ते भांडत होते. पाणी वितरण जे आहे, व्हाल रिपेअर चा जो प्रश्न आहे त्यामुळे पाणी योग्य त-हेने नाही जाऊ शकले या गोष्टींकडे जास्त लक्ष दया. आमचे सदस्य श्री. प्रमोद टाले खुप सक्षम नगरसेवक आहेत. खासदार निधीतून १२ लाख घेऊन आले आपल्या प्रभागातील पाण्याची समस्या ७० ते ८० टक्के सोडविली. आम्ही कुठे जाणार त्यांचे ऐवढे चालते.



<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-</u> तो आमदार निधी आहे ना.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u> सर्व पक्षीय नगरसेवकांना ते देतात यादी त्यांच्याकडे जाते ते व्हेरीफाय करतात प्रयत्न करून ते सर्वांना समान वाटत करतात. ६६ लाख रूपये खुपश्या नगरसेवकांना वाटावे लागतात. १२ लाख रूपये कोणत्त्याही नगरसेवकाला वैयक्तिक दिले नाही आहेत जसे प्रमोद टालेंना दिले आहेत. प्रथम लिगली विचार करा त्यानंतर निर्णय घ्या.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :-</u> मा.महापौर आता श्री.किशोर वनवारी म्हणाले पाण्याचे योग्य त-हेने वाटप झाले पाहिजे. ते एकुन खुप बरे वाटले त्यांच्या तोंडून हे निघते तर हे शहरासाठी खुप चांगले आहे. दुसरी गोष्ट ही की ते म्हणाले कायद्याने हे योग्य आहे की नाही ते पहवे पण मला चांगल्या त-हेने लक्षात आहे. आमचे मित्र श्री.प्रमोद टाले व बाबूराव बगाडे यांनी पाणी पुरवठा नीट होत नाही म्हणून उपोषण केले होते. त्यावेळच्या आयुक्तांनी त्यांना एक पत्र दिले होते. सदस्यांनी एक मागणी केली होती उपोषणास बसण्यापूर्वी त्यात त्यांची ही पण मागणी होती की प्रभागात पाणी येत नाही तर बिले माफ करावी. तेव्हा लिखित उत्तर देताना आयुक्तांनी उत्तर दिले की हा महासभेचा विषय आहे महासभेमध्ये जर आपण ठराव पास करता तर हे होईल. आयुक्तांची सही आहे ती प्रत माझ्या कडे आहे, पाणी पुरवठा विभागात पण असेल त्यानुसार त्यावेळच्या आयुक्तांनी जे उत्तर दिले ते कायद्या पाहूनच दिले असेल. तर प्रमोद टाले, बी.बी.मोरे तसेच ज्या ज्या प्रभागात पाणी आले नाही त्या सर्वांना त्रास झाला आहे. त्या त्रासावर जसे

जखमेवर मीठ चोळायचे म्हणजे पाणी बिलकूल नाही आणि भरमसाठ बिले पाठविणे तर बिल माफ झाले पाहिले अशी माझी विनंती आहे.

<u>मा.सदस्य श्री प्रमोद टाले :-</u> मा.महापौर सो. उपमहापौर सो. मला वाटते माझया प्रश्नावर आपण निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

<u>मा.महापौर :-</u>मी उत्तर देतो, मी सदनाच्या लक्षात आणून देतो की, या वर्षाचे जे अंदाजपत्रक मंजुर केले त्यात पाण्याचे दर लावले आहे. प्रत्येकी रूम,प्लॅट, बॅरेक,झोपडी एक निश्चित दर ठरवून मालमत्ता कराच्या पावती सोबत पाण्याचे कर जोडले आहे. <u>१००/-रू.प्रति</u> ४० रू. प्रति तर ते कर पूर्ण शहराला लागू आहे. ज्यांना पाण्याचे कनेक्शन नाही त्यांना पण कर लावले आहेत. आपल्याकडे पाण्याचे नळ आहेत त्याचे बिल न घेतले जावे हे कसे वाटेल? आणि जसे किशोर वनवारी म्हणाले की कायदयाच्या दृष्टीने पाहणे जरूरी आहे. काही ठराव आपण पारीत करण्यापूर्वी त्यास कायदयाच्या दृष्टीने पाहणे जरूरी आहे. सो वुई विल रेफर धिस इशु टू लिगल एक्सपर्टस ऑफ द कार्पोरेशन लेट देम गीव देयर ओपीनियन जर मत टालेंच्या बाजुने होत असेल तर ज्या प्रभागात पाणी नाही आहे. त्या प्रभागाच्या लोकांनी बिल का भरावे? या मुद्यावर विचार केला जाईल.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> महापौर आपण कायद्याने बोलतात. आपण शहराचे प्रथम नागरिक आहात. हयूमिनिटी ग्राऊंड वर जनतेस पाहिले पाहिजे हा मुद्या घेतला पाहिजे.

<u>मा.महापौर :-</u> मी प्रथम तेच लक्षात ठेवले आहे. नंतर कायद्याविषयी बोलतो.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-</u> एक मिनिट, सन्माननिय महापौरांनी सांगीतले आहे कायद्या पाहून करू ज्यांच्याकडे नळ नाही त्यांच्याकडून पाण्याचे पैसे घेऊ इच्छितात. बरोबर आहे, मी सदना समोर आणु इच्छितो या उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा विभाग असाच काम करत राहीला तर ज्यांनी पैसे खर्च करून नळ घेतले त्यांना एक थेंब पाणी नाही मिळणार पण ज्यांनी नळ नाही



घेतले त्यांना आजपण भरपुर पाणी मिळते उदया पण मिळत राहिल. पाणी पुरवठा विभागाचे जे अभियंता कर्मचारी आहेत ते काम करत नाही. आज पण अनाधिकृत नळ जोडणी चालू आहे. मी लिखित दिले आहे, काय करायचे? जो पर्यंत पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी योग्य त-हेने काम करत नाहीत तो पर्यंत हे पाण्याचे वाटप कधी निट होणार नाही ज्यांनी नळ घेतले त्यांना पाणी मिळणार नाही. त्यांना लॉ ॲन्ड ऑर्डर समजत नाही. श्री महाडीक बरोबर म्हणाले की आयुक्तांनी बगाडेंना लिखित उत्तर दिले होत. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, महाराष्ट्र शासन शेतक-यांचे लाईट व पाण्याचे बिल माफ करू शकते तर उल्हासनगर महानगरपालिका ही काय महाराष्ट्रा बाहेर आहे.

<u>मा.महापौर :-</u> शासनाचे आपले अधिकार असतात. महापालिकेचे सिमित अधिकार असतात दोघांमध्ये फरक आहे.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-</u> यु राईट टू गर्व्हमेंट लवकर लिहा ज्यांना पाणी नाही मिळाले ते भुगतान नाही करणार.

<u>मा. महापौर :-</u> येस, आपल्या विचारांचे स्वागत करतो.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- जो पर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत पाण्याचे बिल नाही भरणार. काय ते बघु नंतर.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- अरे आमचेच नगरसेवक अनाधिकृत नळ जोडणी घेत आहेत, कार्यालयाला न विचारता.

मा.सदस्य :- कोण आहे असे?

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- खुपसे नगरसेवक आहेत.

मा.विपक्ष सदस्य :- नावे द्या.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव:- नाव देऊन काही फायदा होणार नाही.

मा. सदस्य. श्री.बी.बी.मोरे :- पैसे जर वसूल करायचे असतील तर पाणी पुरवठा विभागाकडून वसूल करा. त्या लोकांकडून नाही हि आमची मागणी आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र४७२ श्री.बी.बी.मोरे यांचा आहे. पुढचे चार प्रश्न पण आपलेच आहेत.
प्रश्न क्र४७२:- गुलमोहर सोसायटीच्या पाठीमागील बाजूस ६१९ प्लॉट लगत जी इमारत बनविली आहे, त्या इमारतीस महानगरपालिकेची परवानगी आहे का? किती मजल्यांची परवानगी आहे...? सध्यास्थितीत किती माळे अस्तित्त्वात आहेत....? याचा सविस्तर खुलासा व्हावा.__ परवानगी आहे. तळमजला अधिक ५ मजले.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- माझा आजचा जो प्रश्न आहे तो शहराचा ज्वलंत प्रश्न आहे. सर्व शहराचे त्यावर लक्ष आहे. मी उभा राहिलो की माईक हा हू का करतो मला घाबरतो वाटते.
श्री.मोरे यांनी वरील प्रमाणे प्रश्न वाचून दाखविला.
मला वाटते मला सर्व प्रश्नांची उत्तरे गोलमाल दिली आहेत. मला नीट, स्पष्ट प्रत दिली नाही. नोंद करणा-यांनी याची नोंद करावी, महापौरांनी ही करावी. आता नवनिर्वाचित नगररचनाकार जे शहराची रचना चांगल्या त-हेने करू इच्छितात ते आता उत्तर देतील.



मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :- सदरची जागा रेसिंडेंन्शीयल क्षेत्रात येते तिथे तीन चार सोसायटयांचे काम चालू आहे. ज्या प्लॉटचा आपण उल्लेख करत आहात त्यास महापालिकेने परवानगी दिली आहे. ग्राउंड+ ५ ची परवानगी आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- यापूर्वी पण जे साहेब होते ते रिपोर्ट दयायचे आता भडकवार साहेब आहेत. भुखंड ६१९ डिसहाऊससाठी ज्या लोकांना दिला गेला आहे त्यापासून १,२ फुटावरच ती इमारत बनत आहे. प्रथम हे सांगा हया भुखंडाचे किती क्षेत्रफळ आहे हि इमारत डिसहाऊस जागेपासनू किती अंतरावर आहे, बॉर्डर कुठे?

मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :- हे मी दोन दिवसात सांगीन सर्व पहावे लागेल, ६१९ प्लॉट खुप मोठा आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- जोपर्यंत सोनावणे साहेब,लिखित देत नाही तो पर्यंत त्या इमारतीचे बांधकाम बंद झाले पाहिजे.

मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :- मी तिकडे जाऊन पहाणी करतो जर प्लॉन प्रमाणे असेल तर आपणाला तशी माहिती लिखित देईन.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- हया गोष्टी सभागृहात फक्त होतात. आम्हाला रेकॉर्ड मध्ये पाहिजे कधी प्लान दिला? कधी पास केला? कीती चौरस फुट आहे? एफ.एस.आय आहे की नाही? कोणत्त्या त-हेने आहे? मी तिकडे जवळच रहतो मला या भुखंडा संबधी सर्व माहित आहे. मी सदनाला सांगु शकतो किती यार्डचा आहे. कुठुन ते कुठपर्यंत आहे.

मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :- जी माहिती पाहिजे ती मी आपणा सर्वांना देईल.

मा. सदस्य. श्री.रामभाऊ आढाव :-माझा उप प्रश्न आहे, तो रोड वायडिंग मध्ये इफेक्टेड आहे का? हा भुखंड आरक्षित आहे, आरक्षित भुखंडासाठी महासभेमध्ये ठराव आणला. ज्यांची घरे रोड वायडिंग मध्ये येतात त्यांना देण्यासाठी हा भुखंड ठेवला आहे. त्यांना पर्यायी जागा दिली आहे का? त्या भुखंडावर ते अतिक्रमण करीत आहे, तर जसे मोरे साहेब म्हणतात प्रश्न विचारणारे ते बांधकाम स्थगित झाले पाहिजे.

मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :- मी परत सांगत आहे की, ६१९ नंबर प्लॉट खुप मोठा आहे त्यामध्ये काही भुखंडावर आरक्षण आहे. पूर्ण ६१९ वर आरक्षण नाही. काही रेसिडेंन्शीयल झोन मध्ये येते तिथेच इमारत परवानगी महापालिकेने दिली आहे. ती परवानगी किती भुखंडांना दिली आहे याची सविस्तर माहिती मी उदया सकाळी तुम्हाला देतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- कृपया लिखित दयावे.

मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :- शंभर टक्के.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- ढाकरे सो.सारखे चॉकलेट तर नाही देणार ना?

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मा.महापौरजी जसे की आज आर.डी.शिंदे उपस्थित नाही तर यांना आयुक्त केले आहे ते काय निर्णय घेऊ. शकतात त्यांना अधिकार आहे. निर्णय घ्यायचा. कारण प्रश्नोत्तरात काही निर्णय असे असतील ते आयुक्तांना घ्यावे लागतील. कधी कधी शुळ साहेबांच्या वेळी असे



व्हायचे की जे काही अधिकार दयायचे नाही तर यांना अधिकार आहेत का निर्णय घ्यायचे.

मा.महापौर :-सोनाळे साहेबांना आयुक्त आर.डी.शिंदे नी ऑफीशियेट केले आहे की आयुक्त म्हणून सभेत हजर रहा हि विल परफार्म ऑल हिस ड्यूटीज.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- निर्णय यांनी घेतला तर.......

मा.महापौर :- नॅचरल पोस्ट वर जी पण कर्तव्य त्यांना करायचे ते करतील.

मा. सचिव :- प्रश्न क्रं.४७३ हा बी.बी.मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र.४७३ :- संबंधित बांधकामामध्ये चटई क्षेत्रफळाची चोरी झाल्याचे दिसते. तरी नगररचनाकारांचया या संबंधी रिपोर्ट काय आहे....? चोरी झाली असेल तर ते अनाधिकृत बांधकाम कधी तोडणार....?

उत्तर :- चोरी आढळून येत नाही. सुधारीत नकाशे दिनांक ४.२.२००० रोजी मंजुर केले आहे. प्रश्न उद्‌भवत नाही.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- प्रश्न वाचत असताना....
मा.महापौर :- मोरे साहेब थोडे जलद गतीने करा प्रश्नोत्तरे संपवून इतवृत्ते घ्यायचे आहेत. पगडीवर पण जायचे आहे, प्लीज.

मा.सदस्य श्री.बी.बी मोरे :-शहराच्या मुख्य मुदयांवर प्रश्न आहे. आपण म्हणत असाल तर पुढच्या सभेत ठेऊ पण सदनात चर्चा झाली पाहिजे. जर पगडीवर जायचे आहे ते पण कनसिडर करू शकतो. हा मुख्य विषय आहे ४ महिन्याने आला आहे. जर महासभेत आम्ही ओरडलो नाही तर लोक प्रतिनिधी म्हणून काही फायदा नाही. संबोधित बांधकामामध्ये चटई क्षेत्रफळाची चोरी झाल्याचे दिसते तरी नगररचनाकाराचा यासंबधी रिपोर्ट काय आहे, चोरी झाली असेल तर ते बांधकाम कधी तोडणार? उत्तर पण वाचून दाखवू? श्री. मोरे यांनी उत्तर वाचून दाखविले.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- ७,७, माळयांची इमारत बनते तरी चोरी आढळून येत नाही.

मा.सदस्य श्री.बी.बी मोरे :-महापालिकेतर्फे अशी उत्तरे दिली जात आहे खरे आहे खोटे ते व्हेरिफीकेशन करा

मा.नगररचनाकार श्री.सोनावणे :-६१९ मध्ये.

मा.सदस्य श्री.बी.बी मोरे :-हे ६१९ चे नाही आहे.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव:-६१९ संबंधी नाही. जनरल आहे सर्वांसाठी आहे.

मा.श्री.सोनावणे (नगररचनाकार):-६१९ ला अनुसरून प्रश्न आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-तो संपला आहे.

मा.श्री.सोनावणे (नगररचनाकार):- संबंधित बांधकामाविषयी.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- सचिव साहेब, त्यांना प्रश्न दाखवा वा कोणता आहे?



मा.श्री.सोनावणे (नगररचनाकार):-इथे संबंधित लिहिले आहे.

मा.सदस्य श्री प्रकाश महाडीक :- मा.महापौरजी संबंधित अधिकार्यांना सूचना करा ते थट्टा मस्करीच्या लेवलने प्रश्नोत्तरे देत आहेत.

मा.श्री.सोनावणे (नगररचनाकार):-त्याच्यामध्ये प्रश्न असा आहे. संबंधित बांधकाम संबधित म्हणजे कुठले? ४७३ नं चा प्रश्न असा विचारला संबंधित बांधकामामध्ये चटई क्षेत्राची चोरी झाल्याचे दिसते. संबंधित म्हणजे कुठले?

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- जनरल हो.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव:- तुम्ही चुकीचे कोड केले आहे पण शहरामध्ये चटई क्षेत्राप्रमाणे बांधकाम नाही झाले आहे. चटई क्षेत्राप्रमाणे झाले नसेल तर ते तोडले जाणार की नाही?

*<u>मा.श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>* आपल्या या प्रश्नाचे उपायुक्त अतिक्रमण चांगल्या त-हेने उत्तर देतील.

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-</u>* अतिक्रमण संबंधी भडकवार सो उत्तर देणार की आयुक्त देणार ते स्पष्ट करा.

*<u>मा.श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>* उपायुक्त अतिक्रमण देणार.

*<u>मा.महापौर :-</u>* अतिक्रमण विभागाशी संबंधीत उपायुक्त आहेत ते जबाबदार पदावर आहेत ते उत्तर देतील.

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u>* ठीक आहे. त्यांना उत्तर देवू दया. चटई क्षेत्र ठरविणारे सोनावणे साहेब आहेत ते नगररचनाकार आहेत.

*<u>मा.प्रभारी आयुक्त श्री.सोनाळे :-</u>* आता इथे जी चर्चा होत आहे, विपक्ष नेत्यांनी विचारले की, आयुक्तांनी जे प्राधिकृत केले आहे ,उपायुक्तांना ते आयुक्त म्हणून निर्णय घेवू शकतात का? तर महापौर साहेबांनी सांगीतले घेवू शकतात पण महानगरपालिका अधिनियम १९४९ चॅपटर (ड)सेक्शन ४३ (५)प्रमाणे आयुक्त उपायुक्तांना प्राधिकृत करू शकतात. पण सदनात जो मुद्या येतो त्यावर निर्णय घेण्याचा व भाष्य करण्याचा रुलीन देण्याचे अधिकार प्राधिकृत केलेल्या उपायुक्तांना नसतो तर मी विनंती करतो की जे विभाग प्रमुख आहेत ते इथे उत्तर देतील, यात जे रूलींग व निर्णय घेण्याचा प्रश्न येतो त्याची नोंद करून आयुक्तांशी चर्चा करून त्यावर जी कार्यवाही करायची आहे तो निर्णय आयुक्त घेतील.

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-</u>* मा. महापौर जी जसे यांनी सांगितले निर्णय घेण्याचा अधिकार नाही यांच्याशी चर्चा करून नंतर निर्णय घेणार मग आमचे हे प्रश्न तीन चार महिन्या नंतर येतात त्याची आम्ही वाट बघतो. चर्चा झाल्यानंतर निर्णय कधी मिळणार आपण ही सभा ठेवायलाच नको पाहिजे होती कारण आज पण आम्ही समाधानी नाही होऊ शकत ना? जसे बी.बी.मोरे सोचा प्रश्न हा आहे. बांधकाम ,अतिक्रमण ,चटई क्षेत्र हे प्लान प्रमाणे आहे की नाही निर्णय घेईस्तो पर्यंत इमारत पूर्ण तयार होऊन सर्टीफिकीट देण्याची वेळ येईल, प्रश्नांनातर ४-४ महिने लागतात, तुम्हाला माहीत आहे १५-१५ दिवसांनी इथे स्लॅप पडतो. अनाधिकृत वायलेशन आहे यात काही शंका नाही. रोज वर्तमान पत्रात येथे अवैद्य बांधकाम आपणास माहित असेल व माझे हे म्हणणे पण योग्यच आहे कि जेव्हा पासून शिंदे सो नी कार्यभार सांभाळला



तेव्हा पासून अनधिकृत बांधकामांना किती प्रात्साहन दिले ते आपणासही माहित आहे, सर्व शहरास माहित आहे. अनधिकृत बांधकाम नसते तर बी.बी.मोरे किंवा मी पत्र दिले ,त्यानंतरही आम्हाला निर्णय मिळणार नाही. आयुक्तांशी चर्चा करून नंतर निर्णय देणार पहले हा विचार करा जे आज होणार आहे त्याचा निर्णय मिळणार नाही तर मोरे सो. आणि मी प्रश्न विचारून काय करणार.

*<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u>*मा.महापौर ,दोन मिनिटे पूर्वी आपण सांगितले की, जेव्हा आमच्या विपक्ष नेत्यांनी प्रश्न विचारला आम्हाला आपला आदर आहे, पदासाठी आदर आहे पण ज्यात-हेने आपण उत्तर दिले की यांना सर्व अधिकार आहेत. नंतर दोन मिनिटा नंतरच प्रभारी आयुक्त यांनी आपल्या रुलिंगला नकार दिला उलट उत्तर दिले तर मला वाटते हे आपल्या पदास शोभा देत नाहीत. एक तर आपल्याला खरी माहिती नाही वा जाणूनबुजून सभागृहाची दिशाभुल करत आहात हे आपणास शोभत नाही.

आपल्या म्हणण्या नुसार तर हे चुकीचे आहे. जर आयुक्तांना अधिकार नाही निर्णय घ्यायचा तर जोपर्यंत आयुक्त हजर होत नाही तो पर्यंत प्रश्नउत्तरे घेण्याचा काही अधिकार नाही.

मा. महापौर :- मी आपली समस्या दुर करतो विपक्ष नेत्त्यांनी जी हरकत घेतली. तेव्हा मी असे नाही म्हणालो की यांना सर्व अधिकार आहे. मी असे म्हणालो की कमीशनर आर.डी.शिंदे इज ऑथराइज्ड टू हिम ऑफिशिएट टूडे. नॉर्मल फंक्शन आहेत ते बघतिल. आय एम नेव्हर से कि त्यांना सर्व अधिकार आहे. आय एम वेरी मच क्लीअर अबाऊट इट. अधिकार नाहित तर नाही करणार. प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी मी पूर्व सचेत होतो की काय बोलायचे सदनाला काय उत्तर दयायचे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- नॉर्मल पॉवर्स इनक्लूड नॉर्मल फंक्शनस् ऑफ दि कार्पोरेशन.क निर्णय घेण्याचा यांना अधिकार नाही.

मा. सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :- मा. महापौरजी काही सदस्य जास्तच उत्त्साही दिसतात. स्वतःला एक्सट्रॉऑडनरी समजुन महापौर सारख्या मोठया व्यक्तीस बोलतात.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- क्षमा करा मला बोलू दया.

मा. सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः-शोभा नाही देत असे म्हणतात हि भाषा वापरतात महापौरांचा अपमान करतात.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- यांना आपले शब्द मागे घ्यायला सांगणार, कि एक्स्ट्रॉऑडनरी स्मार्ट समजतात. नॅचरली ते निवडून आले आहेत.

मा. सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः- मला बोलू दया.

मा सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- महापौरजी यांना शब्द परत घ्यायला सांगा. मी काय म्हणते भाषा व्यवस्थित वापरायला सांगा. हरकत घ्यायची तर घेवू शकतात.

मा. सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः-मा. महापौरांवर लांछन लावतात चुकीचे आहे.



मा सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- आम्ही नाही लांछन लावले आपण चुकीचे बोललात.

मा. सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः- मा.महापौरजी प्रथम त्यांनी आपणावर आरोप लावले.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मी आरोप नाही लावले भाषा दुरूस्त करण्यास सांगीतले. सदन मध्ये भाषा योग्य असली पाहिजे.

*<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u>* मा.महापौरजी हा जो विषय सुरू आहे यावर मी पाच मिनिटे बोलू इच्छितो, प्रथम तर महासभेत पिठासिन अधिकारी जे असतात ते महापौर असतात, त्यांचा निर्णय हा अखेरचा निर्णय असतो. महासभेच्या निर्णयानुसार प्रशासनाला कार्यवाही करायची आहे. इथे सर्व सन्माननिय सदस्य बसलेले आहेत खुपसे निर्णय महासभेत यापूर्वी घेतले आहेत. त्यावर कार्यवाही झाली आहे आज मी स्थायी समितीचा चार वर्षापासून सदस्य आहे. तिथे जर आयुक्त नाही आले तर खुर्ची रिकामी न रहावी म्हणून कधी ढाकरे साहेबांना तर कधी इतर कुणाला बसवतात. आज आमच्या सन्माननिय सदस्यांचा प्रश्न चालू आहे.त्याचे उत्तर ज्यापण विभाग प्रमुखाने दिले आहे ते त्या उत्तराशी समाधानी नाहीत म्हणून उपप्रश्न विचारतात. त्यांना समाधानकारक उत्तर मिळावे म्हणून मंचावर उभे आहेत. इथे आयुक्तांना निर्णय घ्यायचा प्रश्न येतो कुठे निर्णय महापौरांना घ्यायचा आहे. आयुक्तांना तातडीने प्रशिक्षणासाठी म्हणून जावे लागले. ते त्यांच्या सबऑर्डिनेटला सांगून गेले की तुम्ही सभा अडेंन्ड करा मला जायचे आहे. त्यामुळे स्थगित झालेली सभा ठेवायची नाहीचा प्रश्न येतो कुठे?सन्माननिय सदस्य प्रश्न विचारत आहेत उत्तर विभाग प्रमुख देत नाही. महापौर निर्णय घेतील आपण खुलासा केला पण पंजाबीजी समजले नाही. सुभाषजी चे म्हणणे बरोबर आहे. जर पंजाबी नव्हते समजले तर थेट असा आरोप नको लावायला पाहिजे होता की तुम्ही सभागृहाची दिशाभुल करता. इथे सर्व मान्यवर आहेत शिकलेले अनुभवी लोक आहेत. कोणतीही गोष्ट बोलण्यापूर्वी त्यांनी विचार केला पाहिजे होता कि, सोनाळे साहेब प्रतिनिधि म्हणून बसले आहेत निर्णय अधिकारी महापौर आहेत. तर मेहरबानी करून प्रश्नावर प्रश्न नंतर वाद वाढणार यापेक्षा हे चांगले राहील की कोणतीही गोष्ट बोलत राहण्यापेक्षा समजुन घेतली तर बरे होईल.

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-</u>* मा.महापौरजी जसे किशोर साहेब म्हणाले आपली आज्ञा पाळली जाईल कारण आपल्यामुळे महासभा चालते. आपणास लक्षात असेल गर्जेच्या बदली साठी आपण दोन वेळा महासभेत आदेश दिले होते त्यावर काही कार्यवाही झाली होती का? किशोर वनवारींना आठवून देऊ इच्छिते.

*<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u>* गर्जे आज त्या पदावर नाही.

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-</u>* गर्जेची आपल्या म्हणण्याने बदली नव्हती झाली आम्ही आंदोलन केले होते. आपल्या म्हणण्याने त्यांची बदली नव्हती झाली.

*<u>मा.महापौर :-</u>* त्याचे क्रेडिट तुम्हालाच जाते.

*<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-</u>* हा महापौरांचा अपमान आहे.



*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :-</u>* आजचे सदस्य जे प्रश्न विचारतात ते आयुक्तांना उत्तर मागतात म्हणून विपक्ष नेत्यांनी प्रश्न केला की आयुक्त नाहीत तरी उपायुक्त इथे बसलेत त्यांनी दिलेले उत्तर बरोबर मानले जाणार की नाही. सन्माननिय सदस्यांनी आयुक्तांना उत्तर नसते विचारले तर हा प्रश्नच नसता आला. महापौरांना विचारले असते तर त्यांनी उत्तर दिले असते. आता सन्माननिय सदस्य म्हणाले महासभा महापौर चालवतात पण उत्तर तर आम्हाला आयुक्तां कडून पाहिजे जर निर्णय देण्याचा अधिकार

त्यांच्याकडे नाही, समजा त्यांनी निर्णय दिला व दुस-या महासभेत येऊन शिंदे साहेबांनी सांगितले मला हा निर्णय मान्य नाही तर चालेल का? असे विपक्षाचे म्हणणे आहे.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- आयुक्तांचे प्रतिनिधित्त्व उपायुक्त करीत आहेत. तर त्यांचे उत्तर योग्य मानले पाहिजे ते आयुक्तांचे प्रतिनिधित्त्व करीत आहेत.

मा.महापौरः- मोरेजी आपणाला नगररचनाकार उत्तर देतील.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-महापौरजी उपायुक्तांनी दिलेल्या निर्णयाला आयुक्त मान्य करतात तर ठिक आहे. ४-६ महिन्यांनी आमचे प्रश्न येतात पण ते म्हणतात मला अधिकार नाही तर जबाबदार कोण? आता सभागृहनेता म्हणाले की स्थायी समितीत जर आयुक्त नाही आले नाही तर कधी ढाकरे बसतात कधी कोण याचा अर्थ ही कामचलाऊ महापालिका आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- काम चलाऊ म्हणतात तरी बसणार नाही प्रश्न विचारतच राहणार.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-महापालिकेने जो प्लान पास केला त्याप्रमाणे काम होत आहे कि नाही यासाठी प्रत्येक महापालिकेत उपायुक्तांचे पद आहे जर त्यांना हे लक्षात नाही आले तर ते आमचा सल्ला घेवू शकतात जे पण काही वायोलेशन आहे ते उपायुक्त पाहणार.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-उपायुक्त भडकवाड साहेबांना सांगा.

श्री.दत्ता भडकवाड (उपायुक्त अतिक्रमण):- सन्माननिय आयुक्त उपमहापौर इथे उभे राहीस्तोपर्यंत आम्हाला असे वाटायचे की, हा ४७३ जो प्रश्न आहे तो ६१९ प्लॉटशी संबंधित आहे म्हणून मी पूर्व तयारी करून नव्हतो आलो. जर पूर्ण शहरात एफ.एस.आय चे वायोलेशन होत आहे तर एम.आर.टी.पी.ॲक्ट मुं.प्रा.म.पा.अधिनियम १९४९ ॲक्ट अन्वये आमचे जे नगररचनाकार आहेत त्यांच्याशी डिर्टेक्ट करू त्यावर कार्यवाही करू.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-चार महिन्यापासून काम चालू आहे काय करत आहात?

श्री.दत्ता भडकवाड (उपायुक्त अतिक्रमण):- पडताळणी करून उत्तर देतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-ऐका तिथे जेव्हा पाया उभारला जातो तेव्हा ना उपायुक्तांचे लक्ष असते ना बीट इन्स्पेक्टर चे. जेव्हा ते तयार होते सन्माननिय सदस्य आवाज उठवतात, लिखित देतात तेव्हा म्हणतात नगररचनाकार जातील उपायुक्त जातील, वायोलेशन आहे कि नाही हे बघतील नंतर सांगितले जाते बांधकाम पूर्ण झाले आहे.



श्री.दत्ता भडकवाड (उपायुक्त अतिक्रमण):-पध्दत अशी आहे की नगररचनाकार विभागातून जेव्हा कोणताही प्लान मंजुर होऊन येता तर आमच्या इथे जे कनिष्ठ अभियंता चे पद आहे ते जाऊन वायोलेशन चेक करतात. वायोलेशन असेल तर कायद्यान्वये पध्दतीप्रमाणे तोडण्याची कार्यवाही केली जाते. जर चार महिनेपूर्वी असे नाही झाले तर यापूढे होईल.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-भडकवाड साहेबांना मी हे सांगु इच्छितो, आज पासून कोणत्याही सदस्यानी सदनात प्रश्न विचारला जाईल अतिक्रमणाविषयी तर प्लान बरोबर लिखित उत्तर मिळाले पाहिजे नाहीतर, मी जे प्रश्न चार महिन्यापासून दिले आहेत आज ती इमारत पूर्ण झाली असेल प्रश्न आज आला टी.पी.साहेब आता बघतील वायोलेशन आहे की नाही आहे.

श्री.दत्ता भडकवाड (उपायुक्त अतिक्रमण):-प्रोसिजर मध्ये सुधारणा करतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-नाहीतर नाही, फायदा नाही लोकप्रतिनिधी ने अनधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी आवाज उठविला.

मा.महापौर:- मोरे जी आपण जी हरकत घेतली त्याचे उत्तर त्यांनी बरोबर दीले जर वायोलेशन आढळले तर महानगर पालिका कार्यवाही करेल.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-अतिक्रमणाचे अधिकारी बेजबाबदारपणे काम करतात म्हणून महापौर, उपमहापौर आजचे आयुक्त व पूर्ण सदनाने यावर लक्ष दिले पाहिजे व तावडतोब कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- यात असे आहे की जास्त लोकांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली. गरीब लोकांच्या झोपडपट्टयांचा जो प्रश्न आपण केलात इमारती खालून नाल्या काढल्या आहेत त्यावर १४ फुटाचे क्लीअरन्स असणे जरूरी आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-ते इमारतीत आहे आम्ही झोपडपट्टीत आहोत, नीट राहू शकतात आम्ही नाही, हे कसले रूंदीकरण आहे?

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- त्या लोकांच्या झोपडया आर.सी.सी असते तर आम्ही जो प्लॉट एरिया लावला की खालून गटार काढून चौदा फुटाचा क्लीअरन्स मिळाला पाहिजे तर आम्ही तसे केले असते. रोड बेअरिंग बांधकाम आहे ते जर रोड मध्ये येते तर खालून गटार नाही काढू शकत.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-मला सांगा ज्यांची पूर्ण इमारत तोड वायडिंग क्षेत्रात येते त्याच्यापूढे जे झोपडया आहेत त्यास काढले जाते ही कोणती पध्दत आहे रोडवायडिंगची सांगा मी आधीच सांगीतले तडजोड ठेवा. समजा साठ फुटाचा रस्ता आहे त्यामध्ये इमारत व झोपडी येते तर रोड ला किती रूंदीकरण करायचे याचा विचार करा. पूर्ण नगरसेवक दाव्यासहित म्हणतो पूर्ण शहरात झोपडपट्टीचे नुकसान झाले आहे. इमारतीचे नाही झाले इमारती तशाच आहेत त्याच्या पुढील झोपडपट्टया तोडल्यात हे तर आमचे नुकसान झाले आहे, असे नाही झाले पाहीजे.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :- मा.महापौर जी मोरे सा़े. नी जे सांगीतले त्यांच्याशी मी पूर्ण सहमत आहे. नेताजी चौकावर एक विनोद अपार्टमेंट आहे दुसरे एक कोणतेतरी अपार्टमेंट आहे त्यांना मार्कींग नाही दिले पण झोपडपट्टींना दोन-दोनदा मार्कींग दिले त्यांनी दोन -दोन फुट मागे घेतले, परत त्यांना मार्कींग दिले फेनिंग करायचे तर सर्व त-हेने फेनिग करा मी सोनावणे साहेबांना हे सांगीतले त्यांनी हेच उत्तर दिले की जे आर. सी.सी चे



बांधकाम आहे ते सोडत आहे झोपडपट्टींना पूर्ण फेनिंग देत आहे हे खुप चुकीचे आहे.

मा.महापौर :- सन्माननिय सदस्य श्री.बी.बी.मोरेंनी जी हरकत घेतली आहे ती योग्य आहे जेव्हा तैतीस रोड चा महासभेत प्रस्ताव आला होता तेव्हा आपण मंजुर केले तेव्हा बी.बी.मोरेंनी वारंवार भाषणात सांगीतले की वायडींग करताना जीथे जीथे अशी परिस्थिती आहे त्यावर पूर्ण लक्ष महापालिका अधिकारींनी ठेवावे जी बी.बी.मोरेंनी हरकत घेतली आहे मी आयुक्तांना असे आदेश देतो की तडजोड विषयी जे बालणे झाले आहे ते लक्षात ठेऊनच काम रोड वायडींग चे करावे. मी सदनाला पण आश्वासन देतो.

काही सदस्य :- एकु नाही आले.

मा.महापौरांनी परत सांगीतले.

मा.उपमहापौर :- एक मिनिट बी.बी.मोरे व देवेंन्दसिंह खेमाणी ने जी हरकत घेतली आहे ती प्रशासनाने ठरावाप्रमाणे जी कार्यवाई केली ॲडजेस्मेंट फक्त इमारतीशी होत आहे झोपडपट्टीशी नाही तर आपण जी ॲडजेस्मेंट संबंधी बोलत आहात ठरावाप्रमाणे एका ठिकाणी इम्प्लीमेंट होत आहे एका ठिकाणी नाही. ते इमारत व झोपडपट्टींना वेगवेग्ळया दृष्टीकोनातुन पहात आहे त्यासाठी स्पष्टीकरण दया.

मा.महापौर :- वेगवेगळया दृष्टीकोनातुन पाहीले जात आहे ते चुकीचे आहे सर्वांना समान पॉलीसी केली पाहिजे.

मा.उपमहापौर :- आमच्या सदस्यांनी त्यावरच आक्षेप घेतला आहे.

मा.महापौर :- सगळयांसाठी समान धोरण ठेवले पाहिजे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-मी एक उदाहरण सन्माननिय सदस्यांना दाखवू इच्छितो.

मा.महापौर :- एक तास झाला प्रश्नोंत्तरे कालावधी संपला आहे मोरेजी बसा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- नंतरचे नका घेऊ यांचे पूर्ण करा.

मा.सदस्या श्री.सुनिता राजवानी :-मा.महापौरजी.....

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- एकदा महापौरांनी सलीन दिले नंतर कुणी बोलू नये.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-मा.महापौर काही लोकांशी सावत्र वागणुक होत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचून दाखवितात.

काही सदस्य :- पास....

--२१--

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलले ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडीक :- मोरे पुढचा प्रश्न करू नका.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- माझा प्रश्न महत्त्वाचा आहे.

मा.सदस्य श्री प्रकाश महाडीक :- सभा त्याग करा, बसा आता.

मा.सचिवः- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.उपमहापौर :- हा दुसरा विषय आपण बरोबर नाही वाचला.

मा.महापौर :- पास झाला.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- कधी पास झाला सर्वांना विचारायला पाहिजे ना?

मा.सदस्य श्री किशोर वनवारी :- महापौरजी सचिव सो विषय वाचत होते आम्ही पास-पास म्हणत होतो हे दुसरे काही तरी बोलत होते. महासभेत लक्ष देत नाहीत नंतर परत-परत बोला म्हणतात.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- अंधाधुंदी नाही चालणार, विषय क्र.२ वाचुन दाखवा कशीही सभा चालविणार का? हा महापौरांचा अपमान की सचिवांचा.....

मा.महापौर :- महाडीकजी माझे ऐका विषय क्र.२ वाचून दाखविला सत्ताधारी पक्षाकडून पास-पास म्हटले गेले.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- विरोधी पक्ष,भाजपा गट नेता बोलले तर ठिक आहे.

मा.महापौरः- सत्ताधारी पक्षाच्या सभागृह नेत्यांनी पास-पास म्हटले कुणी हरकत घेतली नाही.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- आम्ही हरकत घेतली.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आम्ही उठलो कशाला.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- सभा त्याग करा, दादागिरी करतात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे काही समतज नव्हते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- विषय क्र.३ वाचलेला पास झालेला विषय परत वाचतात का?

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-इतिवृत्त विषय नसतो. आम्ही सभा त्याग करतो.

मा.सदस्य श्री किशोर वनवारी :- म्हणूनच म्हणतो इतिवृत्त विषय नसता. दादागिरी केली म्हणता.



मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- ही सभा चालविण्याची पध्दत नाही.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- इतिवृत्तासाठी आपण अनुमती देता की नाही हे सांगा फक्त......

मा.महापौरः- इतिवृत्त आपण मंजुर केले आता परत कशाला वाचायचे, प्रश्नच नाही.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-इतिवृत्त आम्ही पास नाही केले.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- चला सभा त्याग करा.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- महापौरजी तुम्हाला कुठे जाऊन यायचे तर पंधरा-वीस मीनिटे जाऊन या नंतर सभा घ्या.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- सचिव पक्षपात करतात हे चुकीचे आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- दादागिरी नाही चालणार. आमचे म्हणणे नाही ऐकले.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- महापौर इतिवृत्त विषय परत वाचायला सांगा नाहितर आम्ही सभा त्याग करू.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीकः- सचिवांची दादागिरी नाही चालणार.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- महासभेचा अपमान करीत आहात.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-महापौरांची दादागिरी सचिवांच्या पॉलिसी प्रमाणे वागले तर सभात्याग करू, दादागिरी आणि पक्षपात आम्ही नाही सहन करणार.

सत्ताधारी सदस्यः- पास-पास.

मा.सदस्य श्री.भीमसेन मोरे :- आम्ही सभा त्याग करीत आहोत.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- इतिवृत्त साठी सभेत बोलू देत नाही असे कसे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- तुम्ही कायद्याने वागा.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- महाडीक सभा त्याग करणे हा तुमचा गुणधर्मच झाला आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीकः- मोरे तुम्ही जपुन वागा. तुम्ही बस म्हटले तर बसा उठ म्हटले तर उठा आम्ही नाही ऐकणार. आम्ही लाचार नाही आहोत.

इकडे सत्ताधारी व विपक्षातील सदस्य मंचाजवळ येऊन महापौरांशी बोलत होते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- काही करेक्शन करायचे तर करू शकता.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- किशोर वनवारी तुम्ही महापौरांना सहयोग देऊ नका.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक :- महापौरांना बोलू दया.

मा.महापौर :- एक मिनिट. विपक्षातील सर्व सदस्यांना मान देवून सचिवांना सांगतो परत वाचा.

मा.सचिव :- यांनी विषय क्र.२ वाचून दाखविला.

काही सदस्य :- पास-पास

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- बी.बी.मोरे चे म्हणणे आता मला पटले ॲडजेसमेंन्ट करावी.

मा.महापौरः- इतिवृत्त सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा.सचिवः- विषय क्र.३ वाचून दाखवितात.

मा.महापौरः- हा जो विषय आहे यावर मी विपक्ष नेता श्री.भिमसेन मोरे सो, प्रकाश माखीजा यांच्याशी चर्चा केली, उपमहापौर सभेत येऊ नाही शेकले ही उदयाने कोणत्त्याही कमर्शिअल ॲक्टीवीटी साठी दीले जाऊ नये दुसरे धार्मिक सांस्कृतिक, राजकीय कामांसाठी मोफत दिले जावे आणि लग्नासाठी जे दर आहेत तेच कायम करावे ठीक आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवीनीः- मा.महापौरजी यात एक मुद्या आहे. ड्रेमेजेस चार्ज विषयी निर्णय घ्या मग आमची हरकत नाही राजकीय पक्षांना मोफत देत आहात, तर नुकसान होते तर ड्रेमेजेस चार्ज साठी काही डीपॉजिट ठेवावे. जर डेमेज नसेल तर पैसे परत करू.

मा.महापौर :- ठिक आहे.

मा.सदस्य श्री.जयप्रकाश भाटीया :- महापौरजी आपली अनुमती ने बोलतो. काही दिवसापूर्वी सपना गार्डन जवळ माझा प्रभाग आहे तेथील दहा-पंधरा इमारतींच्या डेलीकेशन घेऊन शिंदं सो कडे गेलो होतो व विनंती केली होती की सपना गार्डन लग्नासाठी देण्यात येऊ नये कारण त्यात डेकोरेशन करणारे लोक तसेच कचरा ठेवतात पूर्ण रात्र लग्न चालते पूर्ण रहिवाशी डिस्टर्ब होतात. त्यात असे आहे. सपना गार्डन पासून आपणास इतके उत्त्पन्न नाही वर्षातून ३०-३५ लग्न होतात. ३०-३५ हजार म.पा.स. उत्त्पन्न मिळते त्यापेक्षा जास्त नुकसान होते. प्ले ग्राऊंड मुलांचे खराब होते. तेवढी एक सुधारणा करा माझी विनंती आहे.

मा.महापौर :- या मुदयास निरिक्षण करून नंतर नविन निर्णय घ्यावे. सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषयः-उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने व उद्याने यांचे भुई भाडे निश्चित करणे बाबत

प्रस्तावना :-

तत्त्कालिन नगरपालिकेच्या स्थायी समितीने ठराव कं.६५४ दिनांक १९.११.१९८७ अन्वये नगरपालिकेच्या मालकीची उद्याने / मैदाने हे लग्न समारंभ,प्रदर्शनी सर्कस, इतर करमणुकीचे कार्यक्रम वैय्यक्तिक समारंभ

इत्त्यादी वापरासाठी अनुक्रमांक १ ते १६ मध्ये दर्शाविलेले मैदाने / उद्याने यांची नोंदणी फी व क्षेत्रफळ ठरविले आहे. मैदाने / उद्याने यांची माहिती खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण | क्षेत्रफळ | प्रतिदिन भाडे |
|---|---|---|---|
| १. | साधूवासवानी उद्यान ,निलकमल अपार्टमेंट समोरील भाग , उल्हसनगर -१ | ३०७२स्के.मी. ८४x४८ | रू.१०००.०० |
| अ) | साधूवासवानी उद्यान सतनाम "डी" समोरिल भाग उल्हासनगर -१ | ४८ ४० (१९२० चौ.मी.) | रू.७५०.०० |
| ब) | साधुवासवानी गार्डन गुलमोहर अपार्टमेंट उल्हासनगर.१ | ६० ४० (२४०० चौ.मी.) | रू.१०००.०० |
| क) | साधुवासवानी उद्यान भगवती नावाणी स्टेज समोर ,उल्हासनगर.१ | ९० ६५ (५०५ चौ.मी.) | रू.१०००.०० |
| ड) | साधूवासवानी उद्यान भगवंती नावाणी स्टेज समोर उल्हासनगर.१ | (४००० चौ.मी.) | रू.१५००.०० + रू.१०००० अनामत रक्कम |
| २. | म्युनसिपल बाल उद्यान (बोटलेक) पवई चौक उल्हासनगर.३ | | रू.३०००/- |
| ३. | लॉयन उद्यान | | |
| अ) | सपना टॉकीजच्या बाजुला | १२३७५ चौ.मी (१५० ८२) | रू.१०००/- |
| ब) | लॉयन उद्यान सपना टॉकीज जवळ | २७०० चौ.मी. | रू.१०००/- |
| क) | लॉयन गार्डन अ व ब | ४००० चौ.मी. | रू.१५००/- रू.१०,००० अनामत रक्कम |
| ४. | म्युनसिपल लॉन्स (मुख्यअधिकारी) दालनाच्या मागील भाग | (६० ८२) १५६०चौ.मी. | रू.१५००/- |
| ५. | उद्यान कम यात्री निवास कालानी महल समोर उल्हासनगर.२ | (उद्यानाचा माळा फक्त) | रू.१०००/- |

| अ.क्र. | ठिकाण | क्षेत्रफळ | प्रतिदिन भाडे |
|---|---|---|---|
| ६. | पप्पु सोसायटी समोरील उद्यान उ.नं.३ | २२५०चौ.मी (७५ ३०) | रू.४००/- |
| ७. | दसरा मैदान उल्हासनगर.३ | | रू.१०००/- अनामत १०,०००/- |
| ८. | वरिल प्रमाणे (विवाह व्यतिरिक्त) | | |
| ९. | जिजामाता उद्यान उ.नगर.४ | २२००चौ.मी. | रू.७५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (९१  २४) | |
| १०. | गागन बालानी उद्यान उ.नगर४ | ६५० चौ.मी. (६०  ११) | रू४००/- |
| ११. | बॅ.नं१६३८ जवळील उद्यान उल्हासनगर४. | १३९४चौ.मी. | रू४००/- |
| १२. | कुर्लाकॅम्प उद्यान (वार्ड नं.२८) उल्हासनगर-५ | २५३६ चौ.मी. | रू.७५०/- |
| १३. | स्वामी भोजराज उद्यान वॉर्ड ३७ ,उ.नं ५ | १०८० चौ.मी. | रू४००/- |
| १४. | बॅ.नं.१८२२ जवळील उद्यान उल्हासनगर५ | १४०० चौ.मी. | रू५००/- |
| १५. | स्वामी टिकमदास उद्यान वॉर्ड ३५ उल्हासनगर५ | २७०० चौ.मी. | रू४००/- |
| १६. | दशरा मैदान उ.नगर५ | ६६००चौ.मी. | रू.७५०/- |

सदर उद्याने / मैदाने यांची फी तत्कालीन नगरपालिकेने सुमारे १३ वर्षा पूर्वी ठरविलेली असुन त्यामध्ये दर्शविलेले भुईभाडे आजच्या मानाने कमी वाटते. उद्याने / मैदाने देखभाल दुरूस्ती इत्त्यादीसाठी येणारा खर्च पाहता सदरचे भुईभाडे तुलनात्त्मक दृष्टया कमी वाटते. सबब सदर मैदाने / उद्याने यांच्या भूईभाडयाच्या रक्कमेत वाढ करणे उचीत वाटते. महानगरपालिका मालकीची खालील अ.क.१ ते १६ उद्याने / मैदाने यांचे भुईभाडे खालील प्रमाणे ठरविण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क. | ठिकाण | क्षेत्रफळ | प्रतिदिन भाडे |
|---|---|---|---|
| १. | साधूवासवाणी उद्यान निलकमल अपार्टमेंट समोरील भाग उ.नगर.१ | ३०७२ चौ.मी. (८४ ४८) | रू.२०००/- |
| | अ) साधुवासवाणी उद्यान सतनाम डी समोरील भाग उ.नगर.१ | (४८ ४०) १९२० चौ.मी. | रू.१५००/- |
| | ब)साधुवासवाणी गार्डन गुलमोहर अपार्टमेंट उल्हासनगर.१ | (६० ४०) २४०० चौ.मी | रू.२०००/- |

| अ.क. | ठिकाण | क्षेत्रफळ | प्रतिदिन भाडे |
|---|---|---|---|
| | क) साधुवासवाणी उद्यान भगवंती नावाणीस्टेज समोर उ.नगर.१ | (९० ६५) ५०५ चौ.मी. | रू.२०००/- |
| | ड)साधुवासवाणी उद्यान भगवंती नावाणी स्टेज समोर उ.नगर.१ | ४०००चौ.मी. | रू३०००/- + रू.२० ,००० अनामत रक्कम |
| २. | म्युनिसिपल बालउद्यान (बोटलेक) पवई चौक उल्हासनगर३ | | रू६०००/- |
| ३. | लॉयन उद्यान | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अ)सपना टॉकीजच्या बाजुला | १२३७५ चौ.मी. (१५० ८२) | रू.२०००/- |
| | ब)लॉयन उद्यान सपना टॉकीज जवळ. | २७००चौ.मी. | रू.२०००/- |
| | क)लॉयन गार्डन अ व ब | ४०००चौ.मी. | रू.३०००/- + रू.२००००/- अनामत रक्कम |
| ४. | म्युनसिपल लॉन्स (मुख्यअधिकारी) दालनाच्या मागील भाग | (६० ८२) १५६०चौ.मी. | रू.३०००/-- |
| ५. | उद्यान कम यात्री निवास कालानी महल समोर उल्हासनगर.२ | (उद्यानाचा माळा फक्त) | रू.२०००/- |
| ६. | पप्पु सोसायटी समोरील उद्यान उ.नं.३ | २२५०चौ.मी (७५ ३०) | रू.८००/- |
| ७. | दसरा मैदान उल्हासनगर३ | | रू.२०००/- |
| ८. | वरिल प्रमाणे (विवाहा व्यतिरिक्त) | | |
| ९. | जिजामाता उद्यान उ.नगर४ | २२००चौ.मी. (९१ २४) | रू.१५००/- |
| १०. | गागन बालानी उद्यान उ.नगर४ | ६५० चौ.मी. (६० ११) | रू.८००/- |
| ११. | बॅ.नं१६३८ जवळील उद्यान उल्हासनगर४. | १३९४चौ.मी. | रू.८००/- |
| १२. | कुर्लाकॅम्प उद्यान (वार्ड नं.२८) उल्हासनगर-५ | २५३६ चौ.मी. | रू.१५००/- |
| १३. | स्वामी भोजराज उद्यान वॉर्ड ३७,उ.नं.५ | १०८० चौ.मी. | रू.८००/- |
| १४. | बॅ.नं.१८२२ जवळील उद्यान उल्हासनगर५ | १४०० चौ.मी. | रू.१०००/- |
| १५. | स्वामी टिकमदास उद्यान वॉर्ड ३५ उल्हासनगर५ | २७०० चौ.मी. | रू.८००/- |
| १६. | दशरा मैदान उ.नगर५ | ६६००चौ.मी. | रू.१५००/- |

सदर मैदाने / उद्याने हे खालील शर्ती व अटींवर भाड्याने देण्यात यावी.

१. उद्याने / मैदाने नोंदणी करते वेळेस भुईभाडे व अनामत रक्कम ही अग्रीम व रोख भरणा करावा लागेल.

२. ज्या उद्येशासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्या उद्येश करिताच मैदाना चा वापर करण्यात यावा.

३. संस्थेने / परवानाधारकाने विद्युत पुरवठा हा स्वत:च्या स्वखर्चाने घ्यावा.

४. उद्याने / मैदानातील रस्ते,लॉन्स इत्त्यादी ठिकाणी खड्डे खोदु नयेत.

५. वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरून न घेता म.रा.वि.मं.यांच्या परवानगीने वीज मंडळाच्या मुख्य खांबावरून घ्यावा.

६. ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.

७. अग्निक्षमण प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.

८. परवानगी समाप्त होताच जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा वा टाकाऊ वस्तु / अवषेश ठेवू नयेत.

९. सदर कार्यकमांस पोलीस विभागाची परवानगी घेण्यात यावी.

१० . सदर जागेवर कोणतेही बांधकाम करू नये.

११. कार्यकमांच्या ठिकाणी शांतता / सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याची जबाबदारी परवाना धारकावर राहील.

१२. परवानगीची मुदत संपल्यावर सकाळी ११ वाजेच्या आत मैदान खाली करण्यात यावे अन्यथा प्रतिदिन २०० रू. दंड आकारण्यात येईल.

१३. अंतर्गत सुशोभिकरण करताना मंडप ठेकेदाराने उद्यानाच्या / रस्त्याच्या / मैदानाच्या ठिकाणी खड्डे खोदु नये.

सबब सदरची महानगरपालिका उद्याने / मैदाने अनुकमांक१ ते १६ चे समोर दर्शविलेल्या वाढीव भुई भाडयास संमती साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव कं</u>. ८ <u>दिनांक</u> :-३०६. २०००

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती.सुनिता राजवानी.

हि महासभा उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने / उद्याने यांचे वरिल प्रस्तावने नुसार भुई वाढविण्यास मान्यता देत नाही. मात्र सदरच्या मालमत्ता लग्न समारंभासाठी पुर्वीच्या भाडयाच्या दराने देण्यास तसेच

दिनांक १९.१.२००० रोजी च्या महासभा ठराव कं१७ मधिल तरतुदी प्रमाणे भाडया पासून सुट असलेल्या प्रयोजना व्यतिरिक्त, व्यवसाय / फायदा किंवा व्यापारासाठी वापरास देता कामा नये.

परंतु भाडया पासून सूट असलेल्या प्रयोजनासाठी मिळकतीचा वापर करून घेणा-या व्यक्ती कडून महापालिका मिळकतीचे काही नुकसान झाले असेल तर

ते पूर्ववत करणे किंवा अशा कामी शहर अभियंता निर्धारित करतील तेवढी नुकसान भरपाई वसूल करणे आयुक्तांच्या अधिकारात राहिल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र४ वाचून दाखिवतात.

विषय :- उल्हासनगर शहरातील काही रस्त्यांना / चौकांना नावे देण्या बाबत नियोजन विकास समितीचा दिनांक २५.५.२००० रोजी चा ठराव क्र३ कायम करणे बाबत.

मा.महापौरः- या विषयासंबंधी आमची सर्वपक्षीय बैठक झाली होती त्यात विपक्ष नेता होते. सभागृहनेता होते. सर्व पक्षाचे गटनेते होते यात हा निर्णय घेतला गेला की, ही जी यादी तयार केली गेली रोड वर चौकांना नामकरण करणे बाबत जी माहिती वेगवेगळया राजकीय पक्षांना पाहिजे होती ती उपलब्ध नाही म्हणून महापालिकेचे शहर अभियंता वर जबाबदारी टाकली की, स्टोर,नगररचना विभाग, जनरल सर्व विभागांना सहयोग देऊन एक अहवाल बनवा. तो अहवाल महासभे समोर आणुन छाननी करून एकेक चौक रोड तपासून नविन घेऊन सर्व पक्षीय एकमताने विषय आणु म्हणून सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

मा.सचिव :- कृपया राष्ट्रगीतावर लक्ष दयावे.

जनगणमन राष्ट्रगीत म्हणुन सभा संपविण्यात आली.

( प्रकाश. प: कुकरेजा )

महापालिका

सचिव

उल्हासनगर

महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१८.८.२०००.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८.८.२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.८.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

| | |
|---|---|
| ३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह | ३६ श्री.वाधवा गिरधारी |
| ४ श्री.गणेश चौधरी | ३७ श्री. पारवानी रामचंद्र |
| ५ श्री.वाघे शामु | ३८ श्री.तलरेजा विनोद |
| ६ श्रीमती. मोकल सीमा सी. | ३९. श्री. गुप्ता प्रभुनाथ |
| ७ श्रीमती.सोनावणे यमुना शालिग्राम मालती | ४०. श्रीमती.करोतीया |
| ८ श्री.ढेणवाल बनावारी सुआलाल | ४१. श्री.बेहरानी ठाकुरदास |
| ९ श्री.उमाप रामदास रामु | ४२. श्री. जाधव सुरेश |
| १० श्रीमती.वेलकर सुरेखा राजन | ४३ श्री.मोरे भिमसेन |
| ११ श्री.यादव नरेश फेकु | ४४ श्री. चव्हाण रमेश |
| १२ श्री. सोनावणे राजु रामभाऊ | ४५. श्री.महाडिक प्रकाश |
| १३ श्रीमती. दासानी मिनु राज | ४६ श्रीमती.साधवानी जया |
| १४ श्रीमती. पवार पंचशीला | ४७ श्रीमती.वनवारी मोना |
| १५ श्री. टाले प्रमोद | ४८ श्री.राजानी नरेंद्र |
| १६ श्री. आढाव रामभाऊ | ४९ श्री.मनसुलकर सुभाष |
| १७ श्रीमती. बगाडे सुनिता | ५० श्रीमती.नाईक यशस्विनी |
| १८ श्री.भांडे भगवान बाबु | ५१ श्रीमती.राजानी भारती |
| १९ श्री.ठाकुर सेवलदास | ५२ श्रीमती.कुंदनानी लविना |
| २० श्री.वनवारी किशोर | ५३ श्रीमती.वलेचा पदमा |
| २१ श्री.तेजी कैलाश | ५४ श्रीमती.गजवानी कांता |
| २२ श्रीमती.रूपचंदानी भगवंती | ५५ श्रीमती.भठीजा इंदिरा |
| २३ श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई | ५६ श्री.केणी जयकुमार |
| २४ श्री.खेमाणी देवेंद्रसिंह | ५७ श्री.पंजाबी नारायण |
| २५ श्री.पमनानी ईश्वर | ५८ श्री.आयलानी कुमार |
| २६ श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास | ५९ श्री.अचनानी पम्मीकुमार |

२७ श्रीमती. मटाई जोनिता नरेश
२८ श्री.चौधरी राजेंद्र
२९ श्री.लांडे पांडुरंग
३० श्रीमती.ससाणे लक्ष्मी मोहनदास
३१ श्री.मोरे भानजी भिकाजी
३२ श्रीमती.राजवानी सुनिता
३३ श्री.वारिंगे पंढरीनाथ
३४ श्रीमती.टेकचंदानी चंदा
३५ श्री.पुरस्वानी जमनादास
६० श्रीमती.वारिंगे पन्ना
६१ श्रीमती.राधवानी आशा
६२ श्री.माखिजा प्रकाश
६३ श्री.रामरख्यानी
६४ श्री.जग्यासी राजु
६५ श्री.बेहरानी गोप
६६ श्री.पंजाबी लाल.
६७ श्री.केसवानी किशोर

--२--

१ श्रीमती.ज्योती कालानी २ श्री.शामसुंदर रोहडा ३ श्री.जयप्रकाश भाटीया ४ श्रीमती.जेस्वानी आशा ५ श्री.किशनानी गोदुमल ना६. श्री.सचदेव गिरधारी रतनमल हे सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्वप्रथम वंदेमातरम् म्हणून सभेची सुरूवात ४.४० वाजता करण्यांत आली.

<u>मा.महापौर</u> :-आजची सभा सुरू होण्यापूर्वी मी पूर्वीचे सभागृह नेता श्री. राजेंदसिंह भुल्लर यांचा वाढदिवस आहे. त्यांचे अभिनंदन करीत आहे.

सर्वांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

<u>मा.सचिव</u> :-प्रश्न क्र.४७६ श्री.बी.बी.मोरे यांचा आहे.

प्रश्न :-१) ब्लॉक क्र.६७९/६८० ,लक्ष्मीधाम, नेताजी चौक येथील बिल्डींगला ऑक्युपाय (सी.सी.)सर्टीफिकेट मिळाले आहे काय? सदर बिल्डींगवर आपली कारवाई काय?
२) प्रभात सिनेमा समोरिल नेताजी चौकतील साई आर्शिवाद बिल्डींगला परमिशन दिलेल्या एफ.एस.आय. व्यातिरिक्त किती बांधकाम झालेले आहे? ते अनाधिकृत बांधकाम कधी तोडणार?
३) से.२५ मधील प्रिन्सेस पॅलेस व नेताजी चौकातील ब्लॉक नं.६८४ येथील बिल्डींगचे परवाना व्यातिरिक्त अनाधिकृत बांधकाम कधी तोडणार?

उत्तरः-१) सी.सी.घेतलेली नाही. जागेवर बांधकाम तपासणी केल्या नंतर त्याबाबत कारवाई करता येईल.
२) जागेवर एफ.एस.आय प्रमाणे बांधकाम केलेले आहे.
३)दोन्ही बांधकामे जागेवर सुरू आहेत.
जागेवर बांधकाम तपासणी केली असता मंजुर नकाशा व्यातिरिक्त बांधकाम आढळून येत नाही.

<u>मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः</u>-आमचे मा.महापौर, आयुक्त, उपमहापौर, सर्व. अधिकारी, आमचा चालिया साहेब उत्त्सव जो ५ नंबर मध्ये सुरू आहे. त्यासाठी महापालिकेने जी मदत केली. यासाठी मी त्यांचे धन्यवाद मानतो. जसे पाणी पुरवठ विभाग, आरोग्य विभाग, यांचे सहयोग मिळाले, रोज लोक येतात. आम्हाला हे जे सहकार्य मिळाले आहे. त्याबददल मी चालिया ट्रस्ट तर्फे सभापती, अधिकारी, या सर्वांचे आभार मानतो. आम्ही सर्व अधिकारी व सदस्यांना तिथे येण्याचे आमंत्रण देतो. ५ तारखे पर्यंत तिथे उत्त्सव आहे त्यापुर्वी तिथे येऊन दर्शनाचा लाभ घ्यावा धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरेः</u>-सन्मानानिय महापौर, आयुक्त साहेब.

(श्री.मोरे यांनी वरील प्रमाणे प्रश्न उत्त्तर वाचून दाखविले.)

सोनावणे साहेबांना मी विचारतो की, इमारत तयार होऊन पडण्याच्या स्थितीत येते तोपर्यंत त्याची तपासणी चालू असते. कधी चौकशी करणार? ती इमारत पडल्यावर चौकशी करणार की, ती पडून परत तयार झाल्यावर चौकशी करणार?

<u>श्री.सोनावणे(नगर रचनाकार)</u>:- जेव्हा सी.सी.साठी ज्याचा अर्ज येईल तेव्हा त्याची तपासणी करून सांगु. जर अतिक्रमण बाबत असेल तर अनाधिकृत



बांधकामासंबधी असेल तर अतिक्रमण विभाग आवश्यक ती कार्यवाही करतील.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u>:-यासाठी तर प्रश्न विचारला ना?

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> जर अनाधिकृत बांधकाम असेल तर अतिक्रमण विभागाशी संपर्क साधा.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u>:-प्रथम नगररचनाकांरांकडून वरीफाय करू. उत्तर आल्यावर त्याप्रमाणे अतिक्रमण विभागास सांगु नाहीतर, अतिक्रमण विभागाला सांगितले हे अनधिकृत बांधकाम आहे तर ते म्हणतात प्रथम नगररचनाकार विभागास विचारा.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u> :-याला सुधारीत प्रश्न आम्ही विचारू इच्छितो . जेव्हा सन्माननिय सदस्य जो प्रश्न विचारतात की, एफ.एस.आय प्रमाणे इमारत तयार झाली की नाही? ती इमारत अधिकृत आहे की, अनधिकृत? त्यास ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले की नाही दिले? प्रश्नात हे सर्व मुद्दे येतात.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>तेच म्हणतो ना ,सी.सी.अजुन दिले नाही. नेताजी चौकात ज्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. ६८४ प्रिंसेस कॉटेज यांच्यामध्ये ब-याच तक्रारी आल्या.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले</u> :-अनाधिकृत असेल तर सी.सी.देणार नाही ना?

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>नाही. प्रश्नच येत नाही दयायचा.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले</u>:-अनाधिकृत असेल तर सी.सी.दयायचा प्रश्नच येत नाही.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>या केसमध्ये ब-याच तक्रारी आल्या होत्त्या. त्यासाठी कोकण भवनचे उपसंचालक इकडे येऊन स्वत: तपासणी करून गेले आहेत. त्यांचा अहवाल अजून यायचा आहे. त्यांच्यावर कार्यवाही करू.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u>:- अहवाल कधी येणार ? किती दिवस? किती वर्षे लागतील?

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>स्वत: उपसंचालक येऊन बघतात. योग्य आहे की नाही ते बघतील.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-</u>जसे काल इमारतीचे ५ पिलर खांब खाली कोसळले तसे तर नाही होणार ना? त्यानंतर लेखी उत्तर मिळेल काय? शाश्वती देऊ शकता? लिखित दया मला.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>कसली शाश्वती?

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-__ इमारतीची शाश्वती हवी तर त्याचे आर.सी.सी कंन्सल्टंट आहेत. त्यांच्याकडून प्रमाणपत्र घेऊ की, इमारत स्टॅबल आहे नाही आहे.ते तर तुम्ही आधीच घेतले पाहिजे होते ना.*



*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__जेव्हा ते कमप्लीशन सर्टिफिकेट मागतील तेव्हा स्टॅबल प्रमाणपत्र मागू अजूनपर्यंत तर त्यांनी प्रमाणपत्र मागितले नाही.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:__-सोनावणे साहेब,मला हे म्हणायचे की, तो जर इतका उशीर लावतो याचा अर्थ ती इमारत अनाधिकृत आहे. तुमच्याकडून ती माहिती का जात नाही अतिक्रमण विभागास. इथे लोकप्रतिनिधी प्रश्न विचारतात. त्यांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण आधीच उत्तर दिले पाहिजे की, याचे उत्तर अतिकमण विभाग देऊ शकतो की नाही.*
*(अरे,फ्लॅश इतका लांबुन मारता. दिसले तर पाहिजे लोकांना? इतक्या लांबुन फ्लॅश मारता.)*

*__श्री.दत्ता भडकवाड(उप.आयुक्त,अ.बा.वि):-__सन्माननिय सदस्य व त्या व्यासपिठवरील अधिकारी प्रश्न क्र.४७६ जो दुसरा मुददा आहे. त्यामध्ये लिहिले आहे की, इमारतीचे बांधकाम एफ.एस.आय प्रमाणे चालू आहे.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:__-हिंदीत सांगा सदस्यांना माहिती पडले पाहिजे.*

*__श्री.दत्ता भडकवाड(उप.आयुक्त अ.बा.वि):-__(यांनी वरील उत्तर हिंदीत दिले.)*
*जोपर्यंत वायोलेशन होत नाही, तोपर्यंत अतिकमण विभाग जात नाही.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-__हे पहा, आपल्या समोर नगररचनाकार आहेत. आपण अतिकमण विभागाचे उपायुक्त आहात. दोघांच्या उत्तरात फरक आहे सांगा.*

*__श्री.दत्ता भडकवाड(उप.आयुक्त अ.बा.वि):-__वेगळे उत्तर नाही आहे, आपण पहिला प्रश्न विचारला सी.सी.विषयी, सी.सी. इमारत पूर्ण तयार झाल्यावर दिली जाते.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:__-माझ्या मताप्रमाणे आपण तर अधिकारी आहात.प्लीन्थ झाल्यावर सर्टिफिकेट देतात.*

*__श्री.दत्ता भडकवाड(उप.आयुक्त अ.बा.वि)__:-ते प्लीन्थ सर्टिफिकेट देतात. कम्पलीशन सर्टीफिकेट इमारत ऑक्युपाय होण्याआधी दिले जाते. ते बांधकाम अजून सुरू आहे, त्यात उप संचालकांनी पण चौकशी केली आहे. नगररचनाकार मला म्हणाले आहेत की, एफ.एस.आय प्रमाणे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे अतिकमण विभागाचा संबध येत नाही.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-__नगररचना विभागाचा संबंध येतो.*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार)__:-ठीक आहे. ८ दिवसात.....*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-__मला फक्त इतके हवे की, एफ.एस.आय. प्रमाणे इमारतीचे बांधकाम चालू आहे की नाही.*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ बांधकाम एफ.एस.आय. प्रमाणे चालू आहे. चारी इमारतींचे बांधकाम एफ.एस.आय. प्रमाणे चालू आहे.*

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-मी म्हणतो एफ.एस.आय. प्रमाणे बांधकाम नाही, सदना समोर तुम्ही असेच म्हणाल एफ.एस.आय. प्रमाणे बांधकाम चालू आहे. मी म्हणतो एफ.एस.आय. प्रमाणे बांधकाम चालू नाही म्हणुन तर लोक प्रतिनिधी विचारतात.

--५--

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- आम्ही इंन्स्पेक्शन करू तुम्ही दाखवा.

मा.आयुक्त :- सोनावणे, सन्माननिय सदस्यांचे म्हणणे आहे की, एफ.एस. आय प्रमाणे बांधकाम चालू नाही. उपसंचालकांनी पहाणी केली त्यांचा अहवाल अजून यायचा आहे. त्यांचा अहवाल आल्यावर त्यांचा रिपोर्ट जर समान असेल तर ठिक आहे नाही तर जे पण वायोलेशन असेल त्यावर कार्यवाही केली जावी.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मा. महापौरजी, मला याविषयावर बोलण्याची परवानगी दयावी. सोनावणे साहेबांना मी प्रश्न विचारला १७८. १९९९ ला आणि हे उत्तर देतात की, १८.१.२००० ला ती इमारत प्लॅान प्रमाणे होती. आम्ही मुर्ख आहोत का? १७८.१९९९ ला तुम्ही उत्तर देत आहात आणि सांगता जानेवारीत इमारत ॲज पर प्लॅान होती त्यानंतर काय? नंतर सांगा त्यानंतरच्या आठ महिन्यात काय झाले, ऑगस्ट महिन्यात मी प्रश्न विचारते उत्तर जानेवारीचे दिले जाते.

श्री. सोनावणे (नगररचनाकार):-जानेवारीत परवानगी दिली आहे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:- मला ऑगस्ट चे उत्तर दया ना. जानेवारीचा अहवाल पाहिजे असता तर, आपणास आठ महिन्याचा पगार का दिला असता? आमची महानगरपालिका तुम्हाला का पगार देते? आपण काय उत्तर देतात? सिंपली नॉनसेन उत्तर दिले. यु आर मिसगायडींग होल हाऊस. ऑगस्ट मध्ये त्या रोडची त्या सी.सी.प्रॅसेजची काय स्थिती होती? तुम्ही मला जानेवारीचा अहवाल देतात.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-आपण जी तकार केली होती अतिकमण विभागाने चौकशी करून उत्तर दिले होते.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:- काय समजुन बसला आपण?भ्रष्टाचाराची पण हदद असते. तुम्ही काय आम्हाला मुर्ख समजता? कशाला तुम्हाला खुर्चीवर बसवतो? सांगा मला? जानेवारीचा अहवाल देता मला? मी ऑगस्टला प्रश्न विचारते. १० दिवसांनी २० दिवसांनी उत्तर दिले असते. मला हरकत नव्हती या बाबतीत आपण म्हणता जानेवारीत ही पोजीशन आहे, ऑगस्टमध्ये काय पोजीशन आहे ते सांगा मला? वेडे बसलो आहोत का?

मा.सदस्य श्री.देवेंदसिंग खेमाणी:- मा.महापौरजी,......

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानी:-मा.महापौरजी आपण पाहिले, जानेवारीची पोजीशन दर्शविली,ऑगस्ट मध्ये प्रश्न विचारला तर ऑगस्टमध्ये काय स्थिती होती ते सांगायला पाहिजे होते. कालपर्यंतच्या तारखेचा रिपोर्ट पाहिजे होता.

मा.महापौर :- कुणी पण सन्माननिय सदस्य महापालिकेकडून एखादी माहिती मागतो तर सर्व अधिकारी वर्गाचे हे कर्तव्य आहे की, तंतोतंत माहिती दिली पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. जया साधवानीः-कमीत कमी कालच्या तारखे पर्यंत वा १ महिना अगोदर पर्यंत दिली असती तरी समजलो असतो. ८ महिने पुर्वीचा अहवाल देतात.



मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणीः- तुम्हाला कमीत कमी तुमच्या प्रश्नाचे / पत्राचे उत्तर तरी मिळते. खरे किंवा खोटे. मला तर उत्तर पण मिळत नाही. जेव्हा मी माझ्या प्रभागातील एका अनाधिकृत बांधकामाबाबत तकार दिली असताना तुम्ही सांगितले निश्चित अशी तकार दया. माझ्या प्रभागात कॅनरा बॅंकेच्या बाजुला तलरेजा नावाचा बिल्डर प्लान मंजुर न करता अनाधिकृत बांधकाम करीत आहे. त्याची बाल्कनी दुस-याच्या घरावर येत आहे. तो दुस-याच्या जमिनीवर बांधकाम करीत आहे. माझ्या तकारीची कुणी दखल घेत नाही. सोनावणे साहेब तुम्ही काय कार्यवाही केली?

मा.सचिव :- प्रश्न क्र.४७६ मधील अ,ब,क पण आपलेच आहेत.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- सोनावणे साहेब, या प्रमाणे दुसरे असे की, नेताजी चौकात प्रभात सिनेमा......
(श्री.बी.बी.मोरे यांनी प्रश्न वाचुन दाखविल. यात-हेने अ.ब.क.ड. तिन्ही प्रश्न तेच आहेत.)

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- आपण जेव्हा प्रश्न विचारला त्यावेळी मी स्वतः साईटवर जाऊन पहाणी केली. तोपर्यंत तरी प्लॉन प्रमाणे बांधकाम चालू होते.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-जर काम त्याप्रमाणे चालू होते किंवा आहे. तर लिखित त्याप्रमाणे त्यावेळी उत्तर दिले होते. जर आधी माहिती दिली असती प्रश्न महासभेत येण्याआधी,तर आम्ही चौकशी केली असती आज काय होते आम्ही प्रश्न विचारतो त्याचे उत्तर काहीही असो इकडे सांगितले जाते काम प्लॅन प्रमाणे आहे आम्ही नंतर लिखित देतो २,४ महीने असेच निघुन जातात याप्रमाणे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-नगररचना विभागातून प्लॉन मंजुर होतो. नंतर प्लीन्थ केले जाते. कंप्लीशन सर्टीफिकेट वेळी डेवलप करणारा अर्ज देतो, मग आम्ही तिकडे जातो,नंतर सी.सी.देतो किंवा रिजेक्ट करतो, या व्यतिरिक्त जे पण अनधिकृत आहे अवैद्य आहे. त्यासंबंधी अतिकमण विभागाशी संपर्क साधावा. माझा संबंध नाही.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-प्रथम हे सांगा उल्हासनगर मध्ये जे पण इमारतीचे बांधकाम चालू आहे ते प्लॉन प्रमाणे आहे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- आपणास जर वाटते ते इलिगल आहे तर अतिकमण विभागास विचारू शकतात, जर काही वायोलेशन असेल.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-कालची गोष्ट आहे, आज वर्तमानपत्रात पण आले आहे. उल्हासनगर मधील ५ इमारतीचे काम खचले आहे ती पडणार आहे. आता पुर्ण तपासणी करीत आहेत. आता बिल्डरला पकडतील. फक्त बिल्डरचाच दोष नाही यात, नगररचनाकार आहेत, अधिकारी आहेत त्यांनी काय लक्ष दिले.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-आपणांस तकार करायची असेल तर, निश्चित ठराविक करावयाची आहे. आम्हाला याबाबत शंका आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-लिखित तकार दिली आहे.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी :- नाही. नाही. सोनावणेजी, तुम्ही म्हणता निश्चित, ठराविक तक्रार दयावी मी तुम्हाला लिखित दिली आहे त्यासंबंधी तुम्ही काय केले.

मा.महापौरः- दर्शनासिंहजी, ज्यांनी प्रश्न विचारला त्यांना उत्तर तर मिळू दया.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी :- सोनावणे म्हणतात स्पेसिफिक लिहा आम्ही दिले तर आम्हाला उत्तर दिले नाही त्याचे काय?

मा.महापौर :- त्यांना उत्तर तर मिळू दया.

मा.सदस्य श्री.दर्शनासिंग खेमाणीः- ते उत्तर बरोबर देत नाही आहेत.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-सोनावणे साहेब मी जे विचारले त्याचे बरोबर उत्तर मला लिखित किती दिवसात दयाल.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-आपण मला हे सांगा तुम्ही विचारू काय इच्छिता.

मा.महापौरः- मोरे साहेब, आपण ठरवा विशिष्ठ इमारतीची माहिती हवी तर ती मागा यांची भुमिका मर्यादित आहे. त्यांना फक्त प्लॅन एप्रुव करायचा आहे, जर काही वायोलेशन होते तर त्याचे विभागाचे जे सब आर्डीनेट आहे. ते जर सांगतील तर तोडणे हे अतिक्रमणाचे काम आहे. दोन्ही मुदयांना एकत्र करू नका.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-मी एकत्र नाही करत, नगररचनाकार विभागाचाच प्रश्न आहे की त्यांनी प्लॅन पास केला का?मार्जिन सोडले का? हे मी त्यांना विचारू इच्छितो. मला योग्य उत्तर दिले, माझे समाधान झाले तर मग मी ते अनाधिकृत आहे नाही आहे हे अतिक्रमण विभागाला विचारीन.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-महापौरजी, मोरेचे हे म्हणणे आहे की, इमारत तयार झाली तर ती किती स्कवायर फुट आहे. मार्जिन सोडले कि नाही, अधिकृत आहे कि अनाधिकृत? एफ.एस.आय. प्रमाणे बांधकाम आहे की नाही? हा प्रश्न त्यांचा होता. माझ्या मते आयुक्तांनी उत्तर दिले की नगररचनाकार व वरीष्ठ अधिकारी यांनी पहाणी केली अहवाल आल्यावर ते ८ दिवसात उत्तर देतील.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-असे नाही आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-महापौर साहेब, हे काय चालू आहे.जरा बटन दाबा. व्हॉट इज धिस लफडा.

मा.महापौर :- सर्व स.सदस्यांना विनंती आहे. कृपया शांत बसा, बी.बी.मोरेंना त्यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे समाधान मिळू दे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-आपण जो ४७६ प्रश्न केला त्यात असलेल्या सर्व इमारतीचे प्लान पास आहे. त्यांना प्लीन्थ सर्टिफिकेट दिले आहे, त्यानंतर



कंपलिशन सर्टिफिकेट आजपर्यंत नाही दिले गेले. कारण काम सुरू आहे. त्यातून आपला तिस-या नबंरचा जो प्रश्न आहे. त्यासाठी तक्रार आमच्या उपसंचालकाकडे पण गेली होती. त्यांनी पहाणी केली आहे. त्यांचा अहवाल एक, दोन दिवसात मिळेल.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-मला लिखित दयाल? किती दिवसात दयाल.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर :-यांचे काम आहे प्लॅान पास करणे. त्यावर अतिक्रमण आहे तर उपआयुक्त अतिक्रमण यांनी उत्तर दयावे. त्यांनी सांगितले ना, प्लान पास केला म्हणुन.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-तेच विचारतो ना? किती दिवसात दयाल लिखित.

मा.सदस्य श्री.सेवलदासठाकुरः-तो तर उपसंचालक अहवाल देणार ना?

मा.सदस्य श्री.लाल पंजाबीः- मा.महापौरजी २५ मिनिटे. एक प्रश्न चालू आहे.

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः- मा.मोरे साहेब, टाऊन प्लॅनर जेव्हा प्लॅान पास करतो तेव्हा एक प्रत अतिक्रमण विभागात देतो, देतो ना? तर त्या इमारतीवर बिल्डर एफ.एस.आय. वाढवतो तर ते पहाण्यासाठी अतिक्रमण विभाग आहे ना? त्यांचे काम आहे. वायोलेशन पहाणे, प्लीन्थ पहाण्याचे काम नगररचनाकाराचे आहे ते पाहून ते प्रमाणपत्र देतात. कंम्प्लीशन सर्टीफिकीट इमारत पुर्ण होण्याआधी देतात यामध्ये जे काही काम आहे ते अतिक्रमण विभागाचे आहे. नगररचनाकाराने प्लॅान पास केला. सबमिशन दिले, अतिक्रमण विभागाला तर त्यांचे काम आहे, वायोलेशन न होवो हे पहाणे हे अतिक्रमण विभागाचे काम आहे, मी मोरे साहेबांना हे सांगु इच्छितो हे दोन्ही गोष्टी मिक्स करू नका व सभागृहाचा वेळ वाया घालवू नका.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-सोनावणे साहेब हे जर एफ.एस.आय. प्रमाणे बांधकाम आहे तर लिखित कधी देणार?

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- एफ.एस.आय. प्रमाणे आहे मी सांगत आहे ना.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-सांगत आहात ना? लिखित कधी देणार?

मा.महापौर :- मिस्टर मोरे, धिस द ॲनसर. जितके पण सदस्य आहेत.....

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-मा.महापौरजी, आम्हाला लिखित यासाठी हवे की, त्यांनी उत्तर बरोबर दिले की नाही ते पहायला.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुरः- हे उत्तर अतिक्रमण विभागाचे देणार. सोनावणे नाही, उगाच वेळ वाया घालवत आहात.

मा.महापौर :- जितके पण सन्माननिय सदस्य लिखित प्रश्न विचारतात त्यांना लिखित उत्तर दिले जाते. जर त्याने त्यांचे समाधान नसले झाले तर महासभेत ते व्यक्त करू शकतात मर्यादे पर्यंत. नंतर जर काही पुरक प्रश्न असेल तर तो पुढील महासभेत दया, त्याचे उत्तर मिळेल पण या त-हेने अर्धा तास एका प्रश्नावर गेला कोर्टाप्रमाणे तपासणी झाली तर हे ठिक नाही.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढावः- पुरक प्रश्न पुढील महासभेत नाही येऊ शकत याबरोबरच येतो.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरीः- मा.महापौरजी, आजच्या सभेत मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी हाताला काळी फिती बांधुन आले आहेत याचे कारण काय सांगितले तर बरे होईल.

मा.महापौरः- तो इश्यु आता नका उपस्थित करू.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- प्रश्नोत्त्तराचा तास आहे, व्यत्त्यय आणु नका.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता बगाडेः- मा.महापौरजी, एका प्रश्नाला एवढा उशीर होतो तर बाकीचे प्रश्न केव्हा होणार.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः- मा.महापौर आज जसे राजेंद सिंह भुल्लर महाराजांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच काही काही गोष्टी अशा असतात. सन्माननिय सदस्यांना काय दुःख आहे. त्यांना काळी फित का बांधली आहे? कुणाचा विरोध करतात? सदनाला समजले पाहीजे, कुणीही सदस्य दुःखासाठी म्हणुन काळी फित बांधतो म्हणजे त्यांना काही दुःख आहे ते दुःख काय आहे? ते सदनाला समजले पाहिजे.

मा.महापौरः- प्रश्नोत्त्तर संपु दया मग बघु?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकरः- मी महापौरांना, मी मा.सदस्यांना विनंती करेन, त्यांचे दुःख ते जाणो सदनाचा वेळ वाया घालवू नका.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिकः-निषेध कुणाचा करतात? काळी पटटी बांधुन. सभागृहाचा का कसला? ते तर समजले पाहीजे. का आम्हा सर्वांचा निषेध करतात?

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरेः-मा.महापौर, एक सदस्य काळी फित बांधुन सभेत येतो त्याचे कारण प्रथम महापौरांना माहिती पाहिजे मग आयुक्तांना काय दुःख आहे.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- हा प्रश्नोत्त्तराचा तास आहे. व्यत्त्यय आणु नका.

मा.सचिवः- प्रश्न क्र.४७७ श्री.राजु जग्यासी यांचा आहे.

प्रश्न :-१) आर द न्यु रोडस कंन्स्ट्रक्शनड स्ट्रीक्टली ॲज पर डी.पी.?
२)वॅाट इज द डीअमॅटर ऑफ नेहरू चौक सर्कल ॲज पर डी.पी.?
३)इज द नेहरू चौक सर्कल ट्राफीक इजलॅड कंन्स्ट्रक्शनड ॲज पर डी.पी.?
४)वेदर ऑल कंन्स्ट्रक्शनड कमींग आर इन द वे ऑफ प्रपोजड नेहरू चौक सर्कल रीमूव्ह..?
५)इज इट टू दॅट द सर्कल इज शीफ्टेड द सेम स-टन कंन्स्ट्रक्शन..?

उत्त्तर :-१) होय.
२) विकास योजनेपुर्वी चौक अस्तित्त्वात होता व चौकामधील सर्व रस्ते सर्कलमध्ये जोडतील असे नाही, तरी अंदाज व्यास १००'' १००'' आहे.
३)होय.



४)कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

५)नाही.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u>:-सचिव साहेब, जरा प्रश्न वाचा.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> त्यांनी प्रश्न वाचुन दाखविला.

व्हॉट इज द डॉयमीटर ऑफ नेहरू चौक सर्कल.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u> उत्तर काय.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>१०० फुट.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u>:-पुर्ण उत्तर वाचा.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>तेच १०० फुट.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u>उत्तरात प्रोकसीमेटली लिहिले की एकजेकट लिहिले.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>१०० फुट आहे.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u>:-डि.पी.त अंदाजे असते की, अचुक असते.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>डी.पी.मध्ये सर्कल आहेच नाही.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-</u> सोनावणे साहेब, मी आपणास प्रश्न विचारला, नेहरू चौकात जे सर्कल आहे. ॲज पर डी.पी.त्याचे डायमीटर काय आहे? आपले उत्तर आहे, अंदाजित १०० फुट. मला फक्त हे सांगा की, डि पी मध्ये कोणतीही गोष्ट अंदाजे असते की अचुक?

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> मी तेच सांगतो की, तुम्ही जर शीट पहाल तर त्यात सर्कल आहेच नाही. आपण म्हणता सर्कल आहे.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-</u> मी नाही म्हणत सर्कल आहे. आपण म्हणता सर्कल नाही, तर नाही म्हणुन उत्तर दया. आपण उत्तर दिले सर्कल आहे, आपण उत्तर दिले डि.पी प्रमाणे अंदाजे १०० फुट आहे. ते कोणत्त्या आधारे लिहिले १०० फुट.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> १०० फुट आहे ना?

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u>जर १०० फुट आहे तर अंदाजे का लिहिले म्हणजेच डी.पी.त स्पष्ट १०० फुट आहे. उत्तर चुकीचे आहे.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>चुकीचे असू शकते.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u> असू शकते नाही आहे, हे काय बोलणे झाले.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी</u>:-आपली सगळी उत्तरे अशीच असतात का? ८ महिने जुने, चुकीचे,असे का करता आपण? आपले मानसिक संतुलन तर ठीक आहे ना? मेडीकल अधिकारी कुणी असेल तर यांचे



मानसिक संतुलन ठीक केले जावे का काही औषध वगैरे घेतले का? ८ महिने पूर्वीची उत्तरे देता असे का करता आपण काय घडले?

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u> आयुक्त साहेब यांचे बरोबर उत्तर कधी मिळेल याची माहिती द्या.*

*<u>मा.आयुक्त:-</u> आपला जो प्रश्न आहे तो रोडशी संबंधित आहे याचे उत्तर क्लीअर कट यस मध्ये दिले आहे. दुसरा प्रश्न पर्टिक्युलर नेहरू चौक विषयी आहे. याने जे उत्तर दिले की एक्जेक्टली सर्कलच्या शेप ने जे डायमीटर पाहिजे तसे नाही येणार असे उत्तर द्यायला पाहिजे.इट कॅन बी ऑड फीगर एक्जेक्टली नाही सांगता येणार.*

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u> आयुक्त साहेब, माझे असे म्हणणे होते की,सोनावणे साहेब कनफ्युजन दुर करून बरोबर उत्तर कधी देणार?*

*<u>मा.आयुक्त:-</u>आपणास जे वाटत होते तेच मला वाटत होते, मी विचारले य. आर रिप्लायिंग टू जि.बी.यु. रिप्लाय प्रॉपली. अंदाजे नका देऊ. व्हेन यु आर सेअिंग अबाऊट सरक्युलर शेप स्ट्रीकली इट कॅन बी लाईकली ऑड शेप. म्हणुन अंदाजे हे शब्द वापरले.*

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u>:- ठिक आहे साहेब, डी.पी. मध्ये काही प्लॅन असेल सर्कल विषयी.*

*<u>मा.आयक्त</u> :- यु आर फि, टू सी.ॲनी टाईम द डिपी प्लॉन.*

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u> मला हेच म्हणायचे होते की, जसा प्लॅान आहे एक्जेक्ट डायमिटर काय आहे. बरोबर उत्तर द्या, कधी देणार?*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> उद्या या, दाखवू शकतो.*

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u>:- लिखित उत्तर मला पाहिजे.*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>लिखित उत्तर देईल.*

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u>:-ठिक आहे.*

*<u>मा.सचिव</u> :- प्रश्न क्र.४७८ हा श्री.पांडुरंग लांडे यांचा आहे.*

*<u>प्रश्न</u> :-साईबाबा मंदीर ते डॉलफिन क्लब या रस्त्यावर असणारी शिवकला टेक्सटाइल नावाची कंपनीची इमारत असून त्या इमारतीला ३० फुट खुण (मार्कींग) दिले असून त्या रस्त्याचे काम जल्द वेगाने सुरू झाल्याने सदरची इमारत मध्ये अडथळे निर्माण करीत आहे. तरी सदरची शिवकला टेक्सटाईल इमारत कधी तोडणार?*

*<u>उत्तर :-</u> सदरहु इमारती जवळ नाल्याचे खनन येताच कॉन्ट्रॅक्टर ने ते विभागास कळविताच शिवकला प्रमाणे तोडण्यात येईल.*

*<u>मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे</u> :- ठिक आहे.*

*<u>मा.सचिव</u> :- प्रश्न क्र.४७९ श्री.नारायण पंजाबी यांचा आहे.*



*<u>प्रश्न:</u>-इन द रोड वायडिंग वर्क हॅव मेनी हाऊसेस ॲन्ड शॉपस् आर डिमॉलिश? प्लीज स्पेसिफाय नं. ऑफ शॉर्पा हाऊसेस.*
*ए) हाऊ अल्टरनेट साईट अलॉक्टेट टू इफेक्टेड, स्पेसिफाय एरियावाइज, लोकेशन इसीटी. ऑफ शॉप, हाऊसेस.*
*बी)अल्टरनेट साईट अलॉक्टेट प्लॉट हीज रिजर्व्हड प्लॉट ऑर अदरवाइज.*

इफ रिझर्व्ह प्लॉट परपोझ ऑफ द प्रीव्हीअसली,
इफ रिझर्व्हेशन्स कॅन्सल्ड बाय प्रोसिडयुर.
सी) ऑथर्टी पॉवर फॉर अलोकेशन ऑफ अल्टरनेट साईड, बाय हुम अलोकेशन प्रोसिडयुड केअरड आऊट.
डी) अ लोकेशन ऑफ अल्टरनेट साईड टू इफेक्टेड, वॉट टाईप ऑफ अव्हायडन्स सबमिटेड, कॅरिड आऊट बाय कार्पोरेशन स्पेसिफाय.
इ)गर्व्हमेंट रेग्युलेशन नंइज दॅट बीफोर डीमोलेशन ऑफ अेनी स्ट्रक्चर रिहॅबिलेशन मे बी डन फस्ट ॲन्ड दॅन डिमोलेशन डन, दीस टाईप ऑफ वर्क कॅरीड आऊट आवर ऑदरवाइज? स्पेसिफाय.
डिटेल ॲन्सर मे बाय रिप्लाय.

<u>उत्तरः-</u> दुकाने १६९, घरे १९८.
ए) ज्यांची बांधकामे १,२,३ कॅम्प मध्ये बाधीत झाली अशांना साईट क्र.७४, टेलिफोन एक्सचेंज जवळ पर्यायी जागा देण्यात आली, व कॅम्प क्र.४,५ मध्ये साईट क्र.१४,१६, १०३ या ठिकाणी पर्यायी जागा देण्यात आली.
बी)साईट क्र.७४ वर १०३ या जागेवर प्राथमिक शाळेचे आरक्षण आहे. साईट क्र.१४ व १६ या जागेवर खेळाच्या मैदानाचे आरक्षण आहे. सदर आरक्षणामध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यात आला आहे.
सी)उल्हासनगर महानगरपालिका.
डी)टॅक्स पावती
पाणी बील.
इ)बाधीत होणा-या सर्व लोकांना पर्यायी जागा देण्याची व्यवस्था महानगरपालिकेने केली होती.

<u>मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी</u>:- ठिक आहे.

<u>मा.सचिव</u> :- प्रश्न क्र.४८० हा श्री.विनोद तलरेजा यांचा आहे.

<u>प्रश्नः-</u>अे)द सॅम्पल ऑफ मटेरियलस् युजड् इन सिमेंट ब्लॉक रोड कंन्स्ट्रक्टेड बिटवीन ओटी सेक्शन उल्हासनगर४ टू व्हीनस टाकीज सेक्शन २५ वॉज सेंट टू व्ही.जी.टी.आय माटुंगा मुंबई फॉर नेससरी टेस्टींग व्हाट इज द रिझल्ट ऑफ द टेस्ट कंडक्टेड बाय द इन्स्टूटयूट?
बी)वॉट करस्पोंन्डन्स हॅज बीन इनीटाएट बाय म्युनसिपल कर्पोरेशन ऑफ सीटी ऑफ उल्हासनगर वीथ द इंन्स्टुटयुट फोर फार? प्लीज क्लेरिफाय?
सी) इट इज लर्नट् दॅट द आर्कीटेक्ट ॲन्ड कॉन्ट्रक्टर कंनर्सन आर ट्राइंग टू मॅनेज वीथ द इंन्स्टूटयूट टू हेव फेवरेबल रिपोर्ट वेदर इट इज अ फॅक्ट आवर आदर वाइज?
डी)हाऊ मच टाईम इट व्हील टेक टू गेट द रिपोर्ट अबाऊट द टेस्ट?

<u>उत्तरः</u>-ए) द लेटर फॉर कंन्डीशनर सर्वे हॅज बीन सेंट टू व्ही.जे.टी.आय. माटुंगा, मुंबई द टेस्ट रिजल्ट ऑफ कंन्डीशनर सर्वे इज अवेटेड फॉम व्ही.जे.टी.आय.
बी) द कार्पोरेशन हॅज रिटर्नड् लेटरस् टू द व्ही.जे.टी.आय.मुंबई फॉर कंन्डीशनल सर्वे. द टेस्टींग रिझल्टस् आर अव्हेटेड फॉम व्ही.जे.टी.आय.
सी)इट इज नॉट ट्रु.



डी) द व्ही.जे.टी.आय.मुंबई हॅज इन्स्पेक्टेड द अबव्ह वर्क. इट व्हील टेक अबाऊट वन मन्थ टाईम टू गेट द टेस्टींग रिपोर्ट फॉम व्ही.जे.टी.आय मुंबई.

<u>मा.सदस्य श्री.विनोद तलरेजाः-</u> ठिक आहे.

<u>मा.सचिवः</u>- प्रश्न क्र.४८१, ४८२ श्रीमती.ज्योती कालानी यांचा असून त्या उपस्थित नसल्याने कार्यवृत्तात त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न ४८१:-ए)व्हीच आर द सीटस् एअरमार्क फॉर द प्रपोज ऑफ अल्टरनेट साईट अलोटेड टू द परसन्स इफेक्टेड अन्डर रोड वाइडिंग ऑफ ३३ रोडस्. बी)वेदर सच सीटस आर रिझर्व्ह फॉर हेबिलेशन ऑफ डिसहाऊस परसन्स ऑर फॉर अेनी ऑदर डेसिग्नेटेड रिझर्व्हेशन्स इन द डेव्हलपमेंट प्लान प्लीज स्पेसिफाय.
सी)वेदर सच सीटस् ऑफ रिझर्व्हेशन बीलॉंगस टू कॉर्पोरेशन ॲन्ड आर वीदीन द परमनन्ट पझेशन्स ऑफ कॉर्पोरेशन?
डी)व्हीच क्लास ऑफ इफेक्टेट परसन्स अंडर रोड वायडिंग वुल्ड बी इलायबल फॉर अल्टरनेट सीटस् फॉर रिसायडेंन्टीयल ऑर कमर्शीयल परपोझ ॲज द केस मे बी ॲन्ड टू वॅटएक्सटेंड.

उत्तरः-अ)१. आरक्षण क्र.१४ खेळाचे मैदान (कॅम्प नं.४ व)
२. --''--- १६ --''----- ----- ५ ----
३. --''--- ७४ प्रा.शाळा (कॅम्प नं.२)
४. ---''--- १०३ प्रा.शाळा (कॅम्प नं.५)
ब) नाही, वर नमुद केल्याप्रमाणे आरक्षित आहेत.
क)वरील सर्व आरक्षित भुखंडाचा ताबा उप-विभागीय अधिकारी यांचे कार्यालयातर्फे नगरपालिकेस वर्ष १९८७ रोजी देण्यात आला.
ड)ज्या विस्थापित लोकांची घरे ५० टक्के व त्याच्यापेक्षा जास्त प्रत्यक्षात रोड मध्ये येत होता. त्यांच्यासाठी १० १६ असे रहिवास क्षेत्र व ज्या लोकांची दुकाने ५० टक्के व त्यापेक्षा जास्त बाधीत होता होती त्यांना ८ ८ असे क्षेत्र विस्थीपांत होणा-यांना देण्यास आले आहे. व १०० टक्के ज्यांचे नुकसान झाले आहे. त्यांना पर्यायी जागा देण्यात आली आहे. तसेच ज्यांचे अंशतः नुकसान झाले आहे व ते त्याच जागेवर राहू इच्छितात अशांना त्यातुन वगळण्यात आले आहे.

प्रश्न ४८२:-अे)हाऊ मे परसनस् सो फार इफेक्टेड इन रोड विडेनिंग हॅव बीन री-हॅबलीअेट इन द म्युनिसिपल प्रीमाइसेस डीसाइनड फोर अेनी ऑदर परपोझ रिझरव्हेशन.
बी)प्लीज. स्पेसिफाय द लिस्ट ऑफ परसन्स गीव्हन रिसीडेंन्टीयल ॲन्ड शॉप प्रीमाइज ऑन द सेड प्लॉट ॲन्ड देअर प्लेस ऑफ रि-हॅबिलेशन.
सी) वॅट इज द क्लीटेरीया फॉर अलॉटमेंट साईट. वेदर अनऑथराईज्ड स्ट्रक्चर ऑर इनक्रोचमेंट मेड ऑन रोडस हू आर अल्टरनेट साईट फॉर रिहॅबिलेशन.
डी) हु इज अलॉटींग द अल्टरनेट साईटस ॲन्ड वॅट इज द मेथड ऑफ कन्वेंन्स ॲन्ड वॅट डॉक्युमेंटस आर बीयींग वेरीफाय.
इ)वेदर द परसन्स प्राइवेट लॅन्ड इट इफेक्ट इन रोड वायडिंग इज गीवन कंनेशन ऑर ॲडीशनल एफ.एस.आय आवर अल्टरनेट साईट.
एफ)वेदर अेनी -हीटन नोटीस इज गीवन टू द परसन्स इफेक्टेड इन रोड वायडिंग ॲन्ड व्हाट वुल्ड बी द डुरेशन.
जी)वेदर द परसन्स इफेक्टेड इन रोड वायडिंग कुल्ड रेज अपर आर.सी.सी फ्लोअरस ऑन द लॅन्ड ऑफ अल्टरनेट साईड ॲन्ड वॅट वुल्ड बी द लिमिट ऑफ अपर फ्लोअरस. वॅट इज द लिमिट प्रीस्काइब बाय यु.



एच)वेदर देअर वुल्ड बी अेनी ट्रीयेट ऑफ डीमोलिएशन टू द परसन्स रेझिंग ग्राऊंड लेवल ऑर अप्पर फ्लोअर लेवेक स्ट्रक्चरस ऑन द अल्टरनेट सीटस् बीयींग अलॉटेड बाय द कॉर्पोरेशन इनलियु ऑफ स्ट्रक्चरेस इफेक्टेड इन रोड वीडिंइनीग.

उत्तर :-अे)आतापर्यंत पर्यायी जागा खालील प्रमाणे देण्यांत आल्या.
दुकाने-१४९ , घरे-१०८
बी)सोबत जोडलेल्या छायांकित प्रतिप्रमाणे.

सी)ज्यांची बांधकामे ५० टक्के पेक्षा कमी बांधील झालेले आहेत, त्यांना पर्यायी जागा देण्यात आली नाही. १०० टक्के बांधीत होणा-यांना पर्यायी जागा देण्यात आलेल्या आहेत. पर्यायी जागा ज्यांची बांधकामे पुर्णतः बांधीत झाली अशा सर्वांना मानवतेच्या दृष्टीकोनातुन पर्यायी जागा देण्यात आल्या आहेत. तशी प्रस्तावना ११.११.९९ रोजीच्या महासभेत करण्यात आली होती.
डी)उल्हासनगर महानगरपालिकेने पर्यायी जागेचे वाटप केले, वाटप करताना अर्ज दाराकडून कर पावती, पाणी पटटी पावती अशी कागदपत्रे घेण्यात आली होती.
इ)यांची मालकी हक्काची जागा रस्ता रूंदीकरणात गेली अशांना त्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात येईल.
एफ)नोटीस देण्यात आलेली नाही.बी.पी.एम.सी ॲक्ट कलम २३१ अन्वये विकास रस्त्याआड येण्याच्या बांधकामांना नोटीस देण्याची आवश्यकता नाही.
जी)ज्या लोकांची बांधकामे ५० टक्के पेक्षा जास्त बाधीत झाली त्यांना पर्यायी जागा नको अशांना वरती एक मजला घेवू दयावा. असे धोरण ठरविण्यात आले.
एच) नाही.

<u>मा.सचिव</u> :- प्रश्न क्र.४८३ हा श्रीमती भगवती रूपचंदानी यांचा आहे.

<u>प्रश्नः-</u>१)अे)वॉट इज द कंन्स्ट्रक्शन कॉस्ट ऑफ सिमेंट कॉक्रीट रोड फॉम ओ.टी.सेक्शन उल्हासनगर४ टू विनस सिनेमा ॲज पर द टेंडर अलॉटेड?
बी)हाऊ मच वर्क इज डन ॲन्ड वॉट इज द बॅलेंस वर्क?
सी)व्हाय द बॅलेन्स वर्क ऑफ सीमेंट कॉक्रीट रोड फॉम ओ.टी.सेक्शन टू विनस सिनेमा इज नॉट बीयींग कंमप्लीटेड?
डी)वॉट ॲक्शन हॅज बीन टेकन बाय यु अगेन्स्ट द कंन्स्ट्रक्टर जंक्नुस कंन्स्ट्रक्शन कं.मेसर्स अर्जुन कंन्स्ट्रक्शन कंपनी. फॉर नीगलिजीएन्स डिफॉल्ट ॲन्ड लेदरजीक ॲटीटयूड?
इ)व्हाय द कॉर्पोरेशन इज नॉट टेक ॲक्शन अगेंन्स्ट द कंस्ट्रक्टर वेन सेवरल ॲडमोनिशन लेटरस इशुड बाय कॉर्पोरेशन?
व्हाय लॉग रोड इज बीयींग गीवन टू द कंन्स्ट्रॅक्टर बाय ऑफिस?

२)एफ)वॉट वुल्ड बी द पेनल ॲक्शन इफ द कंन्स्ट्रक्टर कंन्टीटयुझ टू डीफॉल्ट ॲन्ड इज नॉट कंम्प्लेटेड द बॅलेन्स वर्क?
जी)व्हाय द ॲक्शन अगेन्स्ट द कॉन्ट्रॅक्टर इज बीयींग डिलेड? व्हाय दे आर नॉट बीयींग ब्लॅकशिट हु इज टू बी हेल्ड रिस्पॉन्सीबल?
एच)वॉट इज द डेट ऑफ अपॉइंटमेंट ऑफ मेसर्स उत्तम एजन्सी वीथ कंन्डीशनस?
आय)वेदर मेसर्स उत्तम एजेन्सी हॅज स-प्राइज्ड द अबव्ह रोड?
जे)वेदर अेनी डीफेक्ट फाऊंड बाय देम? इफ यस, वॉट ॲक्शन टेकन बाय देम?

३)के)हाऊ मच अमाऊंट पेड टू उत्तम एजन्सी फॉर दीस वर्क?



<u>उत्तर</u> :-अे)कंन्स्ट्रक्शन कॉस्ट ऑफ सीसी रोड फॉम ओ.टी सेक्शन टू विनस सिनेमा उल्हासनगर४ इज ॲज पर टेंडर इज अबाऊट रू. १,१२,२६,६२०/-
बी)६० परसेंट वर्क हॅज ऑलरेडी बीन कंप्लीटेड ॲन्ड ४० परसेंट वर्क इज बॅलेन्स.
सी)द कॉर्पोरेशन हॅज रीटन ' लेटर्स टू द कॉन्ट्रक्टर टू रिस्टार्ट ॲन्ड एक्सपेडीट द प्रोग्रेस ऑफ वर्क. द वी.जे.टी.आय हॅज ऑलसो बीफोर क्वेंश्चनड टू कंन्डक्ट द कंन्डीशन सर्व्हे फॉर द सी.सी.वर्क द सेम इज इन प्रोग्रेस इट सीमस द कॉन्ट्रॅक्टर व्हील स्टार्ट द वर्क ॲज सून ॲज टेस्ट रिसल्टस / रिपोर्टस रिसिव्हड फॉम वी.जे.टी.आय.

डी)द ॲक्शन इज इन प्रोग्रेस ॲत पर टेंडर कंन्डीशन.
इ)द ॲक्शन ॲज पर टेंडर ॲन्ड अग्रीमेंट इज इन प्रोसेस.
एफ)द ॲक्शन ॲज पर टेंडर कंन्डीशन इज इन प्रोसेस.
जी)आफ्टर रिसिव्हींग द टेस्ट रिझल्ट ऑफ कंन्डीशन सर्व्हे फॉम व्ही.जी.टी. आय द ॲक्शन व्हील बी टेकन अगेंन्स्ट कॉन्ट्रक्टर.
एच)द अपॉइंटमेंट ऑफ मेसर्स उत्तम इंजिनियरिंग कॉन्सूल प्रायव्हेट लिमिटेड इज फॉम थर्ड एप्रिल १९९६.
आय)यस.
जे)सम केएकस आर फाऊंड ऑन द सरफेस ऑफ पेव्हमेंट, अकॉ-डली दे हेव्ह प्रपोझड टू गेट द कंन्डीशनल सर्व्हे डन फॉम द व्ही. जे.टी.आय ॲन्ड सेम इज इन प्रोसेस.
के)ॲन अमाऊंट ऑफ रू६६ ,५००/- हॅज बीन पेड टू द उत्तम एजेन्सी फॉर कंन्सल्टन्सी चार्जेस फॉर दीस वर्क.

<u>मा.सदस्या श्रीमती भगवती रूपचंदानीः</u>- ठिक आहे.

<u>मा.सचिवः</u>- प्रश्न क्र४८४ हा श्रीमती भगवती रूपचंदानी यांचा आहे.
<u>प्रश्न ४८४:</u>-ऐ)वॉट इज द डेट ऑफ अपॉइंटमेंट ऑफ श्री.विलास सोनावणे ॲज प्रोजेक्ट ऑफिसर फॉर सूवर्ण जयंती स्कीम (गोल्डन जुब्ली स्किम)?
बी)वॉट वॉज द ओरीजनल पोस्ट ही वॉज होल्डींग पिरीयर टू दीस अपॉइंटमेंट डयू डेट ऑफ अपॉइंटमेंट वीथ हीज ग्रोस सॅलरी डिटेल्स?
सी)वेदर कार्पोरेशन हॅज फाल्वोव्ह द प्रोसिडयुर फॉर द अपॉइंटमेंट ऑफ प्रोजेक्ट ऑफिसर? इफ यस, प्लीज मेंन्शन द डिटेल्स?
डी)हाऊ मच अमाऊंट कार्पोरेशन रिसिव्हड फॉम कलेक्टर ऑफीस?
इ)हाऊ मेनी वार्डस कव्हर्ड अंडर दीस स्किम ?
एफ)हाऊ मेनी लेबर एंगेज फॉर दीस प्रोजेक्ट वर्कस? वेदर मस्टर हीज मेंन्टेन फॉर लेबर ॲट साईड?
जी)व्हू इज सुपरिअर ऑफ श्री.विलास सोनावणे?
एच)वेदर ऐनी ऑफीसर (डेप्यूटी कमिशन)वेरीफाय द लेबर ॲट साईड? गीव्ह डिटेल्स. इफ नो वॉट ॲक्शन कमीशनर हॅज टेकन इन द मॅटर.
आय)हाऊ मेनी वर्कस स्टार्टड सो फार?
जे) वेदर ऐनी कंप्लेंट रिसिव्हर्ड अगेन श्री.विलास सोनावणे फॉम द कार्पोरेटर. इफ एस. वॉट ॲक्शन कमीशनर हॅज टेकन अगेनस हीम. इफ नो, गीव रिझन.

<u>उत्तर :</u>- ऐ)श्री.विलास सोनावणे वॉज अपॉइंटमेंट ॲज प्रोजेक्ट ऑफीसर डबलू. इ. एफ. ३.७.९९.
बी)ही वॉज होल्डींग द पोस्ट ऑफ क्लर्क पिरीयर टू द अपॉइटमेंट डबलू.इ. एफ.१०.१२.९६ ग्रोस सॅलरी <u>प्राइज ५७००/-</u>
सी)ॲज पर प्रासिडयूर प्रिसकाइब इन गर्व्हनमेंट रिझोलेशन जी.आर.
१)यु.बी.एस.पी/१०९३/१६४४/सी.सी.-१०५/९३/युडी-३३, डेट.१.३.९६.
--१६--
२)पी.एम.आय-यु.पी.ई/१६९४/२४८९/सीएल-१६३/९४-युडी-३३, डेट.१२.३.९६.
३)एसजेआरवाय/१०९७/सीएल-१४२/९७/युडी-३३ ,डेट.२०.३.९८.
४)एसजेआरवाय/१०९७/सीएल-११९-युडी-३३ डेट ५.२.९८.
डी)प्राईज १८,३१,५००/-.
ई)एन्टायर सी.टी.हिज कव्हर्ड अंन्डर द स्किम.
एफ)३५० लेबर्स एन्गेज फॉर वर्क. यस, मस्टर इज अ मेंन्टेड ॲट साईड.
जी)ज्युनिअर इंजिनिअर, डी.एम.सी.एचक्यु एक्झुक्यूटिव्ह इंजिनियअर, सीटी इंजिनिअर, कमीशनर.
एच)डी.वाय कमीशनर, (एचक्यु)कमीशनर, ज्युनिअर इंजिनिअर, एक्झूकीटीव्ह इंजिनिअर, सी.टी.इंजिनिअर, वेरीफाय ॲट साईट.
आय)२४ वर्कस स्टार्ट्रेड.
जे)यस(नो स्पेसिफिक कंम्पलेन्स)

मा.सदस्या श्रीमती भगवती रूपचंदानी:-ठिक आहे.

मा.सचिव:- प्रश्न क्र.४८५ हा श्रीमती पन्ना वारिंगे यांचा आहे.

प्रश्न ४८५ :-वॉट इज द रूल रिगार्डिंग काऊ शेड सिच्युएटेड इन द सीटी? वॉट इज द लोकॅलिटि गिवन टू देम टू कॅरी ऑन देअर बिझनेस अवर वेदर दे आर अलाऊड इन सीटी एरिया?

वॉट आर द रिमेडिस ऑर प्रीकाऊशन्स दे आर टेकिंग व्हाइल डिसचार्जिंग देअर वेस्टेज . माय वॉर्ड हॅज ५ टू ६ काऊ शेडस ॲन्ड देअर डिसचार्ज हिज डायरेक्टलि इन द ड्रेनेज व्हीच गेटस चॉकडअप ॲट कुमार सोसायटी डिव्ह टू व्हीच इट बीकम प्रोब्लेम फॉर क्लिनिंग द ड्रेन?

उत्तर :-१)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५३ अंतर्गत भाग १४ मधील नियम क्र.२२ नुसार महापालिकेच्या हददीत जनावरांचे तबेले ठेवण्याकरिता आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक असते.

परंतु उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीतील तबेले पूर्वी पासूनच आहेत व त्यांना परवानगी देण्यात आलेली नाही.

तरी त्यांनी स्वच्छता पाळताना कसुर दिसून आल्यास पुढील कारवाई करिता विचार करण्यात येईल.

२)मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचे प्राथमिक चौकशी अहवालाप्रमाणे प्रभाग क्र. ३२ मधील तबेल्यातील शेण ई.० नाली मध्ये सोडतात. तसेच जवळपास असेलेल्या फ्लॅट मधील कचरा सुध्दा नाल्यात टाकला जातो. त्यामुळे कुमार सोसायटी जवळील नाल्यामध्ये अडथळा निर्माण होतो. याबाबत त्यांना नोटिस देण्यात आलेली आहे. व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- आपण उत्तर मला मराठीत दिले. मला इंग्रजी किंवा हिंदीत द्या.

मा.सचिव:-मराठी इज ऑफिशियल लॅग्वेज.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-पण मी इंग्रजीत प्रश्न दिला आहे.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-हिंदीत सांगतो तुम्हाला?

मा.महापौर, आयुक्त,स.सदस्य असे म्हणून श्री.लांजेवार यांनी प्रश्न उत्तर हिंदीत वाचून दाखविले.



मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-यामुळे जी समस्या होते, साफसफाई बाबत.

श्री.लांजेवार(आरोग्य अधिकारी):- त्याविषयी मी पुढे लिहिले आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-आपण लिहिले प्र.क्र.३२ मध्ये तबेले, शेण नाली मध्ये सोडतात. त्यामुळे माझ्या किंवा इतरांच्या प्रभागात समस्या निर्माण होतात. त्यासाठी त्यांच्याकडून पैसे घ्या किंवा त्यांना सांगा सफाई ठेवा.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-त्यासंबंधी त्यांना तशी नोटीस देण्यात आली आहे. नोटीसीचे त्यांना उत्तर हि दिलेले आहे. खूपश्या लोकांनी शेण त्यात टाकण्याचे सोडले आहे. ट्रक लावून कचरा उचलत आहेत.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे__ :-पूर्वी बायका उचलून घेवून जायच्या. इट वॉज युजड् ॲज फ्युअल. आता काय फ्युअलच्या कामी येत नाही. ते थेट नाल्यात जाते यामुळे समस्या निर्माण होते.

__श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-__ बरोबर आहे, चोकअप होते.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे:__-नाल्याच्या पाण्यास ते थांबवत नाही ते पाणी निघुन जाते पण सेनिटेशनवर तर फरक पडतो ना? लहान मुले, मोठे, म्हातारी माणसे आजुबाजूला रहातात त्यासाठी तुम्ही काय केले आपण बोलता त्यांनी तुम्हाला अंडरटेकिंग दिले जे पण पत्रव्यवहार आपण केले.

__मा.महापौर:__- डेव्हलपमेंट प्लान मध्ये कॅटल शेडसाठी खास आरक्षण आहे.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे:__- बरोबर.

__मा.महापौर:-__ माझा हेल्थ ऑफिसर, टाऊन प्लानर, आयुक्तांना आग्रह आहे की, शहरात जितके पण कॅटल शेड आहे त्यांना पूर्वीच्या नगरपालिकेने पण हलवायचा प्रयत्न केला होता. विथ द हेल्थ ऑफ ॲडमिनिस्ट्रेड ऑफीस आज पण मी आयुक्तांना सांगीन की, जितके पण रिजर्व एरिया आहे. कॅटल शेड साठी आहे. तिकडे हलविण्यात यावे.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे:-__ इफ देअर आर अेनी रिझर्व्हड प्लॉट.

__मा.महापौर:__-डि.पी त रिर्जेव्हेशन आहे.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे:__-आपल्या उल्हासनगर मध्ये जागा रिकामी आहे?

__मा.महापौर:-__ कार्पोरेशन विल टेक स्टेप टू इन्शुअर, रिजर्व्ह एरिया वेकेट करून त्यांना दिले जावे.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे:-__दिस इज अ जस्ट पोझिटिव्ह अन्सर्ड बट विदाऊट इमप्लीमेंटेशन.

__मा.महापौर:__-वुई व्हील हेव टू इंमप्लीमेंट. भविष्य काळ लक्षात घेऊन शहरात जितके पण कॅटल शॅड त्यांना शिफ्ट करावे लागते हळूहळू.



__मा.सदस्या श्रीमती पन्ना वार्रिंगे:__-विशेषत: माझ्या प्रभागात ५ तबेले आहेत आणि आशा राधवानी च्या प्रभागात पण तबेले आहेत. त्याचा निकाल माझ्या प्रभागातून आहे. म्हणुन जास्तच त्रास होतो. सी.धीस इज इंप्लीमेंन्टेड.

__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-__ शहरात यामुळे किती लोक मेले रोग पसरले मी कितीदा उपायुक्तांना लिखित दिले की, हे तबेले कुठे हटविले जाणार? केव्हा याची चौकशी होणार? यांनी साधी नोटीस दिली अजुन त्या नोटीशीचे उत्तर तबेले वाल्यांनी दिलेले नाही. आपण सांगता त्याला हटविण्यास जागा वगैरे आहे, पण कधी हटविणार? झोपडपट्टी एरिया आहे. लहान मुले खेळतात, रहातात त्याच्या बाजुला पुरा कचरा नालीमध्ये जातो. नाल्याच्या बाहेर पण कचरा असतो, रोगराई पसरण्याची शक्यता आहे. पावसाळयात तर अजुन घाण असते. प्रत्येक झोपडपटटीत दोन-दोन तीन-तीन तबेले आहेत कधी हटविणार. आयुक्तांनी उत्तर दयावे किती दिवसात घेईल.

__मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:__-मी जागा सांगु.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-एक्सक्युज मी, माझा प्रश्न आहे मला बोलू दया. मागील ५० वर्षापासून तर काही कार्यवाही झाली नाही.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-जागा पाहिजे तर मी सांगतो.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-त्याविषयी मी पुढें सांगत आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- लांजेवार सांगु नका कधी होणार हे सांगा. मी कित्त्येक वेळा यांसंबधी बोललो आहे, फक्त त्यांना नोटीस दिली.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-मा.महापौरजी, हा माझा प्रश्न आहे यांना सांगा वेगळा दुसरा प्रश्न दयायला. मला विचारू तर दया माझा प्रश्न अजुन संपला नाही आहे.

मा.महापौर:- आयुक्त उत्तर देतील.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:- आता पर्यंत जी सभा सुरू होती हे पाहून खुप दुःख होते ज्या नगरसेवकांचा प्रश्न असतो, मा.सदस्य प्रश्न विचारतात. ज्यांचा प्रश्न आहे त्यांना उत्तर मिळु दया. इतर नगरसेवकांना प्रश्न विचारायचे आहे तर पाच प्रश्न पुढील महासभेत विचारू शकतात. कृपया ज्याचा प्रश्न आहे त्याला बोलू दयावे. कारण अधिकारी उत्तर देतात. ज्याचा प्रश्न आहे तोच पुरक प्रश्न विचारू शकतो जसे दुसरे सदस्य मध्ये हरकत घेत आहे, ज्यांना समस्या आहे कृपया त्यांनी दुस-या महासभेत प्रश्न विचारावेत. प्रत्त्येक नगरसेवक पाच प्रश्न विचारू शकतो. कृपया सभा व्यवस्थित चालू दया. प्लीज.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- थॅक्यू मिस्टर किशोर वनवारी.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-मी सभागृह नेत्त्यांना विचारू इच्छितो की,त्या प्रश्नामध्ये जर आमचे काही चांगले सुझाव जात असतील तर चांगले आहे ना?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-पण मला प्रश्न विचारू तर दया ना.मिस्टर सेवल नंतर सुझाव दया. सुझावांचे नेहमीच स्वागत आहे.



मा.महापौर:-लांजेवारजी, आपण नाही, आयुक्त उत्तर देतील.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-हाऊ मेनी काऊ शेडस आर टोटली इन उल्हासनगर सीटी.

मा.उपमहापौर:- महापौरजी, बोलले त्यावर मी दोन मिनिटे बोलू इच्छितो, तबेलाचा मुददा जेव्हा आला तेव्हा महापौर साहेब म्हणाले की, आरक्षण भुखंडावर आपण काही तरी करू. त्यावर पुनम वारिंगे नी प्रश्न केला की, आपल्या कडे आरक्षण जागा शिल्लक आहेत की, नाही आमच्या प्रांत अधिका-यांनी नगरपालिकेत १९८७ मध्ये डि.पी प्रमाणे काही रिझर्व्ह प्लॉटस हस्तांतरित केले आहेत. महानगरपालिकेस जमीन दिली त्यात प्लॉटस रिझर्व्ह केले. महानगरपालिकेने अजुन ताबा घेतला नाही. अजुन पर्यंत माझ्या हिशोबा प्रमाणे १९८७ पासून २००० पर्यंत डि.पी.प्रमाणे आपल्या कडे जे रिझर्व्ह प्लॉटस आहेत, तिकडे आता बांधकाम चालू आहेत. उदा. दशहरा मैदानाजवळ शाळेसाठी आरक्षित जागा होती तिथे बांधकाम चालू आहे. मी नगररचनाकारांस विचारले ते म्हणाले डि.पी मध्ये आरक्षित भूखंड आहेत पण सनद त्यांनी आणली प्लान आम्हाला पास करावा लागला. मंजुरी दयावी लागते तर कुठ पर्यंत असे चालेल शासनाने आपल्या कडे जागा हस्तांतरित

कागदोपत्री केले आहे. पण वास्तविक आपल्याकडे काही नाही. प्रांत कार्यालय त्यांना अजुन पर्यंत सनद देत आहे असे कुठ पर्यंत चालेल, आपल्या हातात काय शिल्लक राहिल आज आपण बोलतो आरक्षित जागा आहेत तिथे तबेले शिफ्ट करू पण त्या जागा रिझर्व्ह उरल्याच नाहीत.

<u>मा.महापौरः-</u> मला वाटते उपमहापौर जे बोलले त्यास मी, जास्त स्पष्ट करतो, आरक्षित भुखंडाचा ताबा नगरपालिकेला मिळाला आहे. नाही मिळाले असे नाही. ८७ मध्ये रिझर्व्ह जागा मिळाल्या आहेत. दुसरे भले प्रांत कार्यालय आपल्या मर्जीने तिथे सनद देतो तर ती त्यांची जबाबदारी आहे. त्यांची चुकी आहे. नगरपालिकेच्या रिझर्व्ह साईटवर ते का सनद इश्यु करतात? कायदयाने करतात की, कसे ही त्यांची जबाबदारी आहे. पण रिझर्व्ह साईटवर महानगरपालिका प्लान मंजुर करते, ज्या कारणासाठी प्लॉट आरक्षित आहे. त्या व्यतिरिक्त माझ्यामते ते चुकीचे आहे. त्याची माहिती काढली पाहिजे
व आयुक्तांनी याबाबत माहिती सदनाला कळवावी उपमहापौरांनी हरकत घेतली त्यावर, आय डोंट थींक अेनी टाऊन प्लानर हेव अेनी साईट टू पास अ प्लॅन ऑन रिझर्व्ह साईट.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबीः-</u> आपण म्हणता ते बिल्कुल खरे आहे कि, आयुक्तांनी यावर माहिती दयावी.

<u>मा.महापौरः-</u> मी आयुक्तांना आग्रह करिन की, आमच्या बहिणीने तबेले शिफ्ट करण्यासंबंधी जे सांगितले त्यावरही बोलावे.

<u>मा.आयुक्तः-</u> मा.महापौर, उपमहापौर, सदस्य, ज्यांनी हा प्रश्न आणला त्यांचा मी आभारी आहे. कारण त्यांनी प्रशासनाच्या नजरेस ही बाब आणली आहे. ही खुप जुनी समस्या आहे. फक्त आपल्या शहरास ही समस्या नाही तर मुंबई सारख्या प्रगत शहरात पण ही समस्या आहे. मुंबईत आपणास माहित असेल आर अे कॉलनी स्पेशल कॉलनी यासाठी बनविली होती. तिकडे वेगवेगळया जागेतून एकाच जागी तबेले एकत्रीत करण्याची योजना शासनाने केली होती ती शासनाची योजना पण पूर्णपणे अंमलात आणली गेली नाही. त्यानंतर लोकसंख्या वाढत गेली, क्षेत्रफळ वाढत गेले., आर ए कॉलनी पण शहरामध्ये आली त्यानंतर तलासरीला शिफ्ट करण्याचा प्लान आखला. तलासरीमध्ये खुप मोठी योजना महाराष्ट्र शासनाने मंजुर करून ठेवली आहे.



शेकडो एकर जमिन तेथे जमा करून ठेवली आहे. ज्या हेतुसाठी ती जागा ठेवली तो हेतु पूर्ण नाही झाला अशी स्थिती तिथे पण आहे. तर प्रत्त्येक शहरात ॲक्चूली यासंबंधी (कॉन्शीयस, इर्फट ) ऐकणे जरूरी होते पण महापालिकेतर्फे व यापूर्वी नगरपालिका होती त्यावेळेस या समस्येकडे दुर्लक्ष केले गेले हे सत्त्य आहे. आता आपण सर्वांना हा विचार करायचा आहे की, काय धोरण ठेवायचे आहे. जसे महापौरांनी आपण सर्वांना सांगितले की, यासाठी आरक्षण ८७ मध्ये महानगरपालिकेला हस्तांतरीत झाले आहे. याचा वापर त्याच उददेशासाठी करावा असे कायदयात प्रावधान आहे. याशिवाय त्या जागेची सनद दुस-या कारणासाठी जर देण्यात आली असेल तर वा त्यास इमारत परमिशन दिली गेली असेल तर कोणत्त्या कायदयान्वये ती परवानगी देण्यात आली आहे. याची चौकशी करण्यात आली. लेट मी फिनिश, आणि प्रश्न असा आहे की, आता जे तबेले आहेत त्यावर काय कारवाई करण्यात येईल?त्यासाठी आधी माहिती गोळा करू की, जे आरक्षित जागा आहे, कॅम्पा मध्ये त्यांची सध्याची स्थिती काय आहे? तिकडे कोणती वकेंट जागा आहे नाही आहे? ते तिथे हलवू शकतो का? व्हॉट आर प्रेझेंट सर्कमटेंसेस हे प्राधान्याने पाहू. आता जो येणारा प्लॉन आहे त्यात पाहू. तबेल्यासाठी वेगळे झोन निर्माण करण्याची शक्यता आहे का? आणि ही पण विनंती करतो सर्वांना जेव्हा प्रारूप नकाशा प्रसिध्द होईल आपले मत पण

विचारले जाईल त्यावेळी परिस्थितीनुसार झोनिंग करण्याचा प्रयत्न करू या कालावधीत इनसेनिटेशनची जी समस्या आपण सांगितली यांसंबंधी जे आपले आरोग्य अधिकारी आहेत त्यांना मी निर्देश देतो की जिथे जिथे तबेले आहेत तिकडे लक्ष ठेवावे. तिकडे विषेश व्यवस्था ठेवावी व तिथे जी साफसफाईची समस्या आहे तिथे व्यवस्थित काम होते की नाही याचे मॉनेटरी त्यांनी करावे आय थिंक दिज आर द वेज टू डील विथ द क्वश्चन ॲट प्रेझेंट.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u>:-याशिवाय जसे आमचे मा.महापौर म्हणाले की असे किती आरक्षित भुखंड आहेत ज्यांचे विशेष आरक्षणासाठी डि.पी.त विशेष प्रावधान केले आहे. यात कित्येक आरक्षित भुखंडावर आपण ताबा घेतला नाही. जसे आता आमचे उप-महापौरांनी आमच्या आरक्षित भुखंडाविषयी सांगितले त्यावर सनद घेतली आहे. महापालिकेने प्लॉनही पास केला आहे. बांधकामही चालू आहे अशा स्थितीत आपल्या महापालिकेचे कर्तव्य आहे तिचे संरक्षण करणे अशा सनदेसाठी महापालिका कोर्टात जाऊन आव्हान का देत नाही?

<u>मा.आयुक्तः</u>-मी तुम्हाला सर्व तपशिल दिला.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u>:-ही शासनाची जागा आहे , महापालिकेंत भरपुर कर्मचारी वर्ग आहे. विधी अधिकारी आहेत सर्व काही आहेत. मग का नाही कारवाई करत. कुणी आपल्या शासनाच्या जागेवर अतिक्रमण करत आहे आणि आरक्षित भुखंडाच्या प्रावधानात बदल करण्याचा प्रयत्न करत आहे. तर आम्ही काही कार्यवाही करत नाही? कुणी महापालिकेच्या जागेवर येवून आक्रमण करतो व आपण पहातच बसतो?

<u>मा.आयुक्तः-</u> इट इज टू बी फोरसिबली शिफटेड टू सम प्लेस.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u>:-महापौरांनी आज प्रथमच एक प्रश्न उपस्थित केला. उपमहापौरांनी पण. त्याचे उत्तर पण आपण दिलेच नाही की, रिझर्व्ह प्लॉट वर कुणी सनद काढून आणतो तर महापालिकेस प्लान पास करायचा आहे की नाही? मुळ प्रश्न हा. दुसरी गोष्ट महानगरपालिकाच्या जागेवर कुणी सनद काढून आणतो आयुक्त या नात्याने आपले काय कर्तव्य बनते त्याच्या



बचावासाठी काय करणार, कोर्टात जाणार? काय पाऊल उचलणार हा प्रश्न आहे.

<u>मा.आयुक्तः</u>- असे आहे आरक्षणावर सनद दयायची आहे की,नाही जसे महापौर म्हणाले हे पहाणे शासनाचे काम आहे. शासन निर्णय घेईल की, सनद दयायची की नाही, कोर्टाने आलाउड केल`का?

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u>:-मानले की शासनातर्फे सनद दिली जाते आरक्षित भुखंडावर पण सनद देण्यापूर्वी खुप सा-या प्रक्रीयेतून जावे लागते त्यावेळी महापालिका का नाही हरकत घेत. व हे का नाही म्हणत की डी.पी त या भुखंडावर आरक्षण आहे. सनद कुठून पण निघो. मंत्रालय ातून निघू दे , कोकण भवनातून निघू दे, जिल्हाधिकारी कार्यालयातून निघो वा, प्रशासक कार्यालयातून, ती महानगरपालिकेत येते. सनद आल्यावर प्लॉन पास करणे महापालिकेचे अधिकार आहे. प्लॉन आल्यावर महापालिका प्लॉन का पास करते हरकत का घेत नाही? आपल्या महापालिकेत असा कोणता विभाग आहे जो सनदेस स्पष्ट पणे मान्य करून प्लान पास करतो. हाऊ इज इट पॉसिबल?

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :-मा.महापौरजी, प्रश्न आहे.

मा.महापौरः- ऐका जरा?

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- खुप महत्त्वपूर्ण विषय आहे हा विषय चालू दयावा जर महापालिकेच्या रिझर्व्ह प्लॉटवर कुणी सनद काढून आणतो हा आमचा प्रश्न नाही. शहराचा व जनतेचा प्रश्न आहे जर त्याची सनद मिळते प्लान पास होतो, तरी का हरकत घेत नाही की, धिस प्लॉट इज रिझर्व्ह फॉर दॅट परपझ व्हाय आय डोंट अंन्डरस्टॅंड.

मा.महापौर :- मी पर्टिक्युलर जागा पर्टिक्युलर सनदेविषयी सांगतो.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- मी पर्टिक्युलर प्लॉट विषयी नाही, मी सर्व रिझर्व्ह प्लॉट विषयी बोलत आहे.

मा.सदस्य श्री.नरेंद राजानीः-कधी पासून उभा आहे मी मेहरबानी करून मला प्रश्न पूर्ण करू दया. आरक्षित प्लॉट १९८७ साली शासनाने महापालिकेला (नगरपालिकेस) हस्तांतरीत केले आहेत ती महापालिकेची संपत्ती झाली. एकदा मला एखादा प्लॉट मिळाला तो माझा आहे. माझे काम आहे त्याचे संरक्षण करणे. या जागेवर दुसरी एखादी व्यक्ती सनद आणते तर ती माझी जबाबदारी आहे. त्याचे संरक्षण करणे, याचा अर्थ महापालिकेने हस्तांतरीत करून मिळालेल्या जागेचे संरक्षण करायला पाहिजे होते. जर त्याची कोणी सनद काढून आणतो मीच त्याला प्लान मंजुर करून देतो. दिस इज रॉंग मा.महापौर, उपमहापौर, हेच सांगु इच्छितात की, भले त्याची सनद काढलेली असो प्लान मंजुर नाही केला पाहिजे. कारण ती आपली मालमत्ता आहे. त्यांना आपण काऊंटर करू शकतो की, हि रिझर्व्ह साईट आहे तुम्ही कशी सनद आणली ही आमची मालमत्ता आहे आमच्या ताब्यात आहे....

मा.आयुक्तः दॅट स्टॅण्ड हॅज नॉट बी टेकन.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगेः- ते म्हणणे मा.उप-महापौरांचे होते.

मा.आयुक्तः- रिफ्युज करण्याचे धोरण ठरवावे लागेल.

--२२--

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः-रिझर्व्ह प्लॉट साठी आपण पॉलिसी काय ठरविणार? शासनाने रिझर्व्ह करून आपल्या ताब्यात दिले त्यासाठी पॉलिसी काय ठरविणार त्यासाठी आवाज उठविला पाहिजे.

मा.आयुक्तः- रिर्जव्हेशन इज डिफरंन्ट, ऑनरशिप इज डिफरंन्ट.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- रिझर्व्हेशन इज डिफरंन्ट आय नो.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढावः- सनदेचे व्हेरीफिकेशन होते का?

काही सदस्य :- होते.

मा.महापौरः- एक मिनिट.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगेः- महापौरजी, एक मिनिट. उपमहापौर जे म्हणाले की, बांधकाम चालू आहे आधीच त्याचे काय करणार?

मा.महापौरः- त्यासंबंधी माहिती देतो, उपमहापौरांनी ज्या विशिष्ठ साईटचा उल्लेख केला व इतर रिझर्व्ह प्लॉटसाठी जे ते बोलले जसे राजानी साहेबांनी आता हरकत घेतली. मला त्यांचे म्हणणे आवडले की, जेव्हा एखादा भुखंड विशिष्ठ आरक्षणासाठी हस्तांतरीत केला जातो. ती संपत्ती नगरपालिका व महानगरपालिकेची आहे. त्या मालमत्तेचे संरक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य

आहे. जे राजानी साहेब म्हणतात ते एकदम बरोबर आहे आपले कर्तव्य आहे ते सांभाळणे. त्याची जर सनद इश्यू पण होते प्रांत कार्यालयातून, तर आपण त्याचा विरोध केला पाहिजे.एस.डी.ओ.कार्यालयाला कळवावे. धिस पर्टीक्युलर साईड बिलॉंग फॉर पर्टीक्युलर रिझोल्यूशन. संबंधित प्लॉटसंबंधी जे उपमहापौर म्हणाले इंदिरा गांधी मार्केट इथे त्यासंबंधी आताच नगररचनाकार यांनी माहिती दिली ती साईट मार्केट साठी रिझर्व्ह आहे आणि शासन निर्णयानुसार ते सांगत होते की, १९९४ साली काही जी आर आला आहे. कोणा व्यक्तीकडे जर ओनरशिप कागदपत्र असतील ती जागा मार्केटसाठी रिझर्व्ह आहे. व तो मार्केटच तिथे वसवू इच्छितो तर १९९४ च्या जी आर प्रमाणे त्या हेतु साठी ती परमिशन देवू शकतो त्यानुसारच त्यांनी परवानगी दिली आहे. मार्केट परपझसाठी काही गाळे एक्सचेंज मध्ये घेत आहे. ते माझ्यामते कायदयान्वये बरोबर आहे. जर असा जी आर असेल तर सो थिंक्स आर वेरी क्लिअर आयुक्त साहेब अधिकारी गणांना आमचा आग्रह आहे की, महानगरपालिकेची जी पण रिझर्व्ह जागा आहे त्यांचे संरक्षण करण्याचा पूर्ण प्रयत्न केला जावा.

मा.उपमहापौरः-महापौर साहेब जे माझ्या मनात होते. राजानी पण म्हणाले प्लान पास तर नंतर करतील बिल्डरने परपझ काय दिला, जो प्लॉट आपला आहे सनद देणारा परपझ क्लीआ करतो का? कि हा प्लॉट मार्केटसाठी आहे. मार्केटसाठीच प्लॉन तर सनद दिल्यावर देईल ना शासनाला कसे माहिती पडेल की, तिथे मार्केट बनत आहे. शासनाने सनद दिली आहे.

मा.महापौरः- दॅट इज व्हाय, वुई शुड प्रोटेक्ट धिस प्रॉपर्टी.

मा.उपमहापौरः- आपण प्रोटेक्ट नाही केली प्रॉपर्टी? ८७ पासून आजपर्यंत हेच प्रोसेस चालू आहे.

मा.महापौरः-भविष्यात काळजी घ्यावी निदान?



मा.उपमहापौरः-आता भविष्यात उरले काय आपणाकडे?

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- जे चालू आहे त्यासंबंधी नाही विचार करणार, भविष्याचे पाहणार? आज कोणत्त्या परिस्थितीतून जात आहोत याचे आपल्याला काही भान नाही.

मा.सदस्य श्री.प्रमोद टालेः-हि महापालिकेची जागा आहे ना बाहेर मैदान याची उद्या कुणीही सनद आणेल. आणली असेल तर त्याला तुम्ही प्लान पास करून देणार का?

मा.उपमहापौरः-आणि खाजगी महापालिका बनवायची.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.आयुक्तः-शासन निर्णयाप्रमाणे.....

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः-पाण्याच्या टाकी लावणेसाठी ती जागा होती. टाकी लावायला गेले तर तिथे पण कुणी तरी सनद त्या जागेची दाखवली आयुक्त साहेब, हे खरे आहे.

मा.महापौरः-प्रश्नोत्तर तास संपला.

मा.सदस्य श्री.प्रमोद टालेः-महापौर साहेब, तुमच्या जागेवर जर कुणी सनद आणली. तुम्ही ते सोडून द्या दुस-यांना इमारत बांधू द्या. चालेल का?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- आयुक्त साहेब.....

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- आमच्या शहराच्या जागेवर सनदी आणणार आणि आम्ही बाहेर जाणार.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-सजेशन देतो. हा जो कॅटल शेडचा प्रश्न आहे. आयुक्त म्हणाले जागा कुठे वॅकंट असेल तर तिथे नेवू आमचे प्र.क्र. १८ ,१९ व ४९ चे मागे बाऊंड्री आहे. उल्हासनगरची तिथे १५ ते २० एकर जमीन उल्हासनगर महानगरपालिकेची आहे. तिथे अजुन अतिक्रमण होत आहे. त्या अतिक्रमणापासून वाचण्यासाठी व त्या जागेचा बचाव करण्यासाठी तिथे कॅटल शॅड हलवा, शांतिप्रकाश आश्रमाच्या मागे, गायकवाड पाड्यामागे व आमचा प्रभाग १८ मध्ये ओ.टी.सेक्शन मागे कमीत कमी १० एकर जमीन आहे महापालिकेची अशी एक टिम बनवा जी बाऊंड्री लावेल.

मा.महापौर:- ती जमीन महापालिका हद्दीत आहे.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत आहे पण तिथे जो अतिक्रमण करायला जातो. तो अंबरनाथच्या हद्दीत आहे असे सांगतो.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे:-सेवलजी, नक्की खरी गोष्ट आहे ना?

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-हो सांगतो ना?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-मग तेच मंजुर करूया. काऊ शेड साठी आपणास नक्की माहित आहे ना? आपल्या क्षेत्रात ते येते ना?



मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-आमच्या प्रभागात आहे. जागा महापालिकेची आहे.

मा.महापौर:- आपले सुझाव आयुक्तांना सांगा.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- माझ्या म्हणण्याचा अर्थ बाऊंड्री वॉल आहे.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर:-ती उल्हासनगर ची हद्द आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- बॉर्डर लाईनवर काऊ शेड असला पाहिजे ना?

मा.सचिव:-या सभेत चार लक्षवेधी आल्या आहेत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- मि.कुकरेजा माझ्या प्रश्नाचे उत्तर मला अजुन पर्यंत मिळालेले नाही. कृपया माझ्या प्रश्नाचे बरोबर उत्तर मिळत नाही. आपण हे तबेले कसे हटविणार आणि कधी हटविणार? आपली योजना काय आहे? आपले म्हणणे आम्ही करू हे ऐवढे पुरेसे नाही का? शिंदे साहेब, प्लीज आपण मला आश्वासन द्या किती साईटस् आहेत त्याचा तपशिल दया?

मा.महापौर:-मॅडम प्रश्नोत्तर तास संपला आहे. यु राईट टू कमिशनर हि विल अन्सर्ड यु इन रायटिंग.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- ओ. के .

मा.सचिवः- पहिली जी लक्षेवधी आहे. त्याचे सुचक आहे,श्री.बी.बी.मोरे अनुमोदक आहे, श्री.नरेश यादव.

मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडेः- एक मिनिट, सचिव साहेब, लक्षवेधी सुचना यायच्या अगोदर मला काही बोलायचे आहे.मा.महापौर व मा.आयुक्त साहेबांनी माझ्या प्रभागात टाकी लावली आहे.

मा.महापौरः- प्रथम लक्षवेधी वाचून दाखवू दे. मग तुम्ही बोला.
सचिवांनी लक्षवेधी खालील प्रमाणे वाचून दाखविली.

१) सुचक :- श्री.बी.बी.मोरे.
अनुमोदक :- श्री.नरेश यादव.

रोड रस्ता रूंदीकरणा मधील बाधीत असलेल्या दुकानदारांना पर्यायी जागा देण्याचे नावावर जवाहर टॉकीज शेजारी महानगरपालिका शाळेच्या आजुबाजूला शाळेच्या जागेवर अनधिकृत बांधकाम चालु आहे. असे निर्दशनास आले आहे. सदरील ठिकाणी महानगरपालिकाची शाळा असल्यामुळे त्याठिकाणी पर्यायी जागा देवू नये. त्याकरिता महासभेचे लक्ष वेधणे करीता दिनांक १८.८.२००० रोजी होणा-या महासभेमधील सदरील लक्षवेधी सुचना घेण्यात यावी.

२) सुचकः-श्रीमती सुनिता राजवानी.
अनुमोदकः-श्री.भिमसेन मोरे.



दसरा मैदान येथील विजय व्हीला ही मोडकळीस आलेल्या इमारतीला पुन्हा बांधकाम करण्यास परवानगी देणार का? सदर इमारत मोडकळीस आली तीला जबाबदार कोण? साईदीप पॅलेस ही इमारत कोसळली त्यानंतर उल्हासनगर शहरात अशा धोकादायक इमारती किती?

३) सुचक :- श्री.प्रमोद टाले.
अनुमोदकः- श्रीमती. पंचशीला पवार.

उल्हासनगर शहरातील प्रभाग १४ मध्ये विविध वस्त्त्यामध्ये गेले दहा वर्षा पासून नळा व्दारे महानगरपालिका थेंबभर पाणी पुरवठा करू शकले नाही.(भारत नगर, नागसेन नगर, पंचशील, आम्रपाली) परंतु आज मीतीस सदर विभागातील नळ धारकांना अतोनात भरमसाठ बीले पाठविली गेली. हा सरळ सरळ महानगरपालिकेने येथील जनतेवर अन्याय केलेला असून सदर लक्षवेधी सुचने व्दारे सदर विभागातील नळ धारकांची बिले माफ करणे बाबत चर्चा घडवून निर्णय घ्यावा.

४) सुचक :- श्री.पांडुरंग लांडे.
अनुमोदक :- श्री. भिमसेन मोरे.

झुलेलाल मांदिर ते रेड कॉस सोसायटी या परिसरात रोड रूंदीकरण मोहिमेच्या नावाखाली अनधिकृत बांधकामे कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता चालू आहे. तसेच त्या ठिकाणी यात्री निवास, मातंग समाज, विकी बारचा दुसरा मजला अशी बरीच बांधकामे राजरोसपणे चालू असून त्याकडे महापालिकेचे अधिकारी डोळझाक करीत आहेत.

तसेच स्थानिक वृतपत्रामध्ये रोज फोटो सहित बातम्या प्रसिध्द होत असुन आजही शहरात अनधिकृत मोठया प्रमाणात चालू आहे.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी:- मा.सचिव जी, आपण दुस-या लक्षवेधीचे सुचक नाही सांगितले.

मा.सचिव:- दुस-या लक्षवेधीचे सुचक श्रीमती सुनिता राजवानी अनुमोदक श्री. भिमसेन मोरे आहेत.

मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे:-मा.आयुक्त साहेब यांनी माझ्या प्रभागात टॅकर दिला आहे तो काय फक्त नामकरण निधी म्हणून दिला आहे का? हयाच्यावर फक्त राष्ट्रवादीच्या लोकांनी पाणी भरायचे बाकीचे कुणी गेले तर म्हणायचे जा तुमच्या आर.पी.आय कडे आणि टाले साहेबांनी सुध्दा टॅकर लावून दिला आहे. तर आयुक्त साहेब , टाले साहेब माझ्या प्रभागात टॅकर व पाण्याचा कारभार पहात असतील तर माझी तिथे गरज काय मी आजच लेटर पॅड वर राजीनामा देवून टाकते, जेव्हा मी निवडणुकीला उभी राहीले तेव्हा सर्व पक्षांनी मला पाठिंबा दिला आणि आश्वासनही दिले की, तुमच्या प्रभागातील सर्व कामे आम्ही पूर्ण करू परंतु माझ्या मते एकही कामे पूर्ण झालेली नाही . जर येत्त्या सहा महिन्यात खरोखर काम झाले नाही तर येत्त्या सहा महिन्यात राजीनामा देईन माझ्या राजीनाम्याने म्हणजे सर्व पक्षांचा अपमान होईल हे उचित नाही एवढेच माझे म्हणणे आहे. मी साहेबांना सांगितले साहेब माझ्या प्रभागात पाणी नाही तर मला फक्त तारीख दिली जाते. ही महानगरपालिका आहे की कोर्ट कचेरी आहे. सभापती साहेब म्हणतात १० तारखेला पाणी येईल.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-बगाडे मॅडमचे म्हणणे हे आहे की, त्यांचे मिस्टर जेव्हा महानगरपालिकेत नगरसेवक होते तर त्यांना अश्वासन दिले होते. ते



कित्त्येक वेळा उपोषणाला बसले होते.जेव्हा त्यांना आश्वासन दिले होते की, पाण्याचा सर्व प्राब्लेम सोडवू.

मा.सदस्या श्रीमती बगाडे सुनिता:- १० लाखाची पाईप लाईन टाकण्याचे ठरवले होते.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- आयुक्त साहेबांनी कितीदा विझिट केली. महापौरांनी पण विझिट दिली. मा.सदस्यांचे त्यांचे म्हणणे हे आहे की, आज पर्यंत तिथे पाण्याचा एक थेंब पण नाही. दुसरे जे टॅकर लावले होते ते बंद केले आहे. तर त्यांचे म्हणणे प्रभागात केवळ क्ष व्यक्तीला अधिकार आहे का? आम्हाला नाही का? याचे स्पष्टीकरण दया. पाणी कधी मिळेल कसे मिळेल त्यांचे कामे कधी होतील अशी महापौरांना विनंती आहे. त्यांना आश्वासन दया.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक:- मा.महापौरजी, आता आमची बहिण सुनिता बगाडे नी त्यांची भावना प्रकट केली पाण्याविषयी. त्याच्याशी मी सहमत आहे. पण ते असे पण म्हणाले की, मी जेव्हा निवडणूकीला उभे होते. तेव्हा सर्व पक्षीयांचा पाठींबा होता मी सुधारणा करतो.

मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे:- एक पक्ष सोडून सर्व पक्षांनी पाठिंबा दिला होता.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-मला वाटते तिथे बीजेपी शिवसेना युतीचा उमेदवार निवडणुकीला उभा होता.

मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे :-शिवसेना भाजपा सोडून सर्व पक्षांनी पाठिंबा दिला होता.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- तुमचाही पाठींबा होता की यास...

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी:-मा.महापौरजी, हि मोठया दुःखाची गोष्ट आहे की, आज आमची बहिण बगाडे ही पाणी पुरवठा विभाग कमिटीची उप

सभापती आहे. हि शरमेची गोष्ट आहे. जर त्यांची अशी हालत आहे तर आमचे काय होणार? मी आयुक्त साहेबांना निवेदन करते हे जे कंटीन्यू प्रभाग आहेत. माझा महाडिक साहेब यांचा, तिथे खुप अडचणी आहेत आणि हि उपसभापती आहे. मी विशेष करून हेच म्हणते की याचे कमिटीत पण चालत नाही का? मा.महापौर काही लक्ष द्या.

मा.महापौरः-मी माझी बहीण सुनिता बगाडे यांनी जी पाण्यांसबंधी हरकत घेतली आहे. त्यांच्या भावनेची कदर करतो आणि त्याबरोबर आश्वासनही देतो की, १४,१५,१६, प्रभाग हे महानगरपालिकेच्या नकाशात रेड मार्क, करून ठेवले आहे. इथे सर्वात जास्त पाण्याचा त्रास होतो आणि खास त्या वार्डात.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- मा.महापौरजी प्रथम लक्षवेधी सुचना स्वीकारली की नाही ते तर सांगा.

मा.महापौरः- प्रथम त्यांना उत्तर देतो? म्हणुन आम्ही पाणीपुरवठा विभागाचे सभापती उपसभापती त्याच प्रभागाचे निवडले.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः-असे तर वर्तमानपत्रात येते की काही प्रभागात पाण्याची समस्या नाही आहे.

मा. महापौर :- त्यानंतरही जर पाण्याचे संबंधी समाधान नाही झाले.



मा.सदस्या श्रीमती बगाडे सुनिताः- पाणी येते केव्हा येते १ जेव्हा तूम्ही चौकशीला येता तेव्हा येते नंतर पाणीच येत नाही.

मा. महापौर :- मी सभापतींना निवेदन करीन की, आपण याकडे जास्त लक्ष दयावे आमच्या बहिणींच्या प्रभागात जे पण काम करायचे आहे ते त्वरीत करून पाण्याचा त्रास दूर करा.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- कुणाच्या प्रभागाच्या पाण्याचा त्रास आहे. सुनिता बगाडेच्या, ज्या प्रभागाची चर्चा चालू आहे, त्या प्रभागाचे नंबर लिहा कूठे कूठे पाण्याची समस्या आहे.

मा.सदस्या श्रीमती बगाडे सुनिताः- कुणाला माहित आहे का? आम्ही उपसभापती आहोत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. महापौर :- इथे ४ लक्षवेधी आल्या आहेत, १)श्री. बी.बी. मोरे २)विपक्ष नेता श्रीम. सुनिता राजवाणी ३) श्री. पांडुरुंग लांडे ४)श्री प्रमादे टालेची आहे. दोन लक्षवेधी स्विकारत आहे एक बी.बी. मोरे ची व एक प्रमोद टालेची व २ री लक्षवेधी नाकारत आहे. मी म्हणेन की, मोरे सो.नी लक्षवेधी वर बोलावे.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानीः- महापौर सो. इमारत पडण्यासंबंधी जी घटना आहे ती लक्षवेधी स्विकारली पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- कॉलिंग अटेंशन जे असते त्याचा हेतू हा असतो की, सार्वजनिक महत्त्वाचे मुददे घ्यावे ते आपण घेत नाही तर मला वाटते, आपण अन्याय करीत आहात.

मा. महापौरः- दोन लक्षवेधीची लिमिट असते, यू क्नो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- सार्वजनिक महत्त्वाची आहे ती?

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :</u>-आमची लक्षवेधी महत्त्वाची आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- महत्त्वपूर्ण लक्षवेधी आपण घेवु शकता.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- आपण इंडियूजल लक्षवेधी स्विकारत आहात, जनरल पालिकेच्या लक्षवेधीस दाखल नाही करत दुःखाची गोष्ट आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बी.बी मोरे</u> :- मी जी लक्षवेधी दिली. श्री. मोरे यांनी लक्षवेधी वाचून दाखविली. महापौरजी उल्हासनगर मध्ये ज्या पण शाळा आहेत, त्या शाळेचे जे मैदान आहे, जागा आहे,त्या जागेवर या शाळेचे कंपाउंड रोड वायंडिंग मध्ये येत असल्यामुळे काढले जात आहे असे सांगितले, तिथे दूकानासाठी जागा दिली आहे, मी पाहिले आहे.*

*<u>मा. महापौरः-</u> मी सांगू इच्छितो की, महानगरपालिकेतर्फे कोणताही पर्यायी जागा बिल्डरला दिली नाही. ज्यांचे दूकान वा घर तोडले गेले त्यांनाच पर्यायी जागा दिल्या आहेत.*



*<u>मा. सदस्य श्री. बी.बी मोरे</u> :-तर महापौरजी शाळेसमोर कूणाचे दूकान आहे? कूणाची जागा रोड वायडिंग मध्से गेली, त्यानेच बनविली.*

*<u>मा. महापौर</u> :- शाळेच्या बाजूला जे कंपाउंड आहे. जवाहर टॉकिजच्या बाजूला जी पण दुकान दिली आहेत, ती त्यांना दिली ज्यांचे घर वा दुकान रोड वायडिंगमध्ये गेले. हि एक वेगळी बाब आहे, आपली हरकत आहे की, शाळेच्या ग्राउंडमध्ये नाही दिले पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. बी.बी मोरे</u> :- महापौर, त्या साईडला ४ दुकान रेशनिंग ऑफिसच्या टर्निंगला आहे तो रस्ता रोड वायडिंगमध्ये नाही आहे, तिथे कूणा गरिबाचे झोपडे होते , तिथे त्याचे कंस्ट्रक्शन होते ते डिमोलिश केले व त्याला सांगितले की, रोड वायडिंगमध्ये येते असे सांगून आज पण भुमाफियाने ३ दूकाने बनविली आहे. आणि अजून दुकान बनविण्याचे काम सूरु आहे. मला याचे स्पष्टीकरण हवे आहे की, ती दूकाने कूणाची आहे कोणी बनविले? दुसरी गोष्ट ही की, शाळेच्या बाजूला का बनवत आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> महापौरजी मी याबाबत खुलासा करु इच्छितो जेव्हा रोड वायडिंग चा मूददा आला होता तेव्हा आपल्या कार्यालयात सर्व पक्षाचे लोक, सदस्य तेथे होते. श्वास करुन सत्ताधारी सदस्य होते, सन्माननिय सदस्य पण होते. तिथे आयूक्त आले होते, त्यांनी सांगितले होते की, ती शाळा जी जवाहर टॉकितच्या शेजारी आहे, त्याचे कंपाउंड चार पाचदा बनविले आहे. मी ९७ साली सेनिटेशन विभागाचा उपसभापती होतो, त्यावेळी मी संपादक श्रीचंद अहूजाच्या सांगण्यावरुन भित बांधली होती, तिथे असामाजिक कामे केली जातात, ते जाणुन बूजून भिंत तोडून नुकसान करायचे व महानगरपालिकाच्या संपत्तिचे नूकसान करायचे, त्याकरीता आपल्या कॅबिनमध्ये आयुक्तांना सल्ला दिला की, तिथे पर्यायी जागा काढून ६x६ चे १७,१८ दुकाने काढली जातील. तिथे आपला निर्णय झाला होता की, ते दयावे म्हणजे कंपाउंडचे नेहमी होणारे नूकसान टळेल. त्याचा मुलांच्या खेळाच्या मैदानावर परिणाम होत नाही. भित २,३, फुट आत असल्याने काही फरक पडत नाही. जाणुनबूजून ही चूकीची लक्षवेधी आणली आहे. तो विषय इथेच संपवा, पर्यायी जागा दिली आहे, कूणाचे झोपडे तोडून अनाधिकृत बांधकाम नाही आहे.*

*<u>मा. महापौर</u> :- श्री. बी.बी. मोरेंच्या लक्षवेधीचे उत्तर आयूक्तांनी दयावे.*

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :- मी अतिक्रमण विभागाचा सभापती आहे, मला माहित आहे तेच असेल.

मा. सदस्य श्री. बी.बी मोरे :-रेशनिंग ऑफिसकडे जो रस्ता जातो, तो रोड वायडिंगमध्ये नाही आहे, कूणाला जागा दिली नाही आहे. तरी पण कुणा भुमाफियाची ३ दुकाने तिथे अतिक्रमण होत आहे त्याचे काय?

मा. महापौर :- आयूक्त याचे उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसूलकर :- मा. महापौर .....

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी:- मी विपक्ष नेता असून शहरासाठी गंभीर असणारा विजय विला चा विषय स्विकार न करुन अन्याय करीत



आहात सभापती सांगत आहे, दूसरी सूचना चूकून आली आहे. मी म्हणेन माझया लक्षवेधीवर लक्ष दयावे.

मा. महापौर :- लेट अस, डिसकस दिज टू कॉलिंग अटेंशन मोशन ऑन द स्पेशल सर्कमंटस वूई विल कम टू धिस इश्यू ऑलसो.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- मा. महापौरजी, आता नारायण पंजाबी म्हणाले तूमच्या कॅबिनमध्ये चर्चा झाली वगैरे वगैरे या सर्व गोष्टी गृहित धरुन प्राथमिक शाळांचे रिजर्वेशन जिथे जिथे आहे, तिथे तिथे तूम्ही कर्मशिल बांधकाम करु शकता का? हि गोष्ट कोणत्त्या कायदयामध्ये बसते याचे जर मला उत्तर मिळाले तर मला वाटते या ठरावाला मदत होईल.

मा. आयुक्त :- मा. महापौर सो. या ठिकाणी जी लक्षवेधी उपस्थित झाली आहे, हा एक दुर्देवी प्रकार आहे. असे मी समजतो. सन्माननिय सदस्यांनी माझया अगोदर जो खुलासा केला तो अतिशय योग्य खूलासा होता, आपल्याच चेंबरमध्ये जो निर्णय झाला होता शहर अभियंतांकडुन मी त्याचा रेकॉर्ड घेतला आहे. शाळेची कंपाउंड जी बांधली ती ३ ,४ , दा पडली होती. असामाजिक लोक तिथे शाळेत जायचे व गैरप्रकार तिथे घडायचे त्यानंतर चर्चा झाली चर्चेत हा निर्णय झाला की, कंपाउंड वाल्या परपज पूर्ण होईल व लोकांचे पुर्नवर्सन्न पण होईल असा एखादा स्ट्रक्चर तिथे उभा केला तर शाळेच्या ॲक्टीव्हीटीमध्ये पण परिणाम होणार नाही. आपला हेतु हि सिध्द होईल आरक्षणात काही बदल होत नाही आहे. प्रथम ही गोष्ट, दुसरे हे की जवळ जवळ तीन साडेतीन लाखाचा प्रस्ताव कंपाऊंड वॉलचा तिथे मंजुर झाला आहे. ते आम्ही थांबवले ते त्या दिवशी पण मी सभेत सांगितले तो ठेकेदार वारंवार मला फोन करीत आहे कि कंपाऊंड वॉल परत बांधायचे आहे का? परत ती पडू शकते तर कितीदा आपण ती बांधणार? कितीदा खर्च करायचा? त्यापेक्षा हेच योग्य होईल लोकांचे पण पुर्नवसन होईल. व शाळेच्या एक्टिविटीज वर काही परिणाम होणार नाही. इतके सगळे झाल्यावर झुलेलाल मंदिर रोड आहे, आजुबाजुची जी जागा आहे यात खुप महत्त्वाच्या ठिकाणाची दुकाने जात होती. त्या लोकांनी ती जागा दिली. जर स.सदस्यांचे हे म्हणणे आहे की, जे अफेक्टेड नाही अशा व्यक्तीला दिले गेले असे उदा. ते लिखित देतील तर आम्ही चौकशी करू आणि जो पण निर्णय होईल तो तुमच्या समोर ठेवू. कुणी भुमाफिया हडप करत असेल तर ते बांधकाम तोडा.

*मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- आम्हाला हे पाहिजे की त्यांनी ती पर्यायी जागा म्हणून दिली असेल तर तसे सांगावे. आम्ही चौकशी करू.*

*मा.महापौर:-ती तीन दुकाने जर त्या व्यक्तीची नाही ज्यांची दुकाने, घरे रोड वायडिंग मध्ये गेली. कुणा भुमाफियाचे अनधिकृत बांधकाम होत असेल तर ते तोडले जाईल.*

*मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-हेच तर पाहिजे.*

*मा.आयुक्त:- हेच होईल, केले जाईल.*

*मा.सदस्य श्री.देवेंदसिंह खेमाणी:- मा.महापौरजी, ज्या दुकानदाराने पुर्नवसनासाठी जागा दिली त्यासंबंधी माझा एक सल्ला आहे त्यांना लिखित काही नाही दिले गेले. त्यामुळे त्यांना लाईटपाण्याचे कनेक्शन अजुन मिळाले नाही आहे. सहा-सहा आठ-आठ महीने ते असेच बेरोजगार होऊन बसले आहेत. त्यांना कोणतीच सवलत मिळत नाही. मागे मी शिंदे साहेबांना बोललो होतो.*

--३०--

*मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- जवाहर टॉकीजच्या बाजुला पर्यायी जागा दिली ते आम्ही मानतो पण रेशनिंग दुकानाकडे उजव्या बाजुला जो रोड जातो तो रोड वायडिंग मध्ये नाही आहे. तिथे कुणाचे तरी बांधकाम होते ते काढून तेथे कुणा भुमाफियांने तीन दुकाने रात्रीतल्या रात्री बनवली आहे. भुमाफीया तिकडे बसुन दमदाटी करतो. पुन्हा गरीबाचे तिकडे बांधकाम होते पांचाळ म्हणुन एक व्यक्ती माझ्याकडे आला होता त्यालापण धमकी मिळाली आहे. अनधिकृत बांधकाम केले आहे. तीन दुकाने तयार झाली आहेत. अजुन पाच सहा दुकाने बनणार आहे. असे प्रपोजल आहे. त्यांचे त्या करिता काय करू इच्छिता. काय करणार याचे मला उत्तर हवे.*

*मा. आयुक्त :- आपल्या लक्षवेधीचा हा भाग नाही म्हणून मी रिप्लाय नाही देवू शकत. जितके त्यांनी विचारले त्यासंबंधी सांगितले त्यांना अजून काही अतिरिक्त माहिती हवी असेल रोड संबंधी तर त्यांनी लिखित दयावे. मी तयार करुन माहिती लिखीत देईन ॲण्ड कन्वेहिम ऑलसो.*

*मा. महापौर :- ॲट लिस्ट यु कॅन ॲन्सर व्हॉट हि मिन टू से की तीन दुकाने भुमाफीयाने बांधली आहेत. ती जागा ज्यांची घरे रोड वायडिंग मध्ये गेली त्यांना नाही मिळाले.*

*मा.सदस्य श्री.देवेंदसिंह खेमाणी:- मा.महापौर, ते म्हणाले की आम्ही फॉरमेट तयार केले आहे ते देवू पण आजपर्यंत दिले नाही गेले. मेहरबानी करून लवकर दया म्हणजे ते लाईट पाण्याचे कनेक्शन घेवू शकतील.*

*मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- महापौरजी, मी पुर्नवसना संबधी काही बोलू इच्छितो. मधुबन हॉटेल समोर ज्या लोकांच्या जागा गेल्या त्यांना पर्यायी जागा दिल्या आहेत. प्लॉट नं.६१९ मध्ये माझ्या प्रभागातच आहे. तीन-चार महिन्यापासून कार्पोरेशन मध्ये येतात, माझ्याकडे येतात आयुक्तां कडे जातात कि, आम्हाला जी चिठ्ठी दिली गेली. पर्यायी जागेसाठी, तिथे एक नगरसेवक दमदाटी करून बनवून देत नाही. दोन महासभेमध्ये हा इश्यू होता की नाही बनवून देत. या महासभेत ठराव पास करावा त्यांना पोलीस प्रोटेक्शन देवून व्यवस्था करावी. आयुक्तांना माहिती आहे ते कितीदा येत आहे.*

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:- हे नगरसेवकांचे नाव देत आहे. कोण नगरसेवक आहे त्यांचे नाव सांगा. असे नाही आम्ही पण सर्व नगरसेवक आहोत त्या नगरसेवकाचे नावे घ्या.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- बी.बी.मोरे आहेत. मी काळी फित बांधली आहे. माझ्या प्रभागातील पाण्याचे कनेक्शन कापून टाकले.पाण्याचे टॅकर माझ्या प्रभागात हजार येतात. उलट त्यांच्या प्रभागात झोपडपटटीत दोन वेळा सुध्दा पाणी येते माझ्या प्रभागात एक वेळा सुध्दा पाणी येत नाही.

इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-काळी फित या करिता बांधली काय?

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:- जे सदस्यांनी चुकीचे सांगितले त्याचे स्पष्टीकरण करतो प्रथम तर मी कुणाचे वैयक्तिक कनेक्शन कापायला सांगितले नाही. मी हे म्हणालो की माझ्या ३१ नंबर प्रभागातील जे पण अनधिकृत कनेक्शन रात्रीतून घेतात ते कनेक्शन कट केले पाहिजे. जे पैसा भरतात त्यांना पाणी मिळाले पाहिजे.



मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- हा आम्हाला पाकिस्तानी म्हणतो सिंधी लोकांना?

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-हा अनधिकृत कनेक्शन घेवू देतो. पाण्याची चोरी करतो. हा चोर सदना मध्ये काळी फित बांधून येतो. मी निवेदन अर्ज दिले आहे, डिसीपी कमिशनरना दिले आहे. जे अनधिकृत कनेक्शन घेतात. रात्री त्यांना बंदी केले जावे, असे आयुक्तांना पण पत्र दिले आहे. त्याशिवाय मी वैयक्ति यांच्याविषयी नाही बोललो कट झाले पाहिजे. पूर्ण कॅम्प नं. १ ते ५ मध्ये अनधिकृत कनेक्शन घेतात त्यावर .....

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- जेव्हा कनेक्शन कापले जात होते तेव्हा सभापती पण होते. व हे उभे होते. व शिव्या देऊन म्हणत होते. जा पळा इथुन.

मा.महापौर:-मी क्लीअर करतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-मला सांगु द्या. ज्यांना पर्यायी जागा दिली. ते बनवुन बसले आहेत दुसरी गोष्ट जर दमदाटी केली आहे तर पोलीस स्टेशनात तक्रार केली आहे का?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:-आता मी पोलीस स्टेशन ला पण जाईन.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे:-सदनात xxxxपणा करून xxx काळी फित बांधुन आला तर xxxसारखेच सर्व चालतील का?

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-हा सदस्यांचा अपमान आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:-अनपार्लमेंटली भाषा आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-हे शब्द परत घ्या.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:-या सदस्यांला बोलण्याची मर्यादा नाही तो स्वत:ला पोलीसांचा बाप म्हणवतो.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव:- मा.महापौरजी,

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी:-आपले शब्द परत घ्या.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :-माफी मागा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:- स.सदस्यांची माफी मागा.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-हा सर्व सदस्यांचा अपमान आहे. चुकीचे आहे त्यांना माफी मागायला सांगा.

--३१--

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौर:- सभा १० मिनिटासाठी स्थगित करण्यात येत आहे.

६.१५ ला सभा स्थगित करण्यात आली. सायंकाळी ६.३१ ला सभा सुरू करण्यात आली.

मा.सचिव:- कृपया लक्ष दया, या पुढची जी लक्षवेधी आहे ती श्री.प्रमोद टाले यांची आहे.

मा.सदस्या श्रीमती यशस्वीनी नाईक:-मा.महापौरजी, पहिल्या लक्षवेधीचे काय झाले?

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:- मा.महापौरजी, पहिल्या लक्षवेधीचे काय झाले?माफीचे काय झाले?

मा.सदस्या श्रीमती यशस्वीनी नाईक:-पहिल्या लक्षवेधीचे काय झाले? त्यांना माफी मागायला सांगा. उद्या आम्हाला पण बोलतील.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:- माफीचे काय झाले. ते xxx म्हणाले त्यांचे काय झाले.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे:-मा.महापौर, दोन सदस्यांचे येथे जे भांडण चालले होते ते भांडण काही तत्त्वाचे नव्हते. आपला एक सदस्य दुस-या एका सदस्याला असंसदिय भाषेत बोलतो? आपणा सर्वांना लोकांनी जे निवडून दिले आहे ते चांगल्या गोष्टी करण्यासाठी चांगले बोलण्यासाठी निवडून दिले आहे. त्यातूनही एखादा सदस्य सभागृहामध्ये चुकीचे बोलत असेल तर त्याने सभागृहात माफी मागीतली पाहिजे हे त्यांचे कर्तव्य आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी:- कुणी एखादा सदस्य दुस-या एखादया सन्माननिय सदस्याला xxxसारखा असे म्हणत असेल हा फार मोठा अपमान आहे. त्यासाठी त्या सभागृहामध्ये ती केवळ श्री.नारायण पंजाबी यांच्या बाबतीतील गोष्ट नाही आहे. ही गोष्ट सर्व नगरसवकांच्या प्रतिष्ठेची आहे. त्यासाठी मला असे वाटते की, येथे जे सन्माननिय सदस्य बसले आहेत. त्यांच्या प्रतिष्ठेची गोष्ट आहे ही केवळ श्री.नारायण पंजाबी यांच्याबाबत

वैयक्तिक स्वरूपाची गोष्ट नाही आहे यासाठी अपमानकारक शब्द उच्चारणा-या सदस्यांनी सभागृहात माफी मागीतली पाहिजे. सर्व सदस्यांची प्रतिष्ठा उंचावणे हे आपले कर्तव्य ठरते. ती जबाबदारी आपणावर येते.

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्वीनी नाईकः</u>- मा.महापौरजी, मागच्या महासभेत आम्ही मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबत स्थगन प्रस्ताव आणला होता त्यावेळी सत्ताधारी पक्षाचे आपले सदस्य म्हणत होते की, आम्ही शहराच्या विकासासाठी महासभा बोलावली आहे. अशा काही गोष्टीसाठी महासभा बोलावलेली नाही तर आता. हे जे सभागृहात चालले आहे ते शहर विकासाचे आहे का? सभागृहामध्ये कशा प्रकारे बोलले जाते हे जर त्या नगरसेवकास कळत नसेल तर आपण त्यांना शिकविले पाहिजे नाहीतर त्यांनी सभागृहात बोललेच नाही पाहिजे. हा आमचा सुध्दा अपमान आहे. एका सदस्याच्या बरोबर सर्व सदस्यांचा अपमान आहे. थेट प्रक्षेपणामुळे सभागृहात काय चालले आहे. ते नागरिक पहात आहेत ते काय विचार करतील? नाहीतर आपण हे थेट प्रक्षेपण बंद करा.

--३३--

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानीः-</u> मा.महापौर, ज्या प्रकारचे वातावरण ज्या प्रकारचे व्यवहार आज या सभागृहात झाले ते अजिबात योग्य नाही. कुण्या नगरसेवकाला नाव ठेवणे, त्याबाबत मला असे विचारायचे आहे. xxx काळी पटटी घेवून का फिरत आहे? त्यांच्या प्रभागातील xxxना सूध्दा त्याबाबत हरकत आहे, कारण ते एका सदस्यांने म्हंटले की, xxxसारखी काळी पटटी बांधून आले आहेत. एखादया सदस्याला अशा प्रकारे नाव ठेवणे योग्य नाही. हे शब्द वापरणा-या सदस्याने त्या सदस्याची माफी मागीतली पाहिजे त्यातच सभागृहाची प्रतिष्ठा आहे. माफी मागितल्याने कुणी छोटा किंवा मोठा होत नसतो. परंतु आवेशात येवून काही भले बुरे एखादा सदस्य बोलला असेल तर माफी मागणे ही फार मोठी बाब नाही. त्यामुळे सदस्यांचा मान राखला जाऊ शकतो व यानंतर प्रत्त्येकाने कमीत कमी आपल्या भाषेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकरः-</u> मा. महापौरजी, याबाबत मी, श्री. नरेंद्र राजानी व सर्व सभागृहास सांगू इच्छितो की, त्यांचे आपसात समेट झाले असून.....

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- खाजगी मिळकत आहे काय..?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- नाही, नाही, आपसात समेट कसा? आपसातील लेन देन आहे काय..? काही देण्याघेण्याचे प्रश्न आहे काय? मिळकतीचा प्रश्न आहे काय..?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- मा. सुभाष मनसूलकरजी आपसातील गोष्ट म्हणतात हया आपसातील गोष्टी घरी करा येथे सभागृहात नको.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :- मा. महापौरजी हा विषय कृपया आता बंद करा.

<u>मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मा. महापौरजी, सभागृहात आज आता जी चर्चा झाली , जो शब्द वापरला तो अतिशय वाईट आहे, अशा प्रकारच्या शब्दांचा प्रयोग सभागृहात झाला नाही पाहिजे. एक वर्षापुर्वी सुध्दा अशाच प्रकारची एक चुक श्री.बी.बी.मोरे यांच्याकडून झाली होती. श्री.नारायण पंजाबी यांना उददेशुन ती चुक झाली होती. त्यावेळचे इतिवृत्त कायम करताना मी एक हरकतीचा मुददा उपस्थित केला होता. कारण त्या इतिवृत्तांत अशी नोंद आली होती की, श्री.नारायण पंजाबी हे बदमाश आहेत. त्यावेळी मी हरकत घेतली होती की हा शब्द इतिवृत्तांतातून काढला जावा.

परंतु त्यावेळी श्री.नारायण पंजाबी यांनी म्हंटले होते की नाही मला मंजुर आहे, त्याचवेळी अशा या प्रकारांना प्रतिबंध केला असता तर आता आजची ही गोष्ट झाली नसती. म्हणुन मी आपणास विनंती करतो की, आजच्या सभेतील श्री.बी.बी.मोरे यांनी
उच्चरलेला हा जो अपशब्द आहे तो इतिवृत्तांतातून काढला जावा व ज्यांच्याबाबत तो शब्द वापरला आहे त्यांची त्याबाबत काही हरकत नसेल तर आमच्या सुध्दा काही भावना नाहीत.

<u>मा.महापौरः-</u> मी सभागृहास सांगू इच्छितो की, आमच्या ज्या दोन स. सदस्यांमध्ये झडप झाली होती व जे काही शब्द त्यांनी एकदुस-याबाबत वापरले आहेत. त्यांची इतिवृत्तांत नोंद केली जाणार नाही. त्या दोन्ही सदस्यांना या प्रकाराबाबत खेद आहे.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबीः-</u> खेद त्यांनी व्यक्त केला पाहिजे ना?महापौर साहेब? आपण का खेद व्यक्त करता?



<u>मा.महापौरः</u>- मी दोघांशीही बोललो आहे, दोघांनीही याबाबत खेद व्यक्त केला आहे. हा मुददा येथे समाप्त केला जावा.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढावः-</u> आता हे प्रकरण संपले ना? आता संपले. संपले.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानीः-</u> थेट प्रक्षेपण चालु आहे ना? इतिवृत्तात?......

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबीः</u>- ते तर चालू आहेच ना?

<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाणः-</u> मा.महापौरजी, श्री.नारायण पंजाबी यांना या बाबतीत खेद आहे. दोघांनाही खेद आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टालेः</u>- मा.महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब व सदनात बसलेले आमचे सर्व पक्षांचे वरीष्ठ सदस्य.... मी आज ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे, मराठीतच बोलतो,(लक्षवेधी वाचून दाखवितात)उल्हासनगर शहरामधील प्रभाग १४ मध्ये विविध वस्त्यांमधील नागरिकांना महानगरपालिका नळाव्दारे गेली, दहा-बारा वर्षामध्ये थेंबभर सुध्दा पाणी पुरवठा करू शकली नाही. त्याच्यामध्ये काही विभाग दिलेले आहेत. भारत नगर, नागसेन नगर, पंचशिल नगर, आम्रपाली नगर वगैरे वगैरे परंतु आज मितिस सदर विभागातील नळ धारकांना भरमसाठ, अतोनात बिले पाठविली गेली हा सरळ सरळ महानगरपालिकेने तेथील जनतेवर अन्याय केलेला असून सदर लक्षवेधी सुचनेव्दारे सदर विभागातील नळ धारकांची पाणी बिले माफ करण्याबाबत चर्चा घडवून निर्णय घ्यावा. हि लक्षवेधी मी दिलेली आहे. मला वाटते दिनांक ३०.६.२००० रोजी जी महासभा झाली त्यामध्ये ४७१ कृमांकाचा माझा प्रश्न होता. पाणी पुरवठ्याचे संदर्भात त्यामध्ये मी जे प्रश्न विचारले होते त्याचे तुमच्या कार्यकारी अभियंत्यानी श्री. धुत साहेबांनी जे उत्तर दिले ते इतिवृत्तांताच्या पान कृ.८ वर आहे. उत्तर दिले होते. प्रभाग क.१४ मधील भारत नगर, नागसेन नगर, आम्रपाली नगर, पंचशील विभाग, साईबाबा नगर मध्ये पाणी यायचे नाही म्हणजे आमच्या कार्यकारी अभियंत्याने कबुल केले होते की, पाणी येत नव्हते. इतिवृत्तांताच्या पान कृ.९ मध्ये असा उल्लेख आहे की, सभापती श्री.रामभाऊ आढाव यांनी असे सांगीतले की, १ एप्रिल २००० रोजी माझ्या प्रभागातील जो जो विभाग पाण्याबाबत प्रभावित होता त्यांना नऊ-नऊ वर्षे, दहा-दहा वर्षे पाणी मिळत नव्हते त्यांच्यासाठी पाण्याची व्यवस्था केली गेली. म्हणजे १ एप्रिल २००० च्या नंतर ही व्यवस्था केली गेली आहे. असे आमच्या सभापती साहेबांनी मान्य केले आहे. त्याच तारखेच्या इतिवृत्तातील पान क.१० वर

असा उल्लेख आहे की, बिल माफीचा ठराव आणावा . पुढच्या महासभेत तो ठराव पास केला जाईल. त्यांनतर पान क्र. ११ वर श्री.प्रकाश महाडीक आमचे स.सदस्य श्री.प्रकाश महाडिक असे म्हणाल्याची नोंद आली आहे की, आमचे प्रिय श्री.प्रमोद टाले व श्री.बाबुराव बगाडे यांनी पाणी येत नाही म्हणून उपोषण केले होते. हे मी याच्यासाठी सांगतो की, आमचे आयुक्त साहेब त्यावेळी येथे नव्हते, सभेत नव्हते त्यात त्यांची मागणी होती की, पाणी येत नाही तर पाणी बिले माफ करावी. तेव्हा लेखी उत्तर देताना आयुक्तांनी उत्तर दिले आहे की, हा महासभेचा विषय आहे. महासभेमध्ये जर आपण हा ठराव पास केला तर हे होईल त्याच्यावर आयुक्तांची सही आहे. त्यावेळच्या आयुक्तांनी हे जे उत्तर दिले आहे. ते कायदा पाहुनच दिले असेल भरमसाठ बिले म्हणजे या जनतेच्या जखमेवर मीठ चोळायचे. पाणी बिल्कूल नाही. आणि भरमसाठ बिले पाठवायची तर बिले माफ झाली पाहिजेत असे आमच्या श्री.प्रकाश महाडीक यांनी म्हटले आहे असे ३० तारखेच्या महासभेच्या इतिवृत्तात म्हटलेले असताना त्यावेळेस



मी तमाम जनतेच्या वतीने ओरडून सांगत होतो ती आमची सुनिता इंगले टॅंकर खाली चिरडून मेली होती. प्रभाग क्र.१६ मध्ये पाणी भरता भरता एका महिलेचा गर्भपात सुध्दा झाला होता. एक बॅंक मॅनेजर शॉक लागुन मेला. पाणी भरता भरता आणि ही महासभा संपून आजची महासभा येई पर्यंत आमच्याच प्रभागात या नागसेन नगर मध्ये कविता राजेंद्र तोरणे या नावाची एक महिला पाणी भरत असताना शॉक लागुन मरण पावली. आज मी पुन्हा तुम्हाला आवर्जुन सांगतो आहे की, महानगरपालिका किती खुन करणार आहेत? या महापालिकेने मागच्या महासभेपर्यंत खुन केले या महासभेच्या वेळे पर्यंत अजुन एक खुन केला. मा.महापौर साहेब,उपमहापौर साहेब व आयुक्त साहेबांना मी सांगेन की, हे खुन तुम्ही केले आहेत. याची या जनतेने निश्चित दाद घेतली पाहिजे. माझा असा प्रश्न आहे की, येणा-या महासभे पर्यंत जर पुन्हा एखादा बळी गेला तर त्या पाण्यासाठी बळी गेला तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? याचे उत्तर मला आयुक्तांनी दिले पाहिजे आणि मी महापौरांना व आयुक्तांना विनंती करेन की, त्यांनी माझ्या प्रभागातील ज्या ज्या प्रभागात पाणी नव्हते आणि खरोखरच जेथे पाणी नव्हेते हे महानगरपालिकेने कबुल केले आहे. अधिका-यांनी कबुल केले आहे. सभापतीनी कबुल केले आहे. आमच्या सदनातील सर्व सदस्यांना हि मागणी माहिती आहे तर मी विनंती करेन की, सदर विभागातील पाण्याची बिले पूर्णपणे माफ करावीत आणि जर माफ करत नसाल तर आम्ही या सदनाव्दारेच नाही तर उदया मी तमाम जनतेला घेवून रस्त्यावर उतरेन व ही बिले माफ करण्यासाठी तुमच्यावर निश्चितच दडपण आणेन. धन्यवाद.

मा.उपमहापौर ६.४५ वाजता. सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा.सदस्या श्रीमती पंचशिला पवार</u>:- श्री.टाले साहेबांनी जी लक्षवेधी आणली आहे ती बरोबर आहे. त्या लक्षवेधीमध्ये त्यांच्या म्हणण्याप्रमाणे भारत नगर, नागसेन नगर, पंचशिल नगर, आम्रपाली नगर व इत्त्यादी दुस-याही ठिकाणी जेथे पाणी येत नाही तेथे पाणी बिल आकारणे हे सर्वस्वी चुकीचे आहे व तमांम जनतेवर अन्याय आहे. तुम्ही तर घर तेथे बिल देत असाल तर तेथे घर तेथे पाणी दयावयास हवे आहे. आणि घर तेथे पाणी जर तुम्ही देऊ शकत नसाल तर तुम्हाला पाणी बिल देण्याचा काही अधिकार नाही.तुम्ही तसे बिल आकारू शकत नाही व लोकसुध्दा देवू शकणार नाही म्हणून आयुक्त साहेबांना, महापौर साहेबांना ही नम्र विनंती आहे की, घर तेथे बिल आकारण्या ऐवजी पहिले घर तिथे पाणी दया व त्यानंतरच घर तेथे बिल दया.येवढेच बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले</u>:-मा.आयुक्त साहेबांना अजुन मी एक असे सांगू इच्छितो की, भारताचा ५३ वा वर्धापन दिन आपण साजरा करित असताना आमचे रिपब्लीकनचे काही लोक शेखर भालेराव वगैरे कार्यकर्ते ते

उपोषणसाठी बसले होते. ते कशासाठी बसले होते? त्यांची पाण्याची बिले माफ करण्यासाठी हा मुददा घेवून ते उपोषणास बसले होते. येथे आपला स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा होत असताना तेथे पाण्यासाठी आमची माणसे उपोषणास बसतात ही लाजीरवाणी गोष्ट कोणासाठी आहे? तुमच्यासाठी कि माझ्यासाठी? की तमांम जनतेसाठी आहे याचे पण उत्तर शोधले पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> महापौर साहेब, हे मंजुर करत आहात काय? कारण माझ्या पण प्रभागातील बरेच आहेत.

<u>मा.महापौर</u>:-आयुक्त साहेब या लक्षवेधीचे अधिक चांगल्याप्रकारे उत्तर देतील.



<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे</u> :- सन्माननिय महापौर, उपमहापौर आयुक्त साहेब व माझ्या प्रभागाच्या बाजुला ज्यांचा प्रभाग आहे. ते सन्माननिय प्रमोद टाले ज्यांनी आताच आपल्या प्रभागातील पाण्याची समस्या मांडली. ते श्री.प्रमोद टाले, मी सांगु इच्छितो की, श्री.प्रमोद टाले यांना माहित आहेत, त्यांच्या प्रभागात जलवाहिनी टाकण्यासाठी आमचे खासदार श्री.प्रकाश परांजपे यांनी निधीतून साडेबारा लाख रूपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. जलवाहिनी भरतनगर पर्यंत जाते. कार्यकारी अभियंता श्री.पाटील साहेब यांनी तिथे एक बुस्टर पंप सुध्दा बसविला आहे. तरी सुध्दा भरत नगर येथे पाणी येत नाही, त्यांची जी भावना आहे तीच माझी भावना आहे. सुभाष टेकडीचे काही लोक माझ्याकडे आले होते. तेथील लोकांची सुध्दा हीच भावना आहे की, आमच्या येथे पाणी येत नाही. त्यामुळे आम्हाला पाणी बिल दिले जावू नये. प्रत्त्येक सदस्य जर असा म्हणु लागला की, पाणी येत नाही म्हणुन पाणी बिल देवू नये हे चुकीचे आहे यासाठी मी अधिकारांना दोषी ठरवू इच्छितो कारण दहा लाख रूपये खर्च करून खास भरत नगर साठी जो बुस्टर बसविला तसेच तेथे पाण्याची टंचाई असल्याने आमच्या खासदारांनी बारा लाखाची एम.एस.पाईप लाईन मंजुर केली, तेथुन दुसरा कोणी जोडणी घेवू शकणार नाही, ती पाईप लाईन थेट भरत नगर पर्यंत जाते परंतु तरीही तेथ पर्यंत पाणी जात नाही व आमचा एक सदस्य म्हणतो पाणी नाही तर बील का देता? त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की, आपले जे अधिकारी चुक करून गेले, त्यांनी जेथे जेथे बुस्टर पंप बसविले ते बुस्टर पंप काढून टाकले जावेत अशी मी सभागृहास विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले</u> :- मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे साहेबांनी आता जे स्पष्टिकरण दिले खासदार साहेबांनी जो साडेबारा लाखाचा निधी उपलब्ध करून दिला त्याबददल मी त्यांचा आभारी आहे. या बाबतीत आणि या नंतर माझ्या प्रभागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे हे हि मी मान्य करतो. दहा-दहा वर्षापासुन तेथे पाणी येत नव्हते. चालु वर्षाचे बील आता सुध्दा आम्ही भरायला तयार आहोत दहा-बारा वर्ष जे कष्ट केले आंदोलन केले. माणसे मेली तुम्ही पाण्याचे बील माफ करू शकत नाही?

<u>मा.सदस्य श्री.जमनु पुरस्वानी</u> :- मा.आयुक्त साहेब आज पुर्ण उल्हासनगर शहरामध्ये पाण्याची टंचाई, माझ्या प्रभागात बॅरेक क्र.११३व ११४ मध्ये पाण्याची टंचाई असल्याबाबत मी कित्त्येक दिवसापासून पत्र दिली आहेत. परंतु आपणाकडिल पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत ते पूर्णपणे बेजबाबदारीने वागत आहेत, आमच्या नारायण पंजाबी यांच्या प्रभागात टॅकर्स व्दारे जे पाणी पुरविले जाते त्याच्या देयकाची रक्कम दरमहा दोन लाख रूपये एवढी असते. याचाच अर्थ वर्षाचा २४ लाखाचे पाणी टूकर्सव्दारे श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागात पुरविले जात आहे. मागील ६ महिन्यात १२ लाखाचे पाणी टूकर्सव्दारे तेथे पुरविले गेले आहे. कुणाही अधिका-याने याकडे

लक्ष दिले नाही. जर तेथे १२ लाखामध्ये पाईप लाईन टाकली असती तर तेथे
सर्वांना नळाव्दारे पाणी मिळाले असते. परंतु आज पण तिथे तीस टॅंकर ४० टॅंकर रोज जात आहेत. एका प्रभागा साठी महानगरपालिकेचा वर्षाला २४ लाख रूपये खर्च होतो. अशा प्रकारे खर्च झाले तर महानगरपालिका कशी चालेल? पाणी पुरवठ्याचे जे अधिकारी आहेत त्यांनी हया गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे, टॅंकर व्दारे जे पाणी पुरविले जात आहे. त्यावर आपला किती खर्च होत आहे? त्या पैशातून पाईप लाईन किंवा इतर काही सुविधा केल्या जाव्यात, जेणे करून नळाव्दारे लांकांच्या घरामध्ये पाणी येवू शकेल.श्री. नारायण पंजाबी यांनी उपोषणाबाबत एक पत्र दिले होते. त्यांच्या प्रभागात वर्षाला २४ लाखाचे पाणी जात आहे व अधिकारी वर्ग म्हणतो की, आम्ही १५ दिवसात यावर (सोल्युशन)उपाय काढू. १५ दिवसात जर उपाय काढू शकत होतात. तर मागील सहा महिन्यात का नाही काढला? जेव्हा बारा



लाखाचे पाणी त्या प्रभागात पुरविले गेले. आमच्या शहरातील पैसा अशा प्रकारे टॅंकर्ससाठी खर्च होत आहे. यास जबाबदार कोण आहे?

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले</u> :- श्री.जमनु पुरस्वानी विषय बदली करू नका, लक्षवेधी जी दिली आहे त्यावर आपण बोला.

<u>मा.सदस्य श्री.जमनु पुरस्वानी</u> :-तर मी आपणास निवेदन करीन की, पाणी पुरवठ्याचे जे अधिकारी आहेत त्यांनी या गोष्टी कडे लक्ष दिले जावे, जेणे करून लोकांना त्रास होवू नये व हे शहर टॅंकर मुक्त व्हावे व लोकांच्या घरा घरा पर्यंत पाणी पोहचावे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी, पाण्याच्या समस्या मध्ये राजकारण येता कामा नये परंतु तरीही दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे. आजच्या सत्ताधारी पक्षामध्ये यु.पी.पी., आर पी आय,कॉंग्रेस, अपक्ष आहेत व सौभाग्याने पाणीपुरवठा समितीचे सभापती आरपीआय चे आहेत. सभापतीच्या नंतरचे जे पद आहे उपसभापती, त्या उपसभापतींच्या प्रभागात पाणी येत नाही. आर.पी.आय चे सदस्य म्हणतात की, दहा वर्षापासून पाणी येत नव्हते व त्यास अनुमोदन सुध्दा तेच देत आहेत. आज मी सभागृहाला ही माहिती देवू इच्छितो की, आज या महासभेच्या विषय सुचीवर जो विषय आणला आहे, ज्या प्रभागात मागील आठ-दहा किंवा दहा-बारा वर्षापासून पाणी येत नव्हते तेथील नागरिकांची पाणी बिले माफ केली जावीत, पाणी पुरवठा समितीचा सभापती सुध्दा आरपीआयचे आहेत. पाणी पुरवठा समिती कडून जर हा ठराव संमत केला की, ज्या प्रभागात दहा वर्षे पासून पाणी येत नाही. तेथील पाणी बिल माफ करावीत व या ठरावाची प्रत जेव्हा महासभेपुढे मंजुरीसाठी येईल तेव्हा, आम्ही सर्व विरोधी पक्षीय, आम्ही सर्व विरोधी पक्षीयांमार्फत असे आश्वासन देतो की, जर पाणी पुरवठा समिती कडून असा कोणताही ठराव महासभे पुढे आला तर आम्हा विरोधी पक्षीयां कडून त्यास समर्थन राहील. जर आपण असे करत असाल तर आम्ही आजच समर्थन देतो यासाठी लक्षवेधी आणण्याची जरूरी नव्हती. आपण पाणी पुरवठा समिती कडून अशा प्रकारचा ठराव महासभेपुढे आणा. आम्ही आजसुध्दा त्यास समर्थन देण्यास तयार आहोत.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :-</u> मा.महापौरजी, आज ही जी लक्षवेधी सभागृहासमोर श्री.प्रमोद टाले व श्रीमती.पंचशीला नाना पवार यांनी मांडली आहे ती, खुपच प्रशंसनिय आहे. कारण की जेव्हा पासुन आम्ही निवडून येथे आलो. १९९७ पासनू आम्ही येथे निवडून आलो. शिवसेना भाजपाची सत्ता होती. श्री.राजु जग्यासी व श्री.जयप्रकाश भाटीया हे पाणी पुरवठा समिती चे सभापती होवून गेले परंतु आज आमचे जे श्री.रामभाऊ आढाव या समितीचे सभापती झाले, रामभाऊ आढाव यांनी पाणी पुरवठ्या मध्ये जी सुधारणा आणली आहे. जेथे जेथे पाणी येत नव्हते तेथे आता पाणी येवू लागले आहे.

त्याबाबत त्यांनी केलेले प्रयत्न खरोखरच प्रशंसनिय आहे. त्यांनी दिवस रात्र एक करून प्रयत्न करून, मेहनत करून त्यांनी एवढी सुधारणा घडवून आणली आहे. ज्या प्रभागामध्ये कित्येक वर्षापासून पाणी येत नव्हते तेथे आता पाणी येवू लागले आहे. ही एक गोष्ट.

या नंतर दुसरी एक गोष्ट अशी की, ठिक आहे. खासदार निधीतून श्री.प्रमोद टाले यांच्या प्रभागात पाईप लाईन टाकली गेली, श्री.भिमसेन मोरे यांनी म्हटले की, लालचक्की पासून श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागा पर्यंत ज्यादा बुस्टर, भरतनगर, नागसेन नगर, साठी ज्यादा बुस्टर १२० चा परंतु त्यानंतर सुध्दा पाणी येत नाही. त्याचे कारण हे आहे की, त्याच्या बाजुने जे प्रभाग आहेत, भिमसेन मोरे यांचा प्रभाग आहे, आणखीन दुसरा कुणाचा



प्रभाग असेल. अधिका-यांनी पाईप लाईन वर २''-२'' च्या बोरिंग मारल्या त्यामुळे पाणी पुरवठा जो दुसरी कडे वळविला त्यामुळे पाणी येत नाही. अशीच परिस्थिती माझ्या प्रभागात व श्री.नरेंद राजानी यांच्या प्रभागात आहे, श्री.राजानी यांच्या प्रभागात मागील वर्षी एक महिला शॉक लागून मरण पावली, हे बरोबर आहे की चुक आहे? हे बघा, हा अतिशय ज्वलंत प्रश्न आहे, मस्करी वर घेवू नका, आज आपला एक सदस्य म्हणतो की, हे चुकीचे आहे बिल माफ होता कामा नये, थेट प्रक्षेपण चालू असल्याने लोकांना दाखविण्यासाठी दुसरा सदस्य म्हणतो की, आपण तसा प्रस्ताव आणा. आम्ही संमत करू. हे राजकारण उल्हासनगरच्या जनतेसाठी खेळू नका.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-श्री.प्रमोद टाले यांनी मांडलेल्या लक्षवेधीस आम्ही समर्थन देतो, आपण ठराव मांडा आम्ही समर्थन देवू.

<u>मा.महापौर :-</u> श्री. महाडिक त्यांना बोलू दया....

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- मला माझे बोलणे पूर्ण करू दया. थेट प्रक्षेपण चालु आहे. प्रभागातील, झोपडपटटीतील लोक टिव्हीवर पहात असतील म्हणुन एक सदस्यांना खुष करण्यासाठी एक बोलतात. व आत एक व बाहेर एक अशी भुमिका घेतात. भिमसेन मोरे म्हणतात की तो बुस्टर पंप काढून टाकला जावा. बुस्टर पंप लावल्यानंतर....

<u>मा.महापौरः-</u> सुभाषजी, वेळ होत आहे, आयुक्तांना उत्तर देवू दया.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- हा अतिशय ज्वलंत प्रश्न आहे, बुस्टर पंप लावल्यामुळे तीन प्रभागात पाणी जाते. माजी महापौर यशस्विनी नाईक, श्री.नरेंद राजानी व माझ्या प्रभागात पाणी येते. व आमच्या सुरेश जाधव यांच्या प्रभागात पाणी येते. आज श्री.ध्रुत साहेबांनी सुरेश जाधव यांच्या प्रभागाचे सर्व्हेक्षण केले आहे. त्यांना विचारा किती लोक आले होते?

<u>मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी</u> :- बिल माफ करण्याबाबत आम्ही सहकार्य देत आहोत....

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- चापलूसीगीरीच्या गोष्टी करून लोकांना गुमराह करू नका. आपणास मिरची का लागत आहे?

<u>मा.महापौरः</u>-श्री.सुभाषजी, आयुक्तांना उत्तर देवू दया. आता.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- उत्तर नाही, उत्तर नाही, एक गोष्ट अशी की, लक्षवेधी मांडली आहे. त्यावर चर्चा झाली पाहिजे. यावर माझे सुध्दा

असे विचार आहेत की, जर आम्ही लोकांना त्या कालावधीमध्ये पाणी दिले नाही, शिवसेना भाजपाच्या कारकीर्दीत काहीच काम झालेले नव्हते व त्या कालावधीत आम्ही त्यांना पाणी पुरवठा केला नव्हता. त्याची बिल माफ केली जावीत. ज्या ज्या प्रभागात पाणी दिले नाही त्याची पाणी बिले माफ केली जावीत. भले ही ते लोक त्यांच्या प्रभागातील असोत. नगरवाशीयांना एक थेंब सुध्दा पाणी न देता हजारो रूपयाची जी पाणी बिले दिली जातात. ती माफ झाली पाहिजेत. त्यासाठी धोरण ठरविले जावे. अशी माझी विनंती आहे.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- मा.महापौरजी, एक सेकंद ज्या प्रमाणे श्री. सुभाष मनसुलकर हे श्री.महाडिक यांच्याबाबत बोलले त्याबाबत एक हरकत आहे. जेव्हा सत्ताधारी पक्षाकडून लक्षवेधी सुचना मांडली जाते. सत्ताधारी पक्षातील एक सन्माननिय सदस्य जेव्हा लक्षवेधी सूचना मांडतो, महापौर ती



दाखल करून घेतात,तेव्हा हे कर्तव्य ठरते. एकतर आपण ठराव मंजुर करा त्यास आम्ही सुध्दा तयार आहोत, त्यासाठी त्यांनी (महाडिकांनी)जी ऑफर केली ती चुकीची नाही. श्री.प्रमोद टाले यांच्या लक्षवेधीवर जर आपण खरोखरच या लक्षवेधीवर सिरीयस असाल तर आम्ही आपणास सहकार्य देण्यास तयार आहोत. जर बिल माफ करत असाल तर बाकी प्रभागामधील सुध्दा माफ करा.

<u>मा.महापौर</u> :- श्री.महाडिक यांनी जे म्हटले,त्याबाबत आम्ही कुठे म्हणतो का की ते चुकीचे आहे म्हणून, आम्ही असे कधीच म्हणत नाही.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- ते (सुभाष मनसुलकर) टिका करत होते.

<u>मा.महापौर</u> :- नाही, नाही. ते टिका करत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद राजानी</u> :- आपणास असे वाटत असेल की, सत्ताधारी कोणते? विरोधी कोणते? असे काही वाटत असेल ना?

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी:-</u> मा.महापौरजी, दोन सेकंदात बोलेन.

<u>मा.महापौर</u> :- आयुक्तांना उत्तर देवू दया.

<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u> :- मा.महापौरजी, सुभाष मनसुलकर यांनी जे म्हटले की, आमच्या कारकीर्दीत काही कामे झाली नाहीत त्यांना मी माहिती देवू इच्छितो की, श्री.प्रमोद टाले यांच्या प्रभागात पाईप लाईन टाकण्याचे काम झाले त्याबाबत पक्षपात न करता माझ्या कालावधीतच आमच्याच खासदारांनी त्यांना निधी दिला होता. किर्लोस्कर योजनेनुसार जी पाईप लाईन टाकली जात आहे ते काम सुध्दा आमच्याच कालावधीत झाले आहे.

<u>मा.आयुक्त</u> :- स.सदस्य श्री.प्रमोदजी टाले व स.सदस्या श्रीमती. पंचशीला पवार यांनी येथे जी लक्षवेधी मांडली आहे. सर्व सदस्यांचे असे मत आहे की, हा अतिशय महत्त्वपूर्ण मुददा आहे. आम्ही सुध्दा हे मानत आहोत.

श्री.प्रमोद टाले यांनी त्यांच्या लक्षवेधी मध्ये हे लिहिले आहे की, दहा वर्षापासून पाणी मिळत नाही. ही सर्व बिले आम्हास माफ केली जावीत. प्रश्न असा येतो की, गेल्या दहा वर्षामध्ये ज्या प्रकारे या शहराची सिस्टम चालत होती त्यामध्ये व आजच्या सिस्टम मध्ये जो फरक आहे. तो फरक आहे तो फरक त्यांनी मोठ्या मनाने बोलून दाखविला आहे व सभागृहाला पण सांगितले आहे. आज ती स्थिती नाही आहे. पाण्याचा बंदोबस्त आज झालेला आहे. या लक्षवेधीचा माझ्याशी संबंधित जो मुददा आहे. त्यावर बोलतो सर्व साधारण मुदयावर मी बोलत नाही.

<u>मा.महापौर</u> :-आपण फक्त बिला बाबत बोलावे.

<u>मा.आयुक्तः-</u> मी पुर्ण शहराबावत बोलत नाही. या शहरामध्ये असे काही भाग आहेत. ज्यास आम्ही डेडॲन्ड बोलतो. किंवा असा काही भाग आहे जो उंचावर आहे. तांत्रिक दृष्टया बरेचसे प्रयत्न केल्यानंतर सुध्दा आजपर्यंत आम्ही तेथे योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करू शकत नव्हतो. ही वस्तुस्थिती आहे व गेल्या दहा वर्षामध्ये याबाबत जी गंभीर चर्चा झाली. त्यानुसार जे काही प्रयत्न झाले, असे काही नाही की दहा वर्षात कुणीच काही प्रयत्न केले नाहीत. नाही तर आजच्या घडीला अठरा कोटीची आमची जी किर्लोस्करची स्किम चालू आहे ती स्किम आज या टप्प्यावर येवू शकली



नसती. आजची परिस्थिती मी या सभागृहात सांगू इच्छितो, एमआयडीसी ची वसुली आहे. जी थकबाकी आमच्यावर आहे, महानगरपालिकेवर, नगरपालिकेच्या कालावधीपासून तो जवळ जवळ ७३ कोटीच्या आसपास आहे व पाणी पुरवठा विभागाचे प्रिन्सीपल सेक्रेटरी श्री.रंगनाथन साहेबांच्या दालनामध्ये जो निर्णय झाला होता. श्री. काळे साहेब त्यावेळी आयुक्त होते त्यानुसार १.३३ कोटी दर महिन्याला जे पाणी बिल येते. त्यातुन ५० लाख रूपये महानगरपालिकेने दर महिन्याला कोणत्त्याही परिस्थितीत एमआयडीसी ला दयायचे आहेत. असा निर्णय झाला होता. आमची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याने त्या निर्णयाची सुध्दा बरोबर अंमलबजावणी होत नव्हती. परंतु आम्ही आल्यानंतर आम्ही प्रयत्न केले की, एमआयडीसीचे पण पेमेंट आपण करावे त्यासाठी येथे वसुली अभियान चालविण्यात आले. मार्च पर्यंत जी वसुली झाली ती आहे २६ कोटी. व मार्च पासून आता पर्यंत ९.७० कोटी वसुली झालेली आहे. हे सविस्तरपणे सांगणे, मी यासाठी जरूरीचे समजतो की, एमआयडीसीच्या पेमेंटची कायदेशीर जबाबदारी जी शासनाने आमच्यावर टाकली आहे ती, महानगरपालिकेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. प्रत्यक्षात आज अशी परिस्थिती आहे की, एमआयडीसी सुध्दा आर्थिक संकटातून जात आहे. एमआयडीसी सुध्दा शासकिय संस्था आहे. आम्ही त्याचे पेमेंट केले नाही तर एक वेळ तर अशी आली होती की, त्याच्या कर्मचा-यांना पगार देण्यासाठी सुध्दा आमच्याकडे पैसा नव्हता. व नाईलाजाने त्यांना पाण्याची कपात करावी लागली. त्यावेळी आमचे महापौर, उपमहापौर, आढाव साहेब व आमच्या सर्व पक्षीय सदस्यांनी प्रयत्न करून त्यांना कन्वेंन्स करून त्यांनी आम्हाला काही सवलती दिल्या. ठिक आहे, आपण जे पैसे भरले नाहीत त्यापैकी कमीत कमी ६ कोटी आपण भरा. त्यानुसार आम्ही तत्काल त्यापैकी ५० टक्के रक्कम म्हणजे तीन कोटी रूपये आपण त्यांना दीले. त्यामुळे पाणी पुरवठा पुर्ववत झाला. त्यांनतर आपली आर्थिक परिस्थिती जेव्हा जेव्हा कमकुवत होत गेली तेव्हा लोकांना पीण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये. अशी भावना मनामध्ये ठेवून ५० लाख व चालु बिल जे आहे दिड कोटी...

अशा परिस्थितीत आम्ही हे पेमेंट दिले नाही तर त्याचे परिणाम काम होतील? त्याची जबाबदारी कुणावर राहील? मी आपणा सर्वांना विनंती करतो की आपण राजनैतिक प्रयत्न करावेत. एम.आय.डी.सी.जर आपणास (मोफत)निशुल्क पाणी पुरवठा करत असेल तर आपण सर्वांना पाणी बिल माफ करा, माझी त्यास काही हरकत नाही, परंतु हे बिल देणे आवश्यक आहे तर पैसा आणणार कुठून ? आपल्या प्रभागाचा प्रश्न आहे. खासदार निधीतून साडे बारा लाख खर्च झाला. दुसरा खर्च झाला पाईप लाईनचा ते नगरसेवक निधीतून झाले आहे. ३-४ लाखाचे त्याशिवाय मी आपल्या प्रभागात आपल्या गैरहजेरीत खुपसे दौरे केले आहे, घराघरात भेटलो आपणास माहित आहे. प्रयत्न आमचा हाच होता. भले एमआयडीसी तर्फे पाणी नाही देऊ शकत तर दुसरा उपाय आम्ही तिथे काय करू शकतो. तर आपण सल्ला दिला तिथे बोरवेल आहे. तिथे जेटपंप बसवून छोटीसी लाईन टाकून द्या. माझ्या मते असे छोटे छोटे दोन स्किम सुरू आहे. जर नाही सुरू तर बघु याव्यतिरिक्त टॅकरवर जो खर्च झाला त्यावर सविस्तर चर्चा झाली. आमचे खुप पैसे खर्च झाले. हि परिस्थिती मी आपल्यासमोर ठेवली आहे.

गेल्या १० वर्षात ज्यांना पाणी नाही मिळाले वा काही घटना स.सदस्यांनी सांगितल्या. पाणी मिळण्यासाठी लोकांना काय काय करावे लागले. काही अपघात घडले याची जबाबदारी कुणाची आहे. अपघात, अपघात आहे, अपघात वॉटर सप्लाय मध्ये टॅकरचा पण होऊ शकतो, अपघात माझ्या तुमच्या गाडीचा पण होऊ शकतो. ती जबाबदारी आम्ही कुणा एकावर नाही टाकू शकत. गोष्ट हि आहे की, आजच्या परिस्थितीत तुम्ही असे नाही म्हणू शकत की प्रशासनाने काही नाही केले हे तर आपण पण मान्य केले की काही तरी केले. प्रश्न आपला हा की, मागील जी बिले आहेत ती माफ करायची की नाही? आम्ही पुर्ण माहिती



सदनाला दिली आहे. आणि पाण्याची जी बेसिक ॲमिनीटी आहे ती सिटीजनला द्यायची आहे. यात जर एमआयडीसी कडून व शासनाने जर काही वेगळा निर्णय घेतला याने परिणाम वेगळे होतील हे मी मोठया विनम्राने सदनासमोर ठेऊ इच्छितो. आणि भावनेचा प्रश्न आहे. ज्यात आम्ही पण सामील आहोत. एक उदाहरण निर्माण केले तर पूर्ण शहरात कधी ना कधी पाण्याचा त्रास निर्माण झाला होता असे सर्व प्रभागाचे निरिक्षण करावे लागेल, करोडोचे लोकांना बिल माफ करावे लागेल हे आम्ही नाही करू शकत म्हणून माझी विनंती आहे. सदनाला या लक्षवेधीवर खुप चर्चा झाली आहे, माझी सदनाला विनंती आहे. असा ठराव पास करू नये.

<u>मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार :-</u> अंबरनाथचे पाणी पितात. तुम्हाला चांगले माहित आहे हे.

<u>मा.महापौर</u> :- वडोळ गांव उल्हासनगर महापालिकेचा हिस्सा आहे. तिकडे पाण्याची चणचण आहे, उल्हासनगरहून पाणी तिकडे जात नाही. हे पण खरे आहे.मी आश्वासन देतो सदनात वडोळ गावात पाणी.....

<u>मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार</u> :- आपण मागील सभेत पण असेच आश्वासन दिले आहे. आतापर्यंत आपण काय केले.

<u>मा.महापौर</u> :- काही वेळ तर लागेल ना?

<u>मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार</u> :- आपण एक पण लाईन टाकली का?

<u>मा.महापौर :-</u> याची व्यवस्था लवकर केली जाईल.

<u>मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार</u> :- आयुक्तांना आम्ही कितीदा बोललो आयुक्त म्हणतात, आमच्याकडे पैसे नाही आहे. आपण रिकव्हरी विषयी इतका विचार करता तर वडोळ गावात लाईन टाका. ते आजपण बिल द्यायला तयार आहेत.

<u>मा.आयुक्त</u> :-एकीकडे आपण म्हणता रिकव्हरी करू नका? एकीकडे म्हणता पाईप लाईन टाका.

<u>मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार</u> :- पाईप लाईन नाही दिली तर बिल कसे देणार लोक? आयुक्त साहेब, मी दोन मिनिट बोलू इच्छिते. आताच तुम्ही थोडया वेळापुर्वी सांगितले की, टाले साहेबाच्या प्रभागात १२ लाखाची लाईन दिली आहे. म्हणजे आतापर्यंत मदत केली आहे. तुम्ही पाण्याच्या लाईन टाकून वगैरे, पण हे सांगा तुम्ही वडोळ गावात तुम्ही किती लाईन टाकल्या? किंवा टॅकरचा किती खर्च झाला तुमचा वडोळ गावात सांगा?

<u>मा.आयुक्त :-</u> आपण आता स्पेसिफिक प्रश्न उपस्थित केला आहे. माझ्यासमोर, माझ्याकडे रेकॉर्ड नाही.

मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार :- रेकॉर्ड नसला तरी तुम्हाला चांगले माहित आहे. वडोळ गावात एक नगरपालिकेची लाईन नाही आहे, किंवा तिथे एकही पाण्याचा टॅंकर जात नाही. हे तुम्हाला चांगल्या प्रकारे माहित आहे. महापौरांना सुध्दा माहित आहे तर तिथे सुध्दा पाण्याची बिले आकारणार आहात का?

मा.आयुक्त :- प्रश्न तोच आहे सगळीकडे.



मा.सदस्या श्रीमती पंचशीला पवार :- प्रश्न तोच आहे कारण तुम्ही रिकव्हरीचे सांगीतले आहे. म्हणुन बोलावे लागते.

मा.आयुक्त :- वडोळचे लोक पाणी कुठून पितात? तुमची लक्षवेधी अशी आहे. पैसे वसुल करू नका, याच्यासाठी पैसा कुठून आणणार हे सांगा तुम्ही जरा?

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- मा.महापौर.

मा.महापौर :- टाले जी, आपल्या लक्षवेधीवर आयुक्तांनी उत्त्तर दिले आहे.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- त्यांच्या उत्त्तरावरच आम्ही बोलू इच्छितो, आयुक्तांनी साहेबांनी जे भाषण केले. मी मुददाम भाषण शब्द वापरतो. मला ते जरा राजकीय स्वरूपाचे वाटते. आयुक्तांनी आयुक्त म्हणून सांगितले असते तर मला जास्त बरे वाटले असते. आयुक्तांनी राजकीय भाषण केले आहे, आणि मी स्पष्टपणे सांगु इच्छितो की, इट इज द कोल्ड ब्लडेड मर्डर.

मा.महापौर :- कुणाचा मर्डर?

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- जनतेचा हा मर्डर आहे. जनतेच्या भावनांचा मर्डर केला आहे म्हणून मी महापौरांना विनंती करतो. आपण प्रथम महापौर आहात. तुम्ही ठराव मांडून पास करावा.

मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे :- मा.आयुक्त साहेब लोकांना भाषण नाही. राशन पाहिजे. पाणी पाहिजे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-मा.महापौर माझी विनंती आहे. प्रमोद टालेंचा जो प्रश्न आहे. सभापती पण वेळोवेळी सांगत असतात की, पाणी पुरवठयाच्या जी. आय.पाईप लाईन टाकणेसाठी २ करोडची तरतूद ठेवली आहे. जे पण लोक प्रभागात पाईप लाईन टाकू इच्छितात. आयुक्त साहेब, म्हणतात नगरसेवक निधीतून टाका. असे प्रभाग आहेत ज्यात पाण्याची चणचण आहे. तिकडे जर एखादी वेगळी लाईन टाकली. २ करोडच्या तरतूदीतून जसे सेवलमलचे आहे. नाका नं ११ ते ओटी पर्यंत एम.एस.लाईन टाकणे साठी वापरावे. जसा प्रमोद टालेचा प्रभाग आहे. नारायण पंजाबीचा आहे. त्यांच्या प्रभागात २४ लाख रूपयाचे टॅंकर्स येतात. लविना कुंदनानी चा प्रभाग आहे. तिकडे नेहमी १७ टॅंकर्स जातात. त्याचे पैसे पण महापालिका भरते. सगळयांचे नाव घेऊ. सुभाष मनसुलकर, तुलसी वसिटा, सुनिता बगाडे, ज्यांच्या ज्यांच्या प्रभागात त्रास आहे. व उल्हासनगर टॅंकर युक्त होवो. त्यांच्याकडे टॅंकरला लागणारा पैसा वाचेल, जे लाखो/करोड टॅंकरची बिले येतात, माझी विनंती आहे. अशा अशा प्रभागात लाईन टाकून द्याल तर आमच्या सदस्यांच्या प्रभागातून पाण्याचा प्रश्न सुटेल. आमचे सदस्य भगवान भांडे आहे. त्यांचे पण प्रभागात समस्या आहे. कुणी पण सदस्य असो यात पक्षपात नाही, प्रत्येक नगरसेवक ५ हजार लोकातून निवडून आला आहे. प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात पाणी बरोबर गेले पाहिजे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- बिलांचे काय करायचे?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- आयुक्त साहेब, टँकरचा जो पैसा आपण वाचवू इच्छिता. माझी अशी विनंती आहे की, अशा प्रभागात नवीन पाईप लाईन टाकून त्यांचा प्रश्न सोडवा. बिलांच्या बाबतीत जे कायदयात असेल. त्याप्रमाणे करावे आज कुणी पण व्यक्ती कसलीही मागणी करेल तर



शासनाकडे पण तो ठराव जातो. मग आपण असा एखादा ठराव पास केला जो कायदयाविरूध्द असेल ते शासनाला लिहितील हा ठराव रदद करा.

मा.आयुक्त :- सॉरी मध्ये बोलतो. एक गोष्ट सांगण्यास विसरलो. जेव्हा मी आजारी होतो तेव्हा सोनाळे साहेब गेले होते. मुख्यमंत्र्यांनी जी बैठक बोलावली होती. महाराष्ट्रातील आयुक्तांची, त्यात एक महापालिकेचा प्रस्ताव आला होता. त्यांनी एक ठराव करून पाठवला होता.मुख्यमंत्र्यांनी त्यावर टिका टिप्पणी करून सांगितले की, असे प्रस्ताव नाही आणले तर बरे होईल.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- अँज पर लॉ करा.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- महापौरांनी स्विकार केले आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- मला या गोष्टीचे दुःख होते की, लाल पंजाबीपेक्षा सिनियर इथे कुणी नाही आहे. जे पण कोर्टात निर्णय घेतात त्याची ते प्रत मागवितात. कायदा वाचत असतात. इकडे बरोबर मार्गदर्शन करा. नियम काय ते सांगा. सिनियर म्हणून....

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- ठराव महापौरांनी अँडमिट केले. आपण यावर काही नाही बोलू शकत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- आपण दिशाभुल करू नका. चांगला सदस्य या नात्याने मदत करा. धन्यवाद.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, ७ वाजता जर सभा संपवायची असेल तर आता संपवा. दुस-या दिवशी सभा ठेवा नाहीतर पूर्णपणे चालू द्या. काय निर्णय देता ते आधी सांगा.

मा.महापौर :- मी सदनाचे मत घेऊ इच्छितो जर सभा सुरूच ठेवायची असेल तर मी तयार आहे. पुर्ण अजेंडा संपवू या.

काही सदस्य :-ठीक आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ मागील सभेचे दि.२०.७.२००० चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- हा जो विषय आहे. इतिवृत्त कायम करण्याचा मागील सभेत जे ठराव मंजुर झाले. त्यात ८ अ ठराव एकमताने मंजुर झाला. जो शोक प्रस्ताव होता. ८ ब बहुमताने पास झाला. जो स्थगन प्रस्ताव होतो. नंतर यात ठराव क्र. ९ ते १४ पर्यंत जे ठराव पास झाले त्यात फक्त मंजुर लिहिले आहे. तर माझी विनंती आहे. ठराव जे असतात ते तर बहुमताने असतात किंवा एकमतानें पास होतात. इथे ९ ते १४ नंबर ठरावात फक्त मंजुर लिहिले आहे. ८ नंबर ठराव झाल्यावर ९ नंबर ठरावात आम्ही सर्व विपक्ष सदस्य उपस्थित असून देखिल ठरावात फक्त मंजुर लिहिले. आमची भुमिका मंजुर म्हणुन नव्हती. आपण मंजुर लिहिले. आमची मंजुरी नसुन देखील मंजुर लिहिले. बहुमताने मंजुर लिहिले पाहिजे होते. समर्थन आहे. तर एकमताने लिहायला पाहिजे होते. पण इथे ९ ते १४ पर्यंत जे ठराव

आहेत. आपण मंजुर लिहिले आहे. तर आम्हाला हे माहिती पाहिजे की, आम्ही उपस्थित होतो. आम्ही उपस्थित असून देखील ९ ते १४ क्र.ठरावांना आमची मंजुरी नव्हती. तरी पण आपण इथे मंजुर कसे लिहिले.



<u>मा.महापौर</u> :- तुम्हाला काय दुरूस्ता सुचवायच्या आहेत? सदनात ठराव पास करताना तो बहुमताने तरी पास होतो किंवा एकमताने तर तसे इतिवृत्तांत आले पाहिजे. हे मी मानतो जर त्यात काही चुकी झाली असेल तर.....

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-चुकी झाली तर काय चुकी झाली, ते सांगा आम्ही सदनात पूर्ण विरोधी पक्ष होतो. आमची संमती नव्हती. जर बहुमताने लिहिले असते तर आमची मत घ्यावी लागली असती. वोटींग व्हायला पाहिजे होती. एकमताने असते तर वोटींगची गरजच नसती. आयुक्तांकडून मला याबाबत माहिती पाहिजे की, कोणताही ठराव जर चुकीचा झाला तर शासनाकडे आपण पाठवता. ९ ते १४ क्र चुकीचे आहेत. फक्त यात मंजुर लिहिले आहे. सदनात उपस्थित असून देखील आमची मंजुरी नव्हती. एकतर आपण बहुमताने लिहा किंवा एकमताने.

<u>मा.महापौर</u> :- काही ठरावात आपण उपस्थित होता. काही ठरावात नाही. ज्या ठरावात आपण उपस्थित होता. तो ठराव बहुमताने लिहिले पाहीजे होते. जिथे आपण उपस्थित नव्हता. तिथे एकमताने लिहिले पाहिजे होता.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-मी तेच म्हणतो ९ नंबर ठरावात आम्ही उपस्थित नव्हतो, १० नंबर ठरावातून आपण पान नं ३६ पहा. इकडे लिहिले विपक्ष सदस्य सभागृहात आले व सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते. ९ नंबर ठरावात आम्ही उपस्थित नव्हतो पण १० नंबर ठरावापासून आम्ही उपस्थित होतो हे इतिवृत्तात आले आहे. ५. ३६ मिनिटांनी १० नं. ठराव सुरू होता. तेव्हा विपक्ष दलाचे सर्व सदस्य उपस्थित होते. ते सदस्य उपस्थित झाल्यानंतरही ठराव क्र.१० ते १४ आपण मंजुर लिहिले आहे. त्यासाठी आमची मंजुरी नव्हती. जर बहुमताने मंजुर लिहिले असते तर वोटींग घ्यायला पाहिजे होती. तर आमचा विरोध आला असता, आमची संमती असती तर एकमत आले असते. ठराव दोनच त-हेने मंजुर होतात. एकमताने किंवा बहुमताने आम्ही सदनात उपस्थित असून देखिल आपण ठराव ९ ते १४ मध्ये मंजुर लिहिले आहे. हे चुकीचे लिहिले आहे. आम्ही सर्व म्हणत होतो. आम्ही मंजुरी देत नाही. तर आपण मंजुर कसे लिहिता?

<u>मा.महापौर</u> :- मी तुमचे म्हणणे समजलो, पण मागील सभेचे माझ्या लक्षात नाही.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- आपण समजला ते नाही. आम्हाला या प्रश्नाचे उत्तर पाहिजे. इथे मंजुर लिहिले आहे. हे पहा या ठरावाची अंमलबजावणी व्हायची आहे. ठराव चुकीच्या पध्दतीने मंजुर नाही झाले पाहिजे. चुकीच्या पध्दतीने ठराव मंजुर झाले तर, आम्ही जिम्मेदार आयुक्तांना धरू जर चुकीच्या पध्दतीने ठराव मंजुर झाले. तर शासनाकडे त्यांनी लक्ष वेधले पाहिजे. सचिव साहेबांना मी विचारतो.

<u>मा.सचिव</u> :-त्या दिवशी अशी स्थिती होती की विपक्षाने सभा त्याग केला होता, नंतर विषय घेतले तर सत्ताधारी पक्षाचे जे सदस्य होते. त्यांनी थेट पास पास म्हणणे सुरू केले, एक दोन विषय झाल्यावर सभेत आपण प्रवेश केला. आपला विरोध हा होता की ,आपण असे असे पास का करीत आहेत तर जे ठराव या बोलण्यात झाले ते मा.पिठासिन अधिकारींनी आपल्या अधिकाराने जाहिर केले होते. मंजुर. आपला विरोध चालू होता, तर त्यावेळी चर्चेस आपणास अनुमती नव्हती व ना आपण वोटींगची मागणी केली. तर

सचिव या नात्त्याने मी एकमताने वा बहुमताने नाही लिहू शकत. हे फक्त पिठासीन अधिकारी जाहिर करू शकतात. त्यांना हे ठरवायचे आहे की, एकमताने का बहुमताने.



<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- आपण जे आता सांगितले ते साफ चुकीचे आहे. आपण म्हणालात २ ,३ , ठराव झाल्यावर आम्ही सदनात आलो. ८ वा विषय संपल्यावर ९ वा विषय वाचलाच गेला नाही. त्योवळी ५.३६ वा. आम्ही सभागृहात आलो. हे इतिवृत्तात आले. आपण म्हणाला की, विपक्षाने वोटींगची मागणी नाही केली. मला माहित होते की, आपण असेच म्हणणार पान नं.२९ वर काय लिहिले ते वाचा जरा. त्यात लिहिलें सत्ताधारी सदस्य पास पास असा आवाज देत होते. विपक्ष सदस्य हरकत घेत होते. पण विपक्ष पक्ष व सत्ताधारी पक्षांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते. हरकत घेत होते याचा अर्थ आमची इथे हरकत होती.

<u>मा.सचिव</u> :- आपली हरकत होती हे खरे आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- आम्हाला ही माहिती पाहिजे जे ठराव ९ ते १४ झाले ते आपण मंजुर लिहिले आहे. ते आपण मंजुर लिहिले आहे. ते एकमताने का बहुमताने?

<u>मा.सचिव</u> :- ते मा.पिठासन अधिकारी सांगतील.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- ते सांगतील तर बरे होईल.

<u>मा.महापौरः-</u>ज्या ठरावात आपण उपस्थित नव्हता, ते ठराव एकमताने झाले.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- ठराव ८ पर्यंत.

<u>मा.महापौर</u> :- आपण उपस्थित होता. तिथे हरकत घेतली. त्याशिवाय सत्ताधारी पक्षाची जी संख्या होती ती जास्त होती ते बहुमताने पास झाले.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-मा.महापौरजी ,सचिवांना मी हे विचारू इच्छितो ठराव कशा पध्दतीने पास करायचा? हे कोणत्त्या कायद्यात लिहिले आहे. आवाजी मताने होतात की मतदानाने होतात. जर महापौर म्हणतात, सत्ताधारी पक्षाची सदस्य संख्या जास्त होती. त्यास गृहित धरून पास केले. ती पध्दत आहे का इथे ठराव पास करायचा होता तर वोटींग घेऊन ठराव पास करायचा होता. महापौरांनी मत घेतले होते का त्यावेळी?

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- मा.महापौरजी,

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- आधि माझ्या प्रश्नाचे उत्तर देऊ द्या.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> :- हे ठराव आवाजी मतदानाने झाले होते.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-मा.आयुक्त साहेब, हे चालले आहे ते फार चुकीचे चालले आहे. याची शासनाकडे नोंद करावी लागेल.

<u>मा.महापौर</u> :-महाडिकजी, तुम्ही वोटींगची मागणी केली नव्हती.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- केली ना? इथे लिहिले आहे.

<u>मा.महापौर</u> :- नाही.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-मग इतिवृत्त चुकीचे आहे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- मा.महापौरजी यांनी जेव्हा मा.बाळासाहेब ठाकरे साठी स्थगन प्रस्तावात वोटींगची मागणी केली . ती तेव्हा वोटींग करण्यात आले. आपण वोटींगची मागणी ठरावात केलीच नाही. आपण सभा त्याग करून गेलात १० मिनिटासाठी. नंतर आम्ही प्रश्नोत्तर तास संपला म्हणून सरळ कार्यसुचीचे विषय घेतले. आम्ही पास म्हणालो. पिठासन अधिकारींनी जाहिर केले.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-पान नं २९ वाचा त्यात आपणास आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल त्यात स्पष्ट लिहिले विपक्ष सदस्य हरकत घेत होते. पण विपक्ष पक्ष व सत्ताधारी पक्षाच्या एकत्रित आवाजामूळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते, आपण असे नाही म्हणु शकत की, आपण मागणी नाही केली.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u> :-महापौरजी,...

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- कोण काय बोलत होते ते समजत नव्हते. आम्ही काही पण बोललेले समजत नव्हते. व आम्ही हरकत घेत होतो हे स्पष्टपणे आले आहे. मी मानतो पिठासन अधिकारीस सभा चालविण्याचा अधिकार आहे. पण त्याबरोबर पिठासन अधिकारीस नियमानुसार सभा चालविण्याचा अधिकार आहे. आपण नियमानुसार सभा नाही चालवत.

<u>मा.महापौर</u> :- असे नाही आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- ठराव क्र.९ ते १४ मंजुर करता तर आम्हाला हे पाहिजे की एकमताने मंजुर करता की बहुमताने.

<u>मा.महापौर</u> :- आपण हरकत घेतली होती पण आपण वोटींगसाठी बोललाच नाहीत.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- इथे लिहिले कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.महापौर</u> :- आपण वोटींगसाठी कधीच नाही म्हणालात जर बोलला असता तर आमची काय हरकत नव्हती.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-इथे लिहिले विपक्ष सदस्य हरकत घेत होते. पण कोण काय बोलतो ते समजत नव्हते. म्हणजे आम्ही बोलत होतो पण तुम्हाला समजत नव्हते इथे लिहिले.

<u>मा.महापौर</u> :- ते इतिवृत्त लिहिणा-यांना समजले नसेल.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- मा.सचिव आयुक्त साहेब हे ठराव चुकीचे आहेत. यावर अंमलबजावणी नाही झाली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u> :- मा.महापौर स.सदस्य महाडिक म्हणतात ते खरे आहे. पण यांनी वॉक आऊट केले. त्यावेळी १० मिनिटात सर्व ठराव पास झाले, नंतर इथे आले.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-आपण जे म्हणता ते खरे आहे का? सचिवांना विचारा सचिव साहेब आढाव साहेब म्हणतात ते खरे आहे का? सर्व ठराव पास झाल्यावर आम्ही आलो का आधी.

मा.सचिव :-१० व्या ठरावात आलात जे इतिवृत्तात लिहिले ते बरोबर आहे.

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर:- सचिवांना मी विचारू इच्छितो, हे किती मिनिटासाठी सभा त्याग करून गेले.

मा.सचिव :- १० मिनिटासाठी.

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :- आले दोन मिनिटात.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-असे कोणत्त्या कायदयात लिहिले आहे की, सदस्य सभागृहात उपस्थित नाही राहत. लहान मुलासारखे बोलतात. त्यांना सांगा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-डायरेक्ट रिले, व टेपरेकार्ड मध्ये पण नाही आले की यांनी वोटींगची मागणी केली.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-जे ठराव झाले आहे ते एकमताने किंवा बहुमताने मंजुर झाले पाहिजे.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-मा.महापौरजी, महाडिकजी, सेवलमल एक सेकंद.....

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-आम्हाला माहित होते असे होणार म्हणून आधीच विचारून घेतले.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-मा.महापौर ज्या त-हेने सभा सुरू आहे. म्हणजे आपण मला ४ दा बोलण्याची अनुमती दिली आहे. आणि कोणी न कोणी मध्ये उठून बोलतो. कृपया निवेदन करतो.....

मा.महापौर:- ही आजची लोकशाही आहे.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-त्या दिवसाच्या सभेत मी उपस्थित नव्हतो. ज्या दिवशी ९ ,१०व्या ठरावात विपक्ष सदस्य हरकत घेत असताना पण मंजुर झाले, पण या सर्व घटना घटतात कशा? ही समस्या निर्माण होते की, प्रस्ताव कसा पारित झाला? बहुमताने का एकमताने हयाचे कारण हे की, जेव्हा पण विपक्ष सदस्य बॉयकॉट करतात. सत्ताधारी पक्ष फायदा घेतात, विपक्ष दरवाज्यापर्यंत पोहोचला नाही तोपर्यंत सत्ताधारी पक्ष विषय न वाचता सर्व विषय पास करतात. कोणताही विषय वाचल्याशिवाय पास करता येत नाही. हा नियम आहे. विषय आधी वाचला तर पाहिजे मग पास म्हणावे. दुसरे लोकशाहीत विपक्ष पक्षास बायकॉट करण्याचा अधिकार आहे. एखाद्या विषयावर तसेच दुस-या विषयावर येऊन चर्चा करण्याचा पण अधिकार आहे. सत्ताधारी पक्ष ती संधी पाहून पूर्ण फायदा घेऊन विषय पास करतात. हि पध्दत बंद झाली पाहिजे. अशी समस्या निर्माण होऊ नये म्हणून यावर अंकुश लावावा.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-ठरावाचे काय करता आपण? ठराव जर मंजुर आहेत तर बहुमताने मंजुर आहेत की एकमताने ते सांगा. जेव्हा पासून नगरपालिका अस्तित्वात आली. जितके ठराव पास झाले, ते बहुमताने तरी



झालेत किंवा एकमताने तरी मागील महासभेत ९ ते १४ नंबर जे ठराव पास झाले. ते ठराव बहुमताने पास झाले का एकमताने याचे उत्तर दया.

मा.महापौर :-जे ठराव आपल्या गैरहजेरीत आले......

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-नाही. आम्ही सदनात हजर होतो. इथे लिहिले आहे ५३६ वा.आम्ही आलो. १० नंबर ठराव चालू असताना आम्ही आलो असे स्पष्ट लिहिले आहे.

मा.महापौर :-मी काय म्हणतो जे ठराव आपल्या गैरहजेरीत झाले एकमताने मंजुर झाले. जे आपल्या उपस्थितीत आम्ही ठराव आणले ते बहुमताने झाले.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-असे कसे ? वोटींग घेतल्याशिवाय होऊ शकते का? याबाबत सचिवांकडून माहिती पाहिजे की वोटींग न घेता बहुमताने ठराव पास होऊ शकतो का? मला याचे उत्तर पाहिजे. १९ नं पेजवर लिहीले. हरकत घेतली म्हणून मा.आयुक्त साहेब या विषयावर तुम्हाला शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल.

मा.महापौर:-सुभाषजी,

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-आयुक्त साहेब तुम्हाला या विषयावर बोलावे लागेल.

मा.महापौर :-मिनिटस् पास......

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-पास.पास....

सर्व सत्ताधारी पक्ष सदस्य पास पास ओरडत होते.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-आमचा विरोध आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-नाही चालु दयायची सभा.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-मा.महापौरजी, ही सभा चालू ठेवण्याची पध्दत नाही आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :-पास.पास.....

सत्ताधारी सदस्य :-पास. पास.......

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे / मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-लोकशाहीचा खुन केला. महापौरांनी यांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही.

इकडे विपक्ष सदस्य महापौरांच्या मंचाजवळ येऊन महापौराशी बोलत होते.

मा.महापौर :- आपण यावर मतदान करू इच्छिता.



इकडे विपक्ष व सत्ताधारी सदस्य मंचाजवळ येऊन एकत्रित आवाजात बोलत होते.

श्री.राजेंद चौधरी यांनी कॅमरावर हात भिरकावला असता.

मा.महापौर :-असे नका करू नुकसान होईल भरून द्याल का?

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-होऊ द्या. महापौर निधी आहे ना?

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-कॅमरा भिरकावला त्यांना सस्पॅन्ड करा.

मा.महापौर :-असेंब्लीत भरून दिले होते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-इथे पण भरून देतील.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-पहले चिटींग बंद करा.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-महापौर काही ॲक्शन नका घेऊ.आम्ही आपसातच आहेत.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-तुम्ही जे म्हणाल ते मंजुर आहे.

मा.सचिव :- कृपया लक्ष द्या. आमचे मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकनी जे दोन प्रश्न उपस्थित केले. त्यांचे हे म्हणणे आहे. ठराव दोन त-हेचे असतात. एकतर बहुमताने किंवा एकमताने. ठराव जेव्हा होतो तेव्हा कुणाची काही हरकत नसते, तेव्हा एकमताने घोषित केले जाते. जेव्हा बहुमताने होतो तेव्हा मतगणना होते. मत घेतले जाते. त्या आधारावर मतगणना केली जाते. दुसरा नियम असा आहे. नियमावलीतील नियम १ (प)पहा. मा.पिठासन अधिकारींनी घोषित केले की, रिझोल्यूशन इज कॅरीड थ्रु की ठराव पारित करीत आहे. असे जाहीर करतात तर त्या स्थितीत एकमताने बहुमताने लिहिणे कठीण आहे. आपण जर म्हणता की घोषित करा. एकमताने का बहुमताने तर त्यादिवशी जी आपली हरकत होती. या त-हेने ठराव पास करू नये. आता आपण म्हणता आपल्या उपस्थितीत जो ठराव पास झाला त्यास बहुमताने पास करा तर याचा अर्थ आपला पिठासन अधिकारीच्या घोषणेस पाठिंबा आहे. त्यावेळी आपली इच्छा पाठिंबा देण्याची नव्हती तर आपण ठराव पास होताना हरकत घेत होता की, पास पास म्हणत आहात. सर्व चुकीचे आहे. आता आपण म्हणता एकमताने किंवा बहुमताने घोषित करा. जर बहुमताने जरी केले तर याचा अर्थ आपले पिठासन अधिकारींच्या घोषणेवर समर्थन होते. म्हणुन मी कायदयान्वये मंजुर मंजुर लिहिले. ॲज पर द डिक्लेरेशन ऑफ द हॉनेबेल प्रेसायडींग ऑफीसर.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-म्हणुन मी विचारू इच्छितो पिठासन अधिकारी सभागृहाचे मत लक्षात न घेता. कोणताही ठराव आपल्या मर्जीने पारीत करू शकतात का?

मा.सचिव :- नियमावलीतील नियम १ (प)पहा त्यात स्पष्ट लिहिले आहे. ठिक आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-मा.महापौरजी, मी वाचतो नियमात स्पष्ट लिहिले आहे की....

--५०--

इकडे परत सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते. यात स्पष्ट लिहिले आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक:-एखादा प्रस्ताव पारीत झाला आहे. असे अध्यक्ष स्थानी असलेल्या प्राधिका-याने केलेली घोषणा आणि एखादा प्रस्ताव पारीत झाला आहे अशी अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याने केलेली घोषणा

आणि कार्यवृत पुस्तकात तशा अर्थाची केलेली नोंद ही अशा घोषणेच्या वेळी कमीत कमी चार पालिका सदस्यांनी मतदानाची मागणी केली नाही तर, त्या वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असेल, मग अशा प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरूध्द देण्यात आलेल्या मतांची संख्या सिध्द करण्याची आवश्यकता असणार नाही. आम्ही विपक्ष सदस्य २९ नं पेजवर स्पष्ट लिहिले आहे. हरकत घेत होते. आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.महापौर</u> :- आपण शेवट पर्यंत वोटींग घ्या असे म्हणाला नाहीत.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-एक मिनिट.

<u>मा.महापौरः-</u> आधी माझे ऐका. आम्ही बहुसंख्य होतो, त्यात भाजपाची सभा असल्यामुळे ते सदस्य गैरहजर होते.मी वोटींगसाठी का नाही म्हणेन?

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः-</u>ठीक आहे, मा.सचिव साहेब, विपक्ष सदस्य जर १० आहेत. तर मतदान नाही होत का? एक सदस्य जरी असेल. इतर सर्व सत्ताधारी सदस्य असतील तरी वोटींग होते असे नाही की सर्व सत्ताधारीचे सदस्य जास्त म्हणून वोटींग नाही.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :-हे पहा, मा.बाळासाहेब ठाकरे अटकेच्या निषेध प्रस्तावात आपण वोटींग म्हणाला होतो तेव्हा घेतली.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-मा.महापौर, आपण म्हणता आम्ही वोटींगसाठी बोललो नव्हतो. ते आपण कसे समजलात कारण यात स्पष्ट लिहिले, विपक्ष सदस्य काय म्हणत होते ते समजत नव्हते. जे आम्ही बोललो ते तुम्हाला कसे समजले इतिवृत्त लिहिणा-यांना नाही समजले तर आपणास कसे समजले?

<u>मा.महापौर</u> :-एक गोष्ट लक्षात ठेवा. मी लोकशाहीवर विश्वास ठेवतो. आय एम द फर्स्ट बिलिव्ह इन डेमोक्रेसी ॲण्ड डेमोक्रेटिक नॉर्मस. ॲण्ड द लास्ट पर्सन टू डू दॅट. जेव्हा इथे आमची मॅजोरीटी आहे, आम्ही वोटींगला का नाही म्हणणार?

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिकः-</u>मा.आयुक्त साहेब, हा विषय आम्ही तुमच्यावर सोपवतो. विषय क्र.९ ते १४ या ठरावाची जर अंमलबजावणी झाली. तर आमच्या विपक्ष पक्षाचा त्याला विरोध आहे, या बाबत तुम्ही शासनाला कळवून काय तो निर्णय घ्यावा अशी विरोधी पक्षाची विनंती राहिल. मा. आयुक्त साहेब यांनी गटनेत्याचा भत्ता असाच मंजुर केला नंतर तुम्ही शासनाला कळवून रदद केला. ठरावाची अंमलबजावणी करण्याची घाई झाली तर त्याला जबाबदार तुम्ही राहाल कारण की, तुम्ही शासनाला कळविले पाहिजे की, सर्वानुमते किंवा बहुमताने न लिहिता मंजुर फक्त लिहिले आहे. आमची तुम्हाला विनंती आहे. विपक्षातर्फे शासनाकडे या ठरावाबाबत तुम्ही विचारणा करावी. पेज नं ३ वर लिहिले आहे. आपली लक्षवेधी व इतरांनी लक्षवेधी दिली आहे. ती आम्ही प्रश्नोत्तरे झाल्यावर वाचू व नंतर निर्णय घेऊ.



आपणच बोललात पान नं १७ काढा. तिकडे लिहिले आहे. प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. सचिव साहेब विषय क्र.२ वाचा. आपण महापौर आहात सभेच्या नियमानुसार कारभार चालला पाहिजे. <u>१/२</u> तास पुर्व सभेच्या सुरवातीचे जे आपण आश्वासन दिले की, लक्षवेधी घेऊ पण पान नं १७ वर आपण लगेच विषय क्र.२ घेतला हि कोणती पध्दत आहे. आपण बोलता व आपणच नियम तोडता.

<u>मा.सचिव</u> :- मी स्पष्टीकरण देतो.

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-नाही. महापौर बोलले त्यांनीच सांगावे.सचिव नाही बोलले. महापौरांना जर अडचण आहे तर त्यांनी सचिवांना सांगावे. महापौर बोलले. सचिवांना उत्तर दया तर मंजुर आहे. पण थेट सचिवांनी उत्तर देऊ नये.*

*<u>मा.महापौर</u> :-५ लक्षवेधी होत्या. ३ लक्षवेधी सत्ताधारी पक्षाच्या होत्या. ती त्यांनी मागे घेतली. २ विपक्षाचे होते आपण नव्हता म्हणून....*

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-नाही असे नाही, आपण प्रश्नोत्तर तास संपल्यावर लक्षवेधी विषयी माहिती दयायला पाहिजे होती. आम्ही २ विपक्षाची लक्षवेधी दाखल केली आहेत. ते उपस्थित नाही म्हणून घेत नाही. सरळ २ नं विषय सुरू केला.*

*<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- साधी गोष्ट आहे. महापौरजी.....*

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-सरळ म्हणालात विषय क्र.२ घ्या.नियमाप्रमाणे प्रश्नोत्तरानंतर लक्षवेधी आली पाहिजे. आपणास काही येत नाही. सचिव सांगतात, वकील सांगतात.*

*<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- साधी गोष्ट आहे. महाडिक म्हणतात की प्रश्नोत्तरानंतर लक्षवेधी यायला पाहिजे होती. विथड्रा झाली तरी अडचण नव्हती. जर लक्षवेधी नाही टाकली तर आता टाकून घ्या. यात अडचण काय आहे? महापौरांनी तीन लक्षवेधी विथड्रा झाल्याची घोषणा व दोन लक्षवेधी विपक्ष सदस्य उपस्थित नव्हते. हि केलेली घोषणा याचा विषय क्र.२ च्या आधी आता समावेश करून घ्या . यात अडचण काय आहे?*

*<u>मा.महापौरः-</u> हे इतिवृत्तात नाही आले त्यात समाविष्ट करून घेता येईल.*

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-लिहून टाकणार हि चुक झाली होती. मा. आयुक्त ठराव ९ ते १४ वर तुमचे मत पाहिजे.*

*<u>मा.सचिव</u> :-एकमताने ना? इतिवृत्त पास.*

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:-इतिवृत्त एकमताने नाही आमचा विरोध आहे.*

*<u>मा.सचिव</u> :- बहुमताने ना.*

*<u>काही सदस्य</u> :- पास.*

*--५२--*

*<u>मा.महापौर</u> :-सदरचे इतिवृत्त श्री.लाल पंजाबी यांनी सुचविलेल्या लक्षवेधीच्या घोषणेबाबतचा समावेश करून दुरूस्ती सह सदरचे इतिवृत्त बहुमताने कायम करण्यात येत आहे.*

*<u>मा.सचिव</u> :-विषय क्र.३ वाचुन दाखवितात.*

*<u>काही सदस्य</u> :- पास.*

*<u>मा.महापौरः</u>- एकमताने ना? सदरचा प्रस्ताव एकमताने पारीत करण्यात येत आहे.*

विषयः- शिक्षक दिवस समारंभाबद्दल पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीच्या दि.१०.८.२००० रोजीचा ठराव क्र.४ कायम करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण समिती दरवर्षी ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

सालाबाद प्रमाणे यावर्षी शिक्षण समिती तर्फे 'शिक्षक दिन' महापालिकेच्या मालकीचे असलेले क्रिडा संकुल व्ही.टी.सी मैदान येथे दिनांक ५ सप्टेंबर २००० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता साजरा करण्याचे योजीले आहे.

शिक्षक दिना निमित्ताने महापालिकेच्या प्राथमिक शाळे मधील सेवानिवृत्त झालेले शिक्षक, कार्यरत शिक्षक तसेच शिक्षण समिती तर्फे आयोजित केलेल्या अंतरशालेय क्रिडा स्पर्धा महोत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यास शहरातील विविध माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षण देणा-या शिक्षकांनी सहकार्य केले त्यांचा शिक्षक दिना निमित्ताने सत्कार करणे.

उपरोक्त कार्यक्रम राबविण्यासाठी निमंत्रण पत्रिका, शाल, श्रीफळ,गुलाब फुले, हार, गुलदस्ते, कापडी नाम फलक, स्टेज, मंडप खुर्च्या,साऊंड सिस्टम, लाईट सिस्टम, पाणी पिण्यासाठी ग्लास, अल्पोहार, चहा, फोटोग्राफर, फॅन,इत्यादी साठी.

सदर कार्यक्रम राबविण्यासाठी रूपये ७५,०००/- अंदाजित खर्च असुन उपरोक्त येणारा खर्च महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'अ' अंदाजपत्रक लेखाशिर्ष सी. ५ उपशिर्ष (२)माध्यमिक शिर्षक या शिर्षाच्या खाली केलेल्या २० लाख रूपये तरतुदी मधुन करावयाचा आहे.

उपरोक्त खर्च अंदाजित केलेला आहे. प्रत्यक्ष दर पत्रके मागवून खर्च निश्चित केला जाईल.

तरी शिक्षक दिन निमित्त होणारा अंदाजित खर्च रूपये ७५,०००/- (रूपये पंच्याहत्तर हजार) खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.



पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती ठराव क्र.४ दि :-१०.८.२०००

सुचकाचे नावः- श्री.सुभाष मनसुलकर.

अनुमोदकाचे नावः- श्री.जमनादास पुरस्वानी.

हि पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती वरील प्रस्तावने अनुसार दिनांक ५.९.२००० रोजी मा. महापौरांच्या अध्यक्षते खाली 'शिक्षक दिन' समारंभ आयोजीत व कार्यान्वीत करणेस तसेच अनुषांगिक कार्यक्रम व खर्च रूपये ७५,०००/- यास महासभेच्या अधिन राहून मान्यता देत आहेत.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**एकमताने मंजुर**

सभापती / पिठासीन अधिकारी
पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती
उल्हासनगर महानगरपालिका.

---

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१५** **दिनांक** :-१८.८.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीचा दिनांक १०.८.२००० रोजीचा ठराव क्र.४ कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**एकमताने मंजुर**

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका.

--५४--

**मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक** :-शिक्षकाची गरज आहे शहराला?

**मा.सचिव** :-विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

**काही सदस्य** :- पास.

**मा.महापौर** :-एकमताने ना? आता वारंवार विचारावे लागेल. सदरचा प्रस्ताव एकमताने पारित करण्यात येत आहे.

**विषय :-** श्री. उमेश कर्तार रामसिंघानी सहाय्यक नियंत्रक व श्री मोहनदास धनश्यामदास भाटिया मिस्त्री / बीट इन्स्पेक्टर उल्हासनगर महानगरपालिका यांचे विरूध्द लाच लुचपत प्रतिबंधक कायदान्वये प्रस्तावित अपराधासाठी खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना:-

ज्याअर्थी, उमेश करतारसिंग रामसिंगानी, हे सन १९७१ ते दिनांक २८.११.९६ पर्यंत सहाय्यक नियंत्रक / अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग, म्हणून उल्हासनगर नगरपालिका /महानगरपालिका येथे सरकारी नोकर म्हणून काम करीत होते. तसेच मोहनदास घनश्यामदास भाटिया हे १९९० ते दिनांक २८.११.९६ पर्यंत बीट इन्स्पेक्टर, अतिक्रमण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका येथे सरकारी नोकर म्हणून काम करीत होते म्हणुन ते भा.द.वि.स. सन १८६० चे कलम २१ व लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम २ (क)प्रमाणे सरकारी नोकर आहेत व सदर कालावधीत त्यांनी शासकीय नोकर म्हणून काम करीत असताना खालील प्रमाणे गैरकृत्य केलेले आहे. ज्याअर्थी फिर्यादी श्री.सुभाष अप्पाजी खैरे, तत्त्कालीन पोलीस उप-अधिक्षक ॲन्टीकरप्शन ब्यूरो, ठाणे यांनी चौकशी अंती उपलब्ध साक्षीदारांच्या जबाबावरून व कागदोपत्री उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून दिनांक २८.११.९६ रोजी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे सरकार तर्फे फिर्याद दाखल केलेली आहे. सदर गुन्हयातील आरोपी १ श्री. सन्मुख उर्फ अन्नू ग्यानचंद मनवानी, २. श्री मनोहर गोविंदराम कामरा ३. श्री.गिरधारी उर्फ गिधु रतनमल सचदेव ४. श्री.लक्ष्मण भिकचंद कटारीया ५. श्री.चोईथराम जेठानंद रोहीडा ६. श्री.मनोहर ग्यानचंद मनवानी, ७ श्री विजय सचानंद ठकरानी, ८ श्री.भागीरथ गोविंद तुमडे, तहसिलदार व विशेष अधिकारी अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभाग, उल्हासनगर नगरपालिका / महानगरपालिका , ९. श्री उमेश करतारसिंग रामसिंगानी, सहाय्यक नियंत्रक, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग, उल्हासनगर नगरपालिका / महानगरपालिका १०. श्री प्रेम श्रीधर पालकल (खाजगी इसम)यांनी एप्रिल १९९३ ते १९९५ या कालावधीत प्लॉट नं.७०५, सीट नं. ६१, उल्हासनगर.२, जिल्हा ठाणे या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी राखुन ठेवलेल्या जागेपैकी १६० ग ५० फुट लांबी रूंदीचे जागा अनधिकृत बळकावण्याच्या इरादयाने व महाराष्ट्र शासनाचे नुकसान व्हावे व आप-आपला व एकमेकांचा आर्थिक फायदा व्हावा, या इरादयाने गुन्हेगारी स्वरूपाचा कट करून सदर कट तडीस नेण्यास एकमेकांस बेकायदेशिरपणे मदत करून, व सहाय्य करून सदर जागे बाबतचे बनावट व बेकायदेशीर कनव्हेन्स डीड तयार करून ते खरे असल्याचे भासवून सदर बनावट कागदपत्रांचा वापर करून आरोपी श्री. मनोहर कामरा व गिरधारी सचदेव व श्री. सन्मुख मनवानी यांनी सदर ठिकाणी एप्रिल १९९३ ते डिसेंबर १९९३ या कालावधीत मनोहर बिल्डर्स या नावाची फर्म भागीदारी असल्याचे दर्शवून सदर फर्मच्या नावे



सचदेव कॉम्पलेक्स , या नावाची एक तळमजला अधिक तीन माळयाची, आठ हजार शंभर चौरस फुट क्षेत्रफळाची आर.सी.सी. इमारत बांधून त्यातील दुकानाचे गाळे विकून आपला आर्थिक फायदा करुन घेवून महाराष्ट्र शासनाचे नुकसान केले आहे. त्याप्रमाणे सदर कटाचे अनुषंगाने बांधण्यात येणारी इमारत नगरपालिकेने तोडु नये म्हणून श्री. मनोहर कामरा व तसेच श्री. विजय ठकरानी व मनोहर मनवानी यांचे नाव दिवाणी न्यायालय, उल्हासनगर व ठाणे येथे दिवाणी दावे दाखल करुन तसेच सदर बनावट कन्व्हेन्स डीडचा पुरावा म्हणून वापर करुन जे खरे असन्याचे भासवून यातील आरोपी श्री. मनोहर कामरा व त्यांचे दोन भागीदार यांनी बेकायदेशीरपणे मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे सदर कटाचे अनूषंगाने यातील आरोपी श्री. सच्चानंद ठकरानी तसेच मनोहर मनवानी यांनी सदर 'सचदेव कॉम्पलेक्स' या इमारतीशी त्यांचा कोणताही मालकी हक्क अथवा संबंध नसतांना सदर ''सचदेव कॉम्पलेक्स'' ही इमारत नगरपालिकेने तोडु नये व सदर इमारत बांधणारे त्याचे नातेवाईक श्री. सन्मुख मनवानी व त्यांचे भागीदार यांचे आर्थिक नूकसान होऊ नये या उददेशाने न्यायालयात दिवाणी दावे दाखल

करून त्यांना बेकायदेशीरपणे मदत केलेली आहे. सदर दाव्यामध्ये न्यायालयाने दिनांक १४.२.९५ रोजी दिलेला स्थगीती आदेश उठविल्यानंतर उल्हासनगर नगरपालिकेचे कायदा अधिकारी, श्री. प्रकाश कुकरेजा यांनी दिनांक १४.२.९५ रोजी मुख्याधिकारी , उल्हासनगर नगरपालिका यांचे नावे पत्र देवून सदर दाव्यातील मनाई हुकुम काढुन टाकण्यात आल्याने सदर अनाधिकृत बांधकामाविरुध्द नगरपालिके मार्फत कायदेशीर कारवाई करता येईल असे कळविले. त्यावरून उल्हासनगर नगरपालिकेचे उप मुख्य अधिकारी, श्री. जेसाराम थदानी, यांनी दिनांक १९.२.९५ रोजी उल्हासनगर नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख म्हणुन काम पहाणारे, श्री. भागीरथ गोविंद तूमडे, तहसिलदार व श्री. उमेश करतारसिंग रामसिंगानी , सहाय्यक नियंत्रक, अतिक्रमण विभाग, यांना सदर बेकायदेशीर बांधकाम दिनांक २०.२.९५ पर्यंत पाडून टाकण्याबाबत लेखी कळविले होते, मात्र यातील आरोपी श्री. भागीरथ तुमडे, तहसिलदार व उमेश रामसिंग्रानी , सहाय्यक नियंत्रक, अतिक्रमण यांनी सदर अनाधिकृत बांधकाम पाडण्याबाबत हेतुपुरस्कर कोणतीही कारवाई केली नाही. व शासकीय नोकर म्हणुन आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार न पाडता भ्रष्टाचारी मार्गाने व इतर आरोपीतांना मदत करून त्यांना शासकीय नोकर म्हणुन मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचारी मार्गाने एकमेकांस सहाय्य करून इतर आरोपीतांना बेकायदेयशीरपणे व भ्रष्टाचारी मार्गाने मदत करून आपापला आर्थिक फायदा करून घेतला असल्याचे व महाराष्ट्र शासनाचे नुकसान केल्याचे निष्पन्न झालेले आहे, त्याचप्रमाणे 'सचदेव कॉम्पलेक्स' या इमारतीच्या उत्तर बाजूस असलेल्या सरकारी मालकीच्या जागेवर यातील आरोपी श्री. प्रेम श्रीधर पालकर यांनी २५ ग १५ फुट क्षेत्रफळाच्या जागेवर उल्हासनगर नगरपालिकेकडुन बांधकामाची कोणतीही परवानगी न घेता एक अधिक दोन माळयाची 'क्षमा टावर्स' या नावाची इमारत अनाधिकृतपणे अतिक्रमण करून बांधून सदर जागा स्वतःच्या निवासस्थानासाठी व व्यवसायासाठी वापरून तसेच काही गाळे इतर व्यक्तींना विकून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच सदर डेव्हलपमेंट प्लान प्रमाणे ८० फुट रुंदीकरणासाठी दर्शविण्यात आलेल्या सार्वजनिक रोडसाठी आरक्षित असलेल्या शासकीय जागेवर वर नमूद आरोपितांना वर नमुद केल्याप्रमाणे सचदेव कॉम्पलेक्स व क्षमा टावरर्स या इमारती अतिक्रमण करून अनाधिकृत पणे बांधल्याने महाराष्ट्र शासनाचे ९,४३,४९०/- रुपयांचे नूकसान केल्याचे निष्पन्न झाले आहे सदर गुन्हयातील खाजगी इसम आरोपी यांचे विरुध्द तसेच सरकारी नोकर असलेल्या आरोपी श्री.भागीरथ गोविंद तुमडे, तत्कालीन तहसिलदार (सदया मयत) उमेश करतार रामसिंगानी, तत्कालीन सहायक नियंत्रक अतिक्रमण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे विरुध्द त्यांनी वर नमूद



केल्याप्रमाणे गुन्हे केल्याबाबत भरपूर पूरावा तपासात निष्पन्न झालेला आहे. सदर गुन्हयातील सरकारी नोकर असलेल्या आरोपीतांनी बेकायदेशीर व भ्रष्टाचारी मार्गाने व लबाडीने सदर खाजगी इसम आरोपीयांना सहाय्य केलेले आहे. तसेच सदर गुन्हयाचे तपासाबाबत श्री. मोहनदास धनश्यामदास भाटिया, बीट इन्सपेक्टर यांनी एम.आर.टी.पी. ॲक्टप्रमाणे फक्त श्रीमती शांतीबाई परशुराम मुनियाल, यांचेविरुध्द उल्हासनगर पोलिस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नं. १७३/९३ एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम ४९ न्वसार गुन्हा दाखल केलेला आहे. वास्तविकता सचदेव कॉम्पलेक्स या इमारतीचे बांधकाम १) श्री. मनोहर गोविंदराम कामरा २) श्री. गिधु उर्फ गिरधारी रतनमल सचदेव, ३) श्री. सन्मुख अन्नु ग्यानचंद मनवानी, या तिघांनी केलेले असतांना त्याकडे हेतुपुरस्कर व जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून सदर तिघांना एम.आर.टी.पी. ॲक्ट अन्वये दाखल केलेल्या गून्हयात श्री. मोहनदास घनश्यामदास भाटिया, बीट इन्सपेक्टर, उल्हासनगर नगरपालिका, यांनी त्यांचे अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करून आरोपी केले नाही व त्यांनी बांधलेली वर नमूद इमारत पाडणेबाबत हेतुपुरस्कर कारवाई केली नसल्याचे तपासामध्ये निष्पन्न

झालेले असून त्याबाबत त्यांचेविरुध्द भरपूर पुरावा तपासात निष्पन्न झालेला आहे.

ज्याअर्थी,उल्हासनगर पोलिस स्टेशन,गुन्हा रजिस्टर नंबर टी कलम१२०(ब)१०९ ,२०२ ,४६५ ,४६६ ,४६७ ,४६८ ,४७१ ,४७७(अ) ,४२० , ४४७ तसेच लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १३(१)(क)(ड)सह १३(२)प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयाच्या तपासाचे कागदपत्राचे अवलोकन व खात्री करुन वरील कृत्यामुळे प्रस्थापित होणा-या गुन्हयासाठी श्री. उमेश करतारसिंग रामसिंगानी, सहायक नियंत्रक अतिक्रमण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे व इतर आरोपीचे विरुध्द सार्वजनिक न्यायाच्या हिताच्या दृष्टीकोनातून सक्षम न्यायालयात खटला भरावयास पाहिजे व सदर खटला दाखल करणेकरीता न्यायाधिशांना दख्खल घेणेकरीता लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (क) प्रमाणे मंजूरीची आवश्यकता आहे. सदर गुन्हयाचे तपासाचे कागदपत्र सर्वसाधारण सभा, उल्हासनगर महानगरपालिका यांचे समोर ठेवण्यात आले आहे व सदर गुन्हयाचे कागदपत्रावरुन त्यातील आरोपी श्री. उमेश करतार रामसिंघानी , सहायक नियंत्रक व श्री. मोहनदास घनश्यामदास भाटिया, बीट इन्सपेक्टर, उल्हासनगर नगरपालिका, यांनी वर नमुद केल्याप्रमाणे गुन्हे केल्याचे प्रर्थम दर्शनी दिसून येत आहे, म्हणून त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात खटला भरणेसाठी लागणा-या परवानगी मिळणेस मंजूरीस प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र :- १</u>६ दिनांक :- १८.८.२०००

सुचकाचे नाव :- श्री. रामभाऊ आढाव

अनुमोदकाचे नाव :- श्री. पांडुरंग लांडे

हि महासभा वरील गुन्हयाचे संदर्भात श्री.उमेश करतारसिंग रामसिंगानी, सहायक नियंत्रक, अतिक्रमण विभाग व श्री. मोहनदास घनश्यामदास भाटिया, मिस्त्री / बिट इन्सपेक्टर,उल्हासनगर महानगरपालिका यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेतून काढून टाकणेस सक्षम आहे. त्याप्रमाणे या महासभेस अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. म्हणून श्री. उमेश करतारसिंग रामसिंघानी, सहायक नियंत्रक, अतिक्रमण विभाग व श्री. मोहनदास घनश्यामदास भाटिया, मिस्त्री / बिट इन्स्पेक्टर , उल्हासनगर महानगरपालिका यांच्यावर नमूद केलेल्या कृत्यांमुळे प्रस्तावित होणा-या



अपराधांसाठी भा.द.वि.संहिता कलम १२०(ब)१०९ ,२०२ ,४६५ ,४६६ ,४६७ , ४६८ ,४७१ ,४७७(अ)४२० ,४४७ तसेच लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चें कलम १३, (१)(क) (ड) सह १३ (२) प्रमाणे सक्षम न्यायालयामध्ये खटला भरण्यासाठी मंजूरी देत आहे.

तसेच सदरच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेले संपूर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहित असून संबंधित प्राधिका-यांना मंजूरीचे आदेश कळविणे ही त्यांची जबाबदारी राहिल.

सूचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सहि</u>-

<u>एकमताने मंजूर</u>

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

<u>सत्ताधारी सदस्य</u> :- पोस्ट पॉन्ड.

<u>मा.महापौर :-</u> तुमचा विचार काय?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- आपण विषय रदद का करीत आहात?

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-हा विषय कुणी आणला?

<u>मा.महापौर</u> :- मी माहिती देतो.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :-अचानक या विषयाला पोस्टपॉड का करीत आहात, आम्हाला काय पाहिजे ते जाणुन घ्यायचा इथे प्रश्नच नाही. आयुक्तांनी हा विषय आणला तुम्ही ठेवला.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-आयुक्त साहेब, तुम्ही सांगा ना?

<u>मा.आयुक्त</u> :- मेसर्स. उत्तम इंजिनियरींग कंसंल्टंसीची मुदतवाढ देण्यासाठी हा ठराव आणला होता. यांच्यासाठी ९६ ला जो ठराव झाला होता यांना जितके काम दिले ते काम शहर अभियंतानी पूर्ण करून घ्यावे. असा निर्णय ९६ ला झाला. ते दोन मिनिटात वाचतो. द म्युनिसिपल इंजिनियर डायरेक्टेड टू युटीलाईज द सर्विसेस ऑफ इंजिनियरींग कंसल्टंसी ओनली फॉर द वर्क एस्टिमेंट टू विच ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲन्ड फायनानशियल सेंशन ग्रॉटेड बाय द जी.बी. फॉर व्हीच अपुवल फॉर कंसल्टसी सर्विसेस ऑलसो बियिंग ऑबटेन फॉम द जी.बी. जे पण उत्तम कंसल्टंसीला काम दिले आहे ते महासभेच्या



परवानगीने ठरावाने जी कामे त्यांनी हातात घेतली आहे. जसे आपणा सर्वांस माहित आहे. याच महासभेत एक ॲन्टी ग्रॅटेड रोड डेव्हलपमेंट प्रोग्राम ३३ रोडचे सेंशन केले. ते इन प्रोग्रेस आहे. या करिता उत्तम कंसल्टंसीची गरज आम्हाला आहे. हा प्रस्ताव पण उशीर झाला आहे. कारण या ठरावाच्या बाबतीत जेव्हा आम्ही चर्चा केली हे स्पष्ट नव्हते की,एक्सटेंशन साठी फॉर्मल गरज आहे का? जेव्हा आम्ही याबाबत लिगल ओपिनियन घेतले तर लिगल ओपोनियनमध्ये पण एक स्पेसिफिक ठराव नाही आहे. कधी मुदत संपते काही लिहिले नाही. तरी पण शहर अभियंतानी चर्चा करावी असे लिगल ओपीनियन त्यांनी दिले. मी अधिका-यांशी विचार विमर्श केले, आणि माझे हे मत आहे. व विनंती आहे की, जे काम हाती घेतले ते पूर्ण करण्यासाठी उत्तम इंजिनियर कंसल्टंट एक सक्षम संस्था आहे. प्राकलनास ३ टक्के ने काम करते, ९६ पासून ते आजपर्यंत जी पण कामे आम्ही त्यांच्यावर सोपविली. त्यांनी जबाबदारीने पार पाडली. जो काही विलंब झाला तो अतिक्रमण विभागामुळे झाला आहे. किंवा रिहॅबिलेशन मध्ये कायदयाची पण अडचण आली म्हणून झाले वा पावसामुळे झाले. त्यांच्याकडून कोणतीही अडचण वा अडथळा प्रशासनास आला नाही. यांचे काम पाहून आपण जे महासभेत काम मंजुर केले. बी.एम.आर.डी.चे मोठे प्रोजेक्ट लोनसाठी पाठविले होते. त्यातही उत्तम कंसल्टरची चांगली भुमिका होती. त्यांनी जिथे जाऊन

रेल्वे ओवर ब्रिज व ३३ रोडचे बी.एम.आर.डी ला जे तांत्रिक समाधान दयायचे होते ते दिले. ऑबार्जवेशन क्यूरी याबाबत महत्त्वपूर्ण भुमिका निभावली आहे. आता पण जे त्यांचे काम सुरू आहे. त्याने प्रशासन समाधानी आहे. म्हणून माझी विनंती आहे की, यामध्ये ठराविक मुदत नसली तरी मुदत द्या. या ठरावाला पास करावा. कायद्याने काही अडचण येणार नाही या ठरवास पारीत करावे हि विनंती आहे.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> महापौरजी, आयुक्तांनी जे सफाईदार भाषण केले. उत्तम इंजिनियरिंग साठी पण आमचे हे म्हणणे आहेकी, उत्तम इंजिनियरिंग ने जे पण काम केले ते निकृष्ठ दर्जाचे आहे, त्या कामाचे काही महत्त्व नाही. यात-हेने काम केले आहे. त्या कामांना इतका उशीर झाला. हददी बाहेर शहराचे रोड पहाल तर पावसात पूर्ण उखडले जातात. नगरसेवक इथे बसले आहेत ते जाऊ शकत नाही. असे काम केले. आता जे दगड टाकली त्यात वाळूचा कण नाही आहे. ते आणून दाखवतो. पहा किती निकस पध्दतीने काम केले आहे. व उशीर केला म्हणून आमचे म्हणणे आहे. त्याला हटवावे कारण शहराचे महानगरपालिकेते शहाडपर्यंत जो रोड जातो. मी आयुक्तांना व महापौरांना विनंती करू इच्छितो की कमिटी नेमावी. व ते काम तपासावे की कशा त-हेने उत्तम इंजिनियरींगचे ठेकेदार काम करीत आहेत. ते, बरोबर नाही. कसे होत आहे पहा. टर्निंग पाईंट ते गोल मैदान रस्ता असाच आहे. हे पण रोड चेक केले जावे. मी तर २ रोड सांगत आहे. अशा त-हेने इतर रोड असतील व जो स्लॅब टाकला जातो. त्याला जर लाथ मारली तर तुटून जाईल. असा टाकला निकस काम केले आहे. म्हणून सदनाला विनंती की, त्यांचा ठराव मंजुर करू नये त्यांना काढून टाकावे.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर</u> :-( मेयर साहेब) मा.महापौर, आयुक्त साहेब सदस्य जेव्हापासून ३३ रोड घेतले बनवायला. १ ,२ , रोड तयार झाले जे बॅ. नं.१९१७ इथे आहे. नेताजी ते स्मशानभुमी पर्यंत जो रस्ता जातो तो पण ९० ते ८० टक्के तयार झाला आहे. आणि दुसरे ५ नं ते इकडून यावे लागते. २५ सेक्शन ते मानेरा गाव, औद्योगिक क्षेत्रापासून ते रोड पण ५० ते ६०टक्के तयार झाले आहेत. सदनाला विनंती आहे की, ५० ते ६० टक्के रोडचे काम होत आले आहे. आता कुणाचे म्हणणे आहे की., रोड उखडत आहे. लाथ मारली तर वाळू , खडी दिसुन येते. एका वर्षात यांनी कधी पत्र



दिले का? असे ओसवालाचे काम आहे. जे सदस्य म्हणतात काम बरोबर नाही त्यांनी कधी लिखित दिले का सदनात?

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> दिले आहे.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर</u> :- दाखवा, सदनात बसले तर सर्व भाऊ, भाऊ आहोत. दाखवा नुसते बोलण्याच्या गोष्टी आहेत. आज रोड पूर्ण व्हायला आले आहेत.

<u>मा.महापौर</u> :- सेवलमलजी.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत न्हवते.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर</u> :- बोलू द्या मला तुम्ही बोलत असताना मी मध्ये बोललो नव्हतो. दिवाळी जवळ येत आहे. आता ओसवालना काढणार तर असा कोणता आर्किटेक्ट आणणार? कुणी डमी आर्किटेक्ट आणणार जो सर्वांना गुडघे टेकवायला लावेल असा माणुस पाहिजे. हि रिस्क कोण घेणार?

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- दिवाळी आहे ना? शहरात काम पूर्ण झाले पाहिजे.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर :- मग सांगा ना. कुणाला देणार आता?

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- निविदा मागवू या.

मा.महापौरः- सेवलदासजी बसा.

मा.सदस्य श्रीमती.जया साधवानी :- महापौरजी,

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर :- आमची विनंती आहे की, ३३ रोड पूर्ण होईस्तोपर्यंत ओसवाल कडेच काम असू दया. कमिटी बनवून लवकर रोड पूर्ण करा.

मा.महापौर :- ठिक आहे.

मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर :- काही चुकी असेल तर समिती नेमुन तपासून घ्या. आमचे शहर अभियंता काय करतात.त्यांना सांगा, ज्यू, इंजिनियर किंवा इतर कुणाचा पत्ता नाही. महानगरपालिकेत जर कुणी काम करत असेल तर त्याला करू द्या ना. आमची विनंती आहे त्यांना ३३ रोड पूर्ण करून द्या.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- महापौरजी, आज जे उत्तम इंजिनियरिंग विषयी चे मत दिले, प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा हक्क आहे. मोरे साहेबांनी नाराज नाही झाले पाहिजे, वैयक्तिक मत देणे हे प्रत्येकाचा अधिकार आहे. ते आपल्या विरोधात नव्हते बोलत आपले मत मांडत होते. उत्तम इंजिनियरींग यांना ४ वर्षापूर्वी इथे कंसल्टंट म्हणून नेमण्यात आले होते. आज जो हा मुददा आला त्यासंबंधी काही विचार केला नाही की, त्यांनाच ठेवायचे का निविदा मागवायच्या ते ३० टक्के घेतात. कुणी १ टक्के पण
घेईल. तर त्याकरिता सर्वांचे मत एक झाले पाहिजे व शहर अभियंता व लेखा विभागा चे काय म्हणणे आहे हे सर्व लक्षात घेऊन सर्व संमतीने सभा



बोलवून कोणताही निर्णय घ्यावा. कारण मार्च ते ऑगस्ट पर्यंत त्याला अजुन कामाचे आदेश नाही दिलेत. आयुक्त साहेब म्हणाले का विलंब झाला आहे. तर मार्च मध्ये त्यांची मुदत संपली आहे, तर विषय डिफर करून हा विचार ठेवला कि निविदा मागवाव्या का? त्यांनाच ठेवावे असे पण आर्किटेक्ट आहेत जे उल्हासनगर शहरासाठी फी ऑफ चार्ज काम करण्यास तयार आहे. काही कंसल्टंट असे आहे. जे म्हणतात शहराच्या विकासासाठी, भल्यासाठी मोफत सेवा देऊ.

काही सदस्य :- कोण आहेत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- आपण चिंता करू नका. आपल्याला त्यांचे नाव माहित आहे. आपण खुश व्हाल तर शहर अभियंता आहेत. भिवापूरकर कार्यकारी अभियंता आहेत, उप अभियंता आहेत. इंजिनियर आहेत. मुकादम आहेत. आपल्या कडे पण तांत्रिक ज्ञान असणारे कर्मचारी आहेत. ६० ते ७० टक्के काम झाले आहे. आपला कर्मचारी वर्ग इतका सक्षम आहे की, जे पण उरलेले काम करवून घेऊ शकतो. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे, पैसे कुणाला द्यायला नाही. कंसल्टंटपण ओरडतो की, मला कंसल्टंट म्हणुन ठेवले पण आजपर्यंत पैसे नाही दिले, जर आपण पैसा पण नाही देऊ शकत, तर सर्व यया गोष्टी लक्षात घेऊन निविदा मागविल्या तर

परत कोर्टात जातील. हे सर्व लक्षात घेऊन यावेळी डिफर करावे नंतर विचार विमर्श करून सभेत आणावे.

मा.महापौरः- ठीक आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानीः- मा.महापौरजी जसे किशोर वनवारी म्हणाले की या विषयाला डिफर करावे तर आमचे पण मत आहे डिफर करावे.

मा.महापौर :- यावेळात त्याची सर्व्हिसेस कंन्टीन्यू राहतील एका महिन्यासाठी.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हे आम्हाला विचारणे चुकीचे आहे. व तो मार्च पासून काम करतो ते आम्हाला विचारून करतो का?

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- डिफर मिन्स कंटीन्यूव ना?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- महापौरांनी निविदा मागविल्यातर त्यांना मार्च नंतरचे पेमेंट देण्यात येणार नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानीः- टेंडर नाही मागविले जात, काही निर्णय नाही घेतला जात तर डिफर विथ कंन्टीन्यू करा.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- कंन्टीन्यू करा.

मा.महापौर :- आयटम इज डिफर बट इटस् सर्व्हिसेस व्हील कंन्टीन्यू स्टील वुई टेक अ डिसिजन.

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यात येत आहे.

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभागात सध्या कार्यरत असलेले मेसर्स. उत्तम इंजिनियर कन्सल्टंसी प्रा.लि. स्थापत्त्य सल्लागार यांना मुदत वाढ देणे बाबत.

--६१--

मा.सचिव :- कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जन गण मन हे राष्ट्रगित म्हटल्यानंतर महापौरांनी ८.०० वाजता सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१८.९.२०००.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८.९.२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १८.९.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्री.भुल्लर राजेंद विरसिंह
४ श्रीमती. सोनावणे यमुना शालिग्राम
५ श्रीमती. ज्योती कालानी
६ श्री.ढेणवाल बनावारी सुआलाल
७ श्री.उमाप रामदास
८ श्रीमती.वेलकर सुरेखा राजन
९ श्री.यादव नरेश फेकु
१० श्री. सोनावणे राजु रामभाऊ
११ श्रीमती. दासानी मिनु राज
१२ श्रीमती. पवार पंचशीला
१३ श्री. टाले प्रमोद
१४ श्री. आढाव रामभाऊ
१५ श्रीमती. बगाडे सुनिता
१६ श्री.भांडे भगवान बाबु
१७ श्री.ठाकुर सेवलदास
१८ श्री.बनवारी किशोर
१९ श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई
२० श्री.प्रमनानी ईश्वर
२१ श्रीमती.बसीटा बेबी
२२ श्री.चौधरी राजेंद्र
२३ श्री.लांडे पांडुरंग
२४ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२५ श्री.मोरे भानजी भिकाजी
२६ श्रीमती. राजवानी सुनिता
२७ श्री.पुरस्वानी जमनादास
२८ श्री.वाधवा गिरधारी
२९ श्री.पारवानी रामचंद
३० श्री.विनोद तलरेजा
३१ श्री.रोहडा श्यामसुंदर
३२. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३३ श्रीमती.करोतिया मालती
३४ श्री.बेहरानी ठाकुरदास
३५ श्री.मोरे भिमसेन
३६ श्री.चव्हाण रमेश
३७ श्री.महाडिक प्रकाश
३८ श्री.भाटीया जयप्रकाश
३९ श्रीमती.बनवारी मोना
४० श्रीमती.जेस्वानी आशा
४१ श्री.राजानी नरेंद्र
४२ श्री.मनसुलकर सुभाष
४३ श्रीमती.नाईक यशस्विनी
४४ श्रीमती.राजानी भारती
४५ श्रीमती.इंदिरा भठिजा
४६ .श्री.केणी जयकुमार
४७ श्री.प्रम्मीकुमार अचनानी
४८ श्रीमती.वारिंगे पन्ना
४९ श्री.राधवानी आशा
५० श्री.माखिजा प्रकाश
५१ श्री.जग्यासी राजु.
५२ श्री.बेहरानी गोप
५३ श्री.किशनानी गोदुमल
५४ श्री.पंजाबी लाल
५५ श्री.केसवानी किशोर

१. श्री.गणेश चौधरी  २ श्री.वाघे शामु,३ श्रीमती. मोकल सीमा ४. श्री.तेजी कैलाश ५ श्रीमती.रूपचंदानी भगवंती ६.श्री.खेमाणी देवेंद्रसिंह ७ श्री.वारिंगे पंढरीनाथ ८. श्रीमती.टेकचंदानी चंद्रा ९ श्री.जाधव सुरेश, १० श्रीमती. साधवानी जया, ११ श्रीमती.कुंदनानी लविना १२ श्रीमती. वलेचा पदमा, १३. श्रीमती.गजवानी कांता, १४ श्री.पंजाबी नारायण, १५ श्री.आयलानी कुमार, १६.श्री.रामरख्यानी मोहनदास, १७ श्री.सचदेव गिरधारी, १८. श्रीमती.जोनिता मटाई हे सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्वप्रथम वंदेमातरम् म्हणून सभेची सुरूवात ४.४० वाजता करण्यांत आली.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर</u> :-मा.महापौर, जसे आपणास माहित आहे. गुरूवारी मा.आयुक्त यांच्या मातोश्रीचे निधन झाले.त्यासाठी आपण सर्वांनी त्यांना श्रध्दांजली अर्पित करावी.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- मा.महापौर, माझी अशी विनंती आहे की, आमच्या मा.आयुक्तांच्या मातोश्रीना दोन मिनिटे श्रध्दांजली वाहिल्या नंतर आजच्या कार्यसुची वरील प्रश्नोत्तरे विषय पुढच्या सभेत घेण्यात यावा व इतर विषय आजच घेऊन सभा संपवावी. कारण आज कोणताही विशेष असा विषय नाही आहे. एकच विषय आहे गणेशोत्त्सवाबाबत तो घेऊन कार्यसूची संपवावी ही विनंती.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> मा.महापौर, हा जो प्रस्ताव आला आहे. आयुक्तांच्या मातोश्रीचे निधन झाल्याने श्रध्दांजली वाहणे बाबत याच्याशी आम्ही सहमत आहेत. परंतु एक तर पूर्ण पणे सभा घ्या किंवा स्थगित करून पुढच्या वेळेस घ्या. एकाचवेळी दोन गोष्टी नाही करू शकत की सभा चालवावी आणि नाही पण. एकच काही तरी ठरवा. जर आजचे सभेचे मत लक्षात घेवून सभा स्थगित करत असाल तर आमची पूर्ण सहमती आहे. परंतु अर्धवट कार्यसूचीचे विषय घेण्यात येवू नये. त्याने हेतु सिध्द होत नाही. सभा पूर्णपणे स्थगित करावी. भले आठ-दहा दिवसांनी ठेवावी. यावर आमची काही हरकत नाही सहमती आहे.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u> :- मा.महापौरजी, जसे किशोर वनवारी म्हणाले, तशी सभा चालविण्यात काही अर्थच नाही. कोणतेही विषय नाही घेतले पाहिजे. श्री.लाल पंजाबीनी जी सुधारीत विनंती केली की, सभा पूर्णपणे स्थगित करून पुढच्या वेळेस ठेवा. आठ दिवसानंतर विशेष सभा म्हणून घेतली तरी चालेल. हि सभा स्थगित झाली पाहिजे. अर्धवट सभा घेवून काही फायदा नाही. आपले उद्दीष्ट साध्य होणार नाही. आम्ही आमच्या आयुक्तांच्या दुःखात सहभागी आहोत. सभा स्थगित झाली पाहिजे.

<u>मा.महापौर</u> :- मी समजतो पूर्ण सभागृहाचे असे मत आहे की, मा. आयुक्तांच्या मातोश्रींना श्रध्दांजली अर्पित केल्या नंतर आजची महासभा पूर्णपणे स्थगित करावी. म्हणून उपस्थित सर्व सन्माननिय सदस्यांना माझे निवेदन आहे की, आयुक्तांच्या मातोश्रींना श्रध्दांजली अर्पित केल्यानंतर सभा पूर्णपणे स्थगित करून ४ ऑक्टोबर ला ठेवावी.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- नो प्रॉब्लेम काही हरकत नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-स्थगित केलेली सभा पुढच्या महिन्यात पण घेऊ शकतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-मा.महापौर साहेब, या महिन्याच्या शेवटी सभा घ्या.

मा.महापौर :- हे पहा, मोरे साहेब मी चार तारखेला मुद्दाम सभा ठेवत आहे. चार तारखेला शुभदिवस आहे. त्या दिवशी सभा ठेवतो. तसेच पूर्व नगरपालिका व महापालिकेचा कर्मचारी श्री.चेतन मदनानी कित्त्येक वर्षापासून कार्यरत होते त्यांचे पण अचानक निधन झाले आहे. त्यांना पण श्रध्दांजली देण्यात येईल. या सभेला श्रध्दांजली वाहिल्यानंतर स्थगित करण्यात येईल.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

शोक प्रस्ताव

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त श्री.आर.डी.शिंदे यांच्या मातोश्री श्रीम. तुळसाबाई दगडु शिंदे यांचे गुरूवार दि.१४.९.२००० रोजी निधन झाले.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या विधी विभागात कार्यरत असलेले शिपाई श्री.चेतन मदनानी यांचे शनिवार दि.१६.९.२००० रोजी अकस्मित निधन झाले.

सदर कुटूंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांच्या आत्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६ अ. दि.१८.९.२०००

सुचकांची नावे :- १) श्री.सेवलदास ठाकुर.

२) श्री.सुभाष मनसुलकर.

अनुमोदकांची नावे :- १) श्री.पांडुरंग लांडे.

२) श्री.प्रकाश माखिजा.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती.तुळसाबाई दगडु शिंदे व श्री.चेतन मदनानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करित आहे.



तसेच मृत व्यक्तीच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करित

आहे.

सुचकांच्या स्वाक्ष-या/- १)

२)

अनुमोदकांच्या स्वाक्ष-या/- १)

२)

एकमताने मंजुर

महापौर/पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.महापौर :- सदरची सभा स्थगित करून ४ ऑक्टोबरला सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात येईल.

जन गण मन हे राष्ट्रगित म्हटल्यानंतर महापौरांनी ४.५० वाजता सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-४/१०/२०००.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.४/१०/२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची दिनांक १८/९/२००० रोजीची सभा स्थगित कलेली सर्वसाधारण महासभा दिनांक ४/१०/२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
४ श्री.वाघे शामु बाबु
२५ श्रीमती.टेकचंदानी चंदा
२६ श्री.पुरस्वानी जमनादास

५ श्रीमती.सोनावणे यमुना
६ श्री.ढेणवाल बनवारी सुआलाल
७ श्री.उमाप रामदास राघोजी
८ श्रीमती. वेलकर सुरेखा
९ श्री.यादव नरेश
१० श्री.सोनावणे राजु
११ श्रीमती पवार पंचशिला
१२ श्री.टाले प्रमोद
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्रीमती.बगाडे सुनिता
१५ श्री.भांडे भगवान
१६ श्री.बनवारी किशोर
१७ श्री.तेजी कैलाश
१८ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
१९ श्रीमती.मटाई जोनिता
२० श्री.चौधरी राजेंद्र
२१ श्री.लांडे पांडुरंग
२२ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२३ श्री.मोरे भानजी
२४ श्री.वारिंगे पंढरीनाथ
२७ श्री.पारवानी रामचंद्र
२८ श्री.तलरेजा विनोद
२९ श्री.रोहडा श्यामसुंदर
३० श्री.जाधव सुरेश
३१ श्री.मोरे भिमसेन
३२ श्री.चव्हाण रमेश
३३ श्री.महाडीक प्रकाश
३४ श्रीमती.साधवानी जया
३५ श्री.राजानी नरेंद्र
३६ श्री.मन्सुलकर सुभाष
३७ श्रीमती.राजानी भारती
३८ श्रीमती.बलेचा पदमा
३९ श्रीमती.गजवानी कांता
४० श्री.केणी जयकुमार
४१ श्री.पंजाबी नारायण
४२ श्री.आयलानी कुमार
४३ श्री.अचनानी पम्मीकुमार
४४ श्रीमती.वारिंगे पन्ना
४५ श्री.माखिजा प्रकाश
४६ श्री.रामरख्यानी मोहनदास
४७ श्री.जग्यासी राजू
४८ श्री.सचदेव गिरधारी
४९ श्री.पंजाबी लाल
५० श्री.केसवानी किशोर



१. श्री.गणेश चौधरी २.श्रीमती. मोकल सीमा ३ श्रीमती.ज्योती कालानी , ४. श्रीमती.दासानी मिनु ५ श्री.ठाकुर सेवलदास ६.श्रीमती.रूपचंदानी भगवंती ७ श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई , ८. श्री.प्रमनानी ईश्वर ९ श्रीमती.बसीटा बेबी. १० श्रीमती.राजवानी सुनिता ११ श्री.वाधवा गिरधारी १२ श्री. गुप्ता प्रभुनाथ १३. श्रीमती.करोतिया मालती १४ श्री.बहरानी ठाकुरदास १५ श्री.भाटीया जयप्रकाश, १६ श्रीमती.बनवारी मोना १७.श्रीमती.जेस्वानी आशा १८ श्री. नाईक यशस्विनी, १९ श्रीमती.कुंदनानी लविना, २०. श्रीमती.भाठिजा इंदिरा २१ श्रीमती.राघवानी आशा, २२ श्री.बेहरानी गोप, २३. श्री. कृष्णानी गोदुमल हे सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्वप्रथम वंदेमातरम् म्हणून सभेची सुरूवात ४. ५० वाजता करण्यांत आली.

<u>मा.सदस्य श्रीमती. जया साधवानी</u> :-मा.महापौर, आमचे सदस्य श्री. नारायण पंजाबी जे अतिक्रमण विभागाचे सभापती आहेत. त्यांचे मोठे भाऊ श्री.प्रताप सन्मुखदास पंजाबी यांचे अचानक २२ सप्टेंबरला निधन झाले. ते कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते होते व कॉंगेस कार्यकारिणीचे जनरल सेक्रेटरी पण होते. माझे निवेदन आहे. आपण सर्वांनी त्यांना श्रध्दांजली अर्पित करावी.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

<u>शोक प्रस्ताव</u>

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगर नियोजन व विकास समितीचे विद्यमान सभापती श्री.नारायण पंजाबी यांचे जेष्ठ बंधु श्री,प्रताप सन्मुखदास पंजाबी यांचे दि.२२ सप्टेंबर २००० रोजी अकस्मीत निधन झाले. ते उल्हासनगर कॉग्रेस कमीटीचे सरचिटणिस होते. उल्हासनगर मधील कॉग्रेसचे जेष्ठ नेते होते.

त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६ ब    दिनांकः-४/१०/२०००.

सुचकाचे नाव :- श्रीमती. जया साधवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.कुमार आयलानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.प्रताप सन्मुखदास पंजाबी यांच्या निधनामुळे दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पीत करित आहे.

--३--

तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होवून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवा अशी प्रार्थना करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.१ प्रश्नोत्तरे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- मा.महापौर,प्रत्येक सभेत लाइव्ह टेलिकास्टची परमिशन दिली जाते. आज ते दिसत नाही. आपण बंद केले का परमिशन देणे? काय केले याचा जरा खुलासा करा.

मा.महापौर :- मोकळेपणाने सांगतो. मला माहित पण नाही, आज ते का नाही आल? सचिवांच्या म्हणण्यानुसार नवरात्र उत्सव पूर्ण शहरात चालू आहे. सर्व व्हिडिओ शुटींग वाले त्यात गुंतले आहेत. ते खुप बिझी असल्यामुळे इकडे येवू शकले नाहीत.

मा.सचिव :- प्रश्न क्र.४८६ श्रीमती.पन्ना वारिंगे यांचा आहे.

प्रश्न क्र.४८६ :-द रिटनिंग वॉल टू बी कंन्स्ट्रक्टेड फॉर द ड्रेन सिच्युऐटेड ॲट हॅप्पी होम ॲन्ड कुमार सोसायटी डिस्पाइट माय रिमाइंडरस्. डेटेड ऑन १५.११.९९ अदर ऑन २५.२.९९ थर्डली ऑन २९.३.९९ ॲन्ड लास्टली ऑन १५.११.९९ द वॉल हॅज नॉट यट बीन कंन्स्ट्रक्टेड हु वील बी रिस्पॉन्सीबल इफ द बिल्डिंग कोलेप्सेस् ड्यू टू द सिपेज?

उत्तर :- बिल्डिंगस् हॅपी होम ॲन्ड कुमार सोसायटी कंन्स्ट्रक्टेड ऑन ड्रेन साईड आर इलिगल. नोटीस हॅज बीन इश्युड टू द ओनर्स ऑफ हॅपी होम बिल्डिंग फॉर ऑबटेनिंग द स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट फॉम द आर्किटेक्ट वाईड दिस ऑफिस लेटर नंबर.यु.एम.सी/ इन्क्रोचमेंट :यु-१/९२ डेटेड २६.४.९९. इट इज नॉट अ रिस्पॉनसीबिलीटी ऑफ म्युनिसिपल कार्पोरेशन टू प्रोटेक्ट द अनऑथराईज्ड प्रायव्हेट बिल्डिंग इफ द बिल्डिंग कोलेप्स ड्यु टू सिपेज इट वील बी द रिस्पॉनसीबीलीटी ऑफ द बिल्डिंग ओनर. इट इज द रिस्पॉनसीबीलीटी ऑफ बिल्डिंग ओनर टू प्रोटेक्ट हिज बिल्डिंग.

मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगे :- सर्वात प्रथम हॅपी बर्थडे टू उप-महापौर मि. धनंजय बोडारे. (मा.सदस्य श्री.पंढरीनाथ वारिंगे यांनी पुष्पगुच्छ देऊन उप-महापौरांचे अभिनंदन केले)



माझा प्रश्न रिर्टनिंग वॉल संबंधी आहे. जो हॅप्पी होम व कुमार सोसायटीच्या मध्ये आहे. त्यामध्ये एक मोठा नाला आहे जो आमचे महापौर व माझ्या प्रभागाला जोडून आहे. हॅप्पी होम इमारतीच्या बाजुला जी भिंत आहे तिला खुप भेगा पडल्या आहेत, आपण जे उत्तर दिले आहे ती अनाधिकृत इमारत आहे म्हणुन आपण काही करू शकत नाही. माझे निवेदन आहे की माझा प्रश्न चालु असताना कोणा सदस्यांना जर काही सल्ले दयायचे असतील किंवा त्यांच्या प्रभागात जर अशी काही समस्या असेल तर माझा प्रश्न संपल्यावर त्यांनी सल्ले दयावेत म्हणजे मी पण ऐकू शकेल व दुस-यांनाही समजेल. आपण यात लिहिले आहे की,बिल्डीगस् हॅपी होम ॲन्ड कुमार सोसायटी कंन्स्ट्रक्टेड ऑन ड्रेन साईड आर इललिगल आहे. नोटीस हॅज बीन इश्युड टू द ओनर्स ऑफ हॅपी होम बिल्डिंग फॉर ऑबटेनिंग द स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट फॉम द आर्किटेक्ट मी एकुण तीन अर्ज यासंबंधी दिले आहेत. आधी शुळ साहेब होते नंतर श्री.काळे. नंतर प्रभारी आयुक्त श्री.जोगळेकर होते. श्री.चिजवानी व श्री.ढाकरे या सर्वांनी तिकडे येऊन पहाणी केली आहे. त्यांचे पण हेच मत होते की, तिथे कंन्स्ट्रक्शन वॉल बांधणे जरूरी आहे. तरीही आपण हे लिहून दिले आहे की, इमारत अनाधिकृत असल्यामुळे आम्ही भिंत बांधून देणार नाही. मला हे समजत नाही की, इमारत जर अनाधिकृत आहे तर तुम्ही तोडणार का? माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? कोणता अधिकारी माझ्या प्रश्नाचे उत्तर देत आहे? हे उत्तर कोणी दिले?

*श्री.भिवारपूरकर (कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-* अनाधिकृत इमारत जी आहे.

*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-* मला ऐकू येत नाही.

*श्री.भिवारपुरकर (कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-* अनाधिकृत इमारत तोडण्याचे काम अतिक्रमण विभागाचे आहे.

*मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगे* :-अनाधिकृत आपण कोणाला म्हणता? इथे तर ९० टक्के इमारती अनाधिकृत आहेत. सांगा कोणाकडे कंप्लीशन सर्टीफिकेट आहेत.

*श्री.भिवारपूरकर (कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-*ओरिजनल नाल्यावर त्यांनी इमारत बांधली आहे.

*मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगे* :-ओरिजनल नाल्याच्या एका बाजुला भिंत आहे. कुमार सोसायटीच्या बाजुला भिंत तुटलेली आहे मी आपणास ड्रेनेज तुटले आहे असे सांगितले. मी हे नाही बोलले की, अनाधिकृत इमारतीत एखादी भिंत तुटली आहे तिला बनवा असे नाही सांगितले. मी सांगितले कंन्स्ट्रक्शन ऑफ ड्रेनेज ऑफ वॉल नॉट फॉर द बिल्डिंग मधील भिंत नाही सांगितली ड्रेनेज वॉल सांगितली.

*श्री.भिवारपूरकर (कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-* इमारत नाल्यावर बांधली गेली आहे.

*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-* अनाधिकृत इमारत नाल्यावर बांधली त्यावेळी आपले अधिकारी नव्हते का?



*श्री.भिवारपूरकर (कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-* इमारत बांधल्यावर कंप्लीसेशन सर्टीफिकेट देण्याचे काम नगररचनाकाराचे आहे. ते त्यांनी तपासले पाहीजे.

*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे* :- ही आमची समस्या नाही. त्यासाठी जनतेने का त्रास सहन करावा? ही आपली चुकी आहे. पदाधिका-यांची चुकी आहे. त्यासाठी जनतेने का सहन करावे.

*मा.महापौर* :- मला असे वाटते मॅडम, ही जी समस्या आहे ती माझ्या आणि आपल्या प्रभागाशी संबंधित आहे.

*मा. सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-* म्हणुनच मी स्पष्टपणे तसे म्हंटले पण.

*मा.महापौर* :- मागील नगरपालिका होती तेव्हा आपला जो प्रभाग आहे त्यातील इमारत माझ्या प्रभागाचा भाग होता. तेव्हा माझी पण हिच तक्रार होती व प्रयत्न होते की, इमारतीला कसे वाचविता येईल. ज्यावेळी ही इमारत बनली अनाधिकृत पणे त्यावेळच्या अधिकारीनी लक्ष नाही दिले व त्या इमारतीला तयार होऊन दिले. तिची प्लीन्थ नाल्याखाली आहे. तिकडे लोक रहातात. आपले नैतिक कर्तव्य आहे की, आपण त्यांना कशात-हेने वाचवू शकतो. पण कायदयान्वये त्यांनी जे उत्तर दिले ते माझ्यामते बरोबर आहे. कायदयाच्या नजरेने ती इमारत अनाधिकृत आहे. तिचा बचाव करणे हे बिल्डर चे कर्तव्य आहे, जबाबदारी आहे तरीही इमारतीला प्रोटेक्ट रिटेनिंग

वॉलचा जो प्रस्ताव होता त्यासाठी मी वेगळा असा एक लाख फंड माझ्या महापौर निधीतून दिला आहे जेणेकरून त्या इमारतीला संरक्षण मिळावे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- मी त्याबददल आभारी आहे. प्रश्न फक्त माझ्या व तुमच्या वार्डाचा नाही. जेव्हा जनप्रतिनिधी म्हणून निवडून येतो तेव्हा चार-पाच हजार लोकांचा आवाज म्हणजे आपला एक आवाज असतो. मी यांच्या भाषेशी सहमत नाही. हयांनी सांगितले की, ती अनाधिकृत इमारत आहे. तुम्ही सांगू शकाल का आता पण अनाधिकृत बांधकाम कुठेही चालू नाही ते? साईदिप इमारत ही नाल्यावर बांधलेली नव्हती. ती नाल्याशेजारी होती ती इमारत कोसळली तेव्हा तुम्ही काय केले?

मा.महापौर :- त्यांनी सांगितले ती इमारत अनाधिकृत आहे, ते काही चुकीचे नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:- नाही-नाही ते शंभर टक्के चुकीची भाषा आहे. लहान मुलासारखी भाषा त्यांनी वापरली आहे. तुम्ही कसे म्हणता चुकीची नाही. तिथे दिडशे-दोनशे माणसे रहातात. त्यांच्या जिविताची व मालमत्तेची हानी झाली तरी आपण म्हणाल की इमारत अनाधिकृत आहे आम्ही काय करणार नाही. जेव्हा पुर येतो किंवा एखादा अपघात घडतो तेव्हा प्रथम पोलीस अधिकारी हे नाही म्हणणार की, तुमचा परवाना दाखवा? आधी ते दवाखान्यात नेतील. व उपचार करतील. तुम्ही या लोकांसाठी काय करणार?

मा.महापौर :- पुर येण ही नैसर्गिक बाब आहे.



मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-मी फक्त उदाहरण दिले. जेव्हा आपण रस्त्याने जातो व अपघात घडतो तेव्हा आधी हॉस्पीटलमध्ये नेले जाते का आधी परवाना विचारला जातो की कार्यवाही केली जाते. समजा उदया देव न करो ही इमारत कोसळली तर आपण आधी त्यांना आधार दयाल की इमारत अनाधिकृत आहे की अधिकृत हे विचारणार हे सांगा आधी. साईदिप इमारत अनाधिकृत होती तरी आपण काय केले?सगळयांनी मिळून एस.डी.ओ,महापौर तसेच कमिशनर साहेबांपर्यंत सगळयांनी मिळून तिकडे भेट दिली. पंधरा दिवसा पर्यंत नुसत्या भेटीच देणे झाले तरी आधार काय मिळाला. आता अजुन कूणी कब्जा घेतला आहे आणि परत इमारत तयार होत आहे. बिल्डर अनाधिकृत बिल्डिंग बनवत नाही येथील अधिकारी लोक त्यांना साथ देतात म्हणुन ती इमारत सात मजली तयार होते. तीन माळे होई पर्यंत अधिकारी लोकांचे डोळे का नाही उघडत. जेव्हा ती इमारत कोसळते तेव्हा म्हणता अवैध बांधकाम होते.

मा.महापौर :- आता ती गोष्ट जुनी झाली. आता आपण हा विचार करायचा आहे की, इमारतीचा कसा बचाव करता येईल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- यांनी उत्तर दिले आहे की, हे आमचे काम नाही. हे उत्तर बरोबर नाही. साईदिप पण अनाधिकृत होती मग तुम्ही का तिचा बचाव करायला का तिकडे गेलात. तिथे भेट दयायला कुणीही जायला नको होते. एका व्यक्ती कडे चार-पाच लाखाचा फ्लॅट असतो त्यात सामान असते. दहा मिनिटात ती इमारत कोसळते. लोक बेघर होऊन जातात

मग आपण रॅली काढतो. म्हणजे एखादया चांगल्या माणसाला आपण भिकारी करून टाकायचे नंतर रॅली काढायची. पण आधी संरक्षण नाही दयायचे. ही एक इमारत अनाधिकृत नाही यात-हेने विजय वीला ची पण अशीच स्थिती झाली आहे. पंजाबी कॉलनी मध्ये पण असेच झाले आहे. कुमार सोसायटी हॅपी होमशी कनेक्टेड आहे हे आपणांस माहित आहे. सोना मार्केटच्या मागे सुध्दा ९४/९५ साली अशी घटना घडली. इमारत पुर्णपणे तयार न होता कोसळली. तरीपण आपण काय संरक्षण करता? आपण अनाधिकृत असल्याची गोष्ट आता करता इमारत तयार झाल्यावर. आता किती अनाधिकृत बांधकाम आहे? एक पण नाही पुर्ण उल्हासनगर मध्ये? आहे ना. त्यासाठी आपण काय करणार? इमारत कोसळण्याच्या स्थितीत आल्यावर म्हणणार ती इमारत अनाधिकृत आहे पडू दया मरू दया लोकांना आम्ही काही नाही करणार.

<u>मा.महापौर :-</u> जेव्हा पासुन आम्ही कार्यभार हाती घेतला तेव्हा पासुन आम्ही हे निश्चित केले की, कोणतेही अवैध बांधकाम न होवो.

<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे</u> :- माझा कुणावर वैयक्तिक हल्ला नाही आहे. मी कुणाच्या विरोधात बोलत नाही. मी सर्वांसंबंधी बोलत आहे. प्रत्त्येकाच्या प्रभागात अनाधिकृत बांधकाम आहे हे सर्वजण मान्य करतील. तरीही तुम्ही काय करता? काही नाही. एखादी बिल्डिंग तुटली आहे अनाधिकृत? नाही. तुम्ही त्यांना आसरा देता. सात मजली इमारत तयार होऊ देता नंतर बोलता. ९५ मध्ये शासनाचा निर्णय आला आहे. श्री.प्रकाश कुकरेजा या विषयी सांगतिल की, काय करायचे. ९५ पर्यंतच्या बांधकामांना संरक्षण दयायचे आहे. आपण या जी.आर ला कायदयान्वये मान्यता देता की नाही? जो माझ्या प्रश्नाचे उत्त्तर देत आहे, त्यांनी मंचावर यावे. मला शहर अभियंता चिजवानी साहेबांकडून उत्त्तर हवे आहे, त्यांना सर्व माहीत आहे. ते उपस्थित नाहीत आज. अधिकारी नाहीत तर उत्त्तर कुणाला विचारायचे?



(श्री.पानपटटे उप-आयुक्त अनाधिकृत बांधकाम विभाग मंचावर आले असता)

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- ओळख करून दया प्लीज कोण आहेत ते?

<u>मा.सचिव</u> :-या साहेबांचे नाव आहे श्री.पाणपटटे उप-आयुक्त आहेत अनाधिकृत बांधकाम विभागाचे आणि आरोग्य विभागाचे.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- भडकवाड साहेब?

<u>मा.सचिव :-</u> भडकवाड साहेब, कॅम्प नं.१ ,२ ,३ , साठी आहेत व हे साहेब ४ ,५ कॅम्पसाठी आहेत.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>:- माझ्या मते पन्ना वारिंगे मॅडमचा प्रश्न १ ,२ साठी आहे. मग हे कसे उत्त्तर देतील.

<u>मा.सचिव</u> :- भडकवाड साहेब आलेले नाहीत आज ते चौकशीच्या कामात बीझी आहेत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- माझ्या प्रभागासाठी मी प्रश्न विचारत नाही. सर्वांसाठी विचारत आहे हे मी स्पष्ट करते.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- हे बरोबर आहे की ज्यांनी लिखित उत्तर दिलेले आहे त्यांनीच उत्तर दयावे हे योग्य होईल. सही कुणाची आहे?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-प्रश्नाचे उत्तर लिखित एक जण देतो. दुसरा तोंडी उत्तर देतो. तिसरा अधिकारी आहे नाही. चौथे श्री.चिजवाणी ज्यांनी भेट दिले ते इथे नाहीत. हाऊ कॅन दिस कॅन बी टॉलरेटेड? या त-हेने महासभा चालवता? दहा लाख जनता आपल्या शहरात राहते. त्यांच्या प्रश्नाविषयी आपण बोलतो. अधिकारी एक दुस-याकडे पहात आहेत उत्तर नाही देऊ शकत.

श्री.पानपट्टे (उप-आयुक्त अ.बां.वि):-हॅपी होम ही पुर्णपणे नाल्यावर बांधली गेली आहे. त्यावेळी बिल्डरने लक्ष दयायला पाहिजे होते की, आपली इमारत कशी सुरक्षित राहील.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-त्यांनी काय केले ते सोडा.आपण काय केले ते सांगा? त्यावेळी का नाही ते बांधकाम थांबवले. आपणास माहित आहे कीती मजली ती इमारत आहे?

श्री.पानपट्टे (उप-आयुक्त अ.बां.वि):- सात मजली आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-प्लान मंजुर केले तेव्हा सात मजले होते? किती असतील तीन-चार मजलीचा प्लान. सांगा मला मी तुम्हाला प्रश्न विचारते तुम्ही मला उत्तर दया. मी जी.आर.संबंधी विचारले तो पण मला दया.मी जे प्रश्न विचारते त्याचे उत्तर मला दया. मला हे नको की ती अनाधिकृत आहे की अधिकृत. आता ती इमारत पडते तर अनाधिकृत आहे की अधिकृत हे पहाणार का त्यांना आधार देणार.



मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- हा जो प्रश्न आहे तो इतका साधा प्रश्न आहे. आणि हे उत्तर नाही देऊ शकत. प्रश्न रिटेनिंग वॉल संबंधी आहे. समजा ती अनाधिकृत इमारत आहे. जर ती पडण्याच्या स्थितीत आहे. तर ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे की, तिचे संरक्षण करणे. हे महापालिकेचे अधिकार आहेत.

मा.महापौर :-मी मॅडम ना सांगितले आहे की, मी महापौर निधीतून भिंत बांधण्यासाठी निधी दिला आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मा. महापौर, मी त्याबददल आभारी आहे. त्याविषयी मी नाही बोलत.

मा.महापौर :- माझे जरा ऐका. यु.बी.स्पेसिफिक अबाऊट युवर क्वश्चन. माझ्या मते......

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आय अेम स्पेसिफिक अबाऊट माय क्वश्चन.

मा.महापौर :- आपण जो प्रश्न केला. त्यांनी जे उत्तर दिले आहे माझ्यामते त्यात काही चुकी नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मला चुकी वाटली म्हणून मी चर्चा करत आहे. त्यांनी लिहिले की, अनाधिकृत इमारत आहे. आपण ती तोडणार का?

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-उत्तर असे चुकीचे आहे की, महापालिका यास जबाबदार नाही. ही आपली जबाबदारी आहे. महापालिकेची जबाबदारी आहे. अशा सर्व इमारतींना संरक्षण देणे. असे कसे उत्तर देऊ शकतात की, आमची काही जबाबदारी नाही.

मा.महापौर :-या कारणास्तवच त्यांनी सेक्रेटरी व चेअरमनला पत्र लिहिले की, इमारतीची दुरूस्तीची करून घ्या.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- पण उत्तरात लिहिले आहे की, ही महानगरपालिकेची जबाबदारी नाही. ही जबाबदारी बिल्डिंग ओनर ची आहे. मॅडमची हरकत अशी आहे की,महानगरपालिकेच्या अधिकारींनी असे उत्तर नाही दिले पाहीजे. अशी आहे ना हरकत मॅडम?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-बरोबर. आपण असे कसे म्हणु शकता की महापालिकेची जबाबदारी नाही. ठीक आहे. अनाधिकृत बांधकाम तोडाल का? ज्यांनी मला उत्तर दिले त्यांना मी विचारते हे बांधकाम तोडाल? इफ यु डोन्ट वॉन्ट टू ब्रेक इट यु हॅव टू प्रोटक्ट इट इज युवर प्रोटोकॉल यु हॅव टू प्रोटेक्ट इट. इट इज अ डयुटी कॉस्ट अपॉन यु.

मा.महापौर :-मि.पंजाबी, व्हॉट यु से आय फिल इट. इट इज द मॉरल रिस्पॉन्सिबिलीटी ऑफ द कार्पोरेशन सेम थिंग आय टोल्ड हर.



मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- त्यांनी उत्तरात लिहिले आहे की, हि बिल्डिंग ओनर ची जबाबदारी आहे महापालिकेची नाही. त्यांनी असे नको लिहायला पाहिजे.

मा.महापौर :-कायदयाने मी सरळ सरळ असे नाही म्हणु शकत की, महापालिकेने अनाधिकृत बांधकामांना संरक्षण दयावे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- जे दर्शाविले आहे त्यासंबंधी मी बोलत आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपण काय म्हणालात. लिगल टर्मस ने कार्पोरेशन थांबत नाही. आपल्याकडे विधी अधिकारी आहे. का विधी अधिकारी नाही आहेत? लिगल टर्मस आपण म्हणालात.

मा.महापौरः- मी म्हणालो कार्पोरेशन कॅन नॉट स्टेट इन लिगल टर्मस दॅट वूई वील पोटेक्ट ऑल द इलिगल बिल्डिंगस्. वीच आर ॲफेक्टेड बाय ए.बी.सी.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-जेव्हा साईदिप कोसळली. लिगल ती पण नव्हती. त्यावेळी तिकडे तुम्ही का गेलात? का त्यांना आधार दिला?

__मा.महापौरः-__ त्यावेळी नगरपालिका होती. वेगळे अधिकारी होते. आज वेगळे अधिकारी आहेत. यु कान्ट पुल दिस ऑफीसर फॉर दॅट लॅप्स.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-नाही -नाही हा पुर्ण शहराचा प्रश्न आहे. तुम्ही असे नाही म्हणु शकत ओव्हरीबडी इज इंटर डिपेंन्डंट अपॉन ऑन इच अदर. माझ्या प्रश्नाचे दुसरे दोन अधिकारी का उत्तर देतात?

__मा.महापौरः-__ मला हे सांगा. वेदर दीस ऑफिसर इज रिस्पॉनसिबल फॉर दॅट यु क्नो इलिगल बिल्डिंग. व्हीच हेज कम अप.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-आपण जेव्हा पत्ता लिहितो. तेव्हा टू द कमिशनर लिहितो. तेव्हा शुळ असो काळे असो शिंदे असो आपला संबंध नाही. आपला संबंध आयुक्तांशी असतो. तो कोणीही असो. आता या पदावर हे आहेत. तर आपण संबंधीत अधिका-यांनाच विचारणार. हे त्यावेळी नव्हते याच्याशी आपला काही संबंध नाही. यापूर्वी होते ते कुठे आहेत?

__मा.महापौर__ :- ओ.के. मी आयुक्तांना निर्देश देतो की, त्यांनी उत्तर दयावे.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-नाही सर मला आश्वासन नको आहे. कारण फक्त आश्वासनच मिळते. आपल्याकडे ४० महासभा झाल्या आहेत त्यात केवळ आश्वासनच मिळाले आहे.

__मा.महापौर__ :- श्री.सोनाळे साहेब, उत्तर दया.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-मला माझा प्रश्न पुर्ण करू दया. मला अजुन माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. मी जी.आर. संबंधी विचारले मला काही उत्तर मिळाले नाही.



__मा.महापौर__ :- मी आयुक्तांना उत्तर दयायला सांगतो तुमचे.

__श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-__आता मॅडमनी जो प्रश्न विचारला रिटर्निंग वॉल संबंधी त्या वॉलच्या बाजूला इमारत आहे. ती अधिकृत आहे कि अनाधिकृत असे उत्तर दिले गेले आहे. रिटर्निंग वॉल बांधणे ही वेगळी बाब आहे. आणि इमारत अनाधिकृत आहे की अधिकृत ही वेगळी बाब आहे. यात मॅडमनी ९५ सालचा जी.आरचा उल्लेख केला आहे. मी आधी दोन वर्ष अतिक्रमण विभागात काम केले आहे. ९५ सालच्या जी.आर मध्ये शासनाच्या जमिनीवर वा जिल्हाधिकारीच्या अधिकारातील जमिन आहे वा महापालिकेची जमिन आहे. या जमिनीवर ज्यांनी रहाण्यासाठी झोपडया बांधल्या आहेत व त्यांची नावे ९५ च्या मतदार यादीमध्ये जर असेल त्या झोपडी धारकाला प्रोटेक्शन दिले गेले आहे. जर शासनाला वा महापालिकेला जर सार्वजनिक हेतुसाठी जागा पाहिजे असेल तर ९५ च्या मतदार यादीमध्ये त्यांचे नाव असल्यास त्यांना दिले जाईल. मुंबई मध्ये ''१० x १५'' पर्यायी जागा दिली जाते. पर्यायी जागा दिल्या नंतरच त्यांच्या जागेचे डेमोलेशन केले जाते. ९५ च्या जी.आरमध्ये तशी तरतुद आहे. इथे प्रश्न असा आहे की, रिटर्निंग वॉल बांधायची आहे की नाही? मॅडमनी फेब्रुवारी ९९ पासून ते नोव्हेंबर ९९ पर्यंत यासंबंधात तीन-चार पत्र दिले आहेत त्या पत्रांचा संदर्भ दिला आहे. त्यावेळी त्या प्रश्नाचे काय उत्तर दिले गेले मला माहित नाही. खाली पण नमुद केले आहे की, या प्रश्नाचे उत्तर आधी पण महासभेत दिले गेले आहे. प्रश्न क्र४३८.

यात रिटर्निंग वॉलचा जो प्रश्न आहे. त्याबाबत मी काही आश्वासन देऊ शकत नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-</u> जर तुम्ही आश्वासन देऊ शकत नाही तर कशाला बोलता? मला माझ्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे. आश्वासन नको कार्यवाही पाहिजे. मला हे समजत नाही जर तुम्ही आश्वासन देऊ शकत नाही तर उत्तर कशाला देता. जो माझ्या प्रश्नाला आश्वासन देऊ शकतो त्याच्याकडून मला उत्तर हवे.

<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u> तुम्हाला उत्तर काय हवे आहे? रिटर्निंग वॉल संबंधी.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u> :-मी तुम्हाला विचारले यासंबंधी काय करतात तर तुम्ही उत्तर दिले की, अनाधिकृत बांधकाम आहे आम्ही काही करू शकत नाही. आपण सांगा काय उत्तर दिले ते? मान्य आहे का? तुमच्या कडे माझा प्रश्न आहे एक मिनिट तुम्ही तो वाचा. सांगा हे उत्तर बरोबर आहे का? म्हणजे तिथे रहाणारे ३०० लोक बेघर होतील आणि तुम्ही सांगता अनाधिकृत बांधकाम आहे आम्ही काही करू शकत नाही. भले लोक मरो त मरो हा अर्थ आहे आपल्या म्हणण्याचा.

<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u>असे नाही आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u> :- फक्त आपण स्पष्ट शब्दात नाही लिहिले, पण आपल्या म्हणण्याचा अर्थ तोच आहे. साईदिपच्या जागेवर जी इमारत बनत आहे ती नाल्यापासून किती फुट अंतरावर पाहिजे हे सांगा. त्यासाठी काय तरतुद आहे. कृपया तुम्ही जर माझ्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नसाल तर बसा. दुस-या कोणाला उत्तर दयायला सांगा. मी इथे उत्तर मिळावे म्हणून उभी आहे. आम्ही जनप्रतिनिधी असे नाही बोलू शकणार की, आमचे



प्रभारी आयुक्त असे म्हणत होते की, मी आश्वासन नाही देऊ शकत. आपण कृपया इमारत पडू दया असे नाही म्हणू शकत. असे म्हणणे अशक्य आहे. आपण असे कसे उत्तर देऊ शकता कोणी म्हणतो अनाधिकृत बांधकाम आहे बचाव नाही करणार. कोणी म्हणतो की, आश्वासन नाही देऊ शकत. अधिका-यांच्या तोंडातुन असे लहान मुलासारखे बालीश वाक्यांची कोणी अपेक्षा ठेवत नाही.

<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u> इथे रिटर्निंग वॉलच्या संबंधात मी काही आश्वासन देऊ शकत नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-</u> मी या उत्तराने समाधानी नाही. जेव्हा आपण उत्तर दिले मी आश्वासन नाही देऊ शकत तेव्हा मी सांगितले की मला तुमच्या कडून उत्तर नको.

<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u>मी यासंबंधी आयुक्तांशी चर्चा करत आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u> :- मला चर्चा नको तिथे चारशे लोक रहातात. त्यांचा जीवनमरणाचा प्रश्न आहे आणि तुम्ही अजुन पर्यंत चर्चा करणार.

__मा.सदस्य श्री.नरेंद राजानी__ :- हा जो प्रश्न चर्चेस घेतला आहे तो अगदीच साधा-सोपा आहे. रिटर्निंग वॉल तुम्ही बिल्डिंगला नाही लावत तर नाल्याला लावत आहात. जेव्हा बिल्डिंग तयार होत होती तेव्हा बिल्डिंग नाल्याला लागून बनत होती तर अधिकारींनी लक्ष दिले नाही. ती जबाबदारी अधिका-यांची होती. त्यावेळी लिहून दयायला पाहिजे होते की, बिल्डिंग नाल्यावर बनवा, नाल्याच्या बाजुला बनवा, नाल्याखाली बनवा आमची जबाबदारी नाही. अशा प्रकारचे उत्तर तुम्ही देऊ शकता का? मी किंवा मॅडम प्रश्न विचारतो की, नाल्याच्या भिंतीवर अनाधिकृत बांधकाम बांधले गेले तर त्याला जबाबदार कोण? हि काय आपली जबाबदारी नाही तुम्ही असे लिहु शकता? आता त्या इमारतीचा बचाव करण्याचा मुददा आला असता त्यावेळी आपण उत्तर लिहून देता की, ही आमची जबाबदारी नाही. जिथे इमारत बनवायची तिथे बनवा. आता इथे इमारत बनली लोक रहायला लागले त्या लोकांकडून आपण कर वसूल करतो, त्यांना पाण्याची बिले पाठवितो त्यांना एन.ओ.सी दिली आहे. यासर्व बाबी आपण पूर्ण केल्या आहेत ना? जर अनाधिकृत इमारतीत रहाणा-या लोकांना प्रत्येक त-हेची सुविधा आपण दिली आहे. आता तर लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यावेळी तुम्ही म्हणता ही आमची जबाबदारी नाही. एका इमारतीला संरक्षण दिले तर सर्व अनाधिकृत इमारतीवाले संरक्षण मागतील अशी रीतच बनून जाईल. लोकांना बोलायचे ते बोलू दया. महापालिका कोणासाठी काम करते. नगरपालिका जनतेसाठी काम करते. जे या शहरात रहातात अशा जनतेचे काम करते. त्यांच्या जीवनमरणाच्या संबंधी तुम्ही विचार केला नाही तर कुणाचा विचार करणार? तिथे नाल्यावर एक भिंत बांधायची आहे. साधा विषय आहे. नाल्यामधून पाणी झिरपून जर इतर इमारतींना धोका पोहचत असेल तर भिंत बांधणे जरूरी आहे. यात आक्षेप घेण्यासारखे काय आहे? मा.महापौरांनी, यासाठी सहृदयाने एक लाख निधी दिला आहे. तर ती भिंत बांधा ना.

__मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव__ :- एक प्रश्न किती वेळ चालू रहाणार आहे. सभागृहाचा वेळ वाया जात आहे.



__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :- तिथे तिनशे लोक मरो तर मरो बेघर होवो त्यांचे इतके नुकसान होणार आहे. त्याची पर्वा नाही. तुम्हाला वेळ जातो याची चिंता आहे.

__मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव__ :- इमारतीवर कार्यवाही झाली पाहिजे.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-आभारी आहे.

__मा.सदस्य श्री.नरेंद राजानी__ :-मा.महापौर, तुम्ही एक लाख निधी दिला आहे. सरळ आहे भिंत बांधली गेली पाहिजे.

__मा.महापौर__ :- मी आधीच सागितले आहे की, ही महापालिकेची नैतिक जबाबदारी आहे की, जनतेला संकटातून वाचविणे म्हणून मी माझा निधी तिथे दिला रिटर्निंग वॉल बांधण्यासाठी.

__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-__ मा.महापौर, माझा प्रश्न हा नाही. मी जे प्रश्न विचारले त्याच्या एकाही प्रश्नाचे उत्तर दिले गेले नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर दया.

*__मा.सदस्य श्री.नरेंद राजानी__ :-काही ठिकाणी भुकंप होतो तेव्हा झोपडपट्टया या दबल्या जातात. तेव्हा आपण असे नाही म्हणत की, झोपडपट्टीत राहणारे लोक अनाधिकृत झोपडीत राहत होते आपला काही संबंध नाही. पुर्ण महापालिका तिकडे जाऊन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करते. मदत करते.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-मी जीआर संबंधी विचारले......*

*__मा.सदस्य श्री.नरेंद राजानी__ :- तुम्ही इथे पण असे का नाही करत?तुम्ही फक्त म्हणा हो करू, नाल्यातून पाणी झिरपत आहे त्यासाठी महापौरांनी एक लाख निधी दिला आहे तिथे रीटर्निंग वॉल बांधू. तुम्ही जर हो म्हणाला असता तर विषय केव्हाच संपला असता.*

*__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी__ :- मा.महापौर, राजानी साहेबांनी जेव्हा विचारले की, महापालिकेची काही जबाबदारी नाही का? आपण जे उत्तर दिले ते त्यांनी ऐकले. आपण म्हणालात की, रिटर्निंग वॉल बांधण्यासाठी महापौर निधीतून एक लाख निधी देईल.*

*__मा.महापौर__ :- दिला आहे.*

*__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी__ :- दिला आहे. आज ज्या लोकांनी फ्लॅट घेतले त्याच्या जिविताचा व मालमत्तेचा प्रश्न आला आहे. त्यांनी सुध्दा बघुनच फ्लॅट घेतले असतील की, नाल्यावर इमारत बांधली आहे. ज्यांनी फ्लॅट घेतले त्यांची सुध्दा काही जबाबदारी आहे. नाल्यावर इमारत बांधली आहे हे माहित असताना सुध्दा फ्लॅट घेतात. दुकाने घेतात हे पहाणे त्यांची जबाबदारी नाही आह?*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-जेव्हा मी म्हणाले की, माझा प्रश्न चालू असताना कोणी बोलू नये.*



*__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी__ :- कृपया मध्ये बोलू नका. महापौरजी, अशा किती इमारती आहेत. की ज्यांच्यावर न्यायालयाकडून स्थगित आदेश येतो. बिल्डर त्यांची दिशाभूल करतात. महापालिका कित्त्येकदा वर्तमान पत्राात पण छापते की, ही इमारत अनाधिकृत आहे. यामध्ये जागा घेऊ नका, दुकान घेऊ नका. तरी कित्त्येकजण घेतात. आज ५ नंबरचे एक उदाहरण आहे. सतनाम साक्षी इमारतीचा उच्च न्यायालयातून आदेश आला आहे की ती इमारत तोडा. लोक त्यावेळी का फ्लॅट घेतात त्यांना हे माहित नसते का इमारत अनाधिकृत आहे? महापालिका झाल्यानंतर प्लान पास केल्यावरच इमारत बांधतात. पूर्वी असे नव्हते. ज्या इमारती ९५ ,९६ ,९७ मध्ये बनल्या आहेत. काही अवैध बांधकाम झाले आहेत. काही इमारती नाल्यावर बांधल्या गेल्या आहेत. त्यासाठी आताचे अधिकारी किंवा आताची सत्ता काय करू शकते. आपण सांगितले की रिटर्निंग वॉल बांधण्यासाठी एक लाख रूपये निधी दिला आहे. यांना अजुन महापालिके कडून काय मदत पाहिजे ते सांगा.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-किशोर वनवारीजी, आपण माझा प्रश्न समजला नाहीत. महापौरजी, मी आधीच सांगितले होते की, माझा प्रश्न चालू असताना कोणाला जर सल्ले दयायचे असतील तर माझा प्रश्न संपल्यानंतर दयावे.*

*__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी__ :- जेंव्हा श्री लाल पंजाबी व श्री.नरेंद राजानी मध्ये बोलले तेव्हा नाही हरकत घेतली त्यांच्यानंतर मी बोलत आहे.*

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-तुमचा हा गैरसमज आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- मा.महापौरजी, आम्ही महापौरांनी दिलेल्या उत्तरा विषयी बोलत आहे. तुमच्या प्रश्नाविषयी बोलत नाही. आम्ही महापौरांना सुझाव देत आहोत. त्यांनी तीनदा तुम्हाला उत्तर दिले ते कुणी ऐकत नाही.

मा.महापौर :- मॅडम माझ्या मते आपल्याला आपल्या प्रश्नाचे उत्तर बरोबर मिळाले आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-नाही महापौरजी, उत्तर बरोबर नाही.

मा.महापौर :- तुम्हाला कोणत्त्या उत्तराची अपेक्षा आहे?कोणते उत्तर बरोबर नाही तुम्हाला काय अपेक्षा आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मी जे जे प्रश्न विचारले त्याचे एकाचेही तुम्ही उत्तर बरोबर नाही दिले. मी जी.आर विषयी विचारले तर यांनी सांगितले की, सार्वजनिक हेतु साठी जागा दिली जाते. सार्वजनिक हेतु साठी जी.आरची आवश्यकता नाही आहे. सार्वजनिक हेतु साठी शंभर वर्षे जुनी जरी इमारत असली तरी ते घेऊ शकतात. कमिश्नरच्या अधिकारात असो वा जिल्हाधिका-याच्या ते देवू शकतात हे कुकरेजा साहेबांना सुध्दा माहित असेल. मी हे नाही विचारत मी हे विचारते आहे की, जी.आर मध्ये दिले आहे की, संरक्षण दयायचे नाही. तर काय तोडायचे? जर तोडायचे नाही तर बचाव करायचा आहे?



मा.महापौर :-माझे ऐका दुस-या महापालिकेत ज्या इमारती कोसळण्याच्या स्थितीत येतात. त्यात काही इमारती अधिकृत पण असतात त्यासाठी महापालिका एक रिपेअर बोर्ड बनवते. मला वाटते येणा-या वर्षामध्ये उल्हासनगरमध्ये सुध्दा अशा दुरूस्ती आणि पुर्नबांधकाम मंडळाची आवश्यकता भासेल. ज्यात-हेने इमारती एका पाठोपाठ एक नाजुक स्थितीत येत आहेत. कारण ज्यावेळी ती इमारत बनत असते त्यावेळी काही अशा त्रुटया राहून गेलेल्या आहेत. त्या ठिकत-हेने काळजीपूर्वक तपासल्या गेलेल्या नाहीत. ज्या इमारती घाई घाईत तयार झाल्यात. त्यांना ना भरपूर पाणी मिळाले ना सिमेंट मिळाले ना वाळू मिळाली. त्या इमारतीची पहाणी देखील व्यवस्थितरित्त्या केली गेली नाही. येणा-या वर्षामध्ये अशा प्रकारच्या कितीतरी इमारती आपल्या समोर येतील. तर आयुक्तांना माझे निर्देश आहेत की, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे दुरूस्ती आणि पुर्नबांधकाम मंडळाची लवकरात लवकर स्थापना केली जावी. जेणे करून ज्या इमारतींवर कोसळण्याचे संकट येईल त्यांचे संरक्षण करता येईल.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- त्यांना धोकादायक इमारती म्हणून घोषित केले जावे.

मा.महापौर :-त्यांना धोकादायक इमारती म्हणुन घोषित करून कोसळण्याच्या आधी इमारतीची चांगली दुरूस्ती करून तिचा बचाव केला जाईल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मी आता पण विचारले की, नाल्यापासुन कीती फुट अंतरावर इमारत बांधण्याची परवानगी आहे.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :- मा.महापौरजी, जसा आता प्रश्न आला अनाधिकृत इमारतीला.....

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मा.महापौर, माझे म्हणणे....

मा.महापौर :-एका प्रश्नावर आपण पन्नास प्रश्न निर्माण करून विचारता याने काय हेतु साध्य होणार आहे?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-माझा काही हेतु नाही पण माझे समाधान झाले नाही.आज एका इमारतीची अशी हालत इतर इमारतींची होवू शकते.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर:-मा.महापौर, जसे आता किशोर वनवारीनी सांगीतले आहे की, बिल्डरर्स जनतेची दिशाभुल करतात. अनाधिकृत बिल्डिंग अधिकृत असल्याचे सांगतात. एफ.एस.आय. वायोलेशन करतात. तो त्रास जनता सहन करते. हे सर्व महापालिकेच्या नजरेआड घडते. बिल्डर जनतेला फसवतो. आपल्याकडे कायदा आहे एम.आर.टी.पी चा बिल्डरवर एफ.आय.आर दाखल करू

शकतो. आज पर्यंत किती एफ.आय.आर दाखल केले आहे. ते तर सांगा तुम्ही? झाले का एफ.आय.आर दाखल? यानंतर एफ.आय.आर दाखल करा आपल्या अधिकारींनी जाऊन तिथे जर सांगितले की, हे वायोलेशन आहे, कटींग करा जर इकडून तशी नोटीस काढली गेली आहे, त्याचे बांधकाम तोडले गेले असेल तर अशा बिल्डर लोकांवर एफ.आय.आर दाखल केला गेला पाहिजे. एम.आर.टी.पी ॲक्ट अन्वये.



मा.महापौर :-मला वाटते की, पूर्वी नगरपालिका होती तिने पण असे कित्त्येक एफ.आय.आर दाखल केले असतील किती बिल्डर्सवर?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मी कुकरेजा साहेबांना विचारले की, नाल्यापासून बांधकाम किती दुर करावे. किती फुट दुर अंतर हवे आहे. मी प्रश्न विचारत आहे ज्यांना उत्तर दयायचे त्यांनी दयावे.

मा.महापौर :- याचे उत्तर नगररचनाकार देतील.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- ठिक आहे नगररचनाकारांनी दयावे.

मा.महापौर :- ते आज आले नाहीत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मग कसे शक्य आहे माझ्या प्रश्नाचे उत्तर देणे? साईदीपच्या जागेवर जी इमारत बनत आहे माझ्यामते तीपण नाल्याच्या बाजुला आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- ते काय आले आहेत ना नगररचनाकार.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :-नगररचनाकार साहेब, आज मानसिक संतुलन तर ठिक आहे ना?

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-विचार करतो. नाल्यावर....

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-नाल्यावर नाही. नाल्यापासून किती फुट अंतरावर?

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ कमीत कमी तीन मीटर अंतर हवे आहे. म्हणजे १० फुट.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-दहा फुट. आता ज्या इमारती बनत आहेत त्या सगळया दहा फुट अंतरावर आहेत का?*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ ज्यांना परवानगी दिली आहे. ज्यांनी परवानगी मागीतली आहे त्यांना १० फुट अंतरावर दिली आहे.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-म्हणजे ज्यांनी परवानगी नाही घेतली त्या बिल्डींगी अशाच तयार होत आहेत. हा अर्थ होतो.*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ ते पहाणे माझे काम नाही.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-आपले फक्त हे काम आहे की, ती इमारत अनाधिकृत आहे असे म्हणणे.*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ माझ्याकडे जो प्लान मंजुरीसाठी येतो....*



*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-क्षमा करा आपले नाव काय आहे?*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ सोनावणे.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-साईदिपच्या जागेवर जी इमारत बनत आहे त्याची पी.सी मिळू शकते का?*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ हो.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-कृपया आणा आता. बघु किती दुर अंतरावर आहे. नाल्यापासून व कशात-हेने प्लान मंजुर झाला आहे.*

*__श्री.सोनावणे (नगररचनाकार):-__ हो.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-__ हो नाही मला पी.सी आणुन दया. कार्यवाही करा. आपण आश्वासन नका देऊ.*

*__मा.महापौरः-__ मॅडम आपल्याला जी पण पी.सी.पहायची आहे ती त्या विभागात जाऊन पहा.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-इमारत तयार झाल्यावर तुम्ही अनाधिकृत म्हणाल आधी नाही म्हणत. प्रभाग क्र.१ ते ६९ मध्ये ज्या पण इमारती आहेत. त्या अधिकृत आहेत का?*

*__मा.महापौर__ :- मला वाटते तुम्ही तुमच्या प्रश्नाच्या व्यतिरिक्त बोलत आहात.*

*__मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे__ :-आपले उत्तर मला प्रश्नाच्या पुढे जाऊन बोलायला लावत आहे.*

*__मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक__ :-आता हे म्हणाले की, नाल्यापासून तीन मीटर अंतरावर हवे. माझा असा प्रश्न आहे की, फुटपाथापासून किती अंतरावर पाहिजे? ते सांगा. कारण आज खुप जणांच्या बालकन्या*

फुटपाथवर येत आहेत. फुटपाथपासून किती अंतरावर पाहिजे प्लान पास करताना.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>डि.सी.रूल मध्ये प्रत्येक फ्लॅटच्या मार्जीन प्रमाणे अंतर सोडले जाते. प्रत्येक फ्लॅटचे वेगवेगळे मार्जीन असते. आपणांस पुर्ण सविस्तर माहीती हवी असेल तर कार्यालयात देईन. प्रत्येक फ्लॅट प्रमाणे वेगवेगळे मार्जीन असते.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- फुटपाथापासून किती आत पाहिजे.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>त्याचा क्रायटेरिया प्रमाणे असतो. रोड किती फुटाचा आहे? किती उंच आहे? प्लॉटची जागा किती आहे? हे सर्व पाहिल्यावर माहिती पडेल.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u> :- सर्व अधिकृत इमारती आहेत. सर्वांचे प्लान मंजुर आहेत.



<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u>मी सर्व इमारतींविषयी बोलत नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे</u> :- आम्ही शहरात राहतो. आम्ही सर्व इमारतींचा विचार करतो.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- आता आमचे सभागृह नेता म्हणाले की, लोक इमारतीत फ्लॅट बघुन घेत नाहीत की इमारत प्लान प्रमाणे आहेत कींवा नाही. आपल्या महापालिकेत जे बीट इन्स्पेक्टर आहेत ते कशाकरता आहेत? बीट इन्स्पेक्टरचे काम काय आहे. हे एकदा सांगा महासभेत. इमारत तयार झाल्यावर लोकांनी चुकीने जरी घेतले तरी बीट इन्स्पेक्टरचे काम आहे की, त्याचा रिपोर्ट देणे. ते देतात का? की इमारत चुकीच्या रितीने तयार होत आहे.

<u>मा.महापौरः-</u> हे पहा बीट इन्स्पेक्टरचे काम आहे. टू डिटेक्ट द अन अथराईज कंन्स्ट्रक्शन ॲन्ड रिपोर्ट टू कार्पोरेशन.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- बरोबर आहे. एका रात्रीत तर इमारत तयार होत नाही. मग बीट इंन्स्पेक्टरचे काम काय आहे. त्या ऐरीयाचा बीट इंन्स्पेक्टर याला जवाबदार आहे. लोकांना कसा दोष देता आपण? मा. सभागृह नेता म्हणाले की, लोकांनी पाहून घ्यावे.

<u>मा.महापौर</u> :- ते जनरल बोलले.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-अनाधिकृत इमारत जेव्हा तयार होते तेव्हा बीट इंन्स्पेक्टर काय करतात? आज उल्हासनगरमध्ये काम चालू असलेल्या सर्व इमारती अधिकृत आहेत किती बीट इंन्स्पेक्टरनी रिपोर्ट दिले आहेत.

<u>मा.महापौर</u> :- माझे म्हणणे ऐका.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- बीट इंन्स्पेक्टरचे काय काम आहे?

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :- एक मिनिट. सोनावणे साहेब परवानगी न घेता मंचावरून खाली कसे उतरले. नगरसेवक आहेत कुणी टपोरी माणुस प्रश्न नाही विचारत.

मा.महापौर :- महाडिकजींनी त्यांना मोकळे केले म्हणुन ते गेले.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- ते उतरून कसे गेले मंचावरून हे सांगा?

मा.महापौर :- महाडिकजींनी त्यांना मोकळे केले म्हणुन ते गेले.

मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :- अनाधिकृत बांधकाम विभागाचा अधिकारी कोण आहे?
श्री.सोनावणे (नगररचनाकार):- आपला प्रश्न बीट इंन्स्पेक्टरसाठी आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :-आपण नाला बंद करण्याची परमीशन दिली त्याच्यावर स्टे आला आहे तरी पण आपण नाला बंद करण्याची परवानगी दिली आहे.



श्री.सोनावणे (नगररचनाकार):- ज्या सी ब्लॉकच्या नाल्याची आपण गोष्ट करता तो नाला डी.पी.शिटमध्ये नाही आहे. डिमार्केशन मध्ये नाही आहे. आता जी रिवीजनल चालू आहे नकाशाची. त्यात मी पाहिले त्याबाजूने नाला जात नाही आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- त्या नाल्याला बांधण्याची परवानगी दिली आहे. त्या नाल्यावर स्टे आला आहे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- त्या स्टेची कॉपी अद्याप पर्यंत माझ्याकडे आलेली नाही.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :-कुकरेजा साहेबांना विचारा स्टे आहे की नाही ते?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- तुमचे अधिकारी वेगळे आहेत काय? नगरपालिकेत स्टे येतो त्याची कॉपी तुमच्याकडे नाही आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- स्टे असून सुध्दा परवानगी दिली यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर :- महाराजजी, आज उपमहापौरांचा वाढदिवस आहे. जरा सभागृहाचे वातावरण आनंदी राहू दे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- हे चुकीचे काम आहे. स्टे असुन सुध्दा परवानगी कशी दिली. नाला बंद करू नये असा स्टे आहे तरी यांनी परवानगी कशी दिली.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :- स्टे आला आहे का?

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- आला आहे. सचिव साहेबांना माहिती आहे स्टे आला आहे ते.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- सन्माननिय महापौर, आमची बहिण पुनम वारिंगे यांनी जो प्रश्न विचारला.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर : - स्टे असुन सुध्दा कशी परवानगी दिली.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- मोरे साहेब तुम्ही जरा बसा आमचे पूर्ण होऊ दया.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- आज तुम्हाला संधी नाही मिळणार बोलण्याची बसा तुम्ही.



इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः- साहेब नाल्याचा मुददा चालू आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- साईदिप हून सी ब्लॉकला गेले आहेत. एक इमारत सोडून आता दुस-या इमारतीचा प्रश्न चालु आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- आम्ही उदाहरण दिले आहे स्टे असून सुध्दा परवानगी कशी दिली. आताच्या आता तो नाला उघडला पाहिजे.

मा.महापौर :- मी आयुक्तांना आदेश देतो याची चौकशी करा.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- चौकशी नको. नाला उघडायला सांगा.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- महापौरांनी रुलिंग दिले तरी चर्चा करतात.

मा.महापौर :- भुल्लर महाराजांनी जो प्रश्न विचारला तो बरोबर आहे. जर एखादया नाल्यास कंन्स्ट्रक्शन मुळे जर नाल्याच्या वाहत्या पाण्याला अडथळा येत असेल तर जर त्यामुळे पुर येतो तर तो नाला उघडला गेला पाहिजे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :-त्यावर स्टे पण आहे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- तसे आहे तर त्याची परवानगी रदद करा.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :-आपणांस स्टे ची कॉपी देऊन दहा दिवस झाले आहेत. ५० वेळा उपमहापौरांनी सागितले आहे.

श्री.सोनावणे (नगररचनाकार):-त्या स्टेची प्रत माझ्याकडे आली नाही.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :- तो नाला उघडला गेला पाहिजे.

मा.सदस्य श्री नरेंद्र राजानी :- महापालिका ॲक्ट नुसार नाल्याचे वाहते पाणी जर रस्त्यावर येत असेल तर चौकशीची गरज नाही त्यासाठी नोटीस दयायची गरज नाही. तुम्ही नुसते माहिती देऊन सुध्दा ते काम करू शकता.

मा.महापौर :- मी पण हेच सांगितले आयुक्तांना जर एखादया नाल्याच्या बांधकामामुळे अडथळा येत असेल तर जी काही योग्य कार्यवाही असेल तर ती त्वरीत केली जावी.

*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर</u> :- कधी करणार? महासभा संपायच्या आत एका तासात करायला सांगा.*

*<u>मा.महापौर</u> :- एका तासात नाही ते करतील.*

*<u>मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे</u> :- महापौर हे सांगा किती बीट इन्स्पेक्टरनी अनाधिकृत इमारती बांधत आहेत असा रिपोर्ट दिला आहे?*



*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर :-</u> त्यांनी स्टे असून सुध्दा परवानगी दिली आहे ती त्यांना परत घ्यायला सांगा.*

*<u>मा.महापौर</u> :- एखादी परवानगी अनाधिकृत असेल तर ती रदद करण्यात येईल.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर :-</u> परवानगी अवैध आहे. विचारा सचिवांना. आपल्या बाजुला सचिव आहेत. विचारा त्यांना स्टे आहे की नाही. सचिव साहेब या गोष्टीचा जरा खुलासा करा.*

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-सचिव साहेब एक मिनिट. महापौरजी, मी दोन मिनिटे बोलू इच्छितो.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर :-</u>दोन मिनिटे नंतर बोला चालेल.*
*मा.सचिव :- सी ब्लॉक येथे चंदर बावलानी नावाच्या व्यक्तीचे कंपाऊंड आहे. तिथे अब्दुल शेख नावाच्या कोणा व्यक्तीने दावा दाखल केला आहे आणि त्याला स्थगन आदेश देखिल मिळाले की, जसे आहे त्या स्थितीत काम ठेवले जावे.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर</u> :-आहे ना स्टे? सोनावणे साहेब काय म्हणतात आता.*

*<u>मा.सचिव</u> :- सोनावणे साहेब म्हणतात मी जी परवानगी दिली आहे ती परत घेत आहे.*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> जर स्टे आहे तर ती परवानगी मी मागे घेईन.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर</u> :-आता सांगितलेना सचिवांनी स्टे आहे म्हणून?*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> कागदपत्र तर हाती पाहिजेत.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंदसिंह भुल्लर :-</u> ते सचिव आहेत ते विधी अधिकारी आहेत. त्यांनी सांगितले ना स्टे आहेत म्हणुन.*

*<u>मा.महापौर :-</u> ते म्हणतात की मी माझी परवानगी मागे घेईन.*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार):-</u> स्टे असेल तर परवानगी मागे घेईनच ना? उदया करेन.*

*<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u> सी ब्लॉक येथे श्री.चंदर बावलानी यांचे प्लाटमधुन जो नाला जातो. त्यांचे साफसफाई बाबत मी कार्यवाही करीन.*

मा.सचिव :- पुढील प्रश्न.....

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-माझा प्रश्न संपला नाही तर पुढचा प्रश्न कसा घेता.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- यांचा प्रश्न होता रिटर्निंग वॉल संबंधी? आजच्या सभेत प्रभारी आयुक्त यांनी याचे उत्तर दयायला पाहिजे होते. आज



उल्हासनगरमध्ये खुपश्या इमारती धोकादायक म्हणुन जाहीर केल्या आहेत. काही इमारती नाल्यावर, नाल्याच्या बाजुला बनल्या आहेत त्या अजुन पर्यंत पडलेल्या नाहीत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- बनल्या आहेत किंवा बनत आहेत, बनणार आहेत त्या सर्व पहा.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- जशी टिल्सन मध्ये एक इमारत तोडली त्या त-हेने आमच्या सदस्यांनी अनाधिकृत इमारतीवर कार्यवाही केली पाहीजे. महापालिका नाही करत, अधिकारी नाही करत तर लोक प्रतिनिधींनी कार्यवाही केली पाहीजे. आज उल्हासनगरमध्ये खुप इमारती पडल्या आहेत. आज आमचे उपायुक्त नाही आहेत.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- अशा त-हेने अनाधिकृत इमारत बनते.त्यांनी इमारत अनाधिकृत आहे हे जाहीर केले पाहिजे व असे उत्तर दिले पाहिजे होते की ती इमारत अनाधिकृत आहे त्यावर कार्यवाही केली जावी. उगाचच एका प्रश्नावर एक तास वाया गेला. महापौर माझी एक विनंती आहे की असे जे प्रश्न येतात त्यावर आपण निर्णय देऊन देखिल यांचे समाधान होत नाही तर प्रभारी आयुक्तांनी उत्तर देऊन विषय संपवला पाहिजे. पुढच्या प्रश्नांची वेळ निघुन गेली एक तास असाच संपला.

मा.महापौर :- अजुन पंधरा मिनिटे आहेत.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- पंधरा मिनिटात किती प्रश्न होतील एका प्रश्नाला एक तास लागतो.

मा.महापौर :- पंधरा प्रश्न होतील.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपण मला एक लाख रूपये दिले. आपण मला वचन दिले होते की अजुन दिड लाख देईन या बांधकामासाठी.

मा.महापौर :- ठिक आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-ते बांधकाम लवकरात लवकर झाले पाहिजे.

मा.महापौर :- लवकरात लवकर केले जाईल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- आभारी आहे.

मा.सचिव :-प्रश्न क्र.४८७ श्रीमती पन्ना वारिंगे यांचा आहे.



प्रश्न क्र.४८७:-लॅटरिन सिच्युऐटेड इन माय वॉर्ड वीच आर नॉट युजफुल, ॲन्ड कॉझड हेल्थ मिसीरीझ. वॉट आर द मेशुअर टेकन फॉर सच परपझ? आयदर यु डिमोलीश इट ऑर यु कंन्स्ट्रक्ट न्यु ऑन इटस् प्लेस, अपार्ट फॉम इट वीच लेटरनाइज आर टोटली नॉट नीडेड वॉट अबाऊट सच लेटरनाइज? वन ऑफ दीज, सिच्युएटेड ॲट गुरूव्दारा वीच इज टोटली डेमेजड इज ऑलसो नॉट रिक्वायर्ड. देअर इज ऑलसो वन दॅट ॲपीअर फॉम माय वॉर्ड वीच वील बी मेंन्टेन बाय गुरूव्दारा ट्रस्टीज.

उत्तर :-या बाबतीत सार्वजनिक संडासाच्या सद स्थितीत चौकशी करून दुरूस्ती विषयी अथवा पाडण्याबाबत बांधकाम खात्यास कळविले आहे.

तसेच सदर गुरूव्दारा समोरील संडासाचे ५ सीट तोडून वळण रस्ता तयार केला आहे व उर्वरित तुटलेले संडास तोडण्याबाबत बांधकाम विभागास कळविलेले आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपण प्रश्न तर वाचा कुकरेजा साहेब.

मा.सचिव :- प्रश्न वाचणे हे नगरसेवकाचे काम आहे.

(श्रीमती पन्ना वारिंगे यांनी वरील प्रमाणे प्रश्न वाचला).

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपण मराठीत उत्तर दिले आहे. कृपया आपण मला उत्तर सांगा. जर मी इंग्रजीत प्रश्न देते तर तुम्ही मला इंग्रजीत उत्तर दया.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- प्रशासकीय भाषा मराठी असल्यामुळे उत्तर मराठीतच दिले जाते. तरी मी आपणांस हिंदीत सांगतो. जितक्या पण तक्रारी नगरसेवक व जनते कडून आल्या होत्या नादुरस्त अनयुझड शौचालयांसंबधी त्याबाबत चौकशी केली गेली. आपण जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा सुध्दा चौकशी केली गेली त्याप्रमाणे उत्तर दिले गेले आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-त्यावेळी गुरूव्दाराजवळ शौचालय होते आता ते बंद आहे.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- यापुढेही मी सांगत आहे. अशा त-हेचे शौचालय ज्यामुळे घाण निर्माण होत आहे. अडथळा येत आहे त्या शौचालयांचा काही उपयोग नाही. ते रिपेअर होऊ शकत नाही. सुरवातीस आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चौकशी करून तोडण्यास सांगितले होते. परंतु नंतर गुरूव्दाराजवळ जे शौचालय आहे. त्यातील अर्धा भाग तोडला गेला आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-ते तोडले आहे. एकुण किती शौचालये तोडली गेली आहेत. एकुण शौचालय किती आहेत?

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- एकुण ७७७ आहेत त्यातील ५७ तोडली गेली आहेत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-५७ तोडली आहेत म्हणजे ७२० अजुन शिल्लक आहेत.

<u>*श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-*</u> *सर्व तोडण्याच्या स्थितीत नाही आहेत.*

<u>*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे*</u> *:-नाही. नाही मी हे नाही विचारत ७२० शौचालये बरोबर आहेत की, काहींवर अनाधिकृत बांधकाम चालु आहेत.*

<u>*श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-*</u> *मी जी माहिती गोळा केली त्याप्रमाणे अजुन तरी नाही. जून २००० पासुन ५७ शौचालये तोडली आहेत. ते तक्रारी नुसार पुर्ण चौकशी करून आयुक्तांच्या परवानगीने तोडले आहे. त्यामधुन कशावरही अतिक्रमण झालेले नाही.*

<u>*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे*</u> *:-५७ शौचालये जी तोडली ती कुठे कुठे आहेत याचे स्पष्टीकरण तुम्ही देऊ शकता का?*

<u>*श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-*</u> *तुम्ही माझ्या कार्यालयात या मी तुम्हाला अवश्य देईन.*

<u>*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-*</u>*असे खुप काही शौचालये आहेत ज्यांच्यावर अतिकमण करून बांधकाम चालू आहे. तश्या तक्रारी पण काही जणांनी दिल्या आहेत.*

<u>*श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-*</u>*माझ्या चौकशी प्रमाणे अजुन पर्यंत ५७ शौचालयांसाठी अशी काही तक्रार नाही.*

<u>*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे*</u> *:-गुरूव्दाराच्या इकडील शौचालय तोडले त्याबददल शिंदे साहेब आणि आपण मला खुप मदत केली. त्यातील चार पाच शौचालये अगदी खराब अवस्थेत होते. तिथे गुरूव्दाराचे ट्रस्टी फाऊंटन बनविण्याचे म्हणत होते. त्याला गुरूव्दार चौक नाव पण देऊ आणि देखभाल दुरूस्ती पण आम्ही स्वत: करू असे ट्रस्टी म्हणत होते. याने काय होईल. त्यावर तिथे अतिकमण कोणी करू शकणार नाही.*

<u>*श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी)*</u>*:-तसा तिकडून प्रस्ताव आला पाहिजे.*

<u>*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे*</u> *:-मी आधीच पत्र दिले आहे.*

<u>*श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी)*</u>*:-आपल्या पत्रात दिले आहे पण त्यांच्याकडून तसा प्रस्ताव आला पाहिजे म्हणजे आम्ही महासभेपुढे, स्थायी समिती पुढे तो मांडू. नक्की ठेऊ.*

<u>*मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे*</u> *:-ठिक आहे. आभारी आहे.*

<u>*मा.सचिव*</u> *:- प्रश्न क्र.४८८ सुध्दा श्रीमती. पन्ना वारिंगे यांचा आहे.*

<u>*प्रश्न क्र.४८८*</u> *:-इनडिक्युअेट पीपल फॉर सॅनिटेशन इज द प्रॉब्लेम इन अेव्हरी वॉर्ड. माय वॉर्ड हॅज ५ मेलस ॲन्ड ८ फिमेल आऊट ऑफ वीच २ टू ३ प्रॉब्लेम रिमेनस् ॲबसेंट डयु टू वीच सॅनिटेशन प्रॉब्लेम अरासेस आय हेव गीवन सच कंप्लेंन्टस टू एस.आय टू इनक्रीझ द नंबर ऑफ वर्कर्स बट द सिटयुऐशन*



*रिमेनस् सेम? वॉट आर द मेसर्स यु हेव टेकन टू इनक्रीझ वर्कर्स फॉर सेनिटेशन?*

उत्तर :- शहरातील स्वच्छता राखण्याकरिता आरोग्य विभाग, महानगरपालिकेत सफाई कामगारांची १५५० मंजूर पदे आहेत. त्यापैकी १२८३ पदे भरलेली आहेत. एकूण रिक्त पदे २६७ आहेत. या पदावर सफाई कामगारांची नियुक्ती करावयाची आहे.

तसेच वशीला व अनुकंपा तत्त्वावरची भरती देखील शासनाने सध्या स्थगित केली आहे. लवकरच सफाई कामगारांची २६७ पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल व ज्या प्रभागात सफाई करिता कामगार अपुरे पडतात. त्या प्रभागात आवश्यकते प्रमाणे कामगाराची नियुक्ती करण्यात येईल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-पन्ना वारिंगे यांनी वरील प्रमाणे प्रश्न वाचून दाखविला.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- सफाई कामगारांची मंजुर पदे एकूण १५५० आहेत. इथे अंदाजे मी १२८३ ही मागची संख्या आहे यात काही बदल झालेत, कुणी रिटायर्ड झालेत, कुणी वारले आता सध्या आपल्याकडे १२८० पदे भरेलेली आहेत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपले उत्पन्न किती टक्के आहे? तरतुदी प्रमाणे २६७ अजुन भरती करू शकतो. आणि तुम्हाला माहित आहे महापालिकेत एवढा पैसा नाही.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- हा या प्रश्नाचा भाग असला तरी तो वेगळा मुददा आहे. कारण हे उत्पन्नाचे मार्ग व येणा-या उत्पन्नावर अवलंबून आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-तुम्ही आश्वासन देता का? २६७ कर्मचारी भरती करणार आहात. भरती जेव्हा होईल तेव्हा या समस्या सुटल्या जातील. काय भरती होणार आहे? हे मी विचारत आहे. तरतुद नाही, ४२ टक्के आहे. आपण पगारावर खर्च करू शकतो.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-बरोबर आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आता आपला खर्च काय आहे? ४२ लाखापेक्षा कमी, ४२ लाखापेक्षा जास्त काय आहे?

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- आता जर २६७ पदे भरली तर एक करोड ५६ लाख रूपये वेगळा खर्च लागेल.तेरा लाख दर महिन्याला लागतील. आता पर्यंत २६७ पदे भरली नव्हती. कोर्टाने त्यांला सिग्नल दिला. आमच्याकडे यादी तयार केली आहे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपले उत्पन्न व खर्च काय आहे.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-माझा प्रस्ताव जाईल. भरणे न भरणे हे आयुक्त ठरवतील.



मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-जर कायदयात तरतुद नाही. ४२ टक्केच्या वर आपण खर्च नाही करू शकत तर आपण भरती नाही करू शकत. इट वॉन्ट फिट इन द ॲक्ट इफ इट इज नॉट फिट इन द ॲक्ट २६७ लोक भरती नाही होणार मग समस्या कशी सुटेल.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- माझे काम ऐवढेच आहे की पदे भरण्याचा प्रस्ताव पाठवणे.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आपण म्हणालात भरती करणार आहोत. आपणास पदे भरण्यास चार महिने ,सहा महिने, एक वर्ष लागेल तोपर्यंत शहराची हालत किती खराब होईल. माझ्या प्रभागात फक्त पाच पुरूष कामगार आहेत त्यातील एक रामपाल तुंडा यांचा एक पाय नाही आहे. क्षमा असावी मदत नाही करू शकत. ते कार्यालयात बसलेले असतात. त्यानंतर एक कांशीराम तोलानी आहे. दोन लोक इतका मोठा प्रभाग कसा सांभाळू शकणार सांगा तुम्ही. मला नाहीतर अजुन सफाई कामगार दया.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-कुणी अपंग झाला तर....

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-नाही, नाही मी त्यांना काढा असे सांगत नाही. उलट ते कार्यालयात बसलेले असतात. तुम्ही त्यांना इतर ठिकाणी देऊन सक्षम असा कामगार देऊ शकता.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):- मला परिस्थिती माहित आहे. आपल्या प्रभागात आहे तशी इतरांच्या प्रभागात पण आहे. परंतु कामगार संख्या कमी असल्याने....

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-आधी काय होते पी.डबलू.डी. आणि टी.पी. डी.मध्ये एक स्पेशल टिम होती आम्ही आठवडयातून एकदा किंवा विनंती करून त्यांना घेऊन जात असू त्यामुळे थोडीफार सफाई व्हायची पण आता ती टीम कमी झाली आहे. त्या टिम मधील लोक जर आम्हाला प्रभागात दिली असतील किंवा इतर ठिकाणी लावले असतील तर मी केव्हापासून पत्र दिले आहे की, माझ्या प्रभागात सफाई कामगार कमी आहेत. तुम्ही त्या टिम मधुन मला कामगार पुरवा.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-आम्ही प्रत्त्येक स्वच्छता निरिक्षकांना सांगितले आहे. प्रत्त्येकाकडे चार-पाच प्रभाग आहेत. पुर्ण शहराची सफाई करण्याचे काम आमच्याकडे आहे. ते कोणताही रोड बघुन ते काम करून घेतात.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-नाहीतर आपण एक काम करा पुर्वी जी पी.डबलू डी/सॅनिटेशनची जी एक टिम होती त्यात १०-१५ लोक असायचे जे आठवडयात आलटून-पालटून दोन-तीन प्रभाग साफ करायचे. परत ती पध्दत सुरू करा.

श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-आपण जो सल्ला दिला त्यावर आम्ही विचार करू.



मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-महापौर जे आपणाकडून आश्वासन दिले आहे. दोन-तीन माणसे वाढवून दया. दोन माणसे पुर्ण प्रभाग नाही साफ करू शकत.

मा.महापौर :- तुम्हाला व सर्व सभागृहाला मी माहिती देतो की,महापालिका २६७ सफाई कामगार भरती करणार आहेत. काही महिन्यातच जितके भरती केले जातील प्रत्त्येक प्रभागात त्यांची वाटणी केली जाईल.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- महापौरजी, पूर्ण शहरात कच-याची समस्या असताना पदे रिक्त रहाणे याचा अर्थ प्रशासनाचे काम बरोबर नाही. माझा आपणांस अनुरोध आहे की यासंबधी आयुक्तांना निर्देश दयावे कि पंधरा दिवसाच्या आत एक महिन्याच्या आत सर्व पदे भरली जावी.

**श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी)**:- एक मिनिट मला अजुन उत्तर बरोबर देऊ दिले नाही. मी उत्तर पुढे दिले आहे.

**मा.महापौर :-** त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

**श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-**त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे आणि यादी बोर्डावर लावली आहे. पंधरा दिवसात सर्व माहिती मिळणार आहे ती सर्व माहिती निवड समिती पुढे ठेऊ.

**मा.महापौर** :- मॅडम तुमचा आणि माझा समान प्रॉब्लेम आहे. मी पण यातून सफर करत आहे. डोन्ट वरी.

**मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे** :- वुई हॅव डझन्ट सो वुई हॅव सफरिंग सेम प्रॉब्लेम.

**मा.सदस्य श्री.किशोर वनवारी** :- आरोग्य अधिकारींनी जे उत्तर दिले आहे त्यासंबंधी मी त्यांना काही प्रश्न विचारू इच्छितो. यांनी लिहिले आहे की, महाराष्ट्र शासनाने वशीला सिस्टमने भरती करण्यास मनाई केली आहे. मी असे ऐकले की नंतर असा आदेश आला आहे की वशीला सिस्टमने भरती केली जावी.

**श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-** आदेश आले आहेत पण इमरजन्सीमध्ये तसे करायचे आहे. यासाठी शासनाची परवानगी घेऊनच भरती करावी.

**मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:-** वशीला सिस्टम बंद झाली तर हा सफाई कामगारांवर अन्याय आहे. ४० वर्षापासून ही पध्दत आहे की, कुणीही सफाई कामगार सेवानिवृत्त झाला तर वशीला सिस्टमने त्यांच्या घरातील व्यक्तींना त्याच्या जागी नियुक्ती केली जाते. आधी महाराष्ट्र शासनाने यावर स्टे दिला परंतु नंतर परत त्यांनी आदेश दिले की, भरती करू शकता. पंजाबी साहेब म्हणाले की, २६७ पदे ही रिक्त पदे नाही आहेत. ज्या सफाई कामगारांनी महापालिकेत काम केले होते ते न्यायालयात गेले होते की आमचे २४० दिवस पुर्ण झाले आहेत. आम्हाला कायम स्वरूपी भरती करून घ्यावे. तर कोर्टाचे असे आदेश आले आहेत की, त्यांना कायम स्वरूपी भरती करून घ्यावे. आरोग्य अधिका-यांनी त्याप्रमाणे तशी यादी लावली आहे. खुपशा लोकांचे पत्ते माहिती



मिळाले नाहीत. काही परमनंट झाले आहेत, काही वारले आहेत. जितक्या जणांची माहिती शक्य होती त्यांनी बोर्डावर लावली आहे. जर थोड्या दिवसात त्यांची भरती झाली तर मॅडमची जशी तक्रार आहे त्यांच्या प्रभागात व ज्यांच्या प्रभागात सफाई कामगार कमी आहेत त्या प्रभागात आधी लक्ष दिले जावे. कुणाही नगरसेवकाचा प्रभाग असो एक ते पाच मध्ये. लवकरात लवकर भरती केले तर बरे होईल.

**मा.सदस्या श्रीमती. पन्ना वारिंगे :-** महापौर साहेब, तुम्ही खाडा बदली सिस्टम परत सुरू करा. आधी नगरपालिकेत ही पध्दत होती. माझ्यामते ही पध्दत सुरू केली तर अनावश्यक सुट्टी घेणारे सफाई कामगार त्यांच्यात सुध्दा थोडा बदल होईल.

**श्री.लांजेवार (आरोग्य अधिकारी):-**आपले म्हणणे बरोबर आहे पण २६७ पदे भरल्यावर आमचा हा प्रयत्न असेल की, प्रत्येक प्रभागात १७ ते १८ सफाई कामगार ठेऊ. त्याप्रमाणे आम्ही वाटणी करणार आहोत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- त्यात प्रथम मला प्राधान्य दया. माझ्या प्रभागात खुप समस्या आहेत.

मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :- खाडा बदली पध्दत सुरू केली तर आपल्या महापालिकेला काही नुकसान होणार नाही. यांनी सांगितले की २६७ पदे भरल्यावर खाडा बदली पध्दत नाही सुरू करू शकत. खाडा बदली सुरू केल्यानें आपल्या महापालिकेला कोणत्त्याही प्रकारचे नुकसान नाही. आपल्या उत्त्पन्नावर काही फरक नाही पडणार.जो सफाई कामगार येणार नाही त्याच्या ऐवजी दुस-याला तिथे ठेवायचे व त्याचा पगार त्याला दयायचा. याने महापालिकेला काही नुकसान नाही मला वाटते की हि पध्दत सुरू केली तर प्रत्त्येक प्रभागातील समस्या सुटेल.

मा.सचिव :- प्रश्न क्र ४८९ श्री. विनोद तलरेजा यांचा आहे.

प्रश्न क्र ४८९:-ओ) वॅाट इज द पोझिशन ऑफ स्वीमिंग पूल ॲट प्रेझेंट?
बी) वेदर इट इज ऑन लिझ टू अेनी बडी?
सी)वेदर स्वीमिंग पुल इज फंकशनिंग ऑर नॉट इफ इट इज क्लोझड व्हाय?
डी)वेदर अेनी पर्सनल टू गीव ऑन लिझ ॲझ मेड? यु आर रिक्वेस्टेड टू रिप्लाय द क्वेश्चन इन जनरल बॉडी मिटिंग इन पार्ट ४.

उत्तर :-अ)तरण तलाव सद्या बंद आहे.
ब)नाही
क)नाही.
ड)सदरचा तरण तलाव लवकरच खाजगी करणाच्या माध्यमातुन भाडे तत्त्वावर देणे संबंधीचा प्रस्ताव लवकरच महासभेसमोर ठेवणेत येईल.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- मा.महापौर, वेळ आहे ना. मी चर्चा करू शकेन का? माझा प्रश्न स्विमींगपुल साठी आहे मी चार महिने पूर्वी हा प्रश्न विचारला होतो. आज माझा नंबर आला आहे. आणि खुप दु:खाची गोष्ट आहे की, आपल्या शहरात एक तरण तलाव आहे जो कित्त्येक वर्षापासून बंद आहे. किती वर्षापासून बंद आहे? अपूर्ण उत्तर दिले आहे आपण.



श्री.ढाकरे (उपआयुक्त):- सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. तरण तलावाचा सध्याची परिस्थिती काय आहे?

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- कधी पासून बंद आहे.

श्री.ढाकरे (उपआयुक्त):- कधी पासुन बंद आहे असा प्रश्न नाही आहे.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :-ठिक आहे. आता सांगा केव्हा पासुन बंद आहे.

श्री.ढाकरे (उपआयुक्त):- सन्माननिय सदस्यांना सविस्तर माहिती जर हवी असेल तर त्यांनी मला थोडा वेळ दिला तर बरे होईल.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :-ढाकरे साहेबांनी तर सर्व प्रश्नांचे उत्तर दिले. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने तरण तलाव भाडयाने देण्यासाठी म्हणुन निविदा मागविण्याची संमती दिली आहे. त्यानंतर महासभेने संमती देऊन दोन महिने झाले आहेत. अजुन पर्यंत निविदा नाही मागविल्या. का नाही मागविल्या? खाजगीकरणासाठी.

श्री.ढाकरे (उपआयुक्त):- महासभेने सदर तरण तलाव खाजगी रित्या देण्याचा जो प्रस्ताव मंजुर केला आहे. टेंडर प्रोसेसिंगची कार्यवाही फॉम वगैरे तयार करण्याचे काम मालमत्ता विभागाकडून चालू आहे.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- हे पहा आपल्याकडे दोन प्रस्ताव होते. एक तरण तलावाचा, एक टाऊन हॉलचा परंतु टाऊन हॉल साठी निविदा मागविल्या आहेत. तसे पेपरात जाहिर पण केले आहेत. तरण तलावाचे अजुन पर्यंत का नाही झाले?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- ढाकरे साहेब, सांगा ना प्रगतीपथावर आहे. आपला नेहमीचा आवडता डायलॉग आहे.

श्री.ढाकरे (उपआयुक्त):- हा मालमत्ता विभागाशी संबंधित प्रश्न आहे की, निविदा का नाही मागविल्या. यासंबंधी संबधीत उपआयुक्त उत्तर देतील. आपण जर परवानगी दिली तर.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- बोलवा त्यांना.

श्री.ढाकरे (उपआयुक्त):-आभारी आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- वेळ संपल्याची घोषणा.

श्री.पाटणकर (उपआयुक्त):- कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- कुठपर्यंत आली आहे.

श्री.पाटणकर (उपआयुक्त):- नक्की पोझिशन मला माहित नाही.



मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- तुम्हाला काही माहित नाही, मग तुम्ही संबंधित उपआयुक्त कसे आहात? असे कसे?

मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :- मा.महापौरजी, मी काही बोलू इच्छितो. सार्वजनिक बांधकाम विभाग समितीने जे दोन ठराव पास केले ते एकत्र पास केले व महासभेत पण एकत्र मंजुर झाले. माझ्या म्हणण्याचे तात्पर्य हे आहे की, टाऊन हॉल बरोबर तरण तलावाचा प्रस्ताव पास झाला आहे. तर दोघांचे निविदा एकत्र मागवाव्या. वेगवेगळे नका मागवू नाहितर टाऊन हॉलच्या निविदा थोडे दिवसांसाठी स्थगित करा जो पर्यंत तरण तलावाची निविदा मागवित नाही तो पर्यत दोन्ही निविदा एकत्र मागविल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- नाही- नाही टाऊन हॉलची निविदा केव्हाच वर्तमानपत्रात जाहिर केली.

मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :- आतापण दोन्ही एकत्र निविदा मागवा. टाऊन हॉलच्या निविदेची तारीख बदलली जावी.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- दोन्ही एकत्र निविदा काढा.साहेब त्यांना काही बोलायला सांगा म्हणजे इतिवृत्तात नमुद केले जाईल. साहेब आता काही उत्तर देऊ शकत नाहीत.

मा.महापौरः- मी आयुक्तांना उत्तर दयायला सांगते, की नक्की परिस्थिती काय आहे?

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- साहेब इतिवृत्तात हे आले पाहिजे की पाटणकरांनी बरोबर उत्तर नाही दिले.

श्री.सोनाळे (उपआयुक्त):-तरण तलावाचे टेंडर मागविण्याची कार्यवाही कुठपर्यंत झाली. किती दिवसात टेंडर कॉल करणार आहेत. याचे उत्तर दिले नाही. मी उप-आयुक्तांबरोबर ती फाईल बघुन लवकरात लवकर टेंडर मागवू.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- हे पहा आज महासभा आहे. कोणते प्रश्न महासभेत येणार याचा तुम्ही महासभेत अभ्यास करून यायला पाहिजे होते. चार महिन्यानंतर माझा प्रश्न आला तरी त्याचे बरोबर उत्तर मला मिळाले नाही.

श्री.सोनाळे (उपआयुक्त):- इथे मला प्रभारी आयुक्त म्हणुन आताच बसविले आहे.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :- बरोबर आहे जो संबंधित अधिकारी आहे. त्याला उत्तर दयायला सांगा. ते का नाही प्रश्न वाचुन आले त्यांना विचारा आणि आम्हाला बरोबर उत्तर पाहिजे आहे.

मा.महापौर :- मला वाटते प्रभारी आयुक्तांना व संबंधित उपआयुक्तांना देखील याची नक्की पोजिशन काय आहे हे माहित नाही. त्यापेक्षा हे चांगले होईल की, मी आयुक्तांना सांगतो तुम्हाला उदया लिखित उत्तर दया.

मा.सदस्य श्री विनोद तलरेजा :-ठिक आहे.

--३०--

मा.सचिव :-प्रश्न क्र ४९० श्रीमती.सुनिता राजवानी यांचा आहे. त्या उपस्थित नसुन कार्यसुचीत नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ४९० :- उल्हासनगर महानगरपालिका पाणि पुरवठा विभागके कर्मचारीयोने उच्च न्यायालय मे एप्रिल, २००० मे याचीका दाखल कि थी, उसके नुसार मा.न्यायाधिश साहबने कहा की कामगारोंको काम पर लेना या नाही। इसका निर्णय महापालिका को लेना है। उन कामगारोंको काम पे लिया या नाही?

इस याचिका के लिए पाणी पुरवठा विभागको कितना खर्च आया?

उत्तर :-उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाच्या कर्मचा-यांनी उच्च न्यायालयात एप्रिल २००० मध्ये कोणतीच याचिका दाखल केली नाही.

याचिका दाखल नसल्याने बाकी प्रश्नाची उत्तरे देण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-क्षमा असावी प्रश्नोत्तर तास संपला आहे ना?

काही सदस्य :- अजुन पाच मिनिटे आहेत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मी विनंती करते की, श्रीमती सुनिता राजवानी यांची तब्येत बरी नसुन त्यांनी मला सांगायला सांगितले की, त्यांचे प्रश्न पुढच्या महासभेत घेतले तर मेहरबानी होईल.

मा.सचिव :- तसे त्यांचे लिखित अधिकार पत्र पाहिजे होते.

मा.सदस्य श्री किशोर वनवारी :- नाही तर कोणी सदस्य गैरहजर असेल तर कुणीही सदस्य उठून त्याच्या ऐवजी प्रश्न विचारेल.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- खरेतर त्यांना बरे नाही त्या मुंबईला आहेत.

मा.सचिव :- नियम असा आहे की, जर त्या स्वतः उपस्थित नाही राहील्या तर इतर सदस्य प्रश्न विचारू शकतो परंतु तसे लिखित अधिकार पत्र सदस्याकडे हवेत.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-मी महापौरांना विनंती केली आहे, मला त्यांनी तसे तोंडी अधिकार दिले आहेत.

मा.महापौर :- हे पहा मी नियमाबाहेर जाऊ शकत नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- हा नियमाचा प्रश्न नाही . मी आपणांस विनंती करत आहे. त्यांना आज बरे नाही आहे. तुम्ही असे बोलू नका.

मा.महापौर :- असे काही महत्त्वाचे प्रश्न आहेत का?



मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-नाही त्या प्रश्नांच्या उत्तराने समाधानी नाही आहेत. म्हणुन त्यांनी सांगितले की महापौरांना विनंती करून माझे प्रश्न पुढील महासभेत घेण्यास सांगावे.

मा.महापौर :-सी वुई वील बी क्रिएटिंग अ प्रेसिडंट दॅन एव्हरी टाईम एव्हरी अदर मेंबर वील रिक्वेस्ट फॉर अे,बी,सी. राजानी व्हॉट इज युवर ओपिनीयन?

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :-त्यांना आज बरे नाही म्हणुन त्या मुंबईला चेकअपसाठी गेल्या आहेत म्हणुन मी विनंती करत आहे.

मा.सदस्य श्री नरेंद्र राजानी :-हे महापौरांनी ठरवायचे आहे. जिथ पर्यंत माझा संबंध आहे. माझ्यामते असे कुठे लिहिले नाही की, लिखित असावे असे मला आठवत नाही.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे :- असे काही नियम असतील तर मला दया.

मा.सदस्य श्री नरेंद्र राजानीः- जर कुणी लिखित विनंती करतो तर त्याचा स्विकार कोण करतो.

मा.सदस्या श्रीमती पन्ना वारिंगे:-त्यांना बरे नाही म्हणून मी विनंती करत आहे. सी देअर इज नो हार्ड ॲन्ड पासड रूल आय अेम रिक्वेस्टींग यु. इफ यु कॅन डू इट.

मा.सचिव :- पुढचा प्रश्न क्र. ४९१ श्रीमती. सुनिता राजवानी यांचा असून त्या उपस्थित नसुन कार्यवृत्तात त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र४९१ :-महापालिकाने सुअर पकडनेके लिए कितने कर्मचारी रखे है?
अ)आज तक कितने सुअर पकडे गये?उसकी नोंद कार्यालयमें है या नही?

ब)उनको शहर के बाहर छोडनेके लिये कितना खर्च आया?
क)उन कर्मचारीयोंको उनके ओरीजनल सेक्शन में वापस भेजने वाले है या नही?
ड)इस प्रकार एक सुअर पकडनेके लिये महापालिका को कितना खर्च आया?

उत्तर :- महापालिकेच्या हदिदीतील डुकरे पकडून शहराबाहेर सोडून देण्याकरिता गठित केलेल्या दक्षता पथकामध्ये ३ महापालिकेचे कर्मचारी व २० कामगार रोजंदारीवर काम करतात. दक्षता पथक डुकरे पकडण्याशिवाय शहरातील मोकाअ जनावरे पकडणे, फेरिवाले इत्त्यादींना हटविण्याचे सुध्दा कामे करित असतात.
अ)आज पर्यंत एकूण ११५५३ डुकरे पकडुन शहराबाहेर सोडण्यांत आलेली आहेत. यांची नोंद कार्यालयात उपलब्ध आहे.
ब)पकडलेल्या डुकरांना शहराबाहेर सोडण्याकरिता दिनांक १२.८.९९ ते दि. ३०.४.२००० पर्यंत रू.८,६३,००० खर्च आलेला आहे. हयामध्ये पथकास दिलेल्या जीपवरील खर्च, महापालिकेच्या ट्रककरिता वापरलेले डिझेल/तेल व रोजंदारी कामगारांच्या वेतनाचा समावेश आहे.
क)सदर पथकामधील कार्यरत कर्मचारी आरोग्य विभागातील असल्यामुळे त्यांना परत पाठविण्याचा प्रश्नच उदभवत नाही.



ड)महापालिकेस शहरातील दिनांक१२.८.९९ ते दि.३०.४.२००० पर्यंत रू. ७,२८,००० खर्च आलेला आहे. म्हणजेच प्रत्येक डुकरामागे रूपये ७४ इतका खर्च आलेला आहे. परंतु हा खर्च शहरातील स्वच्छता राखण्याकरिता खर्च करण्यात आलेला आहे. व त्यामुळे शहरातील डुकरे कमी झालेली आहेत व डुकरे पाळणा-या व्यक्ती भिती पोटी शहरात डुकरे कमी प्रमाणात सोडतात. त्यामुळे काही काळाकरिता हे पथक कार्यरत ठेवणे आवश्यक आहे.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र. ४९५ श्री.बी.बी.मोरे यांचा आहे.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- प्रश्न क्र ४९१ नंतर सरळ प्रश्न क्र.४९५ कसा आला. त्यामधील प्रश्न कुठे आहेत?

<u>मा.सचिव</u> :-प्रश्न क्र. ४९२,४९३,४९४ श्रीमती सुनिता राजवानी यांचे असून ते नाकारण्यात आले आहेत. तसे त्यांना लेखी कारण दिले आहे.

<u>प्रश्न क्र.४९५</u> :-श्री.अशोक बोधा यांच्या प्रेसचे ग्राऊंड एक मजला अनाधिकृत बांधकामास महापालिकेने पहिली नोटीस दिनांक ४.४.९८ ला दिल्यानंतर डिमोलेशन ऑर्डर दि.१०.६.९८ ला दिली गेली होती. परंतु सदर बांधकाम न तोडल्यामुळे पुन्हा २०.६.९८ ला डेमोलेशन ऑर्डर काढली. परंतु आज मीती पर्यंत महापालिकेने अशोक बोधाचे अनाधिकृत बांधकाम का तोडले जात नाही. तर त्याचे कारण काय?

<u>उत्तर :-</u> दि.१८.७.९९ चे सर्वसाधारण महासभेमधील चर्चेनुसार सध्या स्थितीमधील चालु अनाधिकृत बांधकाम प्राधान्य देऊन तोडण्यात यावी असे ठरले आहे. व त्यानुसार सदर बांधकाम हे ९८ चे असल्यामुळे त्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> (हा माईक खाली आहे मी वर ज्याच्या विषयी प्रश्न विचारला आहे तो वर बसला आहे. त्याला सुध्दा ऐकु येऊ दया) माझा प्रश्न वरील प्रमाणे असुन आता आयुक्तांनी सांगितले की, ९५ मध्ये एक ठराव झाला की, ९५ पर्यंत जी पण बांधकामे आहेत त्यांना संरक्षण दिले

जाईल. ९५ नंतर जे बांधकाम केले जाईल ते अनाधिकृत असेल व त्याचे डिमोलेशन केले जाईल असा महासभेचा ठराव आहे. मग हे ९८ चे बांधकाम असून हे का नाही तोडले गेले कारण काय? मला बरोबर उत्तर पाहिजे नाहीतर मी महासभेत हंगामा करीन. जेव्हा जेव्हा मी बघतो याला आश्रय दिला जातो. ९८चे जर बांधकाम आहे आणि ते अनाधिकृत आहे तर ते का नाही तोडले जात? त्याला दोनदा नोटीस पण दिली आहे.

मा.महापौर :- मला वाटते आज १,२,३ कॅम्पचे जे उपायुक्त आहेत ते गैरहजर आहेत. याचे बरोबर उत्तर तर तेच देऊ शकतात.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-इकडे आयुक्त आहेत. ते बसले आहेत त्यांनी उत्तर दयावे.

श्री.सोनाळे (उपआयुक्त):-बहुधा प्रश्नाचे उत्तर संबंधित अधिकारी देतात. इकडे जे उत्तर दिले आहे त्यावर आयुक्तांची स्वाक्षरी आहे. १८ जुलै १९९९ मध्ये जी सर्वसाधारण महासभा झाली होती त्यात असा ठराव झाला होता की, जी



जी बांधकामे चालु आहेत ज्यांना परवानगी दिली नाही किंवा परवानगी दिली परंतु वायोलेशन झाले आहे. ही जी सध्याची परिस्थिती आहे त्यांना डिमोलेशन करायचे असा इथे ठराव झाला होता. आपण जो प्रश्न विचारला ती इमारत ९८ सालची आहे. आणि जो ठराव आहे तो १८ जुलै १९९९ चा आहे म्हणुन ९८ सालची इमारत डिमोलेशन नाही केली.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-आयुक्त साहेब, हे साफ चुकीचे आहे. आपण सभागृहाची दिशाभुल करत आहात. ९५ सालचे जे पण बांधकाम असेल ऑन प्लॉटवर असले तरी त्यांना संरक्षण दिले जाईल. असे महापौरांनी रूलींग दिले होते. हे ९८ चे बांधकाम आहे त्याला हा ठराव कसा लागू केला जात आहे. त्याला कसा आश्रय दिला जातो? त्याचे बांधकाम का तोडले जात नाही? इतक्या वर्षापासुन टिल्सन इमारत बनली होती ती पण आता तोडली ९८ सालचे अशोक बोधाचे बांधकाम का तोडले जात नाही?

श्री.सोनाळे (उप-आयुक्त):- आपले म्हणणे बरोबर आहे पण कोर्टाकडून आदेश, लोकायुक्तांकडुन आदेश येतात. त्याप्रमाणे डेमोलेशन केले जाते.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-याचा अर्थ असा आहे की, आम्ही पण कोर्टात गेले पाहिजे.

श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-मी असे नाही म्हणत. आपण टिल्सनचे उदाहरण दिले म्हणुन म्हणतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-आपले हेच म्हणणे आहे की, त्यांनी टील्सन साठी कोर्टातून आदेश आणला म्हणून तोडले.

श्री.सोनाळे (उप-आयुक्त):- मी टिल्सनचे उदाहरण दिले ते का तोडले याचे उत्तर सांगीतले. मी काही बोललो नाही आपणच टिल्सनचा विषय काढला.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-ती अनाधिकृत इमारत बनली होती म्हणुन कोणा व्यक्तीने त्याचा पाठपुरावा केला. हि पण विचार करण्यासारखी गोष्ट आहे. हि महापालिकेसाठी निंदनिय बाब आहे. कि महापालिकेने काही कार्यवाही केलेली नाही. म्हणुन क्ष व्यक्तीने राज्यपाल शासना पर्यंत अर्ज विनंती केले.

त्याची विनंती न ऐकल्यामुळे त्याला कोर्टात जावे लागले. शेवटी कोर्टान त्याला न्याय दिला. आम्ही इथे चार-चार महिन्यापासून प्रश्न विचारतो की, अनाधिकृत इमारत बनवली जात आहे. त्याचे डेमोलेशन का नाही केले जात? तरी बीट इन्सपेक्टर उपायुक्त त्यांना आश्रय देतात. इमारत तयार केली जाते. इमारत तयार झाल्यावर प्रभारी आयुक्त उत्तर देतात की, त्याला ९८च्या जिआर प्रमाणे आश्रय दिला आहे. हे बरोबर नाही आहे. जो पर्यंत मला बरोबर उत्तर तोपर्यंत मी पुढील कार्यवाही होऊ देणार नाही.

<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u> ९८ चा जिआर नाही आहे. उत्तरातही त्याचा उल्लेख नाही व मी पण तसे काही म्हणालो नाही. महासभेचा तसा ठराव आहे.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-असा काही ठराव झाला नाही आहे ९९ सालचा.

<u>मा.महापौर</u> :- मोरे साहेब, माझे म्हणणे ऐका.



<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-महापालिकेचे आयुक्त ९८ च्या बांधकामास अशा त-हेने आश्रय देऊ इच्छितात तर आजही शहरात अनेक अनाधिकृत बांधकाम चालु आहे आणि अजुनही पूढे होतील. अशा त-हेने महापालिकेचे कामकाज चालु राहिले तर एक इंच जागा सुध्दा शिल्लक राहणार नाही. त्याला दोनदा नोटीस पाठविली आहे त्या नोटीसचे काय झाले? काय ती नोटीस फाडून फेकुन दिली?

<u>श्री.सोनाळे (उप-आयुक्त):-</u>१८ जुलै ९९ चा जो ठराव आहे तो आणि संबंधित उप-आयुक्त आपल्याशी चर्चा करतील.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-त्या व्यक्ती कडून पैसे घेऊन काय नोटीस रदद केली गेली मला महापालिकेकडून उत्तर पाहिजे.

<u>मा.महापौर :-</u> मोरे हे जे उत्तर दिले आहे ते आयुक्त श्री.आर.डी.शिंदे यांनी स्वतः दिले आहे. आज ते उपस्थित नाहीत. आपली इच्छा असेल तर हा प्रश्न पुढील सभेत घेता येईल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u>माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, जसे आता ढाकरे साहेबांनी विनोद तलरेजाला उत्तर दिले की, चार महिन्यापासुन आम्ही प्रश्न विचारतो आणि आम्हाला उत्तर दिले जात नाही तर आयुक्त काय चार महिन्यापासून झोपले होते. लोकप्रतिनिधीला चार महिन्यापासून उत्तर मिळत नाही तर आमचा वेळ खर्च करून कशाला बसतो. यापुढे जर महासभा चालवायची आहे तर अधिकारींना प्रशिक्षण दीले जावे.प्रभारी आयुक्त असो वा उप-आयुक्त त्यांनी बरोबर उत्तर दिले पाहिजे तरच आम्ही महासभेत बसु अन्यथा नाही. महासभा रदद करा. नको अशी महासभा.

<u>मा.महापौर</u> :- ठिक आहे. भविष्यात या गोष्टीकडे लक्ष दिले जाईल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-महापौर, माझ्या प्रश्नाचे काय केले जावे आपल्या कडून उत्तर हवे.

<u>मा.महापौर</u> :- आपले मत असेल तर पुढच्या सभेपर्यंत स्थगित केले जाईल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-मी लॉक नाही करू देणार. मी याविषयी जरूर महापालिकेला प्रश्न विचारणार. जर मला उत्तर नाही दिले तर मी इथे तर उपोषणाला नाही बसणार कारण इथे मेलो तरी म्हणतील बरे झाले. मी मंत्र्यालयासमोर आमच्या आर.पी.आय चे सातही नगरसेवक उपोषणाला बसणार आहोत. हे काय चालले आहे महापालिकेत? लोक प्रतिनिधी इथे

येतात आपला वेळ वाया घालवतात. त्यांना नीट उत्तर दिले जात नाही. आज आयुक्त नाही. प्रभारी आयुक्तांनी अभ्यास करायला पाहीजे होता प्रश्नोत्तरांचा.

<u>मा.महापौर :-</u> त्यांना माहित नव्हते आपला प्रश्न इतक्या लवकर येईल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> हे तर आपण मला मी शांत बसावे म्हणुन सांगत आहात.पुढील महासभेत मला या प्रश्नाचे उत्तर नाही मिळाले तर आम्ही ही महासभा चालू नाही देणार.

<u>मा.महापौर :-</u> प्रश्न क्र.४९७ पुढील महासभेत घेतला जाईल.

--३७--

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी</u> :-मागील महासभेत आपण पिठासिन अधिकारी होता तेव्हा एका प्रश्नाचे उत्तर मला ९ महिने आधीचे दिले गेले होते. आपण चेअरपर्सन कबुल केले होते की, आठ दिवसात संबंधित विभागाकडून आपण उत्तर घेऊन दयाल. मला अत्यंत खेदाने म्हणावे लागते की, आठ दिवस काय ४८ दिवस झाले अजुन पर्यंत त्याचे उत्तर मिळाले नाही. मी विनंती करते की, आठ दिवसाचे ४८ दिवस आपण घेतले अजुन आपणांस उत्तर देण्यास किती दिवस पाहिजे?

<u>मा.महापौर</u> :- मी आयुक्तांना परत निर्देश देतो की, मा.सदस्या श्रीमती.जया साधवानी यांना त्याच्या प्रश्नाचे उत्तर आठवड्यात दयावे. नाहीतर असे समजले जाईल की, महापालिका उत्तर देण्यात असफल झाली. आम्ही संबंधित अधिका-यावर कार्यवाही करू.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :-</u> आभारी आहे.

<u>मा.महापौर :-</u> प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. आज सदनाला सुचवू इच्छितो की उल्हासनगर महानगरपालिकेचे नौजवान उप-महापौर श्री.धनंजय बोडारे यांचा वाढदिवस आहे. मागील महासभा जेव्हा मी स्थगित केली होती तेव्हा आयुक्तांच्या आईचे जेव्हा निधन झाले होते. तेव्हा सभा ४ ऑक्टोबरला ठेवण्याचे आदेश दिले होते. तेव्हा सन्माननिय सदस्य श्री.बी.बी.मोरेंनी सदनात प्रश्न विचारला होता की, ४ तारखेला का तेंव्हा मी उत्तर दिले होते की ४ तारखेला शुभ दिवस आहे. याचे उत्तर तुम्हाला त्याच दिवशी देईन. आज तो दिवस आला आहे. मी माझ्या तर्फे, नगरवासियांतर्फे , आपणा सर्वांकडुन उपमहापौरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो व त्यांचे अभिनंदन करतो.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- मी आपणांस विनंती करतो की, उप-महापौरांना वाढदिवसा निमित्त महापौर या पदावर बसवावे. व महासभेची शोभा वाढवावी.

<u>मा.महापौर</u> :- जरूर. (मा.महापौरांनी उप-महापौरांच्या मस्तकावर मुकुट घालुन त्यांना सन्मानित केले.)

सर्वांनी मंचावर येऊन उप-महापौरांचे हार-पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

<u>मा.महापौर</u> :-सदनातील सर्व सन्माननिय सदस्यांना निवेदन आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर बसावे. काही कारणास्तव मला अचानक महासभा सोडून जावे लागत आहे म्हणुन मी माझे लहान बंधु उप-महापौर हे पिठासिन अधिकारी म्हणुन सभेची पुढील कार्यवाही चालवतील.

मा.उप-महापौर पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ झाले. सर्वांनी टाळया वाजवून त्यांचे स्वागत केले.

*<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी</u>* :- मा.महापौरजी, आपणांस कसे वाटत आहे? एका वाक्यांत सांगा, काय आपण खुश आहात? कसे वाटत आहे?

*<u>श्री.धनंजय बोडारे (पिठासिन अधिकारी):-</u>* बाकी इतर दुसरे कुणी विचारणार आहे का? याचे उत्तर ४ आठवडया नंतर मिळेल.

--३६--

*<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी</u>* :-नाही,नाही, आपण या खुर्चीवर बसल्या नंतर आपणास कसे वाटत आहे?

*<u>श्री.धनंजय बोडारे (पिठासिन अधिकारी):-</u>*प्रथम नागरिक या नात्याने....

*<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी</u>* :- आपल्या आयुष्यातील ही फार मोठी गोष्ट आहे. उल्हासनगरचा प्रथम नागरिक म्हणुन आज आपण या आसनाम विराजमान आहात, जन्मदिवसाच्या शुभदिनी, आपणास कसे वाटते?

*<u>श्री.धनंजय बोडारे (पिठासिन अधिकारी):-</u>*शहराचा प्रथम नागरिक बनण्याचा आज मला जो गौरव प्राप्त झाला आहे. त्याबददल मी आभार व्यक्त करतो.

*<u>मा.सदस्या श्रीमती.जया साधवानी</u>* :- आभारी आहे.

*<u>मा.सचिव</u>* :-पूढचा विषय आहे, मागील सभेचे दि.१८/८/२००० रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>* :-पास.पास.

*<u>श्री.धनंजय बोडारे (पिठासिन अधिकारी):-</u>* दि. १८/८/२००० रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

*<u>मा.सचिव :-</u>* विषय क्र.३ .

*<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u>* :- पास.पास.

*<u>मा.सचिव</u>* :- विषय न वाचता पास पास?

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>* :- आमचा महापौर आहे. म्हणुन सर्व मंजुर करत आहोत.

*<u>श्री.धनंजय बोडारे (पिठासिन अधिकारी):-</u>*सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

*<u>विषय :-</u>* श्री.गणेश दर्शन प्रतियोगिता २००० ,बददल क्रिडा,
समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा
दिनांक २५.८.२००० रोजीचा ठराव क्र.४ कायम
*<u>करणे बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना</u>*

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती तर्फे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी गणपती सणाचे वेळी गणेश दर्शन स्पर्धा आयोजित करण्यात येत असते त्यानंतर उत्त्कृष्ठ मूर्ती, उत्त्कृष्ठ देखावा, उत्त्कृष्ठ विषय इत्त्यादी पारितोषिके दिली जातात. या वर्षी ही दिनांक १ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २००० पर्यंत सदरचा उत्त्सव

उल्हासनगर शहरात साजरा होणार आहे. त्या निमित्ताने क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती तर्फे गणेश दर्शन स्पर्धा आयोजित करण्याचे



योजिले आहे. या वर्षीच्या या कार्यक्रमासाठी स्पर्धेची एकूण पारितोषिके, व्हीडीओ शुटींग बारा दिवस, बारा दिवसासाठी दोन गाडयांचा खर्च, बारा दिवसांच्या सदस्यांचा चहा-पाण्यांचा खर्च, फोटोग्राफी खर्च, प्रमाणपत्र व प्रवेश पत्रिका छपाई इत्त्यादी कामी अंदाजे रूपये १,७५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. या खर्चास क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीची मंजुरी मिळणेस प्रस्तावित.

<u>क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम ठराव क्र.</u> <u>४दि.२५८.</u> २०००.

सुचकाचे नाव :-श्री.जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.सुभाष मनसुलकर.

हि क्रीडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती उल्हासनगर महानगरपालिके तर्फे 'श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता २०००' सालाबाद प्रमाणे आयोजित व कार्यान्वित करणे कामी मा.महापौर यांना मान्य असलेल्या सदस्यांची त्यांच्याच अध्यक्षतेखाली महासभेच्या अधिन राहून समिती नेमण्यासाठी मान्यता देत आहे. तसेच अनुशांगिक पारितोषिके व्हिडीओ शुटींग, वहान, प्रमाणपत्रे, जाहिरात, बॅनर, छायाचित्रे इत्त्यादी व्यवस्था करणे कामी अंतर्भुत खर्च रूपये १,७५,०००/-(एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र)यास मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

तसेच मा.महापौरांनी निवडलेले सदस्य समिती या ठरावाचा भाग मानला जाईल.या विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार गणेश दर्शन प्रतियोगितेचे आयोजन करून कार्यान्वीत करणे कामी विलंब झाल्यास त्यामुळे अत्त्यंत गैरसोयीचे होईल असे वाटल्यास सदरचा ठराव महासभे कडून कायम होण्याची
वाट न पहाता गणेश दर्शन, प्रतियोगितेचे आयोजन करून कार्यान्वीत करता येईल.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापति / पिठासीन अधिकारी
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
उल्हासनगर महानगरपालिका

--------------------------------------------------

सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१७ दिनांक :-४.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री.जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दि.२५.८.२००० रोजीचा ठराव क्र.४ कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :- आज तर महापौर ''मराठी भाषिक'' आहेत.

मा.सचिव :-माफ करा. राष्ट्रगीत म्हणण्यापूर्वी मा.पिठासिन अधिकारी आपले मनोगत व्यक्त करू इच्छित आहेत.

श्री.धनंजय बोडारे (पिठासिन अधिकारी):-ब-याच दिवसांनी आज संधी मिळालेली आहे. नाही तर प्रत्येक वेळी मा. महापौरांची परवानगी घ्यावी लागत होती. मराठीत बोलतो, नंतर हिंदीत ही बोलतो, सात वाजण्यास बराच वेळ बाकी आहे. उपस्थित सर्व नगरसेवक / नगरसेविका सर्व अधिकारी / सर्व सदस्य आज मला येथे जो सन्मान देण्यांत आला आहे. हा सन्मान ब-याच कमी लोकांना प्राप्त होत असतो. माझ्या मते हा सन्मान प्राप्त करणारा मी ४ था किंवा ५ वा नागरिक असेन. यामध्ये माझा नंबर लागला म्हणुन मी प्रथमच परमेश्वराचे आभार मानले आहेत. धन्यवाद.



या खूर्चीवर बसल्यानंतर आपण माझ्या गळयात पुष्पहार घालत होतात व मी त्यामध्ये दबून जात होतो, ते ओझे फुलांचे नव्हते तर ते जबाबदारीचे ओझे होते. या खूर्चीवर बसल्यानंतर असे निर्दर्शनास आले आहे की, ही खूर्ची तशी साधी नाही, या खूर्चीमध्ये काटे जास्त आहेत, हे आपल्या प्रश्नाचे उत्तर मी देत आहे,या खुर्चीत बसल्यानंतर असे जाणवु लागले आहे

की, काटे टोचणारी ही खुर्ची आहे. दिसायला सिंहासन आहे. आज या खुर्चीवर बसल्यानंतर महापौर म्हणुन मला सन्मान मिळाल्यानंतर मी उल्हासनगर शहरवासियांशी काही बातचीत करू इच्छित होतो. इच्छित आहे. आमचे काही शिवसैनिक....., महापौर या नात्याने, पक्षाच्या लोकांचा उल्लेख करत नाही, परंतु माझ्यावर प्रेम करणारे जे काही लोक आहेत, तसे तर सर्व उल्हासनगरवाशी माझ्यावर प्रेम करतात.....

यासाठीच मी मराठीत बोलु इच्छित होतो. या शुभदिनी उल्हासनगरवाशीयांना मी काही संदेश देऊ इच्छितो, उल्हासनगरमध्ये वंदेमातरम् नावाचे एक मंच आहे, किरणकुमार नावाचे एक अभिनेते येथे आले होते. स्टेजवर आल्या आल्या त्यांनी म्हटले की, येथे येण्यापूर्वी उल्हासनगर बाबत मी बरेच चुकीचे ऐकले होते.

परंतु येथे आल्यानंतर मी जे पाहिले ते बिलकुल त्याच्या विरूध्द आहे, मी जे ऐकले होते त्यांच्या अगदी विरूध्द आहे. उल्हासनगर मध्ये प्रत्येक गोष्टीचे दोन भाग आहेत. चांगले व वाईट असे दोन भाग असतात. आपण काय हाय लाईटस् करत आहोत त्याप्रमाणे संदेश जात असतो. जसे श्री. किरण कुमार यांनी सांगितले की, उल्हासनगर बाबत आम्ही चुकीचे ऐकले होते परंतु येथे तर त्या उलट आहे. येथे चांगल्या गोष्टी जास्त आहेत, त्यांना सांगणारे माहिती देणारे जे होते त्यांच्यावर हे सर्व अवलंबुन होते. त्यांच्या मनामध्ये या शहराबाबत जो पूर्वग्रह दुषित भावना निर्माण झाली होती ती भावना ते येथे आल्यानंतर अर्ध्या तासातच संपूष्टात आली. ही जी उल्हासनगर बाबत बाहेरच्या लोकांच्या मनामध्ये भावना निर्माण झाली. प्रतिमा तयार झाली. त्यास कारणीभुत आम्ही उल्हासनगर शहरवाशीच आहोत. परंतु ते बदलण्यासाठी  लोक प्रतिनिधी म्हणुन आपण तसेच नागरिकांनी नागरिक या नात्याने या शहरावर प्रेम केले पाहिजे, हे शहर आमचे आहे. ते स्वच्छ व सुंदर राहिले पाहिजे, चांगले राहिले पाहिजे. अशा प्रकारच्या ज्या भावना आपण आपल्या घराबाबत ठेवतो. त्याप्रमाणे या शहराबाबत चांगल्या भावना ठेवणे हे लोकप्रतिनिधीचे प्रथम कर्तव्य आहे. या शहराचे नाव अधिकाधिक लौकीक कसे होईल.... शहराच्या विकासाचे काम तर चालु आहेच. त्याबरोबर शहराची इमेज, प्रतिमा, कशा प्रकारे चांगली राखता येईल यासाठी प्रचार माध्यमा मार्फत आम्ही जर प्रयत्न केले. आमच्या शहराचे नाव उज्वल केले तर ते चांगले आहे ते चांगलेच आहे त्यासाठी आम्ही (हाय लाईट) करू.

कारण नवरात्रीचे दिवस चालु आहेत. मी दुर्गामातेला अशी प्रार्थना करतो की, आम्हाला सदभावना, सदबुध्दी दे, आमच्या उल्हासनगर शहराचे नाव लौकीक होवो, उल्हासनगरचा विकास होवो, हीच अपेक्षा करतो व आपली रजा घेतो, आपण मला जो सन्मान दिला त्याबाबत मी आपणांस धन्यवाद देतो. जयहिंद आभारी आहे.

<u>मा.सचिव</u> :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

--४०--

जन गन मन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायना नंतर सायंकाळी ६. २० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.पिठासिन अधिकारी श्री. धनंजय बोडारे यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा.

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय :- उल्हासनगर शहरातील महापालिकेच्या ३ प्रवेश व्दारांना नावे देण्या बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाकडुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज, शहिद दुनिचंद कालानी किंवा इतर मान्यवरांचे नांव उल्हासनगरच्या प्रवेशव्दारांना देण्याबाबतच्या प्रस्तावानुसार उल्हासनगर शहरातील प्रवेश व्दारे खालील ठिकाणी बांधलेली असून त्यापैकी दोन पुर्ण व एक अपूर्ण अवस्थेत आहे.

१) शांतीनगर जकात नाका,उल्हासनगर-३
२) साईबाबा मंदिर फर्स्ट गेट, उल्हासनगर-३, (काम अपूर्ण आहे)
३) कैलास कॉलनी, उल्हासनगर-५

वरील प्रवेशव्दारे १९९० पूर्वी पासुन अस्तित्त्वात आहेत. त्या अनुषंगाने उपरोक्त सुचविलेल्या नावांपैकी साईबाबा मंदिर फस्ट गेट, उल्हासनगर-३ जवळील प्रवेशव्दारास भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव, कैलास कॉलनी, उल्हासनगर-५ येथील प्रवेशव्दारास छत्रपती शिवाजी महाराज यांचे तसेच शांतीनगर जकात नाक्याजवळील प्रवेशव्दारास शहीद दुनिचंद कालानी यांचे नांव देण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिका सभेपुढे मंजुरीसाठी पाठविणेस प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. दिनांक :-२०.१०.२०००.

सुचकाचे नाव :-१) श्रीमती ज्योती कालानी.
२)श्री.सुभाष मन्सुलकर.
३)श्री.बी.बी.मोरे.

अनुमोदकाचे नाव :-१)श्री.पांडुरंग लांडे.
२)श्री. किशोर वनवारी
३)श्रीमती.पंचशिला पवार.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार साईबाबा मंदिर फस्ट गेट उल्हासनगर-३ जवळील प्रवेशव्दारास भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव, कैलास कॉलनी, उल्हासनगर-५ येथील प्रवेशव्दारास छत्रपती शिवाजी महाराज



यांचे तसेच शांतीनगर जकात नाक्याजवळील प्रवेशव्दारास शहीद दुनिचंद कालानी यांचे नाव देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-१)

२)

३)

अनुमोदकाची सही-१)

२)

३)

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर्र पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/१०/२०००.

इतिवृत्त

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१०/२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/१०/२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
४ श्री.वाघे शामु बाबु
५ श्रीमती.मोकल सीमा
६ श्रीमती.सोनावणे यमुना
७ श्रीमती.ज्योती कालानी
८ श्री.ढेणवाल बनवारी सुआलाल
९ श्रीमती. वेलकर सुरेखा
१० श्री.यादव नरेश
११ श्री.सोनावणे राजु
१२ श्रीमती पवार पंचशिला
१३ श्री.टाले प्रमोद
१४ श्री.आढाव रामभाऊ
१५ श्रीमती.बगाडे सुनिता
१६ श्री.भांडे भगवान
१७ श्री.ठाकुर सेवलदास
१८ श्री.वनवारी किशोर
१९ श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई
२० श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२१ श्री.पमनानी इश्वर
२२ श्रीमती.वसीटा बेबी
२३ श्री.चौधरी राजेंद्र
२४ श्री.लांडे पांडुरंग
२५ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२६ श्री.मोरे भानजी
२७ श्रीमती.सुनिता राजवानी
२८ श्री.पुरस्वानी जमनादास
३० श्री. तलरेजा विनोद
३१ श्री.रोहडा श्यामसुंदर
३२ .श्री.गुप्ता प्रभुनाथ
३३ श्रीमती. करोतिया मालती
३४ श्री.बहरानी ठाकुरदास
३५ श्री.जाधव सुरेश
३६ श्री.मोरे भिमसेन
३७ श्री.चव्हाण रमेश
३८ श्री.महाडिक प्रकाश
३९ श्रीम.वनवारी मोना
४० श्री.राजानी नरेंद्र
४१ श्री.सुभाष मन्सुलकर
४२ श्रीमती.नाईक यशस्विनी
४३ श्रीमती.राजानी भारती
४४ श्रीमती.वलेचा पदमा
४५ श्रीमती.गजवानी कांता
४६ श्रीमती.भटीजा इंदिरा
४७ श्री.केणी जयकुमार
४८ श्री.पंजाबी नारायण
४९ श्रीमती.राधवानी आशा
५० श्री.माखीजा प्रकाश
५१ श्री.रामरख्यानी मोहनदास
५२ श्री.जग्यासी राजु
५३. श्री. किशनानी गोदुमल
५४. श्री. पंजाबी लाल

१९ श्री.पारवानी रामचंद्र



१. श्री.गणेश चौधरी २. श्री.उमाप रामदास राघोजी ३ श्रीमती.दासानी मिनु ४ श्री.तेजी कैलाश ५ श्रीमती.रूपचंदानी भगवंती ६ श्रीमती.मटाई जोनिता. ,७श्रीवारींगेपंढरीनाथ ८ श्रीमती.टेकचंदानी चंद्रा ९ श्री.वाधवा गिरधारी १० श्रीमतीसाधवानी जया ,११ श्री.भाटीया जयप्रकाश, १२ .श्रीमती.जेस्वानी आशा
१३ श्रीमती.कुंदनानी लविना ,१४ श्री.आयलानी कुमार, १५. श्री. अचनानी पम्मीकुमार, १६. श्रीमती.वारिंगे पन्ना १७ श्री.बेहरानी गोप, १८. श्री.सचदेव गिरधारी, १९ श्री.केसवाणी किशोर हे सदस्यां सदस्या अनुपस्थित होतो/ होत्त्या.

सर्वप्रथम वंदेमातरम् म्हणून सभेची सुरूवात ४. ३०वाजता करण्यांत आली.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :-आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेतील कर विभागात कार्यरत असणारे शिपाई श्री. गणपत बी. गावडे यांचे परवा निधन झाले. तरी त्यांना दोन मिनिटे सर्वांनी श्रध्दांजली अर्पित करावी.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

<u>शोक पस्ताव :-</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागात कार्यरत असलेले शिपाई श्री. जी. बी. गावडे यांचे बुधवार दि.१८.१०.२००० रोजी आकस्मित निधन झाले.

सदर कुटुंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांच्या आत्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १७ अ</u> <u>दिनांक :-</u>२०.१०.२०००

सुचकाचे नाव :- श्री.सुभाष मन्सुलकर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. भिमसेन मोरे.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.जी.बी.गावडे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करीत आहे.

तसेच मृत व्यक्तींच्या कुटुबियांच्या दुःखात सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजूर

महापौर /पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुर :- मा.महापौरजी, आपल्या महाराष्ट्राचे लोकशाही आघाडी सरकारास १८.१०.२०००रोजी एक वर्ष पुर्ण झाले. त्यामुळे मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचे अभिनंदन करीत आहे. मा. महापौरांना विनंती आहे की, या कारणास्तव सभागृहात पेढे वाटण्याची परवानगी देण्यात यावी. व टाळया वाजवून त्यांचे स्वागत करावे.

(काही सदस्यांनी टाळया वाजवून स्वागत केले)

मा.सदस्या श्रीमती कांता गजवानी व श्रीमती पदमा वलेचा यांचे सायंकाळी ४.३२ वाजता सभागृहात आगमन झाले.

मा.सदस्य श्री.नरेंद राजानी :- आघाडी सरकारच्या कारकिर्दीत चार-चार तास लाईट बंद असतात. आठवडयातून दोनदा त्यांचे अभिनंदन करायचे तर करा.

मा.महापौर :- श्री. सेवलदास ठाकुर नी सांगितले की, लोकशाही आघाडी सरकारचे मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व मा. श्री. छगन भुजबळ यांच्या नेतृत्त्वाधीन एक वर्षाचा कार्यकाल पुर्ण केला आहे. या वर्षात सर्वात मोठे जे कार्य झाले आहे ते मी सदनाला सांगु इच्छितो. कालच मला मा. गृहराज्य मंत्री यांच्या कडुन हे माहित पडले आहे. त्यांनी मंत्रालयात जी सभा घेतली. त्यात १ जानेवारी १९९५ पर्यंत महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणारे जे पण अनाधिकृत बांधकाम आहे. इमारत असो, झोपडी असो, घर असो, त्यांना डिमोलेशन न करण्याचे सरकारने निर्णय घेतला आहे. व त्यांना नियमित करण्याचा निर्णय देखील सरकारने घेतला आहे. कल्याण - डोंबिवली महापालिका, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे महानगापालिका, मुंबई महानगरपालिका यांच्यासाठी ही एक चांगली बातमी आहे. व आम्ही त्याचे स्वागत करतो. असे जन-हित निर्णय लोकशाही आघाडी सरकार नेहमी करत राहील अशी अपेक्षा ठेवतो. आणि त्यांचा जो एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाला आहे त्याबाबतीत त्यांचे अभिनंदन करतो. व श्री. सेवलदास ठाकुर यांना निवेदन करतो की, त्यांनी पेढे वाटून सर्वांचे तोंड गोड करावे.

मा.सदस्य श्री.नरेंद राजानी :- त्या बरोबर माझा प्रस्तव हा आहे की, केंद सरकारास पण १२ ऑक्टोबरला एक वर्ष पुर्ण झाले आहे. मा. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखाली आघाडी सरकार कार्य करीत आहे. कारगिल युध्द, अणुबॉम्ब स्फोट इत्त्यादी अनुपम कामे केंद्र सरकारने केली आहेत. अशी कामे वर्षानुवर्षे यापूर्वी झाली नव्हती त्या सरकारचे पण आपण या बरोबर अभिनंदन करावे.

काही सदस्यांनी टाळया वाजवून स्वागत केले.

मा.महापौर :- राजानीजी, आपण जर पेढे आणले असतील तर एकत्र वाटायला सांगा.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :-मा.महापौरजी, कारगिल युध्द कशामुळे झाले.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- जर तुम्ही छेडू इच्छितात तर...

(इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते)

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडीक</u> :-मा.महापौरजी, जेव्हा गृहराज्यमंत्री आले होते तेव्हा त्यांनी महानगरपालिकेची कार्यालयाची स्थिती सुधारण्याचा प्रस्ताव आपल्यासमोर ठेवला होता. सभागृहात नीट त-हेने बसुन चर्चा सुध्दा करता येत*

--४--

*नाही खुप गरम होते. गृहमंत्री म्हणाले होते की, महापालिकेची स्थिती सुधारली पाहिजे त्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही कराल अशी आम्ही आशा ठेवतो.*

*<u>मा.महापौर</u> :-मा गृहमंत्र्यांचे विचार मी आयुक्तांना सांगितले आहेत. माझ्या पण लक्षात आहेत. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती जरा हलाखीची आहे. आशा आहे. नोव्हेंबर डिसेंबर मार्च पर्यंत महापालिकेची आर्थिक स्थिती भक्कम होईल. यासर्व प्रस्तावांवर आम्ही कार्यवाही करू.*

*<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे. प्रश्न क्र. ४९५ श्री बी.बी.मोरे यांचा आहे.*

*<u>प्रश्न ४९५</u> :- श्री. अशोक बोधा यांच्या प्रेसचे ग्राऊंड एक मजला अनाधिकृत बांधकामास महापालिकेने पहिली नोटिस दि. ४.४.९८ ला दिल्यानंतर डिमोलेशन ऑर्डर दि. १०.६.९८ ला दिली गेली होती. परंतु सदर बांधकाम न तोडल्यामुळे पुन्हा २०.६.९८ ला डिमोलेशन ऑर्डर काढली परंतु आज मिती पर्यंत महापालिकेने अशोक बोधा चे अनाधिकृत बांधकाम का तोडले जात नाही. अगर तोडले जात नाही तर त्याचे कारण काय?*

*<u>उत्तर</u> :- दिनांक १८.७.९९ चे स्थायी समिती सभागृहातील चर्चेनुसार सद्या स्थितीमधील चालु अनाधिकृत बांधकाम प्राधान्य देवून तोडण्यात यावीत असे ठरलेले आहे. व त्यानुसार सदरचे बांधकाम हे ९८ चे असल्यामुळे त्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.*

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u>माझा हा प्रश्न मागच्या महासभेत अर्धवट राहिला होता. त्यादिवशी काही जबाबदार अधिकारी हजर नव्हते म्हणुन हा प्रश्न परत घेतला आहे. (श्री.बी.बी.मोरे यांनी प्रश्नोत्तर वाचुन दाखविले) महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर दयायला कोण येत आहे.*
*(इकडे सर्व सदस्यांना पेढे वाटत असतांना)*

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- सभा चालु असताना काही खाल्ले नाही पाहीजे जेव्हा महानगरपालिका झाली व आम्हाला प्रशिक्षणासाठी जेव्हा बोलावले होते तेव्हा वरीष्ठांनी सांगितले होते की, ज्या सभागृहात तुम्ही चर्चा करायला जातात. तेथे काही खाल्ले नाही पाहिजे.*

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u>माझ्या या प्रश्नाच्या उत्तराखाली आयुक्तांची स्वाक्षरी आहे.म्हणजे आयुक्तांनी वरील प्रमाणे उत्तर लिहून दिले आहे. महापौरजी, मला हे सांगा मी पण चार वर्षापासून इथे नगरसेवक आहे. जेव्हा शिवसेना भाजप सत्ताधारी पक्ष होता तेव्हा असा महासभा ठराव झाला होता की, ९५ च्या आधी जे पण बांधकाम झाले. ऑन प्लॉटवर मग ते बिल्डिंग असो झोपडी असो घर असो दुकान असो. ते तोडले जाणार नाही. इथे स्पष्ट लिहिले आहे की, ९८ चे बांधकाम आहे. इथे रजिस्टर आणा आणि मला दाखवा की, ९८ ते २००० पर्यंत ९८ मधील कोणाचेच बांधकाम तोडलेले नाही का?*

*<u>मा.आयुक्त:-</u> मागील सभेत हा प्रश्न झाला होता. त्यावर सविस्तर चर्चा पण झाली होती. अशी माहिती मला आहे. जेव्हा मी कार्यभार सांभाळला तेव्हा ऑन गोइंग स्ट्रक्चर तोडण्याचे काम आम्ही हाती घेतले होते. सभागृहात*

यावर खुप चर्चा झाली. त्यानंतर असे एक मत ठरले की, आम्ही ठराव असा कुठेही शब्द वापरलेला नाही. पण सभागृहाचे असे एक मत होते की, जे चालु बांधकाम



आहे त्याच्यावर आधी नियंत्रण ठेवले जावे. प्राधान्यांने ती तोडली जावी. या पुर्वीचे जे बांधकाम होते त्याविषयी आम्ही काही निर्णय घेतला नव्हता. शासनाचा जो निर्णय आहे तो १ जानेवारी ९५ पासुनचा आहे. तर मी महासभेला विनंती करेन की, महासभेत हा जो निर्णय घेतला आहे त्यात जर काही बदल करायचे असेल तर आपण चर्चा करून जर काही अजुन निर्णय ठरत असेल तर महासभेतर्फे आम्हाला तसे निर्देश दिले जावे त्याप्रमाणे आम्ही पुढची कार्यवाही करू. यांनी अजुन असे विचारले आहे की, ९८ पर्यंत ते अजुन पर्यंत किंवा ९८ सालचे बांधकाम एकही तोडले नाही का? बहुतेक तोडलेही असेल आमच्या कडे आता यादी नाही पण नंतर देऊ शकतो. एखादी कोर्ट केस असेल, एखादी लोकायुक्तांची केस असेल एखादया रोडवायडिंग मध्ये किंवा गटारावर आहे म्हणुन तोडले गेले असेल खुप काही कारणामुळे बांधकाम तोडले गेले असेल. तर महासभेच्या विरोधात जाऊन काही करण्यापेक्षा महासभा जे ठरवेल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. शासन निर्णय १.१.९५ पर्यंत आहे.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> आता आयुक्तांनी जे सांगीतले ते उत्तर बिलकुल, एकदम साफ चुकीचे आहे. असे काही मत किंवा अशी काही चर्चा महासभेत झाली नव्हती की, ९८ चे बांधकाम तोडावे किंवा तसेच राहू दयावे किंवा त्याला आश्रय दिला जावा असे काही ठरले नाही. एकाही सदस्यांने तसे सांगावे मी मानेन. ९७ पासुन मी नगरसेवक आहे. माझी एकाच महासभेत अनुपस्थित आहे इतर नाही. असे काही महासभेत ठरलेले नाही. ९८ च्या बांधकामाविषयी.

<u>मा.आयुक्त</u> :- ९८ च्या बांधकामाविषयी नाही. जर तुमचे असे मत असेल की, ९५ च्या शासन निर्णयावर कायम रहायचे तर मला सर्व्हे करावा लागेल. ९५ नंतरची जी पण बांधकामे आहेत...

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> एक मिनिट...

<u>मा.आयुक्त</u> :- एक मिनिट मला बोलु तर दया. ९८ सालचे फक्त एक अशोक बोधाचे बांधकाम तोडणे योग्य ठरणार नाही. सर्वांचे एकत्र तोडावे लागेल.

<u>मा.महापौर</u> :- मोरेजी, मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतो. मी सन्माननिय सदस्य श्री.बी.बी.मोरे व सर्व सदस्यांना सांगु इच्छितो की, जेव्हा टी. चंद्रशेखर यांना उमपा आयुक्त म्हणुन अतिरिक्त कार्यभार दिला गेला. तेव्हा १२ जुलै ला आयुक्त शिंदे साहेब हे ओ.एस.डी. म्हणुन इथे नियुक्त केले गेले होते. तेव्हा सर्व पक्षीय नेते व सदस्य यांच्याशी चर्चा झाली तेव्हा शहरात वाढत जाणारे अनाधिकृत बांधकामाविषयी असे ठरले की, जेव्हा पासुन तुम्ही आयुक्त म्हणुन कार्यभार सांभाळला. तेव्हा पासुन ऑन गोईंग स्ट्रक्चर ॲक्टीव्हीटी शहरात चालू आहे ती थांबवा असे आम्हा सर्वांचे मत त्यांना सांगण्यात आले. व भविष्यात अनाधिकृत बांधकाम होणार नाही याची काळजी घ्या सांगण्यात आले. आज पर्यंत झालेल्या अनाधिकृत बांधकाम शहरात जे झाले ते जर रोड वायडिंग मध्ये येत नसेल तर त्यांना तुम्ही हात लावू नये असेही सांगण्यांत आले व यास टी.चंद्रशेखर यांनी मान्यता दिली होती. आम्ही दिलेल्या मताचा आदर करून त्यांनी हे ऐकले व शिंदे साहेब

त्या पॉलिसीनुसार काम करत आहेत. हे सदनात नव्हते ठरले. हे सदनाबाहेर जी आयुक्तांबरोबर स्थायी समिती सभागृहात चर्चा झाली त्यावर याबाबतीत मोकळया मनाने चर्चा झाली व सर्व पक्षांचे मत घेऊन हा निर्णय देण्यात आला व त्यानुसार आयुक्तांनी हे उत्तर दिले आहे.

--६--

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> महापौर साहेब, आयुक्त साहेब स्पष्टपणे बोलतात की, सदनात अशी चर्चा झाली होती. मी म्हणतो सदनात अशी चर्चा झाली नाही. जर चंद्रशेखर साहेब, आपण व आयुक्त यांची आपसात चर्चा झाली असेल तर आम्हाला माहीत नाही.

<u>मा.महापौर</u> :- मला वाटते सदनातील सर्व सदस्यांना हे माहित आहे. त्यांच्या उपस्थितीतच ही चर्चा झाली होती व निर्णय घेतला गेला होता.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- मा. महापौर, चंद्रशेखर साहेब जेव्हा उल्हासनगर महानगरपालिकेत आले तेव्हा स्थायी समिती सभागृहात सर्व सदस्यांना आमंत्रित केले होते त्यावेळी ही चर्चा झाली होती या सभागृहात चर्चा नव्हती झाली. तिकडे स्थायी समिती सभागृहात निर्णय घेण्यात आला होता.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> तसे काही लिखित आहे का? अशी अनऑफिशियली चर्चा केली गेली आहे. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत आम्ही मंचावर जाऊन काहीही बोलु. असा काही रेकॉर्ड आहे का? मला सांगा. चंद्रशेखर जे म्हणाले ते लिखित आहे का? त्यांनतर काही डेमोलेशन केले नाही का? हे सांगा.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> मला यासंबंधी बोलायचे आहे. अनाधिकृत बांधकाम कुठे झाले आहे किंवा होत असेल तेव्हा आयुक्तांनी असे म्हटले की महासभेने संकेत दिला पाहिजे. नियमानुसार आयुक्त व अतिक्रमण विभागास पुर्ण अधिकार आहे अनाधिकृत बांधकाम तोडण्याचा. महासभा त्यात हस्तक्षेप करू शकत नाही व तसे करणे हा गुन्हा देखिल आहे हे बहुतेक सदस्यांना माहित असेल. मी एक मत या सभागृहात ठेऊ इच्छितो काही सदस्यांना ते मान्य होणार नाही. कोणाही नगरसेवकांनी एखादा वैयक्तिक अनाधिकृत बांधकामाचा मुददा उठविण्याऐवजी व्यापक मुददा उपस्थित केला तर बरे होईल. जेव्हा आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम करून घेतो तेव्हा आपला नगरसेवक निधी हा दुस-यांच्या प्रभागात जाऊन वापरत नाही. की चला इथे माझा मित्र राहतो नातेवाईक राहतात तिथे मी निधी खर्च करतो असे कुणी करत नाही. स्वतःच्या प्रभागातच खर्च करतो. अनाधिकृत बांधकाम हे पूर्ण शहरात चालु असेल व तसा मुददा उठविला तर काही हरकत नाही. असे माझे वैयक्तिक मत आहे. कुणाशी वैयक्तिक स्कोर सेटल करण्यासाठी आहे म्हणुन मुददा उपस्थित करणे हे ही ठिक नाही मी कोणालाही उदेदशून बोलत नाही. वैयक्तिक मुदयापेक्षा शहरातील पूर्ण अनाधिकृत बांधकामा विषयी बोलले तर बरे होईल.

मा.सदस्य श्री.राजु सोनावणे यांचे सायंकाळी ४.४५ वाजता सभागृहात आगमन झाले.

<u>मा.महापौर</u> :- देअर इज नो क्वश्चन ऑफ सेटलिंग स्कोरस विथ ॲनी वन.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- आर यु शुअर.

<u>मा.महापौर :-</u> आय एम वेरीमच शुअर अबाउट दिस.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :- हा जो प्रश्न निर्माण झाला आहे. पर्टीक्युलर अशोक बोधांच्या बांधकामा विषयी मला हे म्हणायचे आहे की, उल्हासनगर हे अनाधिकृत शहर आहे. त्यात पूर्वीचे अधिकृत बांधकाम सोडून बाकी सर्व अनाधिकृत आहे. तरीही आम्ही अशोक बोधांच्या बांधकामाला धरूनच नाही

बोलत आहे. हा एक मुददा आला की, आयुक्तांनी सांगितले की, ९८ पर्यंतचे बांधकाम तोडायचे नाही. तरीही आमच्या अपरोक्ष आमच्या डोक्यातही नाही अशी



कितीतरी बांधकामे तोडली असतील. ९८ चे ते जर तोडले जातात तर अशोक बोधाचे बांधकाम जेव्हा चालु होते तेव्हा बीटवाल्यांनी त्यांना नोटीस देखिल दिली आहे. बांधकाम तोडण्याची देखिल नोटीस दिली गेली. तरी ते तोडले गेले नाही. यामागे अधिका-यांची काय भुमिका होती? अधिकारी दोषी आहेत की नाही? आयुक्त साहेब दोषी आहेत की नाही? त्यावेळी हे आयुक्त नसतील दुसरे कुणी असतील जर ते सर्व दोषी आहेत तर शहराने का त्रास सहन करावा? दुसरी गोष्ट अशी की जर इतर बांधकामे तोडली आहेत तर अशोक बोधाचे बांधकाम का तोडले नाही? त्यांच्या बांधकामाविषयी तक्रारी देखील होत्त्या.

<u>मा.सदस्य श्री. सेवलदास ठाकुरः</u>- एक मिनिट, माझी सभागृहाला विनंती आहे. सजेशन देत आहे. सभागृहात जो एक तास मिळतो तो काय अशी वायफळ बडबड करून वाया घालवायचा का? सजेशन आयुक्तांच्या फायदयासाठी नाही तर शहराच्या फायदयासाठी सांगतो.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी यांचे सायंकाळी ४. ४७ वाजता सभागृहात आगमन झाले.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर</u> :-आपण एक मुददा घेऊन पूर्ण सभागृहाचा वेळ घेत आहात. मी सजेशन देत आहे. जी पॉलिसी चंद्रशेखर साहेबांच्या वेळी फिक्स केली होती त्याच पॉलीसी नुसार आता वागा.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> महापौरजी, प्रश्न माझा आहे मला बोलु दया. मनपा समोर एक तंबु ठोकला आहे. ज्याचे बांधकाम ९५ वर्षापूर्वीचे झोपडे होते ते त्यांनी बनवले तर तोडून आले आहेत.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर</u> :- ९५ पासुन पॉलिसी ठरवत असाल तर....

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> सेवल खाली बसा. महापौरजी आयुक्त प्रथम म्हणाले की सदनात चर्चा झाली. मी आधी पण सांगितले की मी सदनात नेहमी हजर असतो फक्त एकच सभा माझी चुकली. चंद्रशेखर साहेब वरील प्रमाणे कधी बोलले नाहीत. बोलले जरी असतील तर त्यांच्या चेंबर मध्ये बोलले असतील ते आम्ही मान्य करणार नाही. ९८ नंतर त्यांनी आजपर्यंत डेमोलेशन केले नाही. समोर आर.पी.आय चा माणुस बसला आहे त्याचे बांधकाम ९५ सालचे होते त्यांनी कच्चे बांधकाम पक्के केले. रोडवायडिंग मध्ये त्यांचे घर गेले त्यांनी ते बनवले तरी भडकवाड साहेब ते तोडुन आले आहेत. आज ज्याची जमिन <u>७/१२</u> ची आहे महापालिकेची नाही. नागसेन नगरच्या बाजुला खुप जणांनी बांधकाम केले तिथे एका दलिताने बांधकाम केले तर ते देखिल तोडून आले. हे काय चालले आहे. महापालिकेचे दलित अधिकारी दलितांचे बांधकाम तोडत आहे. अन्याय करत आहे. यासाठी काय करायचे याबददल आम्हाला रूलींग दया. समोर तंबु टाकला आहे त्याचे बांधकाम का तोडले आहे? कारण काय? जेव्हा एका माणसाचे बांधकाम तयार होते त्याला नोटीस दिली जाते. डेमोलेशन आदेश पण निघतात त्याचे बांधकाम तोडले जात नाही. ही कोणती पध्दत आहे? रेशनिंग ऑफिसच्या इकडे जो रोड जातो तिथे सुध्दा दोन अनाधिकृत दुकाने बनली आहेत. ती दुकाने तशीच रहातात आणि आम्हा दलितांचे बांधकाम तोडले जाते. ही कोणती पध्दत आहे?अधिकारींना समोर आणा.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- महापौरजी, नियमांनुसार प्रश्नाचे उत्तर आयुक्तांना दयावे लागते त्यावर नंतर चर्चा होत नाही. पण इथे आम्ही या आधी पण पाहिले, आतापण पाहीले यांची एक-एक तास चर्चा होत आहे. प्रश्न एक किंवा दोनच होतात असे नाही झाले पाहिजे. आपले उत्तरदायित्व आहे सभागृहावर नियंत्रण ठेवणे. जर पॉलिसी मेटर डिसाईड करायचे असेल तर....

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> पंजाबींना मी सांगु इच्छितो की, तुमचे सदस्य नरेंद्र राजानी अर्धा अर्धा तास प्रश्नावर चर्चा करतात तेव्हा वेळ वाया जात नाही का?

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u> :- मा.महापौरजी, लाल साहेब पॉलिसी डिसाईड करायला सांगत आहेत ती झाली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- मा.महापौरजी तुम्हाला जर एखादे धोरण निश्चित करायचे असेल तर जसा आयुक्त साहेबांनी तुम्हाला संकेत दिला आमचे राजानी साहेब म्हणाले. तुम्ही अेजेंडावर हा विषय आणा भले हे नाही म्हणु दे. १५ नंतर तोडायचे तर सर्वांचे तोडा. कोणीही वैयक्तिक शिकार नाही झाला पाहिजे. सर्वांशी समान वागले पाहिजे.

<u>मा.महापौरः-</u> मला असे नाही वाटत की, फेश पॉलिसीची गरज आहे.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- दुसरा प्रश्न सुरू करा मग.

<u>मा.महापौर</u> :- नविन पॉलिशीची गरज नाही. मी सर्व सन्माननिय सदस्यांना सांगु इच्छितो की, जी हरकत लाल पंजाबींनी घेतली प्रश्नोत्तर तासाबाबतच्या वेळेबाबत सांगीतले तर सन्माननिय सदस्यांनी ही स्वतःची जबाबदारी समजली पाहिजे त्यांचे पण कर्तव्य आहे की, आपण जे प्रश्न विचारतो त्याचे उत्तर जर मिळाले तर बसावे. ही त्यांची स्वतःची जबाबदारी आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :- मा.महापौरजी, जसे नरेंद्र राजानी व लाल पंजाबी व जसे सुनिता मॅडम म्हणाल्या की पॉलिसी ठरवावी. तुम्ही त्यावेळी कुठे होतात ज्यावेळी मागच्या महासभेत पन्ना वारिंगेने प्रश्नोउत्तराचा संपूर्ण वेळ घेतला त्यावेळी तुम्ही कूठे होतात.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी,

इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :-मला बोलु दया. पन्ना वारिंगेंना त्यांच्या प्रश्नांचे उत्तर जसे त्यांना हवे होते तसे त्यांना नव्हते मिळाले म्हणुन एक तास वाया गेला. तसेच बी.बी.मोरे यांना समाधानकारक उत्तर जर मिळाले नाही तर प्रश्न विचारून फायदा काय?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मोरे साहेब मला परवानगी मिळाली आहे. मला बोलू दया.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-मा.महापौर आम्हाला रूलिंग दया. आमच्या प्रश्नाचे उत्तर दया. तुम्ही जे रूलिंग दयाल त्याच्याशी आम्ही सहमत आहोत.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :- मा.महापौरजी, आता हे म्हणाले की, आम्ही तुमच्या खुलिंगशी सहमत आहोत. दुःखाची गोष्ट हि आहे की, सत्ताधारी पक्ष इथे प्रश्न विचारतो विपक्ष वाले नाहीत. जेव्हा आमची सत्ता होती तेव्हा दोन वर्षात आम्ही एवढे प्रश्न.....

*<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u>* :- मा.महापौरजी,

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :- यांना बसवा आधी. माझे बोलणे पुर्ण होऊ दया.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.रोहडा श्यामसुंदर यांचे सायंकाळी ४. ५२ वाजता सभागृहात आगमन झाले.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :-मी महापौरांची परवानगी घेतली आहे.

*<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-</u>* प्रश्न माझा आहे.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :-पुरक प्रश्न आहे. खाली बसा आपण...

*<u>मा.महापौर :-</u>* बी.बी.मोरेंना मी उत्तर देतो.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>*महापौर यांना खाली बसायला लावा हा आपला अपमान आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u>* :- मा.महापौर, मन्सुलकर चहा पिता पिता तुमच्याशी बोलत आहे हा तुमचा अपमान आहे. ही काय पध्दत नाही चहा पिता-पिता तुमच्याशी बोलायची.

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>* :- एक गटनेता असुन असे वागतात हे योग्य नाही.

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u>* :- हा आपला अपमान आहे.

*<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u>* :- गटनेत्त्याचा प्रश्न नाही. एका बी.बी.मोरेच्या विरोधात एवढे जण उभे राहून बोलत आहात.

*<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u>* :- प्रथम आधी सभागृहात वागण्याची पध्दत शिका. आपण महापौरांशी बोलत आहात की चहा पित आहात. आम्ही महापौरांशी बोलत आहोत.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :-मा. महापौरजी. आपण मला परवानगी दिली आहे तर या सर्वांना खाली बसायला सांगा प्लीज.

*<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u>* :-आपला आदर ठेवून मी खाली बसत आहे.



*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :- आभारी आहे. महापौर मी आपला आभारी आहे.

मा.महापौर :- या सदनात कोणी एकमेंकांच्या विरूध्द बोलत नाही आहे. हे हेल्दी डिसक्शन आहे. कुणी जर आपले विचार मांडत असेल तर मांडु दयावे त्यात चुक काय आहे? बी.बी मोरेंच्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर त्यांना मिळेल कोणी नाही दिले तर मी देईन.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी,

मा.सदस्य श्री.बी.बी मोरे :- आधी यांना खाली बसवा. परमिशन घेतली आहे का?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरांनी मला आपल्या आधी परवानगी दिली आहे.

मा.सदस्य श्री.बी.बी मोरे :- आमचा प्रश्न आहे आम्ही बोलणार.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- असे नाही आहे. आम्ही पुरक प्रश्न विचारू शकतो. विचारा सचिव साहेबांना. सचिव साहेब एखादया सदस्यांच्या प्रश्नाला दुसरा सदस्य पुरक प्रश्न विचारू शकतो की नाही सांगा त्यांना?सचिव साहेब त्यांना उत्तर दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः- माझा प्रश्न आहे मी विचारणार.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-नियम विचारा शिका आधी. सचिव साहेब आपण यांना आधी उत्तर दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- नाही असे चालणार नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-असे कसे चालणार नाही. तुमचा घरचा कायदा आहे का? येथील नियम वेगळे आहेत.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- जेव्हा पन्ना वार्गिचा प्रश्न होता तेव्हा आम्ही काही बोललो का?

मा.महापौर :- आपल्या प्रश्नाचे उत्तर मी देतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- त्यांना बसवा आधी. जो सदस्य चार चार पाच पाच महिने आधी प्रश्न विचारतो त्याला समाधानकारक उत्तर नको मिळायला?

मा.महापौर :- प्रश्नोत्तराचा एक तास असाच निघुन जाईल प्रश्न असाच राहील.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- मा.महापौर यांना यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळू दया.



मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- मा.महापौर, मी बोलतो. मोरे साहेब आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय दुसरा प्रश्न नाही घेतला जाणार. पण कोणाला जर आपले मत मांडायचे असेल तर मांडु दया त्यांना आपला मुददा चांगला आहे म्हणुन सर्वजण विचार मांडत आहे. आपण दोन मिनिटे यांना बोलू दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- मी सदनाला सांगु इच्छितो की, यापुढे कुणाचाही प्रश्न असला तर आम्ही पण बोलणार.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- जरूर बोला.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे काण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आता महापौर म्हणाले की, प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा. महापौरजी, आपण या सभागृहाचे प्रमुख आहात त्यानुसार नियंत्रण ठेवा. विपक्ष सदस्य नेहमी विरोधातच बोलणार. परंतु जे सत्ताधारी आहेत त्यांनी सभेआधी आपसात सगळयांशी सल्लामसलत करून सभेचा वेळ वाचवू शकतात. जसे की याच महासभेत कच-यासंबंधी कोणी लक्षवेधी आणतो अशी परिस्थितीच आली नाही पाहिजे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्याने ही जाणीव करून दयावी की कच-याचे काम बरोबर होत नाही. हे आपण आपसात मिटवायला पाहीजे होते.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :- कच-याबाबत पनवेलकरांनी सेटींग केली आहे का?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मा.महापौरजी, ससाणे मॅडम काही बोलू इच्छितात त्यांना परवानगी दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- आता विषयांतर करू नका. महाडिक काय म्हणाले कच-याबाबत पनवेलकरशी त्यांचे संगनमत झाले आहे.

मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई :- अहो आता आवाज बंद करा.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई :- वार्ड नं. ३० मध्ये बांधकाम तोडले आणि अंबिकाच्या बाजुला जे इमारतीचे बांधकाम चालु आहे ते का नाही तोडत? त्याला परवानगी आहे का?

मा.महापौर :- कुठे?

मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई:- वार्ड नं ३१ मध्ये. वार्ड नं ३० मधील बांधकाम आज तोडले.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- कुणाचा प्रभाग आहे?



मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई:- मोरे साहेबांचा. त्यांच्या घराच्याच बाजुला वार्ड नं ३० मध्येच का नेहमी धावपळ होते. प्रत्येक प्रभागाच्या कामात ढवळाढवळ करतात मी काही बोलत नाही.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- बॉऊंड्री तरी माहीत आहे का प्रभागाची?

मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई:- बॅाऊड्री गेली तेल लावत. नेहमी प्रभागात ढवळाढवळ करत राहतात. माझे हे आहे माझे ते आहे करत राहतात. बॅाऊंड्री दाखवतात. इंजिनियर लोक कशाला जातात तिथे?

मा.महापौर :- मॅडम भडकवाड साहेब याबाबत पूर्ण चौकशी करून आपल्याला माहीती देतील.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- मा.महापौरजी, मला माझ्या प्रश्नाचे उत्तर आज मिळाले पाहिजे.

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :- मा.महापौर....

मा.सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई:- अहो आम्हाला बोलु दया आता.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आता मोरे साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे तो चांगला प्रश्न आहे. जर महापालिकेने ९९ पर्यंत पॉलिसी निश्चित केली आहे तर जसे दहा वर्षापुर्वीचे टील्सन मार्केट तोडले गेले. त्यासाठी सांगितले की, तसे लोकायुक्तांकडून आदेश आले आहेत. कोर्टाचा आदेश आहे. कधी कधी वैयक्तिक अर्जान्वये देखिल ९६, ९७, ९८ सालचे बांधकाम तोडले जात आहे. जसे विनोद ठाकुर चे तोडले. ते खुप वर्षाचे जुने बांधकाम होते. कधी लोकायुक्तांकडून निर्णय येतो कधी कोर्टाकडून निर्णय येतो. बांधकाम तोडले जाते. महापालिकेत असे अनेक तक्रारी बांधकामाविषयी येतात. माझ्या प्रभागात सहा बांधकामे ९८ सालची आहेत. तिथे त्यांना ९७ सालची घर पावती देण्यांत आली आहे. आधी कम्पाऊंड वॉल होती नंतर पत्रे टाकुन घर बनविण्यात आले. पॉलिसी जर निश्चित केली आहे तर त्यानुसारच वागण्यात यावे. जसे मोरे साहेब बोलले, इकडे तोडले, तिकडे तोडले, तर असे नाही झाले पाहिजे. भेदभाव नाही झाला पाहिजे. जर तोडायचे नाही तर कोणतेच नका तोडू. जसे स्थायी समिती सभागृहात निर्णय झाला होता ९९ साल पर्यंतचे बांधकाम नाही तोडले पाहिजे. एखादे बांधकाम तुटते एखादे नाही हे चुकीचे आहे. मोरे साहेब जे म्हणाले ते खरे आहे. मध्ये मध्ये सदस्य बोलतात जसे मागील सभेत भुल्लर साहेबांचा प्रश्न नव्हता तरी त्यांनी कोर्ट मेटर चा विषय काढला होता. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण त्यांचे म्हणणे ऐकले त्यावर आदेश देखील दिले. जसे पन्ना वार्गिनी तबेल्याचा विषय काढला. पाऊण तास, एक तास त्यावर चर्चा झाली. तेव्हा सर्व सदस्य शांत बसले होते. सदस्यांनी मत मांडले हा वेगळा विषय आहे. मागील महासभेत आयुक्त नसल्याने महापौरांनी रूलींग दिले होते की, पुढील महासभेत हा प्रश्न घेतला जाईल व आयुक्त याचा खुलासा करतील. आमच्या सदस्याचे समाधान झाले पाहीजे. ९९ साल पूर्वीचे कोणतेही बांधकाम तोडायचे नसेल तर त्या पॉलीसीची कडकपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. कोणतेही बांधकाम तोडले नाही गेले पाहिजे.

मा.महापौर :- मी परत सांगतो सदनामध्ये १२ जुलै ९९श्री. चंद्रशेखर आयुक्त व श्री.आर.डी.शिंदे ओ.एस.डी.म्हणून रूजु झाले त्यावेळी सर्व पक्षीय नेता, नगरसेवक, नगरसेविका सर्व हजर होते त्यावेळी हे ठरले होते की, १२ जुलै



९९ पर्यंत जे पण अनाधिकृत बांधकाम झाले आहे. ते चालेल यानंतर आम्ही परवानगी नाही देणार. इतकेच नाही तर ऑन गोइंग बांधकाम जे चालु आहे त्यांना देखिल तोडले जाईल. भले ते कमर्शिअल असो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-मला हे मान्य नाही.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- म्हणजे तुमचे महापौर चुकीचे आहेत.

मा.सदस्य श्री.प्रभुनाथ गुप्ता :- मा.महापौर मला काही विचारायचे आहे. रोड वायडिंगची जी पॉलिसी आहे ती सर्व शहरासाठी समान आहे की वेगवेगळी आहे?

मा.महापौर :- सर्वांना समान पॉलिसी लागु आहे.

मा.सदस्य श्री.प्रभुनाथ गुप्ता :- आमच्या प्रभाग क्र.४० मधील रमेश मुकणे यांच्या घरासमोर कमल ऑटो गॅरेजवाला "३ x ७" ची पाच-सहा दुकाने होती ती तोडली गेली. चार-पाच भाऊ होते वेगवेगळे झाले. कुठून तरी पैसा गोळा करून त्यांनी दुकान बनवायला सुरूवात केली. मी गावाहून परवा आलो. त्याचे पुन्हा तोडले गेले. प्रभात टॉकीज जवळ हरीराम भाटीया नावाचा बिल्डर आहे. रोड वायडिंग मध्ये दुकाने गेली नसताना देखील त्याने अनेक दुकाने बांधली. असे का होते याचा खुलासा करा नाही तर सभा नाही चालु देणार.

मा.महापौर :- याबाबत मी आयुक्तांना सांगीन की त्यांनी खुलासा दयावा.

मा.सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:- खुलासा केल्यानंतर मला लिखित स्वरूपात उत्तर पाहिजे. आमच्या प्रभागाशी अन्याय का होतो?

मा.महापौर :- ठीक आहे ते तुम्हाला लिखित उत्तर देतील.

मा.सदस्य श्री.प्रभुनाथ गुप्ता :-ठीक आहे.

मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे :- सन्माननिय महापौर साहेब, आयुक्त साहेब आज सकाळी शांतीनगर मध्ये एक गरीब कुटूंब आपल्या स्वतःसाठी घर बनवत होते. त्यांना कुठल्याही प्रकारची नोटीस न देता आज डेमोलेशन करण्यात आले. महापौर साहेब आम्ही जे बोलतो आपले त्याकडे लक्ष नाही आहे. याचा अर्थ आम्ही सुध्दा मंचासमोर येऊन बोलावे अशी आम्हाला शंका वाटायला लागली आहे.

(इकडे श्री.ठाकुर बेहरानी मंचा समोर येऊन महापौरांशी काही तरी बोलत होते)

मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे :- सन्माननिय महापौर साहेब, आयुक्त साहेब आज सकाळी शांतीनगर मध्ये एक गरीब कुटुंब आपल्या स्वतःसाठी घर बनवत होते. त्यांना कुठल्याही प्रकारची नोटीस न देता आज डेमोलेशन करण्यात आले. परंतु अंबिका दर्शनच्या शेजारी दोन मजल्यांची इमारत कुठल्याही प्रकारची परवानगी नसताना आणि रोड वायडिंग मध्ये गेले नसताना सुध्दा ते बनवत आहेत. ते कुठल्या आधारावर? आणि हा निर्णय, ही पॉलिसी श्रीमंत आणि गरीब अशी आपण ठरविली आहे का?



मा.महापौर :- मला नाही वाटत की महानगरपालिका श्रीमंत आणि गरीब मध्ये काही फरक समजते.

मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे :- नाही तर मग तिथे एक गरीब माणुस बनवत होता ते तोडुन आले. आणि दुसरीकडे जवळ-जवळ एक महिन्यापासुन काम चालु आहे. रोड वायडिंग मध्ये गेले नसताना देखिल तो आज बिनधास्तपणे बांधकाम करत आहे.

मा.महापौर :- आयुक्तांना सांगतो ते वेरिफाय करून कार्यवाही करतील.

मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे :- नाही-नाही भडकवाड साहेबांनी यावर खुलासा केला तर बरे होईल. अंबिका समोरच्या बांधकाम करणा-याकडे परमिशन असेल तर तसे त्यांनी आम्हाला सांगावे महासभेसमोर. आज जे फांऊडेशन तोडले ते कुठल्या आधारावर याचा अर्थ त्यांच्याकडे परमिशन नाही. परवानगी नाही.

मा.आयुक्त :- तुमच्या सांगण्यावरून असे दिसते की ऑन गोइंग स्ट्रक्चर तोडले गेले आहे. आणि जे तोडलेले नाही आपण म्हणता त्याच्या डिटेल्स दया. वेरीफाय करू जर ते बेकायदेशिर असेल तर ते निश्चित तोडु. डिटेल्स दया त्याचे तावडतोब तोडून टाकू.

मा.महापौर :- मी कमिश्नर साहेबांना सांगतो ते तुम्हाला समाधानकारक उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- तुम्ही हिंदीत बोला.

मा.महापौर :- मी जितके उत्तर दिले त्याच्या पेक्षा जास्त समाधानकारक उत्तर असेल असे मला वाटत नाही म्हणुन मी आयुक्तांना सांगतो की, आपल्या प्रश्नाचे त्यांनी समाधानकारक उत्तर दयावे. म्हणजे आपले समाधान होईल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-त्यांना उत्तर देऊ दया.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आपल्या रूलिंग नंतर कमिश्नरनी बोलावे का?

मा.आयुक्त :- मला हे कळु दया की, कोणत्या उत्तराने त्यांचे समाधान होईल?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- समाधान कारक उत्तर दिले नाही तोपर्यंत समाधान होणार नाही.

इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- मी सजेशन देऊ का कोणत्या उत्तराने समाधान होईल. तुम्ही तावडतोब त्यावर कार्यवाही करा.

मा.आयुक्त :- असे निवडुन निवडुन नाही तोडु शकत. सॉरी.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मा.आयुक्तांनी सभागृहावर निर्णय सोडला. सभागृह महापौरांवर निर्णय घेण्याचे सोडत आहे आपण बोला.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- मा.महापौर, मी हे म्हणतो की ९८ मध्ये त्यांनी जेव्हा बांधकाम केले तेव्हा आपल्या कार्यालयाने त्यांना नोटीस दिली नंतर परत डीमोलेशन नोटीस दिली. तरीही काही कार्यवाही केली नाही त्याला जबाबदार कोण?

मा.महापौर :- त्यावेळचे अधिकारी जबाबदार आहेत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-आता ते गेले तर काय?त्यांच्यासाठी थांबायचे? जेव्हा मी प्रश्न विचारला तेव्हा आयुक्तांनी काय कार्यवाही केली?

मा.महापौर :-हे पहा त्या दरम्यान एक नवी पॉलिसी निश्चित केली. त्यामुळे त्याबांधकामाला आपोआपच संरक्षण मिळाले. या मुदयाचा तुम्ही जास्त विस्तार करू नका. पुर्ण शहराला जो निर्णय लागु केला आहे तो यांनापण लागु करू दया.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-९९ मध्ये असे काही ठरलेच नाही आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- हा महापौरांचा अपमान आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- मा.महापौर विपक्ष पक्षांने थोडावेळ बाहेर जाऊन येऊ दे का? तुम्ही यांना समजवा.

इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे :- मोरे साहेब तुमची परवानगी घेऊन बोलू का?

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-बिल्कूल इंटरफेअर करू नका.

मा.महापौर :- दुसरा प्रश्न घ्या.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरेः-नाही-नाही दुसरा प्रश्न कसा? प्रश्नाचे उत्तर अधिकारी बरोबर देत नाही. मग असेच चालत राहील. प्रश्न विचारायचे कशाला? आम्ही विचारणारच नाही. जेव्हा महापौर म्हणतात दुसरा प्रश्न चालु करा तर प्रश्न विचारायची गरज काय? याचा अर्थ आम्हाला आमच्या प्रश्नाचे उत्तर या सभागृहात मिळणार नाही मग याचा फायदा काय?

मा.महापौर :- मोरेजी, मी पिठासिन अधिकारी म्हणुन उत्तर दिले आहे. आयुक्तांनी लिखित उत्तर दिले. तुमच्या पुरक प्रश्नाचे उत्तर दिले.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-आपल्या समोर आयुक्त सरळ-सरळ चुकीचे बोलत आहेत की सदनात चर्चा झाली. व आपण म्हणता स्थायी समिती सभागृहात चर्चा झाली. आपण सांगा किती फरक आहे दोघांच्या बोलण्यात.



ठिक आहे चंद्रशेखर यांनी निर्णय घेतला तेव्हा मी नसेन. परंतु कायदयान्वये लिखित असे काही आहे?सांगा मला. त्यानंतर कुणाचे तोडले नाही. ते रजिस्टर तर आणा मी पाहीन की त्यानंतर कुणाचे बांधकाम तोडले आहे की नाही ते.

मा.महापौर :- पुढील सभेत आपल्याला रजिस्टर दाखविण्यात येईल चालेल.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-सोडा जाऊ दया.

(असे म्हणुन श्री.बी.बी.मोरे यांनी पाण्याची बाटली खाली फेकली व आर.पी. आय च्या सर्व नगरसेवकांसहीत आर.डी.शिंदे मुर्दाबाद असा निषेध करून ५. २५ वाजता सभा त्याग केला)

(इथे सर्व अधिकारी गण मा.आयुक्त यांच्या विरूध्द दिलेल्या घोषणे बददल निषेध म्हणुन सभा त्याग करत असताना)

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- अधिकारी कुठे चालले आहेत?

मा.आयुक्त :-सभा त्याग करू नका. सर्व अधिकारी बसून घ्या.

मा.सदस्या श्रीमती इंदिरा भठिजा हया सायंकाळी ५. २५ वाजता सभागृहातून बाहेर पडल्या.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ४९६ हा श्री.बी.बी.मोरे यांचा असून ते उपस्थित नसुन कार्यवृत्तात त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र४९६ :- नगरपालिका असतांना शहरात म्हणजे विशेषतः झोपडपट्टी विभागात पावडर, तेल व मच्छर मारणेसाठी धुराची मशीन व्दारे धुर मारून मच्छर मारले जात असे परंतु महापालिका झाल्यापासुन आज मिती पर्यंत का मारली जात नाही अगर मारले जात नाही तर ही औषधे कोठे जातात? त्याचा खुलासा दया?

उत्तर :- उल्हासनगर शहरातील झोपडपट्टी विभागात सफाई कामगार नाही किंवा घाण साफ केल्यानंतर आवश्यकतेनुसार जंतुनाशक पावडर टाकतात किंवा जंतुनाशक औषधाची फवारणी करतात. तसेच डासांच्या प्रतिबंधनासाठी नालीमध्ये अळीनाशक तेल किंवा औषधे आठवडयातुन एकदा सोडली जातात. त्यामुळे डांसाच्या उत्पत्तीला आळा बसतो. राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत किटकनाशकांची फवारणी जून महिन्यात करावयाची असते. तसेच डासांचे प्रमाण वाढल्यास मशीनव्दारे तात्काळ डास मारण्यासाठी किटकनाशकाचा धुर आवश्यकतेप्रमाणे केला जातो. किटक नाशकांच्या धुराची वारंवार आवश्यकता नसते.

आरोग्य विभागातर्फे सर्व प्रभागांना जंतुनाशके औषधे प्रभागात वापरण्यासाठी वितरित करण्यात येतात. व आवश्यकतेप्रमाणे वापरली जातात. याची नोंद प्रत्येक प्रभागातील नोंद वहीत आहे.

मा.सचिवः- प्रश्न क्र४९७ श्री. नारायण पंजाबी यांचा आहे.

प्रश्न क्र ४९७:-१)आफ्टर रीवाइज प्लान फॉम टी.पी.डी., श्री.गुल भाटीयाझ आर.सी.सी.कॉम्प्लेक्स नीअर लव-कुश अपार्टमेंट उल्हासनगर-३ इज गोइंग ऑन ॲज पर प्लान ऑर नॉट.



२)वेदर यु हेव गीवन हीम द इनस्ट्रक्शन टू रिमूव्ह द वायोलेटेड पोरशन, बीफोर कंन्स्ट्रक्शन ऑफ आर.सी.सी कॉम्प्लेक्स.
३)वेदर द ग्राऊंड फ्लोअर शॉपस ऐरीया आर ॲज पर रिवाइजड प्लान, इफ नॉट व्हाय द डिमोलीशन प्रॉग्राम इज नॉट कॅरीड आऊट.
४)इफ द एक्सेस ऐरीया ऑफ आर.सी.सी कॉम्प्लेक्स ऑफ श्री. गुल भाटीया इज डिटेक्टेड दो टाऊन प्लानर, व्हाय ही इज नॉट गीवन परफेक्ट मार्कींग फॉर द डिमोलीएशन ऑफ सेड स्ट्रक्चर.
५)डिमोजीअेशन ऑर्डर इज गीवन टू गूल भाटीया ऑन २९.३.२००० बट अपटील नो डेट इज नॉट फीक्सड् फॉर द डिमोलीऐशन ऑफ एक्सेडस् ऐरीया ऑफ गुल भाटीया आर.सी.सी कॉम्प्लेक्स.
६)फॉर ॲक्युरेट डीमोलेशन रिमुव्हल ऑफ एक्सेस अेरीया, डिमोलीऐशन प्रोग्राम मस्ट बी कॅरीड आऊट अंडर द सुपरव्हीजन ऑफ टाऊन प्लानर.
ॲज सच द कॉन्सरन मे बी डायरेक्ट टू गीव डिटेल ॲन्सर इन द मेटर.

उत्तर :-१)द रिवाइजड् प्लान हॅज बीन ॲप्रुव्हड बाय द कॉर्पोरेशन ॲन्ड द वर्क इज एट टू बी कंम्पेट टील टूडे. वर्क इज प्रोग्रेस.
२)यस.
३)ग्राऊंड फ्लोअर शॉपस आर परपोझड् इन द रिवाइज प्लान ॲन्ड द वेलिडिटी ऑफ द ॲप्रूव्हड प्लान इज वन इअर फॉम द डेट ऑफ कमेन्समेंट.
४)द एक्सेस कॉन्स्ट वॉज ऑलरेडी डिमोलिशड् बाय द ॲप्लीकंन्ट. हाऊअेव्हर डयु टू चेंजेस इन द रीवाइज्ड प्लान द टाऊन प्लानर हॅज इन्डीकेटेड टू डिमोलिश द एक्सेस कॉन्स्ट इन द प्लान ॲप्रुव्हड व्हीच इज शोन इन द ड्रॉविंग.
५)द डिमोलीशन ऑर्डर वॉज पासड् ऑन २९.३.२०००फॉर डिमोलीशन ऑफ एक्सेस कॉन्स्ट श्री. गुल भाटीया हॅज रिक्वेस्टेड द देम कमिशनर ऑफ यु.

एम.सी.डॅट ड्यू टू फायनान्शीयल पॉब्लेमस् द टाईम पीरीयड ऑफ ३ मंन्थस वी ग्रेंटेड टू अरेंज फॉर सम फीनिश द कॉन्स्ट ऑफ माय बिल्डिंग.
६)द रिक्वेस्टेड टाईम पीरीयड मेंन्टेड इन दीस लेटर इज ३०.६.२०००, आफ्टर द लेप्स ऑफ अबाऊ टाईम पीरीयड द डिमोलीशेशन ॲन्ड रिमुव्हल ऑफ एक्सेस अेरीया टू बी डिमोलिशड् वील बी कॅरिड आऊट.

<u>मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी</u> :- ठिक आहे.

<u>मा.सचिव</u> :- प्रश्न क्र ४९८ श्री. रामदास उमाप यांचे आहेत. त्यांचे पाच प्रश्न सलग आहेत ते उपस्थित नसल्यामुळे त्यांची कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र४९८</u> :- सुवर्ण जयंती रोजगार हमी योजने अंतर्गत चालणा-या कामावरील एकूण खर्च व प्रत्यक्षात किती कामे झाले आहे?

<u>उत्तर</u> :- सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेचे कामासाठी रूपये १७,१४,७१३/- एवढा खर्च झालेला आहे. तसेच २४ प्राकंलनांचे कामे सुरू असून विहित मुदतीत कामे पूर्ण करण्यांत येणार आहे. (कामे प्रगती पथावर आहेत.)

<u>प्रश्न क्र४९९</u> :- सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेत कामगारांना वेळेवर पगार दिला आहे काय?



<u>उत्तर</u> :-रोजगार हमी योजनेत कामगारांना वेळेवर पगार देणेत येत आहे.

<u>प्रश्न क्र५००</u> :- सुवर्ण जयंती रोजगार हमी योजने अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये किती काम झाले आहे....?

<u>उत्तर :</u>- प्रभाग क्रमांक ८ चा सी.सी पॅसेज गटार व शौच्छालय बांधणेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. त्यांचे तर्फे प्रशासकीय मंजुरी प्राप्त होताच कामांना सुरूवात करणेत येणार आहे.

<u>प्रश्न क्र५०१</u> :- प्र.क्र.८ मध्ये सुवर्ण जयंती रोजगार हमी योजने अंतर्गत नगरपालिकेचे १० सीटचे संडास व दोन ठिकाणी संडास बांधणेसाठी केलेले खड्डे येथे काम कधी पूर्ण होणार की नाही?

<u>उत्तर :</u>- प्रभाग क्र.८ जवळ संत ज्ञानेश्वर नगर जवळ नाल्याजवळ सहा बैठकीचे शाच्छालयाचे काम सुरू केलेले असून सदर कामे प्रगती पथावर आहेत.

दुस-या ठिकाणी जी जागा दर्शाविली रोडवर तेथेही जिल्हाधिकारी कार्यालयाची मंजुरी मिळताच कामांना सुरवात केली जाईल व प्रस्तावित कामे विहित मुदतीत पुर्ण करणेची तजविज आहे.

<u>प्रश्न क्र५०२</u>:- सुवर्ण जयंती रोजगार हमी योजना शहरी भागात राबविणे साठी सक्षम व शैक्षणिक पात्रता असलेल्या अधिका-यांची नेमणुक केली आहे का? असेल तर त्याची शैक्षणिक पात्रता काय?

<u>उत्तर :-</u> सुवर्ण जयंती शहरी रोजगार हमी योजना शहरी भागात राबविणेसाठी अधिका-यांची शैक्षणिक पात्रता योग्य असुन संबंधित अधिकारी योजना राबविणेसाठी सक्षम आहेत. तसेच अधिका-यांची नेमणुक नियमानुसार केलेली आहे. प्रकल्प अधिकारी यांची शैक्षणिक पात्रता एस.वाय.बी.ए. व आरोग्य निरिक्षकांचा डिप्लोमा झालेला आहे. नुकतिच या कामावर नियंत्रण ठेवणेची जबाबदारी उपआयुक्त (अतिक्रमण)यांचेवर सोपविणेत आलेली आहे.

मा.सचिव :-प्रश्न क्र५०३ हा मा सदस्य श्री. रामदास उमाप यांचा असुन तो नाकारण्यांत आला आहे. म्हणुन सभेत घेता येत नाही.

मा.सचिव :- प्रश्न क्र५०४ हा श्रीमती इंदिरा भठिजा यांचा असून त्या उपस्थित नसल्याने कार्यवृत्तात त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र५०४:-ऐ)व्हाय सपना गार्डन इज बीयींग गीवन ऑन रेंट फॉर मॅरेज परपझ?
बी)द मेरेज सेरीमनिझ इन द सेड गार्डन कंन्टीन्युझ अप टू २.०० ऐ.एम. ॲन्ड कॅव्झड नॉइज पोल्यूशन मच टू द अनरेस्ट ऑफ नेबरींग रेसिंडेंट.
सी)वेदर यू वुल्ड स्ऑप गीवींग सपना गार्डन फॉर मेरेज परपझ ऑर नॉट?
डी)देअर इज स्ट्रॉग प्रोटेस्ट फॉम द नेबरींग रिसाइडस् अगेन्स्ट द अलॉटमेंट ऑफ द सपना गार्डन फॉर मॅरेज परपझ?
इ)वॉट इज इन्क्लीमेशन ऑफ द कार्पोरेशन टू डिस्पेन्स वीथ द सेड प्रॉब्लेम?

उत्तर :- अ)तत्त्कालिन नगरपालिका स्थायी समिती ठराव क्र६५४ दि.१९.११.८७ अन्वये सपना गार्डन भाडे तत्त्वावर लग्नासाठी देण्यात येते.
ब)सदर बाब पोलिसांच्या कक्षेत येते.

--१९--

क)सदर बाब महानगरपालिकेच्या कक्षेंत येते.
ड)सपना गार्डन जवळील रहिवाश्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास त्यावर विचार करणेत येईल.
ई)सदर बाबींवर कारवाई करणेसाठी नगरपालिका सक्षम आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५०५ हा श्रीमती. सुनिता बगाडे यांचा असून त्या उपस्थित नसल्याने कार्यवृत्तांत त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र५०५ :- अ) दि.२ मे, १९९९ पासुन आजपर्यंत प्र.क्र. १६ मध्ये एकूण किती टॅंकर पाणी पोहचले व त्याकरिता महानगरपालिकेला किती पैसे मोजावे लागले?
ब) १ एप्रिल, १९९९ ते १६ फेब्रुवारी ,२००० पर्यंत महानगरपालिकेने एकुण किती वार्डामध्ये पाणी पुरवठा केला व एकुण किती टेंकर पोहचले व एकूण किती गाडया चालल्या?
क)पाणी पुरवठा विभाग नं.३ व पाणी पुरवठा वि.क्र५ मध्ये एकुण किती टेंकर भरले जातात व महिन्याला किती टेंकर देण्याची तरतुद आहे.
ड)दोन्ही पॉईन्टवरून भरले जाणारे टॅंकर मर्यादित वेळेमध्ये पूर्ण चक्कर (फे-या)पूर्ण करतात काय?
इ)१ एप्रिल १९९८ ते १ एप्रिल, २००० पर्यंत प्र.क्र१६ मध्ये किती टेंकरने पाणी पुरवठा करण्यांत आला, त्यांची संख्या दयावी? व त्यांचे बील किती झाले त्याचा तपशील द्यावा.

उत्तर :-अ) प्रभाग १६ मध्ये सदर कालावधीत एकुण ४३११ टेंकर्सव्दारा पाणी पुरवठा करण्यात आलेला असून यांचा एकुण खर्च रू.८,७५,१३३/- झाला आहे.
ब) सदर कालावधीत एकुण ३१ प्रभागात २०,८७६ ५टॅंकर्स पाणी पुरवठा केला व सरासरी १० ते १२ टेंकर्स पाणी पुरवठा करीत होते.
क)सद्यस्थितीत विभाग नं.३ येथुन सरासरी ७५ ते ८० आणि विभाग नं.५ मधुन ५५ ते ६० टेंकर्स भरले जातात. विशिष्ठ तरतूद नाही. मात्र मागणीनुसार टेंकर्स भरले जातात.
ड)विद्युत शक्ती खंडीत होणे अथवा एम.आय.डी.सी. चा पाणी पुरवठ्याचा दाब यातील कमी जास्त प्रमाणामुळे फे-यांमध्ये फरक होतो.
ई)सदर कालावधीत प्रभाग १६ मध्ये एकूण ६०४८ टेंकर्सने पाणी पुरवठा केला व त्याचे देयक रू.१२,७४,४९२/- इतके झालेले आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र. ५०६ व ५०७ हा श्री. वी.बी.मोरे यांचा असून ते उपस्थित नसल्याने कार्यवृत्तांत त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र५०६ :- महापालिकेने रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत विस्थापित झालेल्या नागरिकांना पर्यायी जागा दिलेल्या आहेत व ज्यांच्या रस्ता रूंदीकरणामध्ये काहीही संबंध नाही, त्यांनाही दिलेल्या आहेत का.....?

उत्तर :- महापालिकेमार्फत रस्ते विकास कार्यक्रम हा एकाच वेळी युध्दपातळीवर घेण्यात आला त्यामध्ये रस्ता रूंदीकरण करताना अनेक दुकाने घरे कुठली व अशा विस्थापित लोकांना पर्यायी जागा देण्यात आल्या. पर्यायी जागा देताना जे लोक रस्ता रूंदीकरणामध्ये विस्थापित झालेले आहे. त्यांनाच जागा देण्यात आल्या आहेत. कोणाही अन्य इसमास महानगरपालिके मार्फत जाणुन बुजून जागा दीलेल्या नाहीत तथापि अपवादात्मक प्रकरणात असे घडून



आल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित जागा अथवा बांधकाम हे अनाधिकृत ठरून निष्कासित करून अहवाल सादर करण्यात येईल.

प्रश्न क्र५०७ :-मधुबन हॉटेल पासुन शहाड स्टेशन कडे जाणा-या रस्त्त्यावर नेपाळी चायनिज फुडवाल्याचे दुकान किंवा घर होते कींवा नाही? नसल्यास त्याला प्लॉट नं. ६१९ मध्ये कोणत्त्या आधारावर जागा देण्यात आली?

उत्तर :- मधुबन हॉटेल ते शहाड रस्त्त्यावरील नेपाळी चायनिज (राजन आर शर्मा)फुडवाल्याचे कच्चे दुकान (खादय पदार्थ विक्री गाडी व बाजुने लावलेल्या चयाव पत्र) होते. तसेच सदर रस्त्त्यावर तो अन्य खाजगी माणसाच्या घरात भाडयाने रहात आहे. रस्ता रूंदीकरणामध्ये ज्या लोकांचे घरांचे नुकसान झाले त्यांना प्लॉट नं. ६१९ मध्ये जागा देताना संबंधित नेपाळी चायनिज हा सुध्दा बनावट टॅक्स पावती व तुटलेल्या घराचे फोटो दाखवून आपले रस्ता रूंदीकरणात नुकसान झाल्याचे सांगीतल्यावरून व फोटो दाखविल्या वरून संबंधित प्लॉट नं ६१९ येथे जागा देण्यात आली होती. तथापि तदनंतर दिनांक ९.६.२००० रोजी स्थानिक चौकशी मध्ये संबंधिताचे दुकान हे फिरत्या गाडीचे स्वरूपात असल्यामुळे ते रस्ता रूंदीकरणातून दुर करण्यात आले. त्याचे घराचे कोणत्त्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे दिसुन न आल्याने त्याला देण्यात आलेला प्लॉट नं. ६१९ मधील घराचा गाळा निश्कासित करण्यात आलेला आहे.

मा. सचिव :- प्रश्न क्र ५०८ हा श्री. विनोद तलरेजा यांचा आहे.

प्रश्न :- ए)वेदर टू डी. सी. लेटर्स डेट. १२.६.९८ वेअर ॲडरेश टु श्री. जे. एम. ढाकरे, डीवाय. म्युनिसिपल कमिशनर (एच.क्यू.)बाय द पि.जी. हेडी सूपरिटेंडंट एक्साईज डिपार्टमेंट , ठाणे.
बी)इज इट नॉट ट्रु दॅट द से लेटर्स आर अबाऊट द इनक्यायरी ऑफ अन-ऑथराइज्ड कन्स्ट्रक्शन ऑफ ११ रिस्टुरेंडस ॲण्ड बारस रिफिरड देअर इन.
सी)इज इट नॉट ट्रू, दॅट द सेड रिफरेन्स वेअर मेड ऑन द बेसिस ऑफ कम्पलेन्ट रिसिव्हड बाय द बोगस बिल्डींग परमिशन ॲलेगड् टु बी सबमिटेड बाय द सेड ओव्हनर्स ऑफ रेस्टॉरंट ॲण्ड बारस.
डी)इज इट नॉट ट्रू दॅट श्री. जे.एम. ढाकरे, डी.वाय. म्युनिशीपल कमिशनर अंडर इटस लेटर नं. २६८/९८ डेट १६.७.९८ इश्यु फोरम टी.पी डी. डिपार्टमेंट दॅट ऑल द बिल्डींग इन क्योशन वेअर इश्यूड नेसेसरी परमिशन डयुरिंग द टाईम ऑफ कान्सिल.
इ) इज इट नॉट ट्रू दॅट द सेड लेटर ऑफ श्री. जे.एम. ढाकरे, डेप्यू. म्यूनिसिपल कमिशनर अमाउंटेड रिटीफिकेट डिक्लेअरींग द ईलिगल बिल्डींग

अस लिगल बिल्डीग ॲण्ड हेल्पड द अवेअरर्स ऑफ रेस्टारेंटस ॲण्ड बार टू ऑब्टेन बिअर बार लायसेन्स ऑन बेनर्स डाक्युमेंटस.
एफ)केन मि. ढाकरे रेस्टिफॉय ॲण्ड ऑथरिटी अस टू वेन ॲण्ड वॅट परमिशन वेअर ईश्यू टू सच रेस्टारेंट.
जी) वाय द प्रुफ बी नॉट मेड थ्रो इनडिपेंडट एजेन्सी फोर द साईड ऑफिस? प्लीज ब्रिंग ऑल द रिलीवेंट डॉक्यूमेंटस इन द मिटींग.

उत्तरः- अ) १२.७.९८ चे पत्र कार्यालयास प्राप्त झाले आहे.
ब) बरोबर आहे.
क) सदरचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. व ते ११ हॉटेलचे बांधकाम अधिकृत आहे किंवा अनधिकृत आहे याबाबत आहे.



ड)होय. सदरचे पत्र उपायुक्त कार्यालय उल्हासनगर यांचे कार्यालयातून जारी झाले आहे.
इ)नियमानूसार निर्णय देणे बाबत सूचिविले आहे.
ई) मा.उप-आयूक्त यांनी बांधकाम परवानगी शिवाय इतर परवानगी दिल्याचे म्हटले आहे.
ऊ) संबंधित कागदपत्रे घेवून उपस्थित रहातील.

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क. ५०९ हा प्रभुनाथ गूप्ता यांचा आहे.

प्रश्न :-अ) सपना गार्डन की पी.डब्ल्यू.डी. की आफिस एंव लाईट की ऑफिस मोनार्च कंपनी को कैसे दि गयी है? भाडा कितना है ।
ब) इसके बाजू मे किसने ऑफिस बनाई है, किसने बनाया है? क्या आपने परमिशन दिया था?
क) पहले ठेकेदार को खाली ग्राऊंड दिया गया था, अभी इन्होंने पुरा ग्राऊंड कब्जा कर लिया है, इससे स्कूल के बच्चो को , खेलने कुदने के लिए जादा परेशानी होगी, इसको ,खाली कराया जाये?
ड) विश्वसनीय सुत्रोसे पता चला है की, १०रसिद बुक गुम हो गया है, शायद ५२९ से ५३०० तक, इसके बारे में आपने क्या कारवाई की है?
इ) शहर के व्यापारियों में रोष है । गाडी कुछ बेवजह रोखकर तंग किया जाता है । एंव दादागिरी की भाषा करते है, कर्मचारी...
ई)पता चला हैकी, लाईट डायरेक्ट लिया गया है। जबादार कौण? अगर कोई अप्रिय घटपस घटी तो जबाबदारी किसकी होगी ?

उत्तर :- अ) पत्र क्र. २३ / दिनांक १०.५.२००० द्वारा अनुमती दि गयी है ।
ब)जानकारी नही है मोनार्च क. का गोदाम बनाया गया है।
क) संपूर्ण ग्राऊंड दिया गया है ।
ड) अभीकर्ताने पुस्तक गुम होन की सूचना महानगरपालिका को देणे के बाद पुलीस से भी शिकायत दज कराई है। जांच जारी है ।
इ) रोष बाबत व्यापारीयोकी कोई शिकायत जाकत विभाग में दर्ज नही है ।
ई) लाईट बाबत जबाबदारी म.रा.वि. मंडळ की है ।

मा. सदस्य श्री प्रभूनाथ गुप्ता :- ठिक आहे.

मा. सचिव :- प्रश्न क्र. ५१० हा श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा आहे.

प्रश्न :- अ) शहर मे कितने आरक्षित भुखंड है? और कितना क्या है।
ब) भुखंड का नं. क्या है? किसने अपने कब्जे में किया है? इसका नाम पुरा पत्ता दे । डिटेल में सदन में पेश करे ।

क) जिसने हडपा है, उसको आपने क्या किया है? और क्या करने का विचार है ? किसके लिए रखा गया है?
ड)कुड दिनो पहिले जिन बिल्डरो के अवैध बांधकाम तूट रहे थै, किन्होने प्रतिज्ञा पत्र दिया था की, हम अपने हाथो तोड देते है? कितने तूटे कितने बचे ?
इ)कितना पुरे शहर में प्रतिज्ञा पत्र महानगरपालिका को दिये थे?
ई) कार्पोरेशन आने बाद कितने लोगों ने अपने बिल्डींग का स्टे ऑर्डर लेकर आये है? कितना रदद हुआ? तो आपने क्या किया ? नाम और पता लिखे.

--११--

<u>उत्तर :</u>-अ) आरक्षित भुखंड १८२ आहे. त्यामधील १५८ महानगरपालिकने विकसित करावयाचे आहे.
ब) वरीलप्रमाणे.
क) सदर बाबत सर्व आरक्षित भुखंडाचे सर्वेक्षण केल्या नंतरच माहिती देता येईल.
ड)एकुण १६ लोंकांनी प्रतिज्ञापत्र दिले होते पैकी ७ तोडले व ८ महानगरपालिकेने कारवाई केली.
इ) प्रश्न क्र ड चे उत्तर प्रमाणे.
ई) महानगरपालिका अस्तित्त्वात झालेनंतर कागदपत्रे पडताळणी केली असल्यास, अनाधिकृत बांधकामाविषयी कोणतीही स्टे ऑर्डर झालेली नाही.

<u>मा सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :-</u> ठिक आहे.

<u>मा. सचिवः-</u> प्रश्न क्र ५११ हा श्रीम. सूनिता बगाडे यांचा आहे.

<u>प्रश्न :-</u> १) महानगरपालिकेमध्ये आतापर्यंत किती नोकर भरती करण्यात आली.
२) अनु. जाती अनु. जमाती व इतर मागासवर्गीय एकूण किती कर्मचारी सदया महानगरपालिकेत कामावर आहेत. किती जागा खाली आहेत? आतापर्यंत किती भरण्यात आल्या.? जर मागासवर्गीयाचा अनुशेष खाली असेल तर कधीपर्यंत पूर्ण करण्यात येईल? व आतापर्यंत का? खाली ठेवण्यात आला?

<u>उत्तर :</u>- एकूण ५२७ कर्मचारी.

| | अस्थायी | | स्थायी | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| अनूसचित जाती | १३५ | + | ५८ | = | १९३ |
| अनुसूचित जमाती | ०२ | + | ०५ | = | ००७ |
| वि.जा.भ.जा. | ००६ | + | ०९ | = | ०१५ |
| इ.मा.व.वर्ग | ०५५ | + | ६२ | = | ११७ |

खाली जागा एकुण = ९८.

आतापर्यंत भरलेल्या जागा-- नाही.
रिक्त पदांचा अनुशेष भरण्याची कार्यवाही सुरु असून लवकरात लवकर अनुशेष भरण्यात येईल.

<u>मा. सचिव :-</u> प्रश्न क्र. ५१२ हा श्रीम. सुंदर गजवानी यांचा आहे.

प्रश्न :- ब्रिटीश काळापासून अस्तित्त्वात आलेल्या आणि सेक्शन २१ ला पाणी पुरवठा करणा-या चार ईंच पाईप लाईनचा पाणी पूरवठा खंडित का व कसा झाला ?

उत्तर :-ब्रिटीश कालातील ४ इंची पाईप लाईन ६ इंची जी.आय.पाईप लाईन टाकलेली होती. परंतु कालांतराने सदरच्या पाईप लाईनमध्ये मोठ्या प्रमाणात छिद्रे पडल्यामुळे ब-याच प्रमाणात गटारातील घाण पाणी आतमध्ये जात असल्याने ग्राहकांच्या खराब पाणी येत असलेबाबतच्या तक्रारी वाढल्यामुळे सदर पाईप लाईन बंद करुन त्याठिकाणी नविन ६ इंची पाईप लाईन



टाकण्यात आली. त्यानंतर मे १९९४ पासून लाईन बंद करण्यात आली आहे. जुन्या ६ इंची पाईप लाईनवरील नळजोडणी नविन ६ इंची सी.आय. पाईप लाईनवर घेण्यात आलेल्या आहेत.

मा. सदस्या श्रीमती. कांता गजवानी :- ठिक आहे.

मा. सचिव :- प्रश्न क्र. ५१३ हा श्री. नारायण पंजाबी यांचा आहे.

प्रश्न क्र५१३ :- १)ऑन विच बेसिस श्री. गुल भाटिया हॅस रिसिव ३ मंन्थस् पिरिड फोर द रिमुव्हल ऑफ वालिएशन स्टील्ट पोर्शन दो डिमोलीशन ऑर्डर वॉज सेंक्शन ऑन २९.३.२००० सबमिटेड बाय लॉस थ्रु टीपी ॲन्ड डेप्युटी कमिश्नर इएमसी सेक्शन ?
२)आफ्टर द सेंक्शन प्लान ॲन्ड डिटेक्शन ऑफ एफ.एस.आर. वोलिएशन (स्टील) द सेड कंन्स्ट्रक्शन शुड बी डिक्लेअर ॲज अन अथराईज्ड ? ॲन्ड इट शुल्ड बी रिमुव्ह वीथ इन २४ हॉर्स ? यस ऑर नो ?
३)वॉट ॲक्शन यु आर गोइंग टू टेक अगेन्स्ट कंन्संट ऑथरीटी हू हॅड मिसगाईड द हाऊस इन लास्ट मिटींग ?
४)व्हील टाऊन प्लानर डिक्लेअर्ड ॲज अ अनअथराइज्ड आर.सी.सी ऑफ श्री. गुल भाटीया ? हु इज अ रिस्पॉन्सीबल फॉर नॉन कोऑर्डीशन्स बीटवीन टाऊन प्लानर ॲन्ड द डेप्यूटी म्युन्सीपल कमिश्नर इ.एम.सी सेक्शन प्लीज मेंन्शन द डीफॉल्टर आफ्टर ?
ॲज सच द कंन्सन मे बी डायरेक्टेड टू गीव डिटेल्स ॲन्सर इन द मेटर ?

उत्तर :- १)द पीरीयड वॉज डीसकस बीटवीन द ऑफीसर ऑन स्पेशल डयुटी ॲन्ड द दॅन कमिश्नर ॲड सीन्स मी. गूल भाटीया ॲग्रीड टू रिमुव्ह द वायोलेशन बाय हिम सेल्फ वीथ हिम थ्री मन्स.
२)टू डिक्लेअर्ड वायोलेशन साईडस इनस्पेक्शन हीज नेसीसरी टू बी डन बाय टी पी ॲन्ड ॲक्शन वील बी टेकन ॲज अर्लिअर.
३)नो ऑथरीटी हॅड मिसगाईड द हाऊसिंग इन द लास्ट मिटींग.
४)टाऊन प्लानर वील डिक्लेअर्ड वायोलेशन्स लिविंग पर्सनल व्हिजीट ॲन्ड इनफेक्शन ऑफ द साईट देअर इज कोऑर्डिशन बीटवीन टाऊन प्लानर ॲन्ड डेप्यूटी म्युनसिपल कमिश्नर (इएमसी).
मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र५१४ ,५१५ ,५१७ ,५१८ हा श्री.बी.बी.मोरे यांचा असुन ते सभेस उपस्थित नसल्याने त्याची कार्यवृत्तांत नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र५१४:- मधुबन हॉटेल समोरील नारळवाल्याचे शेजारी घर व रस्ता रस्तारूंदीकरणामध्ये तोडण्यात येऊन त्याठिकाणी नाली बनविण्यात आली होती. सदर नाली तोडुन पुन्हा त्याजागी इमारत बनविण्यासाठी महापालिकेच्या कोणत्त्या नियमानुसार परवानगी देण्यात आली आहे ?

उत्तर :- मधुबन हॉटेल समोरील नारळ वाल्याचे शेजारी घर व रस्ता रूंदीकरणामध्ये तोडण्यात आले असून सदर घराला बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

प्रश्न क्र५१५ :-महापालिका अर्थसंकल्प वर्ष २०००-२००१ मध्ये गलिच्छ वस्ती सुधारण्यासाठी तरतुद करणेत आलेला निधी हा झोपडपट्टी विभागामध्ये



खर्च न करता आर.डी.पी साठी वर्ज करणेत आला आहे?

उत्तर :- सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत रूपये १ कोटी ५० लाखाची तरतुद केलेली होती. त्यात रूपये एक कोटी आर.आर.डी.पी रस्त्त्यांसाठी व ५० लाख इतर किरकोळ रस्त्त्यासाठी तरतुद आहे. त्यामुळे प्रश्नात नमुद केल्याप्रमाणे गलिच्छ वस्ती सुधारणातुन आर.आर.डि.पी. मध्ये कोणत्त्याही निधी वर्ग करण्यात आला नाही. सदर बाबींवर अंदाजपत्रकीय महासभा दिनांक २०.४.२००० च्यासभेत चर्चा झाली आहे. कृपया इतिवृत पान क्र २३ पान क्र ३८ चे अवलोकन करावेण

मा.सचिव :- प्रश्न ५१६ हा नाकारण्यात आला असून त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येत नाही.

प्रश्न क्र५१७ :- महापालिकेतील विविध विभागातील कार्यरत कर्मचा-यांच्या दर तीन वर्षांनी बदल्या कोणत्त्या कारणास्तव करीत नाहीत?

उत्तर :- महानगरपालिकेतील विविध विभागातील कार्यरत कर्मचा-यांच्या दर तीन वर्षांनी बदल्या कराव्यात असा नियम नाही तरी काही कर्मचा-यांच्या बदल्या प्रशासकीय स्तरावर करण्यात येतात.

प्रश्न क्र५१८ :- महानगरपालिकेतील विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत असतो त्यासाठी जनरेटर बसविण्याची व्यवस्था का करीत नाहीत?

उत्तर :- महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडुन अतिरिक्त विद्युत वाहीनी घेतलेली असून त्या वाहिनीमधुन महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या विविध अधिकारी व पदाधिकारी यांच्या कार्यालयात अतिरिक्त पुरवठा देण्याचे काम सुरू आहे. सदर काम पुर्ण झाल्यानंतर विद्युत पुरवठा खंडीत होण्याची शक्यता कमी होईल अशी अपेक्षा आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र५१९ ,५२० हे श्री.प्रमोद टाले यांचा असुन ते सभेस उपस्थित नसल्याने त्याची कार्यवृत्तांत नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र५१९ :- १)उल्हासनगर शहरामधील यावर्षी रस्ते खड्डें (पॅटोस) भरण्याचे किती लाख रूपये खर्च झाले?
२) सदर कामे कुठल्या महिन्यात पूर्ण केली.
३)आजच्या तारखेला संपूर्ण शहरातील सर्व रस्ते खड्डामय झालेले असून या परिस्थितीला जबाबदार कोण? महानगरपालिका अधिकारी कि काम करणारे ठेकेदार?

उत्तर :- १)यावर्षी रस्त्त्यातील खड्डे भरण्याच्या कामावर अजुनपर्यंत काहीही खर्च करण्यात आला नाही.
२)कामाचे प्राधान्यानुसार कामे हाती घेण्यात आलेली आहे. काही कामे अंशतः पुर्ण झाली आहेत व पावसाळयामुळे काही सुरू करण्यात आली नाहीत.
३)उल्हासनगर शहराचे सांडपाणी, पावसाचे पाणी वाहून जाण्यास मोठी गटारे बांधण्यात आली नसल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्त्यावर गोळा होते तसेच जाण्याचा निचरा योग्य होत नसल्यामुळे रस्त्त्यावर खड्डे पडतात. असे

दरवर्षी पावसाळयात अनुभवास येते. नैसर्गिक परिस्थितीमुळे रस्त्यावर खड्डें पडणे साहजिकच आहे. ज्या रस्त्यावर पावसामुळे खड्डे पडलेले आहेत ते खड्डे



भरण्याचे काम संबंधित ठेकेदारांकडुन पावसाळासंपल्यावर दुरूस्ती करून घेण्यात येणार आहे.

प्रश्न क्र.५२० :-१) प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी डि.पी प्लान प्रमाणे किती व कोणत्त्या जागा रिझर्व आहेत.
२) १९४७ साली एस.टी.ओ. ऑफीसचे रिझर्व जागा महानगरपालिकेला वर्ग केल्यात्त्यावेळी ॲक्युझिशन कॉस्ट किती होती?
३)सदरील जागेची सदय परिस्थिती काय?

उत्तर :- १)मंजुर विकास आराखडा नुसार प्राथमिक शाळांसाठी व माध्यमिक शाळांसाठी बारा भुखंड आरक्षित आहेत.
खालील जागा रिझर्व आहेत.
५१ ,५२ ,५३ ,५४ ,५५ ,५६ ,५७ ,५९ ,६१ ,६३ ,६४ ,६५ ,६६ ,६८ ,६९ ,७० ,७१ ,७२ ,
७३ ,७४ ,७७ ,७८ ,७९ ,८० ,८१ ,८२ ,८३ ,८४ ,८५ ,८६ ,८७ ,८८ ,९९ ,९२ ,९३ ,९४ ,९४ ,९६ ,९७ ,९८ ,९९ ,१०० ,१०१ ते ११२ माध्यमिक शाळा -११३ ते ११९ , १२१ ते १२७.
२)१९४७ साली एस.टी.ओ. ऑफीसने रिझर्व्ह जागा या कार्यालयात वर्ग केल्याचे दिसत नाही. १९८७ साली भुखंड नफा नगरपालिकेकडे हस्तांतरीत झाले.
३)सरकारच्या वतीने एस.डी.ओ कार्यालयाने १९८७ साली आरक्षित भुखंड नगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेले आहेत. बहुतांश आरक्षित भुखंड हे अतिक्रमित झालेले आहेत.

मा.सचिव :- प्रश्न क्र ५२१ ,५२२ ,५२३ ,५२४ ,५२५ हे प्रश्न श्रीमती. पंचशिला पवार यांचे असुन त्या सभेस उपस्थित नसल्याने त्याची कार्यवृतांत नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र.५२१ :-दिनांक १२.७.२००० व १३.७.२००० रोजी अतिवृष्टीमुळे पुर परिस्थिती निर्माण झाली होती. दरवर्षी पावसाळयात पाणी साचुन मोठया प्रमाणात नुकसान होते. तरी सुध्दा शहरातील मोठया नाल्यांमधील कचरा गाळ काढला गेला नाही? सम्राट अशोक नगर ते शांतीनगर पर्यंत वालधुनी नालाशेजारी परिसरामध्ये दरवर्षि पाणी शिरून पुर परिस्थिती निर्माण होते. अनेक वेळा जिवित हानी सुध्दा झाली आहे. नागरिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते हजारो घरे पाण्याखाली असतात तरी सुध्दा महानगरपालिकेने कोणत्त्याही प्रकारचा विचार केलेला नाही. नागरिकांचे हित लक्षात घेता पुर परिस्थिती निर्माण होऊ नये त्याकरिता उपाययोजना नाहित त्यांचे कारण काय?

उत्तर :- पावसाळयात पुर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणुन आरोग्य खात्त्या मार्फत शहरातील सर्व लहान-मोठया नाल्यातील गाळ पावसाळयापूर्वी प्रत्येक प्रभागाकरिता कामगारांची नेमणुक करण्यात आली आहे. तसेच मोठे नाले प्रोक्लेन मशीन व्दारे साफ करण्यात आलेले आहेत.

सम्राट अशोक नगर ते शांतीनगर हा नदी काठचा भाग असल्याने पुराचे पाणी खाली तुंबणार नाही या दृष्टीने आवश्यक ठिकाणचा गाळ प्रोक्लेन मशीन व्दारे काढून टाकण्यात आला होता.

दिनांक १२ जुलै ला १२६७. ४ मी.मी व १३ जुलै ला २३९. ४ मी.मी. पावसाची नोंद आहे. या दिवशी झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच बदलापुर बॅरेज धरणाचे पाचही दरवाजे खुल्ले केल्यामुळे पुराचे पाणी वाहिले होते व नदीच्या

पात्रामध्ये असलेल्या झोपडया, घरे पाण्याखाली होते. परंतु कोणतीही जिवित वा



वित्त हानी झालेली नाही. महानगरपालिकेचा पुर नियंत्रण पक्ष कार्यरत आहे. व सदर पुराचे वेळी योग्य दखल कक्षातर्फे घेण्यात आलेली होती व कोणत्त्याही आपत्तीसाठी कक्ष सज्ज असते.

<u>प्रश्न क्र ५२२</u> :- उल्हासनगर महानगरपालिका विकास आराखडा मधील आरक्षित प्लाटवर बांधकाम चालु आहे काय? असे प्लाट कोणते...(झोपडया वगळून) किती इमारती आरक्षित प्लाटवर बनविलेल्या आहेत?त्त्या इमारती कोणत्त्या, कधीपासुन बनविलेल्या आहेत?

<u>उत्तर :-</u> उल्हासनगर महानगरपालिका विकास आराखडामधील आरक्षित प्लॉटवर सदयस्थितीत कोठेही अनधिकृत बांधकाम चालु असल्याचे आढळून आले नाही.

यापुर्वी आरक्षित प्लॉटवर झालेल्या अनधिकृत बांधकामाचा सर्व्हे नगररचना विभागाकडुन करण्यात आलेला असुन त्याची प्रत सोबत जोडली आहे.

<u>प्रश्न क्र ५२३</u> :-उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाणी वाहणारे नाल्यावर इमारतींचे बांधकाम चालु आहे काय?

यापुर्वी किती नालेवर इमारतींचे बांधकाम झाले आहे ते कधीपासुन?

<u>उत्तर</u> :- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सदय स्थितीत सांडपाणी वाहणा-या नाल्यावर इमारतींचे बांधकाम कोठे चालु असल्याचे आढळून आले नाही.

यापूर्वी नाल्यावर झालेल्या इमारतीचे बांधकामा बाबत ते कधीपासुन व किती इमारती, यासाठी सर्व्हेक्षण करणे गरजेचे असुन सव्हेक्षण पुर्ण झाल्यावर सभागृहास माहिती देता येईल.

<u>प्रश्न क्र ५२४</u> :- उल्हासनगर कॅम्प क्र ३ प्र. क्र १३ उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे फाटक वरील उड्डान पुलाचे प्रयोजन पुल बनविणे करीता महानगरपालिकने आखले आहे ते प्रलंबित का?

<u>उत्तर</u> :- सदर उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे फाटक वरील उड्डान पुलाचे प्राकलन पुल बनविणे करीता उल्हासनगर महानगरपालिकेने त्या कामासाठी अंदाजे येणारे खचाचे प्राकलन तयार करुन रेल्वे कडे पाठविलेले होते. त्यास रेल्वे ऑथोरिटीचे पत्र क्र इडब्ल्यू/६४१/बीआर /१७६/१९९९-२००० अन्वये मंजूरी प्रदान केली आहे. त्यात रेल्वेचा खर्चाचा वाटा रुपये २७५.१२ लाखाचा व महानगरपालिकेचा खर्चाचा वाटा रुपये २२०.९० लखाचा रहाणार आहे. रेल्वेने रेल्वे उड्डान पुलाचे निविदा बोलाविले असून निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख <u>२४/८/२०००</u> आहे. रेल्वे कडुन उड्डान पूलाचे काम सुरु होताच महानगरपालिकेकडुन पोच मार्गाचे काम हाती घेण्यात येईल.

<u>प्रश्न क्र ५२५ :-</u> उल्हासनगर शहरामध्ये मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई आहे. शहरातील जन संख्येवर आधारीत पाणी पुरवठा विभागाकडुन पाणी मिळते का? एकुण किती एम.एल.टी. पाणी मिळते. १ ते ५ नंबर कॅम्पात वितरण व्यवस्था एम.एल.टी मध्ये कसे व किती? पाणी पुरवठा विभाग (एम. आय.डी.सी)कडुन शहरात पाणी पुरवठा करणे करिता कोणते निकश लावले जातात.

<u>उत्तर :-</u> उल्हासनगर शहरात सर्वत्र पाणी टंचाई आहे असे म्हणुन पूर्ण सत्य नाही. वितरण व्यवस्थेच्या टोकाच्या व उंचीवरील भागात पाणी पुरवठा

अपुरा होतो. शहराची भौगोलिक परिस्थिती जुनी वितरण व्यवस्था व वाढती मागणी



यामुळे यंत्रणेवरील ताण वाढत आहे. शहराची वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे काम करून घेण्यात येत आहे.

उल्हासनगर शहराच्या वितरण व्यवस्थेतून साधारणत: ८.०० लाख लोकांना पाणी पुरवठा केला जातो. एम.आय.डी.सी तर्फे २ ते ३ महिन्यापूर्वी सरासरी १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा होत असे. एम.आय.डी.सी कडील दुरूस्ती, विद्युत पुरवठ्यातील व्यत्यय व तत्सम कारणामुळे सध्या फक्त ९७ द.ल.लि. पाणी पुरवठा होत असुन ८.०० लाख लोकसंख्येस यंत्रणेतील गळतीचे प्रमाण शहराची वाढणारी लोकसंख्या विचारात घेता हा पुरवठा अपुरा आहे. सध्याची आठ लक्ष लोकसंख्येस १४० लि. दरडोई पाणी पुरवठा करण्यास २५ टक्के योजनेतील घट धरून एकुण ४० द.ल.लि. एम.आय.डी. सी कडुन पाणी मिळणे आवश्यक आहे. परंतु सध्या फक्त ९७ द.ल.लिटर पाणी पुरवठा होतो म्हणजे ४३ द.ल.लिटर पाणी पुरवठ्याची वाढीव आवश्यकता आहे.

कॅम्प क्र १ ,२ ,३ मध्ये सरासरी ५८ एम.एल.डी. तर कॅम्प क्र ४ ,व ५ मध्ये सरासरी ३९ एम.एल.डी इतका पाणी पुरवठा होत आहे. एम.आय.डी. कडुन शहरास होणारा पाणीपुरवठा हा ठोक पुरवठा (बुल्क सप्लाय )या तत्त्वावर करण्यात येत असुन यासाठी विविध ठिकाणी एम.आय.डी.सी च्या जलवाहिन्यांवर जोडण्या दिलेल्या आहेत या जोडण्यांव्दारे एम.आय.डी.सी कडुन मंजुर झालेला पाणी पुरवठा शहराच्या वितरण व्यवस्थे करिता दिला जातो.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र. ५२६ हा श्री. जमनु पुरस्वानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र ५२६</u> :-१)गोल मैदान के पास, मोनीका महल के पास नाले के उपर झुनका भाकर का परमिशन कब तक है?
२)इस झुनका भाकर केंद में आजतक एकभी झुनका भाकर बेचा नहीं है. वहां पर भजिया पाव की दुकान खुली हुई है. उसके बारे में आप क्या करेंगे.
३) नाले पर बने हुए झुनका भाकर केंद की मुदत खत्म होने के बाद भी क्यु नहीं हटाया गया है.
४)टोटल (एकुण)उल्हासनगरमें कितने झुनका भाकर केंद है.?
५)उनकी मुदत कब खत्म हुई है?
६)सरकारने झुनका भाकर से सबसिडी खत्म कर दी है?उसके बाद भी आप झुनका भाकर जो भी कुछ समय के लिए दिये गए थे क्यु नही हटाते?
७)नालेपर कितने झुनका भाकर केंद है? तथा उनकी परमिशन कैसे दि गई?
८)गोल मैदान का झुनका भाकर केंद कब तक तोडेंगे?

<u>उत्तर</u> :- १)सदर प्रकरणी दिनांक ४.१.२००० पर्यंत परवानगी होती.
२)सदर बाब ही झुनका भाकर केंद्रावर नेमलेल्या देखरेख करणा-या समितीच्या अखतारीत आहेत. तरी अर्ज त्यासमितीकडे सादर करावी. (प्र.क्र. झुभायो /१०९५/प्र.क्र/१८९ नापु.२२ , दि.२५.८.१९९५)
३)नाल्यावर झुनका भाकर केंद दिल्याचे दिसुन येत नाही.
४)दोन झुणका भाकर केंद्रांना परवानगी देण्यात आलेली आहे.
५)मुदत दिनांक. ४.१.२००० व २५.११.९९ पर्यंत होती.
६)सदर बाब मा. जिल्हाधिकारी यांचे अखत्त्यारिततील आहे.
७)नाल्यावरांझुणका भाकर केंद्राला परवानगी दिलेली नाही.
८) झुणका भाकर योजना बंद करून,केंद्र परत ताब्यात घेण्याचा विषयी जैसे थे स्थिती ठेवण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले असल्याचे शासनाचे क्र.झुभायो :३९००/, <u>३०४/प्र.क्र.१४५७/ना.पु.२२</u> , दि.५.७.२००० अन्वये कळविले आहे व न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन होणार नाही यांची दक्षता

घेण्याबाबत कळविले आहे पुढील आदेश प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल.

मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :- ठिक आहे.

--२८--

मा.सचिव :- प्रश्न क्र.५२७ श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र.५२७ :-१)सुवर्ण जयंती योजनेमार्फत आतापर्यंत किती बेरोजगारांना रोजगार दिला आहे. त्यात मजूर किती, सुपरवायझर किती १ यांची माहिती मिळणे?
२)सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत कोणकोणती कामे हाती घेतली आहेत. त्यापैकी कोणती कामे पुर्ण झाली आहेत व कोणती अपुर्ण आहेत?
३)सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत चालणा-या कामासाठी लागणारे बांधकाम साहीत्य, रेती, विटा, सिमेंट, खडी लोखंड इत्त्यादींचा पूरवठा कोण करते, त्यासाठी निविदा मागविली होती का? ती कोणाच्या नावाची आहे? व किती रक्कमेची आहे.
४)आजपर्यंत किती साहीत्त्य पूरविण्यास आले त्यांची एकूण किंमत किती? यांची वारंवार माहिती मिळावी?

उत्तर :- १)३७५ मजूी कामावर आहेत. प्रत्त्येक कामनिहाय मजूरांपैकीच एकास सुपरवायझर म्हणुन कामे देण्यांत येतात.
२)सदर योजने अंतर्गत समाज मंदिर बांधणे सहा बैठकिचे शौचालय बांधणे, सि.सि. पॅसेज व गटार बांधणे, ईत्त्यादी कामे घेतली होती त्यापैकी सि.सि. पॅसेज चे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असुन समाज मंदिर व शौचालयाचे काम सुरू आहेत.
३ व ४)दिनांक ७.१२.९९ च्या वर्तमानपत्रामध्ये आवश्यक बांधकाम साहित्त्याचा पुरवठा करण्यासाठी वार्षिक निविदा मागविण्यात आलेली होती. एकुण प्राप्त चार निविदापैकी मेसर्स मयुर कंन्सल्टंसी यांची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे व आर्थिक वर्षभरामध्ये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत कामे हाती घेतली जातील त्याकामासाठी लागणा-या साहित्त्याचा पुरवठा मागणी प्रमाणे त्यांनी करावयाचा असुन सदर योजने अंतर्गत शासनाकडुन प्राप्त होणा-या रकमेचा विनियोग कामनिहाय ७४० या प्रमाणात अनुक्रमे साहित्त्य साहित्त्य व मजुरी करावयाचे असुन कामासाठी एकुण प्राप्त रकमेपैकी ६० टक्के रक्कम ही साहित्त्य वाढ खर्च करावयाची आहे. एकुण ५३, ५२,९२५ रूपये यांच्या कामाचे २४ प्राकलन मंजुरीसाठी जिल्हानागरी विभाग संस्थेकडे पाठविण्यात आले होते त्यापैकी ४९,७२,५०० रूपये रक्कम मंजुर करण्यात येऊन ती प्रात्त्प झाली असुन त्यापैकी ६० टक्के प्रमाणे साहित्त्यावर रूपये २९,११,५००/- एवढी रक्कम वापरायची असून त्यापैकी साहित्त्य खालील प्रमाणे रूपये १३,३६,९३९ रूपये खर्च झालेला आहे. त्यांची वार वार माहिती सोबत जोडत आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-वेळ आहे का आम्हाला यावर चर्चा करायची आहे. नाही तर पुढच्या सभेत घ्या.

मा.सचिव :- पाच मिनिटे शिल्लक आहेत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-नाही आम्हाला अर्धा तास चर्चा करायची आहे.

मा.सचिव :- चर्चा करायची तर करा. चर्चा तुम्हाला करावी लागेल. जितका वेळ आहे तोपर्यंत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-स.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब माझा प्रश्न सुवर्ण जयंती बददल वरील प्रमाणे आहे. मी प्रश्न विचारून चार महिने झाले आहेत. आणि त्याकामावर एका प्रभागात दहा-दहा लोक सुपरवायझरींग

--२९--

करतात अशी मी लेखी तक्रार दिली आहे. आयुक्तांना व उपआयुक्तांना दिली आहे. चार महिने अगोदर आणि आजही चार महिन्यानंतर तिथे कमीत कमी पाच-पाच लोक आहेत ती का ठेवली जातात व त्यांच्याकडुन पाच-पाचशे रूपये घेतले जातात. मी तसे लेखी जिल्हाधिकारीकडे देखिल दिले आहे. अजुन त्यावर काही कार्यवाही झाली नाही. प्रत्यक्ष जो माणुस पैसे घेतो त्याचे नाव देखिल दिले आहे तरी काही कार्यवाही केलेली नाही. दुसरा माझा असाच एक प्रश्न आहे आतापर्यंत २४ कामांसाठी मंजुर होऊन आलेले जे पैसे आहेत ४९,७२,५००/- त्यापैकी २९,११,५००/- रूपये खर्च साहित्त्यांवर करण्यात आला आणि त्यापैकी १३,३६,९३९/-रूपये मजुरांवर खर्च करायचे आहे. आतापर्यंत २४ कामांपैकी एकही काम पूर्ण झालेले नाही. माझ्या माहिती प्रमाणे त्या रकमेपैकी जे ४९ लाख रूपयांपैकी ४५ लाख खर्च झालेले आहेत आणि एकही काम पूर्ण झालेले नाही. उरलेल्या चार लाखांमध्ये ती कामे पूर्ण होणार आहेत का? ती कामे पूर्ण होणार नसतील तर त्याला जबाबदार कोण? मी वारंवार उपायुक्तांना तक्रार करून देखिल ते त्याची दखल घेत नाही. त्याचे कारण काय समजायचे आम्ही? त्या कामांमुळे नविन कामे जी मंजुर होऊन आली आहेत ती सुरू होत नाहीत. प्रकल्प अधिकारी सोनावणे म्हणुन ठेवण्यांत आलेले आहेत त्यांची वारंवार तक्रार करून देखिल त्यांची बदली करण्यांत येत नाही त्याचे कारण काय समजायचे सभागृहानी?

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त):-</u>सुवर्ण जयंती योजने अंतर्गत <u>४०/६०</u> व ६० /४० या रेशोनुसार काम करायचे आहे. शासनाच्या मार्गदर्शना अन्वये त्यानुसार साहीत्त्यांवरही खर्च करण्यांत आला आहे व मजुरांवरही खर्च करण्यांत आला आहे. ख-या अर्थाने कामाला सुरूवात झाली जुन पासून ८० टक्के कामे पुर्ण झाली आहेत. दुस-या टप्प्यांतील कामांचे धनादेश एक-दोन दिवसांपूर्वीच प्राप्त झालेले आहेत. त्या कामाला देखिल सुरूवात चार-पाच दिवसात करण्यात येईल.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :-माझे म्हणणे असे आहे आता पर्यंत जी रक्कम आली आहे ४९ लाख रूपये त्यापैकी ४५ लाख संपले आहे. ही मला मिळालेली माहिती खरी आहे का? व उरलेल्या चार लाखात २४ कामे होणार आहेत का? नाही झाली तर त्याला जबाबदार कोण?

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त):-</u> ज्याप्रमाणे निधी उपलब्ध असेल त्याप्रमाणे शासनाच्या मार्गदर्शनानुसार सर्व कामे पुर्ण होतील.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- नाही झाले तर चार लाखात कामे पुर्ण होणार आहेत का?

<u>मा.आयुक्त:-</u> प्राकलनाप्रमाणे प्रत्येक कामावर ते खर्च होणार आहे आणि काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे कामे अपुर्ण राहिली तर त्याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होणार नाही. जी जी कामे पूर्ण झाली आहेत त्याचे कंमप्लीशन सर्टीफिकेट जिल्हाधिकारीना दिले आहेत. आणि जिल्हाधिकारींनी दुस-या टप्यातील कामे मंजुर करून दिली आहेत त्यात एक अट घातली आहे. की पहिली जी कामे पुर्ण झाली आहेत त्याचे कंमप्लीशन सर्टीफिकेट दया. त्यानंतर आम्ही दुसरा चेक देतो. मेजर काम आपले पुर्ण असल्यामुळे परवाच त्यांनी दुस-या टप्यातील ४३ लाखाचा चेक आपल्याकडे हॅन्डओव्हर केला आहे. आणि आता दुसरा टप्पा सुरू करायला आम्हाला आता काही अडचण राहीलेली नाही.



<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :-तुमचे म्हणणे असे आहे की सर्व कामे होतील या रक्कमे मध्ये जी चोवीस कामे दाखविली आहेत व ती जर पुर्ण झाली नाही तर याला जबाबदार कोण? असे माझे म्हणणे आहे.

मा.आयुक्त :- त्याला जबाबदार आम्हीच. कोण असणार आहेत?

मा.सदस्या श्रीमती जेस्वानी आशा यांचे सायंकाळी ६. २० वाजता सभागृहात आगमन झाले.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-नाही झाली तर त्याला जबाबदार कोण? ती रक्कम त्या कामासाठीच उपयोगी येते की दुसरीकडे कुठे चालली आहे याची चौकशी कुणी करायची?

मा.आयुक्त :- आम्ही तुम्हाला जबाबदार धरणारच नाही कुणाला?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- का धरणार नाही? त्याच्यावर आताच लक्ष दिले तर कुणाला जबाबदार धरण्याची वेळ येणार नाही.

मा.आयुक्त :- आमची जबाबदारी आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- आम्ही सहा महिन्यापासुन प्रश्न विचारतो. तेव्हा जर तुम्ही त्याच्यावर कार्यवाही केली असती तर आतापर्यंत तुम्हाला जबाबदार धरण्याची वेळ आली नसती.

मा.आयुक्त :- अनेक ठिकाणी अनेक अडचणी आल्या होत्त्या. कुठे जागेची अडचण होती, कुठे काही अडचण होती.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-५०० रू. सुपरवायझरला कामाला लावण्यासाठी घेतात त्यावर तुम्ही काय कार्यवाही केलीत? काहीच कार्यवाही करत नाहीत.

मा.आयुक्त :- ठिक आहे त्यामध्ये असे ठरवले होते की, संबंधित कामगाराने तशी तक्रार करावी. नंतर आम्ही पुढील कार्यवाही करू. संबंधित कामगारांना आमच्याकडे पाठवून दया आम्ही त्यांना विचारू त्यांनतरची पुढील कार्यवाही निश्चित करू.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-तसेच या कामामध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्त्या. त्यामध्ये असे म्हटले होते की, चांगल्या प्रतीचे सिमेंट वापरले जावे पण आता प्रत्यक्ष तिथे पहातो तर मुंबईचा कमांडो नाव असेलेले सिमेंट वापरतात जे कधी ऐकले नाही. व चारशे गोण्या सिमेंट गठठ्या झालेल्या आहेत याला जबाबदार कोण? उपायुक्त म्हणुन काय काम करतात हे? निविदा मध्ये अट होती ना चांगल्या प्रतीचे सिमेंट वापरावे. मुंबईचा कमांडो कुणी नाव ऐकले आहे का?

मा.आयुक्त :- सिमेंट पुरविताना चांगले होते नंतर पावसामुळे त्याचा गठठा झाला आहे की, पुरवितानाच गठठा झाला याची चौकशी करून आम्ही आपल्याला निश्चितपणाने सांगु.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :- मा.महापौरजी, राजेंद चौधरींनी विचारलेला प्रश्न चांगला प्रश्न आहे. आपल्या शहरातून आपण निधी गोळा करतो, कर वगैरे तसेच बाहेरच्या निधीतून आपण काम करून घेतो जसे स्वयंरोजगार योजना बाहेरच्या निधीतून हे काम आपण करवून घेतो. कर लोक प्रत्यक्ष भरत नाहीत. त्यामध्ये जेवढे लक्ष दयायला पाहिजे होते तेवढे लक्ष देण्यांत प्रशासन असफल झाले आहे.पाटणकरांनी जेवढे लक्ष दयायला पाहिजे होते तेवढे दिले नाही. मी



जर पाटणकरांना विचारले तुम्ही कुठे कुठे कोणकोणत्त्या जागेला भेट दिली कुठे काम चालु आहे. तुम्ही प्रत्यक्ष तिथे गेला आहात का? तर उत्तर शंभर टक्के नाही म्हणुनच येणार. त्यांना हे विचारले की, पहिले काम कुठे सुरू आहे आणि कुठपर्यंत आले आहे. ८० टक्के काम पुर्ण झाले असे म्हणतात तर ८० टक्के का झाले १०० टक्के का नाही किती महिन्यापासुन काम चालू होते? काम किती रक्कमेच आहे? दोन लाखाचे, एक लाखाचे?

एखादे नाल्याचे काम असेल, एखादे सी.सी पॅसेज बनविण्याचे काम असेल, सार्वजनिक शौचालय बांधण्याचे काम असेल ते पूर्ण करायला किती वेळ लागतो? जर आपला विभाग इतका थंडपणे काम करीत असेल तर जितकापण बाहेरून निधी आपल्याला मिळतो त्याचा लाभ आपण बरोबर नाही घेऊ शकणार. हे ठिक नाही. त्याकडे पुर्ण लक्ष आपण व महापौरांनी दिले पाहीजे. व कामे पुर्ण करून घेऊन नवी कामे सुरू केली पाहिजे. पाटणकरजी तिकडे लक्ष देत नाही असा माझा पण आक्षेप आहे.

<u>मा.आयुक्त</u> :- आपण जे सभागृहात सांगीतले ते काही अंशी सत्त्य ही आहे. मी पुर्णपणे नाकारत नाही. या कामात थोडया समस्या आल्या होत्त्या त्यातील एक दोन जागी मी महापौरांना पण घेऊन गेलो होतो. आता समस्या सुटल्या आहेत. ती समस्या आमच्या प्रकल्प अधिकारी व उपायुक्तांच्या हाताबाहेर होती. महापौरांनीही आम्हाला त्यात सहकार्य दिले व जे काम सुरू नव्हते झाले ते सुरू करण्यात आले. मी सदनाला सांगु इच्छितो मला सांगताना आनंद होत आहे की, या योजनेचा सर्वात जास्त लाभ जर कोणत्त्या महापालिकेने घेतला असेल तर उल्हासनगर महापालिकेने घेतला आहे. काही कामे अर्धवट राहिली आहेत. मी स्वत: बैठकीत जातो. नवी मुंबईचे जे अध्यक्ष आहेत मिस्टर जुडाके. ठाणे जिल्हा अर्बन डेवलपमेंट एजन्सीचे त्यांना विनंती करून जितके जास्त काम पास करून घेता येईल तितके करून घेतले आहे. काही समस्या आल्या होत्त्या म्हणुन थोडे काम रेंगाळले होते. आता मी उपायुक्त पाटणकर साहेब यांना निर्देश देतो की, उरलेले काम पंधरा दिवसात ते पुर्ण करतील आणि दुस-या टप्प्यातील कामे पुढील महिन्यात सुरू करू.

<u>मा.सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता</u>:- पाटणकर साहेब इतके सुस्त आहेत की, त्यांच्याकडून हे काम होणार नाही. त्यांच्या कार्यभार इतर कुणाला दिला तर बरे होईल. आमच्या प्रभागात दोन महिन्यापासुन ते नुसते आश्वासन देत आहे. गेल्यानंतर ते भेटत देखिल नाही. हे त्यांच्या लायकीचे काम नाही. हे इतर कुणाला काम दयावे.

<u>मा.महापौर</u> :- सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत आयुक्तांनी जी माहिती दिली की, या महापालिकेला सर्वात जास्त निधी मिळालेला आहे मी मानतो. परंतु स.सदस्य नरेंद्र राजानी यांनी जी याबाबत माहीती दिली आहे. मी पुर्णत: त्यांच्याशी सहमत आहे. तिथे सुपरवायझरींगचा पुर्णपणे अभाव आहे. ते जे काम चालु आहे त्यावर कोणाचेही लक्ष नाही व होणा-या खर्चावरही कुणाचे लक्ष नाही. ही सर्व पक्षाच्या नगरसेवक सेविकांची तक्रार आहे. म्हणुन मी आयुक्तांना सांगतो की, या योजने अंतर्गत जी पण कामे सुरू आहेत त्याबाबतीत उपायुक्त पाटणकर यांना कडक आदेश दया त्यांनी पुर्णपणे लक्ष दयावे.
<u>मा.सचिव</u> :- प्रश्नोत्त्तराचा तास संपला आहे. या सभेत एक लक्षवेधी आली आहे. ज्याचे सुचक आहेत श्री.सुभाष मन्सुलकर व अनुमोदक आहेत श्री.बी.बी. मोरे.

<u>मा.महापौर</u> :- सदरची लक्षवेधी दाखल करून घेण्यात येत आहे.

--३२--

<u>लक्षवेधी सुचना</u>

मा. महोदय उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कचराकुंडीतील कचरा उचलण्याचा ठेका मेसर्स. पनवेलकर यांना निविदा न काढता ठेका देण्यांत आला आहे. परंतु मागच्या काही महिन्यापासून शहरातील कच-याची परिस्थिती अतिशय बिकट झाली आहे. याचे कारण पनवेलकर हे ठेकेदाराकडून रोजच्या रोज कचरा उचलला जात नाही. तो कचरा का उचलला जात नाही त्याला कारण काय? याचे बाबत महासभेत सविस्तर चर्चा व्हावी ही विनंती.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :- मोठया दुःखाची गोष्ट आहे अनुमोदक साहेब निघुन गेले त्यांचा पाठिंबा मिळाला असता मला या लक्षवेधीवर. मा. महापौरजी, बोलु का?

मा.सदस्या श्रीमती सुनिता रजवानी :- बोला बोला. घाबरता कशाला.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :- मर्द के बच्चे है. कुणाला घाबरत नाही. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो जेव्हा शिवसेना भाजपाची सत्ता होती. तेव्हा कचरा उचलण्याचा ठेका ठेकेदारांना दिला होता. ते बरोबर कचरा उचलत नव्हते. त्याचे प्रत्यंतर असे आहे की, त्यावेळचे मुख्यमंत्री मा.मनोहर जोशी जेव्हा उल्हासनगरला आले. तेव्हा दुर्गंधी वरूनच त्यांनी अनुमान लावले की उल्हासनगर आले आहे. हे सर्वांना माहित आहे. जेव्हा ठेकेदार काम करत नव्हते तेव्हा शहरातील कच-याची समस्या फारच बिकट झाली होती. तेव्हा सर्व पक्षाच्या सन्माननिय नगरसेवकां/नगरसेविकांनी लक्षवेधी आणली तेव्हा असे ठरवले की, ठेकेदारांचे पेमेंट थांबविले जावे. त्यांचे पेमेंट थांबवल्यावर दुसरा ठेकेदार कोण येणार? तेव्हा निविदा न मागविता सर्वांनी एक मतांनी पनवेलकरांना ठेका दिला कारण त्यांच्याकडे कचरा उचलण्याचे वेगवेगळे मशीन साहित्य होते ते करू शकतील. त्यांनी त्याप्रमाणे चांगले काम करून दाखविले. शहरातील कचरा उचलण्यास त्यांनी मदत केली. पण आत काही महिन्यापासुन कचरा उचलण्यात ढिलेपणा आला आहे. मी आयुक्तांना विनंती करतो की, माझ्या दोन-तीन प्रश्नांचे उत्तर त्यांनी दयावे. जेव्हा आपण पनवेलकरांना ठेका दिला तेव्हा रोज कचरा उचलण्याचा ठेका दिला का दोन-तीन दिवसांनी कचरा उचलण्याचा ठेका दिला. रोजचा ठेका दिला होता ना? आपले अमाऊंट फिक्स होते जे आपण जुने ठेकेदारांना दयायचो तेच अमाऊंट पनवेलकरांना दयायचे ठरले होते. त्याप्रमाणे रोज कचरा उचलला जात नाही. त्यांनी जे चांगले काम केले ते पण आम्ही बोललो. पण काही महिन्यापासुन आम्ही पहात आलो आहोत महापौर पण आपल्याला तक्रार करतात. आरोग्य विभागाचे सभापती/ उपसभापती आपल्याकडे तक्रार करतात. इतर विपक्षांनी पण आपल्याला तक्रार दिली असेल जसे चार्ली ने तक्रार दिली की, आमच्या प्रभागातून कचरा उचलला जात नाही.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- नाही नाही माझी कुठे तक्रार आहे?

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :- ठिक आहे. सेटींग झाली असेल.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :- सेटींग शब्द ऑब्जेक्शनबल आहे. याप्रकारे कोणा सदस्याला बोलणे उचित नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :-माझ्या बोलण्याचा अर्थ त्यांनी तुम्हाला कचरा साफ करून दिला असेल.



मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-तुमची सेटींग नाही झाली म्हणुन तुम्ही लक्षवेधी आणली का?

(इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते)

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :-मा.महापौर, मला एक मिनिट बोलु दया.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- मी तर म्हणतो संपूर्ण चर्चा होऊ दे आम्ही तुमच्या बरोबर आहोत. भले आर.पी.आयच्या सदस्यांना पण बोलवा.

__मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर__ :-मला हे सांगायचे आहे की, आपल्या शहरात रोज कचरा उचलला गेला पाहिजे. गल्ली-गल्लीतील कच-यांचे ढीग उचलले नाही जात आहे. म्हणुन मी प्रत्येक नगरसेवकांच्या समोर लक्षवेधी सुचना देऊन हे दाखविले की, दिवाळी जवळ आली आहे प्रत्येक घरात रंगरंगोटी होत आहे. साफ-सफाई होत आहे. त्यांचा कचरा त्या ढिगा-यावर येऊन पडत आहे. रविवारी सुट्टीच्या दिवशी पनवेलकरांची गाडी येत नाही. मी तुम्हाला त्याचे पूर्ण विवरण देतो. जेव्हा आरोग्य सभापती यांनी सभा घेतली तेव्हा स्वच्छता निरिक्षक यांनी त्यांची स्टेटमेंट दिली आहेत. मी तीन दिवस आधी याकरिता लक्षवेधी दिली की, एस.आय वाल्यांनी जाऊन चौकशी करावी म्हणजे तुम्हालाही वेळ मिळेल आणि मलाही माझ्या प्रश्नाचे उत्तरही देता येईल. आता या इतिवृतांत ४ नंबरचे एस.आय गंवानी यांनी सांगीतले की, ठेकेदारांची वाहने कचरा वाहतुकीस आलेली नाही. श्री. पाटील यांनी सांगितले की सोना मार्केट मधील कचरा संपुर्ण उचलला जात नाही. श्री.पगारे एस.आय यांनी सांगीतले की १८० बॅरेक जवळचा २००, ३०० ट्रीप कचरा पडुन आहे. ठिक आहे हा कचरा नाही उचलला जात. श्री.उमाळकर हे पाच नंबरचे एस. आय आहेत. त्यांनी सांगितले आहे ठेकेदार लांबचा कचरा बॅरेक नं २१०१ जवळील कचरा उचलत नाही. ठेकेदाराला प्रत्यक्ष बोलावून सुचना देण्यात आलेली आहे परंतु ठेकेदार अदयाप आलेले नाहीत. त्यानंतर श्री. चांदवानी यांनी सांगीतले की नारीशाला प्रभाग क्र.१७,१८,१९ त्यातील आतील जागेत चिंधी कचरा बराच पडलेला आहे. त्यानंतरचे ४ नंबरचे एस. आय राजु चुग यांनी सांगीतले की, एक आठवडयापासून कचरा वाहन येत नाही त्यामुळे कचरा वाहतुकीचे काम बरोबर होत नाही. प्रभाग क्र.५५ मध्ये ३,४ जागी कचरा पडुन आहे. ५२ माझा प्रभाग आहे यात लिहिले आहे की, ठेकेदारांना सांगितले आहे. परंतु त्यांच्याकडून काही कार्यवाही झालेली नाही. श्री.सोनावणे हे आपले एस.आय आहेत त्यांनी सांगीतले ११२७ जवळील कचरा ठेकेदार उचलत नाही. श्री.मोरे एस.आय. आहेत त्यांचे हे म्हणणे आहे की, प्रभाग क्र.६० मध्ये गुरूमुखच्या घरामागे तसेच त्यांच्या कंपाऊंड मध्ये कचरा उचलला जात नाही. तरी हा जो कचरा उचलण्याचा ठेका दिला तो याकरिता नव्हता दिला की त्यांनी चार-पाच दिवसात जमा कचरा उचलणे शहरातील मुख्य रस्त्याचा कचरा उचलला जातो. जिथुन आयुक्त, महापौर, उपमहापौर, जातात ते रस्ते स्वच्छ असतात. परंतु जिथे गल्ली आहे जसे बेबी वसीटा नगरसेवक आहे त्यांच्या प्रभागातील कचरा जेव्हा पासुन पनवेलकरांना चार्ज दिला तेव्हा पासून आजपर्यंत त्यांच्या प्रभागातील कचरा उचललेला नाही. तरी त्यांच्या नव-याने दहा-बारा वेळा सांगितले माझ्या मते तुम्हीही तिथे जाऊन आलात. तरी कचरा उचलला गेला नाही याचे कारण काय?

__मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :-__ मा.महापौर, आयुक्त,उपमहापौर सभेतील सर्व सदस्य जेव्हा महासभेत यापूर्वी रिवाइज बजेट मांडले होते. जेव्हा



३३ रस्त्यांचा प्रस्ताव ठेवला गेला होता तेव्हा कचरा उचलण्यासाठी खुपश्या गाडया मागवणार होते. माझ्या मते एक वर्ष झाले एकही गाडी आलेली नाही. तरी कच-याची समस्या ही नेहमी शहराची ज्वलंत समस्या म्हणुन राहीलेली आहे. यापुर्वी कचरा खडयात असायचा जो हळूहळू कमी होत गेला. व आम्ही खुश होतो. परंतु आता परत कच-यांचे ढीग दिसत आहेत. मी आठ दिवसांपासून आरोग्य अधिकारी श्री. लांजेवार यांना सांगीतले आहे की, ११३,११४ बॅरेक जवळ ५-६ गाडयांचा कचरा आहे. दिवाळी असल्यामुळे लोक कचरा टाकतात व कचरा दबत जातो. मा.महापौर माझ्या प्रभागात उदघाटनासाठी आले असता रात्री नऊ वाजता १००-२०० लोकांनी महापौरांना उभे केले व कच-याचा ढीग दाखवला. आज अशी स्थिती आहे की, आम्ही सत्ताधारी असून लक्षवेधी आणली आहे. मी विनंती करेन की, लवकरात लवकर शहरातील कचरा हटवा. दुसरी कामे करून देखील कच-याच्या गाडया प्रथम मागवा. जसे शुळ साहेबांनी आम्हाला एक जे.सी.बी व दोन

डंपर मागविले. ते वेळोवेळी आता कामाला येतात. त्यांनी एक प्रस्ताव मांडला एक घंटा गाडी दारोदारी जाऊन कचरा उचलायची त्यामुळे रोडवर कचरा खुप कमी दिसायचा. आज ती पण पध्दत बंद केली आहे. मी विनंती करेन शुळ साहेबांनी गल्लो गल्ली फिरून रोड रोड फिरून त्यांनी ठरवून दिल्या की येथुन येथुन कचरा उचलायचा. गाडी तिथे जायची घरा-घरातून कचरा उचलायची. फर्निचर बाजारात गाडी जायची त्यामुळे कचरा खुप कमी दिसायचा. तर आमचे मा.आयुक्त शुळ साहेबांनी जी प्रथा सुरू केली. ती परत सुरू करावी. व आम्ही जो गाडयांचा प्रस्ताव ठेवला होता त्या लवकर मागविल्या जाव्यात. व शहराची समस्या सोडवावी धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> मा.महापौर,आयुक्त व सदस्य ही एक मोठी विचित्र स्थिती आहे की रूलींग पार्टीचा एक गटनेता, त्या पक्षाचे आज महापौर आहेत. स्थायी समितीचे सभापती पण सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहेत. त्या पक्षाचा एक गटनेता हे सांगतो की शहरात सफाईचे काम बरोबर होत नाही यातुन दोन गोष्टी सिध्द होतात की, एक तर प्रशासनाचे काम बरोबर नाही. महापौरांच्या अधिकारात प्रशासन असफल ठरले आहे हे एक प्रकारचे सर्टीफिकेट आहे. सत्ताधारी पक्षाचे गटनेता श्री.सुभाष मन्सुलकर यांच्या तर्फे हे माझे खुले म्हणणे आहे. किंवा दुसरे असे असेल की, गटनेत्त्यांचे म्हणणे महापौर किंवा स्थायी समिती सभापती ऐकत नसतील म्हणुन त्यांना हे पाऊल उचलावे लागले. आम्ही तर आधीच म्हणतो की शहरात सफाई होत नाही. जे सफाई कामगार आहेत त्यांच्यावर नियंत्रण नाही. पुर्वी स्वच्छता निरिक्षक नगरसेवकांच्या घरी जायचे तक्रार काय आहे विचारायचे प्रशासन व आपण पाहिले पाहिजे की शहरात सफाई बरोबर झाली आहे की नाही हे आपले कर्तव्य बनते. यात दुमत नाही. तुम्ही काहीतरी कडक पाऊल उचला.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- मा.महापौर आता आमचे ज्येष्ठ नगरसेवक लाल पंजाबी हे दोन वर्षापर्यंत भाजपाचे गटनेता होते. आता त्यांनी जे सांगीतले मला असे वाटते ते विसरले की, जेव्हा भाजपा शिवसेनाची सत्ता होती. तेव्हा यांनी सहया करून विशेष सभा बोलावली होती. सेनिटेशन, वॉटर सप्लाय आणि अनाधिकृत बांधकामा संबंधी त्यावेळी हे सर्व फेल्युअर होते का? तर सत्ताधारी वाल्यांनी नुसते माकड होऊन बसायचे का? डोळयांनी पहायचे नाही, कानाने ऐकायचे नाही, किंवा तोंडाने बोलायचे नाही का? सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक असो वा विपक्षाचा तो पाच हजार लोकांमधून निवडून आले आहेत. श्री.लाल पंजाबी हे तर नामनिर्देशित नगरसेवक आहेत. आम्ही पाच-सहा हजार लोकांमधून निवडून आलो आहोत. सुभाष मन्सुलकरांनी जी लक्षवेधी दिली आहे. त्याचा अर्थ हा नाही की पुर्वी जे ठेकेदार होते ते यांच्यापेक्षा सरस होते. जर

--३७--

कुणी सदस्य तक्रार करतो तर प्रशासनाचे काम आहे. जसे आयुक्त आहेत, उपायुक्त आहेत, आरोग्य अधिकारी आहेत. त्यांनी लक्ष दयावे. व त्यांनी जिथे जिथे सांगीतले तिथला कचरा उचलला गेला पाहिजे. यांनी जितके पण प्रभाग सांगीतले त्यात भाजपा, शिवसेना, अपक्ष, कॉंग्रेस सगळयांचे नाव घेतले. स्वच्छता निरीक्षक पण ओरडत आहेत. पनवेलकरचा ड्रायव्हर कचरा उचलत नसेल क्लीनर लक्ष देत नसेल, सुपरवायझर लक्ष देत नसेल ते कच-यांचे ढिग उचलले गेले पाहिजे. जेव्हा मागे सत्ताधारी पक्षांनी सभा बोलवली तेव्हा आम्ही असे म्हणालो होतो की, तुमचे राज्य असून तुम्ही सभा बोलवता? तेव्हा महाडिक साहेब म्हणाले होते की, आमचे महाराष्ट्राचे सम्राट मा.बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला अन्याया विरूध्द लढायला शिकवले आहे. सत्ताधारी असो वा विपक्ष. हे मला नेहमी इथे सांगायला लागते जर सत्ताधारी असो वा विपक्ष कुणासदस्याला समस्या आहे तर तो आपल्या जनतेसाठी प्रभागासाठी मांडतो कारण दुस-यावेळेस त्याला निवडून यायचे असते त्याचा प्रभाग चांगला झाला पाहिजे. आमच्या पक्षाचे नाव शहरात

चांगले झाले पाहिजे म्हणुन लक्षवेधी आणून प्रश्न विचारतात या गोष्टीचा आम्हाला अभिमान आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी, जसे आमचे आता सभागृहनेता म्हणाले की, सत्ताधारी असून देखिल आम्ही विशेष महासभा बोलावली होती. आम्ही मानतो आम्ही विशेष सभा ठेवली त्यावेळी अशी परिस्थिती होती की, सुरतमध्ये प्लेग पसरला होता त्यावेळी शासनाने असे आदेश दिले होते की, सुरत सारखा इतर शहरात प्लेग नाही पसरला पाहीजे. पावसाळयाचे दिवस होते. म्हणुन विपक्षांना सोबत घेऊन या विषयावर चर्चा करण्यासाठी ही विशेष महासभा बोलावली होती व या महासभेत आपले शहर सुंदर कसे दिसावे हा निर्णय घेण्यासाठी महासभा बोलावली होती. सभागृह नेत्यांना लक्षात नसेल तर त्यांना हे लक्षात यावे म्हणुन मी हे सांगत आहे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u> आमच्याशी कोणतीही चर्चा केली नव्हती सभागृहाची दिशाभुल करू नका.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- मा.महापौर व आयुक्त साहेब आज आम्ही खुश आहोत आमचे काम सत्ताधारी करत आहेत. जी लक्षवेधी आम्ही आणायला पाहिजे होती ती आमच्या मित्रांनी आणली आहे. जे काम स्थायी समिती मध्ये पास केले होते कच-याचे ते काम बरोबर होत नाही हे आता म्हणाले आता आम्ही छाती ठेकपणे सांगू शकतो की, आमच्या राज्यात काम व्यवस्थित होत होते. किशोर वनवारींच्या बोलण्याला महाडिकांनी उत्तर दिले आहे. शहरातील कचरा उचलायचा होता जुने ठेकेदार व्यवस्थित कचरा उचलत नव्हते. त्यामुळे आम्ही स्थायी समितीत बहुमताने अधिकार दिले की असा कोणता ठेकेदार पहा जो व्यवस्थित कचरा उचलेले तेव्हा आयुक्तांनी ठेकेदार नेमला व त्यांनी चांगले काम केले. दोन वर्ष त्यांनी चांगले काम केले. आता सत्ताधारी पण ओरडत आहेत. हे तर खरे आहे की, आमच्यावेळी तरी कचरा नीट उचलला जात होता आता ते काम नीट होत नाही. चुकी त्यांची आहे आमची नाही. आरोग्य सभापती त्यांचा स्थायी समिती सभापती त्यांचा, महापौर त्यांचे सर्व अधिकारी त्यांचे असे नाही म्हणत मी. संबंधित सभापतीनी याकडे लक्ष दिले पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- ही दुःखाची गोष्ट आहे हे म्हणत आहे की, महापौर आमचा आहे. उपमहापौर पण आमचे आहेत.



(इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते)

<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे</u> :- सभागृह नेता जे म्हणाले ते बरोबर म्हणाले त्यांनी आमच्या मा.बाळासाहेब ठाकरेचे पण उदाहरण दिले ते बरोबर आहे त्यांना माहित आहे की आमच्यावेळी काम बरोबर होत होते. आणि आता ते होत नाही हे त्यांनी मान्य केले आहे. आयुक्त साहेबांनी यावर लक्ष देऊन समाधान करावे. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- मा.महापौर शहरातील कच-याविषयी चिंता व्यक्त केली जावी. मग ती विपक्ष करो वा सत्ताधारी. श्री. सुभाष मन्सुलकरांनी लक्षवेधी आणली आहे. श्री.लाल पंजाबींनी काही भाष्य केले की, त्यांनी प्रथम महापौरांना, स्थायी समिती सभापतींना सांगुन अधिका-यांना बोलावून हे सांगायला पाहिजे होते. श्री. किशोर वनवारींनी यासंबंधी काही भाष्य केले होते हा पण मुददा आला होता की, मा.मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना येणा-या दुर्गंधी मुळे असे कळले की उल्हासनगर मधुन जात आहे. मी

सुभाष मन्सुलकर यांना सांगु इच्छितो की त्यावेळी शिवसेना भाजपा सत्ता आली नव्हती, येणार होती. मा.मुख्यमंत्री प्रचारासाठी इथे आले होते त्यावेळी त्यांना हा दुर्गंध जाणवला. आपल्या मुख्यमंत्रींना तिकडेच एवढा दुर्गंध येत असेल उल्हासनगरमध्ये यायचा ते विचारच करत नसतील असे होऊ शकते. किशोर म्हणाले की, शहरासाठी आपण येथे विचार करतो. इतरही विषय होते कार्यसुचीवर आणण्यासाठी केवळ शहराच्या प्रशासनाचा विषय आहे. प्रशासनाला स्टीम लाईन केली पाहिजे. सुभाष मन्सुलकर म्हणाले की निविदा न मागविता त्यांना ठेका दिला होता ते तर सर्व संमतीने झाले होते. आता हरकत घेण्यांत काही हरकत नाही. यावेळी महापौर हरदास माखीजा होते तेव्हा सांगीतले होते की ठिक आहे आम्ही आयुक्तांना अधिकार देतो जेणे करून शहराचे चांगले होवो. हा मुददा इथे आणणे मला उचित नाही वाटत. त्यानंतर हे म्हणाले की, पाच-सहा महिन्यापासुन जर ही समस्या होती तर आज सत्ताधारी पक्ष कसा जागा झाला. इतके महिने काय करत होते? यापुर्वी का नाही लक्षवेधी आणली? यापूर्वी काही अर्ज तक्रार महापौर, आयुक्तांकडे घेऊन गेला होता का? जर घेऊन गेला तर काही फायदा झाला नाही का? हे सदनासमोर स्पष्ट करा की आम्ही खुप मेहनत केली सभापतींना सांगीतले, महापौरांना सांगीतले, आयुक्तांना सांगीतले पण काही झाले नाही.म्हणुन आम्ही आपले सहकार्य मिळावे या दृष्टीने सभागृहात सुचना आणली. सभागृहात याकरिता सुचना आणतात ६९ नगरसेवकांनी यावर खुली चर्चा करावी. आम्हाला चर्चेत सामील करू इच्छितात तर तशी परिस्थिती स्पष्ट करावी. असे का घडते. कित्त्येक महिन्यापासून स्थिती जर बिघडत आहे तर तुम्ही आधीच प्रयत्न का करीत नाही. इथे लक्षवेधीत शेवटी लिहिले आहे की, महासभेत सविस्तर चर्चा व्हावी. आम्ही तयार आहोत चर्चा करण्यासाठी पण परिस्थिती तर स्पष्ट करा. किती महिन्यांपासुन ही स्थिती बिघडत आहे? सत्ताधारी पक्ष म्हणुन तुम्ही काय प्रयत्न केले? कुठे तुम्ही नाकामयाब झाला? ते सांगाल तर आम्ही चर्चा करायला तयार आहोत.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- आपणांस आमच्या कडून कोणते सहकार्य हवे.

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी</u> :- मा.महापौरजी, स.सदस्य सफाईसंबंधी चांगली हेल्थी चर्चा झाली आहे. जी झाली पाहिजे होती चांगल्या चर्चेसाठी बराच वेळ घेतला हे चांगले आहे. वारंवार ही गोष्ट येत होती की, मा. मुख्यमंत्री



मनोहर जोशी आले होते. ते सुध्दा असे म्हटले होते की मी बहुतेक उल्हासनगर मध्ये आलो आहे इतका दुर्गंध त्यांना येत होता. शिवसेना भाजपाची सत्ता आल्यावर आम्ही पण वारंवार हे म्हणत होतो की, ही दुर्गंधी मंत्रालयापर्यंत पोहोचली आहे. मला वाटते या मुददयाकडे न वळता आजच्या मुददयाकडे वळूया. मन्सुलकरांनी लक्षवेधी दिलेली आहे. माझ्यामते पनवेलकरांना जो ठेका दिला जसे आता नरेंद्र भाईंनी सांगीतले की त्यावेळी सर्व संमतीने हा निर्णय झाला होता. महापौर पण होते. आधीचे काही महिने त्यांनी काम समाधानकारक केले असे सर्वांचे म्हणणे होते. शहरातील कचरा उचलला जात आहे. पण आज तीन वाजता मी कार्यालयात आले श्री.लांजेवार यांना फोन केला कारण माझ्या प्रभागातून पण तक्रार आली की, कचरा उचलला जात नाही आहे. मी त्यांना हे म्हणाले की,तिथला कचरा उचलण्यास सांगावा. ३३ रस्त्यांचे रूंदीकरण होत असल्याने गाडया तिथे जाऊ शकत नाही. माझ्या प्रभागात रोडचे काम चालु होते तेव्हा कचरा गाडी जायला जागा नव्हती. प्रभागाच्या लोकांनी खुप कचरा तिथे टाकला होता. तेव्हा मी स्वतः तिकडे गेले व ड्राइव्हर कडून दगडी वगैरे टाकून गाडीला येण्यासाठी रस्ता केला. माझ्या मते हे पण एक कारण असू शकते शहरातील कचरा वाढण्याचे. मी मा.आयुक्तांना निवेदन करीन यावर थोडे लक्ष दयावे. की यामुळे तर कच-याच्या गाडया तिथपर्यंत जाऊ शकत नाही? पनवेलकरांना

एकदा बोलावून त्यांच्याशी चर्चा घडवून आणा. त्यांना आम्ही हे सांगु की शहरातील सफाईकडे जास्त लक्ष दयावे. मी सर्वांचे आभार मानते की, या मुददयांवर चांगली हेल्दी चर्चा झाली. याकरिताच आपण घर-परिवार सोडून महासभेत येतो. नेहमी अशाच मुददयांवर चर्चा घडली तर चांगले होईल.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :- </u>मा.महापौर आम्ही असे समजावे की, पनवेलकरांशी मिटींग घडवून आणण्यासाठी ही लक्षवेधी आणली गेली.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> स्थायी समिती सभापती त्यांना नाही बोलावू शकत का? त्यांचे ऐकत नाही का?

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी</u> :- हे पहा सर्वांच्याच प्रभागात कचरा आहे. सर्वांनी मिळून केले तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- आमचे हे म्हणणे आहे की तुम्ही हे स्वतः करू शकता ना?सभागृहाची परवानगी घ्यावी असे आहे का?

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी :-</u>तुम्ही जर येऊ नाही इच्छिता तर आम्ही आमचे करू.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :-तुम्ही आधी स्वतः का नाही केले ते सांगा? आज आपण ओरडत आहात . इतके वर्ष काय केले? याचा अर्थ आपण असफल झालात.

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी</u> :- मी थोडयावेळा पूर्वी सांगीतले की, मी आरोग्य अधिकारीना आल्या-आल्या फोन केला. माझी इच्छा होती सर्वांनी मिळून सभा घ्यावी जर तुम्ही सहकार्य नाही देऊ इच्छिता तर आम्ही आमचे करू.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- तुम्ही आधीच त्याच्याशी चर्चा करायला पाहिजे होती. इथे कशाला हि गोष्ट काढली?



<u>मा.सदस्य श्री. बनवारी ढेणवाल</u> :- मा.महापौर उपस्थित सदस्य मी सर्वांना सांगु इच्छितो की, शहराचा कचरा का उचलला जात नाही याला एक कारण आहे. जेव्हा पनवेलकरांनी ठेका घेतला तेव्हा शहरातील कचरा चांगल्या त-हेने उचलला जात होता. हे सगळयांना मान्य आहे. त्यात एक अशी अट होती की, ९५ नंतरच्या गाडयांचा कचरा उचलण्यासाठी वापर केला जाईल. आज स्थिती खराब आहे याचे सर्वांत मोठे कारण हे आहे की, मागील जुन्या ठेकेदारांना पेमेंट दिले नाही त्याच जुन्या गाडया व लेबर कचरा उचलत आहे. भाजपा शिवसेनेच्या सत्तेत मी कित्येक गाडया पकडुन दिल्या होत्त्या त्या गाडया अशयारितीने ॲडजेस्ट केल्या होत्त्या की, त्यावर दोन घमेले कचरा टाकला तरी गाडी पूर्ण भरलेली दिसायची. आज त्याच गाडया पनवेलकरांनी लावल्या आहेत. म्हणुन शहरातील कचरा उचलला जात नाही. माझ्या मते एक-दोन गाडया सोडून बाकी सर्व गाडया साठ-सत्तर सालच्या आहेत. दुसरे असे की, आपण त्यांना लमसम पर डे पेमेंट देतो.जुने जे ठेकेदार होते त्यांच्या पेमेंटमध्ये आणि यामध्ये खुप फरक आहे. तसेच सुटटीच्या दिवशी पनवेलकरांची गाडी कचरा उचलायला येत नाही. त्यांना ३० दिवस काम करायचे आहे. आपण तीस दिवसांचे पैसे त्यांना देतो.यावर विशेष लक्ष दिले जाईल. सर्वात उत्तम हे की पनवेलकरांची निविदा रदद करून दुस-यांना ठेका दयावा. होऊ शकते पनवेलकरांपेक्षा चांगला काम करणारा मिळेल. आपल्या महापालिकेची बचत होईल. यावर विचार केला जावा. धन्यवाद.

__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-__ मा.महापौर ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे की, कमीत कमी सत्ताधारी पक्षाने शहरातील कच-याची समस्याही सोडवली. विपक्ष पण यागोष्टीशी सहमत आहे.

__काही विपक्ष सदस्य :-__ आपण म्हणत आहात समस्या सुटली आम्ही नाही. आम्ही समाधानी नाही. तुम्ही फेल्युअर आहात म्हणुन तर तुम्ही विषय आणला.

__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी__ :-आज कमीत कमी विपक्षांना हे तर समजले की, आम्ही कच-याची समस्या सोडवली. एक वेळ अशी होती की, उच्च न्यायालयाने आदेश दिला होता व दोन उपायुक्त शहरात पाठवले होते. इतके कच-यांचे ढिग साठले होते. त्यांनी आदेश दिला होता की, १५ दिवसात शहर स्वच्छ झाले पाहीजे. आनंदाची गोष्ट आहे मी आयुक्त व महापौर साहेबांना धन्यवाद देतो की, कमीत कमी ९० टक्के कच-याची समस्या आपण सोडवली आहे. १० टक्यासाठी लक्षवेधी आम्ही आणली तो पण कचरा साफ होईल.

(इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते).

__मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-__मा.महापौर, जमनु पुरस्वानींना हे माहित नाही की, शहरात कचरा आहे म्हणुन लक्षवेधी सुचना दिली आहे आणि मा. महापौरांनी सुचना मान्य ही केली विसरले का ते? कचरा संपला त्याबाबत सुचना नाही कचरा आहे म्हणुन सूचना आहे.

__मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर__ :-मा.महापौर, विषयांतर होत आहे. हे पहा दोन वर्ष लोकांनी काम केले ते त्याच विषयी विचार करतील. मला पुर्ण शहराचा विचार करायचा आहे, मी पुर्ण शहरासाठी हा विचार करत आहे. तुमच्या मनात चुकीची भावना आहे तर काय करू शकतो. व नरेंद्र राजानी वेगळे सांगतात इतर कुणी काय बोलतो. माझा सरळ प्रश्न आहे. माझे ऐका



मी हे पण म्हणालो की, मागचे ठेकेदार काम करीत नव्हते म्हणुन विनानिविदा मागवता पनवेलकरांना काम दिले. माझी यामध्ये अशी काही भावना नव्हती की सेटींग करायची दिवाळी आली आहे. मला दुःख होते की, नगरसेवक हे जनतेकडे जातात. हातापाया पडुन वोट मागतात. कचरा साफ करू, पाणी देऊ अशी आश्वासन देतात. हा मुख्य मुददा आल्यानंतर आपले काही नगरसेवक जे निवडून आले आहेत लोकांना फसवून असे मला म्हणावे लागते. ज्वलंत प्रश्न समोर आला तरी विषयांतर करत आहे. कारण पनवेलकरांना परत ठेका मिळायला पाहिजे त्यांना काही शिक्षा नाही झाली पाहिजे. काही नोटीस नाही दिली पाहिजे म्हणुन. त्यांना सांगायचे कचरा नीट व्यवस्थित उचला असे काही सुचना समोर येत नाही. त्यांची निविदा रदद करण्यासाठी तर आम्ही नाही म्हणालो दिवाळी येत आहे. आमचे सर्व भाऊबंध शहरवासी रंग देत आहेत. चुना, कचरा जो निघतो तो ढिगा-यावर जाऊन टाकत आहेत. ढिगच्या-ढिग साचत आहे हे आम्हाला म्हणतात की, तुम्ही नाकामयाब झालात. तुम्ही काय कामे केली ते मी तुम्हाला सांगु शकतो त्यावेळी. मी सरळ म्हणालो की ज्या रस्त्यावरून महापौर, उपमहापौर, आयुक्त, विपक्ष नेता, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती ,भाजपा गट नेता जातात ते रस्ते बरोबर स्वच्छ असतात. जिथे गल्ली बोळात जो कचरा-कपटा आहे. तिथे गाडी जाणुन बुजून जात नाही. स्वच्छता निरिक्षकांचे ऐकले जात नाही. त्यांच्याशी बरोबर वागत नाही हे मी सभेसमोर आणु इच्छित होतो त्यांचा यांनी चुकीचा अर्थ काढला. त्यांचे तोंड मी बंद नाही करू शकत. चार-पाच हजार लोकांमधुन आम्ही निवडून आलो ते लोकांना फसविण्यासाठी नाही आलोत. ही यादी माझ्या एकट्याच्या प्रभागाची नाही आहे. शहरातील सर्व रस्त्यांची माहिती मी इथे आणली आहे. यात पुर्ण

विवरण दिले आहे. या तोंडी गोष्टी नाही आहेत. लक्षवेधी आणली याकरिता नाही की दिवाळीची सेटींग करायची मन्सुलकरला ते विसरून जा आपण.

(इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते तर समजत नव्हते.)

<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :-</u> हे चुकीचे बोलत आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :- हे मी जाणुन-बुजून बोलत आहे. आमचे काही नगरसेवक बंधू xxx पणे हसत आहे.

<u>काही विपक्ष सदस्य</u> :-मा.महापौर आमची हरकत आहे यावर.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडीक</u> :- हे चुकीचे बोलत आहेत. आमची हरकत आहे इथे काही महिला पण नगरसेविका बसल्या आहेत हा शब्द त्यांनापण लागु होतो. त्यांना हा शब्द परत मागे घ्यायला सांगा.

(इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते तर समजत नव्हते.)

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी:-</u>हे शब्द मागे घ्यायला सांगा.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- शब्द मागे घ्यायला सांगा. नाहीतर मागे बसलेल्या लोकांना राग येईल.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :- मी आपले शब्द मागे घेतो. माझ्याकडून काही चुकीचे शब्द निघाले असतील तर...



<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-</u> क्षमा केली.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :- माझ्याकडून भावनावश काही चुकीचे शब्द निघाले असतील तर ते मी मागे घेत आहे. शब्दाने शब्द वाढवावा म्हणुन मी लक्षवेधी नाही आणली. मी आधीच आयुक्तांना सांगितले की चार-पाच प्रश्न मी विचारणार आहे मला उत्तर द्या. माझे अनुमोदक उपस्थित नाही आहे.

<u>मा.महापौर</u> :- हे पहा तुमच्या मुदयावर मी पण बोलणार आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :- मला बोलू दया. जसे भिमसेन मोरे म्हणाले की, आरोग्य विभाग सभापती यांना विचारा. मी एका गोष्टीवर प्रकाश टाकतो आरोग्य विभाग समितीचे सभापती श्री. सुरेश मधुकर जाधव यांनी १७.१.२००० रोजी सभा बोलावली. स्वच्छता निरिक्षकांची मिटींग घेतली. याकरिता की त्यांना त्याची जबाबदारी समजली पाहिजे कचरा साफ झाला पाहिजे त्यावेळी ठेकेदाराविषयी जे पण सत्य होते ते एस.आय.नी सांगितले. तसे इतिवृत पण त्यांच्याकडे आहे. त्यावेळी आयुक्तांनी एक पत्र १८ फेब्रुवारी २००० ला त्यांना दिले. ते असे की, मेसर्स पनवेलकर यांना कंत्राट दिलेले आहे. त्याप्रमाणे त्यांच्या वाहनाव्दारे नियमित प्रमाणे कचरा उचलला जातो. याबाबत प्रत्येक कॅम्पाच्या निरिक्षकाने याबाबत तसे प्रमाणपत्र कार्यालयात सादर केले आहे. माहे जानेवारी दिनांक २,९,१६,१७ रोजी कचरा उचलला गेला नाही. असे स्वच्छता निरिक्षकांच्या अहवालावरून निर्दशानास आले आहे असे नमुद केले आहे या पत्राच्या संदर्भात दि.१७.२.२००० रोजी स्वच्छता निरिक्षकांची बैठक घेतली असता सर्व दिवशी कचरा व्यवस्थित उचलला जातो व त्याबाबत कोणाचीही तक्रार नसल्याचे त्यांनी सांगीतले यावरून आपले पत्र वस्तुस्थितीशी विसंगत वाटते. तथापि ज्या

स्वच्छता निरिक्षकाने आपल्याला माहिती दिली. त्यांची नावे आम्हांस कळवल्यास त्याबाबत सखोल चौकशी करता येणे शक्य आहे. आरोग्य विभागाच्या संबधात कोणतीही माहिती किंवा अडचणी आल्यास थेट आपण माझ्याशी अथवा आरोग्य अधिका-याशी चर्चा करू शकतात. मला हे म्हणायचे आहे की, १७ जानेवारी ला आरोग्यविभाग समिती सभापतींनी त्यांच्या केबिन मध्ये सभा घेतली असता. स्वच्छता निरिक्षकाने सांगीतल्यानुसार अहवाल त्यांच्या समोर आला. त्यानंतर १ फेब्रुवारी ला सभापतींनी आयुक्तांना त्याप्रमाणे पत्र दिले की असाच जर कचरा उचलत असतील तर मेहरबानी करून त्यांचे पेमेंट थांबवा.

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u> :- आयुक्तांनी कधी उत्तर दिले?

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर</u> :- १७ फेब्रुवारीला तुम्ही सांगा एका सभापतीशी असा व्यवहार केला जातो. तुम्ही त्यांच्यावर ढकलत आहात की त्यांनी लक्ष दिले पाहिजे. त्यांचे ते कर्तव्य आहे. म्हणुन मी तुम्हाला हे सर्व सांगत आहे.

(इकडे सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते तर समजत नव्हते.)

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u> :- आपण माझ्याकडे हात दाखवत होतात मला वाटले मलाच तुम्ही सल्ला विचारत आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर</u> :- आयुक्त साहेब, मी विचारलेले प्रश्न आपण लिहून घेतले आहेत ना? कृपया मला उत्तर दया.

--४१--

<u>मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी</u> :-पनवेलकरांना ठेका देण्यापूर्वी शहरात कच-याची काय हालत होती हे सर्वांना माहित आहे. सुरवातीला पनवेलकरांनी चांगले काम केले. आता काही ढिलेपणा त्यांच्या कामात आला आहे. जसे ज्योती भाभीने आता सांगीतले की पनवेलकरांशी चर्चा करून त्यावर काही तरी मार्ग काढला जावा. पनवेलकरांच्या आधी ठेकेदार होते त्यांनी कशी कशी कामे केली ते सर्व माहित आहे सर्वांना. १५ दिवसातून एकदा व महिन्यातून दोनदा गाडी यायची. तर लवकरात लवकर जसे ज्योती भाभी म्हणाल्या त्याप्रमाणे पनवेलकरांना बोलावून चर्चा करून ज्याप्रमाणे अटी आहेत त्याप्रमाणे काम करण्यास सांगूया. प्रत्येक प्रभागात जाऊन गाडीने रोज कचरा उचलला जावा असे माझे निवेदन आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद राजानी</u> :- मा.महापौर जसे आता सुभाष मन्सुलकरांनी आपली पिडा व्यक्त केली. आपली भावना शहराच्या प्रती दाखवली. त्याबरोबर मला मोठे दुःख होते की, १७ जानेवारीला सभापती स्वच्छता निरिक्षकांबरोबर सभा घेतात. त्याचे उत्तर आपणांस मिळाले. आपण तेव्हा महापौर होतात. मार्चमध्ये ठाकुर बेहरानी स्थायी समितीचे सभापती होते . एप्रिल महिन्यात श्रीमती ज्योती कालानी स्थायी समिती सभापती झाल्या. आज स्वच्छता निरिक्षकांनी जिथुन जिथुन कचरा उचलला जात नाही असे सांगीतले त्या ठिकाणांची यादी सुभाष मन्सुलकरांकडे आहे. आपल्याकडे आहे? स्थायी समिती सभापती यांच्याकडे आहे? सफाई विभागाचे सभापती सुरेश जाधव यांच्याकडे आहे? स्वच्छता निरिक्षकांचा रिपोर्ट आहे का आपल्याकडे? कृपया मला कोणी उत्तर दया.

<u>मा.महापौर</u> :- आपण आपले म्हणणे पूर्ण करा मग मी त्यावर उत्तर देतो.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद राजानी</u>:- ठिक आहे. मी माझे बोलतो. आपण फायनल वर्ड बोलणार. ठिक आहे आपण महापौर आहात. आपले म्हणणे मी ऐकेन. यातून हा संकेत मिळतो की, (कुणाला तरी उददेशुन) महापौरांचा शेवटचा

शब्द मी ऐकायला ही तयार आहे आणि मानायला ही तयार आहे ऐवढा शिष्टाचार माझ्याकडे आताही आहे आणि शेवट पर्यंत असेल. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, जो अहवाल कॉंग्रेस गटनेत्त्याकडे आहे. यावरून असा संकेत मिळतो की, हा अहवाल महापौर, स्थायी समिती सभापती व आरोग्य सभापती यांच्याकडे नाही. जानेवारी पासून त्यांना हा त्रास आहे आणि त्यावेळेपासून आजपर्यंत कुणीही बैठक नाही बोलवली. आयुक्तांबरोबर चर्चा नाही केली. एक उत्तर आयुक्तांनी दिले पुन्हा त्यावर चर्चा नाही झाली. स्वाभाविक आहे एक साधारण नगरसेवक, साधारण म्हणजे मी पण साधारण आहे. अनर्थ नका काढू. त्यांना पिडा झाली म्हणुन त्यांनी सभागृहासमोर लक्षवेधी दिली. महापौर आपण यात असफल झालात. स्थायी समिती पण असफल झालेत. दुःखाची गोष्ट ही पण आहे की, स्थायी समिती सभापती इथे सांगतात की, मी येऊन लांजेवारांना फोन करून सांगितले. स्थायी समिती सभापती कधीही लांजेवारांना कॅबीन मध्ये बोलावून आपल्या प्रभागाच्या विषयी सांगु शकल्या असत्त्या. इथे सांगायची काय गरज नव्हती. बरे झाले आज लाईव्ह टेलीकास्ट चालु नाही. त्यांच्या काही वैयक्तिक समस्या आहेत म्हणुन ते इथे आले नाहीत. पत्रकारवर्ग पण वर बसला आहे. याप्रकारचे सत्त्ताधारी पक्षाचे चित्र बाहेर गेले तर काय होईल हे समजण्याचा प्रयत्न करा. महापौर या नात्त्याने ,स्थायी समिती सभापती या नात्त्याने व आरोग्य विभाग समिती सभापती या नात्त्याने आपण जेव्हा असफल होता तेव्हा तुमच्याच पक्षाच्या नगरसेवकांना किती त्रास होता. त्याचप्रकारचा त्रास इथे बसलेल्या सर्व विपक्षाला होतो. याचे समाधान तुम्हाला काढायचे कारण तुम्ही सत्त्ताधारी आहात. आपसात बसुन हे केले पाहिजे होते



सभागृहात हे आणायला नको पाहिजे होते. सभागृहाचा उपयोग आम्ही करणार आहोत. इकडे सफाईची समस्या,पाण्याची समस्या , रस्ते नाही बनले अगणित मुददे आहेत जे आम्ही विचारणार आहोत.

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी :-</u> २ ऑक्टोबर तारीख निघुन गेली.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- अजुन आपल्या लक्षात आहेत. चला ठिक आहे. २ ऑक्टोबर तारीख निघुन गेली तरी खुप तारखा आहेत. पर्व आहेत. आम्ही आमचे आंदोलन छेडू शकतो. माझे म्हणणे हे आहे की, सुभाष मन्सुलकरांच्या भावनांचा आदर महापौर, स्थायी समिती सभापती यांनी ठेवला नाही. ही समस्या तिथेच सुटू शकली असती, लक्षवेधी आणली आहे तर काहीतरी निष्कर्ष निघाले पाहिजे. आपल्याकडे निष्कर्ष कोणकोणते आहेत. एकतर पनवेलकरांना काढून टाका. दुसरा जे स्थानिक ठेकेदार काम करत होते त्यांना दया. त्यात पनवेलकर पण सामील होऊ शकतात. पनवेलकरांना सांगायचे की, तुमचे काम आधी चांगले होते. आता काम चांगले नाही. हे सर्व सांगण्यासाठी लक्षवेधी सभागृहात आणण्याची काय गरज होती. आयुक्तांनाही तुम्ही बोलू शकला असता की, पनवेलकरांचा ठेका रदद करून दुसरा ठेका आणा. स्थायी समितीत निविदा आणा. सर्वात कमी दराच्या निविदाकारास ठेका देऊ. हे तुम्ही तिथेही करू शकला असता, दुसरे पनवेलकरांना बोलावून त्यांच्याकडून काम करवून घ्यायला पाहिजे होते. हे आपण काही केले नाही आपण असफल झालात. सत्त्ताधारी पक्ष असफल झाला.

<u>मा.सदस्य श्री. बनवारी ढेणवाल</u> :- मा महापौर, १७ जानेवारी रोजी आरोग्य विभाग समिती यांनी घेतलेल्या सभेतील स्वच्छता निरिक्षकांच्या अहवालावरून आम्ही आयुक्तांना पत्र लिहिले होते की, काही ठिकाणचा कचरा उचलला जात नाही. आयुक्तांनी सभापती व आमच्याशी चर्चा केली व लगेच त्यावर कार्यवाही केली. व त्या समस्यांचे समाधान केले म्हणुन आम्हाला मुददा वाढविण्याची गरज भासली नाही. पण आज परत शहरात ही समस्या निर्माण झाली आहे. दिवाळीचे दिवस जवळ येत आहेत. म्हणुन लक्षवेधी आमच्या गटनेत्त्यांनी ठेवली याचा आपण गैर अर्थ घेत आहात. आपण म्हणता

महापौरांना सांगायला पाहिजे होते. स्थायी समिती सभापतींना सांगायला पाहिजे होते. आमच्या आरोग्य विभाग समिती सभापती सक्षम आहेत. त्यांनी त्याचवेळी आयुक्तांना सांगुन सफाई करून घेतली पण आता परत कचरा वाढत आहे. म्हणुन लक्षवेधी आणावी लागली.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- यानंतर मी काहीच बोलणार नाही. मी खुप काही बोललो आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- मा.महापौर, ज्याप्रमाणे लक्षवेधीवर सर्वांनी आपल्या सुचना मांडल्या, मन्सुलकरांनी एवढा मोठा अहवाल दाखवला, एस.आय यांचा रिपोर्ट दाखवला, ढेणवाल साहेब म्हणाले की, आयुक्त साहेबांनी आमच्या समस्येचे समाधान केले होते. कचरा उचलला जात होता. तर ही फाईल घेऊन मन्सुलकर बसले आहेत तर ती फाईल यानंतरची आहे का समाधान होण्यापूर्वीची आहे.

<u>मा.सदस्य श्री. बनवारी ढेणवाल</u> :- ही फेब्रुवारीची फाईल आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :- समाधान झाले तरी मग आज लक्षवेधी कशाला आणली?



<u>मा. सदस्य श्री. बनवारी ढेणवाल</u> :- हे उदाहरण त्यावेळचे आम्ही दिले. आज शहरात परत कचरा झाला आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u> :- याबाबतीत आरोग्य विभाग समिती सभापती यांना बोलु दया.

<u>मा.सदस्य श्री. सुरेश जाधव</u> :- मा.महापौर, उपमहापौर व आयुक्त आम्ही सर्वांनी मिळून पनवेलकरांना ठेका दिला. आता प्रश्न असा आहे की, शहरातील सर्व कचरा उचलला जात नाही. खुप सदस्यांच्या तक्रारी पण माझ्याकडे आल्या आहेत. जो कचरा उचलला जात नाही त्याबाबतीत पनवेलकरांवर आपण काय कार्यवाही केली. मी आयुक्तांना पण हे विचारले होते की, त्यांना कचरा न उचलण्या बाबत आपण काय दंड ठेवला आहे? सत्ताधारी पक्षाने व आपण सर्वांनी मिळून आयुक्तांवर हे सोपवले की, त्यांनी त्यांच्या मर्जीने ठेका द्यावा. त्याप्रमाणे आयुक्तांनी पनवेलकरांना ठेका दिला आहे. जर ते कचरा नाही उचलत नाही तर त्यांच्यावर काहीतरी दंड ठेवा. दंड नाही म्हणुन ते मनमानी करत आहे म्हणुन शहरात सफाई होत नाही. म्हणुन शहरवासी त्रासात आहेत. आपण पुर्ण पैसा त्यांना देतो पण कचरा उचलला जात नाही. जसे रविवारी पूर्ण महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना सुट्टी असते त्यादिवशी कचरा उचलला जात नाही. तरी पण आपण पनवेलकरांना पैसे देतो. का देता? आपल्या शहरातील पैश्याचे नुकसान का करत आहोत? मला हे म्हणायचे आहे की, सुट्टीच्या दिवशी कचरा उचलला जात नाही तरी त्यांना आपण पैसे देतो. त्यांना त्यादिवशी पण कचरा उचलायचा आहे. तरी काही अंशी असफल ते झाले आहेत. पूर्ण असफल झालेत असे मी म्हणत नाही. काही तरी अंकुश यावर लावला गेला पाहिजे. म्हणुन मी आयुक्तांना विनंती करतो की, यावर अंकुश ठेवण्यात यावा.

<u>मा.महापौर :-</u> मी असे समजतो की, शहराची कोणतीही समस्या असो ती सत्ताधारी व विपक्ष अशी वाटली नाही गेली पाहीजे. शहराची समस्या ही सर्वांची समस्या आहे. त्यासमस्येला सत्ताधारी व विपक्ष दोघांना तोंड दयायचे आहे. मी आमचे मित्र जे विपक्षात आहेत त्यांना आठवण करून देऊ इच्छितो. त्यांचा जो कार्यकाल होता ९७ साली. त्यावेळी शहराला एक काळा डाग लागला होता. या सदनातच कोणी म्हणाले होते की, उल्हासनगर नाव बदलुन कचरा नगर नाव ठेवायला हवे होते. नॅशनल वर्तमानपत्रात अशा प्रकारच्या

बातम्या आल्या होत्त्या, फोटो छापले गेले होते. मुंबई उच्च न्यायालयात मी स्वतः वादी म्हणून विनोद तलरेजा बरोबर व शहरातील इतर समाजसेवकां बरोबर ज्यात भाजपा व शिवसेनाचे कार्यकर्ते श्री. रमेश मुकणे, मि.पारवानी व रोटरी क्लबचे काहीजण असे सर्वांनी मिळून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली की, शहरातील कचरा उचलला जात नाही. कोर्टाने ओदेश दिले त्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचे दोन माजी आयुक्त इथे पहाणी करायला आले होते. त्यांनी उच्च न्यायालयाला त्याप्रमाणे पूर्ण विवरण दिले. त्याप्रमाणे महापालिकेत कार्यवाही केली गेली. व त्यानंतर शहरातील कचरा उचलला जात होता. त्यावेळी आम्ही हा विचार नाही केला की भाजपा आणि शिवसेनाची सत्त्ता असफल झाली आहे किंवा लाचार झाली आहे. त्यांना मदत नाही केली पाहीजे. आम्ही स्वतःला शहरवासी व शहराचा एक हिस्सा समजुन भले आम्ही विपक्षात होतो तरी आपल्या मदतीसाठी आम्ही धावलो होतो. आमची इच्छा होती की, शहरात साफ-सफाई झाली पाहिजे. या उददेशांनी आम्ही उच्च न्यायालयापर्यंत गेलो होतो. आज शहरात कच-याची समस्या निर्माण झाली आहे म्हणुन कॉंग्रेस गटनेत्त्यांनी लक्षवेधी आणली आहे त्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो. याबाबतीत दुमत नाही की पनवेलकरांना ठेका दिल्यानंतर कचरा उचलण्याबाबत



बरीच प्रगती झाली होती. मी स्वतः आयुक्तांना हे सांगीतले होते की, शिंदे साहेब कचरा उचलण्यात बरीच प्रगती झाली आहे. परंतु काही दिवसापासून पहाण्यात येते की, कामात ढिलेपणा आला आहे. हे सुध्दा मी आयुक्तांना बोललो हातो. एका आठवडयापूर्वी मी सांगीतले की, कचरा उचलला जात नाही. आजपण मी आलो तेव्हा राजु सोसायटी समोर जो सिमेंट रोड आहे मध्यरस्त्त्यात कचरा पडला आहे. एखादी समस्या शहरात निर्माण झाली व ती सभागृहासमोर ठेवली व त्यावर वेगवेगळया पक्षांचे विचार घेतले अधिकारीकडून त्यावर आश्वासन घेतले. तर यात काही चुक आहे असे मला वाटत नाही. यास कोणाची सफलता व असफलता म्हणुन समजणे हे चुकीचे आहे. मला वाटते लाल पंजाबींना हे पटत असेल जे मी बोलतो ते खरे आहे. ही शहराची समस्या आहे त्यावर सर्वांनी मिळून काहीतरी मार्ग शोधला पाहिजे. म्हणुन ही लक्षवेधी सभेत आणली आहे. मी कॉंगेस गटनेता सुभाष मन्सुलकर यांना धन्यवाद देतो आणि आयुक्तांना निर्देश देतो की दिवाळी सणाचे दिवस आहेत कचरा अजुन शहरात जमा होईल. कचरा न वाढावा म्हणुन ठेकेदाराला बोलावून त्याच्याशी चर्चा करून काय-काय करायचे आहे ते उदयाच सांगा. दिवाळीत शहर कचरा शुन्य झाले पाहिजे. शहरवासियांना शहर कचरा शुन्य दिसले पाहिजे. इतकेच नाही तर दिवाळी नंतर देखील येणा-या महासभेपर्यंत आम्ही त्या ठेकेदाराचे निरिक्षण करू. सत्त्ताधारी असो वा विपक्ष असे मत पडले की, ठेकेदाराचे काम बरोबर नाही तर आम्ही त्या ठेकेदाराला बदलु व तसे सभेचे मत पण घेऊ म्हणुन अजुन एक संधी एक महिन्यापर्यंत त्या ठेकेदाराला देतो. तो पर्यंत आयुक्तांना असे सांगतो की, ठेकेदारांना ताकीद दया. जसे ते जुन्या गाडया वापरतात. चार-पाच दिवस कचरा उचलत नाही. म्हणुन हा जो मुददा आला आहे तो बरोबर आहे. मी आयुक्तांना सांगतो की, त्यांनी या मुददयावर सदनाला काहितरी आश्वासन दयावे. आणि पुढे महासभा येई पर्यंत त्याचे काम पहावे. व हा मुददा परत सदनात नाही आला तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> मा.महापौर, तुम्ही आता शहरातील ज्वलंत प्रश्न लक्षवेधी स्वरूपात सुभाष मन्सुलकरांनी महासभेपुढे आणला म्हणुन आपण अभिनंदन केले आम्हाला आनंद झाला. पण याच बरोबर आम्ही आपले लक्ष एका गोष्टीकडे वेधु इच्छितो की जेव्हा कधी आम्ही याच्यापेक्षाही गंभीर समस्यांची लक्षवेधी विपक्षा तर्फे आपल्याकडे येते तेव्हा ती लक्षवेधी आपण नाकारता. असे खुपदा झाले आहे. या समस्येपेक्षाही गंभीर समस्या आम्ही लक्षवेधी मार्फत आपणांस दिली आहे. पण त्यावर आपण चर्चाच नाही करू दिली. कृपया यापुढे असा पक्षपात करू नका. सत्त्ताधारी व विपक्ष असा भेदभाव नाही झाला पाहिजे. ही आमची विनंती आहे.

मा.महापौर :- तुम्ही असे कधी पण मनात आणु नका की, विपक्षाची लक्षवेधी आहे का सत्ताधारीची असा विचार मनात आणुन रिजेक्ट करतो असे कधीच नाही करणार? शहराची समस्या आहे तर त्यावर चर्चा करणे विचार विनिमय करणे हे आमचे व आपले पण कर्तव्य आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- मा.महापौर, मागील पाच-सहा महासभा आपण पहाल तर विपक्षाची एकही लक्षवेधी आपण स्विकार नाही केली आहे. आपण इतिवृत्त पहा.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मा.महापौर, विजय विल्ला विषयी मी व पांडुरंग लांडे साहेब यांनी लक्षवेधी दिली होती. दोन्ही लक्षवेधी आपण रिजेक्ट केल्या व सत्ताधारी पक्षांच्या दोन्ही लक्षवेधी स्विकारल्या.

--४५--

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौर :- जर ज्वलंत प्रश्न असता तर नक्कीच चर्चा केली असती.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मी विजय विल्ला विषयी जी लक्षवेधी दिली ती काय जनतेच्या हितासाठी नव्हती. लांडे साहेबांनी आणली ती पण सार्वजनिक हितासाठीच होती. आपण काय समजता आम्ही वैयक्तिक लक्षवेधी आणतो. आम्ही इथे जनतेसाठी बसलो आहोत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- यापुढे असे करू नका आमचे पण अभिनंदन करत जा आम्ही पण शहराच्या समस्या सभागृहात मांडतो.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- लक्षवेधीचा अर्थ आम्ही आपले लक्ष वेधु इच्छितो.

मा.महापौर :- मी आयुक्तांना सांगतो की त्यांनी सभागृहाला आश्वासन दयावे.

मा.आयुक्त :- मा.महापौरजी, स.सदस्य इथे जी लक्षवेधी आणली आहे त्यासाठी मी मन्सुलकरांचे आभार मानु की नको मानु याबाबत मी जरा गोंधळून गेलो आहे. आमच्या महापौरांनी आभार मानले आहे तर मी पण मानतो.

मा.सदस्य श्री.सुरेश जाधवः- आभार मानायला काही हरकत नाही.

मा.आयुक्त :- मी गोंधळून याकरिता गेलो की, हा मुददा लक्षवेधी म्हणुन आणण्यासारखा होता का? याबाबतीत खुप काही सदस्यांनी पण मत मांडली आहेत. मी खुप खुश आहे की सत्ताधारी व विपक्ष या दोघांनी या गोष्टीची प्रशंसा केली की, आजची जी स्थिती आहे ती पुर्वी पेक्षा शंभर टक्के चांगली आहे. इट इज द ॲप्रीसिएशन टू द ब्युरोक्रेट लाईक मी. त्याबददल मी आभारी पण आहे. सन १९९९-२००० ला कच-याचा ठेका दिला. तेव्हा १५ वेगवेगळे ठेकेदार शहरातील पाच कॅम्पामध्ये काम करत होते ते काय काम करत होते. कशाप्रकारे करत होते हे पूर्ण शहराला माहित आहे. समस्या एवढी गंभीर झाली की त्यांना पेमेंट देण्याचे प्रश्न आला बावीस ऑक्टोबरच्या स्थायी समितीत तेव्हा सर्व पक्ष एकमताने म्हणाले की हे पंधरा ठेकेदार आहेत हे काम करत नाहीत. म्हणुन आम्ही प्रशासनाला अधिकार देतो की त्यांनी आपल्या आवडीनुसार ठेका देऊन या समस्येचे समाधान करावे. मला त्यावेळी खुप दबाव आला होता. इतक्या तातडीने कोणत्त्याही समस्येचे समाधान करायचे असेल तर त्यासाठी काही प्रोसिजर पण असते. ऑडीटच्या

हिशोबाप्रमाणे फॉर्मलिटी जी असते ती पूर्ण करावी लागते. परंतु स्थायी समितीने मला अधिकार दिले होते म्हणुन मी काही करू शकलो. मी पनवेलकरांना विनंती केली कारण पनवेलकरच असा व्यक्ती आहे ज्याच्याकडे सर्व त-हेचे साहित्य आहे. त्यांच्याकडे डंपर आहे ट्रक्स आहेत, जेसीबी आहेत. जितक्या पण आधुनिक मशीन आहेत त्या त्यांच्याकडे आहेत. मी त्यांना विनंती केली तेव्हा ते म्हणाले की या कच-याच्या कामात मला नाही गुंतविले तर बरे होईल. कारण महापालिकेचा प्रश्न आहे मला या कामाची काही सवय नाही. आम्ही त्यांना विनंती केली की शहराची ही गंभीर समस्या आहे. मी विनंती करतो म्हणुन आपण यात लक्ष दयावे. पंधरा ठेकेदारांनी व्यवस्थित काम न केल्यामुळे पनवेलकरांना काम दिले गेले होते. मला किशोर वनवारींचा डायलॉग लक्षात आहे की, ते म्हणाले आमचे ठेकेदार ट्रीप बेसिसवर काम नाही करत ट्रीक



बेसिसवर करतात. आम्ही या समस्यांचे पण समाधान काढले त्यांना सांगीतले की, ५०० खत्ते आहेत तिथुन तुम्हाला कचरा उचलायचा आहे आणि शहराला स्वच्छ करायचे आहे. त्यांनी कबुल केले आणि मागच्या ठेकेदारांना जे दर लागु केले होते त्याच दरांनी त्यांनी हे काम केले होते. आणि अट टाकली की, कचरा उचलून ते डंपिंग ग्राऊंडवर टाकायचा. डंपिंग ग्राऊंडच्या इथे काही समस्या आली तर ती त्यांनीच सोडवायची. महापालिका सहकार्य देईल. मी शहरात फिरत असतो तुमची माझी नेहमी भेट होत असते. थोडी बहुत चर्चाही होते ही इतकी गंभीर समस्या झाली आहे हे जोपर्यंत लक्षवेधी नव्हती आणली तोपर्यंत मला माहित नव्हते. समस्या जरूर आहे मी असे नाही म्हणत की शंभर टक्के सफल आहे. शेवटी मशीनरी आहे कधी ट्रक बंद होऊ शकतो, कधी दुसरी काही समस्या येऊ शकते. पंधरा- वीस खत्ते यांनी इथे दर्शाविले. पाचशे खत्त्यांपैकी पंधरा-वीस खत्त्यांचे काम काही कारणामुळे राहीले असेल तर मला नाही वाटत ही खुप मोठी गंभीर समस्या आहे. त्यावेळेपुरती ती समस्या निर्माण झाली असेल नंतर तिथुन कचरा हलवला गेला असेल आणि समस्या सुटली देखिल असेल. काही खत्ते अशाठिकाणी आहेत जेथे ट्रक जात नाही, मशीनरी जात नाही. जसे श्रीमती आशा राधवानी यांच्या प्रभागात एक खत्ता आहे त्याठिकाणाला हाजिमलंग असे तेथील लोक म्हणतात. मी तिथे भेट दिली आहे. तिथे माणुस फक्त पायी चालु शकतो. (इकडे काही सदस्य बोलत असताना)कुणाचातरी प्रभाग असेल तिथे आठ-नऊ वर्षापेक्षा जास्त तिथे २००-२५०ट्रकचा खत्ता पडुन आहे.त्याची माती पण झाली आहे. असे एक-दोन ठिकाण आहेत तिथे ट्रक जाऊ शकत नाहीत. जर एखादया प्रभागात गार्बेज लिफ्टिंगचा प्रॉब्लेम असेल तर आपल्याकडे यंत्रणा अशी आहे डॉ.लांजेवारांच्या अध्यक्षतेखाली एक सेल आहे. कोणाची तक्रार आली तर पनवेलकरांचे प्रतिनिधीकडे कळवली जाते. त्याप्रमाणे काम केले जाते. नंतर तक्रार परत येत नाही. जानेवारीच्या एका पत्राचा उल्लेख श्री. मन्सुलकरांनी केला ज्यात एस.आयनीं लिहुन दिले की, काही खत्ते असे आहेत. जिथुन कचरा उचलला नाही गेला. सभापतींच्या तक्रारीला गंभीरपणे घेणे माझे कर्तव्य होते. त्यांना विचारले यापूर्वी जे तुम्ही आम्हाला सर्टीफिकेट दिले. पेमेंट देण्याची एक पध्दत आहे ती म्हणजे जोपर्यंत एस.आय आम्हाला लिहून देतात की, माझ्या ऐरीयातील जोपण खत्ता आहे. त्यावरील कचरा उचलला जातो. जोपर्यंत आम्हाला असे सर्टीफिकेट देत नाही तोपर्यंत आम्ही पेमेंट देत नाही. आम्ही त्यांचे सर्टीफिकेट चेक केले त्या सर्टीफिकेटच्या आधारे आम्ही त्यांना पेमेंट दिले आहे ते सर्टीफिकेट आम्ही तुम्हाला दाखवू शकतो. इतिवृत्तात त्यानी असे सांगीतले हा एक वेगळा संशोधनाचा विषय आहे. त्यामिटींगच्या आधारे आम्ही त्यांना पत्र लिहिले त्यांना हे पण सांगीतले की जर काही प्रशासना तर्फे अडचण आली तर आपण केव्हाही येऊ शकता. आपण एकत्र त्यावर उपाय काढू. त्यानंतर एक-दोनदा मला सभापती (आरोग्य विभाग) भेटले होते. पण यागोष्टीचा परत उल्लेख झाला नाही. पण आज मी आधी पण म्हणालो की लक्षवेधी नंतर मला समजले की, ही एक गंभीर समस्या आहे. ठिक आहे असे जरी असले तरी महापौरांनी रूलिंग दिले आहे. पनवेलकरांना ताकीद दया. व कचरा शुन्य

शहर दिसले पाहिजे. नव्या गाडीविषयी बजेटमध्ये जी तरतुद होती त्याप्रमाणे ते का नाही झाले त्याविषयी मी सदनात सांगु इच्छितो की, लवकरात लवकर एक प्रस्ताव सदनात येणार आहे. ज्यामधे रिसोर्स नावाची कंपनी आहे जी गार्बेज मधुन ग्रीन कोल बनवायची कंपनी आहे त्यांच्याशी आपल्याला करार करायचा आहे. मी सदनासमोर ही बाब आणेन. विधीअधिकारींना मी लिगल फॉर्मेलिटी चेक करण्यासाठी प्रस्ताव दिला आहे. महापौर, उपमहापौर यांच्याशी पण बोलणे झाले आहे. मशीनरी जर विकत घेतल्या तर एक-दोन करोड नुकसान होऊन जाईल. जर या कंपनीशी आपला करार झाला तर कंपनी स्वतः प्रत्येक खत्त्यातून कचरा उचलेल. दोन ते पावणे दोन करोड खर्च महापालिकेचा होत



आहे तो वाचेल म्हणुन याकारणास्तव गाड्या खरेदी नाही केल्या. इथे खुप काही गोष्टी झाल्या. मी प्रशासनाची बाजु घेत नाही व हे नाही बोलत की, शंभर टक्के स्थिती चांगली आहे. पनवेलकरांचा जो ठेका आहे तो डिसेंबर २०००, दोन महिन्या पर्यंत आहे. एक महिना महापौर साहेबांनी आम्हाला वाढवून दिला आहे. प्रयत्न आम्ही जरूर करू. त्यानंतरही समाधान नाही झाले तर सदनाच्या आवडीनुसार कोणत्याही ठेकेदाराला बोलावून निविदा मागवुन ठेका देऊ शकतो. पण जी परिस्थिती पनवेलकर येण्यापूर्वी होती तशी स्थिती परत निर्माण होईल. ही माहीती मी सदनाला देणे माझे कर्तव्य समजतो. महापौरांनी जसे सांगीतले तशी कार्यवाही लवकरात लवकर होईल. व दिवाळी पर्यंत कचरा शुन्य शहर दिसेल. इतकेच मी सांगतो.

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर</u> :- मा.आयुक्त साहेब, जसे आता सभापतींनी सांगीतले की, रविवारच्या दिवशी किंवा सुट्टीच्या दिवशी आपले स्वीपर कामावर येत नाही. त्यामुळे जागोजागी वार्डातला कचरा खत्त्यावर येत नाही. कारण पनवेलकरांना आपण ठेका दिलेला आहे त्यांना सध्याकाळी चार-पाच वाजेपर्यंत कचरा गोळा करायचा आहे. त्याच्यानंतर खत्तावर कचरा येणार नाही. जेव्हा सफाई कामगार सुट्टी करतात. पनवेलकरांना आपण सुट्टीच्या दिवसाचे पण पैसे देतो का?

<u>मा.आयुक्त</u> :- याबाबत मी तुम्हाला उत्तर देतो. स्वीपर जरी कामावर येत नसले तरी लोक त्यादिवशी खत्त्यावर कचरा टाकतात. आणि मागे आम्ही असे प्रयोग करून पाहिले की रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी जर कचरा उचलायचा नाही असे ठरविले तर अतिशय मोठी दुर्गधी पसरण्याची शक्यता असते. आणि समजा जर रविवारी सफाई कामगाराने त्या खत्त्यावर कचरा आणला नाही तरी सोमवारी तो कचरा खत्त्यावर येतो. शेवटी काय पनवेलकरांना आम्ही ट्रीप बेसिसवर दिलेले नाही हे कृपया करून लक्षात घ्या. त्यांच्याकधी पाच ट्रीप होतील कधी दहा होतील काही ठिकाणी रोड वायडिंगचा जसे स्थायी समिती सभापतींनी सांगीतले की, त्याप्रमाणे खुप माती आणि डेमोलेशन केलेला कचरा पण यांनी उचलला आहे. त्याचा हिशोब आम्ही केला नाही. समजा रविवारी नाही आले तरी दुस-या दिवशी कचरा खत्त्यावरच येणार आहे. शहरातील पुर्ण कचरा उचलण्याची जबाबदारी त्यांची आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :-</u> माझ्या म्हणण्याचा उददेश असा आहे की, दिवसाला जो कचरा जमा होणार तो त्यांना उचलायचा आहे. भले दहा ट्रीप असू दया किंवा पंधरा. दोन दिवसाचा कचरा राहू दे असे आपण बोलून कसे काय चालणार. जर रविवारी त्यांना कमी कचरा मिळतो तर दोन ट्रिप होत असणार एका प्रभागात. स्वीपर लोक कचरा खत्त्यावर घेऊन येत नाहीत. समजा घरच्या लोकांनी तिथे आणुन कचरा टाकला तर...

<u>मा.आयुक्त</u> :- रविवारी जरी कमी ट्रीप झाल्या तरी सोमवारी जास्त होत असतील.

मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :- आपण रोजच्या रोज त्यांना पेमेंट देतो ना? असे तर नाही की, जास्त कचरा आहे तर त्यांना जास्त पैसे देतो. पंधरा ट्रीपच्या दुस-या दिवशी वीस ट्रीप होऊ दया. रस्त्यावर जितका कचरा आहे त्यांना उचलायचा आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आयुक्त साहेब यावर मला काही सुचवायचे आहे. आधी महानगरपालिकेत सफाई कामगारांना गुरूवारी अर्धा



दिवस सुटटी असायची व रविवारी पण अर्धा दिवस सुटटी असायची. गुरूवारी अर्धा दिवस सुटटी झाल्यानंतर ते आपल्या कामासाठी एल.टी.ए., लिव्ह साठी ते महापालिकेत येऊ शकत. आता काही महिन्यापूर्वी गुरूवारची अर्धी सुटटी रद्द करून त्यांना पूर्ण दिवस काम करावे लागते. व रविवारी त्यांना पूर्ण दिवस सुटटी असते. आमच्या नगरपालिकेच्या एका प्रशासकाने सावंत साहेब यांनी युनियनच्या सांगण्यावरून दहा-बारा वर्षापूर्वी असे पास केले होते की ज्यादिवशी शासन सुटटी असेल त्यादिवशी त्यांनापण सुटटी देण्यात येईल. लाईट विभाग, पी. डब्लू.डी विभाग सुटटीच्या दिवशी चालु असतो. सफाई कामगारांना मात्र सुटटी असते. समजा शनिवारी दिवाळी आली. शासनाची सुटटी असल्याने पूर्ण दिवस सफाई कामगारांना सुटटी असते. दुस-या दिवशी रविवारी सुटटी असते तर पूर्ण दोन दिवस शहरातील कचरा उचलला जात नाही, शौचालये साफ केली जात नाही, झाडू मारला जात नाही. खुप प्रॉब्लेम होतो. एका वर्षात तर चार महिने सुटी असते, कधी ईद आहे, कधी दिवाळी आहे, कधी रोझा आहे तर कधी दसरा आहे. तीन-चार महिने सुटटी असतेच. त्यांच्या स्वतःच्या रजा असतात. सी.एल. आहे, ई.एल आहे. पूर्वीची पध्दत सुरू केली तर जसे रविवारी व गुरूवारी अर्धा दिवस केला तर पनवेलकर जसे कचरा सुटटीच्या दिवशी उचलत नाही कारण कचरा रस्त्यावर येत नाही तर ते उचलणार काय? त्यामुळे सोमवारी त्यांना दुप्पट काम करावे लागते. ते काम पण त्यांना अर्धे करावे लागेल. ती जी पूर्वीची पध्दत होती त्यात त्यामुळे नगरसेवक, शहरवासी खुश होते. आता काय होते समजा रविवारी कोणी मंत्री येणार असतील, किंवा मैयत आहे, कार्यक्रम आहेत सफाई कामगारांना सुटटी असल्यामुळे आम्ही त्यादिवशी कार्यक्रम ठेऊ शकत नाही. तर मेहरबानी करून तीस वर्षापासून जी पध्दत सुरू होती अर्धा दिवस रविवार, गुरूवार त्यांना सुटटी दयायची पूर्ण दिवस नाही ती चालू केली तर पनवेलकरांची पण समस्या सुटेल. पनवेलकरांची जी समस्या आहे त्यात आधीचे पंधरा ठेकेदार कचरा उचलण्यात अयशस्वी ठरले त्यानंतर आम्ही एका ठेकेदाराला हे काम दिले. त्यांनी त्यांच्यापेक्षा शंभर टक्के जास्त चांगले काम केले. कामात जर ढिलेपणा आला तर तो पनवेलकरांमुळे नाही त्यांच्या स्टाफमुळे हे सदस्यांनी लक्षात घ्यावे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १८.९.२००० सह दि. ४.१०.२००० रोजीचे इतिवृत कायम करण्याबाबत.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंग भुल्लर :- मा.महापौर त्यादिवशी प्रभारी आयुक्त श्री. सोनाळे साहेब होते. नाल्याबाबत जो मुददा निघाला त्याविषयी म्हणाले होते की, दोन दिवसात नाला साफ करून मिळेल. साफ करणे तर लांबची गोष्ट इतिवृतात ते वाक्य आले देखिल नाही. त्यात उल्लेखच नाही.

मा.सचिव :- सोनाळे साहेब म्हणतात मी असे म्हणालोच नाही.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंग भुल्लर :-रेकॉडींग पहा. रेकॉडींग त्यादिवशी केले होते की नाही. आयुक्तांना स्वतः माहिती आहे की, तो नाला किती महत्त्वाचा आहे. पूर्ण उल्हासनगर मध्ये त्यामुळे पाणी भरले होते. चंदरपाकीटमारवाला

नाला आपण स्वतः साफ करून घेतला होता. स्टे असुनसुध्दा सोनावणे साहेबांनी त्यांना परवानगी दिली नाला बंद करण्यासाठी.

<u>मा.सचिव</u> :- यात वाक्य टाकले जाईल.



<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंग भुल्लर</u> :-ठिक आहे. आयुक्त साहेब आपण स्वतः तिकडे पहा नाला साफ करण्याविषयी म्हणजे प्रॉब्लेम येणार नाही.

<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे</u> :- मा.महापौरजी, इथे भडकवाड साहेबांविषयी लिहीले आहे. लॉक केले जावे.

<u>मा.आयुक्त</u> :- याविषयी मी महापौरांना बोललो आहे ही गोष्ट मी वाढवू नाही इच्छित. आम्ही महापौरांचा आदर ठेवतो.

<u>मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :-</u> हे चुकीचे आहे. असे शब्द नाही वापरले पाहिजे.

<u>मा.महापौर</u> :- हे पहा कोणताही अधिकारी किंवा स.सदस्यांविषयी अशोभनिय शब्द जर कुणी वापरला असेल तर तो इतिवृतांतून काढला जावा. वूई डिलीट इट.

<u>मा.आयुक्त</u> :- आम्ही तर यापुढे असे म्हणणार होतो की, महापौरांनी अशा सदस्यांना वॉर्निंग दयावी.

<u>मा.महापौर</u> :- सदर इतिवृत्त सुचविलेल्या दुरूस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>विषय</u> :- उल्हासनगर शहरातील महापालिकेच्या ३ प्रवेश व्दारांना
<u>नावे देण्या बाबत.</u>

<u>मा.महापौर :-</u> मला वाटते याविषयावर सर्व पक्षांचे एकमत नाही. उपमहापौरांनी दिलेल्या माहितीनुसार मला वाटते हा विषय वगळून टाकावा. परत नव्याने आणु या.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- हा विषय आणला कोणी?

<u>मा.आयुक्त</u> :- खरे तर मी सर्व फाईल पाहिल्या नाव देणे हे काम काही ब्युरोक्रेसीचे नाही आपले आहे. यशवंत भालेराव नावाच्या युथ आर.पी.आयच्या अध्यक्षाने उपोषण केले त्यात त्यांनी जी मागणी केली. त्यात एक मागणी ही होती
की डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक व शिवाजी महाराज चौक हे नाव दोन गेटना दिले जावे. उपायुक्तनी त्यांना उत्तर दिले की ती बाब आमच्या कार्यकक्षेत येत नाही तरी पण आम्ही सदनासमोर ठेवून त्यांचा जो निर्णय असेल तो आम्ही तुम्हाला सांगु.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- नामकरणाचा जो विषय आहे. प्रशासनाचे ते काम नाही हे आपल्या तर्फे आले म्हणुन विचारतो.

<u>माआयुक्तः-</u> आम्ही याकरिता आणले कारण आम्ही त्यांना तसे सांगीतले होते. जोपर्यंत आम्ही सभागृहात ठेवत नाही तोपर्यंत आम्ही काही निर्णय देऊ शकत नाही.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी :- मी आयुक्तांना विनंती करेन की, कार्यसुचीवर कोणताही विषय आणण्यापूर्वी मला वाटते दुनिचंद कालानी जे नाव दिले आहे ते पूर्वी नगरपालिका असताना दिले आहे तसा महासभेचा ठराव पण आहे. हे आपण परत का आणले नगरपालिकेचे ठराव रद्द केले आहेत का?

मा.आयुक्त :- हे रिपिट नको व्हायला म्हणुन जर आपण चर्चा करत असाल तर पूर्ण माहिती आमच्याकडे आहे. आम्ही कोणतीही गोष्ट अंधारात ठेऊन केली नाही.

मा.महापौर :- वुई वील वेरीफाय द एन्टायर रेकॉर्ड. सर्व पक्षांशी सभा घेऊन यावर निर्णय घेऊ.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी :- मला चांगले आठवते की, शहीद दुनिचंद कालानी हे नाव पूर्वी नगरपालिका असताना महासभेत पास केले गेले आहे. त्याप्रमाणे गेटला नाव दिले गेलेले आहे. हे आधी आपण तपासा नंतर कार्यसूचीवर विषय आणा.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आपण परत नव्याने विषय आणा.

मा.महापौर :- मी तेच म्हणत आहे.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मा.महापौर ज्योती कालानी जे म्हणाले ते मी मानते. चार वर्ष झाले आहे, माझ्यामते नविन नावे आणली तर बरे होईल.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- मा.महापौर ज्योती भाभी म्हणाल्या ते बरोबर आहे. नगरपालिका असताना रोड, चौक, मार्ग यांना जी नावे दिली ती वैद्य आहेत ती बदलता येणार नाहीत व ती नावे परत देता येणार नाही.

मा.महापौर :- पुर्व नगरपालिका असताना केलेला रेकॉर्ड चेक केला जाईल व नव्याने हा विषय परत आणला जाईल.

मा.सदस्य श्री.पांडुरंग लांडे :- विषय डिफर केला आहे की, परत चर्चा करत आहात.

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

मा.सचिव :- कृपया सर्वांनी राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जन गन मन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायना नंतर सायंकाळी ७.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर हरदास माखिजा यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा.
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/११/२०००.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/११/२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/११/२००० रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री. हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
४ श्री.गणेश चौधरी
५ श्रीमती. मोकल सीमा
६ .श्रीमती.सोनावणे यमुना
७ श्रीमती.ज्योती कालानी
८ श्री.ढेणवाल बनवारी सुआलाल
९ श्री.उमाप रामदास
१० श्रीमती. वेलकर सुरेखा
११ श्री.सोनावणे राजु
१२ श्रीमती. दासानी मिनू
१३ श्री.भांडे भगवान
१४ श्री.बनवारी किशोर
१५ श्री.तेजी कैलाश
१६ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
१७ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
१८ श्री.प्रमनानी ईश्वर
१९ श्रीमती.बसीटा बेबी
२० श्रीमती मटाई जोनिता
२१ श्री.चौधरी राजेंद्र
२२ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२३ श्रीमती. राजवानी सुनिता
२४ श्री. वारींगे पंढरीनाथ
२५ श्रीमती.टेकचंदानी चंदा
२६. श्री.पुरस्वानी जमनादास
२७. श्री.वाधवा गिरधारी
२८. श्री.पारवानी रामचंद्र
२९. श्री. रोहडा श्यामसुदर
३०. श्री.गुप्ता प्रभुनाथ
३१. श्री. बहरानी ठाकुरदास
३२. श्री.जाधव सुरेश
३३. श्री. मोरे भिमसेन
३४. श्री.चव्हाण रमेश
३५. श्री. महाडिक प्रकाश
३६. श्रीमती.साधवानी जया
३७. श्रीमती.बनवारी मोना
३८. श्रीमती.जेसवानी आशा
३९.. श्री.राजानी नरेंद्र
४०. श्री.मन्सुलकर सुभाष
४१. श्रीमती.नाईक यशस्विनी
४२. श्रीमती. राजानी भारती
४३. श्रीमती.कुंदनानी लविना
४४. श्रीमती. वलेचा पदमा
४५ श्रीमती.गजवानी कांता
४६. श्रीमती.भठिजा इंदिरा
४७. श्री.केणी जयकुमार
४८. श्री.पंजाबी नारायण
४९. श्री.आयलानी कुमार
५० श्री.अचनानी पम्मीकुमार
५१ श्रीमती. वारिंगे पन्ना
५२ श्रीमती. राधवानी आशा
५३. श्री. प्रकाश माखिजा
५४. श्री.जग्यासी राजु.
५५. श्री.बहरानी गोप
५६. श्री. पंजाबी लाल.
५७. श्री. केसवानी किशोर



१ श्री.वाघे शामु बाबु २. श्री.यादव नरेश,३ श्रीमती पवार पंचशिला ४. श्री.टाले

प्रमोद ,५ श्री आढाव रामभाऊ ६. श्रीमती बगाडे सुनिता ७. श्री ठाकुर सेवलदास ८ श्रीमती रूपचंदानी भगवंती ९. श्री लांडे पांडुरंग, १०. श्री. मोरे भानजी भिकाजी, ११. श्री. विनोद तलरेजा, १२. श्रीमती करोतिया मालती, १३. श्री भाटीया जयप्रकाश, १४. श्री रामरख्यानी मोहनदास १५. श्री. क्रिशनानी गोदुमल, १६. श्री. सचदेव गिरधारी हे सदस्यां सदस्या अनुपस्थित होते/ होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन ३ . ५० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सदस्य श्री किशोर वनवारी</u> :-आजची महासभा सुरू होण्याआधी मी एका जरूरी गोष्टीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो. आज आमचे मा. सदस्य श्री. प्रमोद टाले आहेत त्यांचा अपघात झाला आहे. तसेच आर.पी.आयच्या गटनेत्त्यांनी पण लिखित पत्र दिले आहे की, त्यांची प्रकृती ठिक नाही आहे. आजच्या दोन्ही सभा जर स्थगित झाल्या तर बरे होईल. तसेच काही सदस्य श्री. प्रमोद टाले यांना भेटायला जाऊ इच्छितात या अपघातात नितनवरें (मालमत्ता व्यवस्थापक) यांच्या मुलाचे निधन देखिल झाले आहे. श्री. प्रमोद टाले यांची प्रकृति देखिल चिंताजनक सांगीतली आहे. म्हणुन मी सर्व सदनातील सदस्यांना आग्रह करतो की, आजची सभा स्थगित करून पुन्हा कधीतरी ठेवावी.

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :-</u>महापौर साहेब मला काही बोलायचे आहे.

<u>मा.महापौर</u> :- एक मिनिट, मी सदनाला सुचवू इच्छितो की, सभागृह नेत्त्यांनी जे सांगीतले की दुदैवाने एक अपघात घडला आहे सकाळी आमच्या आर.पी.आयचे नगरसेवक आहेत प्रमोद टाले ते आपल्या मित्रांबरोबर गावी जात होते. तर सकाळी नॅशनल हायवे वर त्यांचा कार अपघात झाला. त्या अपघातात आपल्या महापालिकेचे मालमत्ता व्यवस्थापक यांच्या तरूण मुलाचे निधन झाले आहे. व त्यांचा एक मित्र गंभीररित्त्या जखमी झाला आहे व त्याचबरोबर श्री.प्रमोद टाले हे देखिल गंभीररित्त्या जखमी झाले आहेत. मला सकाळी आर.पी.आयचे गटनेता श्री.बी.बी.मोरे यांनी ही बातमी दिली. व आग्रह केला की, आजच्या दोन्ही महासभा स्थगित करण्यांत याव्यात तसे मी उप-महापौरांशी बोललो देखिल तसे लिखित देखिल त्यांनी आम्हाला पाठविले आहे. आता श्री. बी.बी.मोरे यांचा मोबाईल वरून संदेश आला की प्रमोद टाले यांची हालत चिंताजनक आहे. त्यांचा एक हात फॅक्चर झाला असून छातीच्या बरगडयांना देखिल भयंकर दुखापत झाली आहे. तसेच डोक्याला देखिल बराच मार लागला आहे. त्यांना सीटी.स्कॅनिंगसाठी घेऊन जात आहेत. त्यांना लवकरात लवकर मुंबईतील इस्पितळात दाखल करण्यात येईल व चांगल्यात चांगला उपचार केला जाईल जेणे करून त्यांचे प्राण वाचतील. अशा परिस्थितीत त्यांचे लिखित निवेदन आले असून व आर.पी.आयच्या सर्व नगरसेवकांनी पुर्ण सदनाला निवेदन केले आहे की, आजची सभा दोन दिवसासाठी स्थगित करण्यांत येईल तर बरे होईल. या विश्वासाने ते माझ्याशी व उपमहापौरांशी देखिल बोलले आहेत. व या विश्वासाने ते महासभेत उपस्थित देखिल झाले नाहीत. माझे सर्व सदस्यांना निवेदन आहे की, घटना लक्षात घेऊन यात आपला एक साथी गंभीररित्त्या जखमी झाला असून आणि तो जीवन-मरणाशी झुंज देत आहे. हे सर्व लक्षात घेऊन तीन वाजता होणारी सर्व साधारण महासभा व विशेष महासभा स्थगित करून दि. २२.११.२००० रोजी
३.००व ५.३० वाजता घेतली तर बरे होईल. आता पण मोरेंनी मला विचारले की महासभा स्थगित करीत आहात ना? मी त्यांना सांगीतले माझे सर्व पक्षीय गटनेत्त्यांशी आताच बोलणे झाले आहे. विपक्ष नेता, भाजपा गटनेता, श्री. नरेंद

रजानी, श्री.लाल पंजाबी , श्री.प्रकाश माखिजा, उप-महापौर या सर्वांशी माझे बोलणे झाले आहे. त्यांनी मला विश्वास दिला आहे की, आम्ही योग्य तो निर्णय देऊ. तरी आजच्या दोन्ही सभा त्यांनी दाखवलेल्या विश्वासानुसार स्थगित करू. जर स्थगित नाही केल्या तर त्यांच्याशी हा विश्वासघात होईल. असे नाही झाले पाहिजे म्हणुन माझे असे निवेदन आहे की, आजच्या दोन्ही सभा १२ तारखेपर्यंत स्थगित कराव्यात.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- मा. महापौरजी, नितनवरे साहेबांच्या मुलाचे निधन झाले त्याबददल आम्हाला दुःख आहे. जी पहिली नियमित सर्वसाधारण महासभा आहे ती स्थगित करा. प्रमोद टालेंना भेटायला आढाव साहेब जेव्हा निघाले होते तेव्हा मी त्यांना सांगीतले होते की, पोहोचल्या बरोबर मला कळवा की, श्री.प्रमोद टालेंची तब्येत कशी आहे? त्यावेळी मला नितनवरे साहेबांच्या मुलाविषयी माहीत नव्हते. वीस-पंचवीस मिनिटांपूर्वी मला फोन आला की, टालेंची तब्येत आता ठिक आहे. डॉक्टर पूर्ण त-हेने चेकअप व्हावे म्हणुन त्यांना सीटी स्केनिंगसाठी नेत आहेत. काळजी घेत आहेत. तसेच श्री.नितनवरे यांच्या मुलाला श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी. पहिली सभा स्थगित करा व दुसरी सभा नियमितपणे घ्या ही आमची विनंती आहे. धन्यवाद.

<u>मा.महापौर</u> :- अजुन कुणा सदस्याला आपले विचार मांडायचे असतील तर त्यांनी मांडावे.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>महापौर, माझे आपणांस व पूर्ण सदनास निवेदन आहे की, जर आपण पहिली महासभा स्थगित करत आहात तर दुसरीपण केली तर दोन दिवसात काय होणार आहे? माझी आपणांस व पूर्ण सदनास निवेदन आहे की, आजच्या दोन्हीही महासभा पुढे ढकण्यांत येऊन सगळयांच्या मताने पुढच्या सभेची दिनांक ठरवावी.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी यांनी जसे सांगितले की, पहीली महासभा पुढे ढकलण्यात येत आहे तर दुसरी महासभा पुढे ढकलण्यांत काय हरकत आहे? परवा तर घेत आहात याच वेळेला. आमचे सदस्य श्री. प्रमोद टाले यांना आम्ही पाहायला जाऊ शकतो. आणि जर साडे पाच वाजता मिटिंग झाली तर आम्ही जाऊ शकणार नाही. जर त्यांना पाहायला जायचे आहे तर दोन्ही सभा स्थगित केल्या तर निश्चिंतपणे जाऊ शकु आणि जर ते एक-दोन दिवसात बरे झाले तर जे सदस्य आज आले नाहीत आर.पी.आयचे ते उपस्थित राहू शकतील. हे लक्षात घेऊन जर दोन्ही सभा स्थगित केल्या तर बरे होईल. सगळे निश्चिंतपणे जातील नाहीतर संध्याकाळ पर्यंत थांबावे लागेल.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौर, जसे सभागृह नेता म्हणाले की, साडेपाच वाजे पर्यंत दुस-या सभेसाठी थांबावे लागेल हे साफ चुकीचे आहे. जर पहिली सभा नितनवरेंच्या मुलास श्रध्दांजली वाहून स्थगित करतो तर या कार्यवृत्तात स्पष्ट लिहिले आहे की, साडेपाच वाजताची सभा जेव्हा पहिली सभा संपते तेव्हा दुसरी सभा लगेच चालु करण्यात येईल असे इथे लिहिले आहे. त्यामुळे साडेपाच वाजेपर्यंत थांबावे लागणार नाही. पहिली सभा स्थगित करा आणि दुसरी सभा लगेच सुरू करा म्हणजे साडेपाच वाजता जाऊ शकतो.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- मा.महापौर, कोणतीही दुःखद घटना घडली. अपघात झाला, निधन झाले तरी प्रथा आहे की, दुःख प्रकट करण्यासाठी सभा तरी स्थगित करतात किंवा शोक प्रस्ताव पारीत करतात. यापुर्वीही अशा

काही घटना घडल्या तेव्हा आपण केवळ शोक प्रस्ताव पारीत करून इतर कार्यवाही पुर्ववत करतो. आज दोन सभा आहेत. आपल्या बरोबर बसणारे नगरसेवक श्री. प्रमोद टाले यांचा अपघात झाला आहे. त्यांची प्रकृती ठिक आहे असा रिपोर्ट देखिल आला आहे. ठिक आहे आणि नाही आहे असा रिपोर्ट आला आहे अशा परिस्थितीत आम्ही आहोत. मा.सदस्य श्री. किशोर वनवारी म्हणतात की, दोन दिवसात बहुतेक ते सभेत हजर राहू शकतील. आमची अपेक्षा आहे की त्यांना लवकरात लवकर बरे होऊन सभेत हजर राहोत. दुसरी गोष्ट अशी की, महापालिकेचे कर्मचारी श्री. नितनवरें यांच्या मुलाचे निधन झाले ही दुःखद घटना आहे. यातून हा मार्ग निघु शकतो की, पहीली जी सर्व साधारण सभा आहे ती स्थगित करावी. शोक प्रस्ताव पारित करून दुःख प्रकट केले जावे. आणि दुसरी सभा सुरू करावी. आपण एकदा दुःख प्रकट केले शोक प्रस्ताव पारीत केला सभा स्थगित केली. तर दुसरी सभा घेऊ शकतो. यासाठी काही कुणाची हरकत असावी असे मला नाही वाटत.

<u>मा.महापौर</u> :-नाही जसे मी म्हणालो, आर.पी.आय चे गटनेता श्री.बी.बी. मोरे यांनी माझ्यावर व उपमहापौरांवर विश्वास दर्शवून जे पत्र पाठवले आहे. आणि या विश्वासाने त्यांनी सातही नगरसेवककांना तिकडे बोलावले आहे. त्यांना आम्ही तसा विश्वास दाखविला आहे. आणि आता परत सभा घ्यायची हे ठिक दिसत नाही. हा पूर्ण गटाशी आपण विश्वासघात करू.

<u>काही विपक्षीय सदस्य :-</u> आम्ही नाही विश्वासघात करत आहोत.

<u>मा.महापौर</u> :- मी पण आपल्या भरोश्यावर त्यांना विश्वास दिला आहे. मला आपल्यावर विश्वास होता. श्री.बी.बी.मोरे आता तीन वाजता माझ्याशी बोलले की श्री. प्रमोद टाले सिरियस आहेत. त्यांना सिटीस्केनिंगसाठी घेऊन गेले आहेत. आजच्या दिवशीच्या दोन्ही सभा स्थगित केल्या तर बरे होईल. महाडिकजी, सुनिता मॅडमजी,...

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी</u> :- आमचे म्हणणे आहे की, दुसरी सभा कंन्टीन्यु करा. आमची विनंती आहे तुम्हाला.

<u>मा.महापौर</u> :- भाभी ज्योती कालानी आपण आपले विचार सांगा.

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी</u> :- श्री. किशोर वनवारींनी आमच्या तर्फे जे विचार मांडले त्या विचारांशी आम्ही सहमत आहोत. अशा दुःखाच्या वेळी दोन दिवस सभा स्थगित केली तर आपले काही जाणार नाही. दोन दिवसांनी सभा घ्यायचीच आहे. दोन दिवसात असे काही होणार नाही ज्याने फरक पडेल. माझी सर्व सहयोगींना विनंती आहे की, अशा दुःखाच्या वेळी श्री.प्रमोद टाले यांचा आधी पण एकदा अपघात झाला होता आणि आता परत देखील झाला आहे. अशा प्रसंगी त्यांना पुर्ण सहयोग देणे आपले कर्तव्य आहे. दोन दिवसासाठी सभा जर स्थगित केली तर फार चांगले होईल.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-मा.महापौर, आपणांस माहित आहे की, ठेकेदार न्यायालयात गेला आहे. टाऊन हॉल संबंधी. त्यांचे असे म्हणणे आहे की आम्हाला वर्क ऑर्डर पाहिजे. माझ्या मते तुम्हाला कोर्टाचा निर्णय माहित असेल नाहीतर आपण श्री. कुकरेजांना विचारू शकता. कोर्टाचा निर्णय आज आला आहे. जो पर्यंत महासभेचा निर्णय आपण तेथे पाठवत नाही तोपर्यंत ती केस पुढे चालणार नाही. जर महासभा चुकीचा निर्णय घेते तर तुम्ही कोर्टात जाऊ शकता. आमची इच्छा आहे कोर्टाचा पण वेळ वाया जावू नये.



आणि ठेकेदारांकडून आपली बदनामी नको. म्हणुन मी वारंवार आपणांस विनंती करते हे बोलणे उचित नाही. आम्हाला खुप दुःख आहे श्री. नितनवरे

यांच्या मुलाचे निधन झाल्याबददल म्हणुन पहिली सभा आपण स्थगित करत आहेत. माझी पुन्हा विनंती आहे दुसरी सभा कंन्टिन्यु करा.

मा.महापौर :- मी आपल्या म्हणण्याशी सहमत आहे. कोर्टाने २७ तारखेपर्यंत केस स्थगित केली आहे. आणि आपण २१ तारखेला सभा घेत आहेत.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- आज सभा झाली तर इतिवृत्त तयार व्हायला खुप वेळ लागतो. सचिव साहेब म्हणतात इतिवृत्त तयार करताना खुप त्रास होतो. इतिवृत्त तयार करणार मग टायपिंग होणार त्यात बदल काही करावा लागेल यासाठी पण खुप वेळ लागेल.

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :- मा.महापौरजी, व सदनातील सहयोगी आज जी सकाळी दुःखद घटना घडली आहे. त्यासंबंधी मी असे सांगु इच्छितो की, श्री. प्रमोद टाले यांचा दुस-यांदा अपघात झाला आहे व त्यांचे सहकारी जे नितनवरेंचे सुपूत्र होते त्यांचे निधन झाले आहे. आणि दोघेजण अत्त्यंत गंभीर आहेत. श्री.प्रमोद टालेंची पण तब्येत पण बरोबर नाही. आणि असे वातावरण सभेत निर्माण झाले आहे की, सभा घेतली जावी की नाही. मी महापौरांना विनंती करतो की, मेहरबानी करून वोटींग घ्या. वोटींग मध्ये ज्यांचे बहुमत असेल त्याप्रमाणे निर्णय घ्या.

मा.महापौर :- या मुददयावर वोटींग नाही घेतली तर चांगले होईल.

काही विपक्ष सदस्य :- मा.श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या मुददयावर सुध्दा वोटींग घेतली होती आजपण घेतली जावी.

मा.महापौर :- मी तेव्हा सुध्दा असे म्हणत होतो की, वोटींग नाही झाली तर चांगले होईल.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मा.महापौरजी, श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या मुदयावर देखिल तुम्ही वोटींग घेतली होती. आम्ही त्यावेळी निषेध केला. होऊ शकते की त्यावेळी काही सदस्यांच्या मनात त्यांच्याविषयी श्रध्दा असेल आणि आम्ही जिंकलो असतो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- मा.महापौर, आता वोटींग संबंधी जे बोलत आहात अजुन पहीलीच महासभा सुरू आहे दुसरी नाही. दुसरी सभा साडेपाच वाजता आहे. आणि नोटीसीत पण असे क्लिअर लिहिले आहे की दुसरी सभा साडेपाच वाजता सुरू होणार. म्हणुन तुम्ही आता वोटींग घेऊ शकत नाही. पहिली सभा स्थगित करण्याशी आम्ही सहमत आहोत. दुसरी सभा साडेपाचला आहे आता तो मुददा नाही.

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :- आता श्री. प्रकाश महाडिक असे म्हणाले की, कार्यसुचीत असे लिहिले आहे. दुसरी सभा लगेच सुरू करता येईल.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- मन्सुलकर मी तुम्हाला वाचुन दाखवतो की, लक्ष देऊन ऐका द स्पेशल जनरल बॉडी मिटिंग शॅल बी कमेंसड ॲट द शेडयुल टाईम ऑफ द नोटीस आर सुन देअर आफ्टर द कंम्प्लीशन ऑफ द



फस्ट जनरल बॉडी मिटींग व्हीच अेव्हर इज अर्लिअर. दुसरी सभा साडे पाच वाजता सुरू होईल किंवा जर पहिली सभा सहा वाजे पर्यंत चालु राहीली तर दुसरी सभा उशीरा सुरू होईल. त्यामुळे दुस-या सभेचा निर्णय घेण्यासाठी वोटींग घेण्याचा तुम्हाला अधिकार नाही. आणि नियम असा आहे, द मिटिंग व्हीच हॅज नॉट कमेन्सड कॅन नॉट बी ॲडजॉन्ड.

मा.महापौर :- ठिक आहे. ही सभा स्थगित करत आहोत साडेपाच वाजेपर्यंत सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून मृतात्त्म्यास श्रध्दांजली अर्पित करावी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- नाही आता महाडिकजी म्हणाले की, दुसरी सभा लगेच घेऊ शकतो.

मा.सचिव :- श्री. किशोर नितनवरे यांच्या शांती साठी म्हणून श्रध्दांजली अर्पित करीत आहोत. कृपया सर्वांनी उभे रहावे.

सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

शोक प्रस्ताव :-

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात कार्यरत असलेले मालमत्ता व्यवस्थापक श्री. नितनवरे यांचे सुपूत्र श्री. किशोर नितनवरे यांचे सोमवार दि.२०.११.२००० रोजी आकस्मित निधन झाले.

सदर कुटुंबियांच्या दुःखात हे सभागृह सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृताम्यांच्या आत्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १७ ब दिनांक :-२०.११.२०००

सुचकाचे नाव :-श्रीमती. सुनिता राजवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रकाश महाडिक.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.किशोर नितनवरे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करीत आहे.

तसेच मृत व्यक्तींच्या कुटुबियांच्या दुःखात सहभागी होत असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर /पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--७--

मा.महापौर :- आजची ही सर्वसाधारण महासभा साडेपाच वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

स्थगित केलेल्या ५.३० वाजताच्या सभेत मा. महापौर पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ होते व खालील प्रमाणे सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
४ श्री गणेश चौधरी
५ श्रीमती. मोकल सीमा
६ .श्रीमती.सोनावणे यमुना
७ श्रीमती.ज्योती कालानी
८ श्री.ढेणवाल बनवारी
९ श्री.उमाप रामदास
१० श्रीमती. वेलकर सुरेखा
११ श्री.सोनावणे राजु
१२ श्रीमती. दासानी मिनू
१३ श्रीमती.पंचशिला पवार
१४ श्रीमती. बगाडे सुनिता
१५ श्री.भांडे भगवान
१६ श्री.ठाकुर सेवलदास
१७ श्री.बनवारी किशोर
१८ श्री.तेजी कैलाश
१९ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
२० श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२१ श्री.प्रमनानी ईश्वर
२२ श्रीमती.बसीटा बेबी
२३ श्रीमती मटाई जोनिता
२४ श्री.चौधरी राजेंद्र
२५ श्री. लांडे पांडुरंग
२६ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२७ श्रीमती. राजवानी सुनिता
२८ श्री. वारींगे पंढरीनाथ
२९ श्रीमती.टेकचंदानी चंदा
३०. श्री.पुरस्वानी जमनादास
३१. श्री.वाधवा गिरधारी
३२. श्री.पारवानी रामचंद्र
३३ श्री.तलरेजा विनोद
३४ श्री.रोहडा श्यामसुंदर
३५ श्री.गुप्ता प्रभुनाथ
३६. श्रीमती.मालती करोतिया
३७. श्री. बहरानी ठाकुरदास
३८. श्री.जाधव सुरेश
३९. श्री.मोरे भिमसेन
४०. श्री. चव्हाण रमेश
४१. श्री.महाडिक प्रकाश
४२. श्रीमती.साधवानी जया
४३. श्रीमती. वनवारी मोना
४४. श्रीमती. जेसवानी आशा
४५. श्री. श्री.राजानी नरेंद्र
४६. मन्सुलकर सुभाष
४७. श्रीमती.नाईक यशस्विनी
४८. श्रीमती. राजानी भारती
४९. श्रीमती.कुंदनानी लविना
५०. श्रीमती. वलेचा पदमा
५१. श्रीमती गजवानी कांता
५२. श्रीमती.भठिजा इंदिरा
५३. श्री.केणी जयकुमार
५४. श्री.पंजाबी नारायण
५५. श्री.आयलानी कुमार
५६. श्री.अचनानी पम्मीकुमार
५७. श्रीमती. वारिंगे पन्ना
५८. श्रीमती. राधवानी आशा
५९. श्री. प्रकाश माखिजा
६० श्री.रामरख्यानी मोहनदास.
६१. श्री.जग्यासी राजु
६२. बहरानी गोप
६३ श्री. पंजाबी लाल
६४ श्री. केसवानी किशोर

१ श्री.वाघे शामु बाबु २. श्री.यादव नरेश,३. श्री.टाले प्रमोद,४ श्री आढाव रामभाऊ, ५. श्रीमती.रूपचंदानी भगवंती ६. श्री. मोरे भानजी ७ श्री.भाटीया जयप्रकाश, ८. श्री. क्रिशनानी गोदुमल, ९. श्री. सचदेव गिरधारी हे सदस्य/ सदस्या अनुपस्थित होते/ होत्त्या.

--८--

मा.महापौर :-आजची तीन वाजताची महासभा साडे पाच वाजे पर्यंत स्थगित करण्यात आली होती. ती सभा मी आधी म्हणालो त्या प्रमाणे २२ तारखे पर्यंत स्थगित करावी. व दुसरी साडेपाच वाजता जी विशेष सभा आहे त्याविषयी पण मी असे म्हटले की, आर.पी.आय तर्फे जो प्रस्ताव आला तो मान्य करून मी ती सभा देखिल २२ तारखेला साडेपाच वाजता ठेवण्यासंबंधी सदनासमोर प्रस्ताव मांडत आहे.

मा.सदस्य श्री किशोर बनवारी:-मा.महापौर साहेब, आम्ही आधी पण म्हणालो होती की, तीन वाजताची सर्वसाधारण सभा व साडेपाच वाजताची विशेष महासभा २२ तारखे पर्यंत स्थगित करण्यात यावी. आता दुपारी तीन

वाजताची सभा घेत आहोत. मा.विपक्ष सदस्य श्री.लाल पंजाबी,श्री.प्रकाश महाडिक, श्री. नरेंद्र राजानी यांचे म्हणणे होते की, तीन वाजताची सभा स्थगित करून साडेपाच वाजताची सभा घेण्यात यावी. आता आधी तीन वाजेची सभा २२ तारखे पर्यंत स्थगित करावी यावर सर्वांचे एकमत आहे. आणि दुस-या सभेविषयी काय करायचे यावर विचार करा.

<u>मा.महापौर</u> :- आजची सर्वसाधारण महासभा २२ तारखेला दुपारी ३.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यांत येत आहे असे मा.महापौरांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर
महानगरपालिका.

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक :-२०/११/२०००.</u>

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/११/२००० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा सोमवार दिनांक <u>२०/११/२०००</u> रोजी सायंकाळी ५. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा.महापौर</u> :-श्री. हरदास माखीजा.

<u>मा.उप महापौर</u> :- श्री.धनंजय बोडारे.

| | |
|---|---|
| ३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह | ३३ श्री.तलरेजा विनोद |
| ४ श्री.गणेश चौधरी | ३४ श्री.रोहडा श्यामसुंदर |
| ५ श्रीमती. मोकल सीमा | ३५ श्री.गुप्ता प्रभुनाथ |
| ६ .श्रीमती.सोनावणे यमुना | ३६. श्रीमती.मालती करोतिया |
| ७ श्रीमती.ज्योती कालानी | ३७. श्री. बहरानी ठाकुरदास |
| ८ श्री.ढेणवाल बनवारी | ३८. श्री.जाधव सुरेश |
| ९ श्री.उमाप रामदास | ३९. श्री.मोरे भिमसेन |
| १० श्रीमती. वेलकर सुरेखा | ४०. श्री. चव्हाण रमेश |
| ११ श्री.सोनावणे राजु | ४१. श्री.महाडिक प्रकाश |
| १२ श्रीमती. दासानी मिनू | ४२. श्रीमती.साधवानी जया |
| १३ श्रीमती.पंचशिला पवार | ४३. श्रीमती. वनवारी मोना |
| १४ श्रीमती. बगाडे सुनिता | ४४. श्रीमती. जेसवानी आशा |
| १५ श्री.भांडे भगवान | ४५. श्री. श्री.राजानी नरेंद्र |
| १६ श्री.ठाकुर सेवलदास | ४६. मन्सुलकर सुभाष |
| १७ श्री.वनवारी किशोर | ४७. श्रीमती.नाईक यशस्विनी |

१८ श्री.तेजी कैलाश
१९ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
२० श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२१ श्री.प्रमनानी ईश्वर
२२ श्रीमती.वसीटा बेबी
२३ श्रीमती मटाई जोनिता
२४ श्री.चौधरी राजेंद्र
२५ श्री. लांडे पांडुरंग
२६ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२७ श्रीमती. राजवानी सुनिता
२८ श्री. वारींगे पंढरीनाथ
२९ श्रीमती.टेकचंदानी चंदा
३०. श्री.पुरस्वानी जमनादास
३१. श्री.वाधवा गिरधारी
३२. श्री.पारवानी रामचंद्र
४८. श्रीमती. राजानी भारती
४९. श्रीमती.कुंदनानी लविना
५०. श्रीमती. वलेचा पदमा
५१. श्रीमती.गजवानी कांता
५२. श्रीमती.भठिजा इंदिरा
५३. श्री.केणी जयकुमार
५४. श्री.पंजाबी नारायण
५५. श्री.आयलानी कुमार
५६. श्री.अचनानी पम्मीकुमार
५७. श्रीमती. वारिंगे पन्ना
५८. श्रीमती. राधवानी आशा
५९. श्री. प्रकाश माखिजा
६० श्री.रामरख्यानी मोहनदास.
६१. श्री.जग्यासी राजु
६२. बहरानी गोप
६३ श्री. पंजाबी लाल
६४ श्री. केसवानी किशोर

--२--

१ श्री.वाघे शामु बाबु २. श्री.यादव नरेश,३. श्री.टाले प्रमोद,४ श्री आढाव रामभाऊ, ५. श्रीमती.रूपचंदानी भगवंती ६. श्री. मोरे भानजी ७ श्री.भाटीया जयप्रकाश, ८. श्री. क्रिशनानी गोदुमल, ९. श्री. सचदेव गिरधारी हे सदस्य/ सदस्या अनुपस्थित होते/ होत्त्या.

(सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सभेची सुरूवात ६.०० वाजता करण्यात आली.)

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :-</u> मा.महापौर आपण दोन्ही सभा स्थगित करण्याचा प्रस्ताव मांडला होता. माझे निवेदन आहे आपण दुसरीपण सभा स्थगित करा.

<u>मा.महापौर</u> :- पहिली सभा स्थगित केली आहे. दुस-या सभेसाठी निर्णय घेत आहोत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-दुसरी जी महासभा आहे त्यात जूलै मध्ये ठराव पास झाला आहे. निविदा देखिल निघाल्या आहेत. विपक्ष सदस्यांनी विशेष सभा यावर बोलावली आहे. तो मुददा रिजेक्ट करायचा की, पास करायचा आहे.

<u>मा.महापौर :-</u> पहिली सभा स्थगित केली आहे. दुसरी आता आपण सुरू करत आहोत.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-पहिली सभा स्थगित केली आहे. दुसरी सभा आपण सुरू केली आहे. जिथे भावनांचा विषय येतो. आपल्या सदनात आपल्या बरोबर बसणा-या एका सदस्याचा अपघात झाला आहे. त्यावेळी खेद प्रकट करताना असे म्हंटले होते की, आर.पी.आयचे सर्व नगरसेवक तिकडे गेले आहेत. त्यांचा आग्रह आहे की, आम्ही आज सभेला उपस्थित राहू शकणार नाही म्हणुन सभा स्थगित करण्यात यावी. आर.पी.आयचे नगरसेवक पहिल्या महासभेत उपस्थित नव्हते आता आहेत. याचा अर्थ हा होतो की, आपल्याला माहित नव्हते किंवा आता आपण त्यांना जाणुन-बुजून इथे बोलावले आहे. म्हणजे कुणाच्या तरी निधनाचा आणि अपघाताचा आपण फायदा घेत होता आपण फायदा घेण्याचा प्रयत्न करत होता. आपली ही रणनिती पुढे येणा-या विषयासंबंधी आहे. आज पूर्ण शहरात झालेल्या अपघाताविषयी दुःख व्यक्त केले जात आहे. आपण त्या मुददयाचा फायदा घेत आहात. आपण जर आपल्या सदस्यांचे चेहरे व मन तपासुन पाहिले तर त्यांना जर आतुन पाहीले

तर कळेल की, ते आपल्या बरोबर या विषयाशी सहमत नाही. कारण साडेपाच वाजता जी सभा सुरू होणार होती ती सहा वाजता झाली म्हणजे आपणास आपल्या सदस्यांना समाधानी करण्यासाठी जी रणनिती करावी लागली म्हणुन ऐवढा वेळ लागला.

मा.विपक्ष सदस्य :- शेम, शेम म्हणुन ओरडत होते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मा.महापौर, मला हे माहित आहे. भावनांचा विषय जिथे येतो तिथे वोटींग घेणे उचित नसते. आपण याच्याशी सहमत असाल. जिथे अपघात निधन , दु:ख असे विषय असतील. तिथे वोटींग घेऊन मात करणे उचित आहे का? भावनांच्या एखादया विषयावर आपण मोजमाप करणे उचित आहे का? अशाप्रकारच्या रणनीतीचा आपण वापर करू शकतो का? महापौर मला वाटते आपण माझ्या विचारांशी सहमत असाल नाही मला आता सांगा म्हणजे मी पुढे बोलेने.

मा.महापौर :- तुम्ही तुमचे बोलणे चालुच ठेवा.

--३--

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :- मा.महापौर, या विषयावर आपले मत हवे आहे. भावनांच्या विषयावर वोटींग घेणे उचित आहे का?

मा.महापौर :- मी आधीच्या पण सभेत सांगीतले आहे की, या विषयावर वोटींग नाही झाले तर बरे होईल.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-म्हणजे भावनांच्या विषयावर वोटींग घेणे योग्य नाही हे तर कबुल कराल. कबुल करायला काय हरकत आहे?

मा.महापौर :- मी आपल्याला पहिलेही सांगीतले की या मुददयाला खेचुन मतदानासाठी आम्हाला लाचार करू नका.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :- आमची पण इच्छा नाही आम्ही आपल्या भावनांची कदर करतो.

मा.महापौर :-आमचा जो सत्ताधारी पक्ष आहे त्यातील एका पक्षाचे निवेदन आले आहे. व ज्या प्रसंगामुळे आले त्या प्रसंगाकडे पण आम्हाला लक्ष दयायचे आहे. आणि माझी इच्छा आहे की, ही सभा पण २२ तारखे पर्यंत स्थगित करण्यात यावी.

मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-केवळ १ मिनिट जिथे भावनांचा मुददा येतो तिथे मतदान झाले नाही पाहिजे. तिथे बहुमताचा वापर नाही झाला पाहिजे. या बरोबरच आम्ही आपल्या भावनांची कदर करतो. भावना जिथे येते तिथे मतदान काय?

इथे मा.सदस्य श्री. किशोर वनवारी बोलायला उभे असताना विपक्ष सदस्य त्यांना बसा, बसा म्हणत होते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी महापौरांना विचारून उभा आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- हा महापौरांचा अपमान आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मला बोलायचे आहे, मी महापौरांची परवानगी घेऊन बोलत आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- जेव्हा मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी बोलत होते तेव्हा कुणी मध्ये बोलत होते का? नाही. मग मी बोलतो तर का त्रास होत आहे? महापौरजी, कुणाचा जर अपघात होतो दुःखद निधन होते त्यासाठी मतदानांचा वापर करू नये भावनांचा वापर करावा. हे आता का बोलत आहेत? हे दुपारी का असे बोलले नाही. आता असे बोलतात काय परिवर्तन झाले आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- सभा स्थगित केली गेली होती तेव्हा बोलण्याचा प्रश्नच नव्हता.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

--४--

<u>मा.महापौर :-</u> महाडिकजी, त्यांना बोलु दया.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- किती जण मध्ये बोलत आहे. तीन-तीन लोक बोलत आहेत. जरा थांबा माझे बोलणे पुर्ण होऊ दया.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- मा.महापौर, आपण रूलींग दिले मग चर्चा कशाला?

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- लोकशाही आहे. महापौरजी प्लीज यांना सांगा. तीन-तीन जण उभे आहेत मला बोलु देत नाहीत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-मा.महापौर आपण रूलिंग दिल्यानंतर हे बोलत आहेत.

<u>मा.महापौर</u> :- त्यांना बोलू दया.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- मला बोलु दया. त्यांनी मला परवानगी दिली आहे. मी बोलणार आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-तुम्ही बोलू शकता पण सभा स्थगित होण्याआधी.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- आमचे म्हणणे होते की, जे प्रमोद टालेंना भेटायला जाऊ शकले नाही ते दुपारी जातील. त्यांना साडेपाच वाजेपर्यंत उगाच खोळंबून नका थांबवू. तेव्हा लाल पंजाबीजी, म्हणाले साडेपाच वाजताच्या सभेचा निर्णय साडेपाच वाजता घेण्यात येईल. आता ज्या आर.पी. आयच्या सदस्या त्यांच्याकडे जाऊन आल्या आणि सभेत हजर राहील्या तर यात दुःखाची काय गोष्ट आहे.

इकडे श्री. राजेंद्र चौधरी काही बोलत असताना...

मा.सदस्य श्री किशोर वनवारी :-मध्ये कशाला बोलता. माझे पुर्ण होऊ दया. तेव्हा आम्ही म्हणत होतो दोन्ही सभा स्थगित करा मतदानाची गरज नाही. तेव्हा महाडिकजी म्हणत होते होऊ दया मतदान, होऊ दया. आता कशाला म्हणतात दुःखाची गोष्ट आहे. यात भावनां लक्षात घ्या.द मतदान नका घेऊ. हे आता बोलायची गरज नाही.

मा.महापौर :- सभा २२ तारखेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आम्ही नियमानुसार बोलत होतो. एक सेकंद. विपक्ष नेत्यांना काही पर्सनल प्रॉब्लेम आहे.

(मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी मंचाजवळ येऊन बोलत होत्या)



मा. महापौर :- मी सदनाला सुचवू इच्छितो की, २२ तारखेला विपक्ष नेत्यांना कुठेतरी काम आहे. त्या सभेस उपस्थित राहू शकणार नाही म्हणुन २३ तारखेला साडेपाच वाजेपर्यंत सभा स्थगित करण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :- मा. महापौर, आयुक्त त्यादिवशी उपस्थित आहेत का विचारा? आमचे बी.बी.मोरे नाहीत तर आज ठेवली ना सभा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आयुक्त उपस्थित राहीले पाहिजेत.

मा.आयुक्त :- चीफ सेक्रेटरी साहेबांनी जनगणनेच्या कामासाठी अर्जंट मिटींग ठेवली आहे. जी आयुक्तांना अटेंड करायची आहे असे निर्देश दिले आहेत. ती २४ तारखेला ११.०० वाजता सभा आहे. त्यामुळे २३ तारखेला संध्याकाळ पर्यंत तिथे रिपोर्ट दयायचा आहे. दुपार नंतर मला तिथे जावे लागेल. त्यामुळे २३ तारखेला दुपार नंतर मला वेळ नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मग २२ तारखेला ठेवा. आयुक्त सभेला हजर पाहिजेत. श्रीमती.लविना कुंदनानी यांना सुध्दा २३ तारखेला बाहेर जायचे आहे.

मा.महापौर :- २२ तारखेला तीन वाजे पर्यंत सर्वसाधारण सभा व सायंकाळी साडेपाच वाजे पर्यंत विशेष महासभा स्थगित करण्यात येत आहे.

असे मा.महापौरांनी जाहिर केले.

मा.सचिव :- बुधवारी २२ तारखेला दोन्ही सभा ठरलेल्या वेळेनुसार घेण्यात येतील. कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन म्हणुन ६. १० वाजता सभा स्थगित केल्याचे मा.महापौरांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२२/११/२०००.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२२/११/२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २२/११/२००० रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री. हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
४ श्री गणेश चौधरी
५ श्री. वाघे शामु
६ श्रीमती. मोकल सीमा
७.श्रीमती.सोनावणे यमुना
८ श्रीमती.ज्योती कालानी
९ श्री.ढेणवाल बनवारी सुआलाल
१० श्री.उमाप रामदास
११ श्रीमती. वेलकर सुरेखा
१२ श्री. यादव नरेश
१३ श्री.सोनावणे राजु
१४ श्रीमती. दासानी मिनू
१५ श्रीमती. पंचशिला पवार
१६ श्री. आढाव रामभाऊ
१७ श्री. बगाडे सुनिता
१८ श्री.भांडे भगवान
१९ श्री. ठाकुर सेवलदास
२० श्री.बनवारी किशोर
२१ श्री.तेजी कैलाश
२२ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
२३ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२४ श्री.प्रमनानी ईश्वर
२५ श्रीमती.बसीटा बेबी
२६ श्रीमती मटाई जोनिता
२७ श्री.चौधरी राजेंद्र
२८ श्री. लांडे पांडुरंग
२९ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
३० श्री.मोरे भानजी.
३१ श्रीमती. राजवानी सुनिता
३२ श्री. वारींगे पंढरीनाथ
३३. श्री.पुरस्वानी जमनादास
३४. श्री.वाधवा गिरधारी
३५ श्री.पारवानी रामचंद्र
३६ श्री. तलरेजा विनोद
३७ श्री. रोहडा श्यामसुदर
३८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३९. श्रीमती. मालती करोतियाा
४०. श्री. बहरानी ठाकुरदास
४१ श्री.सुरेश जाधव
४२ श्री.मोरे भिमसेन
४३. श्री.चव्हाण रमेश
४४. श्री. महाडिक प्रकाश
४५. श्रीमती.साधवानी जया
४६. श्रीमती.बनवारी मोना
४७. श्रीमती.जेसवानी आशा
४८. श्री.राजानी नरेंद्र
४९. श्री.मन्सुलकर सुभाष
५०. श्रीमती.नाईक यशस्विनी
५१. श्रीमती. राजानी भारती
५२. श्रीमती.कुंदनानी लविना
५३. श्रीमती. वलेचा पदमा
५४ श्रीमती.गजवानी कांता
५५. श्रीमती.भठिजा इंदिरा
५६. श्री.केणी जयकुमार
५७. श्री.पंजाबी नारायण
५८. श्री.आयलानी कुमार
५९ श्री.अचनानी पम्मीकुमार
६० श्रीमती.वारिंगे पन्ना
६१ श्रीमती. राधवानी आशा
६२ श्री. प्रकाश माखिजा
६३ श्री.रामरख्यानी मोहनदास
६४. श्री. जग्यासी राजु
६५ श्री.सचदेव गिरधारी
६६ श्री. पंजाबी लाल.
६७. श्री. केसवानी किशोर

१ श्री.टाले प्रमोद ,२ .२ श्रीमती.रूपचंदानी भगवंती ,३ श्रीमती. टकचंदानी चंदा ,४. भाटीया जयप्रकाश ,५ श्री.बहरानी गोप, ६ श्री. क्रिशनानी गोदुमल हे सदस्य/ सदस्या अनुपस्थित होते/ होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सभेची सुरूवात ३ . ५० वाजता करण्यांत आली.

मा.सचिव :- विषय क्र.१ प्रश्नोत्त्तरे.

प्रश्न क्र.५२८ हा श्री. नारायण पंजाबी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५२८ :-१. ऑन वीच ग्राउंड आर.सी.सी बिल्डींग कंन्ट्रक्शन इज इन प्रोग्रेस ऑन परपोझड २५ फिटस् डी.पी. रोड रिचरस् टू मॉडेल स्कुल? प्लीज एक्सप्लेन ब्रीफ्लाय?

२. बीफोर सॅक्शन ऑफ ॲप्रुव्हड् प्लान, वेदर टाऊन प्लानर हॅव ऑबटेन्ड सी. डी
वेरिफीकेशन दो एस.डी.ओ?

३ हाऊ वेरिअस प्लॅन्स वेअर सॅक्शनड् ऑन परपोझड् २५फीटस् लिन्क रोड? वेरिअस प्लानस् आऊटवार्ड नं. आर ॲज फॉलोझ:-

१) यु.एम.सी. /टी.पी.डी/जी.बी/७३/९५/४२५, डेटेड. १२.२.९८.

२) ----डु----- ----------/९७/१४६/डेटेड.१८.५.९९.

३)------------"---------९५/५८४/डेटेड.५.१.९९

४)-----------"----------९५/६७४/डेटेड.१६.९.९९

४.ब्रीफोर क्लेरिफिकेशन ऑफ प्रपोझड २५ फीटस् डी.पी.रोड, वील टाऊन प्लानर इज गोइंग टू इश्यु कंम्पेटेशन सर्टीफिकेट टू द सेड आर.सी.सी? प्लीज गीव डिटेलड् इनफॉरमेशन?

५.सीन्स लास्ट सो मे यीअर ऑनवर्डस् टाऊन प्लानरस् क्लेरिकल स्टाफ इज नॉट ट्रान्सफरड? व्हाय वेदर दे आर द इनफॉन्शीअल स्टाफ वर्कींग अंडर द गायडनस ऑफ आर्कीटेक्ट बिल्डर्स? हेड क्वार्टर प्लीज सर्टीफाय?

उत्तर :- १) बांधकाम परवानगी भुखंड क्र.६२२ शिट क्र.६० व ७६ उल्हासनगर-३ येथे देणेत आली आहे. सदर भुखंडास एका बाजुस २५-०" रूंदीचा (नियोजित)तर दुस-या बाजुस ४०'-०" रूंदीचा आस्तित्त्वातील रस्ता आहे. सदर कावंधकामास प्लिंथचा दाखला दि.१८.१०.९९ रोजी दिला आहे.

२)बांधकाम मंजुरी प्रकरणात सनद तपासणी अहवाल उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालयातून प्राप्त करून घेतली जातात.

३)सुधारित मंजुरी वेळोवेळी अर्जदार यांनी मागणी केले नंतर नियमानुसार देणेत आली आहे.

४)जागेवरील इमारत बांधकाम मंजुर नकाशा प्रमाणे केल्याचा दाखला संबंधित परवानाधारक यांनी या कार्यालयाकडे दाखल केल्या नंतर पहाणी करून पुढील कारवाई बांधकाम पूर्णतेचा दाखला बाबत केली जाते.

सदर बाबतीत सामान्य प्रशासन विभागाकडुन कारवाई केली जाते.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- उत्तर ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र.५२९ हा श्री.नारायण पंजाबी यांचा आहे. हा दुसरा प्रश्न सुध्दा आपलाच आहे. प्रश्न क्र. ५२८ व ५२९ आपले आहेत.

प्रश्न क्र.५२९ :-ओ) हाऊ मेनी लायसेन्सड् आर्कीटेक्ट सव्हेअर आर रजिस्टरड् वीथ
द कार्पोरेशन?

बी)प्लीज गीव द लिस्ट ऑफ द प्रपोझल ऑफ इच ऑफ द आर्कीटेक्ट फॉर द
इयर १९९९-२००० ॲन्ड २०००-२००१?

सी )वेदर द ॲक्शन इज टेकन अगेन्स्ट द आर्कीटेक्ट हु विथड्रा फॉम सुपरविजन
ऑफ बिल्डींग हाल्फ द वे, वेन कॉनट्रवेन्शन ऑफ सेंक्शनड प्लान स्टार्टस?
डी)हेव यु ससपेंड ऐनी बिल्डींग परमीशन ॲज सुन ॲज द नोटीस ऑफ विड्रावल
ऑन नोटीस रिसिव्हड फॉम द आर्कीटेक्ट?
इ)हॅव यु ऑबझव्हड द प्राक्टीस ऑफ आर्कीटेक्ट टु विथड्रा द सुपरव्हीजन ॲन्ड कंन्टीन्यु वीथ अनॲथोराइज्ड डेव्हलपमेंट?
एफ)वेदर सच आर्कीटेक्ट कॅन बी बीलीव्हड फॉर फरदर परमिशन फॉर द ग्रॅन्ट
ऑफ फरदर परमिशन?
एच)कॅन देअर लायसेंन्स बी सस्पेंडेड?

<u>उत्तर :-</u> अ) एकुण २९ वास्तुविशारद/ अभियंत्त्यांना परवाना या कार्यालयातून देण्यांत आले आहे.
ब)सदर बाबतीत यादी तयार करणे शक्य नसल्याने यासंबंधात आपणांस काही शंका असल्यास त्याबाबत माहिती देता येईल.
क)प्रकरणी संबंधित परवानाधारक यांना स्पष्टीकरण बाबत विचारणा पत्रे पाठविण्यांत आली असून त्यावर त्यांचे स्पष्टीकरण आल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत येईल.
ड)बांधकाम परवानगी रदद केली नाही, परंतु निदर्शनास आल्यावर नियमानुसार योग्य ती कारवाई केली जाईल.
इ)वास्तुविशारद/ अभियंते हे काही प्रकरणात संबंधित कामावर देखरेख रदद केल्याचे कळवितात, अशांना त्याबाबत विचारण केली असून त्याचे स्पष्टीकरण योग्य नसल्याचे निर्दशनास आल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल.
एफ)जोपर्यंत दोषी वास्तुविशारद आढळून येत नाही, तोपर्यंत तो परवानाधारक म्हणुन काम करू शकतो.
ग)दोषी आढळल्यास करता येईल.
<u>मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी</u> :- उत्तर ठिक आहे.

<u>मा.सचिव :-</u>प्रश्न क्र५३० हा श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र५३०</u> :-१) महापालिकेने ३३ रस्त्यांचे रूंदीकरणाचे काम हाती घेतले असून त्यामध्ये बाधीत झालेल्या नागरिकांना महापालिकेने विशेषतः आर.सी.सी. बांधकामासाठी विना परवानगी एक मजली व दोन मजली असे बांधकाम करण्याचे सवलत देण्यात आली आहे का?
२)पालिकेच्या विना मंजूरी सुरू असलेल्या बांधकामामुळे पालिकेच्या महसूली उत्पन्नाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यास जबाबदार कोण?
३) शहरातील रस्ता रूंदीकरण मोहिमेच्या निमित्ताने नागरीक आर.सी.सी एकमजली, दोन मजली इमारती पालिकेकडुन प्लॅन पास न करता बनवित आहेत व बनविल्या गेल्या आहेत, त्या इमारती एक दोन वर्षात कोसळून त्यामध्ये होणा-या जीवित व वित्तहानीस जबाबदार कोण? पालिका प्रशासन? अनधिकृत बांधकाम विभाग?

<u>उत्तर</u> :- १)माहे मे २०० चे महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्वसाधारण सभेचे मत आजमावून मा.पिठासीन अधिकारी यांनी रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होणा-या लोकांना त्यांचे घराची (बांधकामाची) दुरूस्ती करताना त्यांनी तळमजला अधिक दोन अशी बांधकामे करण्याचे धोरण स्विकारले असे मा. आयुक्त यांना सुचीत केलेले होते. ते सदर सभेचे कार्यवृत्ताच्या पान क्र६९ वर नमुद आहे. हयाप्रमाणे रस्ता रूंदीकरणातील बाधीत झालेले लोक संबंधीताची बांधकामे करीत आहेत.

२)रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होणा-या बांधकामाची दुरूस्तीचे काम केले जात असल्याने, सदर बांधकामास विकास शुल्क आकारण्याचा प्रश्न उद्भवत नाही.



३)रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होणा-या बांधकामांना दुरूस्तीचे काम केले जात असल्याने, इमारतीची प्रत चांगली ठेवणे ही संबंधीत बांधकामे मालक यांची जबाबदारी असुन, भविष्यात इमारती कोसळुन होणा-या जीवीत हानीचा संबंधीत बांधकाम कर्ते मालक हेच जबाबदार असेल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :-सन्माननिय महापौरजी, मी असा प्रश्न विचारला आहे की, महापालिकेने ३३ रस्त्त्यांच्या रूंदीकरणाचे काम हाती घेतलेले आहे. त्यामध्ये ज्या नागरिकांची घरे अथवा बांधकामे बाधित झाली आहेत अशा नागरिकांना परवानगी न घेता एक मजली किंवा दोन मजली बांधकामे करण्याची विशेषत: आर.सी.सी. बांधकामे करण्याची महापालिकेने सुट दिली आहे का?मी असा प्रश्न विचारलेला आहे. यावर उत्तर दिलेले आहे, मे-२००० मध्ये झालेल्या महासभेत झालेल्या चर्चेनुसार, सर्वसाधारण महासभेचे मत आजमावून मा. पिठासिन अधिकारी यांनी स्वत: रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित होणा-या लोकांना त्यांचे घराची /बांधकामाची दुरूस्ती करताना त्यांनी तळ मजला अधिक दोन अशी बांधकामे करण्याचे धोरण स्विकारले असे मा.आयुक्त यांना सुचित केले होते. ते सदर सभेच्या कार्यवृत्तांताच्या पान क्र.६९ वर नमुद आहे याप्रमाणे रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित झालेले लोक संबंधितांची बांधकामे करीत आहेत.

मी विचारले होते की, ज्या लोकांची घरे किंवा दुकाने जी पण काही रस्ता रूंदीकरणात गेली होती. अशा या लोकांना बांधकामे करण्यासाठी परवानगी दिली आहे का? की आपण ऐवढे ऐवढे बांधकाम करू शकता. ज्यांचे घर किंवा दुकान रस्ता रूंदीकरणात जाते ते लोक दोन मजली,तीन मजली अशी बांधकामे करत आहेत. ती बांधकामे तयार होत आहेत, आपण त्यांना परवानगी दिली आहे काय? लेखी स्वरूपात?

<u>मा.महापौर :-</u> मोरे साहेब, मी आपणांस आठवण करून देऊ इच्छितो, हा जो रस्ते रूंदीकरणाचा कार्यक्रम महानगरपालिकेने हाती घेतला होता. त्याबाबत आयुक्त साहेब व इतर अधिका-यांशी आमचे जे बोलणे झाले होते व महासभेत सुध्दा अशा प्रकारची चर्चा झाली होती की, ज्या लोकांच्या मिळकतीचा काही भाग रस्ता रूंदीकरणामध्ये जात असेल, भले ती मिळकत रहीवासी अथवा व्यावसायिक वापरातील असो अशा मिळकतींचा काही भाग रस्ता रूंदीकरणामध्ये जात असेल तर त्यांना त्या मिळकतीवर बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी. तळमजला अधिक दोन मजले असे बांधकाम करण्याबाबत महासभेनेच अशा प्रकारचा ठराव केलेला आहे. अशाप्रकारची लेखी परवानगी देण्याचे ठरलेले नव्हते. निवडुन आलेले लोक प्रतिनिधी व महापालिका अधिकारी यांच्यामध्ये असे मत होते की, तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- आपल्या म्हणण्यानुसार जर कुणी तळ मजला अधिक दोन माळे या पेक्षा अधिक बांधकाम केले असेल तर आपण काय कारवाई करणार?

<u>मा.महापौर</u> :-अशा बांधकामांवर कायदयानुसार योग्य ती कारवाई करण्यास महानगरपालिका मोकळी आहे. रस्ते रूंदीकरणामध्ये जर असे एखादे बांधकाम, तळमजला अधिक दोन मजले असे बांधकाम झाले असेल तर.... कारण की, महासभेमध्ये असे ठरले होते की, तळ मजला अधिक दोन माळे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, असा ठराव झाला होता कींवा सहमती झाली होती की, ज्याचे बांधकाम रस्ता रूंदीकरणात जाते अशा लोकांना तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करण्याची परवानगी देणे बाबत महासभेमध्ये



चर्चा झाली होती. परंतु हा निर्णय होण्यापूर्वी दोन -तीन दिवस अगोदर माझ्या प्रभागात तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम असलेल्या एका बांधकामाचा दुसरा मजला तोडला गेला होता. संपुर्ण शहरामध्ये तळ मजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे तर, त्यांना सुध्दा दुस-या माळयाची दुरूस्ती करू दिली पाहिजे. तळ मजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास परवानगी दिली पाहिजे असे मी या महासभेत सांगु इच्छितो. तळ मजला अधिक दोन माळे बांधकाम करण्यास सर्व उल्हासनर शहरात परवानगी आहे तर तळमजला अधिक दोन माळयाचेच बांधकाम झाले पाहिजे. माझ्या प्रभागात त्या बांधकामाचा दुसरा माळा तोडला गेला होता. व त्यावेळी हा निर्णय झालेला नव्हता. यासाठी हा निर्णय झाला पाहिजे.

मा.महापौर :-या महासभेचे असे मत आहे की, रस्ता रूंदीकरणाध्ये जे पण घर, दुकान, रहिवासी वापराचे किंवा व्यावसायिक वापराचे बांधकाम अंशत: तुटले असेल अशा बांधकामांना तळ मजला अधिक दोन मजले बांधण्याची परवानगी दिली जावी असे या महासभेचे मत आहे.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :-आभारी आहे.

मा.सदस्या श्री.प्रभुनाथ गुप्ता :- मा.महापौरजी, असे लोक तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम करू शकतात ना? ज्यांची बांधकामे रस्ता रूंदीकरणामध्ये तुटली आहेत? अशी काही उदाहरणे माझ्या प्रभागात सुध्दा आहेत. अशा लोकांना तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी. माझ्या प्रभागात जवाहर हॉटेलच्या समोर काही बांधकामे रस्ता रूंदीकरणात तुटली आहेत त्यांनाही तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास परवानगी दिली गेली पाहिजे. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा.महापौरजी, आता येथे जी चर्चा चालु आहे त्याबाबत मला जी माहिती आहे,त्याबाबत मी सांगु इच्छितो की, मा.आयुक्त साहेबांनी याचे स्पष्टीकरण करावे. सुरवातीस जेव्हा रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू झाले त्यावेळी काही लोक तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करत होते.त्यानंतर असे सांगण्यात येत होते की, तळमजला अधिक दोन माळे अशी जी बांधकामे झाली आहेत, जी झाली आहेत ती झाली आहेत यापुढे मात्र जो कोणी बांधकाम करेल तो फक्त तळमजला अधिक एक माळा असेच बांधकाम करेल. दोन माळयाचे बांधकाम करणार नाही. जेव्हा मी त्यांच्या दालनात गेलो होतो तेव्हा अशा प्रकारची चर्चा आयुक्तांच्या दालनात चालली होती. आता याचा निर्णय व्हावा तळ मजला अधिक दोन माळे असे बांधकाम करायचे आहे की, तळमजला अधिक एक माळा असे बांधकाम करायचे आहे?

मा.महापौर :- शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे वाढू नयेत म्हणुन आयुक्त साहेबांनी आपणांस असे सांगीतले असेल असे मला वाटते. महासभेचे असे मत होते की, तळ मजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी. त्यासभेचे इतिवृत्त सुध्दा कायम झालेले आहे.

मा.आयुक्त :- यामध्ये आणखी एक गोष्ट मी सांगु इच्छितो की, आमच्या रस्ते रूंदीकरण मोहीमेचा काही लोक गैर लागु फायदा घेत असल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणावर येवू लागल्या, शासनाकडे सुध्दा तक्रारी जाऊ लागल्या तेव्हा आम्ही सर्व्हे केला त्यात असे आढळून आले की, कुणाचे २ फुटाचे, कुणाचे ४ फुटाचे तर कुणाची फक्त भिंतच गेली आहे, असे लोक आपले कच्चे बांधकाम असलेले घर किंवा दुकान तोडुन दोन-दोन तीन माळयाचे बांधकाम करू लागले.

प्रत्यक्षात आमचे असे धोरण होते की, ५० टक्के पेक्षा ज्याचे जास्त नुकसान झालेले आहे. ज्या माणसाचे फ्लोरींग गेले आहे. ज्याला आम्ही पर्यायी जागा



देऊ शकलो नाहीत, तो माणुस आपल्या त्याच जागेवर रिसेटमेंट पुन्हा स्थायीक होऊ पहात आहे. अशा लोकांना लक्षात घेऊन जास्तीत जास्त त्यांनी तळमजला अधिक दोन माळे ऐवढे बांधकाम केले तर ते ठीक राहील. असे एक धोरण होते. परंतु ज्याचे फक्त २ फुट ३ फुट बांधकाम गेले आहे म्हणजे नुकसान अतिशय कमी झालेले आहे. व फायदा मात्र त्याच्या दसपट होऊ पहात आहे. अशी प्रकरणे मला वाटते, ती प्रकरणे मेरीट प्रमाणे निकाली काढली पाहिजेत.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-मा.महापौरजी, आता, आयुक्त साहेबांचे म्हणणे वेगळे आहे. या शहरामध्ये अशा प्रकारच्या व्दिधा निर्माण होतात, अडचणी निर्माण होतात. काही ठिकाणी नगरसेवक तक्रारी करत असेल काही ठिकाणी दुसरा कुणी ना कुणी अशा तक्रारी करत असेल की, अमुक अमुक या प्रभागात हे काम चालु आहे. या विषयावर जास्त बोलणे योग्य नाही, परंतु विषय निघाला आहे. श्री. मोरे यांनी विषय काढला आहे, श्री.महाडिक यांनी त्यास विषय जोडला आहे. त्यानुसार मी ही विषय जोडु इच्छितो आयुक्त म्हणतात की, रस्ता रूंदीकरणामध्ये ज्याचे दोन किंवा तीन फुटाचे बांधकाम तुटले आहे किंवा भिंत तुटली आहे त्यास डब्बल माळयाचे बांधकाम करण्याची अनुमती नाही. / परवानगी नाही. महासभेने एक संकेत पास केला होता. त्यावेळी असा काही संकेत दिला गेला नव्हता की, ४ फुट बांधकाम तुटले गेले असेल तर त्यास तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम करण्यास परवानगी दिली जाणार नाही, कमीत कमी अर्धे बांधकाम गेले असेल तरच त्यांना २ माळयाचे बांधकाम करण्यास परवानगी दिली जाईल. अशा प्रकारचे काहीही स्पष्टीकरण केले गेलेले नव्हते, रस्ता रूंदीकरणात ज्यांचे बांधकाम तुटले गेले आहे त्यांना दोन माळयाचे बांधकाम करण्यास परवानगी आहे अशा प्रकारचे संकेत असल्यामुळे लोकांनी दोन-दोन माळयाची बांधकामे करून घेतली. आपले दोन फुट किंवा ४ फुटच बांधकाम तुटले आहे, अर्धे बांधकाम तुटले नसल्याने आपणास आम्ही बांधकामाची परवानगी देणार नाही. अशी आपली दुहेरी भुमिका असता काम नये, आमची भुमिका स्वयंस्पष्ट असली पाहिले. तर मा.महापौर आपण कृपया स्पष्टीकरण करावे.

<u>मा.महापौर</u> :- राजानीजी आपले जे मत आहे. त्याबाबत मी हे सांगु इच्छितो की, रस्ते रूंदीकरणामध्ये जेवढी काही बांधकामे बाधीत झाली होती, ती सर्व बांधकामे बहुतांश पुर्ण झाली आहेत. मला असे वाटत नाही की कुणाचे असे एखादे प्रकरण प्रलंबीत असेल म्हणुन..... आयुक्त असे म्हणत होते की, काही लोक गैरलागु फायदा उठवू इच्छित होते. त्यांच्यावर अंकुश लागला पाहिजे. नो बडी शुड टेक नं.१ अन डयु ॲडव्हान्टेज.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> अनडयु ॲडव्हान्टेज ची गोष्ट नाही आहे. कुणाचे ६ फुट दुकान गेले? १५ फुट लांबीचे दुकान होते त्यापैकी ६ फुट दुकान रस्ता रूंदीकरणात गेले. त्या माणसाने त्यावर दोन माळयाचे बांधकाम केले पाहिजे किंवा नाही? हा साधासा प्रश्न आहे.

<u>मा.महापौर</u> :- मला वाटते की, त्यांनी तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम करण्यास काही हरकत नाही.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- ज्यांचे २ फुट बांधकाम गेले. ४ फुट बांधकाम गेले त्यांनी त्यावर बांधकाम केले पाहिजे किंवा नाही?

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-</u> मा.महापौरजी, आताच श्री.नरेंद्र राजानी यांनी जे म्हटले, कुणावर कॉमेन्टस करायचे नाहीत. परंतु अशाप्रकारे नियम बदलत

गेले तर महानगरपालिकेला काम करणे खुप अवघड जाईल. ज्याचे ७५ टक्के नुकसान होते त्यास तळमजला अधिक दोन माळयाच्या बांधकामाची परवानगी दिली तर चालेल.



परंतु ज्याचे ४ फुट किंवा दोन फुट बांधकाम जात असेल तर त्यास कशी? परवानगी दिली जाईल? हे चुकीचे होईल ना? हे चुकीचे होईल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> मा.महापौरजी, सभागृहातील सर्व सहका-यांच्या मी असे निदर्शनास आणुन देवू इच्छितो की,आता काही वेळे पुर्वी आयुक्त साहेबांनी सांगितले मा.महापौर साहेब सुध्दा ऐकत आहेत, ज्याचे ५० टक्के बांधकाम गेले आहे, त्यांना तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी हे ठिक आहे, मी तर हा विचार करतो की, शहराचे भले होत असले तर ते योग्यच आहे. परंतु माझ्या प्रभाग क्र.३१ मध्ये एका मुस्लीम बांधवाचे कमीत कमी १५ ते २० फुटाचे बांधकाम रस्ता रूंदीकरणात गेले होते, त्याने आर.सी.सी बांधकाम करण्याचा निर्णय घेतला, पहिल्या माळयाचे बांधकाम कुठे झाले नाही झाले तर त्याचे बांधकाम तोडले गेले. ते का तोडले गेले? श्री. गरजे यांनी ते बांधकाम तोडले होते. एक वेळ नाही तर दोन वेळा ते बांधकाम तोडले होते. तेथे आयुक्त साहेबांना सुध्दा मी घेवून गेलो होतो. मा.महापौरांना सुध्दा घेवून गेलो होतो, ही कोणती निती आहे?

<u>मा.आयुक्त :-</u> तेथील गोष्ट वेगळी आहे, मा.महापौर साहेबांना पण मी तेथे घेवून गेलो होतो, त्या माणसाचे जे बांधकाम तुटले होते व त्याची जी जमीन बाकी होती त्याव्यतिरिक्त असलेल्या जमिनिवर तो अतिक्रमण करीत होता त्यामुळे ते बांधकाम तोडले होते.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u> :- आयुक्त साहेब, माझा प्रभाग आहे, मी सकाळ संध्याकाळ तेथून जात येत असतो.

<u>मा.आयुक्त :-</u> स्वत: महापौर साहेबांनी साईट पाहिली आहे.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> पाहिजे तर सभागृहातील सदस्याची एक समिती नेमली जावी, मी त्या सर्वांना बरोबर घेऊन जाईन, डॉल्फीन क्लबचा जो रस्ता निघतो आहे त्या रस्त्यामध्ये त्याचे २० ते २५ फुटाची जागा गेली आहे. व श्री. मारवीजा साहेबांनी त्याची शहानिशा केली आहे, तेथे त्या व्यक्तीने बांधकाम केल्यानंतर खुन्नसने गर्जे यांनी तेथे जाऊन ते बांधकाम तोडले. एक वेळ नाही तर दोन वेळा त्यांनी ते बांधकाम तोडले आहे. ही एक गोष्ट मी सभागृहासमोर आणु इच्छितो. तसेच दुसरी एक गोष्ट आहे की, आता आयुक्त साहेबांनी सांगितले की ज्याचे ५० टक्के बांधकाम गेले तो तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करू शकतो. तर माझ्या प्रभागात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात महाराष्ट्र बिअरबार नावाचा जो बार आहे त्या बारवाल्यांचे दोन फुटाचे सुध्दा बांधकाम तुटले गेले नाही. तो तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम करीत आहे. ही कुठली निती आहे? हे काय चालले आहे या शहरामध्ये? महाराष्ट्र बार आज सुध्दा पाहीला तर असे दिसुन येईल की त्याचे काहीही बांधकाम रस्ता रूंदीकरणामध्ये गेलेले नाही. तरीही तो तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम करीत आहे. आर.सी.सी. बांधकाम करीत आहे. बारवाल्याला बांधकाम करण्याची परवानगी कशी दिली आहे?

<u>मा.महापौर :-</u> उप-आयुक्त याची पडताळणी करतील व योग्य ती कार्यवाही करतील.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- पडताळणी? दुस-यांच्या बांधकामाची पडताळणी न करता, तात्काळ त्यांची बांधकामे तोडली जातात. महाराष्ट्र बारचे कमीत कमी एक महिन्यापासून काम चालु आहे, अनाधिकृत बांधकाम विभागाच्या

अधिका-यांचे त्याकडे लक्ष जात नाही? का जात नाही? याशिवाय रमेश किराणा दुकानवाला व गोप रेशन दुकानवाला यांची बांधकामे तोडली पाहिजेत. परंतु बारवाल्याला जादा



बांधकाम करू दिले पाहिजे का? तर तेथे लोक दारूपिण्यासाठी जातात म्हणुन? का? त्याचे बांधकाम का होत आहे? रस्ता रूंदीकरणामध्ये तर त्याचे काहीही बांधकाम गेलेले नाही. आताच आयुक्त साहेबांनी सभागृहात सांगितले की, ज्याचे ५० टक्के बांधकाम गेले असेल तर तो उर्वरित जागेवर बांधकाम करू शकतो. यावर मी सुध्दा सहमत आहे कारण की, शहरातील लोकांचा फायदा होत असेल तर त्यात मला काही हरकत नाही आहे. परंतु महाराष्ट्र बारचे काहीही बांधकाम कटलेले नसताना तो बांधकाम करित आहे, पुढे पत्रे लावून त्यामागे तो इमारतीचे बांधकाम करित आहे. हा कुठला न्याय आहे? व आपण केव्हा त्या बांधकामाची पडताळणी करणार? व कधी त्यावर कारवाई करणार? त्याबबत मला या सभेत उत्तर पाहिजे.

<u>मा.महापौर</u> :- श्री. मोरे साहेब, उदया त्याची पडताळणी केली जाईल व हवे असेल तर पुढच्या महासभेत आपणांस सविस्तर अहवाल हि दिला जाईल.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- ठीक आहे, दुसरे असे की या प्रश्नाचा दुसरा भाग (अ) पालिकेच्या विना परवानगी सुरू असलेल्या बांधकामामुळे पालिकेच्या महसुल उत्त्पन्नाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे त्यास जबाबदार कोण? यावर उत्तर दिले आहे.

रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होणा-या बांधकामाच्या दुरूस्तीचे काम केले जात असल्याने सदर बांधकामास विकास शुल्क आकारण्याचा प्रश्न उदभवत नाही.

<u>मा.आयुक्त :-</u> रस्ता रूंदीकरणाच्या कामात आम्ही काही लोकांचे नुकसान करत आहोत. त्याच बरोबर आम्ही त्यांची जागा घेत आहोत, याचाच अर्थ जी व्यक्ती बाधीत आहे. आम्ही त्यांना रिलिफ दिले आहे की, आपण आपल्या बांधकामाची दुरूस्ती करून घ्या किंवा तळमजला अधिक एक माळा असे बांधकाम करा. तेथे पुर्नवसन करा व त्यानंतर सुध्दा जर आम्ही त्याच्याकडुन विकास शुल्यापोटी पैसे
घेतले तर हे कुठपर्यंत योग्य होईल? हे जे धोरण आहे ते ठाण्यामध्ये सुध्दा अंमलात आले आहे, कल्याण मध्ये सुध्दा अंमलात आले आहे. व आपणाकडे सुध्दा या ३३ रस्त्यांच्या कामामुळे पहिल्यांदाच अंमलात आलेले आहे.

ज्या लोकांचे आम्ही नुकसान केले आहे,त्या लोकांकडुन विकास शुल्क आम्ही घेतलेले नाही. नुकसान त्यांचे झालेले आहे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u> आयुक्त साहेब, मी आपल्या म्हणण्याशी सहमत आहे. परंतु आज सुध्दा स्मशानभुमीच्या गेटमध्ये एका सरदारजीच्या बांधकामाचे निश्कासन केले जात आहे, कालच श्री.भडकवाड साहेब त्यास सांगून आले आहेत की, आपण हे बांधकाम हटविले नाही तर आम्ही हे बांधकाम तोडून काढू. मी त्यांच्याशी सहमत आहे परंतु मा.महापौर व आयुक्त साहेबांचे मी लक्ष वेधू इच्छितो की, या लोकांना लेखी देण्यामध्ये काही हरकत आहे का? ज्यांचे दुकान किंवा घर रस्ता रूंदीकरणामध्ये गेले आहे त्यांच्याबाबत आपण सहानुभूती दाखविता. परंतु त्यांना लेखी परवानगी पत्र देण्यामध्ये काही हरकत आहे का? परवानगी पत्र दिले जात नसल्यामुळे बांधकाम करण्यास लोक आज सुध्दा घाबरतात कारण की, समजा माझे व श्री.भडकवाड यांचे जमत नाही, असे असताना मी जर एखादे बांधकाम केले तर श्री.भडकवाड हे खुन्नसपणे ते बांधकाम तोडून काढतील. अशा प्रकारांमुळे लोक घाबरतात. तो सरदारजी आज सकाळी माझ्याकडे आला होता. म्हणे साहेब, आज माझे बांधकाम तोडणार आहेत. मी स्वत: तोडून घेवू? मी म्हटले तोडुन घ्या परंतु आपण त्यांच्याकडुन परवानगी घ्या. असेही होवू शकते की आज आयुक्त श्री.शिंदे साहेब येथे नाहीत. उदया दुसरा कुणी आयुक्त म्हणुन येईल व म्हणेल की शिंदे साहेबांचे आदेश मला मान्य नाहीत. आपणाकडे काही लेखी नाही आहे. रस्ते रूंदीकरणामध्ये

येणारी बांधकामे आपण हटविता तर त्यांना बांधकाम करण्यास परवानगी देण्यास काय हरकत आहे? परवानगी दिल्यामुळे उदया तो माणुस बांधकाम करण्यास घाबरणार नाही. महापालिकेच्या नियमानुसार जेवढे



बांधकाम त्याला करता येण्यासारखे आहे. तेवढे बांधकाम तो करू शकतो ही माझी विनंती आहे. अशा प्रकारचे धोरण या शहरात अंगीकारले जावे.

मा.आयुक्त :- प्रत्यक्षात असे आहे की, ज्यांचे बांधकाम तुटते त्याची नोंद आपल्या पी.डब्लु. डि विभागातील रस्ते नोंदणी पुस्तकात आम्ही करतो त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कुणी व्यक्ती जर बांधकाम करीत असेल तर त्यानुसार आमच्या असे निर्दशनास येते की, कुणीतरी अनाधिकृत बांधकाम करीत आहे. रस्ते रूंदीकरण कार्यक्रमात एक अंडरस्टॅडिंग आहे की, ज्याचे बांधकाम तुटते त्यास उर्वरित जागेवर बांधकाम करण्यास आम्ही सवलत दिलेली आहे. ही अंडरस्टॅडिंग आहे त्यामध्ये जर लेखी दिले गेले तर त्यामध्ये कायदेशिर अडचणी येऊ शकतात. अंडरस्टॅडिंगमध्ये कायदा नसतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- साहेब, मी हा प्रश्न का विचारतो आहे, जेव्हा श्री. पप्पु कालानी हे नगराध्यक्ष होते. तेव्हा अमन सिनेमा समोरची जी बांधकामे रस्ता रूंदीकरणामध्ये गेली. त्यांना लेखी पत्र दिल्यानंतर सुध्दा आज त्याची बांधकामे तोडली जात आहेत. कारण दाखविले जाते की, रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होत आहे म्हणुन...

मला असे म्हणायचे आहे की, ज्यांची बांधकामे बाधीत झाली आहेत अशा लोकांना आपण / महापालिकेने लेखी पत्र दिले तर त्यामुळे काही फरक तर पडणार नाही? कारण की आज ते लोक घाबरत आहेत, एक एक पैसा गोळा करून केलेले बांधकाम महापालिकेकडुन पाडले जाते.

व दुसरी गोष्ट अशी की, रस्ता रूंदीकरणामध्ये ज्याचे काहीही बांधकाम गेलेले नाही. परंतु असे लोक बांधकामे करत आहेत त्याची बांधकामे २-३ वर्षानंतर पडली तर त्यास जबाबदार कोण राहील? महापालिका म्हणेल आम्ही तर लेखी दिलेले नाही.

मा.आयुक्त :- इमारत पडेल असे बांधकाम कुणी का करेल? ज्याला तेथे रहायचे आहे तो आपली सुरक्षितता लक्षात घेवूनच घराचे बांधकाम करेल. पडणा-या घराचे बांधकाम तो कसा करेल? पडणा-या घराचे बांधकाम तो कसा करेल?

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- हेच करायचे होते,हाच विचार करणारे होते तेर या उल्हासनगर शहरामध्ये आपण असतानाच जी इमारत पडली. ती कोणत्त्या कारणामुळे पडली?

मा.आयुक्त :- माझ्यामुळे पडली नाही.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- जर बी.बी.मोरे यांनी विचार केला असता की, माझे घर पडले नाही पाहिजे. चांगल्या प्रकारे घर बांधले पाहिजे. परंतु असे होत नाही. कुणी असा विचार करतो आणि कुणी असा विचार करत नाही. जी इमारत पडली ती कोणत्त्या कारणामुळे पडली? त्यावेळी कनिष्ठ अभियंता कोण होता? त्यावेळचे आयुक्त कोण होते? हे शोधण्या पूर्वी जर त्यांनी बांधकाम परवानगी घेतली आहे का? तळमजला अधिक दोन किंवा तीन माळे, चार माळे बांधकाम केले आहे का? हे सर्व पाहिले पाहिजे. आजच्या या महासभेमध्ये या मुदयावर विचार झाला तर शहरासाठी ते चांगले होईल.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी :- मा.महापौरजी, श्री.बी.बी मोरे साहेब जे सांगत आहेत की, रस्ते रूंदीकरणामध्ये प्रत्येक लोकांना काय काय समस्यांना तोंड दयावे लागत आहे. हे सर्व खरे आहे याबाबत मागील काही महासभांमध्ये

मी हे आपल्या व आयुक्त साहेबांच्या निर्दशनास आणुन दिलेले आहे की, ज्यांना पर्यायी जागा



दिलेल्या आहेत त्यांना त्याबाबत काहीही लेखी देण्यात आलेले नाही. ती तर आमच्या श्री. गर्जे साहेबांची मेहरबानी आहे. त्यांनी १इंच बाय १ इंचाची चिठ्ठी दिलेली आहे. यापेक्षा जास्त काही यांना दिलेले नाही. व त्यांना अद्याप जसे की, वर्ष दोन वर्ष होत आलेले आहेत. त्या चिठ्ठी नुसार ना त्यांना विजेची जोडणी मिळत, ना इतर कोणतीही सुविधा, याबाबत मी श्री. गर्जे यांच्याशी चर्चा केली होती त्यांनी सांगीतले होते की, आम्ही प्रमाणपत्र तयार केलेले आहेत ते त्यांना दिले जातील. परंतु अद्याप काहीच झालेले नाही.

<u>मा.आयुक्त :-</u> प्रमाणपत्र देण्याचा आम्ही बंदोबस्त करू. करत आहोत.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> माझ्या असे निर्दशनास आले आहे की, कॅम्प ४ मधील महाराष्ट्र बॅंक शेजारील ज्यांची तीन-चार दुकाने तुटली आहेत त्यांना टेलीफोन एक्सचेंजच्या समोर जागा दिलेली आहे. त्यांना आपणाकडुन लेखी पत्र दिले गेलेले आहे. आपली अमुक-अमुक येथील दुकाने तुटल्यानंतर आपणास अमुक-अमुक या प्लॉटवर जागा दिलेली आहेत. यांना आपण लेखी देता तर इतरांना का नाही देत? हा सुध्दा एक प्रश्न आहे.

<u>मा.आयुक्त :-</u> मध्यंतरी यामध्ये अशी एक अडचण आली होती की, एम.आर.टी. पीचे कलम ३७ अनुसार आरक्षण रदद करण्याचा प्रस्ताव आहे. महासभेत मंजुर होऊन त्यावर विचार करण्यासाठी शासनाकडे पाठवण्यात आलेला आहे. जेव्हा मायनर मॉडीफिकेशनचा प्रस्ताव शासन मंजुर करेल, अपेक्षा आहे हे महिना दिड महिन्याच्या आत होईल. कारण की मा.मंत्री महोदया पर्यंत मा.महापौर साहेबांनी शिफारस केलेली असुन त्यांना आश्वासन दिले आहे की, हे काम आम्ही लवकरात लवकर निकाली काढू. प्रत्यक्षात हे कारण होते की,बाकी इतर लोकांचे राहिलेले आहे. याबाबतीत मी अधिका-यांशी सुध्दा चर्चा केली आहे. जे प्लॉट आम्ही लोकांना दिलेले आहेत त्याबाबत आम्ही त्यांना सबुत देवू. लेखी सर्टीफिकेट देवू. एक सहयांदी नगरचे सोडून कारण की ते न्यायप्रविष्ठ आहे.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> उल्हासनगर शहरामध्ये एका माणसाला लेखी दिले जाते. इतरांना दीले जात नाही प्रत्यक्षात सर्वांना लेखी दिले पाहिजे.

<u>मा.आयुक्त</u> :-ब-याचशा लोकांना लेखी दिलेले आहे. एका माणसाचा प्रश्न नाही.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> सर्वसाधारणपणे मी पाहिले आहे की, ब-याचशा लोकांना आपण लेखी दिलेले नाही आहे.

<u>मा.आयुक्त</u> :- काही लोकांना दिलेले आहे. परंतु ब-याचशा लोकांना मिळालेले नाही. ते देण्याचा बंदोबस्त आम्ही करू.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u> दुसरी गोष्ट अशी की, त्यादिवशी सूध्दा मी विचारले होते व आपणास ही सांगितले होते की, ज्याचे बांधकाम रस्ता रूंदीकरणामध्ये गेलेले नाही. अशा कित्त्येक लोकांना प्लाट ६१९ वर घरे / दुकाने दिली आहेत. त्याचे काय केले साहेब? आपण लेखी दिले होते., त्यांचे नावाची यादी आपण मागविली होती ज्यावेळी श्री.भडकवाड यांनी पदभार स्विकारला त्यावेळी मी त्यांना लेखी पत्र दिले होते. हे पत्र मी आपणांस (आयुक्तांना) उददेशुन लिहिले होते. व त्याची प्रत श्री. भडकवाड यांना दिली होती त्याबाबत सुध्दा अद्याप काहीच कार्यवाही झालेली नाही.

*मा.आयुक्त* :-माझ्या माहिती नुसार एक चायनिझ घडयाळवाले जे आहेत.त्यांनी गडबड करून, टॅक्स पावती वगैरे काढून पर्यायी जागा मिळविण्याचा प्रयत्न केला



होता. त्यास पर्यायी जागा दिली गेली होती. प्लॉट ६१९ वर परंतु जेव्हा आपण त्याबाबत मुददा उपस्थित केला तेव्हा आम्ही पडताळणी केली. आम्हाला आढळून आले की, त्याने तिकडम बाजी करून ही जागा मिळवली आहे. त्यानंतर तत्काळ ते बांधकाम निष्कासित करून आम्ही तो प्लॉट आमच्या ताब्यात घेतला. ही एकच केस आहे. या व्यतिरिक्त आणखीन काही केसेस असतील तर आम्ही आपणांस विनंती करतो की, त्या आपण आम्हास दया. आम्ही त्याची पडताळणी करू.

*मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे* :- एक केस बाबत तर असे झाले होते की, मी नऊ तारखेला पत्र दिले व १० तारखेला गर्जे साहेब त्यांच्याकडे जाऊन म्हणाले की, ती चिठ्ठी दया. मला निष्कासन करायचे आहे. तुमच्या बाबतीत श्री.बी.बी मोरे यांनी असा असा आवाज उठवला आहे. प्रश्न विचारला आहे ती गोष्ट तर सोडुन दया. त्याबाबत कार्यवाही झालेली आहे. परंतु मी जेव्हा प्रश्न विचारला त्यानंतर गर्जे साहेबांनी ते बांधकाम निष्कासित केले परंतु मी जे लेखी पत्र दिले आहे. त्याबाबतीत काय झाले. कमीत कमी १००-१५० लोकांना जागा देण्यात आली आहे. माझ्या प्रभागात डॉलफिन क्लबचा जो रस्ता निघतो त्या रस्त्याबाबत मी बोलत आहे. कित्येक लोक भिमनगर कॅम्प १ मध्ये राहतात. ज्यांची प्रॉपर्टी नाही आहे. अरूण एकनाथ पवार, मी नाव सुध्दा सांगु इच्छितो सभागृहामध्ये त्या माणसाचे या रस्त्यामध्ये घर गेलेले नसताना सुध्दा त्याला घर दिले गेले. त्याने ८० ,०००/- हजारा मध्ये घर विकले सुध्दा व त्यानंतर लफडे सुध्दा झाले. ऐवढे मी सांगतो आणखी काय सांगु?
*मा.आयुक्त :-* आपण सविस्तर माहीती दया. आम्ही चौकशी करू, पडताळणी करू.

*श्री. भडकवाड (उपायुक्त) :-*श्री. मोरे साहेब, आपण जी तक्रार केली आहे त्यामध्ये सर्वच्या सर्व यादी झेरॉक्स करून आपण आमच्याच विभागाकडे दिली आहे. त्यावर आयुक्त साहेबांनी आदेश दिलेले आहेत की, भडकवाड साहेब याबाबत मोरे साहेबांशी चर्चा करून यामध्ये कीती लोकांबाबत चुक झालेली आहे. कालच माझ्याकडे ते पत्र आलेले आहे.

*मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-*चर्चा तुमच्याशी मी केलेली आहे. तुम्ही माझ्याशी चर्चा केलेली आहे. ज्यांचे घर गेलेले आहे त्यांच्या बददल मी आपणांशी चर्चा केलेली आहे. व ज्यांची काहीही बांधकामे रस्ता रूंदीकरणात गेलेली नाहीत. अशांची यादी मी तुमच्याकडे दिलेली आहे. नसेल तर पुढच्या वेळेला मी तुम्हाला ती सादर करेल.

*श्री. भडकवाड (उपायुक्त):-* कालच आयुक्त साहेबांकडुन ती माझ्या पर्यंत आली आहे. आदेश सहित आलेली आहे. त्यामध्ये काय काय चुका झालेल्या आहेत. त्या बाबत मी आपणांशी चर्चा करतो. आणि जर चुकीचे झाले असेल तर त्यावर कार्यवाही करतो.

*मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे* :- झालेले असेल म्हणजे काय? भडकवाड साहेब, तुम्हाला येथे येऊन सहा महिने होत आले आहेत. व आल्या-आल्या मी तुम्हाला यासाठी दिले होते की, याची चौकशी व्हावी आणि आयुक्तांना सांगुन त्यावर कार्यवाही केली जावी. अशा पध्दतीने मी तुमच्याशी बोललेलो आहे त्याच्याबददल अजुन काहीही झालेले नाही.

*श्री. भडकवाड (उपआयुक्त):-* कालच आयुक्त साहेबांकडुन ती तक्रार माझ्याकडे आलेली आहे. कदाचित आपण असे समजता की, माझे व भडकवाड यांचे जमत नाही. तसे माझ्या मनात नाही. त्यामुळे मी उदयाच आपणाकडे येईन.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u> माझ्या ही मनामध्ये नाही आहे, एक उदाहरण म्हणुन मी सांगितले की असे होऊ शकते.

--१२--

<u>मा.भडकवाड (उपआयुक्त):-</u> तसे काही नाही, मी उदयाच आपणाकडे येऊन चर्चा व पडताळणी करून पूढील कार्यवाही करेन.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> अधिकारी, प्रशासन व लोक प्रतिनिधी यांचे संबंध चांगले रहात असतील तर? आम्ही तर सत्ताधारी आहोत.

<u>श्री. भडकवाड (उपआयुक्त):-</u> नाही, साहेब असे काहीच नाही, मी उदया आपणाकडे येतो, चर्चा करतो, व योग्य ती कारवाई करतो.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- पुढच्या महासभे पर्यंत?

<u>श्री.भडकवाड (उपआयुक्त):-</u> त्याच्या आत कारवाई होईल.

<u>मा.सचिव</u> :- पुढचा प्रश्न श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र.५३१ :-</u>१)महापालिकेमार्फत जात असलेल्या ३१ प्रभागांतील टॅकर्सची प्रत्येक वार्डाची वर्गवारी द्यावी.
अ)प्र.क्र.१६ मध्ये नोव्हेंबर, डिसेंबर-९८ व जानेवारी ९९ या महिन्यामध्ये एकूण किती टॅकर्स पोहचले, महापालिकेने किती टॅकर्सची स्लीप टॅकर ठेकेदारांना दिली?
ब)३१ प्रभागांत जात असलेल्या टॅकर्सची संबंधित अधिका-यांनी चौकशी करून त्याचा अहवाल मा.आयुक्त यांना सदर केला आहे का? टॅकर्स नियमित पोहचतात किंवा नाही, या करिता कोणी अधिकारी नेमलेले असहे काय?
क)अधिका-यांनी अहवाल सादर केला नसेल किंवा कोणी अधिकारी नेमले नसतील तर त्याचे कारण काय?

<u>उत्तर :-</u> महानगरपालिकेमार्फत जात असलेल्या ३१ प्रभागातील टॅकर्सची प्रत्येक वार्डाची वर्गवारी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे आहे.
अ)प्रभाग क्र.१६ मध्ये विचारलेल्या महिन्यांत खालीलप्रमाणे टॅकर्स पोहोचले.

| अ.क्र | महिना | दिलेली टॅकर्स ची स्लीप | पोहोचलेले टॅकर्स | टॅकर्स क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | नोव्हेंबर ९८ | १२० | १२० | MH05 509 |
| २. | डिसेंबर ९८ | १२४ | १२४ | MH05 509 |
| ३. | जानेवारी ९९ | १२४ | १२४ | MH05 509 |

ब) ३१ प्रभागात जात असलेल्या टूंकर्सची संबंधित अधिका-यांनी किंवा नेमलेल्या कर्मचा-यांनी टॅकर भरण्याच्या ठिकाणी नोंदवहीत नोंदी घेतलेल्या आहेत व त्याचा गोषवारा देयक तयार करतांना कार्यालयांत सादर करण्यांत येतो. प्रचलित कार्यपध्दतीमध्ये आयुक्तांना टॅकरबाबतचा अहवाल सादर करण्याची प्रथा नाही. टॅकर नियमित पोहचतात किंवा नाहीत, याविषयी संबंधित उप-अभियंता / शाखा अभियंता हे चौकशी करतात. तसेच संबंधित ठिकाणच्या नागरिकांची

किंवा नगरसेवकाची टॅंकर मिळाल्याची पोहोच ग्राहय धरण्यांत येते. पोहोच मिळालेल्या ठिकाणचीच टॅंकरची बिले प्रस्तावित करण्यांत येतात.

क)प्रचलित पध्दतीप्रमाणे अधिकारी किंवा कर्मचारी पाठविलेल्या टॅंकरची नोंद वहीत नोंद घेतात. याबाबत आदेश झाल्यास मा.आयुक्तांना तसा अहवाल सादर करण्यांत येईल.



## उल्हासनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

महापालिकेमार्फत जात असलेल्या ३१ प्रभागातील टॅंकर्सची प्रत्येक वार्डाची वर्गवारी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | हल्ली जात असलेल्या टॅंकर्सची संख्या. |
|---|---|---|
| १. | ०१ | ०० |
| २. | ०३ | ०० |
| ३. | ०४ | ०१ |
| ४. | ०७ | ०० |
| ५. | ०८ | ०० |
| ६. | ११ | ०१ |
| ७. | १४ | ०५ |
| ८. | १५ | ०३ |
| ९. | १६ | १४ |
| १० | १७ | ०७ |
| ११. | २२ | ०० |
| १२. | २५ | ०७ |
| १३. | २६ | १३ |
| १४. | २७ | ०२ |
| १५. | २८ | ०१ |
| १६. | ३१ | ०० |
| १७. | ३५ | ०१ |
| १८. | ३८ | ०२ |
| १९. | ४२ | ०१ |
| २०. | ४३ | १४ |
| २१. | ४४ | ०५ |
| २२. | ४५ | ०१ |
| २३. | ४७ | ०० |
| २४. | ४८ | ०२ |
| २५. | ५१ | ०१ |
| २६. | ५२ | ०२ |
| २७. | ५३ | ०२ |
| २८. | ५५ | ०२ |
| २९. | ६० | २१ |
| ३०. | ६१ | ०५ |
| ३१. | ६२ | १० |

मा.सदस्या श्रीमती.सुनिता बगाडे :- साहेब प्रश्न वाचुन दाखवा, मी इतिवृत्तांताची प्रत बरोबर आणलेली नाही.

श्रीमती. सुनिता बगाडे यांनी त्यांचा प्रश्न क्र. ५३१ व त्याचे संबंधित विभागाकडुन देण्यांत आलेले उत्तर यावेळी महासभेत वाचुन दाखविले. माझा प्रश्न आहे. महानगरपालिके तर्फे जात असलेल्या टॅकर्सची प्रत्येक प्रभागाची वर्गवारी



दयावी. प्रभाग क्र.१६ मध्ये नोव्हेंबर-डिसेंबर १९९८ व जानेवारी १९९९ मध्ये एकूण किती टॅकर्स पोहचले, महानगरपालिकेने किती टॅकर्सची स्लीप ठेकेदारांना दिली? तुम्ही उत्तर दिलेले आहे. महानगरपालिके मार्फत जात असलेल्या ३१ प्रभागातील टॅकर्सची वर्गवारी यादी प्रमाणे.

नोव्हेंबर ९८-१२० गाडी क्र.MH05- ५०९ डिसेंबर ९८ मध्ये १२४, टॅकर्सची स्लीप गाडी क्र. Mho4-५०९ जानेवारी ९९ मध्ये सुध्दा १२४ या प्रमाणे स्लीप दिलेली आहे. मला असे वाटत नाही की, १२४ च झाले असतील म्हणुन? याची तुम्ही बरोबर चौकशी करावी.

<u>मा.महापौर</u> :- मॅडम आपण या उत्तराने समाधानी आहात की नाही? ते सांगाल तर संबंधित अधिका-याला बोलावून आपणांस स्पष्टीकरण दयावयास सांगतो.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता बगाडे</u> :- मला या प्रश्नामध्ये एक ही उत्तर माझ्या मनासारखे मिळालेले नाही.

<u>श्री.दशोरे (उप अभियंता):-</u> तुम्ही जे प्रश्न विचारले आहेत त्याची उत्तरे तुम्हाला दिलेली आहेत त्यामध्ये तुम्हाला काय अडचण आहे ते सांगा? संबंधित कार्यकारी अभियंता हे आज एक कोर्ट केस साठी मुंबईला गेले आहेत.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता बगाडे</u> :-श्री.ध्रुत साहेबांना बोलवा.

<u>श्री. दशोरे (उप अभियंता):-</u> आज एक कोर्ट केस होती त्यासाठी ते मुंबईला गेले आहेत. त्यांनी मला प्राधीकृत केले आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता बगाडे</u> :- ध्रुतसाहेब, नाहीतर हा प्रश्न पूढील महासभेत घेतला जावा.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौर साहेब, प्रश्न क्र.५३१ बाबत जे उत्तर दिले आहे.त्यात प्रभाग क्र.१६ मध्ये नोव्हेंबर ९८ मध्ये १२० टॅकर्स गेल्याचे लिहिले आहे, या उत्तरा सोबत जी यादी दिली गेली आहे. त्यामध्ये प्रभाग क्र.१६ मध्ये टॅकर्सची संख्या एकादिवशी १४ लिहिली आहे की, महिन्याची? मला वाटते एका दिवसाची ती संख्या आहे, ३१ प्रभागामध्ये जे टॅकर्स जातात. त्याची यादी मागच्या बाजूला दिली आहे त्यात प्रभाग क्र.१६ मध्ये दिवसाला १४ टॅकर्स जात असल्याचे दर्शविले आहे.

त्यानुसार आजच्या तारखेला दिवसाला १४ टॅकर्स म्हणजे महिन्याला ४२० टॅकर्स होतात. आजच्या स्थितीत प्रभाग क्र.१६ मध्ये ४२० टॅकर्स जातात अशा प्रकारे ऑफीशीयली उत्तर येथे दिले गेले आहे.

<u>मा.आयुक्त</u> :- नाही, नाही साहेब त्याचे कसे आहे?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- जे उत्तर आहे, त्याप्रमाणे, या उत्तरात प्रभाग क्रमांक दिलेले आहेत व त्यांच्या समोर, जात असलेल्या टॅकर्सची संख्या दर्शविली आहे.

<u>मा.आयुक्त :-</u> त्याच उत्तरामध्ये पूढे त्या टॅकर्सचा नंबर सुध्दा दिलेला आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :-मागच्या पेज बददल बोलतो आहे मी...

मा.आयुक्त :- मागच्या पेज वरील बरोबर आहे.

--१५--

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मागचे पेज बरोबर आहे ना? मी तेच म्हणतो आहे साहेब.

मा.आयुक्त :- मी काय म्हणतो, हे माहिनावार दिलेले आहे. १२० म्हणजे हया १२० ट्रीप्स आहेत.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- १२० ट्रिप्स महिन्याच्या आहेत ना?

मा.उपमहापौर श्री.धनंजय बोडारे हे सायंकाळी ४.१० वाजता. सभागृहातुन बाहेर पडले.

मा.आयुक्त :- एकाच टॅकरने केलेल्या.....

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- नाही नाही तसे नाही, जो ५३१ क्रमांकाचा प्रश्न आहे. त्याच्या उत्तरामध्ये असे लिहिले आहे की, प्रभाग क्र.१६ मध्ये खाली प्रमाणे टॅकर्स पोहचलेले टॅकर्स १२०, नोव्हेंबर ९८ मध्ये बरोबर आहे? नोव्हेंबर ९८ मध्ये जेव्हा शिवसेना-भाजपाची सत्ता होती व आमचे राजु जग्यासी पाणी पुरवठा समितीचे सभापती होते. त्यावेळेला प्रभाग क्र.१६ मध्ये १२० टॅकर पूरे पडत होते व आज त्याच प्रभागात दिवसाला १४ या प्रमाणे एका महिन्याला ४२० टॅकर्स जातात अशा या उत्तरावरून स्पष्ट होते. ज्या वेळेला शिवसेना भाजपाची सत्ता होती व राजु जग्याशी सभापती होते. त्यावेळेला प्रभाग १६ मध्ये फक्त १२० टॅकर महिन्याला जात होते. याचा अर्थ दिवसाला ४ टॅकर जात होते व आज प्रभाग
क्र.१६ मध्ये दिवसाला १४ टॅकर या प्रमाणे महिन्याला ४२० टॅकर्स जातात. हा नेमका काय घोळ आहे तो स्पष्ट केला जावा.

श्री. दशोरे (उप अभियंता पा.पु.वि) :- प्रभाग क्र.१६मध्ये हल्ली जात असलेल्या टॅकर्सची संख्या खाली लिहिलेली आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- १४ लिहिलेली आहे. साहेब, जरा वाचा, १४ लिहिलेली आहे, मागे बघा, मागे अ.क्र.९ प्रमाणे हल्ली दिवसाला १४ लिहिले आहे म्हणजे महिन्याला ४२० होतात.
श्री. दशोरे (पा.पु.वि):-सरासरी आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- गरज काय सरासरी काढायची? तुम्ही दिशाभुल करत आहात. प्रभाग क्र.१मध्ये --०, ३ मध्ये काही जात नाही, ४ मध्ये -१ टॅकर, प्रभाग क्र.१६ मध्ये दररोज १४ या प्रमाणे महिन्याला ४२० टॅकर होतात, उत्तर तर तुमच्या अधिका-यानेच दिलेले आहे ना हे? त्याच बरोबर हे पण दिलेले आहे की नोव्हेंबर-९८ मध्ये १२० टॅकर जात होते. डिसेंबर ९८ मध्ये १२४ टॅकर जात होते, जानेवारी ९९ मध्ये १२४ टॅकर जात होते महिन्याला? आणि आता?
श्री. दशोरे (पा.पु.वि):- जेव्हा प्रश्न दिला होता त्यावेळचे हे आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- बिल्कुल नाही, प्रश्न कधीचा आहे? गेल्या महिन्यामधील प्रश्न आहे.
श्री. दशोरे (पा.पु.वि):-२२.८.२००० रोजीचा.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- २२.८.२००० , ८व्या महिन्यातील परिस्थिती ही आहे? म्हणजे ८ व्या महिन्यामध्ये प्रभाग क्र.१६ मध्ये महिन्याला ४२० टॅकर्स जात होते म्हणजे यामध्ये कुठे तरी ...हे आहे.ज्यावेळी बजेटची चर्चा चालली होती

तेव्हा मा.आयुक्त साहबांनी हे म्हटले होते की, आम्ही पाण्याच्या टॅकर्ससाठी फक्त २० लाख रूपये ठेवू. ५ टॅकर महापालिका खरेदी करेल, या ५ टॅकरच्या



माध्यमाने प्रत्येक कॅम्पात एक एक टॅकर याप्रमाणे २० लाख पूर्ण होतील, जर आज एका प्रभागात ४२० टॅकर जातात तर २१० रूपया प्रमाणे किती बिल होते?

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-</u> मा.महापौरजी, श्रीमती.सुनिता बगाडे यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याबाबत मी सांगु इच्छितो की, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर या महिन्यामध्ये टॅकर्सची संख्या कमी झालेली आहे. १४ हा चुकीचा आकडा येथे आला आहे. प्रभाग क्र.१६ मध्ये प्रत्येक दिवशी १४ टॅकर्स जात नाहीत. माझ्या मते दोन किंवा तीन टॅकर्स असतील.... हा आकडा चुकीचा आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> अधिकारी जी माहिती देतात ती चुकीची माहिती देतात. हे जे चालले आहे ते चुकीचे चालले आहे.

<u>मा.महापौर :-</u> श्री.महाडिक, संबंधित विभागाचे जे सभापती आहेत. त्याचे म्हणणे आहे की, या आकडयामध्ये काही चुक आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- असे कसे? जबाबदार अधिकारी चूकीची माहिती कशी देतात. सन्माननिय सदस्यास चूकीचे उत्तर देतात, असे कसे? आपले प्रशासन असे कसे? महासभेमध्ये सन्माननिय सदस्यांच्या प्रश्नाला जे उत्तर
दिले जाते तेच जर चुकीचे दिले जाते तर कसे चालेल? यावर स्वाक्षरी कुणाची आहे? कार्यकारी अभियंता व इतर संबंधित सर्व लोकांच्या स्वाक्ष-या आहेत, कार्यकारी अभियंत्यानी उत्तर दिलेले आहे.

<u>मा.महापौर</u> :- माणसाकडुन कधी कधी चूक होत असते.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- प्रभाग क्र.२६ मध्ये दिवसाला १३ टॅकर दर्शविले आहेत. या हिशोबाने किती टॅकर जात आहेत. आयुक्त साहेब, तुम्ही याचा खुलासा करा, तुम्ही म्हंटले होते आम्ही फक्त २० लाख यावर खर्च करणार म्हणुन.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u> :- मा.महापौरजी, १९९८ मध्ये, तेथे टॅकर जरूर जात होते.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- नोव्हेंबर-९८ मध्ये दिवसाला फक्त ४ टॅकर जात होते असे येथे स्पष्ट उत्तर आहे. व महिन्याला १२० टॅकर जात होते.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव</u> :- आजच्या तारखेला मला वाटते तेथे फक्त दोन किंवा तीन टॅकर जातात.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडे</u> :- संपुर्ण प्रभागात ११ टॅकर येतात.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- पहा, आयुक्त साहेब हे चाललेय काय? पाण्यात पैसा चाललाय वाटत?

<u>मा.महापौर</u> :- मला जी माहिती आहे. त्यानुसार जेव्हा पासुन पाणी पुरवठा समितीच्या सभापती पदी श्री.रामभाऊ आढाव यांनी सूत्रे हाती घेतली. तेव्हापासुन कॅम्प नं ४ व ५ मध्ये त्यांनी सुधारणा घडवून आणली आहे. व श्रीमती सुनिता

बगाडे यांचे स्वतःचे असे म्हणणे आहे की, माझ्या प्रभागात आता पाणी येते, पाणी येते याचा अर्थ टॅंकरच्या फे-या कमी झाल्या, हे स्वाभाविक आहे.



<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी, आपल्याच सत्ताधारी पक्षाचे श्री.सुरेश जाधव येथे आहेत, श्री. सुरेश जाधव यांनी हे वाचले आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. मी त्यांच्याकडून माहिती घेवू इच्छितो की, त्यांच्या प्रभागात सुध्दा दिवसाला १४ टॅंकर जात असल्याचे लिहिले आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुरेश जाधव :-</u> माझ्या प्रभागात पाण्याची फारच टंचाई आहे त्यामुळे माझ्या प्रभागात दिवसाला १४ टॅंकर येतात...

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> (सुरेश जाधव)यांच्याकडे दिवसाला १४ टॅंकर येतात. प्रभाग १६ मध्ये १४ टॅंकर रोज येतात का? नक्की काय ते सांगा. मा. आयुक्त साहेब जर १४ टॅंकर दिवसाला येत असतील तर महिन्याला ४२० टॅंकर होतात.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडे</u> :- आता दिवसाला फक्त ११ टॅंकर येतात.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- आयुक्त साहेब, आपण आपले निवेदन मागे घ्या, बजेटच्या सभेत आपण म्हणाला होतात की, टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी बजेट मध्ये आम्ही २० लाखाची तरतुद केलेली आहे. त्यावेळी आपण
म्हटले होते की, आम्ही ५ टॅंकर खरेदी करू. एका कॅम्पात एका टॅंकरमार्फत पाणी पुरवठा करू अशा प्रकारे २० लाखामध्ये आमचे काम पूर्ण होईल, आता ४२० टॅंकर प्रत्येक महिन्याला एका प्रभागात नाही तर दोन-दोन प्रभागात, प्रभाग क्र.१६ व प्रभाग क्र.४३ या दोन प्रभागामध्ये दिवसाला २८ टॅंकर च्या मार्फत पाणीपुरवठा होत आहे तर प्रति महिन्याला ८४० टॅंकर फक्त या दोन प्रभागामध्ये जातात व ८४० टॅंकर पाण्याचे बील किती होईल? त्यांच्या प्रभागातील पाण्याची समस्या का सोडवत नाहीत? टॅंकर मार्फत पाणी का पुरवत आहात?

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे</u> :-समता नगरला नाही येत टॅंकर?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक:-</u>दोन प्रभागांमध्ये एका महिन्याला ८४० टॅंकर पाण्याचे जातात. याचा अर्थ काय झाला? एका प्रभागात ४२० टॅंकर? दोन प्रभागांमध्येच ८४० टॅंकर? काय करत आहात आपण? नागरिक मिळकत कर भरत आहे व आपण पाण्याच्या टॅंकरवाल्यांवर या पैशाची लुट करत आहात. हे चुकीचे आहे.

<u>मा.आयुक्त :-</u> काय चुकीचे आहे?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- येथे अधिका-यांनी जे आकडे दिलेले आहेत. दोन प्रभागात १४-१४ टॅंकर?

<u>मा.सदस्य श्री.सुरेश जाधव</u> :-मा.आयुक्त साहेब, जर नागरिक पैसे भरत आहेत तर त्यांना पाणी सुध्दा पुरविले पाहिजे म्हणुन टॅंकरनी पाणी पुरविले जात आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :-पाण्याच्या लाईनच्या माध्यमातुन हे पैसे खर्च झाले पाहिजेत. टॅंकरच्या माध्यमातुन नको तर नळाव्दारे लोकांच्या घरात पाणी मिळाले पाहिजे.

मा.सदस्य श्री. सुरेश जाधव :- तर मग आम्हाला पाण्याची लाईन टाकुन दिली जावी.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-मा.महापौरजी, टॅकरची आकडेवारी देण्यामध्ये आमच्या अधिका-यांची चुक झालेली आहे. पुढच्या महासभेत याचे आम्ही उत्तर देऊ.अधिका-यांना आम्ही सांगु.

--१८--

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे का?

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- कसे चुकीचे? चुकीचे नाही. आज प्रभाग क्र. ४३ सुध्दा इफेक्टेड आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- त्या प्रभागामध्ये १४-१४ टॅकर दिवसाला जात आहेत. मा.सभापती साहेब, प्रभाग क्र.१६ व ४३ मध्ये दिवसाला १४ टॅकर पाणी पुरविले जाते.... म्हणजे हे उत्तर चुकीचे आहे?थोडक्यात या महासभेमध्ये अधिका-यांनी दिलेली उत्तरे चुकीची असतात?

मा.महापौर :- पुढच्या सभेत याचा खुलासा करू.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- करा खुशाल.

मा.सचिव :- प्रश्न क्र.५३२ हा श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे.

प्रश्न क्र.५३२:-महापालिका स्थापनेनंतर उल्हासनगर शहरात २'' व्यासाची नळजोडणी टाकण्याची किती कामे करण्यांत आली? त्या कामांवरील एकूण अंदाजित खर्च किती?

अ) कोणकोणत्त्या ठेकेदारांनी सदर कामे केलेली आहेत? किती किती कामासाठी ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत?

ब)ठेकेदारांनी किती रक्कमेची देयके महापालिकेला सादर केली आहेत? त्यापैकी किती रकमेची देयके अदा करण्यांत आली आहेत.?

क)सदर कामामध्ये कामाच्या अंदाजपत्रकानुसारच विशिष्ट दर्जाची साहीत्त्य वापरण्यांत आले काय?

उत्तर :-महापालिका सीपनेनंतर उल्हासनगर शहरांत २ '' व्यासाची नळजोडणी टाकण्याची १२९ कामे करण्यांत आली. त्या कामावरील एकूण अंदाजित खर्च रू.८६ ,३२ ,८५६/- इतका आहे.

अ)सदर कामे दिलेल्या ठेकेदारांची नावे सोबत जोडलेल्या यादीत दर्शविण्यांत आलेली आहेत. सर्वच कामांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

ब)या कार्यालयाकडुन रू.८६ ,३२ ,८५६/- रकमेची केलेल्या कामाची देयके लेखा विभागास सादर करण्यात आलेली आहे. त्यापैकी किती रकमेची देयके अदा करण्यांत आली आहेत. या बाबतचा तपशील हया विभागाव्दारे देणे अवघड आहे.

क) होय.

मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे :- मी दुसरा प्रश्न दिला होता तो असा आहे.

श्रीमती सुनिता बगाडे यांनी प्रश्न क्र.५३२ सभागृहामध्ये यावेळी वाचुन दाखविला.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, दोन दोन इंची पाण्याची लाईन टाकण्याची इथे जी यादी दिलेली आहे. त्यामधील अनुक्रमांक ४६ , प्रभाग क्र.४६ हा माझा प्रभाग आहे.यामध्ये असे लिहिले आहे की, रविंद्र नगर चौक ते ब्लॉक सी.८० , जागृती पाडा ,उल्हासनगर-५ येथे ५० मी.मी.व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे. आनंद मजुर कामगार सहकारी संस्थेला हे काम देण्यात आलेले आहे. परंतु हे जे स्थळ दर्शविले आहे ते माझ्या माझ्या प्रभागात नाही. हे जे लिहिले आहे. जागृती पाडा ,अनुक्रमांक ४६ , प्रभाग क्र.४६ लिहिले आहे तो जागृती पाडा सुध्दा माझ्या प्रभागात नाही व रविंद्र नगर चौक ते ब्लॉक सी.८० माझ्या प्रभागात नाही. हे सगळे चुकीचे दिले गेले आहे. तुम्ही दाखवा प्रभाग क्र.४६ मध्ये जागृती पाडा कुठे आहे ते? अनुक्रमांक ४६ , प्रभाग क्र.४६ समोरच आलेला

आहे. तुम्ही हे पहा प्रभाग क्र४६ मध्ये जागृती पाडा कुठे आला आहे हे दाखवा मला?



श्री. दशोरे (उप अभियंता) हे मंचावर उभे राहून स्पष्टीकरण करू लागले परंतु ते काय बोलत आहेत हे सन्माननिय सदस्यांना ऐकू येत नव्हते.
मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंग भुल्लर :- माईक चालु करा.
श्री. दशोरे (उप अभियंता):- संबंधित जे कार्यकारी अभियंता आहेत. ते कोर्ट केस संदर्भात कोर्टात गेलेले आहेत.....

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- हे सर्व चुकीचे चालले आहे. मा.आयुक्त साहेब,कृपया याची गंभीरपणे दखल घ्या.कारण की, ४६ नंबर प्रभागात जागृती पाडा कुठेही नाही आहे.कारण माझा प्रभाग मला चांगला महित आहे. रविंद्रनगर चौक कुठेही नाही. माझा प्रभाग क्र४६ आहे त्याच्या समोर जे लोकेशन लिहिले आहे ते चुकीचे आहे, हे लोकेशन माझ्या प्रभागात नाही.

मा.सचिव :- पुढील प्रश्न घेतला जावा का?पुढील प्रश्न....
मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-याचे तुम्ही काय करत आहात? पुढील महासभेत घेणार?

मा.सचिव :- प्रश्न क्र५३३ हा श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे.
प्रश्न क्र५३३ :-दि.२५.५.२००० को संपन्न हुई स्थायी समिति की सभा मे आयत्त्यावेळी में जो बी. एम.का काम पास किया उस ठराव क्र३८ के अनुसार अबतक कितने रूपये का काम किया, शहर में कोन से रस्तों का बी.एम.का काम करने के लिए सार्वजनिक बांधकाम का नियम क्या है?

उत्तर :- दि.२५.५.२००० को संपन्न हुई स्थायी समिति सभा में आयत्त्यावेळी में जोबी.एम. का काम पास किया गया उस ठराव क्र३८ के अनुसार काम चालु किया गया था। बारीष की वजहसे अशतः कूछ काम किया गया है। जो काम किया गया है उनका बिल का भूगतान अभितक किया गया नही है। बारीष खत्म होने के बाद जहां खड्डे गिरे है उनकी दुरूस्ती पुरी होने के बाद ठेकेदारोंका भूगतान किया जाएगा। राज्य सरकार सार्वजनिक बांधकाम नियम महानगरपालिका को लागु नही है। महानगरपालिका की अलग नियमावली है उस नियमावली के अनुसार महानगरपालिका क्षेत्र में जो भी रास्ते खरोब होते है इनकी उप-अभियंता / कनिष्ठ अभियंता व्दारा निरीक्षण कराने के बाद और हालत देखने के बाद प्राकलन तयार किया जाता है। उक्त प्राकलन को स्थायी समिती सभा में मंजूरी प्रदान की जाती है। व स्थायी समिती के बैठक में जो भी निर्णय लिया जाता है। उनके अनुसार सार्वजनिक बांधकाम व्दारा काम किया जाता है। दिनांक २५.५.२००० की स्थायी समिती बैठक में ४९ रोड के खड्डे बी.एम.और ए.सी से भरने के काम के प्राकलनिय वित्तिय मान्यता प्रदान की है। और उपरोक्त काम मजदुर कामगार सहकारी संस्था को निविदा के बिना थेट संविधा के लिए मा.आयुक्त को प्राधिकृत किया गया है। यह सब कार्य स्थायी समिती बैठक में पास किए गये निर्णय के आधारपर है। महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ (२)(२)के नुसार स्थायी समितीने मा. आयुक्त को प्राधिकृत किया गया है।

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मा.महापौरजी, हा जो गोल मैदानच्या पाईप लाईनविषयी चा मी जो प्रश्न विचारला आहे. त्यावर त्यांनी उत्तर दिले आहे की, ज्यांना पण पाण्याची टंचाई असेल अशा लोकांना या पाईप लाईन वरून पाण्याची पुर्तता केली जाईल. एका त-हेने असे लिहिले आहे की, हे प्रभाग क्र६१ व प्रभाग क्र३२ यांच्या समाधानासाठी केले आहे. व दुस-या त-हेने असे उत्तर दिले आहे की, ज्यांना पण पाण्याची कमतरता असेल त्यांची पुर्तता केली जाईल. सर्वात प्रथम प्रभाग क्र. ३२ व ६१ मधील पाणी टंचाई दुर केली जावी. त्यानंतर आपण हा विचार करा की, ज्यांना पाण्याची टंचाई आहे. त्यांना या

पाईप लाईन वरून पाणी पुरवठा केला जाईल. या लाईनला ब्रॉच लाईन टाकली गेली नाही. ज्या



त-हेने ही पाईप लाईन टाकली गेली होती तीच्या वरूनच ज्याला पाहिजे तेथुन अर्ध्या इंचाची पाईप लाईन टाकली गेली. त्यानंतर पाणी पुरवठा विभागाचे सभापती श्री. आढाव साहेब हे आमच्या प्रभागात आले होते. त्यांनी या समस्येचे समाधान केले होते. समस्येचे समाधान झाल्यानंतर आयुक्त साहेब स्वतः ,पोलीस कर्मचा-यांना बरोबर घेऊन येथे आले होते व त्यांनी येथील सर्व नळ जोडण्या तोडुन काढल्या, माझ्या हे लक्षात येत नाही की, हे लोक एक तर ब्रॉच लाईन टाकत नाहीत. व लोकांनी घेतलेल्या नळ जोडण्या तोडुन काढतात. या लोकांनी एकतर ब्रॉच लाईन टाकुन दिली पाहिजे. स्थायी समितीत तसे पास करून घेतले पाहिजे किंवा महासभेत पास करून घेतले पाहिजे होते. परंतु अशा प्रकारे उत्त्तर दिलेले आहे की ज्यांना पाणी टंचाई असेल त्यांना या लाईन वरून पाणी पुरवठा केला जाईल. प्रश्न व त्याचे दिलेले उत्त्तर हे मला समजुन येत नाही. कृपया आपण त्याचे स्पष्टीकरण करावे.

<u>मा.महापौर :-</u>एम.आय.डी.सी. कडुन ही जी ६ इंचाची लाईन घेतली आहे. ही लाईन १९९७ मध्ये जेव्हा श्रीमती.ज्योती कालानी हया नगराध्यक्षा होत्त्या. त्यावेळी हा प्रस्ताव तयार केला गेला होता. दुर्दैवाने त्या कामास उशीर झालेला आहे. हा जो प्रस्ताव होता तो पूर्ण गोलमैदानाच्या परिसरासाठी आहे. कोणत्त्याही एका प्रभागासाठी नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-</u> येथे तसा उल्लेख केला गेला आहे. व मी आपणांस हे नाही विचारले की, हा प्रस्ताव केव्हा तयार केला गेला होता. व त्याची कार्यवाही कधी झाली?महापौर साहेब, आपण सभागृहाची दिशाभुल करू नका. मी आपणांस हे नाही विचारले की, प्रस्ताव कधी समंत झाला होता? श्रीमती. ज्योती कालानी यांनी केले असेल, कार्यवाही करण्यासाठी प्रयत्त्न कुणी केले? तुम्ही कृपया सभागृहाची दिशाभुल करू नका.
<u>मा.महापौर :-</u> मी आपणांस त्या प्रस्तावाची पार्श्वभुमी सांगु इच्छितो.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-</u>मी येथे पार्श्वभुमी विचारलेली नाही. मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्त्तर दया. मी पार्श्वभुमी विचारलेली नाही. महापौर, तुम्ही नेहमी पार्श्वभुमी सांगत असता. जर पार्श्वभुमीची जरूरी आहे, काम झाले असेल तर आम्ही प्रश्न विचारलाच असता कशाला?

<u>मा.महापौर :-</u> आपणांस समजावून सांगण्यासाठी पुर्ण पार्श्वभुमी सांगणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :- मला समजवण्याची आवश्यकता नाही याबाबतीत, मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे मला उत्त्तर दया.

<u>मा.महापौरः-</u> त्याचेचे उत्त्तर देत आहे. गोलमैदानचा पुर्ण परिसर कव्हर करण्यासाठी या लाईनचा प्रस्ताव तयार केला होता. व हे सुध्दा लक्षात घेतले गेले होते की, या लाईन वरून ज्या थेट नळ जोडण्या घेतल्या जात होत्त्या त्या घेतल्या जाऊ नयेत. तीन इंचाची ब्रॉच लाईन टाकली पाहिजे त्यावरून कुणालाही अर्ध्या इंचाची नळ जोडणी घेता येईल. मी आपणांस हे सांगु इच्छितो की, ज्या लोकांनी या लाईन वरून अनाधिकृत नळ जोडण्या घेतल्या होत्त्या. याबाबत माझ्याकडे काही तक्रारी आल्या होत्त्या त्याबददल मी आयुक्तांना स्वतः सांगीतले होते.
<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :- कुणाची तक्रार आली होती?

<u>मा.महापौर :-</u> शेजारील विभागातील, संबंधित प्रभागातील....

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :-ही सुध्दा तक्रार आली असेल की, आमच्या नळ जोडण्या तोडल्या गेल्या आहेत. पूर्वी घेतलेल्या अधिकृत नळ जोडण्या व मा.सभापती महोदयांनी सांगीतल्या नंतर घेतलेल्या नळ जोडण्या अशा प्रकारे दोन्ही प्रकारच्या नळ जोडण्या तोडल्या गेल्या आहेत.

<u>मा.महापौर :-</u> ६ इंची पाईप लाईन टाकल्यानंतर त्यावर ज्या अनाधिकृत नळ जोडण्या झाल्या होत्त्या....

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :-किती अनाधिकृत नळ जोडण्या होत्त्या?

<u>मा.महापौर :-</u> माझ्या मते लाईन टाकण्याचे काम अदयाप पूर्ण सुध्दा झालेले नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> पाईप लाईन सुरू सुध्दा झाली आहे. मला येथे उत्तर काय दिले गेले आहे? गोल मैदान जवळ जी ६ इंचाची पाईप लाईन टाकली आहे ती प्रभाग क्र३२ व ६१साठी, बरोबर गोष्ट आहे? येथे स्पष्टपणे

खुलासा केलेला आहे. आणि प्रथम प्रभाग क्र. ६१ व ३२ ला पाणी पुरवठा केला जावा. त्यानंतरच इतर प्रभागांना पाणीपुरवठा केला जावा. जर प्रभाग ३२ व ६१ मध्येच पाण्याची कमतरता आहे, तेथेच पाण्यासाठी लोकांमध्ये हाहाकार माजला आहे. तर येथे कसे दिले आहे? की, बाकी दुस-या प्रभागात पाणी पुरवठा केला जाईल म्हणुन? अशाप्रकारे करता? त्या लाईन वरून जोडण्या घेतल्या जातील, आपण म्हणाल आम्ही आपणांस उत्तर दिले आहे ना? जेथे पाणी पुरवठा होत नाही अशा ठिकाणी आम्ही पाणी पुरवठा करू म्हणुन, अशा प्रकारे जर या लाईन वरून सर्वांनाच पाणी पुरवठा करू लागलात तर मग आम्ही का प्रयत्न करायचे? की, गोल मैदान विभागात पाणी नाही. रोज आम्ही कागदपत्र घेऊन फिरत रहायचे, कधी चिजवानी साहेबांकडे, काहीवेळी सभेच्या कार्यसुचीवर हा विषय आणत असतो. काही वेळा सदस्यांना सांगत असतो की, हा प्रस्ताव पास करून दया. जनतेची ही समस्या आहे. नाहीतर आम्ही प्रयत्नच केले नसते. जे आहे तेच स्विकारले असते.

<u>मा.महापौरः</u>- हे पहा, ही जी लाईन आहे ती पूर्ण गोलमैदान परिसरासाठी आहे. व या लाईनला १८ तास पाणी असते. कारण की, ही लाईन एम.आय.डी.सी च्या मेन लाईनवरून घेण्यात आलेली आहे. ज्या लाईनला १८ ते २० तास पाणी आहे त्या लाईनवरून ही लाईन घेण्यात आलेली आहे. आणि मी असे समजतो की, आपण पूर्ण गोल मैदान परिसराला कव्हर केले तरी पाण्याचा दाब कमी होणार नाही असे मला वाटते.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u>मा.महापौर साहेब, मी असे नाही म्हंटले की, गोलमैदानलाच पाणी मिळाले पाहिजे तर पुर्ण शहराला पाणी मिळाले पाहिजे. परंतु ज्यांनी याकामी मेहनत घेतलेली आहे, याकामी प्रयत्न केले आहेत, ज्यांच्या प्रभागाचा त्यात उल्लेख आलेला आहे. प्रथम त्यांना तर दया. ज्यांना दोन-दोन, तीन-तीन महिने पाणी येत नाही त्यांना तर प्रथम पाणी दया.

<u>मा.महापौर :-</u>त्यांना तर देऊच.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- कुठे दिले आहे? त्यांच्या नळ जोडण्या तोडून आला आहात. कुठे दिले आहे?

<u>मा.महापौर</u> :- अशा प्रकारे अनाधिकृत नळजोडणी कुणी घेतली असेल तर वेगळी गोष्ट आहे. अधिकृत नळ जोडणी तोडण्याचा तर प्रश्नच उदभवत नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> महापौर साहेब आपण याचा उल्लेख करा की, अधिकृत नळ जोडण्या किती व अनाधिकृत नळ जोडण्या कीती? आपण उल्लेख करता?

<u>मा.महापौर :-</u> किती त्याची गोष्ट नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> आपण कसे म्हणता अनाधिकृत म्हणुन? आपण अंदाजाने बोलत आहात ना? येथुन रोज नव-नवीन पाईप लाईन टाकुन पाईप लाईन पुढे पुढे नेली जात आहे. तर गोलमैदान येथील पाण्याची समस्या तर सुटू शकणार नाही.

<u>मा.महापौर</u> :- जी लाईन अदयाप सुरू केली गेली नाही त्या लाईनवर जर कुणी अनाधिकृत नळजोडणी घेत असेल तर त्यावर कार्यालयाकडुन कार्यवाही ही होणारच.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-जेव्हा ही पाईप लाईन टाकली गेली तेव्हा या लाईनवर जर सहा ब्रॅच लाईन टाकल्या असत्त्यातर ही समस्या निर्माणच झाली
नसती. त्यावर किती ब्रॅाच लाईन दिलेल्या आहेत याचा उल्लेखच केलेला नाही. हे बरोबर आहे का? ज्यांना पाण्याची टंचाई आहे अशा लोकांची पाण्याची समस्या सुटल्या पुर्वीच त्यांच्या नळ जोडण्या कापुन टाकल्या जात आहेत. आपण अशा प्रकारचे आदेश काढा की, त्या लाईनवरून ज्यांनी नळजोडण्या घेतलेल्या आहेत त्यांच्या नळजोडण्या तोडल्या जाणार नाहीत.

<u>मा.महापौर :-</u> मी असे समजतो की, याबददलची माहिती संबंधित विभागाचे प्रमुख किंवा संबंधित विभागाचे सभापती हेच देऊ शकतील.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u>सभापती साहेबांशी माझी चर्चा झाली होती, माझ्या प्रभागातील लोक पण त्यांच्याकडे आले होते. बरीचशी चर्चा झाली होती. त्यांनी म्हटले होते की, या नळजोडण्या तोडल्या जाणार नाहीत. परंतु त्यांचा निर्णय झाल्यानंतर सुध्दा नळ जोडण्या तोडल्या गेल्या आहेत. आपण सभापती साहेबांना विचारा.

<u>मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-</u> मा.महापौरजी, त्या लाईनवर ५८ नळ जोडण्या झाल्या होत्त्या. व आज सुध्दा आहेत. त्या एक्सप्रेस लाईनचा उददेश हा होता की, सी ब्लॉक पासुन गोल मैदान, मधुवन सोसायटी पर्यंत थेट पाईप लाईन टाकुन तेथुन ब्रॅच लाईनने सर्वांना पाण्याचे वितरण करण्याची व्यवस्था पाणी पुरवठा विभागाने आखली होती. परंतु त्यामध्ये काय झाले? यामध्ये स्वारस्थ्य असलेल्या आमच्या काही नगरसेवकांनी या 'एक्सप्रेस लाईनलाच पंक्चर केली' नगरसेवकांनी केले की लोकांनी केले त्यानंतर श्री. कुमार आयलानी व श्रीमती.सुनिता राजवानी यांच्याशी आमचे सविस्तर बोलणे झाले. त्यानंतर ब्रॅच लाईन असुन सुध्दा त्यावर अर्ध्या इंचाच्या नळ जोडण्या घेण्याचे ठरले होते. परंतु ते होऊ शकले नाही. आज तेथे एम.आय.डी.सीने तीन इंचाची बोरींग करून दिलेली आहे. ती लाईन एक-दोन दिवसात पूर्ण होइल व पुढे आपणांस पाण्याची टंचाई येणार नाही. परंतु एक्सप्रेस लाईन आपण पंक्चर करू नका त्यामुळे आपणासच त्रासाचे होणार आहे. त्यावर अनाधिकृत नळ जोडण्या झाल्या होत्त्या. म्हणुन त्या हटविल्या गेल्या.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानीः-</u> ही एक्सप्रेस लाईन आपण कुणास म्हणत आहात हे मला समजले नाही. हि एक्सप्रेस लाईन कोणती आहे?

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-एम.एस.लाईन टाकण्याचा अर्थ काय होतो? ते सांगा आपण?

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी:-मला समजत नाही म्हणुनच तर विचारते आहे. मला तांत्रिक भाषा समजत नाही.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :-येथे जे पदवीधारक इंजिनिअर आहेत. त्यांनीच ही लाईन पंक्चर केली आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- होऊ शकते तांत्रिक शब्द मला माहित नाही. आपण त्या विभागाचे सभापती आहात तांत्रिक शब्द आपणांस माहित आहेत. एक्सप्रेस लाईनने पूर्ण गोल मैदान विभागात पाणी येईल काय? आमच्या प्रभाग क्र.३२ मधील पाण्याची तर प्रथम पूर्तता करा ना? तेथे ज्या नळ जोडण्या घेतल्या होत्त्या, आपण म्हणाला होतात ना की, त्या राहू दया म्हणुन?

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- त्या लाईनवर त्या नळ जोडण्या नव्हत्त्या. जुन्या लाईन वरच्या नळ जोडण्या तोडलेल्या नाहीत.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- मा.महापौरजी,....

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- महापौर साहेब, माझे बोलणे पुर्ण होऊ दया. मा.महापौर, आपण हे कसे करत आहात? दोन सदस्यांना एकाच वेळी बोलण्यास परवानगी देता? माझे समाधान झाल्यानंतर जेव्हा मी खाली बसेन त्यानंतरच दुस-यास बोलु दिले जावे. माझा प्रश्न आहे. श्री. आढाव साहेबांच्याशी संबंधित आहे. जे पाणी पुरवठा विभागाचे सभापती आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा.महापौर साहेब,जेव्हा सुनिता बगाडेंचा प्रश्न होता. तेव्हा श्री.महाडिक साहेब त्यावर बोलु शकतात? जर सुनिता राजवानी यांचा प्रश्न असेल तर कुणी बोलु शकत नाही? असे काही आहे का?

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- त्यांनी उपप्रश्न विचारला होता. अधिका-यांनी उत्तरामध्ये जे चुकीचे आकडे दाखवले होते त्यावर ते सभागृहाचे लक्ष वेधीत होते.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.सदस्या श्रीमती सुनिता बगाडे यांचे बोलणे झाल्यानंतर मा.महापौर साहेब मी आपली परवानगी घेऊन उपप्रश्न विचारला होता. परंतु हे तर आता बोलत आहेत.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- त्यादिवशी आमची दिड-दोन तास त्याविषयावर आमची चर्चा चालली होती, माझ्या प्रभागातील काही लोक त्यावेळी आले होते. त्यावेळी मा.सभापती महोदय उपस्थित होते व त्यांनी निर्णय घेतला होता.
सभापती आणि माझी चर्चा चालु आहे, कृपया आपण खाली बसा.व सभापती महोदयांना बोलु दया. मी खुलासा केला आहे ना?

मा.महापौर :-श्रीमती. सुनिता राजवानी मॅडम आपण आपले बोलणे पूर्ण करा. म्हणजे दुस-या सदस्यास बोलण्यास परवानगी देता येईल.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-महापौर साहेब, जेव्हा सभापती साहेबांनी आदेश दिला होता की, ज्या लोकांनी दोन इंच व्यासाची नळ जोडणी घेतली आहे त्यांचे समाधान केले जाईल. परंतु त्या मिटिंगच्या नंतर ज्यांनी दोन इंच व्यासाच्या नळ जोडण्या घेतल्या त्यांच्या त्या नळ जोडण्या तोडल्या गेल्या, तर मग सभापतींनी आमच्या बरोबर तो निर्णय कसा घेतला? यांनी आदेश कसे दिले? त्यावेळी त्यांच्या बरोबर पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी सुध्दा होते. श्री. धुत व इतर अधिकारी त्यांच्याबरोबर होते. जेव्हा सभापती म्हणतात की,जेथे आवश्यक आहे तेथे दोन इंच व्यासाची नळ जोडणी दिली जावी. त्यानंतर एका आठवडयातच त्या नळजोडण्या तोडण्यासाठी आले. हे कसे होते? सभापती निर्णय घेतात व त्यानंतर अधिकारीगण त्या नळजोडण्या तोडण्यासाठी जातात. तेच अधिकारी जे सभापती बरोबरच्या त्या दिवसाच्या सभेत उपस्थित होते. त्यांनी मला उत्तर तर देऊ दया?

मा.सदस्य श्री रामभाऊ आढाव :- मॅडम आपला गैरसमज झालेला आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- गैरसमज नाही झाला. जो आपण निर्णय घेतला होता तो आम्ही मंजुर केला होता मग निर्णयाच्या विरूध्द का गेलात?

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- ५८ नळ जोडण्या तोडल्या, त्यानंतर कुठे नळ जोडण्या तोडल्या आहेत?

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- त्याच दिवशी आपण त्या नळ जोडण्या मोजल्या होत्त्या. मोजल्या नंतर, आपला तो निर्णय आम्हाला मंजुर होता. त्यावेळी श्री.कुमार आयलानी सुध्दा उपस्थित होते. तो निर्णय मंजुर झाल्यानंतर नळ जोडण्या तोडण्याची पाळी का आली?

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- माझा व आपला जो निर्णय झाला त्यानंतर कोणत्त्याही नळ जोडण्या तोडण्यात आलेल्या नाहीत.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- बिल्कुल, त्यानंतर सुध्दा नळ जोडण्या तोडल्या आहेत. तेव्हा मी येथ नव्हते, मुंबईला गेले होते. मला मुंबईला फोन आला आपणांस माहित असेलच की, मी मुंबईला कुठे होती? आता तुम्हाला मी चुक की बरोबर हे कसे पटवून देऊ. प्रभागातील लोकांना घेऊन येऊ? ठिक आहे प्रभागातील लोकांना घेऊन येते व पटवून देते की, तो निर्णय झाल्यानंतर नळ जोडण्या तोडल्या आहेत.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- एक्सप्रेस लाईनचा जो उददेश होता तो उददेश आपण साध्य करू दिला नाही.

मा.महापौर :- मॅडम, सभापतींनी म्हंटले आहे की, आपणांस त्यांनी जे आश्वासन दिले त्यानंतर कोणत्त्याही नळ जोडण्या तोडण्यात आलेल्या नाहीत.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- दुःख या गोष्टीचे आहे की, आश्वासनानंतरच नळ जोडण्या तोडण्यात आलेल्या आहेत. प्रभागातील लोकांना मी घेऊन येते व आपणांस सिध्द करून देते. जर त्या नळ जोडण्या तोडल्या असतील तर पुन्हा जोडल्या जाऊ शकतात? मी त्यांना घेऊन येते आपण त्यांना सांगा.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- ठिक आहे. घेऊन या?

मा.सचिव :- प्रश्नोत्त्तराची वेळ संपली आहे.

मा.महापौर :-श्री. कुमार आयलानी आपण बोलु इच्छित असाल तर कृपया दोन मिनिटात बोला.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- मा.महापौर......

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-माझा प्रश्न पुर्ण झाला नाही तरी यांना कुठे मध्येच बोलण्यास परवानगी दिली?

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- मी आपल्या फायदयासाठीच बोलत आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तराची वेळ संपल्यानंतर आम्हाला सुध्दा बोलण्यास परवानगी दिली जावी.

मा.उपमहापौर श्री. धनंजय बोडारे हे सायंकाळी ४. ४५ वाजता पून्हा सभागृहात आले.

मा.महापौर :- ते तुमच्या म्हणण्याला दुजोराच देत आहेत.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- आमचे एक दुस-याला सहकार्य आहेच. प्रभाग क्र.६१ व ३२, मी प्रभाग क्र.३२ वर वेगळे काही बोलत नाही. प्रभाग क्र. ६१ व ३२ या दोन्ही प्रभागांबददल बोलत आहे. श्री. कुमार आयलानी यांचा प्रभाग वगळुन मी बोलत नाही. ३२ बाबत तर मी बोलतच आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २०.१०.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- इतिवृत्तांतात दुरूस्ती करणे बाबत मी बोलत आहे. मी ४९५ क्रमांकाचा जो प्रश्न विचारला होता. त्याबाबत महापौरांनी जे उत्तर दिलेले आहे की, दि.१८.७.९९ च्या सर्वसाधारण महासभेमधील चर्चेनुसार सद्यस्थितीतील अनाधिकृत बांधकामे प्राधान्य देऊन तोडण्यात यावीत असे ठरलेले आहे. व त्यानुसार सदरचे बांधकाम हे ९८चे असल्यामुळे कार्यवाही करण्यात येत नाही. महासभेमधील चर्चेनुसार म्हंटलेले आहे. त्यावेळी स्थायी समिती हॉल मध्ये चर्चेअंती असे ठरले होते, महासभेमध्ये ठरले नव्हते. अशी दुरूस्ती केली जावी.

मा.महापौर :- दि.२०.१०.२००० रोजीच्या इतिवृत्तांतात मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे यांनी सुचविलेली दुरूस्ती करून सदरचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- :- आंतरशालेय क्रिडास्पर्धा महोत्सव आयोजित करणे कामी पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीचा दि. २४.१०.२०००रोजीचा ठराव क्र.५ कायम करणे बाबत.

प्रस्तावना :-

माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती उल्हासनगर महानगरपालिका तर्फे महापालिकेच्या ३० शाळेतील व शहरातील अनुदानीत माध्यमिक ३५ शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव

मिळणेसाठी तसेच त्यांना प्रोत्साहनासाठी व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार दरवर्षी क्रिडा स्पर्धा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

सालाबाद प्रमाणे यावर्षी ही दि. २७ नोव्हेंबर २००० ते २ डिसेंबर २००० पर्यंत क्रिडा स्पर्धा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. सदरच्या स्पर्धा महानगरपालिकेच्या मालकीचे व्ही.टी.सी.मैदान, उल्हासनगर४ येथे आयोजन करावयाचे असुन स्पर्धासाठी लागणारे साहित्य खालील प्रमाणे. निमंत्रण पत्रिका उदघाटन व बक्षिस वितरण, बॅनर, नारळ पुष्पगुच्छ,हार, शाल, प्रमाणपत्र, शिल्ड, फोटो दररोज ६० तसेच उदघाटन व बक्षिस वितरणाचे फोटो अंदाजे २०० प्रतिदिन, व्हिडिओ सुटींग दररोज दोन कॅसेट (खेळसुरू असतांना) लाईट व्यवस्था, साऊंड सिस्टीम, ६ दिवसासाठी, मेगनेट सजावट (उत्कृष्ठ प्रकारे)६ दिवसासाठी ३० x ४० मोठा स्टेज मंडप झालरसह ६ दिवसासाठी (उत्कृष्ठ प्रकारे) स्टेजच्या दोन्ही बाजुस शिक्षकवर्ग व खेळात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना सावलीत बसण्यासाठी १० x २०चे दोन मंडप, उदघाटनाच्या दिवशी स्टेज समोरील मैदानात आलेले पाहुणे, नगरसेवक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी यांना बसण्यासाठी २० x ३० मंडप १ दिवसासाठी मैदानांच्या बाजुला साईड परदे, सहा दिवसासाठी, स्टेजवर ३० x ४० चे कारपेट उदघाटनाच्या दिवशी व बक्षिस वितरणाच्या दिवशी ६००--६०० प्लास्टीक खुर्च्या, १० व्ही.आय.पी. खुर्च्या, डनजप खुर्च्या ३० व दररोज २०० खुर्च्या प्लास्टीक, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कॅप व टिशर्ट, ॲप्रन, प्रिन्टसह, खेळाडूंना लेमन गोळया ५० किलो, ६ दिवसासाठी, पंच व कर्मचारी साठी चहा, सकाळ संध्याकाळ व जेवण दुपारचे अंदाजे ५० जनांचे ७ रंगाचे कापडी मोठे झेंडे व मैदानाच्या तीन बाजुस रंगीबेरंगी २०० कापडी झेंडे काठीसह, पंचाना गुणपत्रक लिहिण्यासाठी पॅड व पेन तसेच विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र लिहिण्यासाठी ५ पेन चांगल्या प्रकारचे, स्वाक्षरीचे रबर स्टॅप ४ नग रिबीन, गॅस फुगे, क्रिडा ज्योत व त्यामधील साहित्य, लांबउडी साठी भुसा १०० गोणी, मैदान आखण्यासाठी चुना १०० गोणी, मैदान बनविण्यासाठी लालमाती टाकणे, अंदाजे २० ट्रक, पंचासाठी शिटी, स्काऊडदोरी सह (उत्कृष्ठ प्रकारचे) मैदान आखण्यासाठी लाईन दोरी सफेद सुती १०० मीटर, खीळे, मीटर, टेप (५० मिटर)थाळी फेंकसाठी १ किला व १ १/२ किलोचे थाळी, गोळा फेक आणि ८ पाऊंड, स्केचपेन, हातोडी २ नग गोटया चमचे, स्किंपींगरेस ३ डझन स्ऑप वॉच, ६ नगर रिलेसाठी बॅटन २ डझन, खो--खो साठी खुंट ६ नग, २ नगर कलापर मार्च पास साठी खेळात भाग घेण्या-या शाळेचे बोर्ड नावासह पंचाना मानधन देणे सहा दिवसाचे इत्यादी.

उपरोक्त महोत्सवात अंदाजित खर्च रूपये २,४८,०००/- असुन येणारा खर्च महापालिकेच्या अर्थसंकल्पातील "अ"अंदाजपत्रक लेखाशिर्ष (II)माध्यमिक शिर्षक या शिर्षाच्या खाली केलेल्या २० लाख रूपयेच्या तरतुदी मधुन करावयाचा आहे. मागील वर्षी प्रत्यक्ष झालेला खर्च व सध्याची भाववाढ लक्षात घेऊन हा खर्च अंदाजित केलेला आहे. प्रत्यक्ष दरपत्रक पुरवठादाराकडून मागवून होणारा खर्च निश्चित केला जाईल.

तरी उपरोक्त क्रिडा महोत्सवास व त्यानिमित्त होणा-या एकुण अंदाजित खर्च रूपये २,४८,०००/- यास मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती ठराव क्र.५ दि. २४.१०.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. देवेंद्रसिंग खेमाणी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. सेवलदास ठाकुर.

ही पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती दि. २७ नोव्हेंबर २००० ते २ डिसेंबर २००० पर्यंत महापालिकेच्या ३० शाळेतील व शहरातील अनुदानित ३५ शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धा महोत्त्सव व्हि.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स उल्हासनगर४ येथे आयोजित व कार्यान्वीत करणेस तसचे अनुषांगिक कार्यक्रम खर्च रू.२ ,४८ ,०००/- यास महासभेच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती
उल्हासनगर महानगरपालिका.

---

सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१८ दिनांक :-२२.११.२०००

सुचकाचे नाव :-श्री. जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.सुभाष मन्सुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीचा दि.२४.१०.२००० रोजीचा ठराव क्र.५ कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, गोषवा-यामध्ये चार रस्त्यांच्या डांबरीकरणाचा समावेश आहे. हे चार रस्ते कोणते आहेत. त्याची आम्हाला माहिती हवी आहे. एम.एम.आर.डी.ओ. कडुन कर्ज घेऊन ज्या चार रस्त्यांचे डांबरीकरण

करण्यात येणार आहे. ते चार रस्ते कोणते? गोषवा-यामध्ये जे चार रस्ते दिले आहेत. त्यांच्यासाठीच कर्ज लागु होणार आहे. की, शहरातील सर्व रस्त्यांसाठी?

<u>मा.आयुक्त :-</u> पुर्ण शहरातील रस्त्यांसाठी लागु होईल.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- ते चार रस्ते कोणते? त्याची माहिती हवी आहे.

<u>मा.आयुक्त:</u>- मानेरा ते लालचक्की, शांतीनगर ते पवई जंक्शन, यु.एम.सी. ते शहाड, चोपडा कोर्ट ते गोल मैदान.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :-ठिक आहे. यानंतर मा.महापौरजी, आताच जे इतिवृत्त कायम झाले त्या इतिवृत्तानुसार जर आयुक्त साहेबांनी, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याचा प्रस्ताव येथे आणला असेल तर तो ठराव आम्ही मंजुर करू. परंतु मागच्या दि. २०.१०.२००० रोजीच्या महासभेच्या इतिवृत्तातातील पान क्र. ३ वर अशी नोंद आलेली आहे की, श्री.सेवलदास ठाकुर हे सभागृहात पेढे वाटत असताना मा.महापौरांनी असे म्हंटले होते, ती वाक्ये मी वाचुन दाखवितो. महापौर म्हणतात श्री. सेवलठाकुर यांनी असे सांगीतले की, महाराष्ट्रातील लोकशाही आघाडी सरकारने मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व मा.श्री. छगन भुजबळ यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारने एक वर्षाचा कार्यकाल पुर्ण केला आहे. या वर्षात सर्वात मोठे जे कार्य झाले आहे ते मी सदनाला सांगु इच्छितो. यापूढे आपण असे म्हणत आहात, कालच मला मा.गृहराज्य मंत्री यांच्याकडुन हे माहित पडले आहे. त्यांनी मंत्रालयात जी सभा घेतली त्यात १ जानेवारी १९९५ पर्यत महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणारी जी पण अनाधिकृत बांधकामे आहेत. ती इमारत असो, झोपडी असो घर असो त्यांना डिमोलेशन नकरण्याचे सरकारने निर्णय घेतला आहे. व त्यांना नियमित करण्याचा निर्णय देखिल सरकारने घेतला आहे. मागील महिन्याच्या २० तारखेच्या सभेत मा.महापौरांनी या सभागृहात उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील असे घर असो, झोपडे असो, वा इमारत असो.त्याचे निष्काशन केले जाणार नाही. व या गोषवा-यामध्ये रस्त्यात बाधीत होणारी बांधकामे हटविण्यासाठी याच महासभेत नगरसेवकांकडुन, महापौरांकडुन आपण अप्रत्यक्षपणे परवानगी मागत आहात. हा जर ठराव आपण मंजुर केला तर मा.महापौरांना गृहराज्यमंत्री महोदयांनी जे सांगीतले जे इतिवृत्तांतात आलेले आहे. मी माझ्या मनाचे सांगत नाही. जे येथे आलेले आहे. मा.महापौर, आपण यावर खुलासा केलात तर योग्य होईल.

<u>मा.आयुक्त :-</u> मी सांगत आहेच ना, लेखी आलेले आहे. लेखी आदेश आल्यानंतर...

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> आपणांस लेखी आदेश आहेत. परंतु येथे मा. महापौरांनी म्हंटले आहे की, मा.गृहराज्यमंत्री यांचेकडुन असे माहित पडले आहे की, मंत्रालयात जी सभा झाली त्यात १ जानेवारी १९९५ पर्यंतची महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणारी,म्हणजे रस्त्यावर येणारी घरे, दुकाने असतात. या शब्दाचा अर्थ असा आहे की, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, जे रस्ते आहेत ते महापालिकेच्या कार्यक्षेत्रातच येतात.

<u>मा.महापौर :-</u>श्री. महाडिकजी,मी सभागृहात जी माहिती दिली होती, ती या आधारावर दिली होती की,मा. गृहराज्य मंत्री महोदयांनी आम्हाला असे सांगीतले की,कॅबीनेट मध्ये असा निर्णय झाला आहे की,उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात किंवा आजुबाजुला ज्या महानगरपालिका आहेत, मुंबईच्या आसपास, त्यांच्या बाबतीत असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, १.१.९५च्या पूवीची जी पण काही बांधकामे असतील,या पूर्वी शासनाची जी अधिसुचना होती ती विशेषतः झोपडपट्टी

साठीची होती की, जेणेकरून त्या तोडल्या जाऊ नयेत. त्याचा विस्तार करून त्यांनी आता असा निर्णय घेतला आहे की आर.सी.सी.बांधकाम असले तरी भले ते रहिवासी वापरातील असो किंवा व्यावसायिक वापरातील असो. १.१.९५ पूर्वीचे जर ते असेल तर ते तोडले जाणार नाही,सरकारकडुन अशा बांधकामांवर दंड आकारून किंवा इतर दुसरी काही कार्य पध्दती अवलंबुन ही बांधकामे नियमित केली जातील. नगररचनेयोजनामध्ये जे बाधीत होतात ती बाधंकामे वगळून...

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- आताच आपण जे इतिवृत्त कायम केले. त्यात असे स्पष्ट लिहिले आहे की, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणारे जे पण अनाधिकृत बांधकाम, मग ते इमारत असो, झोपडी असो, घर असो. त्यांचे निष्कासन न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आता जे इतिवृत कायम केले त्यामध्ये अशीच नोंद आलेली आहे.

मा.महापौर :-जर ते नगररचनेयोजनामध्ये बाधित होत नसेल तर ......

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- तर इतिवृत्तांतात तसे आले पाहिजे. सरकारने हा जो निर्णय घेतला आहे, त्यामध्ये विकास आराखडयामध्ये बाधित होणारी बांधकामे गृहित धरली जाणार नाहीत.

मा. महापौर :- मी, सभागृहामध्ये असे सर्वसाधारण वक्तव्य केले होते याचा अर्थ हा नाही की, जी बांधकामे विकास आराखडयात बाधित होतात ती तोडली जाणार नाहीत.

मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- आपण आपले सरकार कसे चांगले आहे, हे दर्शविण्यासाठी सभागृहाची दिशाभुल करत आहात.

मा. महापौर :- दिशाभुल करण्याचा काही प्रश्न नाही.
मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- येथे असे स्पष्ट लिहिले आहे की, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणारे घर असो, इमारत असो, झोपडे असो ते तोडले जाणार नाही. आपल्या सरकारचा असा निर्णय असल्याचे गृहराज्य मंत्री महोदयांनी म्हंटल्याचे आपण सांगीतले आहे. परंतु आयुक्त साहेब येथे या दुस-या सभेत असा प्रस्ताव आणतात की, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी सभागृहाची परवानगी पाहिजे. तर आम्ही काय समजायचे? सभागृहात सन्माननिय सदस्यांना महापौर एक सांगतात तर पुढच्या सभेत मा. आयूक्त साहेब दुसरा ठराव आणतात. तो मंजुर करण्यासाठी परवानगी मागतात. तर मग आम्ही काय करायचे? महापौर मंत्रीमंडळाचा जो निर्णय सांगतात तो मानायचा की, आयुक्त साहेब रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याबाबत सभागृहाची जी परवानगी मागतात. ती दयायची का?

मा.महापौर :- हा जो प्रस्ताव आणला आहे. तो या शहरामध्ये ३३ रस्त्यांचे नुतनीकरण ,रूंदीकरण व सुशोभिकरण करण्याकामी महासभेने जो ठराव पारीत केला होता. व त्याकामी जो निधी लागणार आहे. एम.एम.आर.डी.कडुन याकामी कर्ज मिळविण्यासाठी आम्ही जे प्रयत्न केले त्यानुसार दहा कोटी रूपये मंजुर सुध्दा झाले आहेत. व दुस-या टप्यातील दहा कोटी सुध्दा मंजुर झाले आहेत. परंतु मुख्य सचिवांचे असे म्हणणे होते की, रस्ते तयार झाल्यानंतर सुध्दा त्या रस्त्यांवर जे बेकायदेशिर अतिक्रमण राहते भले ही ते बेकायदेशिर पार्कींगचे असो , हातगाडीवाल्यांचे असो, बेकायदेशिररित्या चालविल्याजाणा-या गॅरेजचे असो अशाप्रकारे जी काही अतिक्रमणे असतील ती हटविण्यासाठी आयुक्तांचे त्यांना आश्वासन हवे आहे. त्याचबरोबर निवडुन आलेले जे लोक प्रतिनिधी आहेत. त्यांची सुध्दा संमती हवी आहे. हे त्यासाठी आहे. हा जो ठराव आपण करत आहोत तो फक्त यासाठी आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौरजी, आयुक्त साहेबांकडुन मी हे जाणु इच्छितो की, ३३ रस्त्यांमध्येच पहिला टप्पा, दुसरा टप्पा आहे की, जे ४३ रोड होते त्यातुन ३३ रोड घेतल्यानंतर जे उर्वरित रोड आहेत ते दुस-या टप्प्यात आहेत?
३३ रोड मधीलच एक अलग टप्पा आहे की दुसरा टप्पा आहे? याची पण माहिती पाहिजे.

मा.आयुक्त :- महाडिक साहेब, १२० की.मी ची जी रोड वीड्थ आहे. त्यातील मुश्किलीने १९-२० की.मी.पर्यंतची रोड वीड्थ या ३३ रस्त्यांच्या डेव्हलपमेंट मध्ये आम्ही कव्हर केली आहे. बाकी जे रस्ते डेव्हलप झाले आहेत ते विकास आराखडयातील रूंदीप्रमाणे झालेले नाहीत. बी.एम.आर.डी.ए ने आमच्याकडुन टाईमबाऊंड प्रोग्राम ची अपेक्षा ठेवली आहे. विकास आराखडयामध्ये रस्ते रूंदीकरणाची १२० कि.मी.ची जी रूंदी आहे. त्यापैकी १९ कि.मी.रूंदी आम्ही पुर्ण विकसित केली आहे. परंतु आमच्याकडे निधी उपलब्ध नसल्याने अर्ध विकसित असे जे रोड आहेत. ते २१ आहेत. या व्यतिरिक्त विकास आराखडयामधील जे रस्ते आहेत त्यांचा आम्हांला सर्व्हे करावा लागणार आहे. व आमची सांपत्तीक स्थिती लक्षात घेता. जर आम्हाला हुडको कडुन कर्ज मिळु शकत असेल तर त्याचाही आम्ही विचार करीत आहोत. त्याचाही आम्ही प्रस्ताव तयार करत आहोत. इंटिग्रेटेड सिटी डेव्हलपमेंट प्रोजेक्टच्या अनुसार हुडकोच्या अधिका-यांशी महापौरांचे व आमचे सुध्दा बोलणे झाले आहे. त्यासंदर्भात चर्चा चालु आहे. विकास आराखडयातील रस्त्यांची जसजशी डेव्हलपमेंट होईल. डि.पी.रोड बाबत मी बोलत आहे. काही रस्ते दुस-या टप्प्यात येतील. तिस-या टप्प्यात येतील. आपली सांपत्तिक स्थिती जशी राहील त्यावर हे अवलंबुन असेल. त्या हिशोबानेच आम्हाला डि.पी.रोडची डेव्हलपमेंट करावी लागणार आहे. ही गोष्ट आहे डि.पी.रोडची तसेच जे नॉन डि.पी. रोड आहेत त्याबाबत बी.एम.आर.डी.एची जी अपेक्षा आहे. ती मी आपल्याला वाचुन दाखवू इच्छितो. श्री. पेडणेकर जे चीफ प्लानिंग ऑफिसर आहेत. त्यांचे जे पत्र आले आहे. ते मी आपणांस वाचुन दाखवू इच्छितो. ज्यानुसार आम्ही हा प्रस्ताव यासभेपूढे ठेवला आहे.

इन व्यु ऑफ द कंडिशन स्पेसिफाइड बाय द एक्झुक्युटीव्ह कमिटी वाइड अप्रुव्हिंग द लोन इट इज नेसिसरी टू प्रोव्हाइड यु.एम.सी ॲट युवर अंडरटेकींग स्टेटेड दॅट इन्क्रोचमेंटस् ऑन ऑल रोडस् इंटायर सिटी ऑफ उल्हासनगर वील बी रीमुव्हड् इन द टाईम बाऊंड मॅनरस् .

यु आर देअर फॉर रिक्वेस्टेड टु गेट अप्रोप्रियेट रिझोल्युशन ऑफ कॉन्सील ॲन्ड सबमीट द अंडरटेकींग अर्ली ॲक्शन इन दीस रिगार्ड वील बी फॅसिलेटेड कंम्प्लीशन ऑफ द फरदर फॉरमॅलिटीज. तर ज्याच्यात एक्झीस्टींग रस्ते आहेत त्यात रूंदीचा मुददा येत नाही. जर त्यात कोणी अडथळा उभारला असेल तर बाय वे ऑफ पार्कींग व्हेईकल किंवा कोणी गॅरेज चालवत असेल, किंवा कोणी सामान ठेवत असेल असे अडथळे घेतले तर त्यांना रिमुव्ह करण्यासाठी कमिटमेंट दयावे लागेल. बी.एम.आर.डी.चे हे म्हणणे आहे की, उल्हासनगर मध्ये जे रोड बनतात आमचा अनुभव आहे. (तो अनुभव आम्हाला पण आहे सांगायची गरज नाही)की, रोड येथे प्रशस्त होतात पण तेथे व्यापारी आपले सामान ठेवतात, कुणी अनाधिकृतपणे वाहने ठेवतात, कुणी अजुन कशात-हेने तरी त्याचा वापर करतात. रोडवर जे गॅरेज चालतात किंवा इतर काही असते ते आम्हाला बंद करायचे आहे. आणि तसे आम्हाला त्यांना आश्वासन दयायचे आहे. जे एक्झीसटींग रोड आहेत त्यांच्यावरील अतिक्रमण हटवायचे आहे. आणि जो डी.पी.रोड आहे त्याचे आम्हाला फेज वाईज कार्यक्रम आखायचा आहे. जसाजसा निधी उपलब्ध होत जाईल तसातसा आम्ही कार्यक्रम आखु त्याप्रमाणे आम्ही टप्पे तयार करू. आम्ही २० की.मी पर्यंत रस्त्यांचे रूंदीकरण केलेले आहे. हि बाब आम्ही आपल्यासमोर ठेवली आहे.

यासाठी ज्या समितीची स्थापना केली आहे. ते पण आम्ही प्रस्तावाच्या पेज नं.४ वर मेंन्शन केले आहे. आणि पाच वर्षाचा टेंन्टीटीव्हली आम्ही प्लान करण्याचा प्रयत्न करत आहोत. यात पहिल्या टप्प्यात जर आम्हाला हुडको काही कर्ज देऊ इच्छित असेल तर त्यांचे आमचे फायनांन्शीयल असीस्टंन्ट झाले आहे. आमच्यावर किती जबाबदा-या आहेत? आमचे किती उत्पन्न आहे? आम्हाला किती कर्ज हुडको देऊ शकते हे सर्व निश्चित झाल्यावर किंवा आपण किती कर्ज घेऊ शकतो हे सर्व लक्षात घेऊन सदनाला पुढच्या टप्प्यासाठी विचार करायला लागेल. रोडवर जे अतिक्रमण होते ते काढुन टाकण्याची बी.एम.आर.डी. ए. आपल्याला हमी दयायची आहे. आम्ही टप्याटप्याने ती अतिक्रमणे काढू आणि दुसरे जे नॉन डि.पी रोड आहेत. त्यात जर काही अतिक्रमण झाले तर ते हटविण्याचे आम्हाला प्रयत्न करायचे आहेत. हे आश्वासन महासभेतर्फे आणि आयुक्तांतर्फे हवे. जोपर्यंत बी.एम.आर.डी ला तसे आश्वासन मिळत नाही तोपर्यंत ते देणार नाही. दहा-दहा करोड कर्ज घेण्यासाठी जे टप्पे तयार केले आहेत. त्यापैकी चार रोड जे आता आम्ही वाचुन दाखविले त्यासाठी १० करोड मंजुर झाले आहेत. ते कर्ज ते देण्यास सुरवात करतील.

<u>मा.उप-महापौर :-</u>आता श्री. प्रकाश महाडिकयांनीं जो मुददा उपस्थित केला त्याची मी मराठीत पुनरावृत्ती करतो. मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी एक वर्षाचा कार्यकाल पुर्ण केला आहे. या वर्षात सर्वात मोठे जे कार्य झाले आहे ते सदनाला सांगु इच्छितो. कालच मला मा.गृहराज्यमंत्री यांच्याकडुन माहिती पडले आहे. त्यांनी मंत्रालयात जी सभा घेतली त्यात १ जानेवारी १९९५ पर्यंत महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणारे जे पण अनाधिकृत बांधकाम आहे. इमारत असो, झोपडी असो, घर असो, त्यांना डिमोलेशन न करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. व त्यांना नियमित करण्याचा निर्णय देखिल सरकारने घेतला आहे. दि.२०.१०.२००० ला जी सभा झाली त्यात हे महापौरांचे वक्तव्य आहे. गृहराज्य मंत्र्यांनी मंत्रीमंडळाचा निर्णय आपल्याला कळविला आणि मला असे वाटते आयुक्त साहेब २४ तारखेला या महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या साईदर्शन इमारतीच्या डेमोलेशनची ऑर्डर ८ नोव्हेंबर ला निघाली. एकीकडे सरकार आपल्याला कळवते आपण लोकांना आश्वासन देतो त्यांचे अभिनंदन करतो की, उल्हासनगर महानगरपालिकेतील अनाधिकृत बांधकाम असणा-या लोकांचे नुकसान होऊ नये म्हणुन ते बांधकाम कायदेशिर करत आहे. त्या दिवसातच शासनाचाच कोणी मुख्य सचिव असेल किंवा उप सचिव असेल त्याच्या आदेशानुसार आपले महानगरपालिकेचे अधिकारी ती इमारत तोडायला जातात हे किती योग्य आहे? म्हणजे नुसता ठराव करून कॅबीनेट मंत्र्यांनी आम्हाला काहीतरी दाखवायचे आणि आम्ही त्यांचे स्वागत करायचे. पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी या महानगरपालिकेत होत नाही. साईदर्शन इमारत महापालिका क्षेत्रात आहे की नाही? त्याचे डेमोलेशन ऑर्डर ८ तारखेला काढले. येथील अधिकारी पुर्ण तयारीसह तेथे गेले होते. तेथील जनतेचे आंदोलनामध्ये कुणी रॉकेल वगैरे ओतुन घेतले त्यानंतर ती कार्यवाही पुढे ढकलण्यांत आली. मा.मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, माझी बैठक होईल. ते कसे विसंगत आहे.आपण महापौर या नात्याने याबाबतीत नक्की निर्णय कोणता घेणार? त्या इमारतीतील रहिवाशी याच नियमामध्ये मोडतात की नाही याचे आश्वासन त्यांना दयावे अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे :-</u> रस्त्यांच्या टप्पा क्र.२ बाबत आयुक्तांनी जो प्रस्ताव आणलेला आहे. त्यासाठी बी.एम.आर.डी.ए कडुन कर्ज घेण्याची जी योजना येथे मांडली आहे. मी आयुक्तांना विचारू इच्छितो की, ३३ रस्त्यांमधील किती रस्त्यांचे काम आतापर्यंत पुर्ण झाले आहे. त्या व्यतिरिक्त आपण एम.एम.आर.डी. ए.कडुन कर्ज मागत आहात. शहरामध्ये रस्त्यांचे काम अतिशय संथगतीने चालु आहे याबाबत ठेकेदारांना विचारले असता ते असे म्हणतात की, आम्हाला बीले मिळत नाहीत. आम्ही कसे काम करणार? आम्ही जेथे जेथे सर्व्हे केला आहे तेथे रस्त्यांची जी स्थिती आहे ती अतिशय दयनिय आहे. काही ठिकाणी अतिक्रमणे हटविली

नाहीत. मागील महासभेत आम्ही विचारणा केली होती. खेमाणी येथील अतिक्रमणे अद्याप का तुटली नाहीत? खेमाणी येथील अतिक्रमणे अद्याप हटविली नसताना आम्ही एम.एम.आर.डी.ए कडुन कर्ज मागवित आहोत व रस्ते रूंदीकरणाचा पुन्हा प्रस्ताव ठेवत आहेत. मला असे म्हणायचे आहे की, ३३ रस्त्यांचे जे काम चालले आहे. ते अतिशय संथगतीने चालु आहे. जी अतिक्रमणे काढायची बाकी आहेत ते काम अद्याप झालेले नाही. या प्रस्तावात आपण असे म्हणत आहात की, रस्त्यावर जी गॅरेजेस व इतर काही अतिक्रमणे आहेत ती हटविण्याची हमी दयायची आहे. मी असे म्हणतो की, ३३ रस्ते यापूर्वी जे पास झाले आहेत त्यावरील अतिक्रमणे अगोदर हटविली जावीत. त्यानंतर ही योजना हाती घ्या. आमचे आपणांस पूर्ण सहकार्य राहील. व आता पण आहे. मी पुन्हा एकदा आपणांस सांगतो खेमाणी येथील अतिक्रमणे अद्याप हटविली नाहीत, या शहराचे प्रथम नागरिक जे आहेत त्यांनी आपले स्वतःचे बांधकाम अद्याप तोडले नाही. असा माझा ठाम आरोप आहे. शहराचा प्रथम नागरिक आपल्या स्वतःपासुन जो पर्यंत सुरूवात करत नाही तोपर्यंत या कामांची सुरूवात योग्य प्रकारे होऊ शकणार नाही. या ३३ रस्त्यांमधील खेमाणी येथे जे बांधकाम तोडण्याचे थांबले आहे, जे अतिक्रमण हटवायचे राहिले आहे. ते का नाही हटविले जात? त्याचे मला आज स्पष्टीकरण दया व याच महासभेत मला उत्तर दया. एम.एम.आर.डी. ए कडुन कर्ज घेण्यासाठी बहुमताने आम्ही आपणांस सहकार्य देऊ धन्यवाद.

<u>मा.उप-महापौरः-</u> महापौरजी, सरकारचे आम्ही जे स्वागत केले, समर्थन केले, आभार मानले त्याविषयी उल्हसनगर वेगळे आहे काय? याबाबत मी प्रश्न विचारला होता. साईदर्शन विषयी आपण लोकांना काही आश्वासने दिली होती आपण पण उल्हासनगर मध्ये राहता. म्हणजे महाराष्ट्रात आहात. शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो सर्वांना लागू होतो. त्यासाठी आम्ही काही करू शकतो का?

<u>मा.महापौर :-</u> उपमहापौरांनी साईदर्शन इमारती विषयी जो प्रश्न या महासभेत विचारला आहे. त्याविषयी मी आपणांस माहिती देऊ इच्छितो की, साईदर्शन इमारत तोडण्याचा मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यामध्ये कार्यक्रम आखण्यात आलेला होता. त्यावेळी मी नागपुर येथे अधिवेशनामध्ये होतो या इमारतीचे निश्कासन थांबावे म्हणुन मी तेथुनच प्रयत्न केले होते. आयुक्तांशी याबाबत मी बोललो होतो की, या इमारतीचे निष्कासन थांबविले जावे. मला वाटते त्यावेळेला आयुक्त म्हणुन श्री.चंद्रशेखर होते. मी त्यांच्याशी सूध्दा याबाबत बोललो होतो की, हे जे निष्काशन होत आहे ते चुकीचे होत आहे. कुणा एका व्यक्तीच्या तक्रारी वरून सहा वर्षापुर्वी तयार झालेल्या, १९९३-९४ मध्ये तयार झालेली असावी. व या इमारतीत आता लोक रहात आहेत. मागील सहा-सात वर्षापासुन ज्या इमारतीत लोक रहात आहेत. त्या इमारतीला एका व्यक्तीच्या तक्रारी वरून तोडणे हे योग्य नाही. व ही गोष्ट मी सरकारपर्यंत पोहचवली आहे. व यावेळी या इमारतीच्या निष्काशनाची महानगरपालिकेकडुन जी कार्यवाही झाली त्यास महानगरपालिका जबाबदार नव्हती. जेवढे नगरविकास विभाग जबाबदार होते. आयुक्तांना त्या विभागाकडुन आदेश आलेला होता. आयुक्तांनी नगरविकास सचिवांचे आदेश अंमलात आणले होते. मी याविषयाबाबत नगरविकास सचिवांशी सुध्दा बोललो होतो की, उल्हासनगर शहरामध्ये विशेष करून या इमारतीला जे 'लक्ष' ठरविले जात आहे ते बरोबर नाही. मी या महासभेत सांगु इच्छितो की, सरकारचा जो निर्णय आहे तो या साईदर्शन इमारतीला सुध्दा लागु आहे. भविष्यात या इमारतीच्या विरोधात कुठली कार्यवाही होणार नाही अशी मला खात्री आहे.

<u>मा.उप-महापौर</u> :- मा.आयुक्तसाहेब, महापौरांनी जे सांगीतलेले आहे त्याबाबत आपण जर स्पष्टीकरण केले तर बरे होईल.

<u>मा.आयुक्त :-</u> खर म्हणजे महापौरांनी सांगीतल्या नंतर त्यावर मी काही सांगणे हे बरोबर नाही. पण माहिती सभागृहाला दयावी म्हणुन मी एक गोष्ट सांगु इच्छितो. साईदर्शन इमारत तोडण्यासाठी ८ तारखेला गेले होते. तेथे जी घटना घडली त्यावेळी आपले मा.उपमहापौर व इतर काही नगरसेवक सुध्दा उपस्थित होते. त्या इमारतीत जे रहीवाशी आहेत त्यांनी आम्हाला विनंती केली की, शासनाशी आमचे कम्युनिकेशन चालु आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आम्हास चर्चेसाठी बोलावले आहे. परंतु वेळ निश्चित झालेली नाही. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेनंतर जर निर्णय आमच्या विरोधात गेला तर आपणांस जी काही कार्यवाही करायची असेल ती आपण करा. मी सदनाला सांगु इच्छितो की, ते लोक या प्रयत्नात होते की, मुख्यमंत्री महोदयांची अपॉइंटमेंट मिळावी व या विषयी चर्चा व्हावी. याविषयी दरम्यानच्या कालावधीत मुख्य सचिव साहेब यांचा सुध्दा फोन आला होता. व मुख्य सचिवांनी असे सांगीतले आहे की, मा.मुख्यमंत्री महोदयांशी जी चर्चा होईल व त्यात जो निर्णय होईल त्यापूर्वी या इमारतीचे निष्काशन केले जाऊ नये. ती चर्चा झाल्यानंतर शासन जो निर्णय देईल त्यानुसार आम्हाला कार्यवाही करावी लागेल.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u> आपण जे प्रयत्न करत आहात. त्याबद्दल मी आपणांस धन्यवाद देतो. त्याबरोबरच या विषयी माझे जे विचार आहेत. जसे की, या प्रस्तावाबाबत रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याविषयी एम.एम.आर.डी.ए ला हमी दयायची आहे. रस्ता रूंदीकरणामध्ये जे लोक बाधित होतील त्यांच्या पुर्नवसनाची सुध्दा आपण योजना आखली पाहीजे. मागील वेळी रस्त्यांच्या रूंदीकरणामध्ये जे लोक विस्थापित झाले होते त्यांना खुपच त्रास सहन करावा लागला. अद्याप त्यांचे योग्य प्रकारे पुर्नवसन झालेले नाही. हे थोडया वेळा पूर्वी सुध्दा मी म्हंटले आहेच. त्यांना ना कुठल्या सुविधा दिल्या गेल्या, ना काही लेखी दिले गेले. जेणेकरून त्यांना पुढे कामी येईल. जे विस्थापित होतील त्यांच्या पुर्नवसनासाठी ठोस असा एक कार्यक्रम तयार करा की जेणे करून त्यांना काही त्रासाचे होऊ नये. कारण की, ज्याप्रमाणे शहरवासी किंवा दुकानदार रस्ता रूंदीकरणाच्या कामामध्ये आपणांस सहकार्य देतात. त्याप्रमाणे आपले सुध्दा त्यांना सहकार्य मिळाले पाहिजे. ही एक गोष्ट व दुसरी गोष्ट अशी की, .....

<u>मा.आयुक्त :-</u> एक मिनिट. मी मध्येच हस्तक्षेप करीत आहे. गोषवा-याच्या शेवटची जी ओळ आहे ती आपण वाचुन पहावी. बाधीत होणा-यांसाठी पुर्नवसनाच्या प्रस्तावासह समितीपुढे सादर करील. सर्व्हे होईल, सर्व्हे मध्ये कीती घरे, दुकाने बाधीत होत आहेत. याचा सर्व्हे झाल्यानंतर....

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u> साहेब मी तो गोषवारा वाचला आहे. खुप चांगले लिहिले आहे.

<u>मा.आयुक्त</u> :- ही जी समिती आहे. यासर्व अपेक्षांचा विचार केल्यानंतर करेल. ...

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u>उपलब्ध रस्त्याच्या रूंदीपैकी काही भागाचा अनाधिकृतपणे वापर होत आहे. उदा.वाहनाचे पार्कींग, दुकानदारांनी सामान रस्त्यावर ठेवणे, गाडी रिपेअरिंग रस्त्यावर ठेवणे, व्यापारी लोकांचे रस्त्यावर अतिक्रमण होते. व वाहनांची पार्कींग असते, हातगाडीवाले रस्त्यावर ज्या हातगाडया उभ्या करतात. त्यामुळे किती त्रासाचे होते ते सर्वांना माहिती आहे. सीरू चौकापासुन नेहरू चौका पर्यंत पुर्ण रस्ता हातगाडीवाले व्यापुन टाकातात. दुकानदारांशी त्यांची भांडणेही होतात. या

प्रस्तावात ज्या अतिक्रमणांचा आपण उल्लेख केलेला आहे त्यामध्ये यांचा सुध्दा समावेश करा. त्याचबरोबर



ऑटो रिक्शावाल्यांचे स्टॅंड आहेत त्यांच्या सुध्दा खुप अडचणी आहेत. मी ज्या थोडयाफार जाणतो. त्यापेकी एक असे की अधिकृत असे रिक्षास्टॅंड खुपच कमी आहेत. त्यांच्या मागणी नुसार वाहतून पोलिसांनी रिक्षास्टॅंड ठरवून दिलेले नाहीत. जेथे पाच रिक्षांसाठी स्टॅंड आहे. तेथे तीस-तीस ऑटोरिक्षा उभ्या रहातात. हे सुध्दा एक प्रकारचे अतिक्रमणच आहे. यावर सुध्दा आपण लक्ष दयावे. की अधिकृत असे रिक्षास्टॅंड नेमुन दिले जावे. जेवढया रिक्षासांठी तो स्टॅंड असेल तेवढयाच रिक्षा तेथे उभ्या राहील्या पाहिजेत. व हातगाडीवाल्यांचे जेथे जेथे अतिक्रमण असेल ते हटविले जावे कारण की, हॉकर्सचा अर्थ असा आहे की, त्यांनी फिरून-फिरून धंदा-व्यापार करावयाचा आहे. जे एकाच ठिकाणी वर्षानुवर्ष हातगाडया लाऊन धंदा व्यापार करतात ते योग्य नाही. आपण जे सांगीतले त्याबरोबर ऑटोरिक्क्षावाल्यांचे अतिक्रमण, हातगाडीवाल्यांचे अतिक्रमणे हे सुध्दा त्यामध्ये समाविष्ट केले जावे. शेवटचे असे की, आपण जी समिती नेमत आहात, आपण सुचविलेल्या नावांमध्ये मा. महापौर, उप-महापौर, व स्थायी समिती सभापती यांचा सुध्दा त्यामध्ये समावेश केला तर खुप चांगले होईल हि आपणांस विनंती आहे. या समितीमध्ये हे तीन लोक घेतले तर खुप चांगले होईल. कारण की ते जनतेचे पतिनिधी आहेत आणि जनतेच्या ज्या अडचणी आहेत त्या त्यांना चांगल्या माहित आहेत.

<u>मा.आयुक्त :-</u> जाणुन बुजून ती अधिका-यांची समिती नेमलेली आहे. परंतु जर मा.महापौर आणि उपमहापौर साहेबांना त्यामध्ये सारस्थ्य असेल तर त्यांनी सांगावे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u>नाही-नाही, त्यांना त्यात सारस्थ्य असो अगर नसो आम्हा लोकप्रतिनिधींना त्यात सारस्थ्य आहे की, या समितीत अधिका-यांबरोबर लोकप्रतिनिधी सुध्दा असावेत. महापौर, उप-महापौर,व स्थायी समिती सभापती हे तीनही लोक असतील तर काम अधिक चांगल्याप्रकारे होईल.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> श्री. दर्शनसिंग खेमाणी यांच्या या प्रस्तावास मी अनुमोदन देतो हे तीनही लोक समितीत घेतले जावेत.

<u>मा.आयुक्त :-</u> आम्ही प्रस्ताव ठेवलेला आहे, निर्णय काय घ्यायचा ते आपल्या हातात आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u> शेवटुन दुस-या परिच्छेदात असे लिहिले आहे की, रूंदीकरणात येणारी सर्व अतिक्रमणे व रस्ता वाहतुकीस मोकळा करून देण्यासाठी रस्ते विकास कार्यक्रम ३ ते ५ वर्षात कार्यक्रम संपूर्ण राबविण्यात येणार आहे. मला असे म्हणायचे आहे की, आपला टेक्नीकल स्टाफ

व त्याबरोबर ठेकेदारांची आपण जी निवड करता. ती अशी केली जावी की, रिलायबल व कॅपेबल असावेत. कारण की, इन कॅपेबल,इन ऑफिशिऐंट व अन रिलायबल जे ठेकेदार व कर्मचारी आहेत त्यामुळे ,खुपच त्रासाचे होत आहे. उल्हासनगर-४ येथील मेन बाजारचा रस्ता अद्याप पुर्ण झालेला नाही. त्यात ठेकेदाराची पण चुकी आहे आणि तांत्रिक कर्मचा-यांची पण चुकी आहे. मी वारंवार सांगुन सुध्दा ऐकत नाही. आमच्या श्री.सुभाष मन्सुलकरांनी पण लक्षवेधी आणली होती. पण त्यानंतर पण त्याचे काही झाले नाही. तो रस्ता तसाच आहे ही मोठी खेदाची गोष्ट आहे. तर माझा हा एक सल्ला आहे की, सक्षम आणि कार्यकुशल कर्मचा-यांची टिम तयार करून हे काम करावे. माझ्या प्रभागाचे एक उदाहरण तुम्हाला सांगतो, दोन नाल्याचे इस्टीमेंट तांत्रिक कर्मचा-याकडुन विनंती करून बनवून घेतले. ४,७०,०००/-चे ते

प्राकलन आहे. त्यातील ठेकेदाराने २० टक्के पण काम केले नाही. काम बंद करून ठेवले आहे. मी विचारले काम का बंद ठेवले आहे तर ते म्हणतात मला आधी मोजमाप करून घ्यायचे आहे. २० टक्के



पण काम नाही झाले तर मोजमाप करायचा प्रश्न येतोच कुठे?याचा अर्थ तांत्रिक कर्मचा-यांनी चुकी केली आहे. २० टक्यात त्याचे काम पूर्ण होते याचा अर्थ जे तांत्रिक कर्मचारी आहेत त्यांना निलंबित करावे. किंवा जे ठेकेदार आहेत ते मुददाम करत असतील तर त्याच्यावर कार्यवाही करावी. हा पण एक मुददा आहे. मी सतत श्री.नागदेव,श्री. चिजवानी साहेब, आणि आपणांसही दोन दिवसापूर्वी सांगीतले आहे की, या ठेकेदारांमुळे खुप समस्या निर्माण हेत आहेत. तर मेहरबानी करून असे कर्मचारी ठेवा . तीन-पाच वर्ष आपण कार्यक्रम आखला आहे. तर सक्षम कर्मचारी सोबत घेऊन आपण काम करावे. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :-</u> मा.महापौर साहेब, मी जास्त वेळ घेत नाही पण शहरासाठी काही बोलु इच्छितो. अंबरनाथ कल्याण रोड काही कारणासाठी बंद केला आहे. तिथे ट्रॉन्सपोर्टवाले आपले ट्रक उभे करतात. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होतो. सम्राट हॉटेलजवळ पण ट्राफिकमुळे खुप त्रास होतो. वाईट मानू नका दिलीप लालवानी सारखे जर दोन माणसे एखादी शवयात्रा घेऊन निघाले तर त्यांना तेथेच थांबावे लागेल. कृपया आयुक्त साहेबांनी यावर लक्ष दयावे. अंबरनाथ-कल्याण रोड शहराचा मुख्य रस्ता आहे तो रिकामा करावा आणि परमानंद ट्रान्सपोर्ट व दोन तीन गॅरेज आहेत त्यांना पण ताकीद दयावी. दुसरी गोष्ट ही की, शहरात काम होत आहे ही खुप चांगली गोष्ट आहे त्याबददल मी आपले आभार मानतो. शहरात जिथे जिथे पण बसस्टॉप होते, रोडवायडिंगमुळे काही बसस्टॉप तोडले गेले आहेत. जसे पाच नंबर, हिल लाईन पोलीस स्टेशन, टिलसन जवळ बसस्टॉप होते. एक ते पाच नंबर मध्ये खुप ठिकाणी बसस्टॉप होते. मा. आयुक्त साहेबांना मी सांगु इच्छितो की, रस्ते तयार झाल्यावर जसे अंबरनाथच्या बाजुला शिवरोड जवळ छोटा आर.सी.सी बस स्ऑप आहे तेथील बसस्टॉप खुप सुंदर दिसते. तसे जर उल्हासनगरमध्ये तयार केले तर खुप उपकार होतील, शहराची शान वाढेल. आणि पुढे नागरिक म्हणतील की आपल्यासारखे महापौर, उप-महापौर व आयुक्त होते सर्व सन्माननिय सदस्य काही कालावधीसाठी होते त्यांच्या राज्यात ऐवढा चांगला बसस्टॉप तयार झाला. धन्यवाद या गोष्टीकडे लक्ष दया.

इथे श्री.सुभाष मन्सुलकर, श्री. नरेंद राजानी दोघे एकत्र बोलायला उभे असताना...

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u>:-आता तुम्ही आधी बोला पण एका अटीवर, पुढच्या वेळेस असे नाही होणार.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u> महापौर साहेब,

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> आता तुम्ही बोलु नका आम्ही समझौता केलेला आहे, परवानगी घेतली आहे.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u> तुम्ही याच्या आधी बोलला आहात, आम्हाला एकदा तरी येऊ दया पिच्चरमध्ये. तुम्ही जास्त वेळ घ्याल.

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :-</u> मा.महापौर.....

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u> :- सन्माननिय महापौर साहेब,....

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक :- प्रत्येक वेळा हे बोलतात. आम्हाला पण बोलायचे आहे. हे काय आहे? यांच्यासाठी आहे का महासभा? माझ्यानंतर बोला तुम्ही. लेडीज फर्स्ट.



मा.सदस्य श्री.बी.बी. मोरे :- लेडीज फर्स्ट, चला ठिक आहे.

मा.महापौर :- मॅडम, बोला आपण.

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक :-मा.महापौर साहेब, एम.एम.आर.डी.ए. कडुन जे कर्ज घेण्यात येत आहे. कर्ज घेण्यासाठी ज्या अटी दिलेल्या आहेत ते कर्ज आपण परत कसे देणार. ते पण सदनाला तुम्ही सविस्तर सांगावे. कशा पध्दतीने तुम्ही कर्ज दयाल?

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- परत नाही देणार सांगा. पैसे आहेत कुठे महापालिकेत?

मा.आयुक्त :-आता आपण यास टाळू शकत नाही. प्रत्येक आठवडयाला आपणांस २२ लाख रू. डिपॉझिट करावे लागतील. ते आपोआपच अकाऊंटमध्ये वळते होतील. यात अशी पध्दत आहे. बी.एम.आर.डी.ए.चे २० करोड जे कर्ज आपणांस मिळणार आहे. आपले उत्पन्न आहे त्यात पहील्या टप्प्यात ११ लाख, दुस-या टप्प्यात ११ लाख असे २२ लाख रू. आपणांस दर आठवडयाला डिपॉझिट करावे लागतील. आपले जे उत्पन्न आहे. जकात, करविभाग, व दुसरेही काही फंड आहेत जसे विकास शुल्क त्यातुन सक्तीने आपणांस हे पैसे खात्त्यात ठेवायचे आहेत. तशी याची पध्दत आहे. कर्ज तर फेडायचे आहेच.

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक :-वर्तमानपत्रात आले होते आणि आम्हालाही असे समजले की, पाण्याचे ७४ कोटी कर्ज देणे बाकी आहे. जेव्हा मी महापौर होते तेव्हा मी श्री. ढाके साहेबांशी सभा घेतली होती तेव्हा एक कोटी ९० लाख रू. आम्ही तुम्हाला दर महिन्याला देऊ असे आश्वासन देऊन आले होते. त्यामुळे आम्ही जकातीचे खाजगीकरण केले. आणि कर्ज पण दयायचो. पण मला असे निर्दशनास आले आहे की, अजुनही आपले हप्ते नियमित जात नाहीत. आपण ते हप्ते नियमित भरावे जेणे करून लोकांचे हाल होणार नाहीत. पाण्यासाठी हाल होणार नाहीत.

मा.आयुक्त :- खरे तर आपण म्हणता त्याच गोष्टीला प्राधान्य दिले आहे. परंतु हा जो रस्ते विकास कार्यक्रम मध्ये आला त्याच्यामुळे हा खर्च खुप वाढला. हा खर्च जसजसा कमी होईल तसतसे आपल्याला आर्थिक दृष्टया काही अडचणी निर्माण होणार नाही. आणि आपल्या रिकव्हरीत देखील वाढ होईल. त्यामुळे इथुन पुढे ती परिस्थिती निर्माण होईल असे वाटत नाही.

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक :-आधी लोकांच्या सुखसोयी महत्त्वाच्या आहेत. लोकांना पाणी भरपुर मिळावे. माझे तरी वैयक्तीक असे म्हणणे आहे की, लोकांच्या हितासाठी आपण ते पैसे नियमित भरावे. कारण की आम्ही आश्वासन देऊन आलो आहोत.

मा.आयुक्त :- तुम्ही आश्वासन दिले आहे आम्ही पैसे भरत आहोत.

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक :- शिवसेना-भाजपा युतीच्या वेळेला आश्वासन आम्ही दिले आणि उत्पन्न ही वाढवले आहे.

मा.आयुक्त :-ठिक आहे.

__मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे__ :- मा.महापौर साहेब, उप-महापौर साहेब,...



(इथे श्री.बी.बी.मोरे बोलायला उभे असताना) आता अतिक्रमण केले आहे (श्री. बी.बी.मोरे)तुम्ही खाली बसा. आता अतिक्रमण हटविण्याविषयी श्री. देवेंद्रसिंग खेमाणी हे व्यापा-यांचे नेतृत्त्व करतात. आम्ही उल्हासनगर हॉकर्स सेनेचे नेतृत्त्व करतो. आपल्या हॉकर्स सेने विषयी सांगीतले होते की, शहरात जे पण हॉकर्स अनाधिकृतपणे उभे आहेत. ते पण या कार्यक्रमां अंतर्गत हटवून टाकावे. परंतु आम्हाला अद्याप कुठेही हॉकर्स झोन दिलेला नाही. तर सन्माननिय आयुक्त साहेबांना सुचित करतो की, हॉकर्सना तेथुन हटविण्या अगोदर व्यापारी वर्गाच्या स्कुटर दोन्ही बाजुला उभ्या असतात. कल्याण-अंबरनाथ रोड असो, २ नंबर- सीरू चौक रोड असो, ४ नं. -मेन रोड असो. महापालिकेचा फुटपाथ त्यांनी शोकेस ठेऊन स्टॉल लाऊन अडवून ठेवलेला आहे. तर व्यापा-यांनी जे अनाधिकृत स्टॉल, बॉक्स दुकानापूढे मांडलेले आहेत. याचाही त्या कार्यक्रमांमध्ये विचार करावा ही मी आपणांस विनंती करतो, कारण की, आमचे हॉकर्स आजही रस्त्यावर आहेत उद्याही राहणार आहेत तुम्ही त्यांचा विचार करावा. आणि दुसरी गोष्ट आपण समिती स्थापण्याचा जो निर्णय घेतला होता. महापौर,उप-महापौर, स्थायी समिती सभापती यांच्या सोबत प्रत्येक पक्षाचा एक-एक नगरसेवक घेतला तर योग्य होईल अशी मी आपणांस सुचना करतो. आणि त्यामुळे एक समन्वय समिती निर्माण होऊन प्रत्येक पक्षांच्या सदस्याचे काय मत आहे हे कळेल ते योग्य होईल अशी मी आयुक्तांना विनंती करतो.

__मा.सदस्य श्री. राजु जग्यासी:-__ मा.महापौरजी, अनुमती दिली मला....

__मा.सदस्य श्री.बी.बी. मोरे__ :- अरे हे काय आहे? कमाल आहे? माझ्यावर हा अन्याय होत आहे.

__मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-__ काही अन्याय होणार नाही. मोरे साहेब, प्लीज. मा.महापौर, उप-महापौर साहेब मी आधीपण या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे की, सपना गार्डन मधुन जो रोड जातो तेथील परिस्थिती पण खराब आहेत. जकातीच्या गाडया २४ तास तेथे उभ्या असतात. आजुबाजुला दोन-तीन शाळा कॉलेज पण आहेत. शाळांच्या मुलांचे येणे-जाणे, हरीकिर्तन दरबार आहे, तेथे लोकांचे येणे जाणे असते. यासंबंधी महापौर साहेबांनी आश्वासन दिले होते की, त्वरीत जकात नाका तिथुन हटवावा असे आयुक्तांना पत्र देईन. जर ते शक्य आहे तर ठिक. नाहीतर ताबडतोब त्या रस्त्याचे दुरूस्तीकरण करा. या विषयास तातडीने घेतले जावे. प्लीज.

__मा.महापौर :-__ आपली तक्रार __जिनियन__ आहे. मी आयुक्तांना सांगीन की, आवश्यक ती कार्यवाही करा.

__मा.सदस्य श्री. राजु जग्यासी :-__ आयुक्तांनी जर सांगीतले तर बरे होईल.

__मा.महापौर :-__ मी आयुक्तांना सांगीतले आहे, जी काही योग्य कार्यवाही असेल ती ते नक्की करतील.

__मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-__ मी आशा ठेऊ का दहा-पंधरा दिवसात रस्ता तयार करतील? सिमेंट रोड नाही बनवायचाय तोपर्यंत तात्पुरता बी.एम.ए. सी. रोड बनवा पण चांगल्यात-हेने बनवा. कारण एक महिना अगोदर कोणी ठेकेदारानी काम केले होते. माझ्या माहितीप्रमाणे ते काम दहा दिवस पण टिकले नाही. असे काम त्या ठेकेदारानी केले होते. त्या साईटवर आपण स्वतः उभे राहून किंवा योग्य अधिकारी उभे करून किती दिवसात हे काम कराल तेवढे सांगा.

मा.महापौर :- शक्य तितक्या लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल.

मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-लवकरात लवकर म्हणजे किती कालावधी जाईल?कधी पर्यंत कराल सांगा प्लीज? आयुक्त साहेब खुप महत्त्वाचा रोड आहे. तिथे शाळेत येणा-या जाणा-या मुलांना त्रास होतो. चोवीस तास तिथे गाडया उभ्या असतात.

मा.आयुक्त :- तो रस्ता बनविण्याचाही प्रयत्न केला होता पण तिथे समस्या हि आहे की, रहदारी खुप आहे. तिथे नाली बनते , तिचा क्युरींग पिरीयड संपत नाही तोपर्यंत जड वाहने त्याच्यावरून जातात आणि ते तुटून जाते. ही समस्या तिथे आहे. सध्या अशी परिस्थिती आहे की, तो मध्यवर्ती नाका आहे. तेथुन तो पर्यायी जागेत हलवणे आम्हाला कठीण आहे. रहदारीवर नियंत्रण ठेवणे मुश्किल आहे. तरी पण इंजिनियरिंग सेक्शनला मी सांगेन की, कशा प्रकारे तिथली समस्या सुटेल. प्लान बनवू, तशी योजना आखु आणि खर्च स्थायी समितीपूढे मांडु.

मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-साहेब परत खर्चावर येऊन काम खोळंबते म्हणुन मी आपणांस सांगतो की, हे खुप महत्त्वाचे अतिआवश्यक काम आहे. जर खर्च पहात राहीलात तर काम तसेच राहील.

मा.आयुक्त :- मी समजु शकतो.

मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-जर आपण समजत आहात तर खुलासा करा ना? मी समजु का पंधरा-वीस दिवसात काम होईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी याचे उत्तर देतो.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-नाही, नाही हा माझ्यावर अन्याय आहे. तुम्ही सभागृह नेता आहात तुम्ही नंतर बोला.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी एका मिनिटात उत्तर देतो.

मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-मी समजु का पुढील महासभा येईस्तोपर्यंत काम होईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा.महापौर, ओसवालने २९ रोड तयार करणे साठी हुडको कडून कर्ज घेण्यासाठी ठेवले होते. आम्ही सत्ताधारी आणि विपक्षपक्षाची सभा बोलवली होती त्यात हा रोड पण आहे. मी राजु जग्यासीना पाठिंबा देत आहे. २९ रोडची जी यादी आहे. दुस-या टप्यात हुडको कडुन कर्ज घ्यायचे आहे. आम्ही तीन वेळा सर्वपक्षीय सदस्यांची बैठक बोलावली होती त्यात काही जण येत नाही. तर दुस-या टप्यामध्ये हा रोड येत आहे. सर्वजण विरोधी पक्ष, सत्ताधारी पक्ष ,गटनेता काही सदस्यांनी बसुन निर्णय घेतला तर तो रोड तयार होईल.

मा.सदस्य श्री.राजु जग्यासी :-वनवारीजी, कृपा करून या रोडला दुस-या टप्यात घेऊ नका. माझे म्हणणे काय आहे. की पुढच्या महासभेपर्यंत हा रोड तयार होईल असे मला आश्वासन दयावे.

मा.महापौर :- आम्ही पुर्ण प्रयत्न करू.

*<u>मा.सदस्य श्री.राजु जग्यासी</u> :-ठिक आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> सन्माननिय महापौरजी, रस्ते विकास कार्यक्रमासाठी कर्ज घेत आहात. याविषयी सर्व सदस्यांनी भरपुर चर्चा केली आहे. आपणांस अतिक्रमण काढण्यासाठी हमी दयायची आहे. मग ते कर्ज देणार. याचा अर्थ असा आहे. पण मी हे म्हणु इच्छितो, जे काही रस्ते आपण तयार करत आहोत त्यावरील अतिक्रमण अजुन हटविले नाही त्याचे काय करायचे? उदाहरणार्थ ए.व्ही.नारायण रोड तेथील अतिक्रमण हटविले नाही., दुसरे डॉलफिन क्लबच्या येथुन जो रस्ता जातो त्यावरील पण अतिक्रमण हटविले नाही. तर दुस-या टप्यात ही कार्यवाही आपण करणार आहोत. तर आधीच्या रोडवरचे अतिक्रमण कधी हटविले जाणार? जसे की, फॉलवरलाईनचा जो मुख्य रस्ता आहे, उल्हासनगरचे नाक त्याला म्हंटले जाते. तेथील पण अतिक्रमण हटविले नाही आहे. तर पहिल्या टप्प्यातील रोडवरील अतिक्रमण तसेच राहीले जाईल. ते तर आधी साफ झाले पाहिजे होते तरच आपण बी.एम.आर.डी.ए यांना आश्वासन देऊ शकतो की, आधीच्या ३३ रस्त्त्यावरचे अतिक्रमण हटविले गेले आहे. रस्ते तयार होत आहेत आता आम्ही दुस-या टप्यासाठी अमुक-अमुक रकमेचे कर्ज घेत आहोत. जसे मी सांगतो श्री.पाटणकरांनी सुवर्ण जयंतीमध्ये जे काही काम होणार होते. ते झाल्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारींना दिल्यावर ते दुसरा निधी मंजूर करतील. तर पहिल्याच टप्यावरील अतिक्रमण हटविले नाही आहे तर काय करायचे? ते कधी करणार? ते करणार की नाही करणार? ए.व्ही.नारायण रोड असाच राहील का?*

*<u>मा.आयुक्त</u> :- पहिल्या टप्यातील दोन-तीन रोडवरचे अतिक्रमण हटविण्याचे राहिले आहे त्याचे कारण पण मी मागील सभेत सांगीतले होते. विशेषतः जे रोड अजुन सुरू नाही झाले. डॉलफिनचा जो मुददा आहे आता दोन तासापूर्वीच कोर्टाकडुन त्याबाबत झालेला निर्णय मला समजला आहे. ज्यात त्यांनी जो एफ.एस.आय. चा वापर केला आहे. त्यामध्ये रस्त्त्याचा जो भाग येतो त्याचाही एफ.एस.आय जर त्यानी कव्हर केला असेल तर तो एफ.एस.आय. सुध्दा हटविला पाहिजे. आता एक दोन तासापूर्वीची गोष्ट मी सांगत आहे. त्याची ही पसंती राहील की, जो एफ.एस.आय त्यांनी वापरला आहे. त्याबाबत जर काही कॉम्प्रमाईज होत असेल तर, महापौर साहेबांशी सुध्दा त्यांची भेट झाली होती. म्हणुन कदाचित जागा ताब्यात घेण्याऐवजी तो एफ.एस.आय आम्ही त्याला अलाऊड करू. परंतु कोर्टाच्या आदेशानुसार त्याने एफ.एस.आय व्हायोलेशन केले आहे. हे सिध्द झाले आहे. कोर्टबाजीमुळे ते अतिक्रमण काढण्याचे अद्याप राहीले होते. या पुढचा जो विभाग आहे. कोळश्याची खाण आहे. व तीच्या मागील जो विभाग आहे. आपणा सर्वांना माहित आहे की, प्लॉट क्र.६१९ व दुस-या चार प्लॉटचे आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे पाठविला होता त्यासंदर्भात कोर्ट केस झाली होती. कोर्ट केस नंतर पुर्नवसन करण्याची अडचण आमच्या समोर आली होती. त्यामुळे आम्ही त्या लोकांना हटवू इच्छित नव्हतो. जो पर्यंत आपण त्यांना पर्यायी जागा देऊ शकत नाही. तोपर्यंत त्यांना हटविणे योग्य नाही. हे आमचेच धोरण आहे की, ज्याचे पूर्ण बांधकाम जाते त्यास पर्यायी जागा दयायची आहे.ही एक गोष्ट होती या व्यतिरिक्त जी पण अतिक्रमणे आहेत ती हटविण्याचे गेल्या आठ-दहा दिवसापासुन युध्दपातळीवर प्रयत्न चालु आहेत. ९५-९६टक्यापेक्षा जास्त काम झालेले आहे. कोर्ट केसेसमुळे किंवा अन्य दुस-या काही पुर्नवसनाच्या मुदयामुळे काही काम अडले असेल तर त्याबाबत सुध्दा लवकरच निर्णय होइल. व हे काम पूढे चालु राहिल. पहिल्या टप्यातील थोडेफार काम जर थांबलेले असेल तर बी.एम.आर.डी.एची अशी काही अट नाही की, आपणांस दुस-या टप्यासाठी कर्ज दयायचे नाही म्हणुन, सेकंड फेजचा येथे आम्ही जो उल्लेख केला आहे तो बी.एम.ए.आर.डी.ए.चा आहे. पाहिल्या फेजमध्ये*

जी सहा कामे होती ती व दुस-या फेजमध्ये जी चार कामे होती ती आम्ही आता वाचुन दाखविली. या रस्त्यांची मी विशेष करून आपणांस माहिती देईन. या रस्त्यांवरील अतिक्रमणे तर १०० टक्के हटविली गेली आहेत. याचे कामही चालु आहे व बी.एम.आर.डी.ए च्या लोकांनी येऊन या कामांचे सर्वेक्षणही केले आहे. बाकी जी कामे राहिली आहेत त्यांची कारणे मी सांगीतली आहेत. तीपण कामे लवकरात लवकर पुर्ण होतील.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-</u> मा.महापौर साहेब, आताच आयुक्तसाहेबांनी जे सांगीतले की, काही कोर्ट प्रकरणांमुळे अशी परिस्थिती आहे. उदा. डॉलफिन क्लब बाबत, मी तर असा विचार करतो की, डॉलफिन क्लब बाबत जर कोर्ट मॅटर आहे तर शांतीनगर व फॉलवरलाईन बाबत तर काही कोर्ट मॅटर नाही आहे. हे एक व दुसरी गोष्ट अशी की, ए.व्ही.नारायण चा जो रस्ता आहे तो सुरवातीपासून ते शेवटपर्यंत, त्या रस्त्याचे काम चालु आहे कींवा नाही हे आयुक्त साहेब सांगतील. परंतु ए.व्ही.नारायण मार्गा बाबत तर काही कोर्ट केस वगैरे नाही. त्यासाठी काय? मी असे का सांगत आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर मध्ये प्रभाग क्र.३१ मध्ये एक फुटाचे सुध्दा अतिक्रमण राहू देणार नाही. भले तुम्हाला राहण्यासाठी जागा असो अगर नसो. परंतु मी एक फुटाचे सुध्दा अतिक्रमण राहू देणार नाही असे श्री.शिर्के किंवा जे कुणी कार्यकारी अभियंता असतील त्यांनी हे सांगीतले आहे की, आपणांस राहण्यास जागा नसेल तरी चालेल परंतु आम्हास हे अतिक्रमण हटवावेच लागेल. ज्याअर्थी एका झोपडयामध्ये राहणारा माणुस की ज्याचे '४ x ४' चेच झोपडे आहे. जास्त काही मोठे नाही आहे. ते सुध्दा काढायला सांगीतले जाते म्हणुन आम्हाला बोलावे लागत आहे. परंतु ए.व्ही.नारायण मार्गावरची एक इमारत मध्ये येते तर तीचे बांधकाम तोडले जात नाही. परंतु एका गरीब दलित माणसाचे '४ x ४' चे झोपडे हे लोक हटवू इच्छितात. हा कोणता न्याय आहे? यासाठी मी हे बोलु इच्छितो, माझी हरकत आहे की, जेव्हा आपण पहिल्या टप्यामध्ये ज्या लोकांची घरे किंवा दुकाने गेली आहेत ते लोक आज किती सहन करीत आहेत. त्यांची घरे, दुकाने तोडल्यामुळे ते लोक प्लॉट क्र.६१९ वर शेळयामेंढयांसारखे राहत आहेत. अद्याप तेथे पाण्याची व लाईटची सुविधा नाही. ते रोज फे-या मारतात व म्हणतात की, आम्हाला पाण्याची व लाईटची सोय नाही. लाईटसाठी आपण एम.एस.इ.बी ला पत्र दयायला पाहिजे होते. पाणी पुरवठा विभाग आपल्या अंतर्गत आहे तेथे आपण पाण्याची जलवाहिनी टाकायला हवी होती. ते लोक आज सुध्दा तेथे शेळयामेंढयांसारखे अंधारात रहात आहेत, व तेथे दोन चो-या सुध्दा झाल्या आहेत. अशाप्रकारे शहरातील समस्या आपण सोडवु इच्छित आहात परंतु कित्येक ठिकाणी समस्या सुटलेल्या नाहीत. शांतीनगर, फॉलवरलाईन व डॉलफिन क्लब या रस्त्यांवरील अतिक्रमणे पुढील महासभा येईपर्यंत आपण जर काढली नाहीत तर मी महापालिकेसमोर उपोषणाला बसेन. असे मी म्हणु इच्छितो.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा.महापौर,उपमहापौर व आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्यांनी या मुदयावर सविस्तर चर्चा केली आहे. कुणी रिक्षांविषयी सांगीतले तर कुणी दुकानदारांबाबत, तर कुणी हॉकर्स बाबत सांगीतले परंतु माझ्या मनामध्ये एक शंका आहे की,या ठरावाची खरोखरच आपण अंमलबजावणी करणार आहात का? करणार असाल तर कोणत्त्या पध्दतीने? त्यासाठी कुठले एखादे विशेष पथक नेमणार आहात का? त्याचे उदाहरण मी देतो. मागच्या वेळेस असाच प्रश्न आम्ही महासभेमध्ये आणणार होतो त्यावेळी श्री. गणेश चौधरी, महापौर होते पण त्यावेळी आपल्याकडे जागा उपलब्ध नव्हती. मा.आयुक्त श्री. शुळ साहेब होते,त्यांना आम्ही एक जागा उपलब्ध करून दिली होती. त्याचा सुचक मी होतो पण प्रत्यक्षात अजुन पर्यंत

तेथे अंमलबजावणी झाली नाही तिथे एकही गाडी डंपिंग केली नाही. म्हणुन माझ्या मनामध्ये हि एक शंका आहे. आपण कोणत्त्या प्रकारे अंमलबजावणी करणार आहेत? याचा खुलासा केला गेला. तर बरे होईल.

मा.आयुक्त :-आम्ही तो प्लानच यामध्ये दिलेला आहे. की पाच वर्षामध्ये कार्यक्रम आखुन आपणांस ही अतिक्रमणे हटवायची आहेत. हुडकोकडुन कर्ज मिळविण्यासाठी हा जो इंटिग्रेटेड सिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम आपण करणार आहोत. त्यामध्ये वाहतुकीचा खोळंबा टाळण्यासाठी आम्ही ट्रक टर्मिनन्स, नो हॉकर्स झोन, सबवेज याची सुध्दा तरतुद करणार आहोत. आणि फुटपाथ व रस्त्त्यावर जी अतिक्रमणे आहेत. मग ती भंगारवाल्यांची असतील किंवा व्यापा-यांची असतील, कुणी सामान ठेवण्यासाठी त्याचा वापर करत असेल तर ही जी अतिक्रमणे आहेत ती आपण हटवून नागरिकांना तो रस्ता वापरासाठी मोकळा करून दयायाचा आहे. इतकी ही साधी कल्पना आहे आणि त्यासाठी आपण समिती नेमलेली आहे. या समितीमध्ये आम्ही पोलीस उपायुक्तांना सुध्दा घेतलेले आहे. आणि आमची वेळोवेळी याबाबत बैठक होईल व त्याचा आढावा घेतला जाईल. जिथे वाहतुकीची जास्त कोंडी होते ते विभाग आम्ही अगोदर निवडणार आहोत त्याची घोषणा आम्ही करणार आहोत. जाहिरात करणार आहोत की, लोकांनी त्याचा वापर या कामासाठी करू नये. आणि ऐवढे करून जर आम्हाला यश आले नाही तर मग आम्ही जबरदस्ती करून ही अतिक्रमणे हटविण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-मा.आयुक्त साहेब, माझी एक विनंती आहे की या कामासाठी तुम्ही जर एक विशेष पथक नेमले तर त्यासाठी आपल्या महापालिकेत असे काही लोक आहेत की, जी चांगले काम करू शकतात. तुम्हाला सुध्दा त्याची कल्पना आहे. जर त्यांचे एक विशेष पथक नेमले तर बरे होईल व लवकरात लवकर त्याची अंमलबजावणी होईल.

मा.आयुक्त :- आपण सुचना दया. त्यांचे स्वागत होईल.

मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर :- मा.आयुक्त साहेब,.... (श्री. नरेंद्र राजानी )आपण अद्याप बोलला नाहीत काय?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- अद्याप तरी नाही बोललो, साई दर्शन ते दर्शन, दर्शनते प्रभु, प्रभु ते राजु, राजु ते मोरे व पांडुरंग हे सर्व आले, मी त्यात नव्हतो बोललो. मी केव्हापासुन रांगेत उभा आहे. पांडुरंगाचे सुध्दा दर्शन झाले. विषय अतिशय लहान होता. आयुक्त साहेब, टप्पा एक, टप्पा दोन, ३३ रोड हे सर्व अद्याप स्पष्ट झाले नाही. शेवटी हे आहे तरी काय? हे टप्पे कोण ठरवते? हे टप्पे आमच्या शहरविकासाचे आहेत की, कर्ज मिळविण्याबाबतचे आहेत? प्रथम कोणते रस्ते तयार झाले पाहिजेत हे एम. एम.आर.डी.ए ठरविते , महासभा ठरविते की, आपण ठरविता हे पण काही समजत नाही? तर याबाबत संपुर्ण माहिती दिली जावी. जसे की मानेरा ते लालचक्की पर्यंतचा रस्ता आहे तेथील अतिक्रमणे हटविली गेली आहेत. काम पण सुरू केले आहे. आता दुस-या टप्प्यात ते काम आणले आहे. शेवटी हा टप्पा आहे काय? कीती टप्याने आमचे शहर तयार होणार आहे?

मा.महापौर :- मला वाटते या प्रस्तावाबाबत आयुक्तांनी पुरेसे स्पष्टीकरण केलेले आहे. आपण लोक समजु शकलो नाही. हा जो दुसरा टप्पा आहे तो बी.एम.आर.डी.ए चा आहे. आणि तो फक्त कर्जाबाबतचा आहे.

मा.आयुक्त :- साहेब, एक सेकंद, पहिल्या टप्प्यामध्ये आम्ही सिमेंट कॉक्रीटचे चार रोड घेतले होते. ओ.टी.सेक्शन ते विनस, गोल मैदानचा परिसर, झुलेलाल

मंदिर ते रेड क्रॉस , गोलमैदान ते शिवाजी चौक हे चार रस्ते व दोन उड्डाण पुल यामध्ये पवईचा एक ५० लाखाचा आहे तर उल्हासस्टेशनचा जो उड्डाण पुल आहे तो २.५ कोटीचा आहे. व दुस-या टप्प्यातील आता आम्ही आपणांस जे चार रोड सांगीतले ते असपाल्ट रोड आहेत. या रस्त्यांना महासभेने या पूर्वीच मंजुरी दिलेली आहे. आम्ही अशा रस्त्यांना प्राधान्य दिलेले आहे की जेथील अतिक्रमण हटलेले आहे. काम चालु आहे व बी.एम.आर.डी. एच्या हिशोबाने जसजसे काम पुर्ण होत जाते तसतसे (रिइंम्बसड) प्रतीपुर्ती आम्हाला मिळते. जर रस्त्याचे काम पुढे सरकले नाही तर निधी सुध्दा बी. एम.आर.डी.ए कडुन (रिइंम्बसड) प्रतीपूर्ती होत नाही. निवड करताना आम्ही हे क्रायटेरिया लक्षात घेतलेली आहे की महासभेने ज्यास मंजुरी दिलेली आहे, ज्या रस्त्यामध्ये कमीत कमी अडचणी आहेत असे रोड दहा-दहा करोडच्या दोन टप्प्यामध्ये आम्ही निवडले आहेत. फक्त कर्जासाठी हे दोन वेगवेगळे टप्पे तयार केलेले आहेत.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> म्हणजे ज्या रस्त्यांवर अतिक्रमणे पुर्णपणे काढली आहेत अश्या रस्त्यांना आपण प्राधान्य दिलेले आहे?

<u>मा.आयुक्त :-</u> बरोबर आहे.

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-</u> मा.महापौर.....

<u>मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> मा.महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, मी या रस्त्याविषयी एक विचारू इच्छितो की, ऐवढे मोठे कर्ज या संपुर्ण महानगरपालिकेवर लादले जाणार आहे. काही असे ठराविक प्रभाग आहेत की जेथे रस्ते हे नावापुरतेच आहेत. पण त्यांची दुरूस्ती केली जात नाही. आम्ही आमच्या नगरसेवक निधीमधुन ते दुरूस्तीचे काम करतो. माझ्या प्रभागामध्ये सिमेंट कॉक्रीटचा जो रोड तयार करण्यात आला त्याचे त्या ठेकेदाराला अद्याप पैसे सुध्दा मिळालेले नाहीत. आम्हाला त्याची सुध्दा कार्यवाही करता येत नाही. माझी विनंती आहे की, हे जे पहिला टप्पा, दुसरा टप्पा यामध्ये जो रस्ता विकास कार्यक्रम हाती घेतला आहे त्यामध्ये असा काही भाग आहे की, काही प्रभाग आहेत, काही रस्ते आहेत की जे विकास आराखडयामधुन वगळलेले आहेत. यांनासुध्दा काही प्रमुख रस्ते म्हणुन घेण्यात यावे अशी विनंती आहे.

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-</u> मा.आयुक्त साहेब, आपण हा प्रस्ताव आणलेला आहे. ज्या रस्त्यामध्ये वाहतुकीला जास्त अडथळा येतो अशा रस्त्यांना प्राधान्य देऊन त्यावर आपण अधिकाधिक लक्ष देणार आहात. तसेच काही वर्षापुर्वी १७ सेक्शन ते हिराघाट हा दुतर्फी रस्ता होता. वाहने येणे-जाणे दोन्ही बाजुने चालु होते परंतु वाहतुक जास्त असल्याने आमच्याच काही लोकांनी, पोलीस उपायुक्त किंवा वाहतुक पोलीसांनी एक दिशा मार्ग केला. तसेच डर्बी हॉटेलच्या समोरून हिराघाट पर्यंत असा येण्याजाण्यासाठी एक वेगळा मार्ग केला आहे. परंतु आता सध्या अशी परिस्थिती झाली आहे की, १७ सेक्शन पासुन हिराघाट पर्यंत ज्या उददेशांसाठी एकेरी मार्ग केला होता तो उदेदश आता आपल्या समोर सफल होताना दिसत नाही कारण तिथे खाजगी ट्रॅव्हल्सदारांची वाहने उभी असतात त्यांच्या प्रवाशांची सारखी ये-जा असते त्यामुळे तेथे नेहमी वाहतुक ठप्प झालेली असते. त्याचा प्रत्यय आपणांसही काहीवेळा येत असेल? काही सदस्यांना सुध्दा येत असणार? तसेच डर्बी हॉटेलपासुन हिराघाट पर्यंतच्या एक दिशा मार्गावर काही टॅकर उभे असतात. काहीवेळा टॅकर उभे असतात त्यामुळे रस्ता जॅम होतो. तर कृपा करून येणा-या समितीपुढे हा मुददा प्रकर्षाने ठेवावा व त्याला प्रथम प्राधान्य दयावे ही माझी विनंती.

<u>मा.महापौर</u> :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र७ वाचुन दाखवतात.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- आपण वाचुन का दाखवत आहात? हा मुददा वाचुन दाखविणे जरूरीचे आहे का? जो विषय आपण वाचुन दाखवत आहात तो वाचुन दाखविणे जरूरीचे आहे काय?

मा.सचिव :- का?

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-आपण जो विषय वाचुन दाखवित आहात तो वाचुन दाखविणे जरूरीचे आहे का?

मा.महापौरः-आपण पास. पास म्हणत असाल तर नाही वाचुन दाखवणार.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-मी सचिवांचे कायदेशीर मत आजमावुन पाहतो. विषय वाचुन दाखविणे आवश्यक आहे का?

मा.सचिव :- हे आपल्यावर अवलंबुन आहे, आपण कश्या प्रकारे करू इच्छित आहात? विषय वाचुन दाखविणे जरूरीचे आहे, परंतु बहुमताने ......

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- कालावधी किती वर्षाचा आहे? कारण काय आहे की, वरच्या बाजुला एक वर्षाचा कालावधी लिहिला आहे तर खालच्या परिच्छेदात पाच वर्षाचा कालावधी लिहीला आहे.

मा.महापौर :- श्री. लाल पंजाबी साहेब, सभागृहाची जशी इच्छा असेल, आपण म्हणाल तर पाच वर्ष नाही तर एक वर्ष जसे आपण म्हणाल तसे म्हणजेच सभागृह जे ठरवेल त्याप्रमाणे...

मा.सचिव :- एक वर्षाच्या कालावधीसाठी देऊ व नुतनीकरणाचा अधिकार आयुक्तांना देऊ.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- चाळीस-पन्नास वर्षासाठी करू शकता का?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-मा.महापौरजी, अट क्र.७ मध्ये लिहिले आहे की, भाडेपटयाने देणार तर किती भाडे घेणार आहात?

मा.सचिव :- पटटयाने देण्याचे लिहिले आहे. म्हणजे लिजने देणार आहेत.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- भाडे असेल ना महिन्याचे किंवा वर्षाचे काही तरी?

मा.महापौर :- स्वामी विवेकानंद शाळेच्या शेजारी, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला हा प्लॉट, जेथे मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांचे विदयार्थी शिक्षण घेतात त्यांना खेळण्यासाठी खेळण्याचे मैदान नाही. व हया मैदानाचा जो प्लॉट आहे. त्यावर दिवसेंदिवस अतिक्रमणे होत आहेत. अतिक्रणांपासून वाचविण्यासाठी आणि मुलांना खेळाच्या मैदानाची सुविधा देण्यासाठी आम्ही हे करीत आहोत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- मी हे जाणू इच्छितो की, त्यांच्याकडून काही घेतले जाईल की, निःशुल्क दिले जाईल? मी हे विचारु इच्छितो.

मा. महापौर :- भाडे घेण्याचा प्रश्न नाही कारण की, ती संस्था डेव्हलपमेंटवर त्यांचा पैसा खर्च करणार आहे.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- ते मी समजतो, माझे हे म्हणणे आहे की, त्यांच्याकडुन काही भाडे घेतले जाईल कींवा नाही?

मा.आयुक्त :- एक वर्षाने नूतनीकरण करण्याचा कालावधी ठेवला आहे. व जास्तीत जास्त पाच वर्षाचा कालावधी ठेवला आहे. या दरम्यान जर परवानगी रदद करायची असेल तर त्याचा निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे.

मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी :- मा.सदस्य हो, हा एक शाळेचा मुददा आहे,स्वामी विवेकानंद शाळा जेथे आमचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. व हे जे मैदान आहे ज्यास आम्ही खुनी खड्डा म्हणतो येथे फार मोठया प्रमाणात खड्डे आहेत. व एक वर्षाचा कालावधी हा अतिशय कमी मुदतीचा कालावधी राहील असे मला वाटते कारण की, एक वर्ष तर त्यांना खड्डे भरण्यामध्येच जाईल. शाळेविषयीचा हा मुददा असल्याने पाच वर्षाचा कालावधी केला तर अधिक योग्य होईल. आम्हाला आपले समर्थन पाहिजे. धन्यवाद.

मा.महापौर :- सदरचा विषय सर्वानुमते पुढील प्रमाणे समंत करण्यात येत आहे.

मा.महापौर :- आयत्यावेळच्या विषयान्वये एक प्रस्ताव चर्चेस घेऊ इच्छितो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- कोणता प्रस्ताव आहे?

मा.महापौरः- घन कच-यापासुन ग्रीन कोल प्रकल्प उभारण्याबाबतचा.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- ही जी सभा आहे. ती स्थगित झालेली सभा आहे. सभा स्थगितीच्यावेळी विषय सुची वरील विषया व्यतिरिक्त दुसरा कोणताही विषय त्यावेळी दाखल करून घेतलेला नव्हता. स्थगित सभेमध्ये तेच विषय येतात जे विषय सभा सुचनेवर असतात.

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- मा.श्री.लाल पंजाबी शहराच्या फायदयाचा एखादा मुददा येत असेल तर तो घेतला पाहिजे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- कायदयाची गोष्ट आहे. यासाठी आपण कधीही सात दिवसाची नोटीस देऊन सभा बोलावू शकता. स्थगित सभेमध्ये असा प्रस्ताव चर्चेस घेता येत नाही.

मा.महापौर :- ठिक आहे. हा विषय पुढील सभेच्या विषयसुचीवर आणला जाईल. पुढील दुसरी सभा पंधरा मिनिटानंतर म्हणजे ६ . १५ वाजता सुरू होईल. सायंकाळी ६ . ०० वाजता या सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखीजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२२/११/२०००.

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२२/११/२००० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक २२/११/२००० रोजी सायंकाळी ५. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शाविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उप महापौर :- श्री.धनंजय बोडारे.

| | |
|---|---|
| ३ श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह | ३५. श्री.वाधवा गिरधारी |
| ४ श्री.गणेश चौधरी | ३६. श्री.पारवानी रामचंद |
| ५ श्री. वाघे शामु | ३७. श्री. तलरेजा विनोद |

६ श्रीमती. मोकल सीमा
७ .श्रीमती.सोनावणे यमुना
८ श्रीमती.ज्योती कालानी
९ श्री.ढेणवाल बनवारी सुआलाल
१० श्री.उमाप रामदास
११ श्रीमती. वेलकर सुरेखा
१२ श्री. यादव नरेश
१३ श्री.सोनावणे राजु
१४ श्रीमती. दासानी मिनू
१५ श्रीमती. पंचाशिला पवार
१६ श्री. आढाव रामभाऊ
१७ श्री. बगाडे सुनिता
१८ श्री.भांडे भगवान
१९ श्री. ठाकुर सेवलदास
२० श्री.बनवारी किशोर
२१ श्री.तेजी कैलाश
२२ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
२३ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
२४ श्री.प्रमनानी ईश्वर
२५ श्रीमती.बसीटा बेबी
२६ श्रीमती मटाई जोनिता
२७ श्री.चौधरी राजेंद्र
२८ श्री. लांडे पांडुरंग
२९ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
३० श्री.मोरे भानजी.
३१ श्रीमती. राजवानी सुनिता
३२ श्री. वारींगे पंढरीनाथ
३३ . श्रीमती. टेकचंदानी चंदा
३४ . श्री.पुरस्वानी जमनादास
३८ . श्री. रोहडा श्यामसुदर
३९ . श्री. गुप्ता प्रभुनाथ
४० . श्रीमती. मालती करोतियाा
४१ . श्री. बहरानी ठाकुरदास
४२ . श्री.सुरेश जाधव
४३ . श्री.मोरे भिमसेन
४४ . श्री.चव्हाण रमेश
४५ . श्री. महाडिक प्रकाश
४६ . श्रीमती.साधवानी जया
४७ . श्रीमती.बनवारी मोना
४८ . श्रीमती.जेसवानी आशा
४९ . श्री.राजानी नरेंद्र
५० . श्री.मनसुलकर सुभाष
५१ . श्रीमती.नाईक यशस्विनी
५२ . श्रीमती. राजानी भारती
५३ . श्रीमती.कुंदनानी लविना
५४ . श्रीमती. वलेचा पदमा
५५ . श्रीमती.गजवानी कांता
५६ . श्रीमती.भठिजा इंदिरा
५७ . श्री.केणी जयकुमार
५८ . श्री.पंजाबी नारायण
५९ श्री.आयलानी कुमार
६० . श्री.अचनानी पम्मीकुमार
६१ . श्रीमती.वारिंगे पन्ना
६२ . श्रीमती. राधवानी आशा
६३ . श्री. प्रकाश माखिजा
६४ . श्री.रामरख्यानी मोहनदास
६५ . श्री. जग्यासी राजु
६६ श्री. बहरानी गोप
६७ . श्री.सचदेव गिरधारी
६८ . श्री.पंजाबी लाल.
६९ . श्री. केसवानी किशोर



१ श्री.टाले प्रमोद ,२ श्रीमती.रूपचंदानी भगवंती ,३ भाटीया जयप्रकाश ,४ श्री. क्रिशनानी गोदुमल हे सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सभेची सुरूवात ७ . ०० वाजता करण्यात आली.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

दि.२०.७.२००० रोजीच्या महासभा ठराव क्र. ९ मध्ये फेरबदल करण्यासाठी
प्रस्तावावर विचार करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :-आम्हाला हा ठराव मंजुर नाही आहे. नियमानुसार तीन महिन्याच्या आत कुठलाही ठराव आहे तो रदद केला जाऊ शकतो. म्हणून दिनांक २०.७.२००० चा टाऊन हॅालचा ठराव रदद करणेसाठी आम्ही येथे प्रस्ताव मांडत आहे.

<u>मा.महापौर</u> :- सेम थिंग आय सेड द प्रपोझल शुड बी रेड आऊट. माझ्याकडे एक प्रस्ताव आला आहे. त्याचे सुचक आहे श्री. नरेंद्र राजानी व श्रीमती.सुनिता राजवानी अनुमोदक आहेत श्री. लाल पंजाबी व श्री. प्रकाश महाडिक यांनी आपले विचार मांडावे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-महासभा ठराव क्र.९ या प्रमाणे आहे. ही सार्वजनिक बांधकाम समिती वरिल प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या टाऊन हॉल व तरण तलावाच्या बाजुला असलेल्या मोकळया जागेसह तरण तलाव या स्थावर मालमत्ता उपरोक्त प्रयोजनासाठी विकसित करणे कामी ३० वर्षाच्या कालावधीसाठी आयुक्त ठरवतील अशा अटीव शर्ती वर महासभेच्या अधिन राहून बिल्ट ऑपरेट ॲन्ड ट्रान्सफर या तत्त्वावर वर नमुद केलेल्या परवाना फी वर भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देत आहे. या ठरावानुसार आयुक्त ज्या अटी व शर्ती ठेवतील त्या महासभेच्या अधिन राहून असतील. इथे स्पष्टपणे लिहिले आहे. त्यानुसार आयुक्तांनी अटी व शर्ती महासभेच्या समोर आणल्या नाहीत. स्थायी समिती समोर आणुन तिथे बहुमताने मंजुर केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचा ३ नंबरचा ठराव महासभा ठराव क्र.९ च्या अधिन राहून असा आहे म्हणुन अटी व शर्ती महासभेसमोर आणल्या पाहिजे. नंतर निविदा वगैरे मागविल्या पाहिजे होत्या. नंतर टेंडर मागवले पाहिजे होते. पण असे झाले नाही या ठरावाची बिल्कुल अंमलबजावणी झाली नाही. म्हणुन आम्हाला हा ठराव मंजुर नाही आणि कायदयात पण अशी तरतुद आहे की, कोणताही ठराव जर मान्य नसेल तर तीन महिन्याच्या आत तो रदद करता येतो. म्हणुन आमची अशी मागणी आहे की, टाऊन हॉलचा ठराव चुकीचा आहे तो आम्हाला मान्य नाही तो नामंजुर करण्यात यावा.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- ३.७.२००० चा जो ठराव आहे.

इथे माईक व्यवस्था बिघडल्याने आवाज नीट ऐकु येत नव्हता. म्हणुन प्रेक्षक वर्ग आवाज आवाज असे ओरडत होते.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- तुम्ही बोला.

मा.सदस्य श्री.नरेंद राजानी :- सोडा माईकला. पत्रकार वर्गाने आवाजाबाबत चिंतीत होऊ नये. आम्हाला सभा चालवू दयावी.



मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- जाणुन-बूजून हे सर्व चालले आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- जाणुन बूजून नाटक करीत आहे. माईक बंद केल्याने आमचा आवाज बंद होणार नाही. उलट बुलंद होईल. नरेंदजी आपण मोठ्या आवाजात बोला.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- जाणुन-बूजून करत आहेत. आमच्याच वेळी मुददाम असे करतात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- माईकसाठी पण रडत आहेत.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- सत्ता चालवत आहे. साधा माईक नाही चालवता येत. शहरास काय सांभाळणार? सोडा सत्ता आमच्या हातात दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- माईक आणि सत्तेचा काय संबंध आहे?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-गलिच्छ वस्तीचे सभापती आहात. एका वर्षात एक पैसा नाही आला शासनाकडुन गलिच्छ वस्तीसाठी सभापती झालेत. ते पहा जरा आणि सत्ता चालवत आहेत. दुस-या सभेत प्रश्न येईल तेव्हा त्याचे उत्तर दया.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- देऊ उत्तर देऊ.

इथे माईक व्यवस्था दुरूस्त करत असताना....

मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :- मा.महापौरजी, मला काही बोलायचे आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- हे काय चालु आहे. सचिवांचा माईक चालत नाही आपला माईक चालत आहे याचा काय अर्थ आहे?

मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :- राजानीजी, आपण या माईकवर येऊन बोला.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- महाडिकजी, तुम्ही वाचा.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- हा जो ठराव झालेला आहे तो रद्द करण्याच्या संदर्भात आम्ही विशेष महासभा बोलावली आहे. त्यासंबंधीत आम्ही जो ठराव मांडत आहे तो अशा प्रकारे आहे.

दिनांक २०.७.२००० रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेमध्ये टाऊन हॉल व तरण तलाव बांधा, वापरा व हस्तांतरीत करा, (बिल्ड, ऑपरेटर आणि ट्रान्सफर)या बददलचा विषय महासभा ठराव क्रमांक. ९ नुसार त्यामधील अटी व शर्ती विषयी कसलीही चर्चा न करता विरोधी पक्ष अनुपस्थित असल्याचे भासवून बेकायदेशिररित्त्या पारीत करण्यात आला.

वास्तविक कोणताही विषय महासभेमध्ये ठेवतांना विषय वाचुन दाखवुन ठराव मांडणे आवश्यक असते परंतु दिनांक २०.७.२००० रोजी इतिवृत्त पहाता तसे केलेले नाही ठराव फक्त विषय क्रमांक३ असा उल्लेख करून व त्याच पध्दतीने महापालिका स्थायी समिती समोर आयत्त्यावेळचा विषय म्हणुन आणुन



सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यासाठी काही सदस्य आक्षेप घेत असताना देखिल त्यांना त्याविषयी चर्चा करू न देता धिसाड घाईने पारीत करण्यात आला.त्यामुळे कोणत्त्याही सभागृहासमोर त्यामधील अटी व शर्तीविषयी चर्चा करण्यांत आली नाही.

जनरल अरूणकुमार वैद्य नावाने असलेल्या सभागृहामध्ये अद्ययावत बियरबार हॉटेल म्हणजे त्यामध्ये सर्व प्रकारचे मद्य आली तसेच सदरचे सभागृह यापुढील तीस वर्षासाठी ठेकेदाराला देण्यात येत आहे व सभागृह मधील तसचे तेथील इतर सर्व दर हे ठेकेदाराने ठरवायचे आहे. असे नमुद केले गेलेले आहेत. त्या अटी व शर्ती व्यतिरिक्त इतरही अटी व शर्ती अशा आहेत की, त्यामध्ये जनहितापेक्षा व्यापारीकरणात जास्त जोर देऊन ठेकेदाराचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल याचा विचार केला गेलेला आहे.

सदरचे सभागृह पुढील तीस वर्षे सर्वसामान्यांच्या उपयोगाचे नाही त्यामुळे सदर ठरावानुसार सर्वसामान्यांचा विचार केला गेलेला नाही त्यामुळे उल्हासनगरमध्ये प्रचंड जन प्रक्षोभ झाल्यामुळे व जन आंदोलन होण्याची शक्यता विविध प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रकट झालेले आहे व त्याचे पडसाद संपुर्ण महाराष्ट्र भर उमटलेले आहेत. शहरातील सर्वसामान्यांच्या भावना लक्षात घेऊन महापालिकेतील १/४ सदस्यांनी सदर विषयांवर प्रगलभबंधा पुर्वक विचार विनिमय करून अटी व शर्ती ठरविण्यासाठी विशेष महासभेसमोर विषय ठेवला आहे.

सदर ठरावांवर प्रगल्भपुर्वक चर्चा करून उल्हासनगरमधील जनतेच्या हिताच्या व सर्वसामान्य जनतेच्या हितास बाधा आणण्याच्या खालील अटीवर चर्चा व्हावी.

१) जनरल अरूणकुमार वैद्य नावाने असलेल्या सभागृहामध्ये दारू विक्री होणे.
२) सदर ठरावानुसार ठेकेदाराला सभागृहापुढील तीस वर्षासाठी दिल्यामुळे एक संपुर्ण पिढीवर अन्याय होत आहे. ३० वर्षे भाडे तत्त्वावर दोन कोटी रूपयांच्या बदल्यात देणे योग्य की अयोग्य?
३) सदर सभागृहामध्ये दर फिक्स करण्याचे ठेकेदारावर सोडणे योग्य की अयोग्य? दर काय असले पाहिजेत हे अधिकार महापालिकेचे अधिकार ठेकेदाराला देणे योग्य की अयोग्य?
४) दिनांक २०.७.२००० रोजीच्या महासभेमध्ये टाऊन हॉल संबंधीचा ठराव क्र.९ पास झाला आहे. तो असा आहे की, महासभा सार्वजनिक बांधकाम समितीच्या दिनांक ३.७.२००० रोजीचा ठराव क्र.३ कायम करीत आहे व सार्वजनिक बांधकाम समितीचा पास झालेला दिनांक ३.७.२००० रोजीच्या ठरावानुसार ३० वर्षाच्या कालावधीसाठी आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती महासभेच्या अधिन राहून असे आहे तर त्या अटी व शर्ती महासभेमध्ये मंजुर केल्या गेल्या का?
५) महापालिका किंवा महानगरपालिकेतील कोणत्त्याही व्यक्तीला ५२ दिवसा व्यतिरिक्त सभागृह भाड्याने घ्यावयाचे असल्यास १८० दिवस अगोदर म्हणजेच ६महिने अगोदर कार्यक्रम निश्चित करणे शक्य आहे का? तसेच इतर सर्व बाबींवर चर्चा करून हा ठराव (महासभा ठराव क्र.९दिनांक. २०.७.२०००)रद्द करावा व शहरातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने योग्य असा नविन ठराव महासभेमध्ये आणावा.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- माझे म्हणणे हे आहे की, हे माईक/ मशिनरी इतक्या वर्षापासुन चालत नाही तिचे पण खाजगीकरण करा. कोणी बिअरबारवाला घेत असेल तर ठिक आहे.

<u>मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :-</u> मा.महापौरजी ,उप-महापौर, आयुक्तसाहेब,



टाऊन हॉल भाडे तत्त्वावर देण्यासाठी बिल्ट ऑपरेट कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग समितीने दि.३.७.२००० रोजी ठराव पास केला. नंतर महासभेत आणला गेला. दिनांक १३.७.२००० ला अजेंडा निघाला. त्यावेळी सर्व नगरसेवकांना
माहिती दिली गेली होती आणि महासभेमध्ये सर्व संमतीने ठराव पास झाला. कोणत्त्याही ठरावास महासभेत मंजुरी मिळाल्यानंतर किती दिवसात रद्द केला जातो. मी सचिवांना विनंती करेन ही माहिती त्यांनी महासभेला दयावी. किती दिवसात महासभेत आणावा लागतो?

<u>मा.सचिव :-</u> जर ठरावाची अंमलबजावणी झाली नसेल तर केव्हाही तो ठराव आणु शकतात.

<u>मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी</u> :- ठरावाची अंमलबजावणी झाली पाहिजे. या ठरावानुसार निविदा देखिल मागवल्या होत्त्या. सर्व वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. कृपया आपण सांगा अजुन काय अंमलबजावणी होणे बाकी आहे.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मन्सुलकर :-</u> ज्यावेळी हा ठराव महासभेत आणला गेला होता त्यावेळी श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या अटकेच्या निषेधार्थ म्हणुन सर्व शिवसेना भाजपा नगरसेवकांनी बायकॉट केले होते. सर्व नगरसेवक सभा त्याग करून गेले. भाजपाचे दोन सदस्यच त्यावेळी हजर होते ते पण निघुन गेले.

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u>* :- बायकॉट नव्हते केले वॉक आऊट केले होते.

*<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर</u>* :- त्यावेळी सभेमध्ये जे सदस्य उपस्थित होते त्यावेळी बहुमताने हा ठराव मंजुर केला होता. परंतु या ठरावाच्या अटी व शर्ती ज्या अधिकारींनी निश्चित केल्या. सभेने तर नाही निश्चित केल्या. मी विनंती करतो की, ज्यांनी अटी व शर्ती निश्चित केल्या त्या अधिका-यांना मंचावर बोलवावे. आमच्या सदस्यांना अटी व शर्ती माहित नाही. त्याचा खुलासा झाला पाहिजे सदनाला याबाबतीत समजले पाहिजे नंतर चर्चा झाली पाहीजे.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>* आता श्री. जमनु पुरस्वानी म्हणाले की, अटी व शर्ती आम्ही तेरा तारखेला सर्व सदस्यांना प्रस्तुत केल्या होत्त्या हे एकदम चुकीचे आहे. १३.७.२००० ला फक्त प्रस्तावना दिली गेली होती तरण तलाव भाडयाने देण्याबाबतची. इथे पी.डब्लु.डी.च्या ठरावात स्पष्ट लिहिले आहे की, अटी व शर्ती आयुक्त ठरवतील महासभेच्या अधिन राहून. याचा अर्थ अटी आणि शर्ती महासभेच्या समोर आणल्या जातील. पण त्त्या अटी व शर्ती महासभेसमोर आणल्या नाही गेल्या. जमनु पुरस्वानी म्हणतात की, १३.७.२००० ला अटी व शर्ती प्रस्तूत केल्या गेल्या होत्त्या. तसे नाही ती प्रस्तावना होती.

*<u>मा.सदस्य श्री. सुभाष मन्सुलकर</u>* :- मा.आयुक्त साहेब,आमच्या ज्या अटी व शर्ती स.सदस्यांना माहित नाहीत. ज्या अधिकारींनी त्या निश्चित केल्या आहेत. त्यांनी वाचुन थोडी आमच्या माहितीत भर घालावी.

श्री.इदनानी हरेश (उपमुख्य लेखा अधिकारी) मंचावर स्पष्टीकरण देण्यासाठी आले असता.

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u>* :- श्री. हरेश इदनानींना परत पाठवा. प्रस्ताव आयुक्तांनी आणला आहे. त्यांनीच बोलावे. वकीलीगीरी दरवेळी नको बस्स झाले.

*<u>मा.आयुक्त :-</u>* मा.महापौर, सन्माननिय सदस्य, टाऊन हॉल भाडयाने देणे बाबत या विषयावर चर्चा करण्यासाठी आजची विशेष महासभा बोलावली गेली आहे. यापूर्वी पण

--६--

यावर खुप चर्चा झाली आहे. खाजगीकरण करणे किती जरूरी आहे हे आता मी सांगुन वेळ वाया घालवत नाही. मी यापुर्वी असे म्हणालो की, दुर्दैवाने या प्रस्तावावर चर्चा नाही होऊ शकली.

*<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u>* :- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब सदनाला कन्वेंन्स करत आहेत. ते आम्हाला नको.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u>* तुम्ही अटी व शर्ती सांगा.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>* :- तुम्ही काय विचार करून खाजगीकरण केलेले आहे. ते सदनाला समजवा.

*<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u>* :- चेअरमनने सांगीतले आहे. आता आयुक्तांनी नको सांगायला.

सर्व सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>* आयुक्तांचे मार्गदर्शन या विषयी हवे. सदनास मार्गदर्शन करा.

*<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-</u> मु.प्रां.म.पा.अधिनियम १९४९ कलम ४३ (२)अन्वये आयुक्तांना कोणत्त्याही प्रस्तावावर मांडण्याची मोकळीक असणार नाही. मी तुमच्यासाठी ते कलम ४३ (२) वाचुन दाखवतो. आयुक्तांस महापालिकेच्या सभेत उपस्थित राहण्याचा व तीत होणा-या चर्चेत भाग घेण्याचा पालिका सदस्याला जो अधिकार असेल आणि त्यास अध्यक्षपदस्थ प्राधिका-याच्या परवानगीने कोणत्त्याही वेळी वस्तुस्थितीसंबंधी निवेदन किंवा स्पष्टीकरण करता येईल, परंतु त्यास अशा सभेत कोणत्त्याही प्रस्तावावर मत देण्याची किंवा तो मांडण्याची मोकळीक असणार नाही.*

*<u>मा.आयुक्त :-</u> साठ शर्ती इथे दिल्या आहेत त्यापैकी ज्या महत्त्वाच्या आहेत. ज्याच्यामुळे हरकत घेतली गेली आहे. सर्व वाचत बसलो तर खुप वेळ जाईल. ज्या मेजर कंडीशन आहेत त्या मी वाचुन दाखवतो.*
*१) कंम्प्लीट सीटींग अरेंजमेंटस् फॉर द ऑडीयन्स.*
*२) डिजीटल साऊंड सिस्टीम*
*३) फॉल्स् सिलिंग.*
*४) कलरिंग ऑफ द अेन्टायर कॉम्प्लेक्स.*
*५) फर्निचर फिटींग ॲन्ड इंटीरीयर डेकोरेशन.*
*६) एयरकंडीशनींग इन द हॉल.*
*७) नॅसेसरी लाइटिंग.*
*८) मार्बल फ्लोरिंग.*
*९) बॅलेन्स सिव्हिल वर्क.*
*१०) प्रोव्हायडिंग लिफ्ट.*
*११) वॉटर प्रुफिंग.*
*१२) ऑदर इनसिडंटल वर्क.*

*दुसरी जी शर्त आहे ती ही आहे की, प्रत्त्येक शनिवारी कल्चर ॲक्टीवीटीसाठी हॉल मोकळा ठेवायचा. ड्रामा असो, नाटक असो, कल्चर फक्शंन असो, १८० दिवसाआधी जर कोणी अर्ज दिला असेल तर त्या दिवसासाठी त्यांना हॉल दयावा लागेल. बाकीचे जे दर आहेत कल्चर ॲक्टीवीटीज सोडुन त्यावर आम्ही पाबंदी नाही लावली. लायसन्ससीला ॲडव्हटायझमेंट व होर्डींग ची परमिशन दिली गेली आहे. सर्वात महत्त्वाची जी अट आहे. ज्याच्यामुळे आज हा विषय*



*आणला आहे. तो म्हणजे लायसन्सीज टाऊन हॉलचा वापर मॅरेजेस कॉन्फरन्स एक्झीबिशन कम सेल्स, रेस्टॉरंट कम बार, जीमखाना, इंटरटेनमेंट गेमस् रिक्रीएशन सेंटर ॲन्ड अदर फंक्शन ॲट द रेट फिक्स बाय हिम फॉम टाईम टू टाईम द लायसन्सी शॅल नॉट युज अेनी पार्ट ऑफ प्रिमायसेस ऑफ टाऊन हॉल फॉर इललिगल ॲन्ड इंम्मोरल परपज द लायसन्सी शॅल नॉट कीप ओपन द प्रिमायसेस फॉर अेनी एक्सप्लोसिव्ह ऑर अेनी आदर आर्टीकल्स प्रोहॅबिटेड ॲण्ड इन एक्सेस ऑफ क्वानटिटी स्पेसिफाय अंडर अेनी लॉ फोर द टाईम बिईंग इन फोर्स. लायसेन्सी शॉल नॅाट ॲट अेनी टाईन डु क्रॉस ओर परमिट अेनी न्युसेन्स इन ओर अपॉन द प्रिमाईस ॲण्ड इन पर्टिक्युलर शॉल नॉट युज ओर परमिट द सेड लॅण्ड टू बी युजड् फॉर व्हॉट इज नॉट ग्रॉटेंड.*

*द लायसेन्यसी कॅन कन्सट्रक्ट अ जेमिनिशियम / जिमखाना विथ मॉर्डन इक्युपमेंटस् / अेमिनिटीझ ॲण्ड मेक ओपन टू पब्लिक सबजेक्ट टू पेमेंट ऑफ फिस् प्रिसकाईब्ड बाय हिम.*

*प्रवेश फी आम्ही निश्चित केली नाही. कारण जर ठेकेदाराने जास्त दर लावला तर शहरातील दुस-या हॉलपेक्षा जास्त दर असल्यास तो स्पर्धेत टिकु शकणार नाही.*
*त्यांना ३० वर्षानंतर जश्या स्थितीत जागा आहे त्या स्थितीत दयायचे आहे. तसेच लाईट, स्टाफ खर्च, दुरूस्ती याचा भार त्यांच्यावर ठेवला आहे. तसेच पुर्ण प्रकल्पांचा इन्शुरन्स त्याला करायचा आहे. तसेच त्यांना लायसेंस फी जी पंचवीस हजार जी प्रतीमहा निश्चित केली आहे ती पाच वर्षापर्यंत आहे. नंतर*

६ ते १० वर्षापर्यंत १० टक्के वाढ, १० ते १५ वर्ष १० टक्के वाढ, १५ ते २० वर्ष १० टक्के वाढ, २० ते २५ १० टक्के वाढ, २५ ते ३० १० टक्के वाढ असे त्यांना दर पाच वर्षानी वाढ करून दयायची आहे. जर ठेक्यात काही वाद निर्माण झाला तर अंतीम निर्णय देणे आयुक्तांच्या हाती असेल. आम्ही टेंडर मागविले त्यापैकी एक टेंडर दोन करोडचे आले होते व दुसरे टेंडर दोन करोड दोन लाख पंच्यांशी हजार किंमत आली होती. मी मेजर कंडीशन तुम्हाला सांगीतल्या आहेत. इतर मायनर कंडीशन सांगणे गरजेचे नाही. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- मा महापौर,२० जुलैला जी महासभा झाली त्यात विपक्ष नेता असे पण म्हणाले की, आम्ही १० मिनिटासाठी वाक आउट करतो. ५.२५ वाजता आम्ही वॉक आउट केले होते. पण आम्ही तीन मिनटातच परत आलो होतो. येवून पहातो तर हा विषय पास झाला होता. ५.३२ वाजेपर्यंत पूर्ण कार्यसूचीचे विषय वाचले गेले होते आणि ६ मिनिटातच सभा संपविण्यात आली होती. हे सर्व इतिवृत्तात आले आहे. या विषयावर चर्चा झाली नाही म्हणुन आम्ही विचार केला की. विशेष सभा बोलावून या विषयावर चर्चा केली जावी. हा टाउन हॉल चा विषय खूप गंभीर झाला आहे. उल्हासनगर शहरात गल्लोगल्लीत हा विषय चर्चेचा बनला आहे. सर्वात प्रथम हा मुददा आहे की, २०.७.२००० चा जो ठराव आहे त्यात ठेकेदारास ३० वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी आपण देत आहात. हे नुसते बंधन आपल्याला नसुन आपल्या येणा-या पिढीला सुध्दा आहे. आणि याचे परिणाम त्यांना देखिल भोगावे लागतील. इतक्या वर्षासाठी खाजगीकरण करणे योग्य नाही. आपली पिढी तर संपेल पण येणा-या पिढीला त्रास होईल. या हॉलचे नाव जनरल अरूणकुमार वैद्य ठेवले गेले आहे. ज्यांनी देशासाठी बलिदान दिले आहे. अशा व्यक्तीच्या नावाखाली बिअरबार उघडणे किंवा विडीओ गेम वगैरे चालविणे हे कोणालाही पटत नाही. मागे जेव्हा टाऊन हॉल विषयी चर्चा झाली. आताही त्यातील काही नगरसेवक इथे बसले आहेत. ज्यावेळी टाऊन हॉल निर्माण झाला त्यावळी तिथे सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात येतील हे उददीष्ट डोळयासमोर होते. जेव्हा सांस्कृतिक कार्यक्रम होतात तेव्हा सर्वजण आपल्या पत्नी व मुलासमवेत इथे येतात. आता जेव्हा ते सांस्कृतिक कार्यक्रमांना जातील तेव्हा तिथे बिअरबार पाहतील याचा लहान मुलांवर वाईट परिणाम होईल. म्हणुन आमची ही इच्छा नाही की, टाऊन हॉलचा वापर बिअर बार



साठी करावा. आणि त्याच प्रकारे हे टेंडर अशा प्रकारे भरले गेले जसे पिक्चरमध्ये दाखवतात. ज्याप्रकारे पिक्चर बनतो. रोमांटीक हिरो असेल तर रोमांटीक स्टोरी असते त्याप्रमाणे स्क्रीप्ट बनवली जाते. थ्रिलर असेल तर थ्रिलर स्टोरी असते. या ज्या अटी व शर्ती तयार केल्या आहेत त्या असे वाटते जनतेचा फायदा न बघता ठेकेदाराला जास्तीत जास्त फायदा व्हावा यादृष्टीने तयार केल्या आहेत. महाराष्ट्रात सगळीकडे आपण पहातो उदा. कधी ठाण्याहुन मुंबईला जातो तेव्हा आधी आपल्याला टोलकर चार्ज भरावा लागतो. तो कर शासन ठरवते ठेकेदार नाही. जर ठेकेदाराला दिले तर तो म्हणले मी २०० रू. चार्ज करतो. नाही दिले तर मुंबईत त्यांना फिरता नाही येणार. असे नसते कर लादण्याचा अधिकार शासनाचा आहे. नगरसेवकांनी मिळून हे ठरवले पाहिजे की, ठेकेदारांनी किती भाडे जनतेकडुन घेतले पाहिजे. आपल्या शहरात खुप हॉल आहेत. जर ठेकेदाराला भाडे ठरवण्याचा अधिकार दिला तर लग्नास हॉल हवा असेल तर सामान्य माणसाकडुन तो ४०,००० हजार भाडे घेईल. तो अधिकार जर ठेकेदाराला दिला तर शहराच्या हातात काय राहील.?त्याचा फायदा काय होईल? हा हॉल सरकारी आहे. सामान्य जनतेसाठी दिला आहे. जर एखादया गरीब माणसास आपल्या मुलीचे तिथे लग्न करायचे असेल तर ५ किंवा १० हजारात त्याला हॉल पाहिजे असेल तर तो काय करील. तो तिथे मुलाचे / मुलीचे लग्न लावू शकणार नाही कारण भाडे ठरवण्याचा अधिकार आपण ठेकेदाराला दिला आहे. गरीब जनतेला याचा काही फायदा होणार नाही. प्रवेश फी तिथे <u>१००/-</u>रू असेल <u>५०००/-</u>रू असेल किंवा अजुन जास्त असेल जसे मुंबई मध्ये मोठमोठया क्लबची प्रवेश फी एक लाख रू. असते. जसे सी.सी. आय मध्ये असते ठेकेदार म्हणेल मी ऐवढा खर्च केला. मला फायदा झाला

पाहिजे त्यामुळे कोणा मध्यम वर्गीय किंवा गरीब माणसाला त्याचा फायदा होणार नाही. अजुन एक गोष्ट यात आहे की, आपण ठेकेदाराला पुर्ण सुट दिली आहे की, प्रोजेक्ट रिपोर्ट तुम्ही नंतर दया आधी टेंडर भरा वर्क ऑर्डर घ्या आणि नंतर तुम्ही आरामशीर प्रोजेक्ट रिपोर्ट दया आम्ही पास करू. इतके अधिकार तुम्ही ठेकेदारांना दिले आहेत. या अटीवर आमची हरकत आहे. जनतेचे किती शोषण झाले तरी तुम्हाला चालेल. समजा एखादा गरीब माणुस आमच्याकडे आला की तो हॉल आम्हाला हवा आहे तुम्ही थोडे कंन्सेशन आम्हाला घेवून दया. तर नगरसेवक काहीच करू शकणार नाही कारण तुम्ही सर्व अधिकार ठेकेदारांना दिले आहेत. काही कायदेशिर त्रुटया देखिल त्यात आहेत. जसे सेक्शन ७९ (सी)चा इथे उल्लेख केला आहे. पी.डब्लु.डी.च्या ठरावात सेक्शन ७९(सी)चा उल्लेख केला आहे. तो मी तुम्हाला वाचुन दाखवतो. आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पटटयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल. त्याच्याखालीच (ड)आहे त्यात लिहिले आहे जो मोबदला घेऊन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पटटयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये. म्हणजे आपणांस आधी चालु बाजार किंमत काढायला पाहिजे होती. तुम्ही फिक्स केले पंचवीस हजार रू. महिना तुम्ही विचार करून भाडे नाही ठरविले. आपल्या शहरात लग्नाचे खुप लॉन्स आहेत. जसे मयुर, माया, इत्त्यादी. ठेकेदार लाखो रू. वर्षाला भरतात. हा जो दर आहे तो चालु बाजारभावाप्रमाणे नाही. मला असे वाटते तुम्ही फक्त सेक्शन ७९ (सी) फक्त वाचला त्याच्याखालचा (डी)वाचला नाही. तसेच तुम्ही अजुन एक सेक्शन विसरला आहात. ६६ (अ) हा सेक्शन तेव्हा लागु होतो जेव्हा बिल्ट ऑपरेट कम ट्रान्सफर म्हणजे जेव्हा आपण स्वतः तो खर्च करू शकत नाही तेव्हा लागु करतो जसे आम्ही जकात विभागाचे खाजगीकरण केले. याचे काही प्रस्ताव असतात ते सेक्शन ६६ अ (१)व (२) नुसार येतात. मी वाचुन दाखवतो. या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्त्याही अन्य कायद्यान्वये महानगरपालिकेवर कोणतेही कर्तव्य लादण्यात आलेले असेल किंवा कोणतेही काम तिला नेमुन देण्यात आलेले असेल, किंवा राज्य शासनाकडुन किंवा एखाद्या इतर प्राधिकरणाकडून एखादी



योजना राबविण्याचे काम महानगरपालिकेकडे सोपविण्यात आलेले असेल त्या बाबतीत-

१)महानगरपालिकेला स्वतःच अशी कर्तव्य पार पाडता येतील किंवा अशी कामे करता येतील किंवा अशा योजना राबविता येतील, किंवा
२) राज्य शासन देईल अशा निदेशांच्या आणि ठरवून देईल अशा अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून, कोणत्त्याही अभिकरणाकरवी ती पार पाडण्याची, करण्याची किंवा राबवण्याची व्यवस्था करता येईल.

परंतु महानगरपालिकेला अशा अभिकरण व्यवस्थेसाठी, राज्य शासन ठरवून देईल अशा अटींशी व शर्तीशी विसंगत नसलेल्या अटी व शर्तीदेखिल विनिर्दिष्ट करता येतील. या शर्ती व अटी शासनाकडुन मंजुर होऊन आल्या पाहिजेत. जकातीच्या वेळी पण असेच केले होते. अटी व शर्ती शासनाकडे पाठवल्या होत्त्या. ते महाराष्ट्र सरकार मंजुर करते. अंडर द कंन्ट्रोल ऑफ स्टेट गर्व्हनमेंट. प्रधान सचिव तसे परिपत्रक काढतात. हा जो जुना ठराव आहे २०.७. २००० चा टेंडर देखिल स्थायी समितीने मंजुर केले आहे. तो ना जनतेच्या फायदयाचा आहे ना कायदयाच्या दृष्टीने योग्य आहे. आम्ही विपक्षात आहोत. आम्हाला माहित आहे तुम्ही बहुमताने एखादा ठराव मंजुर करू शकता. पण मी एक गोष्ट सांगु इच्छितो की, खरे खोटे हे बहुमताने ठरत नाही. जर तसे असते तर बहुमताच्या आधारे प्रधानमंत्री चीफमिनिस्टर हे हुकूमशहा बनले असते

व त्यांनी जनतेवर जुलूम केले असते पण असे होत नाही कारण जनता ही सर्वात मोठी व महत्त्वपूर्ण आहे. ती आम्हाला पहाते आहे, आमच्या गोष्टीवर जनतेचे लक्ष आहे. कार्यावर लक्ष आहे. आपण जर काही चुकीचा निर्णय घेतला तर बाहेर बसलेले शहरवासी आपल्याला माफ करणार नाही. असे बोलुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा.महापौरजी, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता जेव्हा आपण बजेट प्राव्हिजन तयार करत होतो तेव्हा सर्वजण म्हणत होते जसे ऑक्ट्रायचे खाजगीकरण झाले तसे स्वीमींग पुल व टाऊन हॉलचे खाजगीकरण झाले पाहिजे. सेनिटेशन पण खाजगीकरणात आले पाहिजे. दोन महिन्यापूर्वी जेव्हा विनोद तलरेजाचा प्रश्न होता की, स्वीमींग पुलचे अजुन खाजगीकरण का नाही केले? तेव्हा ढाकरे साहेब म्हणाले होते की, कार्यवाही पुर्ण होत आली आहे देण्यात येईल. तेव्हा कोणी सदस्य काही म्हणाले नाही. त्यानंतर हा ठराव २०.७.२००० ला महासभेत आणला गेला तेव्हा विपक्ष वॉकआऊट करून बाहेर गेले होते. त्यानंतर २०.८.२००० ला जेव्हा महासभेत इतिवृत कायम होत होते तेव्हा महाडिक साहेबांनी हरकत घेतली होती की, ठराव एकमताने की बहुमताने पास या विषयावरच त्यांनी अर्धातास चर्चा केली होती. त्यावेळी एकदाही त्यांनी या ठरावावर हरकत नव्हती घेतली. कोणाही सदस्याने इतिवृत्त कायम करताना या ठरावाबाबत हरकत नव्हती घेतली. तेव्हा कोणीही असे नाही म्हटले की टाऊन हॉल का देत आहे? याच्या अटी व शर्ती काय आहेत? आम्हाला चर्चा करायची आहे? त्यावेळी फक्त एकमताने बहुमताने ठराव पास कसे झाले यावरच चर्चा झाली? त्यावेळी त्यांनी हरकत घ्यायला पाहिजे होती? त्यावेळी सर्वजण सदस्य होते. नंतर तुम्ही टेंडर मागविले. नॅशनल पेपरमध्ये त्याची जाहिरात देण्यात आली होती. त्यावेळी जितकी लोकपण फॉरवर्ड आहेत त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी हरकत नाही घेतली. जेव्हा टेंडर भरणे चालु होते तेव्हा पण कोणी हरकत नाही घेतली. त्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जस्ट फॉर इनफरमेशन म्हणुन स्थायी समितीमध्ये आले. जितके पण गोषवारे आहेत. स्थायी समितीचे असो, पी.डब्लू.डी.चे असो कोणाचेही असो ते सर्व आयुक्तांकडुन येतात. त्यावेळी आम्ही स्थायी समितीमध्ये जस्ट फॉर इनफरमेशन साठी टेंडर पास केले की, जेणेकरून ठेकेदारांना ठेका देण्यात यावा. फक्त माहितीसाठी स्थायी समितीत आले होते.

--१०--

<u>मा.सदस्य श्रीमती. सुनिता राजवानी ,श्री.नरेंद्र राजानी</u> :- महासभेमध्ये कधी आले होते? महासभेत नव्हते आले.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- २०.७.२००० च्या महासभेत पास झाले आहे. कोणतेही ठराव असो, स्थायी समितीचे, महासभेचे आयुक्त त्यावर पुढे कार्यवाही करतात. त्यांनी त्यानुसार निविदा मागविल्या. आता आपण ही नवीच प्रथा पाडत आहोत की ठराव रदद झाले पाहिजेत. नवीन संशोधन झाले पाहिजे. आज जर आपण यावर संशोधन केले तर कोण आयुक्त स्थायी समिती व महासभेच्या ठरावाची अंमलबजावणी करेल? ते तर असे म्हणतील की, तुम्ही केव्हाही ठरावात फेरबदल करता किंवा रदद करता म्हणुन जी पण निवडुन आलेले प्रतिनिधी जे मंजुर करतात त्यावर आयुक्त कार्यवाही करतात. विषय मंजुर करताना विपक्ष सदस्य जरी उपस्थित नव्हते तरी इतिवृत्त मंजुर करताना ते उपस्थित होते. उगाचच मुददा वाढवायचा आणि सांगायचे शहरात चर्चा होत आहे. काही कुठे चर्चा होत नाही आहे. आज महापालिकेची आर्थिक स्थिती नाजुक आहे. ७८ करोड रू.चे कर्ज फक्त पाणीपुरवठयाचे महापालिकेवर आहे. आज जर बारा वर्षापासुन टाऊन हॉल बंद आहे तर कुणी लक्ष नाही दिले. कुणी गरीब तिथे लग्नासाठी गेला नाही. बारा वर्षापासुन जेव्हा बंद होते तेव्हा कुणाला चिंता नव्हती. तर मेहरबानी करून याला राजकीय मुददा नका बनवू. हे महापालिकेला मिळणारे उत्त्पन्नाचे साधन आहे. तेव्हा कृपा करून असे करू नका. जुलै महिन्यात पास झालेला ठराव तुम्ही नोव्हेंबर मध्ये आणत आहात हे ठिक नाही. आज टाऊन हॉलवर दोन करोड खर्च करावे लागतील. महापालिकेची तेवढी

आर्थिक कुवत नाही. तर मेहरबानी करून जास्त वेळ घेऊ नका. ज्या सदस्यांना बोलायचे ते बोलले आहेत. खुप वेळ झाला आहे तेव्हा मेहरबानी करून जसा आहे तसा ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच जुलै महिन्याच्या ठरावात कोणताही फेरबदल करू नका.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- मा.महापौरजी, आता जे सभागृह नेता म्हणाले त्यांना मी काय म्हणु मला माहित आहे त्यांचे मराठी खुप कच्चे आहे. आणि सभागृहाचे कामकाज मराठीतच झाले पाहिजे असा ठराव शुळ साहेबांनी आधीच केला आहे. त्यावेळी श्री. किशोर वनवारीच्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो की त्यावेळी २०.८.२०००च्या सभेत मी एक मराठीत वाक्य बोललो होतो त्याचा अर्थ तुम्हाला समजला नाही. मी असे म्हणालो होतो की, जर या ठरावाची अंमलबजावणी झाली तर आयुक्त साहेब तुम्हाला दोषी ठरवण्यात येईल. या ठरावाची अंमलबजावणी नाही झाली पाहिजे. अंमलबजावणी या मराठी शब्दाचा इंग्रजीत अर्थ आहे इंम्प्लीमेंटेशन मी म्हणालो होतो या ठरावाची अंमलबजावणी नाही झाली पाहीजे. जसे गटनेत्यांचा वाहन भत्ता ठराव तुम्ही शासनाला पाठवला होता. तो रद्द केला गेला होता. मी पण हे म्हणालो या ठरावाची अंमलबजावणी नाही झाली पाहिजे. जर मी मराठीत बोललो तर किशोर वनवारी काहीच समजणार नाही म्हणुन मी हिंदीत बोलतो की, अंमलबजावणी म्हणजे इम्प्लीमेंटेशन. जर समजत नसेल तर बोलु नये. त्या इतिवृत्ताची कॅसेट आहे. इतिवृत्तात मराठीत सर्व आले आहे. दुसरी गोष्ट जसे लाल पंजाबींनी आता दोन-चार लिगल पॉइंटस् सांगितले तसे मी पण एका कायदेशिर मुददयावर आयुक्तांचे लक्ष वेधु इच्छितो की तुम्ही सेक्शन ७९ च्या आधारे स्थायी समिती व महासभेत खाजगीकरणाचा प्रस्ताव आणला होता. खाजगीकरण कुणा-कुणाचे केले पाहिजे याबाबतीत सेक्शन ७९ मध्ये लिहिले आहे तसेच खाजगीकरण कधी करायला नको हे पण ७९ (अ) मध्ये लिहिले आहे. मी वाचुन दाखवतो. श्री. किशोर वनवारींना हे समजणार नाही ती वेगळी बाब आहे. कोणत्याही विशिष्ट विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेली कोणतीही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी ती धारण करण्यात आली असेल त्यास बाधा येईल अशा रितीने पटटयाने देता, विकता किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येणार नाही. याचा अर्थ मुळ उददेशाला बाधा नाही आली पाहिजे. तसे झाले तर भाडयाने दिले नाही पाहिजे. या सभागृहात जे वरिष्ठ सदस्य आहेत. ८६ ते ९१



सालामध्ये नगरसेवक होते. तेव्हा श्री. पप्पु कालानी हे नगराध्यक्ष होते. आताचे महापौर, सभागृह नेता, मी व श्री. भिमसेन मोरे, लाल पंजाबी ,ज्योती कालानी हे सर्व होते. तेव्हा खुप चांगला उददेश ठेवून टाऊन हॉलचे निर्माण केले होते की, या शहरातील संस्कृतीचे जतन झाले पाहिजे. गरीब लोक मुंबई ठाणे शहरात जाऊ सांस्कृतिक कार्यक्रम बघु शकत नाहीत तर इथे ते करण्यात येतील. हा उददेश लक्षात घेऊन शहरात टाऊन हॉल निर्माण केला हा आमचा मुळ उददेश होता. त्यावेळी आम्हाला असे नव्हते वाटले की, इथे दारू, बिअर बार वगैरे उघडतील. आमचा उददेश चांगला होता आपण पण त्यावेळी नगरसेवक होता. त्यावेळी हे ठरले होते की, सिंधी व इतर संस्कृतीचे जतन झाले पाहिजे. सिंधी व इतर संस्कृतीची माहिती मिळाली पाहिजे. आमच्या वरिष्ठांनी काय काय बलिदान केले हे माहिती झाले पाहिजे. या शहराच्या संस्कृतीचे जतन नीट जोपासले गेले पाहिजे. हा चांगला उददेश समोर ठेऊन आम्ही टाऊन हॉल निर्मितीचा ठराव पास केला. आता तिथे बिअरबार विडिओ गेम सुरू करणार आहेत हे एकदम चुकीचे आहे. कृपया मी सर्वांना सांगतो की, हे बहुमत बहुमत करणे सोडून शहराच्या विकासासाठी जनतेच्या फायदयासाठी एक ठोस निर्णय घ्या. २०.७.२००० चा ठराव जनतेच्या फायदयासाठी नाही आहे. तो रदद करून शहरातील टाऊन हॉलचा योग्य त-हेने वापर केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> मा.महापौर, उपमहापौर आयुक्त साहेब, टाऊन हॉल बारा वर्षापासुन बंद आहे. मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी हे स्थायी

समितीत सभापती होते त्यांनी अंदाजपत्रक सादर केले होते. तेव्हा त्यांनी हा विचार केला नाही की, टाऊन हॉल बनविण्यासाठी काही तरी तरतुद करावी. आज सार्वजनिक बांधकाम समितीने हा खाजगीकरणाचा प्रस्ताव आणला आहे. तरी इतका गोंधळ होत आहे. जर हा प्रस्ताव आणला गेला नसता तर अजुन अशा प्रकारे १०-१५ वर्ष टाऊन हॉल बंद पडुन कोसळला देखिल असता. कुणाच्याही तो कामी आला नसता. मा.श्री.लाल पंजाबी म्हणाले की, शासन दर निश्चित करते मी सांगु इच्छितो की, कुठेही जाण्याचा मार्ग एकच आहे. तोलकर तिथे लागु केला जातो. मला जर दुस-या रस्त्याने जायचे असेल तर मी तिथे जाऊ शकत नाही. एका नाक्याचा दर १०० आहे दुस-याचा २० म्हणुन मी तिथुन जातो असे होत नाही. जर कुणाला हॉल हवा असेल तर शहरात खुप ठिकाणी चांगले हॉल आहेत. जर या ठेकेदाराने जास्त पैसे घेतले तर जनता दुसरीकडे हॉल घेईल. दुसरे हे म्हणाले की, यांनी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार नाही केला. प्रोजेक्ट रिपोर्ट कसा तयार करतील? आम्ही लिहिले आहे दोन करोड पेक्षा जास्त जो भरेल. कोणी तीन करोड भरेल कोणी चार करोड त्यावर खर्च करतील. आम्ही दर फिक्स केला आहे महिन्याला पंचवीस हजार. ठेकेदार टाऊन हॉलवर स्वत:च खर्च करणार आहे. जर त्याच्याकडुन दोन करोडचे प्रोजेक्ट बनवून घेतले आणि त्याने जर ४ करोड खर्च केला तर त्या प्रोजेक्टला चुकीचे मानण्यात येईल म्हणुन आम्ही प्रोजेक्ट रिपोर्ट स्वत: ठेकेदाराला बनवायला सांगितला. दुसरे हे म्हणाले की, हा हॉल जनतेच्या कामी येणार नाही. दर शनिवारी सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी म्हणुन हॉल मोकळा ठेवला आहे. आज दहा वर्षापासुन तो हॉल बंद आहे तर कोण गरीब जनता त्याचा फायदा घेत आहे. शनिवारी सांसकृतिक कार्यक्रमांशिवाय दुसरे काही होणार नाही महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन आम्ही हा टाऊन हॉल बील्ट ऑपरेट आणि ट्रान्सफर साठी आणला आहे. कृपया या विषयाला मंजुर केले जावे. हा ठराव चुकीचा आहे रदद करावा हे आणले आहे ते चुकीचे आहे. धन्यवाद.

श्री.बी.बी.मोरे बोलायला उभे असताना....

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-</u>बी.बी.मोरे काय बोलता तुम्ही पण जा दारू प्यायला टाऊन हॉल मध्ये.



<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u> मा.महापौर व सन्माननिय सदस्य, आज टाऊन हॉल विषयी चर्चा चालु आहे. माझे बंधु आहेत ते त्यांना विरोधी नाही समजत मी. आज खुप विचार करत आहेत की,शहराचे काय होईल? जनतेचे काय होईल हे सर्व ते आज बोलत आहेत. मला वाटते श्री. प्रकाश महाडीक दोनदा निवडुन आले आहेत. तेव्हा तुम्ही जर टाऊन हॉलचा विचार केला असता तर......

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक / श्री.सुनिता राजवानी :-</u> दोनदा नाही तीनदा निवडुन आलो आहे. तेव्हा यु.पी.पी. ची सत्ता होती.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :-</u> सत्ता कुणाचीही असो सत्तेचा इथे प्रश्न नाही. सत्ता आपली पण दोन वर्ष होती. शहराच्या विकासाचा जर तुम्ही विचार करता तर तुम्ही हा विषय आणला असता पण आपण हा विचार केला नाही. दहा बारा वर्ष झाली उल्हासनगरच्या जनतेला त्याचा काय फायदा झाला. जर दहा वर्ष अशीच इमारत राहीली तर इतका पैसा जो महापालिकेने लावला आहे तो व्यर्थ जाईल. तुम्ही तुमच्या सत्तेत तो दयायला पाहिजे होता. महापालिकेला उत्पन्न मिळाले असते. आता सभागृहनेता म्हणाले की पाण्याचे आपल्यावर कर्ज आहे. मी तर विचार करतो की, बोट क्लब पण भाड्याने दिले पाहिजे. जर हा हॉल महापालिकेतर्फे खाजगीकरणासाठी दिला आहे तर शहरासाठी खुप फायदेशिर आहे. दुसरे तुम्ही म्हणाला की तीस वर्षासाठी नाही दिले पाहिजे मोठा कालावधी

आहे. मी विचार करतो टाऊन हॉलला जनरल अरूणकुमार वैदयांचे नाव दिले आहे. मिलीटरीतील अधिकारी लोक सुध्दा दारू पितात. नशा करतात.

<u>मा.विपक्ष सदस्य</u> :- हे चुकीचे बोलत आहात.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- सैनिकांसाठी असे नाही बोलले पाहिजे.

इथे मा.सदस्य श्री. गणेश चौधरी यांनी मंचाजवळ येऊन महापौरांजवळ याबाबतीत निषेध व्यक्त केला.

<u>मा.सदस्य श्री.गणेश चौधरी :</u>- हे चुकीचे बोलत आहेत. लाज नाही वाटत.

<u>मा.सदस्य श्री.सुनिता राजवानी</u> :- यांना लाज वाटली पाहिजे हे बोलायला. ज्या सैनिकांनी देशासाठी बलिदान केले त्यांच्याविषयी हे असे बोलत आहे.

<u>काही विपक्ष सदस्य</u> :- हा अपमान आहे सैनिकांचा.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- देशासाठी मरणा-यांची इज्जत करायला शिका.

इथे विपक्ष सदस्य थु थु असे म्हणत होते.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :</u>- मी हकीकत सांगत आहे.

<u>काही विपक्ष सदस्य :-</u> माफी मागा माफी.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- लाज नाही वाटत लाज प्रत्येक वेळी माफी मागतात.



<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- हे सत्ताधारी पक्षाचे काम आहे. प्रत्येक सभेत त्यांना माफी मागावी लागते.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :- देशाचा xxxx आहे हा.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- तुम्ही शहराचे xxxxx आहात.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- आपल्याला सत्ता नाही चालवता येत.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुरेखा वेलकर</u> :- ज्यांनी देशासाठी बलिदान केले त्यांच्यासाठी असे शब्द वापरता काही वाटत नाही.

<u>मा.सदस्य श्री.गणेश चौधरी</u> :- देशद्रोही आहे हा. देशाचा अपमान आहे हा.

<u>मा.महापौर</u> :- सदनातील सर्व सदस्यांना विनंती आहे की, सर्वजण आपापल्या जागेवर बसा.

<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- सैनिकांसाठी असा अपशब्द वापरतात.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :-त्यांना माफी मागायला सांगा.

मा.सदस्य श्री. गणेश चौधरी :- जो पर्यंत माफी मागणार नाही तो पर्यंत कोणीच सदस्य बसणार नाही. देशद्रोही आहे हा.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- विपक्ष वाल्यांना काहीतरी पाहिजे. ठिक आहे मी माफी मागतो.

इथे सर्व विपक्ष सदस्य मंचापुढे येऊन उभे असताना.....

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- आम्ही सॉरी म्हंटले आहे ना? लाल पंजाबी आता खाली बसा.

मा.महापौर :- हे पहा बी.बी.मोरेंनी सदनाची माफी मागीतली आहे त्यांचा बोलण्याचा हा हेतु नव्हता.

मा.सदस्य श्री.गणेश चौधरी :- सभागृहाची माफी मागीतली त्यांना आता बाहेर काढा.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- त्यांना माफी मागायची सवय झाली आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- कधी म्हणतात मी पोलीसांचा बाप आहे. कधी सैनिकांचा अपमान करतात.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- माफी मागीतली ना. आता मागचे पुढचे काही काढू नका.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मोरे मेंटल आहेत. त्यांना मेंटल हॉस्पीटल मध्ये पाठवा.



मा.महापौर :- बी.बी.मोरेंनी माफी मागीतली आहे त्यांचा हा उददेश नव्हता.

काही विपक्ष सदस्य :- कधी माफी मागीतली?

काही सत्ताधारी सदस्य :- जाऊदे मोरे परत माफी मागा.

मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :- जे मी अपशब्द वापरले त्याबददल मी माफी मागतो.

मा.सदस्य श्री.गणेश चौधरी :- यांना सभागृहा बाहेर घालवा.

मा.सदस्य श्री.रामभाऊ आढाव :- माफी मागीतली ना त्यांनी आता.

इथे मा.सदस्य श्री.गणेश चौधरी मंचाजवळ खाली जमिनीवर मांडी घालून धरणे धरून बसले.

मा.महापौर :-खाली बसु नका. आपण शहराचे प्रथम महापौर होता.

काही विपक्ष सदस्य :- प्रथम नागरिक आहेत त्यांचा पण अपमान झाला आहे. ते पण सैनिक होते.

मा.सदस्य श्री.सुरेखा वेलकर :- मोरेंना बाहेर घालवा. ते सदस्य बनण्याच्या लायकीचे नाही आहेत.

*<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी</u> :- अर्ध्या तासासाठी त्यांना बाहेर घालवा.*

*इथे सर्वश्री. ठाकुर वेहरानी, कुमार आयलानी, रामभाऊ आढव, राजु सोनावणे व इत्त्यादी सदस्य श्री.गणेश चौधरी यांना उठवण्याचा प्रयत्न करत होते.*

*मा.सदस्य श्री.गणेश चौधरी त्यांच्या विनंती वरून उठले.*

*<u>मा.सदस्य श्री.गणेश चौधरी</u> :- बी.बी.मोरे कधी मी पोलीसांचा बाप आहे असे म्हणतात तर कधी सैनिकांविषयी अपशब्द वापरतात यांना मेंटल हॉस्पीटल मध्ये पाठवा.*

*इथे सर्व सदस्य आपापल्या स्थानी आसनस्थ झाले.*

*<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- आता टाऊन हॉल विषयासंबंधी सैनिकांविषयी मोरेंनी जे अपशब्द वापरले त्यामुळे इथे बसलेला जो सैनिक आहे त्यांना तीव्र पीडा झाली कारण ते पण माजी सैनिक आहेत. ती पीडा इथे बसलेल्या लोकांनाही झाली पाहिजे. आज आपण गंभीर विषयावर चर्चा करत आहोत. त्याला वेगळे वळण देणे अनुचित आहे. मोरेंनी तर क्षमा मागीतली आहे. हे इतिवृत्तात येईलच म्हणुन आम्ही आमच्या जागेवर परत बसलो. आता बोलताना किशोर वनवारी म्हणाले की आम्ही इतिवृत्त कायम करताना विरोध नव्हता केला. इथे सचिव बसले आहेत ते विधी अधिकारी देखिल आहेत. त्यांना विचारा इतिवृत कायम करताना इतिवृत्तासंबधी बोलले जाते. विषयासंबंधी नाही. कोणताही ठराव महासभेत पारीत झाला. तो एकमताने होवो किंवा बहुमताने तो तीन महिन्याच्या आत फेरबदल करण्यासाठी आणता येत नाही. आपण म्हणालात तुम्ही विरोध केला नाहीत काही नाही आपल्या माहितीसाठी मी तुम्हाला सांगु इच्छितो कोणताही ठराव तीन महीन्यापर्यंत फेरबदलासाठी आणता येत नाही तसे कायदयात स्पष्ट लिहिले आहे.*



*नियम (२)खालील प्रमाणे आहे.*
*महानगरपालिकेने पारित केलेल्या कोणत्त्याही ठरावात, तो पारित झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रदद करता येणार नाही. मात्र ,अशा ठरावात, एकुण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक व्दितीयांश पालिका सदस्यांनी, किंवा कोणत्त्याही विवक्षित बाबतीत, या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत समंत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रदद करता येईल. खंड (ह)मधील आवश्यक गोष्टी पूर्ण करून अशा सभेची नोटीस देण्यात आली असली पाहिजे आणि अशा नोटीशीत , ज्या ठरावात, अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रदद करण्याचे योजिले असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी किंवा तो रदद करण्यासाठी असलेली सूचना किंवा प्रस्ताव पूर्णपणे नमूद केला पाहिजे. तीन महिन्यानंतर त्यात बदल करता येतो यात स्पष्ट लिहीले आहे. आणि आता या ठरावाला तीन महीने पूर्ण झाले आहेत. दुसरे हे म्हणाले की, स्थायी समितीमध्ये फक्त माहितीसाठी आला होता. स्थायी समितीमध्ये कोणताही विषय मंजुरीसाठीच येतो. आणि स्थायी समितीमध्ये मतदान करून बहुमताने पास केले आहे. शिवसेना व भाजपाच्या सदस्यांनी विरोधात मतदान केले आहे. लोकांची आम्ही दिशाभुल करीत नाही तुम्ही करत आहात आम्ही प्रकाश टाकत आहोत. मागच्या सभेत मी सचिवांना विचारले होते की, कार्यसुची वरील विषय वाचणे गरजेचे आहे. तर सर्वात पहिले चुकी ही होती जेव्हा विपक्ष सदस्य वॉकआऊट करून गेले तेव्हा विषय न वाचता पास केले गेले. बायकॉट नव्हते केले वॉकआऊट केले होते. बायकॉट चा अर्थ असतो सभात्त्याग करणे. त्यांनी सभात्त्याग नव्हता केला*

वॉकआऊट केले होते. वॉकआऊट केल्यावर ते परत आत आले होते चर्चा करण्यासाठी तेव्हा आत येऊन पाहतात तर मा.महापौरांनी कार्यसूचीवरचे विषय न वाचताच पास केले. विषय न वाचताच काय पास होते? इथे विरोधी पक्ष तुम्हाला विचारत आहेत की, याच्या अटी काय? हा इतका महत्त्वपूर्ण मुददा आहे न वाचता पास केला गेला. त्याच्या अटी व शर्ती न वाचता पास केल्या गेल्या. मोरेजी आणि पुरस्वानी म्हणाले की, तुम्ही जेव्हा सभापती होतात तेव्हा का नाही हा विषय आणला गेला? मी सांगतो की, महापालिकेची ऑबलिगेटरी डयूटीज काय आणि डिसक्रियेशनरी डयुटीज काय आहे? ऑबलिगेटरी डयूटी मध्ये पाणी देणे, रोड ठिक करणे, सेनिटेशन येते. आमची ही महापालिका खुप छोटी आहे. छोटी म्हणजे वयाने लहान आहे. फक्त चार वर्ष झाली आहेत महापालिका होऊन. टाऊन हॉल बनवणे, बोट क्लब देणे इत्त्यादी तुम्ही म्हणाल जुहू का नाही बनवले? आम्हाला प्राणी पाहायचे आहेत.

<u>मा.सदस्या श्रीमती.प्रन्ना वारिंगे</u> :- जागा नाही सोडली यांनी काही करायला.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-</u> तेच म्हणत आहे मी. ऑबलिगेटरी डयुटीज आम्ही आधी पुर्ण करणार की, डिसक्रिएशनरी डयुटीज. त्यावर आम्ही चर्चा कशी करू शकतो. सेकंडरी डयुटीवर आम्ही चर्चा कशी करू शकतो? आपण विचारले खाजगीकरणाला आम्ही सहयोग देण्याची मनाची तयारी केली की चला महापालिकेचा यावर काही खर्च होणार नाही. स्थायी समितीमध्ये हा विषय जेव्हा आयत्त्यावेळी आला तेव्हा विपक्ष पक्षाच्या सदस्यांनी हरकत घेतली की आयत्त्यावेळी हा विषय कशाला आणता? विषय कशाला आणता? अजुन महत्त्वाचे प्रश्न आहेत. जसे आता कुमार आयलानी म्हणाले माझ्या प्रभागात पाणी नाही. कमी आहे तो आयत्त्यावेळचा विषय म्हणुन आणला असता तर समजु शकतो.

<u>मा.सदस्य श्री.कुमार आयलानी</u> :- नाही नाही. मी कधी असे म्हणालो माझ्या प्रभागात पाणी कमी आहे म्हणुन?



<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :- ही शहराची समस्या आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-</u> आमचे सदस्य स्थायी समितीमध्ये म्हणाले की, तुम्ही आयत्त्यावेळी हा विषय का आणलात नियामित कार्यसुचीवर आणा. आम्हाला आमच्या वरिष्ठांशी चर्चा करायची आहे. आजच्या आज आताच घाईघाईने करणे हे आवश्यक नाही. आयुक्त देखिल म्हणाले होते की, महासभेत यावर चर्चा झाली नाही हे एक दुर्भाग्यच आहे. असे स्थायी समितीत बोलले. या शब्दांचा वापर आयुक्तांनी केला म्हणजे त्यांनापण चर्चा न झाल्याचे दुःख आहे. मा.महापौरांनी पण व्यक्तीगत रूपाने याचा विरोध केला आहे. यु.पी.पी.च्या काही सदस्यांनी देखिल आपला विरोध वर्तमानपत्रात विरोध व्यक्त केला आहे. तशी त्यांची स्टेटमेंट पण आहे. त्यात ते म्हणाले की आम्ही याचा विरोध करत आहोत. मी आधी पण म्हणालो होतो की जिथे भावनांचा विषय असतो तिथे मतदान नाही घेतले जात. हा पूर्ण शहराचा प्रस्ताव आहे. पुर्ण शहर यावर चर्चा करत आहे. माझ्याकडे ५० वर्तमानपत्रांची कटींग आहे. शहरातील प्रमुख व्यक्ती ज्या या शहराच्या भल्याचा विचार करत आहे. त्यांनी याचा विरोध केला आहे. दुसरे असे आहे की, मा. जनरल कैलासवासी श्री.अरूणकुमार वैद्य यांच्या नावाने तिथे बियरबार चालवला जाणार. ते देशाचे जनरल होते त्यांनी देशासाठी बलिदान केले होते. मी स्वतःलाच विचारतो की, माझे हे म्हणणे प्रत्त्येक व्यक्तीला लागु होते. समजा माझ्या वडिलांचे नाव रामचंद आहे. मी जर श्री.रामचंद बियरबार उघडला तर कसे वाटेल?जर टाऊन हॉल मध्ये जर बिअरबार उघडले गेले तर काय वाचले जाणार? श्री. अरूणकुमार वैद्य बियरबार असे म्हटले जाणार? आमच्या येणा-या पिढीला काय वाटेल त्यांना काय आदर राहील? हे तर असे

आहे की, महाभारतात द्रोपदीचे दुःशासन वस्त्रहरण करत होता आणि सर्व लोक नुसते पहात बसले होते. पितामह भिष्म गुरूद्रोणाचार्य त्यांनी पण पश्चाताप केला. आजच्या दुःशासनाला या पापाचा दंड दिलाच पाहिजे. आपण हे नुसते डोळे उघडे ठेवून बघत राहायचे हे ठिक नाही. अशा दुःशासनासाठी आपल्याला पण भीम व्हावे लागेल. दुसरी गोष्ट ही की, तीस वर्षाच्या दिर्घकालावधीसाठी तुम्ही हा हॉल देत आहात. कोणत्त्या कायदयात हे लिहिले आहे. कलम ७९(ग)मध्ये हे लिहिले आहे की, गलिच्छ वस्तीतील रहिवाश्यांच्या सहकारी संस्थेला भाडेपटयाने देण्याकरता नियम असलेल्या कमाल भाडयाच्या बाजार मुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्या पेक्षा कमी असेल अशा भाडयाने व महानगरपालिका लादील अशा शर्तीस अधिन राहून तीस वर्षापेक्षा अधिक होणार नाही. इतक्या मुदती करिता भाडेपटयाने देता येईल. कलम ७९मध्ये प्रत्त्येक ठिकाणी आपल्यावर अंकुश लावला आहे. आपणांस शासनाकडुन परवानगी घ्यायची आहे ती आपण घेतली का? परवानगी न घेता आपण कसे खाजगीकरण करत आहात? आपल्याकडे पत्र आहे? शासनाकडुन पण या बाबतीत अटी व शर्ती काय म्हणुन पत्र आले आहे. तुमच्याकडे आले आहे काय?

<u>मा.आयुक्त :- </u>आमच्याकडे पत्र आले आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- </u>शासनाकडुन परवानगी घेतल्याशिवाय शासनाला पत्र पाठवल्याशिवाय तुम्ही निविदा कशा मागवल्या. हा तर कायदयाचा एक प्रकारे खेळ तुम्ही केला. शहरातील जनतेशी केलेला हा खेळ आहे. त्यानंतर तुम्ही म्हणाल की, हा हार जीतचा मामला आहे आम्ही टाऊन हॉल भाडयाने देणार. तेव्हा लोक काय म्हणणार भाजपा आणि शिवसेना हा मुददा पास करून आले. आम्ही बिल्कुल असे नाही म्हणणार आम्ही शांतीपूर्वक विनम्रतेने बाहेर निघुन जाऊ आणि असे म्हणु की, ही जीत कॉंग्रेस आर.पी.आय, शिवसेना-भाजपा यांची नसुन पूर्ण शहराची जीत आहे. कोणा व्यक्तीस पाहून निर्णय नाही घेतला पाहिजे.बीयरबार उघडणे हे तुमच्या



मनाला कसे पटते? शहरांनी तुम्हाला निवडून दिले आहे. शहराला त्याचा फायदा झाला पाहिजे. मला जसे वाटते की, श्री. रामचंद बियरबार नाही झाला पाहिजे तसे इतरांना याविषयी असेच वाटत असेल.

<u>मा.महापौर</u> :- सर्व सदस्य याविषयी बोलले आहेत. भावनाशिल भाषण देणे हा एक वेगळा मुददा आहे. आपण प्रॅक्टीकल झाले पाहिजे. उपमहापौरांना काही माहिती हवी आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- </u>मी इतर बरेच काही बोलु शकलो असतो. टेंडर दोन करोडचे कसे आले? कमी किंवा जास्तीचे का नाही आले? टेंडरच्या पुस्तकात
दोन करोड चा उल्लेख नव्हता त्याचे स्पष्टीकरण प्रीबीड मिटींगमध्ये झाले होते. पण मी हे न विचारता मुख्य मुददा घेतला. जे सहा लोक टेंडर फॉम घेऊन गेले. टेंडरच्या त्या सभेचे इतिवृत्त जर मी मागीतले तर त्यावर सुध्दा बरेच बोलता येण्यासारखे आहे. मी ऐवढेच सांगु इच्छितो की, हे टेंडर पूर्णपणे मॅनेज केले गेले होते. मी कित्त्येक लोकांचे चेहरे येथे स्पष्ट करू शकतो. परंतु हा शहरासंबंधीचा प्रश्न आहे. शहर आमचे आहे म्हणुन मी आणखी जास्त काही बोलु इच्छित नाही.

<u>मा.उपमहापौर</u> :-आम्ही विशेष सभा बालावली. २०.७.२००० रोजी टाऊन हॉल बाबत जो ठराव पास झाला त्याबाबत. शिवसेना भाजपाने एक महिन्यापूर्वीच विशेष महासभेची मागणी करून त्याबाबतची माहिती मागविली होती. ती माहिती नरेंद्र राजानी यांनी सांगितली आहे. ठराव कसा पास झाला पाहिजे त्याबाबतचे कायदेशिर सल्ला किंवा मत विधी अधिकारी महापालिका सचिव ज्यांच्या

साहायाने हे सभागृह चालते. त्यांनी नोंदविले आहे की, कोणताही ठराव तेव्हा पास होतो. जेव्हा तो कायदेशीर रित्या सभागृहासमोर मांडला जातो. त्यांच्याकडुन मागविले होते. त्यांनी त्यांचे ते मत मांडलेले आहे. श्री.लाल पंजाबी यांनी म्हंटले की, न वाचता पास केले हे इतिवृत्तांतात कोणकोणत्त्या पानावर आले आहे ते सांगीतले. विपक्षांनी वॉकआऊट केल्यांनतर प्रश्नोत्तरे तास रदद करून लगेच विषय सुरू करून चार मिनिटात दोन विषय मंजुरही झाले. चार मिनिटात दोन विषय मंजुर होण्याचे प्रकार फक्त उल्हासनगर महापालिकेतच होतात. ठराव कोणता ? काय? त्यावर चर्चा न करता पास पास म्हंटले. नागरिंकांच्या दृष्टीने हा महत्त्वाचा विषय आहे. आयुक्त स्थायी समिती सभेत म्हंटले होते की, दुर्भाग्य पणे या ठरावावर चर्चा झाली नाही. म्हणजे आयुक्तांना ही या प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक वाटत होते. हे खरोखर दुर्भाग्य आहे की त्याविषयावर चर्चा नाही होऊ शकली. स्थायी समितीमध्ये ठराव मांडला गेला तेव्हा हा विषय आयत्त्यावेळी घ्यावा किंवा नाही? यावर पण एकमत झालेले नव्हते. त्यावेळी अजेंडयावर हा विषय समाविष्ट करून घेण्या ऐवजी या मतावर खरे म्हणजे मतदान व्हायला पाहिजे होते.सचिव साहेब मी म्हणतो ते बरोबर आहे ना? विषय समाविष्ट करून घेतले की नाही हे सुध्दा इतिवृत्तांत आले नाही. काही नगरसेवक हटट करत होते की हा विषय आयत्त्यावेळचा नाही. जेव्हा इमरजन्सी असते तेव्हा विषय आयत्त्यावेळी घेतात. हा विषय आयत्त्यावेळी घेवू नका यावर आम्हाला चर्चा करू दया. आयत्त्यावेळी विषय घ्यावा की नाही यावर चर्चा न करता मतदान न घेता बेकायदेशिरपणे धिसाड घाईने प्रस्ताव मंजुर केला गेला. यानंतर श्री.महाडिक यांनी जे सुचविले की, ३.७.२००० ला जो पी.डब्लु.डी. कमीटीचा ठराव झाला. त्या प्रस्तावाबददलच्या गोषवा-यात अटी व शर्ती घालावयास पाहिजे होत्त्या. त्यात स्पष्ट लिहिले आहे की, त्या अटी व शर्ती ठरवून महासभेच्या अधिन राहून मंजुर केल्या जातील. म्हणजेच अटी व शर्ती महासभे समोर आणुन मंजुर करायला पाहिजे होत्त्या. मलाही वाटते तसेच व्हायला पाहिजे होते. या अटी कोणकोणत्त्या असल्या पाहीजेत हे आयुक्त यांनी ठरवून सर्व सदस्यांपुढे यायला पाहिजे होते परंतु तसे नाही झाले. सचिव साहेब, मी म्हणतो ते ठिक आहे ना? आपले मत सांगा. काही शंका आहे का? नंतर सांगा. तसे केले गेलेले नाही. ठराव महासभेसमोर आणला तो ही चुकीच्या पध्दतीने. प्रगल्भतेने चर्चा झाली पाहिजे बराच वेळ झाला



आहे. मी उल्हासनगर महापालिकेच्या शहर अभियंत्त्याला विचारतो की, टाऊन हॉलचे कंम्प्लीशन सर्टीफिकीट आहे का?या टेंडरच्या टर्मस आणि कंडीशन कोणी ठरवल्या आहेत. ते आयुक्तांचे काम नाही आहे. ते प्रशासनाचे म्हणजेच शहरअभियंता किंवा इस्टेट डिपार्टमेंट चे काम आहे. कंम्प्लीशन होणे हे महत्त्वाचे होते परंतु ते झाले नाही. मला काही शंका आहेत त्याचे समाधान करा. ठेकेदाराकडुन पूर्वी बांधकाम करून घेतले होते.

<u>श्री. चिजवानी (शहरअभियंता):-</u> हे माझ्या डिपार्टमेंटशी संबंधित नाही.

<u>मा.उपमहापौर</u> :- मग कुणाच्या डिपार्टमेंटशी संबंधित आहे?

<u>श्री. चिजवानी (शहरअभियंता)</u>:-इस्टेट डिपार्टमेंटशी संबंधित आहे.

<u>मा.उपमहापौर</u> :- इस्टेट डिपार्टमेंटला तुम्ही हॅन्डओव्हर केले आहे का? कंम्प्लीट झाल्याशिवाय तुम्ही हॅन्डओव्हर करू शकत नाही. तुम्ही म्हणता केले आहे. तुमच्या विभागात नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> शहर अभियंता असुन त्यांना बोलता येत नाही.

<u>मा.सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :-</u> मा. महापौर, आता जे मुददे उपस्थित केले गेले आहेत. त्यासर्व गोष्टी सदनासमोर येणे आवश्यक आहेत. शहराच्या

हितासाठी आम्ही काम करतो. या गोष्टींना दुर्लक्ष करून कोणी अधिकारी जर आपल्या अधिकाराचा वापर योग्य त-हेने करतो की नाही हे तर माहिती पडले पाहिजे.

<u>मा.उप-महापौर</u> :- हा प्रस्ताव कोणत्त्या डिपार्टमेंटशी संबंधित आहे. हे शहर अभियंता आपणांस माहीत नाही आहे? संबंधित विभागाचा कोणी प्रतिनिधी येथे उपस्थित नाही आहे काय?मा.महापौर, श्री. महाडिक यांनी सांगीतले की, जेव्हा श्री.प्पु कालानी हे नगराध्यक्ष होते. तेव्हा आपण नगररचना समितीचे सभापती होतात. तेव्हा आपणांस हे माहित असेल की, टाऊन हॉल कोणत्त्या कारणासाठी बांधण्यात आला. त्यावेळचा ठराव असेल.

<u>मा.महापौर :-</u> टाऊन हॉलचे बांधकाम हे उददेश डोळयासमोर ठेवून करण्यात आले होते. की,शहरातील जितके पण सांस्कृतिक कार्यक्रम आहेत ते इथे झाले पाहिजेत. पण दुर्भाग्याने महापालिकेची आर्थिक स्थिती ठिक नाही. म्हणुन खाजगीकरण करावे लागत आहे.

<u>मा. उप-महापौर</u> :- गेल्या १० वर्षापासून तर पहातो, उल्हासनगर नगरपालिकेने उल्हासनगरमध्ये ऐवढी मोठी वास्तु बांधली आहे. त्या वास्तुवर आता नाममात्र दोन कोटी खर्च करायचा आहे. १० कोटी, २० कोटी कर्ज घेण्यासाठी आमची (महापालिकेची)स्थिती कशी चांगली आहे. हे दाखविले जाते. त्यानुसार कर्ज देणारे कर्ज देण्यास तयार ही होतात. १३३ कोटीच्या बजेट मध्ये टाऊन हॉलवर फक्त दोन कोटी खर्च करायचे होते. परंतु ते होऊ शकले नाही. आयुक्त साहेब नेहमी बोलत होते की, हा हॉल डेव्हलप झाला पाहिजे. महापौर इमोशनल आहेत. म्हणुन तो शब्द तेथे वापरला आहे. १३३ कोटीच्या बजेट मध्ये टाऊन हॉलसाठी २ कोटी खर्च आपण करू शकत नाही? हा हॉल आपण तीस वर्षासाठी देत आहोत. ठेकेदाराला देताना दर महापालिकेने ठरवायला हवे होते. जे दर सर्वसाधारण व्यक्तीला परवडतील अशा स्वरूपाचे असावयास हवे होते. या ठेक्याच्या निमित्ताने महापालिका लोकांना काय संदेश देऊ पहात आहे. बी.बी. मोरेंनी म्हंटले दारू पिणे मुख्य उददेश श्री.महाडिक यांनी सांगीतला त्याप्रमाणे सिंधु व हिंदु संस्कृतिचे जतन करण्यासाठी



या हॉलची निर्मिती करण्यात आलेली आहे. जी चुक मागच्यावेळी केली ती यावेळी होऊ नये. इमोशनल होऊ नये म्हणुन टाऊन हॉलचा हा जो विषय आहे त्यामध्ये लोकांचे काय काय हित बघितले गेले. माझ्या मते लोकांचे हित थोडेसे कमीच बघीतले गेले. व जास्त प्रमाणावर दुर्लक्षिले गेले. अरूणकुमार वैद्य यांची संस्कृती कुठली? आम्ही पाश्चिमात्त्य संस्कृती जतन करत आहोत काय? सर्व काही उघड करा असे आम्ही तरी नैतिक जबाबदारी टाकुन बोलु शकत नाही. म्हणुन या प्रस्तावामध्ये पार्टी पॉलिटीक्स न आणता शिवसेना भाजपाच्या लोकांनी जो प्रस्ताव आणलेला आहे. या प्रस्तावावर बरीच चर्चा झालेली आहे. ब-याच लोकांना पटले नाही आणि पटले आहे पक्षपात न करता शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने झालेली चुक सुधारून हा ठराव रदद करून नविन ठराव आणला जावा अशी विनंती करतो. धन्यवाद. जय हिंद, जय भारत.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> महापौर, एक सेकंद टाऊन हॉलसाठी आपणांस पैसा उभारायचा असेल तर त्यासाठी आम्ही भाजपा शिवसेनेचे सदस्य आपल्या नगरसेवक निधीतून तीन-तीन लाख रू.देण्यास तयार आहोत. परंतु टाऊन हॉल विकु नका.

<u>मा.महापौर</u> :- टाऊन हॉल बाबत सर्व सदस्यांनी मोकळया मनानी सविस्तर पणे आपले विचार मांडलेले आहेत. या प्रस्तावावर इमोशनल न होता प्रॅक्टीकल झाले पाहिजे. आज टाऊन हॉलची स्थिती काय आहे...?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- बहुतांश नगरसेवकांचा नगरसेवक निधी पूर्ण झाला आहे. या निधीतून कोणी कुणाला निधी उपलब्ध करून देत नसतो. मा. महापौरांना या प्रस्तावावर बोलु दया.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- मा.महापौर, चुकीचा निर्णय घेऊ पहात आहेत म्हणुन त्यांना सुध्दा आम्ही बोलु देणार नाही.

मा.महापौर :- महानगरपालिकेवर सुमारे १३० कोटी रूपयांचे कर्ज देणे आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- श्री. पप्पु कालानी हे आपल्या आमदार निधीतून यासाठी निधी उपलब्ध करून देत नाहीत काय?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- श्री. पप्पु कालानी साहेब, असते तर टाऊन हॉल भाडेपटयाने देण्याची जरूरतच पडली नसती हा प्रोजेक्ट त्यांनीच दिला आहे. स्पोर्टस कॉम्प्लेक्स त्यांनीच दिले आहे. सर्व पप्पु कालानींचीच मेहरबानी आहे.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- आमदार निधी उपलब्ध करून देत नाहीत. मग मते मागायला कसे येतात? ते शहराचे आमदार नाहीत का?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- तिथे तुम्ही दारू चालविणार?

मा.महापौर :- महानगरपालिकेवर सुमारे १३० कोटी रूपयांचे कर्ज देणे आहे. त्यामध्ये एम.आय.डी.सीचे ७८ कोटी, हुडको चे २. ५ कोटी, एम.एम.आर.डी.ए.चे वीस कोटी, महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाचे (एम.जे.पीचे) ११ कोटी व एल.आय. सी चे
(नविन पाईप लाईन टाकण्यासाठीचे) १८ कोटी असे एकुण सुमारे १३० कोटी रूपये कर्ज देणे बाकी आहे. अशा परिस्थितीत.....

--१०--

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- तर काय टाऊन हॉल मधून ऐवढे पैसे मिळणार आहेत काय?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हे मध्ये मध्ये बोलत आहेत. मा.महापौर साहेब, हे आपला अपमान करत आहेत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- सभा आम्ही बोलावलेली आहे. ती आमचे विचार मांडण्यासाठी.

मा.महापौर :- महापालिकेवर सुमारे १३० कोटीचे कर्ज देणे बाकी असताना टाऊन हॉल वर खर्च करून तो चालविणे शक्य नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-तर मग हुडको, बी.एम.आर.डी.ए कडुन यासाठी कर्ज घेऊन टाऊन हॉल चालवा.

मा.सदस्य श्रीमती.सुनिता राजवानी :- टाऊन हॉल ठेकेदाराला कोणत्त्याही परिस्थितीत दिला जाऊ नये.

मा.महापौर :- याबाबतचा निर्णय मी एकटयाने घ्यायचा नसुन महासभेने तो निर्णय घ्यायचा आहे. संपुर्ण देशभरात सर्व स्तरावर खाजगीकरणाची प्रक्रीया

चालु आहे. मारूती मोटार या उदयोगाचे सुध्दा खाजगीकरणाची प्रक्रीया चालु आहे अशा परिस्थितीत टाऊन हॉल महापालिकेने स्वत: तयार करून चालविण्यास घेतला तर त्यासाठी किमान ५०-६० कर्मचारी नेमावे लागतील. त्यांच्या पगार व आस्थापनावर होणारा खर्च हे सर्व महापालिकेस सध्या तरी करता येण्यासारखे नाही.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-कर्मचा-यांचा सुध्दा खाजगीकरणाच्या या प्रस्तावास विरोध आहे.

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर</u> :-मा.महापौरांना बोलु दिले जावे.

<u>मा.महापौर</u> :- मागील दहा-बारा वर्षा पासुन टाऊन हॉल बंद होता. आज आपल्याला त्याची दुरूस्ती करण्याची संधी मिळाली आहे. महापालिकेने टाऊन हॉलचा ठेका दिलेला आहे. त्यांना परमिशन दिलेले आहे. मा.सदस्यांनी ज्या बाबी सभागृहासमोर आणल्या आहेत. त्याबाबत आम्ही ठेकेदारांवर दबाव टाकु. की तिथे असे काही वातावरण निर्माण नाही झाले पाहिजे. त्याकरता ठेकेदारांना सुचित करू की, बीयरबारचा जो भाग आहे तो टाऊन हॉल मध्ये वेगळया भागात असावा असे त्याला बंधन घालु व त्याचे प्रवेशव्दार वेगळे करायला सांगु.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- मा.महापौर साहेब, परंतु टाऊन हॉलच्या मागे मोठे अयप्पा मंदिर आहे पुढे देखिल मंदीर आहे त्याचे काय? आपण त्याला लिकरची परमिशन दिली आहे.

<u>मा.महापौर</u> :- ते पहाणे एक्साइज डिपार्टमेंटचे काम आहे. आमचे नाही.



<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- तिथे जवाहर टॉकीजच्या समोर महापालिकेची शाळा आहे. तिथे सांस्कृतिक कार्यक्रम न घेता शहराचे हि न बघता तेथे डान्स बार चालु दया.

<u>मा.महापौर</u> :- आपल्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, पूर्ण राज्यात लिकरची परमिशन दिली नाही पाहिजे हा एक चांगला प्रोजेक्ट आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.महापौर</u> :- शहराला एक खुप मोठा प्रोजेक्ट मिळत आहे. तिथे हेल्थ क्लब आहे. जिमखाना आहे. येणारी पिढी तुम्हाला दुवा देईल.

इकडे सर्व विपक्ष सदस्य एकत्र येऊन जोरजोराने ओरडत असताना

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- मा.महापौर, आपल्याला मुददाम बोलू दिले जात नाही. शहराची दिशाभुल करीत आहे म्हणुन आपल्याला स्पष्टीकरण करू देत नाही. कारण सर्वांना खरे काय ते माहित पडेल.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> तेथे हे लोक जाऊन दारू पित बसतील.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी, श्रीमती.सुनिता राजवानी, श्री.प्रकाश महाडिक, श्री.नरेंद्र राजानी, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. रमेश चव्हाण इत्त्यादी

सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहे हे समजत नव्हते.

<u>मा.महापौर</u> :- ज्या सुविधांसाठी उल्हासनगरचे लोक मुंबईला जातात त्या सुविधा त्यांना उल्हासनगरमध्येच मिळतील. म्हणुन शिवसेना भाजपाने हा जो प्रस्ताव आणलेला आहे. आपली इच्छा असेल तर स्विकार करा नाहीतर रिजेक्ट करा. मी महासभेसमोर तो मांडत आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- शिवसेना भाजपाने मांडलेला प्रस्ताव रिजेक्ट केला जावा.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-</u> पुर्ण शहरात यावर वादविवाद चालला आहे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- शिवसेना भाजपाने काय प्रस्ताव दिला आहे तो वाचुन दाखवा.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- यांनी प्रस्ताव वाचुन दाखविला.

<u>मा.महापौर</u> :- या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :-कोणत्त्या बाबीसाठी मतदान घेतले जात आहे? हे सांगीतले जावे.



<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> प्रस्तावातील शेवटची दोन वाकये वाचा त्यावर निर्णय घ्या.

<u>मा.उप-महापौर</u> :- सचिव साहेब, अटी व शर्ती काय असल्या पाहिजेत. शिवसेना भाजपाने काय प्रस्ताव मांडला आहे. आणि त्यांना त्यात काय बदल पाहिजे आहे. हे थोडक्यात वाचुन दाखवा.

<u>मा.सचिव</u> :- शिवसेना भाजपाने जो प्रस्ताव दिला आहे. त्यामध्ये ज्या हॉलला अरूण कुमार वैद्य यांचे नाव दिले आहे. तेथे बीयरबार चालविणे, योग्य आहे काय? सदरचा हॉल ३० वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीसाठी भाडेपटटयाने दिला जात असल्याने येणा-या पिढीवर अन्याय केल्या सारखे होणार आहे किंवा नाही. सदरचा हॉल तीस वर्ष भाडे तत्त्वावर दोन कोटी रू.च्या बदल्यात देणे योग्य की अयोग्य आहे. सार्वजनिक बांधकाम समितीच्या दिनांक ३.७.२००० रोजीच्या ठरावानुसार ३० वर्षाच्या कालावधीसाठी आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर महासभेच्या अधिन राहून असा उल्लेख आहे तर त्या अटी व शर्ती महासभेमध्ये मंजुर केल्या आहेत काय? श्रेणीवार व्यतिरिक्त टाऊन हॉल आरक्षित करायचा झाला तर तो १८० दिवस अगोदर आरक्षित केला गेला पाहिजे. १८० दिवसांचा कालावधी हा अतिशय मोठा कालावधी आहे. या सर्व मुदयांवर चर्चा झाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.

<u>मा.महापौर</u> :- या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

<u>मा.सचिव :-</u> जे सदस्य पूर्वीचा ठराव क्र.९ दि. २०.७.२००० मध्ये फेरबदल करण्याच्या शिवसेना भाजपाने मांडलेल्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत. त्यांनी आपले हात वर करावे.

प्रस्तावाच्या बाजुने :-

१. श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
२. श्री.गणेश चौधरी
३. श्रीमती.सोनावणे यमुना
४. श्रीमती.वेलकर सुरेखा
५. श्रीमती.यशस्विनी नाईक
६. श्री. भांडे भगवान
७. श्री. तेजी कैलास
८. श्री. बोडारे धनंजय
९. श्री.चौधरी राजेंद्र
१०. श्री. लांडे पांडुरंग
११. श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
१२. श्रीमती.सुनिता राजवानी
१३. श्री. वारिंगे पंढरीनाथ
१४. श्री. मोरे भिमसेन
१५. श्री. चव्हाण रमेश
१६. श्री. महाडिक प्रकाश
१७. श्रीमती.मोकल सिमा
१८. श्री.उमाप रामदास
१९. श्रीमती.मटाई जोनिता
२०. श्री.पारवानी रामचंद्र
२१. श्रीमती.आशा राधवानी
२२. श्री. जग्यासी राजु
२३. श्री. माखिजा प्रकाश



२४. श्री. राजानी नरेंद्र
२५. श्री. भारती राजानी
२६. श्री. रामरख्यानी मोहन
२७. श्रीमती.आशा जेस्वानी

मा.सचिव :- जे सदस्य पूर्वीचा ठराव क्र.९ दि. २०.७.२००० मध्ये फेरबदल करण्याच्या शिवसेना भाजपाने मांडलेल्या प्रस्तावाच्य विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरूध्द :-

१. श्रीमती.ज्योती कालानी
२. श्रीमती. मिनु दासानी
३. श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई
४. श्री.वाधवा गिरधारी
५. श्री.तलरेजा विनोद
६. श्रीमती.वनवारी मोना
७. श्रीमती.कुंदनानी लविना
८. श्री.किशोर वनवारी
९.श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंदा
११ श्रीमती.पवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.सोनावणे राजु

१७ श्री.पुरस्वानी जमनु
१८ श्री.पंजाबी नारायण
१९ श्री.आयलानी कुमार
२० श्री.जाधव सुरेश
२१ श्री.वाघे शामु
२२ श्री.ढेणववाल बनवारी
२३ श्री.ठाकुर सेवलदास
२४ श्रीमती.वसीटा देवी
२५ श्री. वेहरानी ठाकुर
२६ श्रीमती.साधवानी जया
२७ श्री. मन्सुलकर सुभाष
२८ श्रीमती.वलेचा पदमा
२९ श्रीमती.गजवानी कांता
३० श्रीमती.वाठिजा इंदिरा
३१ श्री.केणी जयकुमार
३२ श्री.माखिजा हरदास
३३ श्री.बेहरानी गोप
( पहिल्यांदा मतदान घेतले असता श्री. गोप बहरानी यांनी प्रस्तावाच्या विरोधात हात वर करून मतदान केले व ते निघुन गेले. परत फेर मोजणी केली असता ते उपस्थित नव्हते. त्यामुळे श्री.नरेंद राजानी म्हणत होते की, श्री. गोप बहरानी हे उपस्थित नसल्याने यांचे मत मोजले न जावे.)

<u>मा.सचिव :-</u> जे सदस्य या प्रस्तावात तटस्थ राहु इच्छितात त्यांनी आपले हात वर करावेत.



तर ४ सदस्य तटस्थ राहू इच्छित आहेत.

१. श्री. देवेंद्रसिंग दर्शनासिंग खेमाणी
२. श्री. गुप्ता प्रभुनाथ
३. श्री. रोहडा श्यामसुंदर
४. श्री.प्रमनानी ईश्वर

<u>मा.सचिव :-</u> ३३ विरूध्द २७ आणि ५ तटस्थ मते आहेत.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :- यु.पी.पी.चे सर्व सदस्य तटस्थ राहू इच्छितात, श्रीमती.ज्योती कालानी या सुध्दा तटस्थ राहू इच्छितात?

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> परत वोटींग घ्या.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- वोटींग पुन्हा दुस-यांदा होऊ शकत नाही. एकदा मतदान केले ते केले.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा.महापौर</u> :- सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे बहुमताने संमत करण्यात येत आहे.

<u>विषय</u> :-दिनांक. २०.७.२००० रोजीच्या महासभा ठराव क्र. ९
मध्ये फेरबदल करण्यासाठी प्रस्तावावर विचार <u>करणे बाबत.</u>

<u>प्रस्ताव :-</u>

सुचकाचे नाव :- १) श्रीमती. सुनिता राजवानी.

२) श्री. नरेंद राजानी.

अनुमोदकाचे नाव :- १) श्री. लाल पंजाबी.

२) श्री. प्रकाश महाडिक.

दिनांक २०.७.२००० रोजी झालेल्या सर्वसाधारण महासभेमध्ये टाऊन हॉल व तरण तलाव बांधा, वापरा व हस्तांतरीत करा, (बिल्ड, ऑपरेटर आणि ट्रान्सफर)या बददलचा विषय महासभा ठराव क्रमांक. ९ नुसार त्यामधील अटी व शर्ती विषयी कसलीही चर्चा न करता विरोधी पक्ष अनुपस्थित असल्याचे भासवून बेकायदेशिररित्त्या पारीत करण्यात आला.

वास्तविक कोणताही विषय महासभेमध्ये ठेवतांना विषय वाचुन दाखवुन ठराव मांडणे आवश्यक असते परंतु दिनांक २०.७.२००० रोजी इतिवृत्त पहाता
तसे केलेले नाही ठराव फक्त विषय क्रमांक३ असा उल्लेख करून व त्याच पध्दतीने महापालिका स्थायी समिती समोर आयत्त्यावेळचा विषय म्हणुन आणुन सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यासाठी काही सदस्य आक्षेप घेत असताना देखिल त्यांना त्याविषयी चर्चा करू न देता धिसाड घाईने पारीत करण्यात आला.त्यामुळे कोणत्त्याही सभागृहासमोर त्यामधील अटी व शर्तीविषयी चर्चा करण्यांत आली नाही.

--२५--

जनरल अरूणकुमार वैद्य नावाने असलेल्या सभागृहामध्ये अद्ययावत बियरबार हॉटेल म्हणजे त्यामध्ये सर्व प्रकारचे मद्य आली तसेच सदरचे सभागृह यापुढील तीस वर्षासाठी ठेकेदाराला देण्यात येत आहे व सभागृह मधील तसचे तेथील इतर सर्व दर हे ठेकेदाराने ठरवायचे आहे. असे नमुद केले गेलेले आहेत. त्या अटी व शर्ती व्यतिरिक्त इतरही अटी व शर्ती अशा आहेत की, त्यामध्ये जनहितापेक्षा व्यापारीकरणात जास्त जोर देऊन ठेकेदाराचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल याचा विचार केला गेलेला आहे.

सदरचे सभागृह पुढील तीस वर्षे सर्वसामान्यांच्या उपयोगाचे नाही त्यामुळे सदर ठरावानुसार सर्वसामान्यांचा विचार केला गेलेला नाही त्यामुळे उल्हासनगरमध्ये प्रचंड जन प्रक्षोभ झाल्यामुळे व जन आंदोलन होण्याची शक्यता विविध प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रकट झालेले आहे व त्याचे पडसाद संपुर्ण महाराष्ट्र भर उमटलेले आहेत. शहरातील सर्वसामान्यांच्या भावना लक्षात घेऊन महापालिकेतील १/४ सदस्यांनी सदर विषयांवर प्रगलभबंधा पुर्वक विचार विनिमय करून अटी व शर्ती ठरविण्यासाठी विशेष महासभेसमोर विषय ठेवला आहे.

सदर ठरावांवर प्रगल्भपुर्वक चर्चा करून उल्हासनगरमधील जनतेच्या हिताच्या व सर्वसामान्य जनतेच्या हितास बाधा आणण्याच्या खालील अटीवर चर्चा व्हावी.

१) जनरल अरूणकुमार वैद्य नावाने असलेल्या सभागृहामध्ये दारू विक्री होणे.
२) सदर ठरावानुसार ठेकेदाराला सभागृहापुढील तीस वर्षासाठी दिल्यामुळे एक संपुर्ण पिढीवर अन्याय होत आहे. ३० वर्षे भाडे तत्त्वावर दोन कोटी रूपयांच्या बदल्यात देणे योग्य की अयोग्य?

३)  सदर सभागृहामध्ये दर फिक्स करण्याचे ठेकेदारावर सोडणे योग्य की अयोग्य? दर काय असले पाहिजेत हे अधिकार महापालिकेचे अधिकार ठेकेदाराला देणे योग्य की अयोग्य?
४)  दिनांक २०.७.२००० रोजीच्या महासभेमध्ये टाऊन हॉल संबंधीचा ठराव क्र.९ पास झाला आहे. तो असा आहे की, महासभा सार्वजनिक बांधकाम समितीच्या दिनांक ३.७.२००० रोजीचा ठराव क्र३ कायम करीत आहे व सार्वजनिक बांधकाम समितीचा पास झालेला दिनांक ३.७.२००० रोजीच्या ठरावानुसार ३० वर्षाच्या कालावधीसाठी आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती महासभेच्या अधिन राहून असे आहे तर त्या अटी व शर्ती महासभेमध्ये मंजुर केल्या गेल्या का?
५)  महापालिका किंवा महानगरपालिकेतील कोणत्त्याही व्यक्तीला ५२ दिवसा व्यतिरिक्त सभागृह भाड्याने घ्यावयाचे असल्यास १८० दिवस अगोदर म्हणजेच ६महिने अगोदर कार्यक्रम निश्चित करणे शक्य आहे का? तसेच इतर सर्व बाबींवर चर्चा करून हा ठराव (महासभा ठराव क्र.९दिनांक. २०.७.२०००)रद्द करावा व शहरातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने योग्य असा नविन ठराव महासभेमध्ये आणावा.

<u>महासभा ठराव क्र. २१</u>   <u>दि.२२.११.२०००</u>.

हि महासभा वरील प्रस्तावनेतील अटींवर झालेल्या प्रदिर्घ चर्चे अंती, दि. २०.७.२००० रोजीच्या महासभा ठराव क्र.९ मध्ये काहीही फेरबदल करण्यास मान्यता देत नाही.

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--२६--

<u>मा.सचिव</u> :- कृपया सर्वांनी राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जन गन मन हया राष्ट्रगीताच्या सामुहिक गायना नंतर रात्री ९. २५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर हरदास माखिजा यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा.
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१३/१२/२०००.

**इतिवृत्त**

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१३/१२/२००० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक १३.१२.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा.महापौर, श्री. हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

२. श्रीमती.सोनावणे यमुना
३ श्रीमती.कालानी ज्योती
४ श्री.ढेणववाल वनवारी
५ श्री.उमाप रामदास
६ श्रीमती. वेलकर सुरेखा
७ श्री. यादव नरेश
८ श्री.सोनावणे राजु
९ श्रीमती. पंचशिला पवार
१० श्री. आढाव रामभाऊ
११ श्री. बगाडे सुनिता
१२ श्री.भांडे भगवान
१३ श्री.वनवारी किशोर
१४ श्री.तेजी कैलाश
१५ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड
१६ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग
१७ श्री.प्रमनानी ईश्वर
१८ श्रीमती.वसीटा बेबी
१९ श्रीमती मटाई जोनिता
२० श्री. लांडे पांडुरंग
२१ श्रीमती.ससाणे लक्ष्मी
२२ श्री.मोरे भानजी.
२३ श्रीमती. राजवानी सुनिता
२४ श्रीमती. टेकचंदानी चंद्रा
२५. श्री.पुरस्वानी जमनादास
२६. श्री.पारवानी रामचंद्र
२७ श्री. तलरेजा विनोद
२८ श्री.रोहडा श्यामसुंदर
२९ श्री.गुप्ता प्रभुनाथ
३० श्रीमती.करोतिया मालती
३१. श्री. बहरानी ठाकुरदास
३२. श्री.सुरेश जाधव
३३. श्री.मोरे भिमसेन
३४. श्री.चव्हाण रमेश
३५. श्रीमती.साधवानी जया
३६. श्री.राजानी नरेंद्र
३७. श्री.मनसुलकर सुभाष
३८. श्रीमती. नाईक यशस्विनी
३९. श्रीमती.राजानी भारती
४०. श्रीमती.कुंदनानी लविना
४१. श्रीमती. वलेचा पदमा
४२. श्रीमती.गजवानी कांता
४३. श्रीमती.भाटिजा इंदिरा
४४. श्री.केणी जयकुमार
४५. श्री.पंजाबी नारायण
४६. श्री.अचनानी पम्मीकुमार
४७. श्रीमती. राधवानी आशा
४८. श्री. प्रकाश माखिजा
४९. श्री. रामरख्यानी मोहनदास
५० श्री. किशनानी गोदुमल
५१ श्री. प्रकाश महाडिक.

तर

मा.उपमहापौर श्री.धनंजय बोडारे तसेच २ श्री. भुल्लर राजेंद्र, ३. श्री.चौधरी गणेश, ४. श्री. वाघे शामु, ५. श्रीमती. मोकल सिमा, ६ श्रीमती. दासानी मिनु,
७ श्री.टाले प्रमोद,८ श्री.ठाकुर सेवलदास, ९ श्रीमती.रूपचंदानी भगवंती ,१० श्री चौधरी राजेंद, ११. श्री. वारीगे पंढरीनाथ, १२. श्री.वाधवा गिरधारी, १३. श्री भाटीया जयप्रकाश,१४ श्रीमती.वनवारी मोना, १५. श्रीमती. जेस्वानी आशा, १६
श्री. आयलानी कुमार, १७ श्रीमती. वारिंगे पन्ना, १८. श्री. जग्यासी राजु, १९.

श्री. बहरानी गोप २०. श्री. सचदेव गिरधारी, २१. श्री. पंजाबी लाल व श्री केसवानी किशोर हे सन्माननिय सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

--२--

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ . ४३ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सचिव</u> :- उल्हासनगर महानगरपालिकेवर नैमित्तिक रिकाम्या जागेवर एका नामनिर्देशित सदस्याची निवड करणे बाबत.

जेव्हा सभा सुचना काढण्यांत आली होती तेव्हा त्या सभा सुचनेबरोबर नामनिर्देशित सदस्याच्या निवडणुकीबाबतचा कार्यक्रम सुध्दा पुढील प्रमाणे देण्यांत आलेला होता.

<u>बुधवार दिनांक १३.१२.२००० रोजी होणा-या</u>
<u>नामनिर्देशित सदस्याच्या नेमणुकीचा निवडणुक कार्यक्रम</u>.

| दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|
| ८.१२.२००० शुक्रवार | दुपारी १२ पूर्वी | नामनिर्देशित सदस्य म्हणुन नेमण्यांत येणा-या उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे विहित नमुन्यात मा.आयुक्त यांचेकडे दाखल करणे. |
| ८.१२.२००० शुक्रवार यांचे | दुपारी १२ नंतर | मा.आयुक्त यांचेकडे आलेल्या सर्व नामनिर्देशन पत्राची पिठासीन अधिकारी मार्फत छाननी. |
| ८.१२.२००० प्रसिध्द शुक्रवार | सायं.४.०० वा. | वैद्य नामनिर्देशित उमेदवारांची यादी करणे. |
| १२.१२.२००० मंगळवार | दुपारी १२ पूर्वी | उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी केलेली लेखी नोटीस पिठासीन प्राधिका-यांस पाठवून आपली उमेदवारी मागे घेता येईल. |
| १२.१२.२००० मंगळवार | सायं.४.००वा. | निवडणुक लढविणा-या नामनिर्देशित सदस्यांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. |
| १३.१२.२००० बुधवार. पदासाठी | सायं.४.०० वा. | निवडणुक सभेची सुरूवात आवश्यक भासल्यास नामनिर्देशित सदस्य मतदान त्यानंतर मतमोजणी व निकाल घाषित करणे. (मतदानाचा कालावधी एक तास) |

ज्या कुणाला आपले नामनिर्देशन पत्र भरायचे असेल त्याने दिनांक८. १२.२००० रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत आयुक्तांकडे आपले नामनिर्देशन पत्र सादर करायचे होते. परंतु त्यादिवशी फक्त एकाच उमेदवाराने आपले नामनिर्देशन पत्र सादर केले होते. त्या उमेदवाराचे नाव होते, श्री.नरेंदकुमार ठाकुर व अन्य कुण्या उमेदवाराने आपले नामनिर्देशन पत्र भरले नव्हते. त्यामुळे त्यांच्यासमोर अन्य कुणीही उमेदवारी भरली नसल्याने त्यांनाच बिनविरोध निवडुन आल्याची



घोषणा करणे आवश्यक आहे. यासाठी मी मा.पिठासिन अधिका-यांना अनुरोध करेन की, याकामी त्यांनी आपला निर्णय दयावा.

<u>मा.महापौर :-</u>स्विकृत सदस्य श्री. मनोहर जेस्वानी यांच्या रिक्त झालेल्या जागेवर एका स्विकृत सदस्याची निवडणुकीने निवड करायची होती. त्याबाबत महानगरपालिकेच्या वतीने आम्ही जी निवडणुक प्रक्रीया चालु केली होती. त्यामध्ये श्री.नरेंदकुमार ठाकुर यांचा एकच अर्ज प्राप्त झाला होता. व दुसरा अर्ज न आल्याने आजच्या या सभेत श्री. नरेंदकुमार ठाकुर यांना बिनविरोध निवडुन आल्याचे मी घोषित करीत आहे.

<u>प्रस्तावना :-</u>

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे कलम ५ (२) (ब) अन्वये सार्वत्रिक निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या दि.५.४.९७ रोजीच्या पहिल्या सभेत नामनिर्देशित सदस्य पदासाठी पुढील पाच सदस्य निवडुन आल्याचे घोषित करण्यात आले.

१)श्री. केसवानी किशोर ककुमल.
२)श्री. क्रिशनानी गोदुमल नारायणदास.
३)श्री. पंजाबी लाल देवनदास.
४)श्री. सचदेव गिरधारी रतनमल.
५)श्री. जेसवानी मनोहर कन्हैयालाल.

दि. २०.११.९९ पासुन श्री. जेसवानी मनोहर कन्हैयालाल नैतिक अध:पाताच्या अंर्तभाव असलेल्या अपराधाबददल उल्हासनगर न्यायालयाकडुन भारतीय दंड संहितेचे कलम १८६, १७९ व १२० अन्वये अपराधाबददल सिध्दअपराध ठरविण्यात आल्यानंतर सदरचे पालिका सदस्य अर्नह घोषित करण्यात आले. त्यामुळे एका पालिका सदस्याची प्रासंगिक रिक्त झालेल्या जागेवर एखाद्या व्यक्तीची निवडणुक करून जागा भरली पाहिजे. म्हणुन या विशेष बाबीसाठी दि.१३.१२.२००० रोजी महासभा बोलविण्यात आलेली आहे. महासभेच्या सूचनेसोबत नामनिर्देशिन पत्र दाखल करणे, छाननी करणे, मागे घेणे व निवडणुक लढविणा-या उमेदवाराची अंतिम यादी प्रसिध्द करणे, कामीचा कार्यक्रम प्रत्येक महापालिका सदस्यांना पुरविण्यात आलेला होता.

या निवडणुकीसाठी श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम या एका उमेदवाराने विहीत मुदतीत आयुक्त यांच्याकडे आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले व छाननी अंती त्यांचे नाम-निर्देशन पत्र वैद्य घोषित करण्यात आले. फक्त एकच व्यक्ती नामनिर्देशित करावयाची असून, वैद्यरित्या निवडून द्यावयाच्या उमेदवाराच्या संख्येएवढी असून महाराष्ट्र, महानगरपालिका नगरपरिषद व नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता, निवडणुका व नियुक्त्या) नियम १९९६ चे नियम ७ अन्वये श्री.ठाकुर नरेंद केवलराम यांना बिनविरोध निवडुन आल्याचे घोषित करणे आवश्यक असेल. तसेच वरील नियमातील नियम २१ अन्वये मा. पिठासन अधिकारी अशा निर्वाचित उमेदवाराचे नाव प्रसिध्द करणेसाठी शक्य तितक्या लवकर राज्यनिवडणुक आयुक्ताला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिका-याला कळवेल.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम यांना श्री. जेसवानी मनोहर कन्हैयालाल यांच्या प्रासंगिक रिक्त जागेवर बिनाविरोध



नामनिर्देशित सदस्य पदासाठी निवडुन आल्याचे घोषित करीत आहे. तसेच अशा निर्वाचित उमेदवाराचे नाव राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी संमती देत आहे.

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.महापौर :-ज्या सन्मानिय सदस्यांना श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचे स्वागत करायचे असेल ते त्यांचे स्वागत करू शकतात. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी महासभेत यावे.

श्री.नरेंद्रकुमार ठाकुर हे महासभेत उपस्थित झाले आहेत. जे त्यांना शुभेच्छा देऊ इच्छितात त्यांनी शुभेच्छा दयाव्यात.

मा.सदस्य श्री. बी.बी. मोरे :-मा. महापौर, आयुक्त साहेब, व सभागृहातील सर्व सहकारीहो, आपल्या पिठासिन अधिका-यांनी आताच जो निर्णय घोषित केला, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेत स्विकृत सदस्याची जी एक जागा रिक्त होती त्याजागेसाठी श्री.नरेंद्रकुमार ठाकुर या एकाच व्यक्तीने आपले नामनिर्देशन पत्र सादर केले होते. त्यामुळे ते बिनविरोध निवडुन आले आहेत. यास्तव महापालिकेतील सर्व पक्षीय सदस्यांचे मी आभार मानतो. उल्हासनगर महानगरपालिकेतील सत्ताधारी पक्षीय सदस्य असोत अगर विरोधी पक्षीय सदस्य असोत सर्वांनी श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचा सन्मान राखला आहे. यास्तव शिवसेना ,भाजपा व सभागृहातील सर्व सन्मानिय सदस्यांचे मी हार्दिक, हार्दिक स्वागत करतो. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेत अशाच एकजुटीने कामकाज चालावे यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो. व सर्वांच्या या भुमिकेचे स्वागत करतो. तसेच श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांना मी हार्दिक, हार्दिक शुभेच्छा देतो.व माझे बोलणे संपवतो. जय हिंद.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- भारतीय जनता पार्टीच्या वतीने मी श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचे हार्दिक स्वागत करतो, अभिनंदन करतो व ज्या भावनेने श्री.नरेंद्रकुमार ठाकुर यांना बिनविरोध निवडुन दिले आहे. ती भावना व प्रेरणा अशीच पुढे चालु ठेऊ अशी अपेक्षा व्यक्त करतो. कधी कधी एखादया विषयावर सत्ताधारी व विरोधी पक्षीय सदस्य एकत्र येऊन शहराच्या विकासासाठी कार्य करू शकतात. तसेच इतर काही प्रसंगी सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष सदस्य आपापले इगो सोडुन एकत्र काम करू शकतात अशी ही प्रेरणा आम्हास मिळू शकते. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यानां सर्वांनी पाठिंबा दिला तसा मी ही पाठिंबा दिला. मी त्यांना पाठिंबा देण्याचे एक विशेष कारण हे सुध्दा आहे की, त्यांचे नाव नरेंद्र आहे त्याप्रमाणे माझे सुध्दा नाव नरेंद्र आहे. तर याआधारावरच एक नरेंद्र दुस-या नरेंद्रचे अभिनंदन करीत आहे. धन्यवाद.

*__मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-__ शिवसेनेच्या वतीने श्री.नरेंदकुमार ठाकुर यांना मी हार्दिक शुभेच्छा देते. व सभेमध्ये त्यांचे स्वागत करते. आताच श्री.नरेंद राजानी यांनी सांगीतले की, त्यांचे नाव नरेंद आहे तसेच निवडुन आलेल्या सदस्याचे नावही नरेंद आहे. तसेच ही एक आनंदाची गोष्ट आहे की, माझ्या मुलाचे नाव नरेंद आहे , माझ्या भावाचे नावही नरेंद आहे. व आणखी एक माझा मुलगा नरेंद इथे स्विकृत सदस्य म्हणुन निवडुन आला आहे. यास्तव मी शिवसेनेच्या वतीने त्यांचे स्वागत करते. व आनंदाची गोष्ट ही आहे की,*



*त्यांना महापालिकेच्या प्रशासनाचा फार मोठा अनुभव आहे. माझ्यामते ते पूर्ण सभेला एकसाथ घेऊन चालतील. जनेतेचे व शहराचे जे प्रश्न असतील तेथे पक्षाचे मत ते आणणार नाहीत. ते फक्त आपले वैयक्तिक मत देतील जे जनतेच्या हिताचे असेल, शहराच्या हिताचे असेल. धन्यवाद.*

*__मा.सदस्या श्रीमती.ज्योती कालानी :-__ आभारी आहे. शिवसेना, भाजपा व आमच्या सत्ताधारी पक्षांच्या वतीने श्री. नरेंदकुमार ठाकुर यांना स्विकृत सदस्य म्हणुन बिनविरोध निवडुन दिले. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आमच्या यु.पी.पी.चे स्विकृत सदस्य श्री. मनोहर जेस्वानी, ज्यांना निलंबित केले गेले होते त्यांच्या जागी यु.पी.पी.च्या वतीने, सर्व ६९ नगरसेवकांचे जे हृदयसम्राट किंवा हिरो म्हंटले तरी चुकीचे होणार नाही.*

*__मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी__ :- ऋतिक रोशन आहेत?*

*__मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-__ मी सर्व पक्षीयांची आभारी आहे व अपेक्षा करते की, श्री. नरेंदकुमार ठाकुर हे आमच्या सर्व ६९ किंवा ७५ जेवढे काही नगरसेवक आहेत. त्यांना ते सहकार्य करतील व यु.पीपी. चे नावलौकीक करतील धन्यवाद.*

*एक विशेष सुचना सुध्दा देऊ इच्छिते कि, सायंकाळी एका भोजन समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे त्यासाठी आपणा सर्वांना निमंत्रित करण्यांत येत आहे. धन्यवाद.*

*__मा.सदस्य श्री.जमनु पुरस्वानी :-__ मा.श्री. नरेंदकुमार ठाकुर जे नव्याने येथे निवडुन आलेले आहेत त्यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. व ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे की, जेव्हा महानगरपालिकेची निवडणुक झाली तेव्हा सहा अपक्ष नगरसेवक होते. हळुहळु सात व आता आठ अपक्ष नगरसेवक झालेले आहेत. कारण की, सर्व पक्षांनी त्यांचे समर्थन केलेले आहे. यास्तव ते अपक्ष नगरसेवक राहतील श्री. नारायण पंजाबी यांनी त्यांना समर्थन दिलेले आहे. यास्तव मी असे म्हणेन की, आज पासुन आठ अपक्ष नगरसेवक होतील व यासाठी मी सर्व पक्षीय नगरसेवकांचे अभिनंदन करतो की, त्यांनी श्री. नरेंदकुमार ठाकुर यांना अपक्ष म्हणुन निवडुन आणलेले आहे. सर्वांचे हार्दिक आभार.*

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-__मा.महापौरजी.... निती हे दर्शविते की, सभागृह नेत्याने शेवटी बोलावे त्यानुसार मी सर्वांना अगोदर बोलु दिले. आता मला सुध्दा दोन मिनिटे बोलु दिले तर खुप चांगले होईल.*

*आज उल्हासनगर महानगरपालिकेत खुपच आनंदाचा दिवस आहे की, आमच्या सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य दिले आहे, महाडिकसाहेब मी आधीच स्पष्ट करून सांगतो. आज खुपच आनंदाचा दिवस आहे. आज सर्व राजकीय पक्षांनी श्री नरेंदकुमार यांना ज्यांना प्रेमाने कुमारी असे म्हणतात. त्यांना सहयोग दिला आहे. व बिनविरोध निवडुन दिले आहे. जेव्हा पहिल्या वर्षी, दुस-या वर्षी जेव्हा शिवसेना भाजपाची सत्ता होती तेव्हा आम्ही सुध्दा त्यांना*

सहकार्य दिले होते. आज त्यांनीसुध्दा आम्हाला जे सहकार्य दिले आहे ते विसरण्यासारखे नाही
यास्तव आम्ही त्यांना धन्यवाद देतो. व यामध्ये सर्वात जास्त योगदान आमच्या श्री. मनोहर जेस्वानी यांचे आहे. त्यांनी सुध्दा श्री. नरेंदकुमार यांना निवडुन येण्यासाठी फार मोठे सहकार्य दिले आहे. ते त्यांच्याबरोबर आले होते त्याना सुध्दा आम्ही धन्यवाद देतो. ज्यांनी त्यांना ग्रीन सिग्नल दिला त्याचबरोबर आमचे आमदार पप्पू कालानी यांचे सुध्दा स्वागत करतो ज्यांनी आम्हाला प्रेरणा दिली की, श्री. कुमारी हे बिनविरोध निवडुन यावेत. मी पुन्हा एकदा त्यांना धन्यवाद देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--६--

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर</u> :- मा.महापौरजी, सभागृहात उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य, श्री. जमनु पुरस्वानी व श्रीमती ज्योती कालानी यांनी जे म्हंटले आहे ते चुकीचे नाही. श्री.नरेंदकुमार ठाकुर हे असे एक व्यक्तीमत्त्व आहे की, ज्यांना आपलेसे करण्यासाठी प्रत्येक जण पुढे येत आहे. प्रत्येक जण त्यांना ते आमच्या पक्षाचे असल्याचे भासवित आहेत. मी म्हणेन की, ते कॉंग्रेसचे आहेत, भाभी ज्योती कालानी म्हणतील की, ते यु.पी.पी चे आहेत. जमनु पुरस्वानी म्हणतील की ते अपक्ष आहेत. आमचे बी. बी मोरे साहेब म्हणतील की, ते आर.पी.आय चे आहेत. शिवसेना व भाजपा चे सर्व नगरसेवकांचे आम्ही आभारी आहोत. कारण की, श्री नरेंदकुमार ठाकुर यांच्यासमोर त्यांनी त्यांचा उमेदवार उभा न करता श्री.ठाकुर यांना बिनविरोध निवडुन आणण्यासाठी मदत केली म्हणुन कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो. व तसे पाहीले गेले तर श्रीमती ज्योती कालानी यांनी म्हंटल्याप्रमाणे ते एक आवडते कलाकार/व्यक्तीमत्त्व आहे. म्हणुन सर्वांना असे वाटते की त्यांनी आमच्याकडे यावे. कारण यापूर्वी ते या महापालिकेत जकात विभागाचे उपायुक्त होते. तेथे त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे काम केले होते त्यांचे ते काम पहाता व स्वभाव पहाता सर्वांनी त्यांना सहकार्य दिले. त्यामुळे मी सर्वांना धन्यवाद देतो जयहिंद. जय महाराष्ट्र.

<u>मा.महापौर</u> :- या प्रसंगी कुणाला आपले विचार मांडायचे असतील तर त्यांचे स्वागत केले जाईल.अन्यथा प्रशासनाच्यावतीने अधिकारीगण त्यांचे स्वागत करू इच्छित असल्याने त्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल. श्री. महाडिकजी, श्री. आढावजी आपण बोला.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव</u> :-महापौरजी, आमचे आयुक्त साहेब, सर्व अधिकारी गण, सर्व पक्षांचे सदस्य व ज्यांना आता निर्वाचित घोषित केले कींवा नाही? निर्वाचित घोषित केले असे स्विकृत सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर.

आज ही फार आनंदाची गोष्ट आहे की, एकमताने स्विकृत सदस्य जो निवडला गेला आहे त्यांच्या विरोधात कुणीही आपले नामनिर्देशन पत्र दाखल केलेले नाही. बिनविरोध म्हणता येणार नाही परंतु ते सर्वांचे एक चांगले मित्र म्हणुन सर्वांनी त्यांच्याविषयी एक सदभावना ठेवून त्यांना सभागृहामध्ये स्विकृत सदस्य म्हणुन निवडुन आणले. मी त्यांचे येथे स्वागत तर करेनच तसेच आभार सुध्दा मानेन. आर.पी.आय.च्या वतीने मी या स्विकृत सदस्याचे आभार मानतो. आणि महानगरपालिकेत त्यांनी जे काम केले त्यांना प्रशासनाचा जो अनुभव आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सध्या जी हालाखीची आहे. त्यात करांची जी वसुली होत नाही. ती वसुली मिळकत कराची असो, पाणी पटटीची असो त्यांना प्रशासनाचा चांगला अनुभव असल्याने आमच्या अधिकारी, कर्मचा-यांना मदत करून आमच्या महापालिकेची वसुली वाढवतील अशी त्यांच्याकडुन अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

मा.आयुक्त :- सन्माननिय महापौर व उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य, आज श्री. नरेंदकुमार ठाकुर यांच्या निवडणुकीच्या निमित्ताने या महासभेत एकत्र आलो आहेत. ते बिनविरोध निवडुन आल्याची घोषणा सुध्दा मा.महापौर साहेबांनी थोडयावेळा पूर्वीच केली आहे. आपण सर्वांनी त्यांना शुभेच्छा सुध्दा दिल्या आहेत.

श्री. नरेंद राजानी यांनी सांगीतले की, नावातील साम्यतेमुळे एक जवळीक निर्माण झाली आहे. मी असे म्हणेन की, जसे सर्व पक्षांचे प्रतिनिधी आहेत तसेच प्रशासनाचे ते प्रतिनिधी आहेत. ज्या व्यक्तीने २०-२५ वर्ष या महापालिकेत काम केले आहे. व त्यानंतर सर्व पक्षीयांकडुन त्यांना स्विकृत सदस्य म्हणुन निवडुन आणले जाते ही फार मोठी गोष्ट आहे. एका कर्मचा-याचा एवढा मोठा आदर

--७--

ठेवला जातो त्याचे श्री. नरेंदकुमार हे एक प्रतिक आहे. एका कर्मचा-याचा एवढा मोठा आदर ठेवला जातो हे एक वेगळया प्रकारचे उदाहरण आहे असे मी समजतो. कुणी माणुस कीती लोकप्रिय असावा असाजर कुणी मला प्रश्न विचारला तर याचे काही मोजमाप करण्याचे साधन नाही आहे. परंतु जास्तीत जास्त लोकप्रियतेचा विचार केला तर श्री.नरेंदकुमार ठाकुर जेवढे लोकप्रिय आहेत तेवढा लोकप्रिय तो माणुस असला पाहिजे. हा कदाचित नरेंद नावचा चमत्कार आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आपण सुध्दा लोकप्रिय आहात ना?

मा.आयुक्त :- तर त्यांच्या एवढा लोकप्रिय होण्यासाठी काय करावे लागेल हे त्यांना गुरू मानुन त्यांच्या कडुन दिक्षा घ्यावी लागेल. असे मला वाटते. प्रशासनातर्फे,माझ्या सर्व सहका-यांतर्फे मी त्यांचे हार्दिक स्वागत करतो व अशी अपेक्षा व्यक्त करतो की, गेल्या वीस-पंचवीस वर्षामध्ये प्रशासनामधील ज्या अडी-अडचणी त्यांनी पाहिल्या आहेत त्या समजुन घेऊन त्यांनी सभागृहामध्ये आमचे सुध्दा प्रतिनिधीत्त्व करावे. अशी अपेक्षा ठेऊन मी आपणां सर्वांची रजा घेतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

मा.महापौर :-श्री. नरेंदकुमार ठाकुर यांना शुभेच्छा देताना मी सदनातील सर्व पक्षीय सदस्यांना धन्यवाद देतो. व त्यांचे अभिनंदन सुध्दा करतो. व त्याचबरोबर अशी अपेक्षा ही करतो की, महानगरपालिकेचा जो उर्वरित कालावधी आहे. त्यामध्ये जितक्याही, काही महासभा येतील त्यामध्ये येणारे प्रस्ताव अशाचप्रकारे, एकमताने महानगरपालिकेचे कामकाज पाहतील तर ते शहराच्या व जनतेच्या हिताचे राहिल. व आज पर्यंतचा माझा जो अनुभव आहे तो पहाता विरोधी पक्षीयांना आजपर्यंत सत्ताधारी पक्षाला बरेच सहकार्य दिलेले आहे. कधी कधी असे काही मुददे येतात ज्यामध्ये विचारांच्या भिन्नतेमुळे आम्ही वेगवेगळे होत असतो. परंतु माझा नेहमी हा प्रयत्न राहीला आहे की, मी विरोधी पक्षीयां ना सुध्दा सत्ताधारी पक्षीयांन बरोबर घेऊन चालावे. व शहराच्या संदर्भात आमचे माजी मुख्यमंत्री श्री. नारायण राणे यांनी कल्याण महानगरपालिकेच्या निवडणुकीत असे म्हंटले आहे की, जेथपर्यंत नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्त्या, ग्राम पंचायत यांच्या निवडणुकीच्या बाबतीत कोणत्त्याही प्रकारचे राजकारण असता कामा नये. तेथे शहरातील कामकाज पहाता सर्व पक्षांना, प्रत्त्येक राजकीय पक्षांना एकसाथ, एका मंचावर येऊन काम केले पाहिजे. अशी आजच्या स्थितीत मी अपेक्षा व्यक्त करतो की, महानगरपालिकेचे उर्वरित कालावधीतील कामकाज एकजुटीने, एकमताने चालावे अशी मला अपेक्षा आहे. धन्यवाद.

मा.सचिव :- कृपया सर्वांनी राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमण या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ५.२० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखीजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२०/१२/२०००.

इतिवृत्त

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१२/२००० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.१२.२००० रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री.हरदास माखीजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

मा.महापौर :-श्री. हरदास माखीजा.

मा.उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

| | |
|---|---|
| ३ श्री. भुल्लर राजेंद विरसिंह | ३४ श्री. वाधवा गिरधारी |
| ४ श्री. वाघे शामु बाबु | ३५ श्री.पारवानी रामचंद्र |
| ५ श्रीमती. मोकल सिमा | ३६ श्री. तलरेजा विनोद |
| ६ श्रीमती.सोनावणे यमुना | ३७ श्री.रोहडा श्यामसुंदर |
| ७ श्रीमती.कालानी ज्योती | ३८ श्री.गुप्ता प्रभुनाथ |
| ८ .श्री.ढेणववाल बनवारी | ३९ श्रीमती.करोतिया मालती |
| ९ श्री.उमाप रामदास | ४०. श्री. बहरानी ठाकुरदास |
| १० श्रीमती. वेलकर सुरेखा | ४१. श्री.मोरे भिमसेन |
| ११ श्री. यादव नरेश | ४२ श्री.चव्हाण रमेश |
| १२ श्री.सोनावणे राजु | ४३ श्री.महाडिक प्रकाश |
| १३ श्रीमती. दासानी मिनु | ४४ श्रीमती.साधवानी जया |
| १४ श्रीमती.पंचशिला पवार | ४५ श्री.भाटिया जयप्रकाश |
| १५ श्री.टाले प्रमोद | ४६ श्रीमती.बनवारी मोना |
| १६ श्री. आढाव रामभाऊ | ४७ श्रीमती.जेस्वानी आशा |
| १७ श्री. बगाडे सुनिता | ४८ श्री.राजानी नरेंद्र |
| १८ श्री.भांडे भगवान | ४९ श्री.मनसुलकर सुभाष |
| १९ श्री. ठाकुर सेवलदास | ५० श्रीमती. नाईक यशस्विनी |
| २० श्री.बनवारी किशोर | ५१ श्रीमती.राजानी भारती |
| २१ श्री.तेजी कैलाश | ५२ श्रीमती.कुंदनानी लविना |
| २२ श्रीमती. लक्ष्मीबाई लुंड | ५३ श्रीमती.गजवानी कांता |
| २३ श्री.खेमाणी देवेंद्रसिंग | ५४ श्रीमती.भठिजा इंदिरा |
| २४ श्री.प्रमनानी ईश्वर | ५५ श्री.केणी जयकुमार |
| २५ श्रीमती.बसीटा बेबी | ५६ श्री.पंजाबी नारायण |
| २६ श्रीमती मटाई जोनिता | ५७ श्री.आयलानी कुमार |
| २७ श्री.चौधरी राजेंद्र | ५८ श्री.अचनानी पम्मीकुमार |
| २८ श्री.लांडे पांडुरंग | ५९ श्रीमती.वारिंगे पन्ना |
| २९ श्रीमती.ससाणे लक्ष्मी | ६० श्रीमती. राधवानी आशा |

३० श्री.मोरे भानजी.
३१ श्रीमती. राजवानी सुनिता
३२ श्रीमती. टेकचंदानी चंदा
३३. श्री.पुरस्वानी जमनादास

६१ श्री. प्रकाश माखिजा
६२ श्री. रामरख्यानी मोहनदास
६३. श्री.जग्यासी राजु
६४. श्री. बेहरानी गोप
६५ श्री. सचदेव गिरधारी
६६. श्री. ठाकुर नरेंद्र
६७ श्री.पंजाबी लाल
६८ श्री.केसवानी किशोर

--२--

१ श्री.चौधरी गणेश,२. श्रीमती. रूपचंदानी भगवंती, ३. श्री. वारिंगे पंढरीनाथ, ४. श्री. जाधव सुरेश, ५. श्रीमती. वलेचा पदमा, ६ श्री. किशनानी गोदुमल हे सन्माननिय सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ . ४० वाजता सभेची सुरूवात
करण्यात आली.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-मा.महापौर, विधानसभेत टाऊन हॉलचा प्रस्ताव रदद करण्यात आला आहे. तशी नोंद

मा.महापौरः- अजुन आम्हाला तसे लेखी काही आलेले नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा. तिवारी साहेब म्हणाले की, लेखी आलेले आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हे सर्व तोंडी झाले आहे. कायदयान्वये शासनातर्फे तसे अजुन लेखी काही आलेले नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- विधानसभेत तसे जाहिर केले आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-विधानसभेत जाहिर झाले आहे म्हणजे ते फायनलच आहे.

मा.महापौर :- हे पहा, महापालिकेला अजुन तशी काही माहिती लेखी मिळाली नाही म्हणुन आयुक्तांनी काही कार्यवाही केली नाही. जर आम्हाला तसे काही लेखी मिळाले नाही तर आम्ही ते अंमलात कसे आणायचे?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-नागपुरमध्ये झालेल्या अधिवेशनात मा. सभापतींनी शासनाला सागितले आहे. व तसे मान्यही केले आहे. तुम्ही जर ते मान्य करत नसाल तर चुकीचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिवेशनात काय काय गोष्टी घडतात, निर्णय घेतले जातात हे सर्वसाधारण जनतेला देखिल माहीत असते. या शहराचे महापौर असे म्हणत असतील की, आम्हाला अजुन तसे शासनातर्फे कळवले नाही तर ते चुकीचे आहे.

मा.महापौर :- महाडिकजी, तशी शासनामार्फत सुचना येऊ दया.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-म्हणजे अधिवेशनात जे झाले ते बरोबर झाले नाही असे आपले म्हणणे आहे का?

मा.महापौर :- मी असे काही म्हणालो नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-जे अधिवेशनात घडले आहे ते पुर्ण महाराष्ट्राला माहित आहे.

मा.महापौर :- शासनातर्फे सुचना येण्याची आम्ही वाट पहात आहोत. त्यात काय लिहिले आहे, कशात-हेने करायचे आहे हे सर्व माहिती पडले पाहिजे ना?

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-अधिवेशनात जे ठरले त्याबददल आम्ही अभिनंदन करतो.



मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- अभिनंदन देत आहोत त्यात काही गैर नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- अधिवेशनात या ठरावास रदद करण्यासाठी ज्या-ज्या लोकांनी प्रयत्न केले व सहकार्य दिले त्यांचे आम्ही अभिनंदन करत आहोत.

मा.महापौर :- ठिक आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-वाचा ते. सचिव साहेब, वाचा आपण.

मा.सचिव :-सदर प्रस्तावाचे सुचक श्री.राजेंदसिंह भुल्लर व अनुमोदक श्री.रमेश चव्हाण आहेत. दिनांक २०.७.२००० रोजीचा जनरल अरूणकुमार वैद्य, सभागृह भाडेपटट्याने देण्या बाबत महासभा ठराव क्र.९, महाराष्ट्र शासनाने रदद केल्याबददल आम्ही शिवसेना भाजपाचे सर्व नगरसवेक महाराष्ट्र शासनाचे विशेष करून पालकमंत्री ठाणे जिल्हा श्री. मधुकरराव पिच्चड, उपसभापती श्री. वसंत डावखरे, सभापती श्री. अरूण गुजराथी व कार्यलयीन कामकाज मंत्री श्री. रोहीदास पाटील व ठराव रदद करण्यासाठी पाठपुरावा करणारे आमदार श्री. साबीरभाई शेख, आमदार श्री. जगन्नाथ पाटील यांचे अभिनंदन करित आहोत.

विपक्ष सदस्यांनी टाळया वाजवुन स्वागत केले.

मा.महापौर :- हा अभिनंदनाचा ठराव जो श्री.महाडिक आणि श्री. राजानी यांनी दिला आहे तो आम्ही फक्त रेकॉर्डसाठी म्हणून घेत आहोत. महापालिकेला याबाबतील तशा काही सुचना प्राप्त झाल्या नाहीत. आयुक्तांचे म्हणणे आहे तशी सुचना आल्यावर करण्यात येईल. हे फक्त रेकॉर्डसाठी नमुद करण्यात येईल.

मा.सचिव :- प्रश्न क्र५३४ श्रीमती भगवंती रूपचंदानी यांचा आहे. त्या अनुपस्थित असुन कार्यवृत्तांत त्याची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र५३४ :-अ)सरकारने किती झोपडपटटींना मान्यता दिली आहे. त्यांची लोकसंख्या/पत्ते व कुठल्या वर्षी मान्यता मिळाली.
ब)प्रत्येक मनुष्याच्या मागे सरकार किती रक्कम देतात व काय-काय करतात?
क)लोकसंख्येच्या हिशोबाप्रमाणे किती ग्रॅन्ड मिळाली पाहिजे.
ड)सन १९९९-२००० मध्ये सरकारी ग्रॅन्ड मिळाली.
इ)यावर्षी किती रक्कमेची तरतुद सरकार कडे पाठविलेली आहे. पाठविली नसल्यास त्यास कोण जबाबदार आहे?
फ)महापालिकेच्या अंदाजपत्रकात स्लमसाठी ठेवलेली रक्कम आजपर्यंत किती खर्च झाली?

उत्तर :-अ)सरकारने ४८ झोपडपटटींना मान्यता दिलेली आहे. त्याची लोकसंख्या/पत्ते सन १९८५ च्या जनगणनेनुसार एकुण लोकसंख्या १,२२,२०७/-एवढी होती व १९९५ च्या जनगणनेनुसार एकुण लोकसंख्या १,९४,७७६/- एवढी होती.(यादी सोबत जोडली आहे)

ब)शासन निर्णय क्र.सुविधा १०९७/सीआर/४५६३/सोच /यु१/मंत्रालय मुंबई दिनांक १ ऑक्टोबर १९९९ अन्वये शासनाने गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमासाठी मुलभुत भौतिक सुविधासाठी दरडोई खर्चाची कमाल मर्यादा रूपये ८०० इतकी ठरवून दिली आहे. सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

| अनु.क्र. | सुविधाचे नांव | खर्चाचे मानक रूपये/दरडोई | सुविधाचे मापदंड |
|---|---|---|---|
| | | --४-- | |
| १) | सार्वजनिक शौचालय | ४८०/दरडोई | ३५ व्यक्तिकरता - १ |
| २) | गटारे प्रत्येक व्यक्तीस उपलब्ध | ८०/दरडोई | झोपडपटटी मध्ये होणा-या जागे प्रमाणे व विहित प्रमाणात |
| ३) | रस्ते व पायवाटा | १२८/दरडोई | वरील प्रमाणे |
| ४) | पाण्याचे नळ | ६४/दरडोई | १५० व्यक्तीकरता-१ |
| ५) | रस्त्यावरील दिवा बत्ती | ४८/दरडोई | सर्व साधारण -३० मीटरवर-१ |

क)लोकसंख्येच्या हिशोबाप्रमाणे शासनाकडुन सन १९९५ च्या जनगणनेनुसार भौतीक सुविधेच्या मान्यतेनुसार एकुण रूपये १४८२ कोटी एवढी रक्कम येते.

ड)सन १९९९-२००० मध्ये सरकारी अनुदान उपलब्ध झाले नाही.

इ)दिनांक १ ऑक्टोबर, १९९९ च्या शासन निर्णयान्वये या कार्यालयाचे पत्र क्र.उमपा/साबा/वि/शा/१८/२००० दिनांक ११.२.२००० अन्वये रूपये २०.९० कोटीचा प्रस्ताव मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व मुंबई विकास मंडळ यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आला होता. परंतु मुख्य अधिकारी मुंबई यांना दिनांक २६.७.२००० अन्वये विशिष्ट विवरण पत्रात माहिती मागविली त्यानुसार (२)या कार्यालयाचे पत्र क्र.साबा/शा/१८ दिनांक ८/८/२००० अन्वये मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई यांचे कडे रूपये १४.९२ कोटीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविलेला आहे. परंतु अजूनपर्यंत प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली नाही.

फ)महापालिकेच्या अंदाजपत्रकात स्लमसाठी ठेवलेली रक्कम आज पर्यंत खर्च करण्यात आले नाही.

मा.सचिव :- प्रश्न क्र५३५ श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे.

प्रश्न क्र५३५:-१)१ जानेवारी २००० पासुन एक खिडकी योजना कार्यान्वित करण्यात आली तेव्हा पासुन आजपर्यंत त्या योजनेचा किती लोकांनी फायदा घेतला?

अ)एक खिडकी योजने अंतर्गत नवीन नळ जोडणीची एकुण किती प्रकरणे आली आहेत? पैकी किती प्रकरणे मर्यादित कालावधीमध्ये पूर्ण करण्यांत आली? किती प्रकरणे अपूर्ण आहेत. (१जानेवारी, २००० पासुन)

ब)१ जानेवारी २००० पासुन एक खिडकी योजनेव्यतिरिक्त दिवसाला नवीन नळ जोडणी किती प्रकरणास मान्यता दिली जाते. आज पर्यंत किती नळ जोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत व त्यामध्ये एक खिडकी योजनेचे दिवसाला किती प्रकरणे पास केली जातात.

क)एक खिडकी योजनेमध्ये नवीन नळ जोडणीचे प्रकरणे थांबवुन ठेवण्याचे कारण काय?

उत्तर :-१) एक खिडकी योजना दिनांक १९.५.२००० पासुन सुरू करण्यात आलेली आहे.

अ)एक खिडकी योजने अंतर्गत नविन नळ जोडणीची एकुण २७ नळ जोडणी प्रकरणे प्राप्त झालेली आहेत. त्यापैकी २५ नळ जोडणी प्रकरणे पुर्ण करण्यांत आलेली असून कागदपत्रे अपुरे असल्याने फक्त दोन नळ जोडणी प्रकरणे प्रलंबित आहे. व संबंधित नळ धारकांना पत्र लिहून सुचना देण्यात आलेली आहे.
ब)माहे १ जानेवारी २००० पासुन दिनांक ३०.८.२००० पर्यंत एकुण ९३६ प्रकरणे मंजुर करण्यांत आली असून त्यापैकी एक खिडकी योजने अंतर्गत २५ नळ जोडणी प्रकरणे मंजुर करण्यात आलेली आहे. दररोज अंदाजे ८ ते ९ प्रकरणे मंजुर करण्यात येतात.
क) एक खिडकी योजने अंतर्गत दोन नळजोडणी प्रकरणे घरपट्टी भरल्याची अदयावत पावती सादर न केल्याने प्रकरण परत केले आहे.

--५--

मा.सदस्या श्रीमती. सुनिता बगाडे :- ठिक आहे.

मा.सचिव :-प्रश्न क्र५३६ श्री. राजेंद चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र५३६ :-नेताजी चौकातून जाताना उजव्या हाताला रिक्षा स्टॅण्ड समोर ३५ x १०० फुटाचे बांधकाम झाले आहे. वरील ठिकाणचे बांधकाम हे अ.ब्रा.वि. उपायुक्त दत्ता भडकवाड साहेब यांनी यापूर्वी ते तोडलेले असताना पून्हा त्याच जागी बांधकामाची परवानगी न देता. इमारत कशी काय उभी राहीली आहे? ती इमारत कशी काय अधिकृत झाली आहे?

उत्तर :-नेताजी चौकातील बांधकाम कशाचे आधारवर सुरू आहे याबाबत वारंवार पुरावे देणे बाबत सांगुनही संबंधितांनी पुरावे दाखल केल्यामुळे सदरचे बांधकाम उपायुक्त यांनी तोडली होती. तथापि त्याठिकाणी असणारी जुनी बांधकाम यावर रस्ता रूंदीकरणासाठी नगररचना विभागाकडुन पुन्हा देण्यात आल्याचे चौकशी निदर्शनास आल्याने संबंधित लोक हे त्यांची रस्ता रूंदीकरणात तुटलेली बांधकामे दुरूस्त करत आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र५३७ श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा आहे.

प्रश्न क्र५३७ :-अ)पुर्ण शहरामध्ये किती बोरवेल आहेत? यामध्ये किती चालु आहेत व किती बंद पडलेल्या आहेत.
ब)बोरवेल दुरूस्तीचा ठेका केव्हापासुन देण्यात आला आहे? व काय काय मेंन्टेनन्स करायचे आहे? मेन्टनेन्स कुठल्या कुठल्या वार्डात करण्यात आली आहेत?
क)ठेक्याची रक्कम किती आहे? ठेक्याची मुददत केव्हापासुन देण्यात आली व कुठपर्यंत पुरे काम टाइम टू टाईम करण्यात येते किंवा नाही?

उत्तर :-अ) संपूर्ण शहरात सन १९८५ -८६-८७ आणि सन १९९२-९३-९४ या कालावधीत एकुण ८२६ विंधनविहिरी (हात पंप) आहेत. यापैकी ५८७ चालु असुन २३९ पूर्णत: बंद आहे.
ब)सदर विंधन विहिरीच्या देखभाल व दुरूस्तीचा दिनांक १७.५.९९ पासुन ठेका कार्यान्वित करण्याचा आदेश दिलेला आहे. या कामात आवश्यकतेनुसार व तक्रारीच्या स्वरूपानुसार वॉशर, बेरिंग्स , पंक्जर, पिस्टन वॉल्स, पंप सिलेंडर, कॉप्ट पीन, चेन, जी.आय.पाईप लाईन, कनेक्टींग रॉड, नट बोल्ड इत्त्यादी सुटेभाग वापरून दुरूस्ती केल्या जातात. साधारणत: सर्व प्रभागात देखभाल दुरूस्त्या केल्या आहेत.
क) सदर ठेक्यांची रक्कम रूपये ६ ,१६ ,६१६/- (पाच महिन्यासाठी साधारणत: १.२५ लाख रू. महिना इतकी आहे) ठेक्याची मुदत दि.१७.५.९९ ते १६.१०.९९ पर्यंत होती. तथापि कामाचे स्वरूप व पाण्याच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेता.

सदर कामास मुदतवाढ देण्यात आली. दरम्यानच्या काळात पुढील कालावधीसाठी निविदा मागविण्यात येऊन त्या अंतीम करण्यता आल्या आहेत व त्या स्थायी समिती ठराव क्र. १०९, दि.८.९.२००० नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरची मुदत १५ एप्रिल २००० रोजी पर्यंत असेल.

तसेच दुरूस्ती बाबत तक्रार आल्यानंतर एक ते दोन दिवसातच तक्रारीचे निवारण करण्यांत येते.

<u>मा सदस्य श्री.प्रभुनाथ गुप्ता</u> :- मा.महापौरजी, उपमहापौरजी व नविन प्रभारी आयुक्त यांना सर्वातर्फे धन्यवाद देतो. आतापण पाहिले तर शहरात पाण्याची खुप टंचाई आहे. आणि बोरवेलचा जो ठेका दिला आहे त्यात आम्हाला खुप घोटाळा



दिसत आहे. कृपया याकडे लक्ष दयावे त्याचबरोबर बोरवेलचा ज्याला ठेका दिला आहे तो अर्धे महापालिकेचे कर्मचारी व अर्धे स्वतःचे घेऊन बोरवेलचे काम करून घेतो. आमच्या प्रभाग क्र४० मधील काही ठिकाणचे बोरवेलचे पाईप काढुन नेले आहेत. परत त्यात जोडले नाही. आमचा प्रभाग क्र४०, जो डालडा डेपोच्या मागे आहे. त्याच्या आत थोडे गेले तर दोन बोरवेल आत आहेत त्यांना काढुल बाहेर लावण्याची मेहरबानी करावी धन्यवाद.

<u>मा.सचिव</u> :- प्रश्न क्र५३८ श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे.एम.आय.डी.सी. पाईपलाईन टाकली आहे त्याविषयी आपण मागच्या सभेत चुकीच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा केली होती. प्रश्न क्र५३३ बी.एम.ए.सी.ए चा होता. आपण यावर चर्चा केली आहे.

<u>प्रश्न क्र५३८</u> :-१)एम.ओंडी.सी ते संत निरंकारी हॉल तक को ६ इंच की लाईन डाली जा रही है इसका टेंडर में लोकेशन कौनसा है।
अ)इस लाईन से ब्रॅच लाईन का भी टेंडर में उल्लेख किया गया है क्या?
ब)इस लाईनसे कौनसी कौनसी जगह पर पानी की लाईन दि जायेगी.

<u>उत्तरः-</u>१)एम.आय.डी.सी कडुन गोलमैदान व सभोवतीचा परिसर तसेच प्र.क्र.६१ व ३२ चा काही भाग यास पाणीपुरवठा करण्यासाठी २ एम.एल.डी. पाणी पुरवठा ४० मी.मी. व्यासाचे जोडणी व्दारे मंजुर करण्यांत आला आहे. हे पाणी १५० मी.मी.व्यासाच्या मृदलोह जलवाहिनी व्दारे एम.आय.डी.सी लाईन (गुरूव्दारा जवळ)ते संत निरंकारी हॉल या मार्गाने पुरविले जाईल. टेंडरमध्ये उपरोक्त लोकेशन दिलेले आहे. या प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र.२ दिनांक २०.४. २००० अन्वये मान्यता मिळालेली आहे.
अ)उपरोक्त जलवाहीनीतून ब्रॅच लाईन गरजेनुसार यथावकाश दिल्या जातात. त्यामुळे निविदेमध्ये उल्लेख केलेला नाही.
ब)सदर जलवाहीनीतुन प्रामुख्याने गोल मैदान आणि त्यांचा परिसर तसेच वार्ड क्र. ६१ व ३२ चा काही भाग यांना पाणी पुरवठा केला जाईल.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-ठिक आहे.

<u>मा.सचिव :-</u> प्रश्न क्र५३९ श्रीमती. सुनिता राजवानी यांचा आहे.
प्रश्न क्र५३९ :-महानगरपालिका के क्षेत्र में कितने शौचालय है?
अ) कितने आज तक तोडे गये है?
ब) तोडे गये शौचालय की जमिनपर अतिक्रमण हुआ है क्या?अगर हुआ है तो उसकी जानकारी दि जाएं?

<u>उत्तर</u> :-१)महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण ७७७ शौचालये आहेत.
अ)जुन २००० पासुन आज दि.१४.९.२००० पर्यंत मोडकळीस आलेले व उपभोगत नसलेले नागरिकांच्या व नगरसेवकांच्या तक्रारी नुसार चौकशी करून

व जवळपासचे नागरिकांचे हरकत नसलेले एकुण ५७ शौचालये तोडण्यात आलेले आहेत.
ब)या कार्यालयाच्या माहितीनुसार महानगरपालिके व्दारे तोडण्यात आलेल्या कोणत्त्याही जागेवर अतिक्रमण झालेले नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-ठिक आहे.

मा.सचिव :- प्रश्न क्र५४० श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

--७--

प्रश्न क्र५४०-सुवर्ण जयंती योजने अंतर्गत अपुर्ण राहिलेली कामे ही किती दिवसात पूर्ण करण्यात यावी अशा आशयाचे आदेश मा. जिल्हाअधिकारी यांचे कडुन प्राप्त झाले आहेत काय?

उत्तर :-सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत अपुर्ण राहीलेली कामे ही किती दिवसात पूर्ण करण्यांत यावी याबाबत मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशामध्ये निश्चित मुदत देण्यात आलेली नाही तसेच काही ठिकाणी (उदा. भिमनगर, भिम कॉलनी) येथील सहा सिटरचे शौचालयाचे बांधकाम) काम करू नयेत. म्हणुन केलेल्या लोकप्रतिनिधीच्या तीव्र व सततच्या विरोधामुळे कामास सुरवात झालेली नव्हती यामुळे कामे पूर्ण होण्यास वेळ झाला असून याठिकाणचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले असून एक महिन्यात सदर काम पुर्ण होईल.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-सन्माननिय महापौर साहेब, उपमहापौरजी व प्रभारी आयुक्त मी प्रश्न वरिलप्रमाणे विचारला आहे. मला उत्तर वरील प्रमाणे दिले असुन मला हे म्हणायचे आहे की, प्रश्न विचारून मला दोन महिने झाले. एक महिन्याच्या आत काम पुर्ण होईल असे त्यांनी सांगीतले आहे. आता तरी कामे पुर्ण झाली आहेत का दोन महिन्यानंतर तरी?

श्री.पाटणकर (उपायुक्त) :- कामे प्रगतीपथावर आहेत. लवकरच पुर्ण करण्यात येतील.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-प्रगतीपथावर आहे? एक महिन्यात काम होणार हे तुम्हीच उत्तर दिले आहे. दोन महिने झाले आणि तुम्ही म्हणत आहात काम पगतीपथावर आहेत. सुवर्ण रोजगार योजने अंतर्गत जी कामे प्रभागात झाली आहे. त्यांची अशी अवस्था आहे की, सर्व खिडक्या दारे यांची दुर्दशा झाली आहे त्याला जबाबदार कोण? आयुक्त साहेब,

दोन-तीन विपक्ष सदस्य :-हा प्रगतीपथ आहे कुठे?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-तिथे काम करणा-या मजुरांना तीन महिने झाले त्यांना अजुन पर्यंत पगार दिला गेला नाही. त्यासाठी एक ऑडीट बसवले होते. त्या ऑडीट मध्ये असे सांगण्यात आले की, पगार देण्यासाठी पैस नाहीत. हे खरे आहे का की, पगार देण्यासाठी पैसे नाही.

श्री. पाटणकर (उपायुक्त) :- अजुन ऑडीट अद्याप पुर्ण झालेले नाहीत. तसा रिपोर्ट आमच्याकडे आल्यानंतर ते आपल्याला कळविले जाईल.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-श्री.काळे साहेबांनी आम्ही विचारल्यावर त्यांनी उत्तर दिले की आम्ही ऑडीट पुर्ण करून आयुक्तांकडे रिपोर्ट दिला आहे. विचारा त्यांना. आणि दुसरे असे की, दोन महिने झाले तरी कामे अजुन प्रगती पथावर आहेत.

*__श्री. दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त)__ :-सन्माननिय महापौर, उपमहापौर, सन्माननिय सदन याठिकाणी आधी सुध्दा मा.आयुक्त शिंदे साहेबांनी सुवर्ण जयंती बाबत सभागृहात कबुली दिली होती की, सुवर्ण जयंती रोजगार योजना कामाच्या बाबतीत तक्रारी होत्त्या ती कामे व्यवस्थित झाली नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी आम्ही प्रकल्प अधिकारी म्हणुन श्री.विलास सोनावणे यांना नियुक्त केले होते ज्यांच्यामुळे याकामात थोडीफार दिरंगाई झाली होती ती कामे प्रगतीपथावर आहेत असे उपायुक्तांनी सांगीतले आहेत. परंतु कामे न होण्यासाठी ज्याकाही विलास सोनावणे बाबतीत तक्रारी होत्त्या त्या अनुषंगाने आयुक्त साहेबांनी त्यांची विभागीय चौकशी सुरू केली आहे. कामाच्या बाबतीत काय घोटाळे झाले आहेत त्यासंबंधी ऑडीट*



*देखील चालु आहे. ऑडीट रिपोर्ट मध्ये जर काही दोष निघत असतील तर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. आणि ही कामे तातडीने पुर्ण होण्याच्या दृष्टीने आम्ही मागील चार दिवसापूर्वी जे तरण तलावाचे व्यवस्थापक आहेत श्री. गर्जे साहेब यांची सुवर्ण जयंतीच्या कामांकडे विशेष लक्ष देण्यासाठी नियुक्ती केली आहे आणि ती कामे तातडीने पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत.*

*__मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी__ :- मा.आयुक्त साहेब, तुम्ही सांगीतले गर्जे साहेबांना चार्ज दिला. पण त्यांनी पदभार सांभाळला आहे का त्या कारभाराचा? दुसरी गोष्ट दोन महिने झाले तरी कामे पूर्ण झाली नाहीत. आणि प्रगती पथावर आहेत म्हणजे काय? जी कामे झाली आहेत त्यांचीच दुर्दशा झाली आहे. म्हणजे सुवर्ण जयंतीची केंद्रशासनाची योजना आहे त्याचे आधीच वाटोळे झाले आहे.*

*__श्री.दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त):-__मी तेच म्हणत होतो जो माणुस तिथे प्रकल्प अधिकारी म्हणुन होते त्यांच्या कर्तव्य चुकीमुळे हा प्रकार झाला आहे म्हणुन मी गर्जे साहेबांकडे त्याचा कार्यभार दिला आहे.*

*__मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी__ :-त्यांनी घेतला का चार्ज?*
*__श्री.दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त)__ :- तसे आदेश काढले आहेत.*

*__मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक__ :- मा.आयुक्त साहेब, सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत.....*

*__श्री.दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त)__ :- चार्ज देण्यामध्ये सुध्दा ही अडचण आहे की, सर्व रेकॉर्ड जे आहे ते व्यवस्थित मेंटेंन केले आहे का? कारण त्याच्या बददल बरेचसे प्रश्न होते, ब-याचश्या तक्रारी होत्त्या. त्यामुळे आम्ही त्यांना सुध्दा तशा सुचना दिल्या आहेत की, चार्ज मोघम घेऊ नका. जे काही व्यवस्थित रेकॉर्ड मेंटेंन केले आहे त्यासह चार्ज घ्या. म्हणुन थोडासा वेळ आहे परंतु चार्ज घेणे चालु आहे.*

*__मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-__त्यावेळचे उपायुक्त कोण पाटणकर ना?त्यांचे कर्तव्य काय, त्यांचे काम काय? त्यांनी चार्ज घेऊन सहा महिने झाले मला वाटते. काय काम केले तिथे? सुवर्ण जयंती कशी सांभाळली? योजना कशी हाताळली? श्री. विलास सोनावणे तर प्रकल्प अधिकारी आहेत त्यांनी काय केले व काय केले नाही याबाबतच्या तक्रारी मी लेखी स्वरूपात दिलेल्या आहेत. १०-१२ तक्रारी लेखी स्वरूपात दिल्या असताना देखील त्यावर कोणतीही कार्यवाही त्यावेळेस केली नाही. का केली नाही? त्यावेळेस ती कार्यवाही केली असती तर सुवर्ण जयंती चांगल्याप्रकारे झाली असती.*

*__श्री. दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त)__ :-चौधरी साहेब मी सभागृहाच्या निर्दशनास आणु इच्छितो की, प्रकल्प अधिकारी म्हणुन त्यांच्यावर जी जबाबदारी सोपवलेली होती त्याच्या व्यतिरिक्त विशेष नियंत्रण हे उपायुक्तांचे त्यांच्यावरती आहे. याबददल माझे दुमत काहीही नाही.परंतु त्यांच्या नियंत्रणाच्या*

बाबतीत जो काही त्यांचा दोष असेल त्याबाबतीत मा.आयुक्त साहेबांकडे त्याप्रमाणे चर्चा केली जाईल व पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- मा.महापौर साहेब, सुवर्ण जयंती योजने बाबत आमचे मित्र श्री.बी.बी.मोरे साहेबांनी पहिली लक्षवेधी सुचना आणली होती विलास सोनावणेंनी काही चुका केल्या आहेत. त्या लक्षवेधीत चर्चा झाली होती आपण म्हणाला होता अधिकारींनी विलास सोनावणेंना प्रशस्तीपत्रक दिले होते की तो चांगले काम करतो. जर त्याचवेळी त्यांच्यावर कार्यवाही केली असती तर आज हि योजना सफल झाली असती हे आपण नाकामयाब आहात. ज्यावेळी लक्षवेधी



आणली होती त्यावेळी आपण सर्वांनी त्यांना पाठिंबा दिला होता. सोनावणे चांगले काम करत आहेत ते सुधरतील. परिणाम हा झाला की, केंद्र शासनातर्फे जो आपल्या शहराच्या विकासासाठी पैसा येतो त्याचा सत्त्यानाश झाला आहे. माझ्या प्रभागात समाजमंदीर बांधण्याचे काम चालु आहे त्यासाठी एक महिन्यापासुन दहा लेबर सहा खड्डे खोदत होते. एका लेबरची मजुरी एका दिवसाची ९० रूपये आहे. तर १० लेबरचा पगार ९०० रू. होतो. व ९०० रू रोज याप्रमाणे ३० दिवस त्यांनी काम केले आहे. हिशोब केला तर ९०० x ३ याप्रमाणे २७,०००/- रू. खड्डा खोदण्यासाठी खर्च झाला आहे. रेती आणि खडी तिथे टाकली आहे. ती इथे-तिथे पसरली आहे. बाजुला शाळा आहे त्या सहा खडयात लहान मुले पडुन अपघात होण्याची संभावना आहे. मी दहादा सर्व अधिकारींना लिहिले आहे बोललो आहे. तरीही कुणी त्याकडे लक्ष देत नाही. अशात-हेने जर कामकाज चालत राहीले तर शहराचे कामकाज पाहणारे अधिकारी वर्गाच्या सक्षमते बद्दल वर बसणा-या अधिकारींनी विचार केलाच पाहिजे. लक्षवेधीच्या माध्यमाव्दारे आपले लक्ष त्यांनी आकर्षित केले होते. आपण अधिकारींना पाठिंबा दिला होता. कृपया परत अशी चुकी करू नका. कोणत्त्याही योजनेचा सत्त्यानाश करू नका. आणि माझ्या प्रभागात समाजमंदिर बांधण्याचे जे काम चालु आहे ते किती दिवसात पूर्ण होईल. याचे उत्त्तर आता हवे आहे.

श्री. पाटणकर (उपायुक्त) :- सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न आता इथे उपस्थित केला आहे. आपल्या प्रभागात कॅम्प नं. ५मध्ये ते काम सुरू करण्याविषयी आदेश पण दिले गेले नाहीत. सोनावणेंना आम्ही असे आदेश दिले नव्हते. की काम सुरू करा.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :- तिथे ३० दिवस दारिद्रय रेषेखाली असलेले लोक काम करत आहेत. ते बिचारे नाक्यावर जाऊन उभे राहतात. रोज मोलमजुरी करून आपले पोट भरू शकतात अशा लोकांना जाणुन बुजून तीस दिवस फसवले गेले आहे. जर आदेश दिले गेले नाहीत तर उल्हासनगर महापालिका तर्फे माझ्या प्रभागात ३० दिवस दहा लोकांनी खड्डा खोदण्याचे काम दररोज केले आहे हे आपण मानता की नाही? ते सहा खड्डे सुवर्ण जयंती रोजगार योजने तर्फे केले आहेत. या योजनेसाठी दारिद्रय रेषेखाली असणा-या लोकांनाच मजुर म्हणुन घेतले जाते. अशा लोकांना महापालिकेच्या अधिकारींनी फसविले आहे हा याचा सरळ-सरळ अर्थ आहे. नाहीतर ३० दिवस ते बिचारे कुठेही नाक्यावर उभे राहून दुसरीकडे कुठेही मोलमजुरी करून आपले व आपल्या मुलाबाळाचे पोट भरू शकले असते. आपण आता म्हणता त्यांना आदेश दिले नव्हते. हे काय चालु आहे? आपण काय करता याचे उत्त्तर दया.

श्री. पाटणकर (उपायुक्त):- उपायुक्तांच्या जर परस्पर महापालिकेतील एखादा कर्मचारी कोणाला कुठेही काही काम करायला सांगत असेल तर ती उपायुक्तांची याबाबतीत जबाबदारी ठरत नाही. त्यांच्यावर आम्ही काय ती कार्यवाही करू. रिपोर्ट मा.आयुक्तांना सादर करण्यात येईल.

मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक :-ठिक आहे. आयुक्तांच्या अपरोक्ष मध्ये तुम्ही पण काहीही करा आणि मग आयुक्तांनी उत्तर देऊ दे की, माझी ही जबाबदारी

नाही उपायुक्तांनी हे काम केले आहे. हे चालेल का? महापालिकेच्या कुठल्याही कर्मचा-यांनी काहीही चुक केली तर त्याची जबाबदारी आयुक्तांची आहे. तुम्ही काय शिकवता इथे आम्हाला. अधिकारी कोणीपण कायपण करतो याला जबाबदार कोण? जर कुणी चुकी करतो तर त्याला आयुक्तच जबाबदार असतो. आणि आयुक्तांच्या अपरोक्षमध्ये आपण उपायुक्त आहात आपण असे लहान मुलासारखे नाही बोलु शकत की, आमच्या हाताखालील कर्मचा-यांनी असे केले. त्यांनी काही केले तरी तुम्ही जबाबदार आहात. तुम्हाला कशाला ठेवलेय? जर सोनावणे निर्णय घेतो तर तुमची जबाबदारी काय? आपण कशाला खुर्चीवर बसलात? आपल्या



हाताखालील कर्मचा-यांवर आपले नियंत्रण नाही. याचा सरळ-सरळ हाच अर्थ आहे. आपले कर्मचा-यांवर नियंत्रण नाही आहे. तो काय करतो ते तुम्हाला सांगत नाही. मग कशाला तुम्ही खुर्चीवर बसता? आपल्या हाताखालील कर्मचारी काय करतात हे आपणांस माहित नाही. आपणच सांगीतले ना सोनावणेंनी केले मला माहीत नाही. या महापालिकेतील कोणत्याही कर्मचा-यांनी काही जरी केले तर आम्हाला माहित नाही तोच भोगेल असे चालणार नाही. इथे असे लहान मुलासारखे बोलू नका.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-महाडिकनी जो प्रश्न विचारला त्यावर मी फक्त हे विचारतो की, ज्या कामगारांनी तिथे काम केले आहे तीस दिवस त्यांना पगार मिळणार का?

<u>मा.महापौर</u> :- महापालिकेच्या अनुमतीने ते काम सुरू नाही झाले तर पगार देण्याचा प्रश्न येतोच कुठे? हे पहा उपायुक्तांनी सांगीतले आहे की, तिथे सुरू असलेले काम हे महापालिकेच्या परवानगीने सुरू नाही झाले.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> कंनसन्ड ऑफीसर, हु हॅज बीन असाईन द ड्युटीज ही हॅज राईट टॅ सी द वर्कस हॅज स्टार्टेड बाय दोज पिपल.

<u>मा.महापौर :-</u> मला नाही वाटत की, प्रकल्प अधिकारी म्हणुन त्यांना काही करायचा अधिकार आहे. बरेच झाले त्यांच्या विषयी.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> आता जी कामे सुरू आहेत ती त्यांच्याच आदेशाने सुरू आहेत का?

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी</u> :- सोनावणेजी, एका महिलेकडुन पार्टी मागतात की, माझ्या बरोबर बदलापुरला लॉज मध्ये चल. त्यावर पोलीसांची तक्रार बरोबर दाखल केली जात नाही. त्यांच्यावर काही कार्यवाही केली जात नाही. ही काम करण्याची आपली पध्दत आहे. आपल्या हाताखाली तो कार्यरत आहे. त्याच्यावर काय कार्यवाही केली पाहिजे हा विषय मी नंतर काढतो. पहिला विषय हा आहे की, त्या तीस कामगारांना पगार दिला जाईल का? यावर महापौरांचे,प्रथम नागरिक या नात्याने हे उत्तर दिले होते की, त्यांना पगार दिला जाणार नाही. आपले व्यक्तीगत मत काय आहे त्यांना पगार दिला जाईल का?

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त)</u> ज्या कामगारांचा रेकॉर्ड आमच्याकडे आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- त्या तीस लोकांचा रेकॉर्ड देखिल आहे.

<u>मा.महापौर</u> :- राजानीजी, महाडिकांच्या प्रभागात जे काम सुरू आहे ते महापालिकेच्या परवानगीशिवाय सुरू झाले नाही. तीस दिवस तिथे काम झाले आहे. महापालिकेत तसा काही प्रोजेक्ट देखिल नाही. तिथे पन्नास दिवस जरी काम झाले, तीस महिने जरी काम झाले जर महापालिकेने काम सुरू करण्याविषयी सांगीतलेच नाही. तर प्रश्न येतोच कुठे त्यांना पगार दयायचा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आपण म्हणता पगार नाही देणार. तर तीस दिवस तिथे कामगारांनी काम केले आहे. सुवर्ण रोजगार योजना कशासाठी राबवितात याचे दोन हेतु होते. एक तर शहराचे काम झाले पाहिजे दुसरा हेतु हा होता की, जे लोक दारिद्य रेषेखाली येतात त्यांना काम मिळाले पाहिजे. तीस लोकांनी काम तिथे ३० दिवस केले. त्यांना आपण पगार देत नाहीत. केंद्र सरकारच्या योजनेला आपण डिफिट करत आहात. केंद्र सरकारच्या योजनेला डिफिट करण्याचे जवाबदारी आपलीच राहील. आपण जर त्यांना पगार देत नाही तर



आपल्या पगारातुन किंवा सोनावणेंच्या पगारामधुन त्यांना पगार दिला पाहिजे. चुकी तुमची आहे त्या लोकांनी स्वत: तिथे जाऊन खड्डा खोदायला सुरवात केली नव्हती. त्यांच्या मनात तर असे आले नाही की, प्रकाश महाडिकच्या प्रभागात जाऊन खोदकाम करावे. त्यांनी आपल्या आदेशाने आपल्या हाताखालच्या कर्मचा-यांच्या आदेशाने काम सुरू केले. आपला तरी पगार कापला पाहिजे किंवा सोनावणेंच्या पगारातुन तरी भरपाई केली पाहिजे. तीस दिवसाचा २७,०००/- पगाराची भरपाई करून घेतली पाहीजे. यावर दुसरा मार्ग काय सांगा?

मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी :- नरेंद्र भाई आपण फक्त प्रकाश महाडिंकच्या प्रभागाविषयी बोलत आहात कि सर्वांविषयी?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मी सर्वांविषयी बोलत आहे त्यांचे नाव उदाहरण म्हणुन देत आहे. आपल्या प्रभागात पण असे झाले आहे का?

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी :- खरतर सहा महिन्यापासुन त्यांना पगारच दिला नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- हे म्हणतात की, माझ्या प्रभागात सुरू असेलेले काम यांना माहितच नाही. सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत ते कामच नाही असे यांचे म्हणणे आहे. म्हणुन राजानी विचारत आहे की, दारिद्य रेषेखालील लोकांनी तिथे काम केले आहे त्यांचे काय होणार?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- बरोबर आहे. याचे उत्तर दया. जर आपणाकडे उत्तर नसेल तर तसे सांगा. मी निरूत्तर आहे मी निघुन जातो.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-त्यांनी काम केले त्यांना पगार आज ना उदया मिळाला असता पण हे म्हणतात त्यांचा रेकॉर्डच नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा.महापौरजी, आता सर्व सदस्यांनी सुवर्ण जयंती रोजगार योजनेवर चर्चा केली आहे. तर ही गोष्ट महाडिक खुप चांगले म्हणाले की, जेव्हा श्री.बी.बी मोरे साहेबांनी लक्षवेधी विलास सोनावणे बाबत आणली तेव्हा आमचे आयुक्त श्री. आर.डी.शिंदे यांनी त्यांचा बचाव केला. त्याचवेळी जर त्याच्यावर कार्यवाही केली असती तर आज अशी स्थिती नसती आली. दुसरा मुददा असा की, पहिल्या टप्यातील जी कामे होती त्यातील बरीच काम अजुन सुरू नाहीत.जसे पाटणकर साहेबांनी असे सांगीतले की, दुस-या टप्यातील कामे सुरू करण्याची परवानगी अजुन नाही. दुस-या टप्यातील ४३ लाख रू. पण आले आहेत. जिल्हाधिका-यांची एक क्युरी होती की, जो पर्यंत पहिल्या टप्यातील कामे पुर्ण होत नाही तोपर्यंत दुस-या टप्यातील कामे सुरू करायची नाहीत. तर विलास सोनावणेंच्या भितीमुळे की तो दुस-या टप्यातील पैसा पहिल्या टप्यात वापरील म्हणुन त्यांनी वेगळे खाते उघडले. ज्यात त्यांनी ४३ लाख वेगळे ठेवले आहेत. पाटणकर साहेब हे बरोबर आहे ना?

श्री. पाटणकर (उपआयुक्त) :- हो.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :-यांना अशी भिती आहे की, पहिल्या टप्प्यातील ३२ लाखांच्या कामांना ७० लाख लागले असतील तर जास्त झालेली रक्कम कुठून दिली जाणार? जसे महाडिकांनी उदाहरण दिले की, सहा खड्डे खोदण्यासाठी २७०००/- लागले आहेत. आताच पाटणकरांनी सांगीतले की, तिथले काम महापालिकेच्या परवानगीने सुरू नाही. पहिली गोष्ट ही की, महाडिक साहेबांचा प्रभाग ७ नंबर मध्ये नाही ४ नंबर मध्ये येतो. विलास सोनावणेंनी ज्या महिला कर्मचारी बरोबर छेडखानी केली. आम्ही आयुक्त साहेबांना सांगीतले की, हा

--१२--

कर्मचारीशी असे बोलतो. तर त्यांनी सांगीतले की, पोलीस तक्रार करा. महापालिकेचा कर्मचारी असुन कामगारांशी असे वागतो. ती महिला कर्मचारी गरीब आहे जर त्यांच्याशी असा व्यवहार करतो तर त्याला त्वरीत निलंबित केले पाहिजे. आमचे आयुक्त आर.डी. शिंदे आम्हाला छोटया छोटया गोष्टीसाठी म्हणायचे तुमचे कोब्याचे काम आहे. या योजने अंतर्गत करू. नाल्याचे काम आहे, शौचालय बनवायचे आहे, समाज मंडळाचे काम आहे या योजनेअंतर्गत करू. ही कामे होणार कधी? जर पहिल्याच टप्प्यातील कामे पूर्ण झाली नाहीत. अजुन पण कामे अशी आहेत जी सुरू पण नाही झालीत. हे स्वतः म्हणतात की, महापालिकेने ते काम करण्याची परवानगी दिली नाही. याचा अर्थ ते स्विकार करतात की, पहिल्या टप्प्यातील काही कामे अजुन सुरूच नाही झाली. कधी होणार? दुसरा टप्पा कधी सुरू करणार? एकवर्षानंतर निवडणुका होणार आहेत. दोन-तीन महिने आधी आचारसंहिता लागु होईल. आमचे सदस्य सर्व पक्षाचे त्यांचे दुस-या टप्प्यातील कामे त्यांची कधी सुरू होणार? कधी पूर्ण होणार? आम्ही महापालिकेकडुन अभिलाषा ठेऊन बसलो आहेत त्याच्यावर त्वरीत कार्यवाही का नाही केली गेली? आणि पाटणकर साहेबांची पण उपायुक्त म्हणुन काही जवाबदारी आहे ते विभाग प्रमुख आहेत. जर त्यांचा कर्मचारी इतके दिवस काम करत नव्हता. तर यांनी काय केले ही मोठया दुःखाची गोष्ट आहे की, प्रशासनाने काही तरी कडक पाऊल उचलायला पाहिजे होते. तो कर्मचारी काम करत नव्हता त्यावेळी नाही तर आज का त्याची बदली केली जात आहे. सहा महिने आधी त्याची का नाही बदली केली गेली? ही खुप लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. यावर काहीतरी कडक कार्यवाही केली पाहिजे.

__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-__ सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब व सदनातील सर्व सदस्य आज सुवर्ण जयंतीबाबत आपल्या नगरसेवकांनी चौधरींनी चांगल्या त-हेने प्रश्न विचारला. महाडिकनी पण मी दिलेल्या लक्षवेधीचा उल्लेख केला आणि सांगीतले की, कशात-हेने गोलमाल झाले आहे. आयुक्त साहेब म्हणायचे नाही नाही विलास सोनावणे खुप चांगल्यात-हेने काम करत आहेत. आज सर्वांना काय आहे ते माहित पडले. उपायुक्त म्हणुन पाटणकर साहेबांना बोलावले होते त्यांना येऊन सहा महिने झाले त्यांना मी विचारू इच्छितो पहिल्या टप्प्यातील जे काम आहे ते पुर्ण झालेले नसुन उलट दुप्पट पैसे लागले आहेत. तर हे कशात-हेने काम चालवत आहेत. दुसरी गोष्ट अशी की, मी पाटणकर साहेबांना वारंवार विचारले व सांगीतले आहे की, जिल्हाधिकारी कडुन झोपडपट्टीचे जे काम आहे ते सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत मंजुर होऊन आले आहे. ते कधी करणार? माझ्या प्रभागात तीन-चार महिने झाले शौचालय बनवायचे आहे. त्याचे खोदकाम होऊन माती पण त्यात परत भरली. मी पाटणकरांना विचारले काम कधी करणार? ते म्हणाले निविदा मागवायच्या आहेत. असे म्हणुन सुध्दा चार-सहा महिने होऊन गेले तर आपण सांगा एका वर्षात निवडणुका येतील. सुवर्ण जयंतीचा पैसा कसा वापरला? दुसरी गोष्ट अशी की, सोनाळे साहेबांनी आयुक्तांचा चार्ज घेतला होता तेव्हा कामगार मोर्चा घेऊन आले होते. त्या कामगारांनी दोन-चार महिने काम केले त्या कामगारांना अजुन पगार मिळालेला नाही. तर बाकीचा हा पैसा कुठे गेला?कोणत्त्या पध्दतीने काम चालु होते? मी पाटणकर साहेबांना वारंवार विचारले असता त्यांनी मला सांगीतले की अजुन ऑडीट चालु आहे. आता ऑडीट चालु आहे तर त्यानंतर पगार दिला जाईल. हि कोणती पध्दत आहे? त्यादिवशी सोनावणे हे जिथे मिस्टर पतंगराव कदम बसतात सचिवांच्या समोर तिथे लपुन बसला होता.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- पतंगराव कदम नाही ते मंत्री आहेत.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- कदम नाही सॉरी नुसते पतंगराव.त्यांच्या कॅबीन मध्ये जाऊन बसले होते. आम्ही विचारले की इथे का बसला आहात तर म्हणाले मोर्चा आला आहे. पाटणकरांना उपायुक्त म्हणुन इथे बोलावले आहे त्यांनी लक्ष दयायला पाहिजे होते. ते म्हणतात सोनावणे मला काही सांगत नाहीत. चार्ज देत नाही. सोनावणे मला काम नाही करू देत. जर उपायुक्त असे उत्तर देतात तर



सुवर्ण जयंतीचे काम गोलमालच होणार आहे. यासाठीच माझे असे म्हणणे आहे की, उपायुक्त असो वा सोनावणे जो कोणी त्याकामाला जवाबदार असेल, सुवर्ण जयंतीच्या पैशाचा गैरवापर केला असेल त्यांच्यावर त्वरीत कार्यवाही करून कडक शिक्षा करण्यात यावी.

मा.महापौर :- मला वाटते सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत जे पण आजतागायत झाले. सन्माननिय सदस्यांनी त्यावर आपले विचार मांडले. मागील काही महिन्यापासुन हे चालले आहे. आता उपमहापौरांशी माझे बोलणे झाले आहे. त्या योजने प्रमाणे कामगारांना जे पेमेंट वाटायचे होते त्याची रक्कम ११ लाख रूपये होती. ती रक्कम आता ३१ लाखावर गेली आहे. जर अशा काही त्रुटया आहेत त्या योजनेत प्रकल्प अधिकारी विलास सोनावणे आहेत मला वाटते ते काम व्यवस्थित होत नाही आहे त्यांना त्वरीत निलंबित केले जावे. वर त्यांनी केलेल्या कामाबददल संपूर्ण चौकशी केली जावी व तसा रिपोर्ट या सदनास सादर करावा. ही शुड बी प्लेसड अंडर सस्पेंन्शन टील ही कमस क्लीन.

मा.सचिव :- प्रश्न क्र ५४१ हा वगळण्यात आलेला आहे. ५४२ व ५४३ श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. ५४२ :-रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली चुकीने मार्किंग दिल्यानंतर चालु असलेल्या अनधिकृत बांधकामास (नेताजी चौक, शहनाई हॉटेल,च्या बाजूला)महानगरपालिकने परवानगी दिली आहे का? त्याबददल सविस्तर माहिती दयावी.

उत्तर :- सदरहू ठिकाणी असणारी जुनी बांधकामे यावर रस्ता रुंदीकरणाखाली नगररचना विभागाकडुन खुणा देण्यात आलेच चौकशी अंती निर्देशनास आल्याने संबंधीत लोक हे त्यांची रस्तारुंदी करण्यात तुटलेली बांधकामे दुरूस्त करत आ

प्रश्न क्र५४३ :-दिनांक १४ ऑगस्ट २००० रोजी युवक रिपब्लीकन अध्यक्ष चंद्रशेखर भालेराव व इतर त्याच्या मागण्यासाठी उपोषणास बसले होते. सदर उपोषणातील मागण्या किती पूर्ण झाल्या? प्रत्येक मागणी बाबत सविस्तर माहिती दयावी?

उत्तर :-दिनांक १४. ८.२००० रोजी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे श्री. चंद्रशेखर भालेराव व इतर कार्यकर्ते त्यांच्या मागण्याबाबत उपोषणातील मागण्यांबाबत माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१)उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीत असलेल्या प्रवेशद्वारास छत्रपमह कशवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नांव देण्यात यावे.

सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण महासभेपूढे योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

२)खिस्ती समाजातील बांधवांसाठी जागा देण्यात यावी. सदरची बाब न्याप्रविष्ट असल्यानटे प्रकरणी भाष्य करणे उचित वाटत नाही.

३)टंचाईग्रस्त भागातील पाण्याची बिले माफ करण्यात यावीत. सदरचा विषय सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी लक्षवेधी सुचनेद्वारे महासभेत मांडला

असता उत्तरादाखल प्रशासनाकडुन पाण्याची बिले माफ करता येणार नाही असे स्पष्टपणे निवेदन केलेले आहे.
४)४ नंबर विभागातील प्र. क्र. १४,१५,१६ मधील पाण्याची समस्या दुर करण्यात यावी.
उल्हासनगर-४ मधील प्र.क्र. १४,१५,व १६ मधील पाण्याची समस्या दूर करण्यासाठी किर्लोस्कर कन्सल्टंसी यांच्यामार्फत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे नुतनीकरण युध्दपातळीवर चालू आहे व इतर पाईप लाईन टाकल्याने पाणी पुरवठा सुरळीत आहे.



५)इंदर मोदी, नेताजी रोड, नंदवानी यांचे अनधिकृत बांधकाम व मेलुमसंद यांचे गांधी रोड येथिल अनधिकृत बांधकामे त्वरित तोडण्यात यावीत.

सदरच्या बांधकामदारांनी उल्हासनगर महानगरपालिकेकडुन रितसर बांधकाम परवानगी घेऊन बांधकाम केलेले आहे.
६) ठेकेदार कल्पतरुद्वारे महानगरपालिकेने बोगस व बेकायदेशीर काम केले त्याची चौकशी करुन त्यावर कायदेशीर कारवाई करणे बाबत.

कल्पतरु ठेकेदार यांनी केलेली पाणी पुरवठयाची कामे समाधानकारक आहेत,असे संयुक्तपणे नाही असे चौकशी अंती निदर्शनास आलेले आहे, त्यामूळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्नच उदभवत नाही याबाबत पाणीपूरवठा सभापतीशी देखील चर्चा झाली आहे. त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.
७)२५ सेक्शन ते लाल चक्मी गुरुद्वारापर्यंत रस्ता रुंदीकरण ज्यांची दूकाने गेली, सदर दुकाने वाटपात भ्रष्टाचार झालेला असून सदरची दूकाने त्वरीत तोडण्यात यावीत रस्ता रुंदीकरण प्रकल्पात बाधीत झालेल्या विस्थापितांना पर्यायी जागा देण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाने केलेला आहे सदर जागा वाटपात भ्रष्टाचार झाल्याचे सकतदर्शनी आढळून येत नाही, तरीही निश्चित उदाहरण दिल्यास उपायूक्त अतिक्रमण हे सदर प्रकरणी चौकशी करतील.
८)महानगरपालिकेमध्ये मागासवर्गीयांचा बॅकलॉक त्वरित भरण्यात यावा. महानगरपालिकेत ज्यावेळेस नियमानुसार भरती करण्यात येईल त्यावेळी अनुशेष भरण्याची देखिल कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.
९)शिव मार्ग लालचक्मी, उल्हासनगर४ येथिल विरशवर मंदिर हॉल त्वरीत बांधण्यात यावे . मा. जिल्हाधिकारी , ठाणे यांनी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत समाजमंदिर बांधण्याची परवानगी दिलेली असून निधी उपलब्ध होताच पूढील कारवाई केली जाईल.
१०)सुवर्ण जयंती योजना प्रकल्प अधिकारी श्री. विलास सोनावणे भ्रष्टाचार लक्षात घेता त्यांना त्वरीत निलंबित करण्यात यावे. सदर बाबतीत उपोषणकर्त्यांना १५ दिवसांच्या आत श्री. विलास सोनावणे यांच्या विरुध्दच्या तक्रारी विस्तृतपण पूराव्यासह संबंधीत विभागाचे उपायुक्त (जकात)यांच्याकडे देणेबाबत सुचित केले होते. परंतू विहित मुदतीत त्यांनी कोणतीही तक्रार न दिल्याचे याबाबतीत कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
११)शहर अभियंता श्री. चिजवानी, यांचा सार्वजनिक बांधकाम विभागातीज भ्रष्टाचार वर्तमानपत्रांतून गाजत आहे. त्यावर त्वरीत चौकशी करुन कारवई करण्यात यावी. सदरची तकार संदिग्ध स्वरुपाची आहे. पुराव्यासह कोणत्ताही तपशिल न दिल्याने त्या संदर्भात कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- ठिक आहे.

मा.सचिव :-प्रश्न क्र५४४ श्री. रामदास उमाप यांचा आहे.

प्रश्न क्र. ५४४ :-अ) गेली चार महिने माझे प्रभागात दोन टॅकरची वारंवार मागणी करुन सुध्दा का पाठविण्यांत आले नाहीत?
ब)जयराम वॉटर सप्लाय यांना माझे प्रभागामध्ये टॅकर सप्लायचे काम दिले आहे मग पाण्याची तकार का येते? याचे कारण काय?

क)वार्डमध्ये दोन टॅकर पाठविण्याबाबत तोंडी, लेखी विनंती करुनही पाणी पूरवठा न करणा-या एजेंसी व अधिका-यांवर आपण कार्यवाही कराल का?
ड)प्र.क्र. ८ मधील बुस्टर पंप लावणेसाठी विलंब होण्याचे कारण काय?

उत्तर :-अ)आपल्या प्रभागात यापूर्वी टॅकर पाठविण्यांत येत होते, नंतर तेथील पाण्याची तक्रार कमी असल्यामुळे तसेच टॅकरची मागणी नसल्यामूळे टॅकर बंद करण्यात आले. आपण चार दिवसापूर्वी केलेल्या तोंडी सुचनेप्रमाणे आपल्या प्रभागात टूंकरने पाणी पूरवठा सुरु करण्यांत येईल.



ब)इआपल्या प्रभगासाठी मे. जयराम वॅाटर सप्लाय यांचेमार्फत पाणी पुरवठा केला जात होता. त्यावेळी या कार्यालयांत कुठलीही लेखी तक्रार आलेली नाही.
क)याबाबत संबंधित एजेंसीला लेखी पत्राद्वारे कळविण्यांत आले असून यापूढे टूंकरने पाणी पुरवठा करण्यांत येईल.
ड)प्र.क्र. ८ मध्ये बुस्टरची मागणी करण्यांत आली होती. प्रस्तावित बुस्टरच्या जागेवर उपलब्ध पाण्याचा दाब १. ५किग्र/ से.मी. २ असून त्यातून पाण्याची गरज भागविण्यांत येते. तांत्रिक बाजू लक्षात घेता या ठिकाणी बुस्टर पंपाची आवश्यकता नाही.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :- मा.महापौरजी, उपमहापौरजी,आणि प्रभारी आयुक्त मी प्रश्न विचारला होता की, गेले चार महिने माझ्या प्रभागात टॅकरची वारंवार मागणी करून सुध्दा पाण्याचे टॅकर आज पर्यंत मला मिळालेले नाहीत. याचे कारण मी विचारले होते. परंतु यावर त्यांनी जे उत्तर दिले आहे ते पुर्णतः चुकीचे आहे. त्यांनी वरील प्रमाणे उत्तर दिले आहे. तर मी विचारू इच्छितो की, या प्रभागात सहा महिन्यापासुन आजच्या तारखेपर्यंत किती टॅकर पाठविले? जर आवश्यकता नव्हती तर मी सहा स्मरणपत्रे पाठवलेली आहेत ती माझ्याकडे आहेत. तरी पण टॅकर आजच्या तारखेपर्यंत पाठविण्यात आलेली नाहीत. याचे उत्तर मला दया.

श्री.धुत (कार्यकारी अभियंता. पा.पु.वि):- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. रमदास उमाप यांनी जो प्रश्न विचारला होता. त्यानंतर आम्ही जेव्हा सबडिव्हिजन मध्ये चौकशी केली तेव्हा असे समजले की,तिकडुन जशी मागणी येते तसे आम्ही टॅकरस् पाठवितो.त्या भागात चौकशी केली असता असे समजले की, तिथे टॅकरस्ची गरज नाही. यांनी मागणी केली तेव्हा आम्ही जयराम वॅाटरस् सप्लायर्स यांना टॅकरर्स देण्याचे आदेश पण दिले आहेत. तरीपण यांनी तक्रार दिली की तो नियमितपणे टॅकरर्स पोहचवत नाही. त्यानंतर आम्ही ऐजन्सी विजय वॅाटर्स यांना तिथे जाण्यास सांगीतले. दोन टॅकरर्स तिथे रोज पाठविण्यास सांगीतले आहे.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :- मी हे विचारले आहे की, आज सात महिने झाले, माझ्या प्रभागात आपण एकुण किती टॅकर पाठविलेले आहेत. आणि मी आपल्या नावाने सात स्मरणपत्रे पाठविली की, माझ्या प्रभागात टॅकरर्सची आवश्यकता आहे. सकाळी एक व संध्याकाळी एक असे टॅकर पाठविले. माझ्या प्रभागात पाच हजार लिटर क्षमतेच्या पाण्याची टाकी महापालिकेने बसविली आहे. ती तशीच ठेवली आहे याचे कारण काय? आपण कुणाला काय नोटीस दिली हे मी आपणांस विचारले नाही. मी विचारले की या सहा-सात महिन्यात माझ्या प्रभागात किती टॅकर पाठविले. आपण लिहिले की तिथे गरज नाही. याचा अर्थ मी जी सात स्मरणपत्रे पाठविली तो माझा मुर्खपणा ठरला असे सिध्द होते. मी आपणांस सात स्मरणपत्रे पाठविली असुन देखील तिथे गरज नाही असे आपण उत्तर कसे दिले.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि) :- आमच्या यंत्रणेतील सब डिव्हीजन आणि सेक्शनल इंजिनियर यांना विचारून आपणांस उत्तर दिले आहे.

*<u>मा.सदस्य श्री. रामदास उमाप</u> :-सबडिव्हीजनल टॅंकर मधुन पाणी पितात काय? आमची जनता पाणी पिते. जनता आम्हाला तक्रार करणार की सबडिव्हीजनला येऊन तक्रार करणार. मी जी सात स्मरणपत्रे लिहिली आहेत आपण त्यावर कोणती चौकशी केली आहे? कधी आम्हाला येऊन भेटलात आणि सांगीतले की तुमच्या जनतेला पाण्याची आवश्यकता नाही आहे. उगाचच टॅंकर मागवू नका. असे आपण काही लिहिले आहे का? ज्या प्रभागात पाण्याची आवश्यकता नाही त्याप्रभागात लाखो रूपयांचे टॅंकर जातात. जिथे झोपडपट्टी वस्ती आहे. पन्नास टक्क्यांपेक्षा*



*जास्त लोंकाना तिथे कनेक्शन नाही. तिथे पाण्याचा समुद्र आहे. टॅंकरची आवश्यकता नाही असे आपले म्हणणे आहे.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि)</u> :-झोपडपट्टी असो वा इमारत काही ठिकाणी पाण्याचा पुरवठा भरपूर आहे. एरियाचा-प्रश्न नाही खुप ठिकाणी पाणी पुरवठ्याबाबत त्रुटयापण आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. रामदास उमाप</u> :- माझी विनंती आहे महापौर व कमिशनर साहेबांना की हे चुकीचे उत्तर दिले गेले आहे. प्रशासन चुकीचे आहे. सात महिने एक लोकप्रतिनिधी सात रिमांइडर पाठवितो. त्याच्यावर काही कार्यवाही होत नाही. आणि उलट निर्णय घेतला जातो की तिथे पाण्याची गरजच नाही. म्हणुन टॅंकर पाठविले जात नाही. खरे काय आहे?*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-श्री. रामदास उमापांचा पाण्याबाबतचा प्रश्न आहे. कुणा सदस्याच्या प्रभागात पाणी नाही म्हणुन त्यांनी प्रश्न विचारला आहे आणि कार्यकारी अभियंता येऊन म्हणतात की, मी सबडिव्हीजनला सेक्शन इंजिनियर ला विचारून नंतर उत्तर देऊ.जेव्हा पासुन हा प्रश्न टाकला तेव्हा पासुन ते आजपर्यंत आपाल्याकडे काही माहिती नाही की त्यांनी किती टॅंकर पाठविले?*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि) :-</u>टॅंकरस् किती पाठविले याचे माहिती....*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> तेच विचारत आहे ना ते?*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि) :-</u>टॅंकरर्स किती पाठविले यासाठी रजिस्टर मागवून माहिती देऊ.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- हे म्हणत आहे की, माझ्या प्रभागात दोन पण टॅंकर तुम्ही पाठविले नाहीत. आणि तुम्ही म्हणत आहात की, रजिस्टर मागवून माहिती देतो. नगरसेवक म्हणत आहेत की, दोन टॅंकर्स सुध्दा पाठविले नाहीत याचा अर्थ टॅंकरर्स पाठविलेच नाही ना? तर का नाही पाठविले.*

*<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- प्रश्न विचारला आहे. अधिकारींनी उत्तराची तयारी करून यायला पाहिजे.*
*<u>मा.महापौर</u> :- ही मस्ट कम प्रिपेअर्ड.*

*<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-</u> यांच्या प्रभागात टॅंकर्सची गरज नाही. काल पण यांच्या प्रभागात एक टॅंकर पाठविला विजय वॉटर्सवाल्याचा परत आला तिथे पाणी भरपुर आहे. आवश्यकता नाही असे तिथले लोक म्हणतात की, आम्हाला पाणी नको नाल्यात टाका ही कालची सत्त्य परिस्थिती आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-विजय वॉटर वाला कुठे गेला होता?*

*<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- आढाव साहेब पाण्याची ऐवढी चांगली स्थिती उल्हासनगरमध्ये नाही.*

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आढाव साहेब आपण प्रश्नोत्त्तरामध्ये येऊ इच्छिता का?

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- यांना आता काहीही अधिकार नाही. उत्त्तर देण्याचा? नगरसेवक सात स्मरणपत्रे पाठवितो आणि हे म्हणतात गरज नाही.

--१७--

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- जिथे आवश्यकता असते तिथे टॅकरर्स जातात प्रत्येक प्रभागात जातात. तुम्ही त्यांना जो प्रश्न विचारला आहे तो बरोबरच आहे. कारण जिथे आवश्यकता नाही तिथे आजपर्यंत टॅकर गेला नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- याचा अर्थ उमाप साहेब जी स्मरणपत्रे पाठवितात ते चुकीचे आहे.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- त्यावर कमिशन बसविले जावे. तुम्ही तेथे जाऊन त्याची चौकशी करा. जर तिकडे आवश्यकता असेल तर टॅकर गेलाच पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-हे आपण चुकीचे बोलत आहात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :-आपण चुकीचे बोलत आहात. आम्ही खरे ते सांगत आहोत.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- महापौर म्हणाले म्हणुन तुम्ही उभे आहात. आम्हाला तुमच्याशी यासंबंधी बोलायचेही नाही.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-राजवानीजी, मला बोलु दया.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मॅडम उमापना बोलु दया प्लीज. ते विनंती करत आहेत.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-टॅकरविषयी मी जे लोकेशन सांगीतले आहे ते माझ्याकडे लिहिलेले आहे. हे पहा आरोप प्रत्यारोप लावणे मला पसंत नाही. ज्याजागेवर महापालिकेची ५००० लिटर क्षमतेची महापालिकेची टाकी आहे. ती कशासाठी आहे. ती टाकी पाणी भरण्यासाठी आहे का कोरडी ठेवण्यासाठी आहे. ज्या लोकेशनमध्ये मी टॅकर मागीतले त्याच ठिकाणी टाकी आहे. ती टाकी भरण्यासाठी आहे की काढणार आहात. माझी मागणी बरोबर होती का चुक होती हे याने सिध्द होते. टेकडीचा भाग असल्यामुळे ज्याठिकाणी टाकी लावलेली आहे तिथे पाणी पोहचत नाही. असे मानले गेले तर शहरात सर्व ठिकाणी पाणी भरपुर आहे सर्व जण सुखी आहेत तर एक-एक प्रभागात लाखो रूपयांचे टॅकर्स जातात त्या प्रभागातील कनेक्शन कापली गेली आहेत का? मला हे चुकीचे उत्त्तर नको आहे. मी जी मागणी केली ती बरोबर आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- टाकी तिथे लावली आहे की नाही?

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-त्या लोकेशनवर टाकी ठेवायची होती की नव्हती.

मा.महापौर :- मी असे समजतो की श्री.धुत हे आपल्याला उत्तर देण्यासाठी व्यवस्थित तयारी करून नाही आले आहेत. आपण विचारलेल्या प्रश्नाचे त्यांनी व्यवस्थित उत्तर दिलेले नाही. मी त्यांना सांगतो की त्यांनी यापुढे सभागृहात व्यवस्थित तयारी करून यावे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- काहीतरी मार्ग निघाला पाहिजे.



मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- याचा अर्थ नगरसेवकांनी तोपर्यंत भोगावे. हे तयारी करून नाही आले याच्याशी आमचा काही संबंध नाही.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- तोपर्यंत टॅंकर्सची व्यवस्था तर करा.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- तुम्ही तिथे पाण्याची टाकी बसविली आहे आणि त्यात पाणी सोडत नाही.

मा.महापौर :- नाही-नाही ती व्यवस्था आम्ही करू.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- ते त्यांना करायला सांगा.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :- मा.महापौर लोकप्रतिनिधी सात रिमाइंडर पाठविताता एकाच मुददयासाठी .......

मा.महापौर :-मी आयुक्तांना निर्देश देतो की, आपल्या प्रभागासाठी टॅंकर्स देण्याची व्यवस्था धुत साहेबांना करायला सांगावी.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-सात महिने जे केले नाही याला दोषी कोण?

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- उदया पण जर ती टाकी नाही भरली तर ती टाकी काढुन टाका.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-ती टाकी महापालिकेत आणुन टाकतो.

श्री. दत्ता भडकवाड(प्रभारी आयुक्त):- मी सदनाला सांगु इच्छितो, परवाच मी प्रभारी आयुक्त म्हणुन चार्ज घेतला आहे. तेव्हा उमाप साहेबांनी ही समस्या मला सांगीतली होती. मला असे वाटते की, प्रशासनाची ही प्राथमिक जवाबदारी आहे. ज्या ज्या नागरीक सुविधा आहेत त्या आम्हाला पुर्ण करायच्या आहेत. त्याप्रमाणे मी परवा धुत साहेबांना त्याप्रमाणे आदेश दिले होते. व कालपासुनच तेथे नियमितपणे जशी मागणी आहे तसा टॅंकर जात आहे.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :- याचा अर्थ हा आहे की, तिथे गरज आहे म्हणुन नियमित टॅंकर जात आहे. आणि सभापती म्हणतात तिथे गरज नाही आहे. हे चुकीचे आहे ना? सभापती जर असे म्हणतात, आरोप लावतात हे यांना शोभत नाही.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- जोपर्यंत आमच्याकडे तक्रार आली नाही तोपर्यंत आम्ही कार्यवाही कशी करणार?

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :-सात रिमाइंडर देऊन सुध्दा तुम्ही आरोप लावता हे सहन करण्यासारखे नाही. जिथे टाकी आहे तिथे पाण्याची गरज नसते.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- आढावजी, आपला सभापती कालावधी काल पुर्ण झाला आहे आपण आज उत्तर देऊ नका. आपण उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

--१९--

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- राजानीजी, कालावधी जरी संपला असला तरी माझ्या कालावधीतील तो मुददा आहे. तुम्ही असे चुकीचे बोलू नका.

मा.सचिव :- प्रश्न क्र ५४५ श्री. विनोद तलरेजा यांचा आहे.

प्रश्न क्र ५४५ :-ऐ) हाऊ मच स्टेच्यू ऑफ नॅशनल डिगनेटरीस आर इनस्टॉलेड इन टाऊन? अनस्टॉलेड बाय युएमसी?
बी)हाऊ मच स्टेच्यु आर कव्हर्ड विथ फेनसिंग?
सी)डिक्लेअर नेमस ऑफ नेशनल डिग्नेटरीस ॲण्ड प्लेस ऑफ स्टेच्यु?

उत्तर :- ऐ)२५ स्टॅच्यु आर इनस्टॉलेड इन द टाऊन. ११ स्टॅच्यु आर इनस्टालेड बाय युएमसी.
बी)ऑल स्टॅच्यु वेअर कव्हर्ड विथ फेनसिंग. फिव्ह रिक्यायर रिपेअर अेट प्रेझेंट.
सी)लिस्ट इज ॲव्हलेबल इन पिडब्ल्यूडी सेक्शन आन.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- मा.महापौर, उप-महापौर व प्रभारी आयुक्त, मी जो प्रश्न विचारला आहे स्मारक पुतळयांबाबत राष्ट्रीय नेत्त्यांचे तिथे पुतळे आहेत ते खुपच नाजुक अवस्थेत आहेत. मला प्रश्नाचे उत्तर देऊन दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि चुकीचे उत्तर दिले गेले आहे. मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असुन मला जे उत्तर दिले ते चुकीचे आहे. यांनी असे उत्तर दिले आहे की सर्व पुतळयांना फेन्सींग लावले आहे. हे चुकीचे उत्तर आहे. कोणत्त्याही पुतळयाला फेन्सींग लावलेले नाही. आपण तीन नंबर ते पवई कडे जाल तिथे दोन पुतळे उभारलेले आहेत. दोन्ही पुतळयांची इतकी गंभीर अवस्था आहे की, जर कुणी ड्राइव्हर दारू पिऊन गाडी चालवत असताना पुतळयाला धक्का जरी लागला तरी तो पुतळा पडेल. ही आपल्या शहराची बेईज्जती आहे. आपणास माहित असेल की, मुंबईमध्ये एका महान हस्तीला अपमानीत केले होते. ज्यासाठी खुप दंगे झाले. इथे अशी परिस्थिती होऊ शकते याला जबाबदार कोण आहे? महानगरपालिकेमध्ये या पुतळयांना देखभाल दुरूस्ती करण्यासाठी बजेटमध्ये प्रोव्हीजन देखिल आहे. त्याकरिता मी १५-२० पत्र दिले आहे की, इथे जे पण महान व्यक्तींच पुतळे आहेत त्यांची हालत खराब आहे. नगरपालिका असताना त्या पुतळयांना रोज सकाळी धुतले जात असे. त्यांना हार घातले जात असत. परंतु आज त्या स्थितीत ते नाहीत आपण पहाल तर आपणांस दुःख होईल. आपण कृपया ज्या अधिका-यांनी उत्तर दिले आहे त्यांना बोलवावे. दया उत्तर दया.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- हे उत्तर कार्यकारी अभियंताने दिले त्यांना बोलवा.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-कोणत्त्या पुतळयांना फेन्सींग लावले आहे.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि):- यांनी प्रश्न वाचुन दाखवला.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-आपण सांगु शकता दयानंद सरस्वतीचा पुतळा कुठे उभारला आहे आपल्या शहरात?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि):-बसस्टॉप उल्हासनगर १ येथे.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-त्या पुतळयाची स्थिती आपण पाहिली का? त्या पुतळयाच्या आजुबाजुला पिच्चरचे पोस्टर लावले आहे.

--१०--

मा.महापौर :- मला वाटते की, विनोद तलरेजा यांनी जो प्रश्न विचारला तो गंभीर आहे. यांना त्याची माहिती नाही.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-यांना माहिती नाही म्हणजे? हे काही उत्तर नाही.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- महापौरजी, आपण सर्व अधिकारींना प्रोटेक्शन देत आहात.

मा.महापौर :- राष्ट्रीय नेत्त्यांचे जितके पण पुतळे शहरात उभारले आहेत. त्यापैकी बहुतेक पुतळयांची अवस्था खराब झाली आहे. त्यांचा बचाव नाही केला. त्यांना ना साफसुफ ठेवले जात, ना धुतले जात. त्यांच्या पुतळयांना रोज हार चढवले पाहिजे ते पण घातले जात नाही. आज आपण जो प्रश्न विचारला त्याबददल मी आपले आभार मानतो. मी आयुक्तांना आदेश देतो की, जितक्यापण महापुरूषाचे पुतळे शहरात आहेत. त्यांची नीट देखभाल दुरूस्ती करण्यात यावी. त्यांचे संरक्षण केले जावे. त्यांना नियमित साफसुफ करून धुतले जावे व हार घातले जावे.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-किती दिवसाच्या आत?

मा.महापौर :- आयुक्तांना निर्देश देतो की, त्वरीत कार्यवाही केली जावी.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- मा.महापौर जेव्हा एखादा सदस्य प्रश्न विचारतो जसा यांनी विचारला व त्यात किती पुतळे आहेत याची यादी मागीतली. यादी देणे ही काय मोठी गोष्ट नाही आहे. २२ पुतळे आहेत. यादी पी.डब्लु.डी. विभागात असेल. शहरात जर पाचशे-हजार पुतळे असते तर आम्ही समजलो असतो मोठी यादी आहे. कोण एक हजार नावांची लिस्ट तयार करेल. आम्ही पाहिले एक प्रश्न होता ५४२ सहा पानी त्याचे उत्तर आहे. या अधिकारींना इतका वेळ नाही की, २२ पुतळयांची यादी मा.सदस्यांना दयावी. म्हणजे अधिकारी किती दुर्लक्ष करतात. आपण यादी दिली असती तर मधल्या कागदात ती मावली असती.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-महापौरजी,आपण प्रत्त्येक प्रश्नावर कार्यवाही करता की, यापुढे ती कार्यवाही अमंलात आणली जाईल. पण अधिकारींनी उत्तर देण्यासाठी व्यवस्थित तयारी करून आले पाहिजे. तसा आदेश महासभे तर्फे आपण अधिकारींना दिला पाहिजे. प्रत्त्येक प्रश्नात अधिकारी तयार नाहीत. प्रत्त्येक प्रश्नाचे उत्तर पुढच्या महासभेत देऊ असे म्हणतात. मला असे वाटले की, विनोद तलरेजाच्या प्रश्नाला आपण असेच उत्तर दयाल. अधिकारी नंतर येतील, बावीस पुतळे पाहून येतील. आपण समाधान तर काढले पण तसे अधिकारींना पण आपण तसे निर्देश दया.

मा.महापौर :- क्षमा असावी. बहुतेक अधिकारी तात्त्पुरत्त्या स्वरूपात इथे आले आहेत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- एकदा तरी एखादया अधिकारीवर कार्यवाही महासभेत झाली पाहिजे.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- मा.महापौरजी, आमचे मित्र श्री. विनोद तलरेजा यांनी जो प्रश्न विचारला आहे की, पुतळयांचा निरादर होत आहे. साफसफाई होत नाही त्यात माझे असे म्हणणे आहे की, नेताजी चौकात

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा आहे. त्यांच्या पुतळयावर मागील दोन-तीन वर्षांपासुन चष्माच नाही आहे.



आहे. ही खुप दुःखाची गोष्ट आहे. चुकीची गोष्ट आहे. मागे पण मी एकदा सभेत सांगीतले होते. तरीही त्यांना अजुन चष्मा लावला नाही ही दुःखाची गोष्ट आहे.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- सन्मानानिय महापौरजी, उल्हासनगर मध्ये जेव्हा पालकमंत्री गणेश नाईक आले होते तेव्हा उल्हासनगर हे पुतळयांचे शहर आहे असे त्यांनी जाहिर केले होते. उल्हासनगर कॅम्प नं.१ ते ५ मध्ये जितके पण पुतळे आहे. जसे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा नगरपालिका असताना पुतळयांची देखभाल केली जात होती, साफसफाई व्हायची, हार घातले जात होते त्यासाठी एक माळी ठेवला होता. त्यावेळी अचानक एकदा फायरब्रिगेडच्या गाडीचा अपघात झाला म्हणुन फायरब्रिगेड गाडी बंद केली. त्यांनतर तिथे साफसफाई केली जात नाही. ना कर्मचारी लक्ष देत ना मुख्यालय. मध्ये तानाजी नगर मध्ये गांधीरोडमध्ये एक पुतळा आहे त्या पुतळयाची अशी अवस्था आहे की, त्या पुतळयाची एका बाजुची ढाल निघुन गेली आहे. तो पुतळा कोणाचा आहे हे देखील माहित पडत नाही. माझ्या मते तो बच्चो रूपचंदानीच्या पत्नीचा प्रभाग आहे. तिथे काही दुर्घटना घडली नाही पाहिजे. इथल्या संबंधित अधिकारीनी जाऊन तो पुतळा कोणाचा आहे याची चौकशी करून महासभेत सांगावे. दुसरी गोष्ट अशी की श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा महानगरपालिकेत कोणत्त्या ठिकाणी आणुन ठेवला आहे. तेथील सुरक्षा बरोबर आहे की नाही हे पण पाहिले पाहिजे. त्याचे लवकरात लवकर अनावरण केले पाहिजे. धन्यवाद.

<u>मा.महापौर</u> :- मी सदनाला सांगु इच्छितो की,श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा जो ब्राझचा पुतळा स्टोरमध्ये कित्त्येक महिन्यापासुन तेथे पडुन आहे. मी याविषयी आयुक्तांशी स्वतः चारदा बोललो आहे. आणि त्यांना लिखीत देखिल दिले आहे. की लवकरात लवकर रिप्लेस करून लावला जावा.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> आपले पण आयुक्त ऐकत नाहीत का?

<u>मा.महापौर</u> :- कोणत्त्यातरी कारणामुळे त्यास विलंब लागला आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-</u> मला वाटले आपले ऐकत नाही. आपण आम्हांस आश्वासन देत आहात तर त्यावर अंमलबजावणी केली जाणार की नाही.

<u>मा.महापौर :-</u> लवकरात लवकर रिप्लेस करून लावले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> मा.महापौरजी, आता कार्यकारी अभियंतानी जी यादी दिली आहे. पंचवीस पुतळयांची बोट क्लब मधील असणारे पुतळयांचा पण यात समावेश आहे का?

<u>मा. उप-महापौर :-</u> महापौरजी, मला वाटते या बाबतीत, शहर अभियंताना जास्त माहिती आहे. कार्यकारी अभियंता तयार होऊन नाही आले आहेत. शहर अभियंतांनी उत्तर दिले तर बरे होईल.

<u>मा. महापौर :-</u>शहर अभियंतांनी उत्तर दयावे.

<u>मा. उप-महापौर</u> :- इथे प्रथा आहे, विभाग प्रमुख उत्तर देतो. तर ज्युनिअर उत्तर का देत आहे?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- मा</u>. महापौर, असाच एक पुतळा गांधी रोडमध्ये बसवला आहे. तो शिवाजी महाराजांचा आहे का? अजून कुणाचा?

माहित पडत नाही. कुणी तो पुतळा बसवला आहे, याचा जर खुलासा केला तर बरे होईल.



जर तो शिवाजी महाराजांचा पुतळा असेल तर हा त्यांचा अपमान आहे म्हणुन तो पुतळा काढुन तेथे दुसरा पुतळा बसविला जावा.

मा. सदस्य श्री. भिमसेन मोरे :- तो पुतळा कुणाचा आहे, हे माहिती पडले पाहिजे,नाहीतर खुप गंभीर प्रकरण होईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- चिजवानी साहेब, उत्त्तर दया. बोट क्लब मधील पुतळयांची नावे या यादीत आहे काय?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- या यादीत ती नावे नाहीत.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- त्या पुतळयांची काय स्थिती आहे? सांगा ना जरा?

मा. सदस्या श्रीमती सुनिता राजवानी :- मा. महापौर ,

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-भाभीजी, मला उत्त्तर घेऊ दया. त्या पुतळयांची इतकी खराब हालत आहे की, ते सांगू शकत नाही.

मा. महापौर :- महाराजजी, मी आधीच म्हटले की, रस्त्यातील मुख्य चौकातील पुतळयाची स्थितीतच बरोबर नाही. तर आतमध्ये बोट क्लब मध्ये काय ठिक असणार?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- बोट क्लब मध्ये गुरुनानकांचा पुतळा आहे. लोक तिथे घाण करतात, थुंकतात,ही तिथली स्थिती मी सांगत आहे. कमीत कमी तिथला पुतळा काढुन तरी टाका.

मा उप-महापौरः- महापौरजी मी एक गोष्ट तूम्हाला सांगतो , एका वर्षापूर्वी पुतळयांची अशी स्थिती मी शहर अभियंतांना सांगितली होती. त्यांनी आश्वासन दिले होते की, आम्ही तिथे सुधारणा करु पुन्हा अशी स्थिती तिथे दिसणार नाही. चिजवानीजी, हे खरे आहें ना? एका वर्षापूर्वी आपण तिथे गेलो होतो ना? तेव्हा तर हे कार्यकारी अभियंता नव्हते. तेव्हा तिथे तात्पुरती दुरुस्ती केली होती. त्यानंतर परत तशीच्या तशी स्थिती राहिली.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- काहीच केले नाही साहेब,अजूनपर्यंत यांनी काहीच केले नाही. काय करणार कमीत कमी पुतळे काढुन तरी टाका? तुम्ही जर पुतळे हाताळू शकत नाही ती काढुन टाका ते पुतळे? कोण कोणत्त्या व्यक्तीचे पुतळे आहे ते सांगा? त्यांची नावे तरी सांगा? कमीत कमी ते तरी सांगा?साहेब तुम्हाला माहिती असेल? पुतळयांबददल ज्यांना माहिती असेल त्यांनी बोलावे, हा फार गंभीर प्रश्न आहे.

मा. महापौर :- त्याची पण चौकशी केली जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-तुम्ही चला आम्ही तुम्हाला पुतळे दाखवतो त्यांची स्थिती दाखवतो .

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- मा.महापौरजी, जर महापालिका या राष्ट्रीय पुतळयांना सांभाळु शकत नाही तर सर्व मुर्ती काढुन एका ठिकाणी म्युझियम बनवा.

***मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर*** :- साहेब याचे उत्तर बरोबर दया. नाहीतर ही खुप लफडयाची बाब आहे. त्याचे उत्तर दिले पाहिजे. ते कोणाकोणाचे पुतळे आहेत



आणि त्यांची काय स्थिती आहे?त्या पुतळयात एक गुरूगोविंदसिंग यांचा पुतळा देखिल आहे.

***श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-*** मला माहीत नाही.

***मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर*** :-माहित नाही चला मी दाखवतो. त्यांनी नाही म्हणावे मी त्यांना जाऊन दाखवतो.

***मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी*** :- मा.महापौरजी, राष्ट्रीय पुतळयांचा विषय इथे निघाला आहे. आपले हे नैतिक कर्तव्य आहे, महापालिकेची जवाबदारी आहे की, त्या पुतळयांना साफ ठेवून, हार घालावे. तिथे कंपाऊंड घातले जावे. आपल्या मा.सदस्यांनी सांगीतले आहे की, नगरपालिका असताना साफ सफाई केली जात असे आणि पुतळयांना हार देखिल घालत. आमची सर्व अधिका-यांना विनंती आहे की, त्यांचा सांभाळ केला जावा आणि आदराने त्यांना हार देखिल घातले जावे. उदयापासुनच हा कार्यक्रम सुरू करावा. आणि माझी ही विनंती आहे की, नगरपालिका असताना लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जे मातंग समाजासाठी झटले होते. मला आठवते सहा लाख रूपये त्यांच्या पुतळयासाठी नगरपालिका असताना मंजुर केले होते. वेळोवेळी ही मागणी असते की, त्यांचा पुतळा तिथे बसवला जावा. तर मी निवेदन करते की, आपण पुतळयांचे काम हाती घेत आहात. येणा-या बजेटमध्ये पुतळयांसाठी परत तरतुद करून त्यांची नियमित साफ सफाई व हार फुले घालण्यांत यावी.तसेच अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा देखिल योग्य त्याठिकाणी ठेवावा.

***मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर*** :-यांना उत्तर तर देऊ दया.

***मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-*** मा.महापौरजी, श्री. भुल्लर यांनी सांगीतल्याप्रमाणे जर बोट क्लबमध्ये असलेल्या गुरूगोविंदसिंग पुतळयांचा निरादर होत असेल तर मी त्याचा कडक निषेध करत आहे आणि त्याला जवाबदार असणा-या अधिकारींवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी करत आहे.

***मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी***:-मा.महापौरजी, इथे सदस्य एखादया विषयाचे समाधान झाले नाही म्हणुन प्रश्न टाकतात. व सर्वात मोठी दुंभाग्याची गोष्ट ही आहे की, तीन महिन्या नंतर त्यांचा प्रश्नाचा नंबर येतो. ना सदस्य त्या गोष्टीला तयार होऊन येतो ना अधिकारी. आज जितके पण प्रश्न झाले सर्व अधिका-यांनी चुकीचे उत्तर दिले आहे. तर कशी ही सभा चालणार? अशात-हेने अधिकारींनी चुकीची उत्तरे दिली तर कसे होणार? सदस्यांना तर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर हवे आहे. आम्ही बाहेर जनतेला काय उत्तर दयायचे. हे आम्ही जनतेसाठी प्रश्न टाकतो स्वत:साठी नाही. आपण पहात आहात हा पाचवा प्रश्न आहे तरी पण अधिकारी चुकीची उत्तरे देत आहेत. कोणानाकोणा अधिकारीला कोणी न कोणी तरी संरक्षण देत आहे. कधी आपण कधी आढाव साहेब तर कधी आयुक्त, जनतेचा प्रश्न आहे आपण त्याचा बचाव कसा करता? जसे पुतळयांचा विषय चालु आहे मला वाटते शहर अभियंता बरेच सिनियर आहेत. ते उत्तर नाही देऊ शकत. जर शहर अभियंता उत्तर देऊ शकत नाही तर बदली होऊन येणारे अधिकारी ते कसे उत्तर देणार? मला वाटते यांना कमीत कमी पंधरा सोळा वर्षे झाली आहेत. आणि ज्योती भाभी जसे म्हणाल्या नगरपालिका असताना पुतळयांची साफसफाई व्हायची पुष्पहार घातले जायचे ही खुप चांगली गोष्ट आहे. पण दीड वर्षापासुन हे सत्ताधारी आहेत यांनी या गोष्टीकडे का नाही लक्ष दिले? यांचाच एक सदस्य प्रश्न टाकतो? तो सदस्य पक्षाशी सभा घेऊन ही गोष्ट का बोलले नाही? भाभी आपण स्थायी समितीचे सभापती आहात आपण सर्व अधिकारींना तिथे बोलावून

हे सांगु शकता. कशात-हेने चालणार हा कारभार? कोणीही सदस्य प्रश्न टाकेल त्यानंतर कुणीही



आपली 'भुली दास्तांन' इथे सांगणार, हे आमचे मत आहे, हे आमचे मत आहे. ही सभा कशी पुढे चालली? सभेला आपण गंभीरतेने घ्या महापौर, गंभीरतेने घ्या.

मा.महापौर :- बोट क्लबमधील गुरूगोविंदसिंगच्या पुतळयांबरोबर इतर महापुरूषांचे जे पण पुतळे आहेत त्याची देखभाल दुरूस्तीपण व्यवस्थित केली जावी असे आदेश मी शहर अभियंताना देत आहे. आणि आज नंतर शहरातील कोणत्त्याही कुठेही असणा-या महापुरूषांच्या पुतळयांची देखभाल केली जाईल. आणि गांधीरोडवर असणा-या पुतळयाविषयी राजेंद चौधरी व भिमसेन मोरेंनी जे सांगीतले त्याविषयी मी आयुक्तांना आदेश देतो की, त्याची चौकशी करावी की तो कुणाचा पुतळा आहे.

मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवानी:-महापौर साहेब, आपणच म्हणत आहात कुणाचा पुतळा आहे. आपल्यालाच माहित नाही कुणाचा पुतळा आहे. कमीत कमी आपल्यातर माहित पाहिजे कुणाचा पुतळा आहे तो?

श्री. दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त) :- ही खुप दुर्भाग्याची गोष्ट आहे की, राष्ट्रसाठी बलिदान केलेल्या थोर महापुरूषांच्या पुतळयांची ही अशी वाईट अवस्था आहे. मी प्रभारी आयुक्त म्हणुन शहर अभियंताना निर्देश देतो की, आपण उदयाच कार्यकारी अभियंता, आरोग्य अधिकारी आणि उद्यान अधिक्षक यांची त्रिसदस्यीय कमीटी बनवावी ती कमीटी दर महिन्याला पुतळयांच्या विकासाचा देखभाल दुरूस्तीचा प्रगती अहवाल आयुक्तांना देईल. आणि शहरात वैद्य व अवैद्य स्वरूपात जितके पण पुतळे आहेत त्यांचे सर्वेक्षण केले जावे व दुसरी गोष्ट अशी की, शासनसुध्दा याबाबतीत संवेदनशिल आहे. जर तिथे अपघात झाला तर जनतेच्या मनाचे खच्चीकरण होईल यासर्व गोष्टी लक्षात घेऊन वरील प्रमाणे त्रिसदस्यीय समिती स्थापन केली जावी आणि उद्यापासुन लगेच पुतळयांच्या दुरूस्तीचे काम सुरू केले जावे.

मा.सचिव :- प्रश्नोत्त्तराचा तास संपला आहे. यासभेत एक लक्षवेधी आणली आहे. ती मागे घेण्यात आली आहे. म्हणुन ती सभेत घेता येणार नाही. श्री. राजेंद्रसिंग भुल्लर त्याचे सुचक होते. तसेच आयत्त्यावेळचा एक विषय आयुक्तांनी इथे आणला आहे. किर्लोस्कर योजनेचा दुसरा टप्पा कार्यान्वित करणे बाबत. मा पिठासिन अधिकारींनी स्विकृतीसाठी सभेत मांडत आहे.

विषय क्र.२:-मागील सभेचे इतिवृत कायम करणे बाबत. दि.२०.११.२००० रोजीचे सर्वसाधारण महासभा इतिवृत दि.२२.११.२००० सह आणि दि. २०.११.२००० रोजीचे विशेष महासभा इतिवृत्त दि.२२.११.२००० सह.

मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव :- इतिवृत्तात टाऊन हॉलच्या विषयाच्या वेळी जे गैर असंसदीय भाषा वापरली गेली. जसे गददार वगैरे. आणि ही प्रथा आहे. ते काढुन टाकण्यात यावे.

मा.महापौर :- जी पण असंसदीय भाषा आहे. ती काढली जावी. वरील इतिवृत्त सर्वानुमते वरील सुधारणेसह कायम करण्यात येत आहे.

मा.सचिव :-विषय क्र.३ वाचुन दाखवतात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- कोण सांगणार याविषयी.

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- कोण सांगणार या विषयी त्यांना बोलवा.



मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मॅच फिक्सींग झाले आहे असे आम्ही वर्तमानपत्रात वाचले आहे. त्याविषयी आम्हाला काही बोलायचे आहे. त्याचे उत्तर कोण देणार?

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- उत्तर कोण देणार ते आधी सांगा?

मा.महापौरः-मॅच फिक्सींग कुठून झाले आहे?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- विचारा त्यांना ज्यांनी मॅच ठेवली होती? त्यावेळी कार्यभार सांभाळत होते, तेव्हा काय-काय चालले होते विचारा त्यांना?

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- त्यावेळी व्यवस्थापक कोण होते त्यांना बोलवा?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- कोणी अधिकारी आहे का सांगणारा.

मा.महापौर :- आपण आपली हरकत सांगा उत्तर देऊ.

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- पण उत्तर कोण देणार. तुम्ही उत्तर देणार का?महापौर चषक क्रिकेटचे आयोजन केले होते त्याचा तपशिल आणि खर्चाचे विवरण दिले आहे. पण जमा किती झाला आहे ते दाखविले आहे. प्रत्येक टिमचे दोनशे रू. आलेले आहेत. किती टिम आल्या होत्या?

मा.महापौर :- सभापती सांगा

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- सभापती कालावधी आता संपला आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- जेव्हा ते मंजुर केले तेव्हा ते सभापती होते.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- असे नसते अधिकारींनी उत्तर दिले पाहिजे.

मा.महापौर :- आम्ही अजुन त्यांना सभापती मानतो.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- अधिकारी उत्तर देतील.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-चार प्रश्न अजुन आहेत ते नंतर उत्तर देऊ शकणार नाही.

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- आयुक्त साहेब, खर्च करताना तुम्हाला व्यवस्थापकांनी विचारले होते काय? जेव्हा खर्च केले ३,८०,०००/- रू. तेव्हा तुम्हाला विचारले होते का?आता विचारावे लागते.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- मा.महापौरजी, इतके चांगले क्रिकेटचे आयोजन केले होते. मुलांनी आनंदाने त्यात सहभाग घेतला होता. व ऐवढे चांगले आयोजन झाल्यानंतर त्या गोष्टीची मजा कमी करू नका. आणि सर्व संमतीने हा प्रस्ताव पास केला जावा.

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- मजा खुप चांगल्या त-हेने लुटली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- मी दर्शनसिंगना सांगु इच्छितो की, तिथे मारामारी भांडणे देखील झाली होती. कशामुळे झाली काय कारण होते? ते पण इथे स्पष्ट करावे.



मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :-माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे? उत्तर दया पहिले. सुचक आणि अनुमोदक कोण आहेत.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :- मा.महापौरजी, माझे मित्र चौधरी म्हणत आहेत तिथे मारामारी झाली. माझ्यामते लहान मुलांमध्ये अशी छोटी-छोटी मारामारी होत असते.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- सेंन्ट्रल हॉस्पीटलमध्ये जखमी भरती आहे ही काय छोटी मारामारी आहे काय?

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-कोणी केली ती मारामारी?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- अधिकारी सांगतील कोणी केली मारामारी. कोणी त्यांना हॉस्पीटलमध्ये ठेवले?

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-कोणी हॉस्पीटलमध्ये ठेवले हे तुम्हाला पण माहित आहे.

मा.महापौर :-मी आयुक्तांना निर्देश देतो की, पुर्व महापौर श्रीमती यशस्विनी नाईक यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर त्यांना दयावे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- नाही आम्हा सर्वांनाच उत्तर हवे आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौरजी, हा जो २० नोव्हेंबरला ठराव पास केला आहे. २७ नोव्हेंबर ते १० डिसेंबर पर्यंत ती स्पर्धा होती. आज २० डिसेंबर आहे. आजच्या दिवशी अंदाजित खर्चाची आपण मंजुरी घेत आहात. याच्या अगोदर पुर्ण विवरण आम्हाला मिळायला पाहिजे होते. आता काम पुर्ण झाले आहे. तर पुर्ण तपशिला सहित किती खर्च झाला किती, जमा झाले ते दिले पाहिजेत. पुर्व मंजुरी आधीच झाली काम पण झाले आहे. कमीत कमी आता तरी मंजुरीसाठी आल्यावर पुर्ण तपशिलासहित त्यांनी दयायला पाहिजे.

मा.महापौर :- हे पहा, सभेची सुचना बारा तारखेला निघाली. दोनच दिवस मध्ये होते.

श्रीमती सिमा मोकल सभेतुन बाहेर पडल्या.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- आपण दुस-या सभेत विवरणासहित देऊन पास करून घेऊ शकतात.

मा.महापौर :- हे सर्व महासभेवर अवलंबुन आहे.

मा.सदस्या श्रीमती. यशस्विनी नाईक :- महापौरजी, मी एक गोष्ट बोलु शकते सभागृहात की, सभागृहनेत्याने सर्वात शेवटी बोलले पाहिजे. ते मध्ये उठून बोलतात सभागृहेच्या शिस्तीचा भंग होतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- यांचे स्वतःचेच दोन-तीन सदस्य उभे आहेत. एक-एक जण उठून बोलत नाही.

मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :- तुम्ही सभागृहनेता आहात. तुम्ही असे बोलणे चांगले दिसत नाही. आपले पद मोठे आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> कल्याणवाली पध्दत लागु करता तर चांगले आहे. पण आधी हे सांगा आधी कोण बोलणार नंतर कोण बोलणार? एक-एक व्यक्ती दहा-दहा वेळा एका मुदयावर बोलतो.

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक</u> :-आपण शेवटी बोला ना?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते समजत नव्हते.

<u>मा.महापौर :-</u> आयुक्तजी, आपण मॅडमना प्रश्नाचे उत्तर दया. नाहीतर अकाऊंटंटला बोलवा.

<u>श्री.दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त) :-</u> हा प्रस्ताव क्रिडा समिती तर्फे आला आहे. मी याबाबतीत आढावा नाही घेऊ शकलो पण जो पण खर्च झाला आहे तो अंदाजित आहे. त्याच्यावर मुख्यलेखा अधिकारीचे अभिप्राय घेऊनच खर्च दिला जाईल.

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक</u> :-लेखा अधिकारींना बोलवा.

<u>श्री.दत्ता भडकवाड(प्रभारी आयुक्त):-</u>त्यांचे अभिप्राय घेतले जातील. आणि एखादया आयटम वर जास्त दर जर वाटत असतील तर आपण सांगु शकता.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव</u> :- हे एस्टीमेट बजेट आहे.

<u>मा.उपमहापौर :-</u> तुमचे काय म्हणणे आहे. आधी मंजुर करायचे आणि मग लेखाधिकारीचे अभिप्राय घ्यायचे.

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक</u> :- मला काही कळलेच नाही काय बोलले ते.

<u>मा.महापौर :-</u> उत्तर दिले की त्यांनी?

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक :-</u> काय दिले.

<u>श्री. दत्ता भडकवाड(प्रभारी आयुक्त)</u> :- मी उत्तर दिले की, हा जो खर्च आपल्या समोर आला आहे. तो प्रशासनाने आणला नाही. क्रिडा समिती कडुन हा प्रस्ताव आला आहे. याचे जे पण पेमेंट आहे ते लेखाधिकारीचे अभिप्राय करून दिले जाईल.या शर्तीवर मंजुर करा.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा.महापौर साहेब, इथे लिहिले आहे मैदानावर तीस ट्रक माती टाकली आहे. आणि एक ट्रक हजार रूपयाला असतो त्याप्रमाणे तीस हजार रू.ची माती तिथे टाकली आहे का? आणि महापालिकेचा दर काय?

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> श्री. चिजवानींना विचारा त्यांना माहित असतील दर.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- हे तीस ट्रकांचे तीस हजार रू.लावले आहेत ते बरोबर आहे का? शहर अभियंतांना विचारा जरा.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव</u> :- चौकशी करून त्यात कमी जास्त केले जाईल.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आमच्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? कोणाला आम्ही प्रश्न विचारायचे?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-महासभेने निर्णय घेतल्यावर आपण तो निर्णय बदलाल का?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-आम्हाला येथे उत्तर देण्यासाठी कोण आहे?

मा.महापौर :-हा जो आयटम आहे. तो क्रिडा समितीचा ठराव आहे, महापौर चषक आयोजित करण्याचा इन प्रीन्सीपल आपण कायम करत आहोत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- जो ठराव आहे त्यात खर्च पण आहे.

मा.महापौर :- तो अंदाजित आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-माझे म्हणणे आहे की, कार्यक्रम झाल्यानंतर विषय जो येतो तो पुर्ण तपशिलासह आला पाहिजे. जर आधी आला असता तर आम्ही मान्य केले असते.

मा.महापौर :- म्हणुन मी सांगीतले की, दहा तारखे पर्यंत स्पर्धा होती. १२ तारखेला सभा सुचना निघाली.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- कमीत कमी आज तरी त्यांनी सांगीतले पाहिजे की, बरोबर खर्च किती आहे ते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- जर बारा तारखेला सभा सुचना निघाली त्यावेळी गोषवा-यात जेवढे मुददे आले आहेत. जसे पाच हजार यावर खर्च, दहा हजार यावर खर्च तसा पुर्ण तपशिल त्यांनी का नाही दिला? निमंत्रण पत्रिकांवर पाच हजार खर्च झाला. इत्त्यादी माहिती दोन दिवसात देता तर महासभा येईस्तोपर्यंत सात दिवसात यांना पुर्ण माहिती दयायला वेळ नाही मिळाला?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-आज तरी त्यांनी उत्तर देण्यासाठी पुर्ण तयारी सहित यायला पाहिजे होते.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मला मनोहर जेस्वानींची आठवण येते. ते विचारायचे हे कुठे गेले पैसे?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-हा क्रिकेट घोटाळा आहे.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- सन्माननिय महापौर, उपमहापौर साहेब, महापालिकेत महापौर चषक, उपमहापौर चषक या स्पर्धा घेतल्या जातात. क्रिडा समिती तर्फे दोन वर्षापासुन हा कार्यक्रम घेतला जात आहे. हा कार्यक्रम झाला आहे या कार्यक्रमात जो खर्च झाला आहे. ती प्रस्तावना या महासभेत मांडली आहे. आम्हाला ते मंजुर करायचे आहे. यात आयटम वाईज खर्च लिहिला आहे. छपाई खर्च , बॅट बॉल,स्टंप खर्च महापौरजी थोडाफार घोटाळा होतो. मॅच फिक्सींग पण होते. हा घोटाळा सरळ सरळ दिसत आहे. क्रिकेटशी माझे जवळचे संबंध आहेत.मी स्वतः क्रिकेट खेळतो त्यामुळे मला यातील थोडीफार माहिती आहे. आता समजा सहा स्टंप आहेत. पन्नास रू.एका स्टंपचे होतात तर सहा स्टंपचे साडेतीनशे होतात,

त्यांनी नविन करन कंपनी कडुन बॉल खरेदी केला आहे. ती डुप्लीकेट कंपनी आहे. नाहीतर एम.आर.आर किंवा गुड शॉट बॉलने हे खेळायचे . त्यांनी क्रिकेट साहित्याचा खर्च लिहिला आहे पंधरा हजार मला वाटते यात काहीतरी घोटाळा आहे. हे स्पष्टपणे दिसुन येते. माझा क्रिकेटशी संबंध आहे म्हणुन मला माहित आहे. त्यांनी एक बॅट तात्पुरती बनवली. ती उंबराच्या झाडाची होती. त्याची किंमत सव्वाशे रू. आहे होलसेल असेल तर १०० रू., बॉलची किंमत आहे २५ रू. यांनी तीन आयटम वर १५०००/- खर्च दाखवला आहे. यात १०१टक्के काहीतरी घोटाळा आहे हे दाव्यासहित बोलतो. याविषयाचा अभ्यास करून आता क्रिडा समिती सभापती पण नाहीत. हा विषय आता पुढच्या सभेत आणा.

<u>मा.महापौर :-</u> या खर्चाला तुम्ही अंदाजित खर्च म्हणुन मंजुर करा.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> एस्टीमेटच बरोबर नाही.

<u>मा.महापौर :-</u> सब्जेक्ट टू दी वेरीफिकेशन बाय ऑडीट डिपार्टमेंट.

मा.सदस्या श्रीमती.लुंड लक्ष्मीबाई सभेतून बाहेर पडल्या.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> मा.महापौरजी, इव्हन एस्टीमेंट पण बरोबर नाही आहे. तीस ट्रकाच्या मातीचे तीस हजार रू. सदस्यांचे म्हणणे आहे की, एवढा दर नाही आहे. म्हणजे एस्टीमेंट देखिल बरोबर नाही.

<u>मा.उपमहापौर</u> :- महापौरजी, शहर अभियंत्याना हे माहित असेल की, डी.एस. आर प्रमाणे मातीचे दर काय आहेत.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :-सोन्याची माती असेल ती.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- शहर अभियंत्यांना बोलवा.

<u>मा.उपमहापौर</u> :- राजानीजी ,एक मिनिट मला बोलु दया. माजी महापौर यशस्विनी नाईक यांनी सांगीतले की, इथे फक्त खर्च मांडला आहे. जमेची बाजु मांडली नाही. पर टिम दोनशे रू. घेतले होते त्यांनतर तिथे काही जाहिराती लावल्या होत्त्या त्याव्दारे पण काही पैसे गोळा केले होते. काही कॅटीन वगैरे तिथे लागले होते. त्यांचा पण पैसा जमा झाला असेल म्हणजे उत्त्पन्नाची बाजु इथे मांडली नाही.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- २०० टिम आल्या होत्त्या. त्यांच्याकडे तशया पावत्त्याही आहेत. २०० रू. प्रवेशफी त्यांनी घेतली आहे. २०० रू.प्रमाणे ४० ,०००/- होतात. हे ४० ,०००/-चे उत्त्पन्न त्यांनी दाखवले नाही. फक्त खर्चच मांडला आहे.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे</u> :- हॅलो, मोरे साहेब, तिथे २०० नाही २५० टिम आल्या होत्त्या. २०० त्यांनी टारगेट ठेवले होते. नगरसेवकांनी जेव्हा त्यांच्यावर दबाव आणला तेव्हा ते म्हणाले जितक्या टिमना यायचे आहे येऊ दया. तेवढे महापालिकाला उत्त्पन्न मिळेल. साधारणत: २५० ते २७५ टिम आल्या होत्त्या. याची पण जरा नोंद घ्यावी.

<u>मा.महापौर :-</u> मी असे समजतो की, इन प्रींसिपल जे मेयरचे टुरनामेंन्ट झाले आहे. त्या विषयाला रेक्टीफाय करण्यासाठी सदनात आणले आहे त्यास आपण मंजुरी देऊ. लेखाविभागाचा प्रश्न आहे. त्या विभागाला असे निर्देश देतो की ,त्यांनी अभिप्राय दयावी काही चुकी असेल तर आपण कार्यवाही करू.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- तुम्ही कायदयाने असे करू शकत नाही. दोन विषयाला तुम्ही वेगवेगळे करू शकत नाही. तुम्ही असे नाही म्हणु शकत की हे

काम आधी करू मग खर्चाचे बोलु हे कायदेशिर नाही. विधीअधिकारी जेस्टीफाय करतील. जस्ट यु कॅन नॉट डू हाऊ कॅन यु से हे पास करू,नंतर खर्चाचे बघु.

<u>मा.महापौर</u> :- मी असे नाही म्हणालो की, नंतर बघु.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u>विधी अधिकारी / सचिव यांनी सांगावे की, असे आपण करू शकतो का? आपण खर्चाला मान्यता देऊ नंतर काही पुढे क्युरी निघाली तर बघु. ही एक शरमेची गोष्ट आहे हे आपण समजण्याचा प्रयत्न करा. ४ लाख खर्च दाखवला आहे त्यात <u>१५०००/-</u> फक्त बॅट,बॉल, स्टंप साठी दाखवले आहेत. उत्पन्नाची बाजु इथे मांडली नाही. २०० टिमच्या प्रवेश फीचे उत्पन्न,जाहिरातीचे उत्पन्न आणि कॅटीनचे उत्पन्न त्यांच्याकडुन वसुल केलेले भाडे या जमेच्या बाजु त्यांनी मांडल्याच नाही. फक्त खर्चाची बाजु दाखवली आणि म्हणतात पास करा. आम्ही इथे डोळे बंद करून काम करणार नाही. जनतेने आम्हाला इथे पाठवले आहे. तुम्हाला बहुमताने पास करायचे आहे तर करा. प्रत्येकवेळी बहुमत दाखवाल तर तुमचाच विजय होईल हे जर तुम्हाला मंजुर असेल तर आम्हाला काही हरकत नाही.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- महापौरजी, हा सर्व कारभार लंडनमध्ये चालेल का?

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> कमीत कमी महापौर चषक ज्यात तुमचे नाव जोडले गेले आहे. इथे आता अरूणकुमार वैद्यांचे नाव नाही आहे. ते तर बिचारे स्वर्गवासी झालेत काही बोलु शकत नाही. देव करो आपले आयुष्य उदंड असो पण आपल्यावर असे शिंतोडे नका उडवून घेऊ.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव</u> :- महापौरजी, हे जे अंदाजित पत्र इथे ठेवले आहे. एस्टीमेट कॉस्ट पण इथे मांडली आहे. इथे फक्त अंदाजपत्रक ठेवले आहे त्याला तुम्ही मंजुरी दिली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- अंदाजपत्रकातच चुका आहेत.

<u>मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :-</u> महापौर चषकासाठी बजेट मध्ये अंदाजपत्रक ठेवायला सांगा. मार्च महिन्यात अंदाजपत्रक ठेवले जाते.

<u>मा.सदस्य श्री. रामभाऊ आढाव</u> :-अंदाजपत्रक नाही अंदाजित खर्च.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u> महापौरजी, आढाव साहेब म्हणत आहे अंदाजित खर्च मंजुर केला जावा. जर काही चुका निघाल्या तर त्यावर उचित कार्यवाही केली जाईल. घोटाळयाची चौकशी होऊ शकते ना?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा.महापौरजी, आता माजी महापौर यशस्विनी नाईक यांनी जो सल्ला दिला. सभागृह नेत्याने सगळयात शेवटी बोलले पाहिजे या गोष्टीचे मी स्वागत करतो.त्याचबरोबर हे पण सांगु इच्छितो की, यांनी जे कल्याणचे उदाहरण दिले तिथे काय पध्दत आहे. एकेका पक्षा तर्फे एकेक सदस्य बोलतो. नंतर विपक्ष नेता बोलतात नंतर सभागृह नेता बोलतो. अंतिम निर्णय महापौर देतात त्यानंतर कोणी बोलत नाही. पण इथे एकेक सदस्य दहा वेळा बोलतो. एक गोष्ट लक्षात आली की बोलतात, परत लक्षात आली की बोलतात असे हजार वेळा थेट प्रक्षेपणात देखिल आले आहे. आणि इथे देखिल दिसुन येते की एकेक सदस्य किती वेळा उठ-बस करतो. जर कोणा सदस्याला आपली भावना व्यक्त करायची आहे तर एकाच वेळी करतो ना. हे तर ‘बकरा किस्तोपर’ असे

इंस्टॉलमेंट मध्ये आपले मत मांडणे चुकीचे आहे. ते जर बंद केले तर आम्ही पण कल्याणच्या पध्दतीचे स्वागत करू. आता मी मुददयावर येतो.

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवाणीः-</u> आपणास पण बसल्यावर लक्षात आले का?
मा.सदस्य श्री.रामरख्यानी मोहनदास सभेतून बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> तुम्ही पाहत नाही का दोन दोन मिनिटांनी सदस्य उठून बोलतात.

<u>मा.सदस्या श्रीमती सुनिता राजवाणीः-</u> आता तो विषय संपला होता तर पुन्हा कशाला काढलात? आता लक्षात आले का?

<u>मा. सदस्य श्री. नरेंद राजानी</u> :- मतदान होते त्यावेळी युपीपी वाले एकदा हात वर करतात, तर एकदा खाली घेतात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- मी माजी महापौरांचा आदर ठेवून खाली बसले होते. मी पण आपले मत मांडु शकतो. जसे त्यांनी मला सल्ला दिला, तसे मला पण त्यांना काही सांगायचे आहे. मी तर त्यांचे म्हणणे स्विकारले. जेंव्हा भाजपा, शिवसेनेचे राज्य होते, तेव्हापण स्पर्धा व्हायच्या. एकदा चार्ली आमच्याकडे प्रस्ताव घेंऊन आले होते, एकदा आशा राधवानी प्रस्ताव घेऊन आले. तेव्हा आमच्या जेसवानींनी पण मुददे काढले होते. की हा घोटाळा झाला आहे तरी पण आम्ही ते शेवटी मान्य केले. त्यावेळी पण खुप टिका झाल्या होत्त्या. आमच्या जेसवानींची नरेंद राजानींनी आठवण काढली, बरोबर आहे, कारण त्यांनी पण असे आरोप लावले होते. तरी दोन वर्ष आम्ही ते मंजूर केलेला हा ठराव किडा समिती तर्फे आला आहे. जेव्हा स्पर्धा बंद होत्त्या तेव्हा हे सदस्य विनंती करायला यायचे, चालू करा, आमची टिम पण घ्या. पक्षपात न करता सर्व नगरसेवकांच्या टिमना संधी दिली गेली होती. मातीविषयी हे बोलत होते. त्यात लेबर चॉर्ज लावला आहे. माती लेवलिंग करून दिली, त्यावर पाणी टाकून क्यूरिंग करुन दिले. त्याप्रमाणे त्यांनी खर्च लिहिला असेल.दरवेळी बजेटमध्ये यासाठी तरतूद असते. किडा समिती, महिला व बालकल्याण समिती, गलिच्छ वस्ती यासाठी सर्व सभापतीसाठी, या कार्यक्रमांसाठी या निधीची तरतूद केलेली असते. जसे व्ही.टी.सीवर शिक्षण समितीचा कार्यक्रम झाला. तेव्हा सर्व नेतागण तेथे उपस्थित होते. पारितोषीके देत होते. निमंत्रण पत्रिकेवर सर्व पक्षांच्या नेत्त्यांचे नाव असते. मी विनंती करतो की, आमच्या सभापतींच्या कार्यकालात ही स्पर्धा पार पडली आहे. तर मेहरबानी करुन यास सर्व संमतीने पास केले तर ,खुप चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद राजानी</u> :- महापौरजी, एक छोटासा प्रश्न आहे, पास करा नका करु. इथे जें पंधरा हजार बॅट,बॉल, स्टॅम साठी खर्च लिहिला आहे. असे किती बॉल, बॅटस् घेतल्या गेल्या होत्त्या, हे जाणून घ्यायचा अधिकार तर आम्हाला आहे ना?हे तर कुणी मला सांगावे. मी आपले मतदान तेव्हा करेन ना जेव्हा मला माहिती असेल.

<u>मा. महापौर</u> :- दर्शनसिंग जी,आपण माहिती देऊ शकता?
<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- त्यांनी सामान खरेदी केले होते का?

<u>मा. महापौर</u> :- त्यांनी स्पर्धेकडे लक्ष दिले होते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणी</u> :-आपण विचारले म्हणून सांगतो ही खरेदी भांडार विभागातर्फे केलेले आहे. भांडार विभागाचा अधिकारी यावर योग्य ते उत्तर देईल.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मा. महापौरजी, दर्शनसिंग व ईश्वर पमनानी यांच्या विषयी मला खूप सद्भावना आहे. तो विषय वेगळा आहे पण काही माहिती तर आम्हाला पाहिजे. जेव्हा शहराचा मुददा आला होता तेव्हा ते आपल्या अंर्तमनाचे ऐकून त्यांनी निर्णय घेतला होता. पण माहिती तर दया.

मा.सदस्या श्रीमती जोनिता मटाई व श्रीमती.भारती राजानी सभेतुन बाहेर पडले.

मा. महापौर :- संबंधित अधिकारी उपस्थित नाही.

मा. सदस्य श्री नरेंद्र राजानी :- विषय वगळा, माहिती नाही मिळाली तर मतदान कसे करणार?

मा.सदस्य श्री.ढेणवाल बनवारी सभेतुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौर चषक आहे, ते मतदानाद्वारे मंजूर व्हावे ही आमची इच्छा नाही. विषय वगळला तर बरे होईल.

मा. महापौर :- राजानीजी, आपणास हवी असेल तर ते लिखित माहिती देतील.

मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- मी काय म्हणतो प्रस्ताव पारित करण्यापूर्वी माहिती तर पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. पम्मीकुमार अचनानी हे ६.१० वाजता सदनातून बाहेर पडले.

मा. महापौर :- अधिकारी उपस्थित नाही.

मा. सदस्य श्री नरेंद्र राजानी :- ही तर मजेशीर परिस्थिती आहे की, अधिकारी उत्त्तर देऊ शकत नाही. इथे प्रश्न विचारले आहेत.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव मी सदनासमोर पारित करण्यासाठी ठेवत आहे.

मा. सचिव :- बहुमताने का? मतदान घ्यायचे का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आमचा विरोध लिहा.

मा. सचिव :-सदरचा प्रस्ताव मतदानासाठी ठेवण्यात येत आहे.

मा.सचिव :- व जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात मतः-

१. श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
२. श्रीमती.सोनावणे यमुना
३ श्रीमती.वेलकर सुरेखा
४ श्रीमती.यशस्विनी नाईक
५ श्री. भांडे भगवान
६ श्री. तेजी कैलास
७ श्री. बोडारे धनंजय
८ श्री.चौधरी राजेंद्र
९ श्री. लांडे पांडुरंग
१० श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
११ श्रीमती.सुनिता राजवानी
१२ श्री. मोरे भिमसेन
१३ श्री. चव्हाण रमेश



१४ श्री. महाडिक प्रकाश

१५ श्री.उमाप रामदास
१६ श्री.पारवानी रामचंद
१७ श्रीमती.आशा राधवानी
१८ श्री. जग्यासी राजु
१९ श्री. माखिजा प्रकाश
२० श्री. राजानी नरेंद
२१ श्रीमती.आशा जेस्वानी

मा.सचिव :- व जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत. कोणीही तटस्थ नाही.

प्रस्तावाच्या बाजुने मत :-

१ श्रीमती.ज्योती कालानी
२ श्रीमती. मिनु दासानी
३ श्री.वाधवा गिरधारी
४ श्री.तलरेजा विनोद
५ श्री.प्रमोद टाले.
६ श्रीमती.वनवारी मोना
७ श्रीमती.कुंदनानी लविना
८ श्री.किशोर वनवारी
९ .श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंद्रा
११ श्रीमती.पवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.सोनावणे राजु
१७ श्री.पुरस्वानी जमनु
१८ श्री.पंजाबी नारायण
१९ श्री.आयलानी कुमार
२० श्री.वाघे शामु
२१ श्री.ठाकुर सेवलदास
२२ श्रीमती.वसीटा बेबी
२३ श्री. बेहरानी ठाकुर
२४ श्रीमती.साधवानी जया
२५ श्री. मन्सुलकर सुभाष
२६ श्रीमती.गजवानी कांता
२७ श्रीमती.बठिजा इंदिरा
२८ श्री.केणी जयकुमार
२९ श्री.माखिजा हरदास
३० श्री.बेहरानी गोप
३१ श्री.देवेंदसिंग दर्शनसिंग खेमाणी
३२ श्री. गुप्ता प्रभुनाथ
३३ श्री. रोहडा श्यामसुंदर
३४ श्री.प्रमनानी ईश्वर

मा. सचिव :- कोणी सदस्य तटस्थ राहू इच्छितो का?

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने संमत करण्यात येत आहे.

--३४--

विषय :- मा. महापौर चषक क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करणे

कामी क्रिडा कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक २४.११.२०००रोजीचा ठराव

क्र.

<u>५ कायम करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

क्रिडा समिती उल्हासनगर महानगरपालिका तर्फे सालाबाद प्रमाणे यावर्षिही महापौर चषक क्रिकेट सामने (दिवस-रात्र)महानगरपालिकेच्या भगवंती नावानी स्टेज समोरील मैदानात दिनांक २५ नोव्हेंबर २००० ते दि. १० डिसेंबर २००० पर्यंत आयोजित करावयाचे असून स्पर्धासाठी लागणारे साहित्य व त्यावर अंदाजित होणारा खर्च पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | लागणारे साहित्य | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्र छपाई खर्च | ५,०००/- |
| २. | क्रिकेट साहित्य (बॉल, स्टेप, बॅट) | १५,०००/- |
| ३. | १५x २० व ३०० खुर्च्या १५ दिवसाकरिता | १५,०००/- |
| ४. | क्रिडा मंच ४ पंधरा दिवसासाठी त्यांचे मानधन | १५,०००/- |
| ५. | ३ समालोचक यांचे १५ दिवसाचे मानधन | १५,०००/- |
| ६. | १०० फोकस, २० टयुब लाईट, १५ दिवस | ४५,०००/- |
| ७. | विद्युत विभाग जनरेटरसह | ९०,०००/- |
| ८. | पारितोषिके (कप १ ते ४ राऊंड पर्यंत) | ८०,०००/- |
| ९. | चहापान फराळ १५ दिवसाचा खर्च | ४५,०००/- |
| १०. | हार व फुले प्रतिदिन १५ दिवस | १५,०००/- |
| ११. | मैदानावर माती पसरविणे एकुण ३० ट्रक | ३०,०००/- |
| | एकुण | ३,७०,०००/- |

उपरोक्त स्पर्धेस होणारा अंदाजित खर्च रू.३,७०,०००/- असुन येणारा खर्च महापालिकेच्या अर्थसंकल्पातील "अ" अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष इ-१ उप शिर्ष (xI) क्रिडा साहित्य खर्च या शिर्षाच्याखाली केलेल्या ०८ लाख शिल्लक तरतुदीतून करावयाचा आहे.

मागील वर्षी प्रत्यक्ष झालेला खर्च व सध्याची महागाई लक्षात घेऊन हा खर्च अंदाजित केलेला आहे. पुरवठादाराकडुन प्रत्यक्ष दरपत्रक मागवून होणारा खर्च निश्चित केला जाईल. तसे उपरोक्त शिर्षात एकुण शिल्लक रूपये ८,००,०००/- (रू.आठ लाख मात्र)आहेत. तसेच सदरचे काम हे तातडीचे असल्याने टेंडर मागवण्यात वेळ जाईल म्हणुन दरसुची मागविण्यास मान्यता दयावी.

तरी उपरोक्त महापौर चषक क्रिकेट स्पर्धा व त्या निमित्ताने होणारा एकूण रूपये ३,७०,०००/- अंदाजित खर्चास मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती समोर प्रस्तावित आहे.

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम ठराव क्र ५ दि.२४.११.२०००

सुचकाचे नाव :-श्री. रामभाऊ आढाव.
अनुमोदकाच नाव :-श्री. सुरेश जाधव.

हि क्रीडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती दिनांक २५ नोव्हेंबर, २००० ते १० डिसेंबर २००० पर्यंत उल्हासनगर-१ येथील गोल मैदानातील भगवंती नावानी स्टेज समोरील मैदानात ''महापौर चषक'' क्रिकेट सामने आयोजित व कार्यान्वित करणे तसेच त्या अनुषंगाने होणा-या अंदाजित रूपये ३,७०,०००/- च्या खर्चास महासभेच्या अधिन राहून (प्रशासकीय व वित्तिय ) मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापति / पिठासीन अधिकारी
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र.२३ दिनांक:-२०.१२.२०००

सुचकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. देवेंदसिंग खेमाणी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समितीचा दिनांक २४.११.२००० रोजीचा ठराव क्र.५ कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

श्रीमती.जोनिता मटाई व श्रीमती भारती राजानी सभागृहात आल्या.

मा. सदस्या श्रीम. ज्योती कालानी :- आम्ही हे मंजूर करतो आणि देवाला प्रार्थना करतो की, लवकरात लवकर त्यांना बरे करुन आमच्या बरोबर पाठवावे.

मा.सदस्य श्री. ढेणवाल बनवारी हे सभागृहात आले.

सदस्य श्री. किशोर वनवारी :- माणुसकीच्या नात्याने मंजूर करतो.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- श्रीमती.भगवंती रूपचंदानी पालिका सदस्या माहे सप्टेंबर २००० ते माहे फेब्रुवारी २००१ पर्यंत तात्पुरत्त्या आजारामुळे सहा महिन्याच्या कालावधीसाठी महापालिकेच्या सभांना गैरहजर राहणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

श्रीमती भगवंती रूपचंदानी या महापालिका सदस्या माहे सप्टेंबर, २०००पासुन लागोपाठ दोन महिने महापालिकेच्या सभांना स्वत: गैरहजर राहील्या आहेत. दिनांक १७.११.२००० रोजी त्यांनी एक अर्ज देऊन आपणांस तात्पुरत्त्या आजारावर उपचार घेण्यासाठी माहे सप्टेंबर,२००० ते फेब्रुवारी २००१ पर्यंत लागोपाठ सहा महिन्याच्या कालावधीत महापालिकेच्या सभांना गैरहजर राहण्यासाठी रजा मंजुर करावी अशी विनंती केली असुन मान्यतेसाठी प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २४ दिनांक:-२०.१२.२०००

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्र राजानी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. लाल पंजाबी.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती. भगवंती रूपचंदानी, पालिका सदस्या यांना माहे सप्टेंबर २०००ते फेब्रुवारी २००१ पर्यंत तात्पुरत्त्या आजारामुळे सहा महिन्याच्या कालावधीसाठी महापालिकेच्या सभांना गैरहजर राहण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा. सचिव :- विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- कल्याणचे उदाहरण दिले आहे, त्यांचे प्रपोजल काय आहे ते सांगा. कल्याण महापालिकेत ठराव आणतात.*

*इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते, ते समजत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> महापौर, डेप्युटेशन वर जे अधिकारी आले आहेत,आयुक्त शासनातर्फे त्यांची मागणी करतात. सहा महिन्याच्या आत महासभेची परवानगी लागते. ते आणण्यास विलंब लागला याचे कारण आहे, आयुक्तांनी महासभेला ओव्हर टेक करुन शासनाला लिहिले की, महासभेच्या परवानगीची आवश्यकता नाही. आपणच दोन वर्ष यांचे कालावधी वाढवा. हा महासभेचा अपमान आहे. हे मुंबई महापालिका प्रांतिक अधिनियम मध्ये लिहिलेले आहे की, आयुक्तांनी आणलेल्या उपायुक्तांना पुन्हा ठेवण्यासाठी सहा महिन्याच्या आत महासभेची परवानगी घ्यावी लागेल. शासनाने त्यांना परत पत्र पाठविले की,महासभेची मंजूरी जरुरी आहे. हा महासभेचा अपमान लक्षात घेता माझे असे मत आहे की, या अधिकारींना परत पाठविले पाहिजे. हे माझे वैयक्तीक मत आहे की, त्यांनी परत जावे.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रकाश महाडिक</u> :- जसे की महापालिका झाल्यावर आयुक्तांनी सहा उपायुक्तांची शासनाकडे मागणी केली. सहा उपायुक्त इथे आले होते. शहराचा विकास करण्यासाठी प्रत्येक विभागासाठी एका उपायुक्तांची आवश्यकता आहे. हे लक्षात घेऊनच शासनाने सहा उपायुक्तांना इथे पाठवले आहे. सहा उपायुक्त इथे काम करत आहेत. आपण नेहमी तक्रार करतो की, आपल्याकडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे. म्हणुन काही काम होत नाही. शासनाने अधिकारी पाठविले की, तुम्ही त्यांना परत पाठवता. आमचे आर.पी.आयचे बंधु प्रत्येकवेळी म्हणतात मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जात नाही. काही मागासवर्गीय अधिकारी येतात तर आपणच त्यांना म्हणतो परत पाठवा. असे नाही झाले पाहिजे. महापालिकेत अधिकारींची आवश्यकता आहे त्यांना परत नाही पाठवले पाहिजे. शासनाने त्यांना पाठवले आहे त्यांच्याकडुन आपण चांगल्यात-हेने काम करून घेतले पाहिजे. मागील महासभेत पण काही अधिकारींना परत पाठवण्याचा प्रस्ताव आपण पास केला होता. परंतु आयुक्तांनी ते शासनाकडे पाठवून अधिका-यांना परत इथेच ठेवले होते. परत जर आपण नामंजुर केले तर आयुक्त शासनाकडुन परवानगी घेऊन त्यांना इथे ठेवतील. जे सहा उपायुक्त इथे आले आहेत त्यांना इथेच ठेवावे अशी माझी सभागृहाला विनंती आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे</u> :- मा.महापौरजी, जे उपायुक्त शासनाकडुन मागविले जातात त्यांना कायम कराल म्हणुन महासभेसमोर प्रस्ताव आला आहे. परंतु आताच आमचे सन्माननिय सदस्य श्री. महाडिक म्हणतात की, मागासवर्गीय अधिकारी जरी आले तरी आर.पी.आय वाले त्यांना परत पाठवतात. आम्ही तर असे म्हणालो नाही की, मागासवर्गीय आहे. जनरल आहे. दुसरे असे की, एक अधिकारी इथे डेप्युटेशन वर येतो तर त्याच्यावर किती खर्च होतो. त्यांचा पगार किती असतो. त्यांचे अलाऊन्स किती असते, त्यांना वाहन दिले जाते. त्यानंतर त्यांचा पगार १५-२० हजार असतो. हे सर्व मिळून ७५,००० पर्यंत त्यांच्यावर खर्च होतो. महापालिका हा खर्च करते त्यानंतर उपायुक्त हवे तसे काम करत नाहीत तर काय महापालिका बुडवायची आहे आपल्याला. वा शहराचे सर्व कामकाज ठप्प करायचे आहे. तो मागासवर्गीय असो, जनरल असो आम्हाला इथे जातीभेद करायचा नाही. आपल्याला पाहायचे आहे की, शासनाकडुन आलेल्या*



*अधिकारींनी चांगले काम केले की नाही. १२,०००/- पगार घेणा-या या उपायुक्तांविषयी मी सांगत बसलो तर खुप होईल. जे बिचारे कारकुन*

चार-पाच हजार पगार घेतात ते पण जास्त काम करतात. आपण असे म्हणतो की, आपल्यावर इतके कर्ज आहे. पाण्याचे पैसे भरायचे आहेत. पैसा नाही आहे, शहराच्या विकासासाठी पैसा नाही हे आपण सांगत असतो. तर सहा-सहा अधिका-यांवर हा आपला खर्च वाया जातो आणि महापालिकेचे कामकाज होत नाही. तर त्यासाठी अशा अधिका-यास ठेवणे उचित नाही. यावर माझे असे म्हणणे आहे की, सभागृहनेत्त्यांनी जसे सांगीतले की, यांना परत पाठवावे यास माझी पण सहमती आहे. यांना ठेवले नाही पाहिजे परत पाठवले पाहिजे. माझे हे पण म्हणणे आहे की, त्यांना चोवीस तासातच परत पाठवावे.

<u>मा.सदस्या श्रीमती यशस्विनी नाईक</u> :- मा.महापौर, आयुक्त साहेब आज जो ठराव इथे मांडला आहे. त्यावर मी माझे मत मांडु इच्छिते. की त्यांच्याकडुन कामे आपण करवून घ्यायची असतात नगरसेवक म्हणुन. हक्काने करवून घ्यायची असतात. आणि बी.बी.मोरे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे त्यावर इतका खर्च येतो जर आपण त्यांना परत पाठवले तर परत दुसरे येतील. शासनाला तशी मागणी आपल्याला करावीच लागेल. तेव्हापण तेवढाच खर्च येणार. त्यासाठी माझी वैयक्तिक अशी मागणी आहे की, या उपायुक्तांना इथेच राहु दया. त्यांच्याकडुन अधिकाराने काम करवून घ्या. कारण की एक वर्षानी निवडणुका येणार आहेत. आणि आचारसंहिता लवकरच लागु होईल. त्यामुळे हा लपंडाव चालु ठेवण्यापेक्षा जे उपायुक्त आलेत त्यांच्याकडुन कामे करवून घ्या अशी माझी मागणी आहे.

<u>मा.सदस्य श्री. पांडुरंग लांडे :-</u> सन्माननिय महापौर साहेब, उपमहापौर साहेब सध्या आपल्याकडे शासनाच्यावतीने जे उपायुक्त आले आहेत. नगरसेवक असो, प्रशासनाचे अधिकारी असो, सभापती असो त्यांनी त्यांच्याकडुन कसे काम करवून घेतले पाहिजे. ही आपली सर्वांची एक नैतिक जबाबदारी असते. यासर्वांवर आपल्या प्रशासनाची व स. महापौरांची व सर्व सभापतींची जबाबदारी असते.आज आपल्या उल्हासनगर शहरात मोठ्याने कॉलराची साथ आली असताना प्रत्त्येक कॅम्प वाईज शिंदे साहेबांनी पाच उपायुक्त नेमले होते. आणि प्रत्त्यक्ष माझ्या प्रभागात सुध्दा पाणपट्टे साहेबांनी विझिट दिली होती आणि त्यावेळी त्यांना काही त्रुटी आढळल्या होत्त्या. त्याबाबत त्यांनी संबंधित अधिका-यांना आदेश दिला होता की सफाई कामगारांवर त्वरीत कार्यवाही करा. अशा सक्षम अधिका-यांच्या बाबतीत आपण महासभेमध्ये शिंतोडे उडवत असाल तर ते चुक आहे. कुठलाही अधिकारी असला तरी प्रामाणिकपणाने काम करण्याचा प्रयत्नच करतो. त्याला असे कधी कुठे वाटत नाही की मी स्वतःच्या कामात कुचराई करावी. आपण कुठल्या पध्दतीने काम करवून घेतले पाहिजे. महापौरांनी आपले जे सभापती आहेत त्यांना हे सर्व उददेशुन सांगीतले पाहिजे की, कुठलाही अधिकारी असला तरी आपल्या शहराबददल त्याच्यामध्ये आपुलकी निर्माण करून त्यांच्यामार्फत आपण जास्तीत जास्त कामे कशी करवून घेतली जावी असे आपण आपल्या स.सभापती व इतर नगरसेवक आहेत त्यांना जाणीव करवुन देणे गरजेचे आहे. आणि कुठलाही उपायुक्त अधिकारी असेल त्यांचा आपण असा अपमान करून त्यांना परत शासनाकडे पाठवू नये अशी मी आपणांस विनंती करतो कारण की, हे अधिकारी गेल्यानंतर उदयासुध्दा आपल्याला अधिका-यांची गरज पडणार आहे. आणि जे अधिकारी येणार आहेत त्यांच्याकडुन सुध्दा आपल्याला काम करवून घ्यायचे आहे. थोडाफार फरक हा प्रत्त्येक अधिका-यांमध्ये असतो. परंतु आपण त्यांच्याकडुन कसे काम करवून घेणे हे आपल्यावर ठरलेले असते. त्यामुळे मी महापौरांना विनंती करतो की हे आपले उपायुक्त म्हणुन आहेत पाणपट्टे साहेब त्यांना कायम करवून घ्यावे अशी आपणांस विनंती करतो.

--३९--

<u>मा.सदस्य श्री. रामदास उमाप</u> :- मा.महापौरजी व प्रभारी आयुक्त साहेब, माझी सभागृहास अशी विनंती आहे की, आपल्या शहरामध्ये कॉलराची साथ

सध्या चालु आहे. पाण्याची टंचाई आहे, ॲडमिनिस्ट्रेशनचे काम अजुन बरोबर चालत नाही. अधिका-याची बदली करणे त्यांना परत पाठवणे, नविन अधिकारी आणणे हा याच्यावरचा पर्याय वाटत नाही. कारण नविन अधिकारी जरी आले तरी त्यांच्यावरील खर्च तेवढाच होणार आहे. आणि हे जरी अधिकारी असले तरी तेवढाच खर्च होणार आहे. सर्व सदस्यांनी अधिका-यांना चांगले सहयोग देऊन , एक दुस-याला मदत करून येणारा जो पुढचा कार्यकाल आहे जो थोडाच आहे. आचारसंहितेच्या अगोदर शहरामध्ये काही नविन बदल व्हावा यासाठी असणारे जेवढे अधिकारी आहे त्यांना कायम करुन घ्यावे, परत पाठवू नये. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

<u>मा. महापौर :-</u> मला वाटते, सभागृहात चाललेली ही चर्चा चारही उपायुक्तांना गृहित धरून होत आहे. का फक्त पाणपटटेंविषयी होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- तुम्हीच वेगवेगळे प्रस्ताव आणले ना?

<u>मा. महापौर :-</u>तर काही सदस्य चारी उपायुक्तांना गृहित धरून बोलत आहेत तर श्री. पांडुरंग लांडे यांनी पाणपट्टेविषयी सांगीतले. जर मी चारही प्रस्ताव सदनासमोर मी मांडतो. कोणाला आपले विचार प्रकट करायचे असतील तर त्यांनी करावे. नाहीतर सदनासमोर चारही उपायुक्तांना कायम करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. आणि ज्या सन्माननिय सदस्यांना वाटते की, चारही उपायुक्तांनी इथेच काम करावे त्यांनी आपले हात वर करावे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> कार्यसुचीवरच वेगवेगळे विषय आहेत. आपण एकत्र चारी विषय घेऊ शकत नाही. मतदान करायचे तर करा.

<u>मा. महापौर</u> :- ठिक आहे. जे सदस्य श्री. पानपटटे यांना कायम करण्याच्या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावेत.

<u>मा. सदस्य श्री लाल पंजाबी</u> :- मतदान हे ठरावावर होते. ठरावाचे स्वरुप काय आहे ते पाहिले जाते, असे मतदान घेतले जात नाही.

<u>मा. महापौर</u> :-वाक्यामध्ये फेर बदल आहे, बाकी काही नाही.

<u>मा. सचिव</u> :- जे सदस्य डॉ. श्री. पाणपट्टे यांना उल्हासनगर महापालिका सेवेत ठेवू इच्छितात, त्यांनी हात वर करावेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> पुन्हा एकदा सांगतो , जे ठरावाच्या बाजूने आहेत, ज्यांनी ठराव आणला आहे.

<u>मा. सचिव</u> :- ठराव असा त-हेनेच आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- ठराव काय आहे?

<u>मा. सचिव :-</u> ठराव हया त-हेने आहे की, डॉ. पाणपट्टे यांना उल्हासनगर महानगरपालिकाच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर कायम करणे बाबत ठराव आहे. ठराव प्रशासनातर्फे आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- ठराव प्रशासनातर्फे येत नसतो.



<u>मा. सचिव</u> :- हा विषय प्रशासनातर्फे आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- ठरावावर तुम्ही कोणा सदस्यांची सही घेणारच ना?

मा. महापौर :- पंजाबी जी विषय असा आहे की, उपायुक्तांना महापालिका सेवेत कायम करणे बाबत. ठराव हा नंतर केला जातो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौर जी, इथे आपण चूकीच्या पध्दतीने कामकाज चालवितो. नाहीतर आधी प्रस्ताव येतो, जे सदस्य अनुमोदक आहेत, ते वाचतात. जसे थोडा वेळा पूर्वी सभागृहनेता म्हणत होते, की, कल्याणप्रमाणे कारभार चालवा, त्यानुसार मी बोलतो की, आधी सुचक व अनूमोदक यांनी बोलले पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-जे डॉ. पाणपट्टे यांना उल्हासनगर महापालिकेत ठेवू इच्छितात व जे न ठेवण्याच्या बाजूने आहेत, ते मतदानाद्वारे केले जाईल. चारी उपायुक्तांचा विषय एकच आहे, त्यांना उमपा सेवेत ठेवायचे की नाही. एकेक विषयावर मतदान घेतले जाईल.

मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :- महापौरजी, आपणच एकेक उपायुक्तांचा कार्यसूचीवर वेगवेगळा प्रस्ताव आणला आहे. त्या ठरावावर मतदान होईल ना?

मा. महापौर :- ठरावावरच मतदान होत आहे ना की, डॉ. पाणपट्टे यांची सेवा उमपात कायम करायची की नाही?

मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :-ठराव असा नाही आहे. प्रस्ताव काय आहे ते आपण पहा ना?

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- प्रस्ताव काय आहे त्याप्रमाणे आम्ही मतदान करू?

मा. सदस्य श्री. नरेंद राजानी :- महापौरजी, कार्पोरेशन स्पीकस् बाय रिझोल्युशन.

मा.सचिव :- मी विषय वाचतो.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- मा.सचिवजी, विषय सर्वांनी वाचला आहे. ठराव काय आहे? सत्ताधारी पक्षातर्फे कसा ठराव आला आहे.

मा.सचिव :- मी सांगतो ना? (सचिवांनी विषय वाचुन दाखवला) आधी तर हा प्रस्ताव असेल की, त्यांना मान्यता दयायची. जे मान्यता देऊ इच्छितात त्यांनी हात वर करावे जे नाही मान्यता देऊ इच्छित त्यांचा विरोध नमुद केला जाईल.

मा.महापौर :- सर्व संमतीने करता तर ठीक आहे. जर मतदान घ्यायचे असेल तर मतदान घेऊ.

मा.सचिव :- जे मा.सदस्य जसा विषय आला आहे तसा मान्य करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत. श्रीमती. सुनिता राजवानी आपला हात वर नाही आपण तटस्थ राहु इच्छितात का?



प्रस्तावाच्या बाजुने मतः-

१. श्री.भुल्लर राजेंद विरसिंह
२. श्रीमती.सोनावणे यमुना

३ श्रीमती.वेलकर सुरेखा
४ श्रीमती.यशस्विनी नाईक
५ श्री. भांडे भगवान
६ श्री. तेजी कैलास
७ श्री. बोडारे धनंजय
८ श्री.चौधरी राजेंद्र
९ श्री. लांडे पांडुरंग
१० श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
११ श्रीमती.सुनिता राजवानी
१२ श्री. मोरे भिमसेन
१३ श्री. चव्हाण रमेश
१४ श्री. महाडिक प्रकाश
१५ श्री.उमाप रामदास
१६ श्रीमती.मटाई जोनिता
१७ श्री.पारवानी रामचंद
१८ श्रीमती.आशा राधवानी
१९ श्री. जग्यासी राजु
२० श्री. माखिजा प्रकाश
२१ श्री. राजानी नरेंद्र
२२ श्री. भारती राजानी
२३ श्रीमती.आशा जेस्वानी

<u>मा.सचिव :-</u> व जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. (एकुण ३५ मते )कोणीही तटस्थ नाही.

<u>प्रस्तावाच्या विरूध्द :-</u>

१ श्रीमती.ज्योती कालानी
२ श्रीमती. मिनु दासानी
३ श्री.प्रमोद टाले
४ श्री.वाधवा गिरधारी
५ श्री.तलरेजा विनोद
६ श्रीमती.बनवारी मोना
७ श्रीमती.कुंदनानी लविना
८ श्री.किशोर वनवारी
९ .श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंद्रा
११ श्रीमती.पवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.सोनावणे राजु
१७ श्री.पुरस्वानी जमनु
१८ श्री.पंजाबी नारायण
१९ श्री.आयलानी कुमार



२० श्री.वाघे शामु
२१ श्री.ढेणवाल बनवारी
२२ श्री.ठाकुर सेवलदास
२३ श्रीमती.वसीटा बेबी
२४ श्री. बेहरानी ठाकुर

२५ श्रीमती.साधवानी जया
२६ श्री. मन्सुलकर सुभाष
२७ श्रीमती.गजवानी कांता
२८ श्रीमती.बठिजा इंदिरा
२९ श्री.केणी जयकुमार
३० श्री.माखिजा हरदास
३१ श्री.बेहरानी गोप
३२ श्री.देवेंद्रसिंग दर्शनसिंग खेमाणी
३३ श्री. गुप्ता प्रभुनाथ
३४ श्री. रोहडा श्यामसुंदर
३५श्री.प्रमनानी ईश्वर

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने समंत करण्यात येत आहे.

विषय :- डॉ. एस.एस.पाणपटटे यांची उल्हासनगर महापालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन प्रतिनियुक्तीवर नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर महापालिकेत तयार केलेल्या आस्थापना सुचीमध्ये उपायुक्त पदनामाची एकुण सहा पदे प्रस्तावित केली आहेत. त्यावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविणेबाबत या महापालिकातर्फे शासनाकडे विनंती केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. पसंप १३०० (४)/१५४४/प्र.क्र.८१/पदुम.१ , दिनांक ८ सप्टेंबर, २००० अन्वये डॉक्टर एस. एस.पाणपटटे यांची उपायुक्त या पदावर महापालिकेकडे शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून नेमणुक केलेली आहे.

डॉ.एस.एस. पाणपटटे हे या महापालिकेत उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य विभाग, अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभाग,(कॅम्प नं. ४ व ५))या पदावर दिनांक. १९.९.२००० पासुन रूजु झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलम ४५ नुसार डॉ.एस.एस.पाणपटटे यांच्या नेमणुकीस शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यास मंजुरी घेणे आवश्यक आहे. मान्य असल्यास सोबतची प्रस्तावना उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस अनुमती मिळावी.

महासभा ठराव क्र. २५ दि:-२०.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बी.बी.मोरे.



हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ.एस.एस.पाणपटटे यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत नाही.

तसेच त्यांना त्वरीत कार्यमुक्त करून त्यांचे मुळ विभागात पाठविण्याची माहिती शासनास सादर करण्यात यावी.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**बहुमताने मंजुर**

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र ६ वाचन दाखवितात.

मा.सचिव :- जे मा.सदस्य जसा विषय आला आहे तसा मान्य करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने मतः-

१ . श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
२ . श्रीमती.सोनावणे यमुना
३ श्रीमती.वेलकर सुरेखा
४ श्रीमती.यशस्विनी नाईक
५ श्री. भांडे भगवान
६ श्री. तेजी कैलास
७ श्री. बोडारे धनंजय
८ श्री.चौधरी राजेंद्र
९ श्री. लांडे पांडुरंग
१० श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
११ श्रीमती.सुनिता राजवानी
१२ श्री. मोरे भिमसेन
१३ श्री. चव्हाण रमेश
१४ श्री. महाडिक प्रकाश
१५ श्री.उमाप रामदास
१६ श्रीमती.मटाई जोनिता
१७ श्री.पारवानी रामचंद्र
१८ श्रीमती.आशा राधवानी
१९ श्री. जग्यासी राजु
२० श्री. माखिजा प्रकाश
२१ श्री. राजानी नरेंद्र
२२ श्री. भारती राजानी
२३ श्रीमती.आशा जेस्वानी



मा.सचिव :- व जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. कोणीही तटस्थ नाही.

प्रस्तावाच्या विरूध्द :-

१ श्रीमती.ज्योती कालानी
२ श्रीमती. मिनु दासानी
३ श्री.प्रमोद टाले
४ श्री.वाधवा गिरधारी
५ श्री.तलरेजा विनोद
६ श्रीमती.वनवारी मोना
७ श्रीमती.कुंदनानी लविना
८ श्री.किशोर वनवारी
९ .श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंदा
११ श्रीमती.पवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.सोनावणे राजु
१७ श्री.पुरस्वानी जमनु
१८ श्री.पंजाबी नारायण
१९ श्री.आयलानी कुमार
२० श्री.वाघे शामु
२१ श्री.ढेणवाल बनवारी
२२ श्री.ठाकुर सेवलदास
२३ श्रीमती.वसीटा बेबी
२४ श्री. बेहरानी ठाकुर
२५ श्रीमती.साधवानी जया
२६ श्री. मन्सुलकर सुभाष
२७ श्रीमती.गजवानी कांता
२८ श्रीमती.बठिजा इंदिरा
२९ श्री.केणी जयकुमार
३० श्री.माखिजा हरदास
३१ श्री.बेहरानी गोप
३२ श्री.देवेंद्रसिंग दर्शनासिंग खेमाणी
३३ श्री. गुप्ता प्रभुनाथ
३४ श्री. रोहडा श्यामसुंदर
३५श्री.पमनानी ईश्वर

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने समंत करण्यात येत आहे.

विषय :- श्री. श्रीधर पाटणकर यांची उल्हासनगर महापालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन प्रतिनियुक्तीवर नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर महापालिकेने तयार केलेल्या आस्थापना सुचीमध्ये उपायुक्त पदनामाची एकुण सहा पदे प्रस्तावित



केली आहेत. त्यावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविणेबाबत या महापालिकातर्फे शासनाकडे विनंती केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. एम.सी.ओ. ११९९/७६८/प्र.क्र.७५/९९/नवि.१४ दिनांक ६ जुन, २००० अन्वये श्री. श्रीधर पाटणकर, यांची उपायुक्त या पदावर महापालिकेकडे शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या आधिन राहून नेमणुक केलेली आहे.

श्री. श्रीधर पाटणकर, हे या महापालिकेत उपायुक्त (जकात व इतर)या पदावर दिनांक. ६.६.२००० पासुन रूजु झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलम ४५ नुसार श्री.श्रीधर पाटणकर यांच्या नेमणुकीस शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यास मंजुरी घेणे आवश्यक आहे. मान्य असल्यास सोबतची प्रस्तावना उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस अनुमती मिळावी.

<u>महासभा ठराव क्र. २६</u> <u>दि:-२०.१२.२०००</u>.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बी.बी.मोरे.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.श्रीधर पाटणकर यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत नाही.

तसेच त्यांना त्वरीत कार्यमुक्त करून त्यांचे मुळ विभागात पाठविण्याची माहिती शासनास सादर करण्यात यावी.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.७ वाचून दाखवतात.

<u>मा.सचिव</u> :- जे मा.सदस्य जसा विषय आला आहे तसा मान्य करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.



<u>प्रस्तावाच्या बाजुने मत:-</u>

१ . श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
२ . श्रीमती.सोनावणे यमुना
३ श्रीमती.वेलकर सुरेखा
४ श्रीमती.यशस्विनी नाईक
५ श्री. भांडे भगवान
६ श्री. तेजी कैलास
७ श्री. बोडारे धनंजय
८ श्री.चौधरी राजेंद्र
९ श्री. लांडे पांडुरंग
१० श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
११ श्रीमती.सुनिता राजवानी
१२ श्री. मोरे भिमसेन
१३ श्री. चव्हाण रमेश
१४ श्री. महाडिक प्रकाश
१५ श्री.उमाप रामदास
१६ श्रीमती.मटाई जोनिता
१७ श्री.पारवानी रामचंद्र
१८ श्रीमती.आशा राधवानी
१९ श्री. जग्यासी राजु
२० श्री. मारिवजा प्रकाश
२१ श्री. राजानी नरेंद्र
२२ श्री. भारती राजानी
२३ श्रीमती.आशा जेस्वानी

<u>मा.सचिव :-</u> व जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. कोणीही तटस्थ नाही.

<u>प्रस्तावाच्या विरूध्द :-</u>

१ श्रीमती.ज्योती कालानी
२ श्रीमती. मिनु दासानी
३ श्री.प्रमोद टाले
४ श्री.वाधवा गिरधारी
५ श्री.तलरेजा विनोद
६ श्रीमती.वनवारी मोना
७ श्रीमती.कुंदनानी लविना
८ श्री.किशोर वनवारी
९ .श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंद्रा
११ श्रीमती.पवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.सोनावणे राजु
१७ श्री.पुरस्वानी जमनु



१८ श्री.पंजाबी नारायण
१९ श्री.आयलानी कुमार
२० श्री.वाघे शामु
२१ श्री.ढेणववाल बनवारी

२२ श्री.ठाकुर सेवलदास
२३ श्रीमती.वसीटा बेबी
२४ श्री. बेहरानी ठाकुर
२५ श्रीमती.साधवानी जया
२६ श्री. मन्सुलकर सुभाष
२७ श्रीमती.गजवानी कांता
२८ श्रीमती.बठिजा इंदिरा
२९ श्री.केणी जयकुमार
३० श्री.माखिजा हरदास
३१ श्री.बेहरानी गोप
३२ श्री.देवेंद्रसिंग दर्शनसिंग खेमाणी
३३ श्री. गुप्ता प्रभुनाथ
३४ श्री. रोहडा श्यामसुंदर
३५श्री.प्रमनानी ईश्वर

<u>मा.महापौर</u> :- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> श्री. के.एस. सोनाळे यांची उल्हासनगर महापालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन <u>प्रतिनियुक्तीवर नेमणुकीस मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर महापालिकेने तयार केलेल्या आस्थापना सुचीमध्ये उपायुक्त पदनामाची एकुण सहा पदे प्रस्तावित केली आहेत. त्यावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविणेबाबत या महानगरपालिकातर्फे शासनाकडे विनंती केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. डि.पी.टी.११/२०००/प्र.क्र.१२४/इ.१ , दिनांक १९ मे, २००० अन्वये श्री. के.एस.सोनाळे यांची उपायुक्त या पदावर महापालिकेकडे शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून नेमणुक केलेली आहे.

श्री. के.एस.सोनाळे, हे या महापालिकेत उपायुक्त (शहर)या पदावर दिनांक. १.६.२००० पासुन रूजु झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलम ४५ नुसार श्री.के.एस.सोनाळे यांच्या नेमणुकीस शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यास मंजुरी घेणे आवश्यक आहे. मान्य असल्यास सोबतची प्रस्तावना उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस अनुमती मिळावी.

<u>महासभा ठराव क्र. २७</u> <u>दि:-२०.१२.२०००</u>.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बी.बी.मोरे.



हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. के.एस.सोनाळे यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत नाही.

तसेच त्यांना त्वरीत कार्यमुक्त करून त्यांचे मुळ विभागात पाठविण्याची माहिती शासनास सादर करण्यात यावी.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.८ वाचुन दाखवितात. वरील प्रमाणेच करायचे का?

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- सचिव साहेब ,सोनाळे साहेबांचे काय झाले.

<u>मा.सचिव :-</u> जसे मागील दोन ठराव तसा तोही पास झाला.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- कोण म्हणाले त्यांना ठेवायचे नाही म्हणुन.

<u>मा. महापौर</u> :- एक मिनिट, कुणाला जर शंका असेल तर वोटींग घेतले जाईल.

<u>मा.सचिव :-</u> आपल्याच एका सदस्याने कुणीतरी जसे आहे तसे करायला सांगीतले.
(विषय क्र.७ वर परत मतदान घेण्यात आले) श्री. प्रकाश माखीजा आपण हात वर नाही केला. पुर्वीसारखीच परिस्थिती आहे.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.८ वाचुन दाखवितात. वरील प्रमाणेच करायचे का?

<u>मा.सचिव :-</u> जे मा.सदस्य जसा विषय आला आहे तसा मान्य करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>मा.सचिव :-</u> व जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. (श्रीमती.ज्योती कालानी आपला हात वर नाही)

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर</u> :- मा.महापौर,

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- मतदानाचे काय झाले ते तर सांगा.

<u>मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-</u>मा.महापौरजी, मला बोलू दया एक मिनिट? जे उपायुक्त प्रतिनियुक्तीवर येतात त्या काही सामान्य व्यक्ती नाहीत. त्यांची अवहेलना होईल असे शब्द सभागृहात वापरले जात आहेत. त्यांचा पण मान आहे. आपण ज्या त-हेने जाऊदया येऊ दया अशा शब्दांचा वापर करून हात उचलुन त्यांचा अपमान करीत आहेत. हा अपमान नाही झाला पाहिजे आपण आधीच विचार करायला पाहिजे होताकी कुणाला ठेवायचे कुणाला नाही. तीन



उपायुक्तांचे विषय होऊन गेले आहेत. आता श्री. भडकवाड यांचा विषय आला आहे ते आज प्रभारी आयुक्त म्हणुन आसनस्थ आहेत. माझी ही सर्वांना वैयक्तिक विनंती आहे की, त्या पदाची गरिमा लक्षात घेऊन त्यांना कायम करण्यात यावे ही माझी विनंती आहे.

मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे :- महापौरजी, श्री. सुभाष मनसुलकर कॉंग्रेसचे गटनेते म्हणतात की, उपायुक्त हे जवाबदार व्यक्ती आहेत. त्यांची अवहेलना सभागृहात होत आहे. लोकशाही पध्दत ही त्यांनाही माहित असली पाहिजे. जर माहित नाही तर त्यांनी माहिती करून घ्यावी. प्रशासनाने हा ठराव आणला आहे की, त्यांना सेवेत ठेवायचे की परत पाठवायचे. तेच शब्द सभागृहात वापरले जात आहेत की, ठेवायचे की परत पाठवायचे आहे यात काही कमीपणाचा प्रश्न येत नाही. प्रशासनानेच तसा ठराव आणला आहे. सन्माननिय सदस्य तेच शब्द वापरत आहे. कॉंग्रसच्या गटनेत्त्यांनी जे सांगितले , त्यास माझा पूर्णपणे विरोध आहे. सन्माननिय सदस्य म्हणाले की, उपायुक्तांनी प्रभारी आयुक्त पद ग्रहण केले आहे. मला वाटते पंतप्रधान असो, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असो, त्यांच्या विरोधात लोकसभेत , विधानसभेत लोकप्रतिनिधीतर्फे जर लक्षवेधी आणली गेली, ठराव मांडला गेला तर त्या ठरावावर चर्चा होते, चर्चा झाल्यावर मतदानपण घेतले जाते, व नंतर निर्णय घेतला जातो, त्यालाच लोकशाही म्हणतात, त्या लोकशाही मुळेच सन्माननिय सदस्य महासभेत बसले आहे, आणि त्यानुसारच कामकाज चालू आहे. मी सुभाष मनसूलकर यांना सांगू इच्छितो की, पंतप्रधान असो, मूख्यमंत्री असो त्याच्यासाठी सुध्दा अशी भाषा वापरली जाते यात काही वेगळे नाही. म्हणून ते आयुक्तांच्या खुर्चीवर बसलेले असो किंवा पंतप्रधानाच्या ,किंवा मुख्यमंत्रींच्या जेव्हा लोक प्रतिनिधी त्यांच्या विषयी ठराव आणतात तेव्हा त्यांनी त्या खुर्चीवरुन स्वतःहून उठून बाजूला झाले पाहिजे. हि त्यांची नैतिक जबाबदारी आहे म्हणून मी म्हणतो मनसूलकरांनी जो निर्णय घेतला त्यावर माझे वैयक्तीक नाहीतर सर्व आरपीआयच्या सदस्यांतर्फे गटनेता म्हणून हे म्हणणे आहे की, या उपायुक्तांना देखील परत पाठवावे.

मा. सदस्य श्री. बनवारी ढेणवाल :- मा.महापौरजी ,हा जो सभेतर्फे प्रस्ताव आला आहे, त्यावर मी माझे मत मांडु इच्छितो. आपण एका बाजूने असे म्हणतो की, उपायुक्तांवर एवढा खर्च येतो, हे गेले तरी दुसरे उपायुक्त येतीलच. म्हणजे खर्च हा तेवढाच होणार आहे.आजपर्यंत जितके पण उपायुक्त आले आहेत, शासनातर्फे आपण त्यांना परतच पाठविले आहे. दुसरीकडे आपण अशी आशा ठेवतो की, यांनी आपले काम करावे. उपायुक्तांना जर सहा महिन्यांनी पाठवायचे असेते तर ते मन लावून कशाला काम करतील. कारण जेव्हा येतात तेव्हाच त्यांना माहित असते की, सहा महिन्यांनी आपल्याला परत जायचे आहे. आणि दुसरीकडे आपण अशी आशा ठेवतो की, त्यांच्याकडुन काम करुन घ्यायचे. यावर कुठेतरी बंधन घातले पाहिजे, माझे असे मत आहे की, उपायुक्तांना काम करण्याची भरपूर संधी दिली पाहिजे. जेणे करुन ते मनमोकळे पणाने जास्तीत जास्त काम करतील. जर आपण सहा महिन्यासाठी आणतो तर ते कशाला काम करतील?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- मा.महापौर, आता जो तीन अधिका-याविषयी आपण बहुमताने निर्णय घेतला आहे. त्यांना त्वरीत पाठवणार की त्यांना नोटीस देणार की, त्यांना काही कालावधी अजुन ठेवणार?
(इथे कॉंग्रेस युपीपी, आर.पी.आयचे सदस्य सदर प्रस्तावाबाबत आपापसात विचार विमर्श करत असताना)

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- जर कॉंग्रेस युपीपी, आरपीआय यांचा जर विचार बदलत असेल तर मी थांबण्यासाठी तयार आहे.



मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- वोटींग घ्या वोटींग.

मा.महापौर :- सभागृह नेता आपण बोला.

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- मा.महापौर, मी आधी उभा आहे, मला बोलु दया.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- आपण तर प्रस्तावाच्या बाजुने मत दिले आहे. इथली वोटींग अजुन व्हायची आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- मा.महापौर, आपण मला उभे करून ठेवले बसायला पण नाही सांगीतले मला बोलु दया.*

*<u>मा.महापौर :-</u> ठिक आहे. बोला.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-मा.महापौरजी, जेव्हा एखादी व्यक्ती उपायुक्त पदावर असो वा कोणत्त्याही जेव्हा त्यांचा विषय या महासभेसमोर येतो हा विषय असा आहे की कुणा ना कुणा व्यक्तीचे कुठे न कुठे तरी मन दुखवले जाणार आहे. आपण कुणाला हटवावे वा हटवू नये हा विषय दुर्दैवाने आपल्या समोर येतो. आणि आपली दुविधा स्थिती होते की आपण कोणता निर्णय घ्यावा. याच स्थितीत पूर्ण सभागृह आहे. दुसरा विषय जो आहे की, विषय उपायुक्तांचा नाही विषय पध्दतीचा आहे. आज जर मला असे वाटते की, एखादा उपायुक्त बरोबर नाही त्याला परत पाठवले पाहिजे. माझ्यात जो उपायुक्त बसला आहे, ज्या पध्दतीचा मी अवलंब केला आहे. त्या पध्दतीचा मी भाग बनलो आहे. त्या पध्दतीलाच मी तोडले पाहिजे. इथे हजार उपायुक्त येतील जातील. प्रत्येक वेळी आमची अशी विचारधारा असते की, इथले जे अधिकारी कायम आहेत त्यांपैकी कोणी एका अधिकारीने काम केले नाही तर तो अधिकारी चांगला नाही त्याची इथुन बदली करा. असे म्हणणे उचित नाही. त्याला इथुन तिथे बदली करा. गॅरेजमध्ये टाका. असे म्हणतो म्हणुन गॅरेजवाल्यांना दुःख नाही झाले पाहिजे. मग बाहेरचा उपायुक्त येतो तो माझे काम करत नाही त्यालाही परत पाठवा. अशा प्रकारचे विचार मनात ठेऊन इथे बसले नाही पाहिजे. जर तो अधिकारी बहुमताने परत त्याच पदावर राहिला तर त्याचे संबंध माझ्याशी चांगले नाही राहणार. असा विचार केला नाही पाहिजे. त्याचबरोबर हा ही विचार केला पाहिजे की, कोणत्त्या अधिका-याने किती काम शहराचे केले. शहरासाठी जे धोरण आखले त्याची अंमलबजावणी केली की नाही. आपले काम प्रामाणिकपणे केले की नाही केले. या मापदंडाच्याआधारे आपण एखादया अधिका-यास विनम्रतेने जाण्यास सांगतो शुभेच्छा देतो की, दुसरी कडे जाऊन चांगले काम करा तर ठिक आहे. पण अशा प्रकारे आपण अपमान करून पाठवतो असे ठिक नाही. शेवटी तो माणुस आहे आणि प्रत्येक माणसाला मानअपमान असतो. आपण एका-दोघा-चौघांना उपायुक्तांना हटवले पण आपण आपल्याआतील चुकीच्या उपायुक्ताला बदलले पाहिजे. जोपर्यंत आपण स्वतःच बदलत नाही, आपला व्यक्तीगत स्वार्थ बदलत नाही तोपर्यंत कोणताही अधिकारी आपल्याला पटणार नाही. त्याचआधारे आपण आपले विचार, मत मांडले पाहिजे. मी मुददा बदलतो इथे आरपीआय, यु.पीपी सत्ताधारी पक्ष आहे. यांनी आधीच याविषयावर विचार करायला पाहिजे होता. इथे सभेत एक-एक सदस्य उठुन एकमेकांकडे जातो याला ठेवा याला नको सभेत चालते. हे सर्व सभेत होणे योग्य नाही. हे तुम्ही सभेआधीच ठरवायला पाहिजे सभागृहात नाही. सभागृहनेता म्हणतात मी सर्वात शेवटी बोलले पाहिजे. त्यांनी हे आधीच ठरवून यायला पाहिजे. धन्यवाद.*



*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- मा.महापौरजी, खरे तर हा विषय संपला होता कारण विपक्षातर्फे मतदान झाले आहे. फक्त आमच्या पक्षाचे मत घ्यायचे होते. आता जो हा मुददा आला आहे. अधिका-यांना ठेवायचे की नाही ठेवायचे. आता मला एक उदाहरण आठवते. जेव्हा कुमार आयलानी उपमहापौर होते व भाजप-शिवसेनावाल्यांबरोबर होते. तेव्हा त्यांनी सर्व पक्षीयाच्या सहया*

घेवून एक विशेष सभा बोलावली होती. ती यासाठी होती की, येथील जेवढेही अधिकारी आहेत त्यांचे प्रमोशन थांबवले गेले आहे. याचे कारण हे आहे की, बाहेरचे अधिकारी डेप्युटेशनवर येतात त्यामुळे आपल्या महापालिकेच्या अधिका-यांना कधीच पदोन्नती मिळाली नाही. जेव्हा विशेष सभा बोलवली होती तेव्हा आम्ही विपक्षात होतो. त्यावेळी शिवसेनेचे सदस्य सोडुन भाजपाचे सदस्य उपस्थित होते. ज्यांनी सतरा अधिकारींच्या पदोन्नतीचा प्रस्ताव मंजुर केला. आजतागायत त्यांना पदोन्नती मिळालेली नाही आहे त्यांच्याशी हा अन्याय आहे. आता राजानी साहेब जे म्हणाले राजानीजी जरा लक्ष दया. जेव्हा आपण सर्वश्री. साळवी, कांबळे, नागराळे आले होते तेव्हा सर्व पक्षीयांनी सर्व संमतीने त्यांना परत पाठवले होते. तेव्हा भाजपा आणि शिवसेनेचे सदस्य पण आमच्याबरोबर होते. आता हे म्हणतात हयांचा अपमान करून नाही पाठविले पाहिजे, किंवा वैयक्तिक दुश्मनी ठेवू नये. इथे वैयक्ति शत्रुत्त्व कुणाचेही नाही आहे. इथे सत्ताधारी पक्षांचे असे म्हणणे आहे की, जितके पण महापालिकेचे अधिकारी वर्षापासुन आहेत. आज अडीच वर्षे झाले त्यांच्या पदोन्नतीचा ठराव पास करून. पण ते कोर्टाच्या स्थगती आदेशांमुळे पदावर आहेत. त्यांना न्याय नाही मिळाला म्हणुन ते कोर्टात गेले. जोपर्यंत बाहेरचे अधिकारी येत राहतील तोपर्यंत आपले अधिकारींना आपण न्याय देऊ शकणार नाही. मी तर म्हणतो यानंतर बाहेरचे अधिकारी आणलेच नाही पाहिजे. कारण आपल्या महापालिकेचे अधिकारी सक्षम आहेत. ते काम करू शकतात व ते पदासाठी लायक आहेत. आणि त्याच लोकांकडुन आपल्याला काम करून घ्यायचे आहे. आपली दाढी दुस-याच्या हातात देऊ नये. आज आपण महापालिकेच्या अधिका-यांवर विश्वास न ठेवुन बाहेरचे अधिकारी बोलावले तरी काय फायदा झाला. कॉलराची साथ आली. साफसफाईची तक्रार आहेच. उल्हासनगर मध्ये राहणारा अधिकारी असेल हे शहर त्याची जन्मभुमी असेल म्हणुन तो प्रामाणिकपणे काम करेल. आणि शहरास आपले समजुन काम करेल हे आमचे मत आहे. आम्ही कुणाला वाईट म्हणत नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी</u> :- सहयोगी मित्र, दोन शब्द मी पण बोलु इच्छिते परीवर्तन हा संसाराचा नियम आहे. ज्या खुर्चीवर आम्ही बसलो आहोत त्या खुर्चीचा कालावधी देखील संपणार आहे. आम्हाला देखिल येथुन जावे लागेल. मी आदराने म्हणते की, हे जे चार अधिकारी आहेत. चौथे अधिकारी आहेत श्री. दत्ता भडकवाड, त्यांचा विषय चालु आहे अजुन नक्की काय ते ठरत नाही. निर्णय होईलच. आम्ही अधिकारींचा मान ठेवतो. आपण अधिकारींनी कॉलरा साथ आल्यावर जे सहयोग दिले. सर्वांनी काम केले त्यासाठी आम्ही सर्वांचे धन्यवाद मानतो.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- हा तुमचा निरोप समारंभ आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी :</u>-असे नाही. आम्ही तुमचा आदर करतो. तुम्ही पण आम्हाला असाच मान दयाल. होऊ शकते आम्हा सदस्यांपैकी काहीजण तर नक्कीच परत निवडुन येणार आणि होऊ शकते आपली पण बदली परत इथे होईल. निवडणुक अधिकारी म्हणुन आपण याल. तेव्हा व्यक्ती विशेष याकडे लक्ष न देता आम्हा सर्वांच्या भावनेकडे आपण लक्ष दयाल. आणि जसा ठराव सदन पास करेल तसे आपण मान्य कराल. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u> :- मा.महापौरजी, व सदनातील उपस्थित सर्व सदस्य आताच किशोर वनवारी म्हणाले, प्रमोशन विषयी आज पी.डब्लु. डी.

विभागात बारा कनिष्ठ अभियंता आहेत. श्री. सुखरामणी हे १९७६ पासुन ज्युनियर इंजिनिअर म्हणुन आहेत. २४ वर्षापासुन ते इथे आहेत. आता ते डेप्युटी इंजिनिअर पदावर आहेत पण ते फक्त काम करतात त्यांची पदोन्नती केली नाही. असे कित्येक ज्युनिअर इंजिनिअर आहेत ज्यांना प्रमोशन दिले नाही. जवळजवळ सर्वांना १९-२० वर्षे झाली आहेत. यावर कोणाही अधिका-यांनी व आयुक्तांनी लक्ष दिलेले नाही की, ज्युनिअर इंजिनिअर यांना पदोन्नती दयावी. किंवा जे डेप्युटी म्हणुन काम करत आहेत त्यांनाही बढती दयावी. यावर पण लक्ष दिले जावे. जे आमच्या इथे २०-२४ वर्षापासुन काम करत आहेत त्यांना प्रमोशन दिलेले नाही, ते ज्युनिअर इंजिनिअर म्हणुनच आहे तरी कृपया त्यांना प्रमोशन दिले जावे.

<u>मा.सदस्य श्री. बी.बी.मोरे</u> :- स.महापौर, खुप चर्चा झाली. भाजपा शिवसेना सदस्यांनी मतदानासाठी हात पण वर केले होते.राजानी काहीतरी म्हणाले सभागृहात हे चालतच असते, नवे असे काही नाही. दुसरी गोष्ट अशी की, आमच्या सभागृहनेत्त्यांनी जे सांगीतले त्याचा मी विरोध करत नाही पण आजचा विषय पुर्ण करा तो विषय आल्यावर बघु. वेळ खुप होत आहे.

<u>प्रस्तावाच्या बाजुने मतः-</u>

१. श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
२. श्रीमती.सोनावणे यमुना
३ श्रीमती.वेलकर सुरेखा
४ श्रीमती.यशस्विनी नाईक
५ श्री. भांडे भगवान
६ श्री. तेजी कैलास
७ श्री. बोडारे धनंजय
८ श्री.चौधरी राजेंद्र
९ श्री. लांडे पांडुरंग
१० श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
११ श्रीमती.सुनिता राजवानी
१२श्री. मोरे भिमसेन
१३ श्री. चव्हाण रमेश
१४ श्री. महाडिक प्रकाश
१५ श्री.उमाप रामदास
१६ श्रीमती.मटाई जोनिता
१७ श्री.पारवानी रामचंद
१८ श्रीमती.आशा राधवानी
१९ श्री. जग्यासी राजु
२० श्री. माखिजा प्रकाश
२१ श्री. राजानी नरेंद
२२ श्री. भारती राजानी
२३ श्रीमती.आशा जेस्वानी

<u>मा.सचिव :-</u> व जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. कोणीही तटस्थ नाही.



<u>प्रस्तावाच्या विरुध्द :-</u>

१ श्रीमती.ज्योती कालानी
२ श्रीमती. मिनु दासानी
३ श्री.प्रमोद टाले.

४ श्री.वाधवा गिरधारी
५ श्री.तलरेजा विनोद
६ श्रीमती.वनवारी मोना
७ श्रीमती.कुंदनानी लविना
८ श्री.किशोर वनवारी
९ .श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंदा
११ श्रीमती.पवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.सोनावणे राजु
१७ श्री.पुरस्वानी जमनु
१८ श्री.पंजाबी नारायण
१९ श्री.आयलानी कुमार
२० श्री.वाघे शामु
२१ श्री.ढेणववाल बनवारी
२२ श्री.ठाकुर सेवलदास
२३ श्रीमती.वसीटा बेबी
२४ श्री. बेहरानी ठाकुर
२५ श्रीमती.साधवानी जया
२६ श्री. मन्सुलकर सुभाष
२७ श्रीमती.गजवानी कांता
२८ श्रीमती.बठिजा इंदिरा
२९ श्री.केणी जयकुमार
३० श्री.माखिजा हरदास
३१ श्री.बेहरानी गोप
३२ श्री.देवेंद्रसिंग दर्शनासिंग खेमाणी
३३ श्री. गुप्ता प्रभुनाथ
३४ श्री. रोहडा श्यामसुंदर
३५श्री.प्रमनानी ईश्वर

मा.महापौर :- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> श्री. दत्ता भडकवाड यांची उल्हासनगर महापालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन <u>प्रतिनियुक्तीवर नेमणुकीस मान्यता देणे बाबत</u>.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर महापालिकेने तयार केलेल्या आस्थापना सुचीमध्ये उपायुक्त पदनामाची एकुण सहा पदे प्रस्तावित केली आहेत. त्यावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविणेबाबत या महानगरपालिकातर्फे शासनाकडे विनंती केली होती.



त्यानुसार महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. डि.पी.टी.११/२०००/प्र.क्र.१२४/इ.१ , दिनांक १९ मे, २००० अन्वये श्री. दत्ता भडकवाड यांची उपायुक्त या पदावर महापालिकेकडे शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून नेमणुक केलेली आहे.

श्री. दत्ता भडकवाड, हे या महापालिकेत उपायुक्त (अनाधिकृत बांधकाम)या पदावर दिनांक. १ ६ २००० पासुन रूजु झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलम ४५ नुसार श्री.दत्ता भडकवाड यांच्या नेमणुकीस शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यास मंजुरी घेणे आवश्यक आहे. मान्य असल्यास सोबतची प्रस्तावना उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस अनुमती मिळावी.

महासभा ठराव क्र. २८ दि:-२० १२ २०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बी.बी.मोरे.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. दत्ता भडकवाड यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत उपायुक्त म्हणुन प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत नाही.

तसेच त्यांना त्वरीत कार्यमुक्त करून त्यांचे मुळ विभागात पाठविण्याची माहिती शासनास सादर करण्यात यावी.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त) :- स.महापौर, उपमहापौर व सदन, मी दत्ता भडकवाड उपायुक्त म्हणुन नाही बोलत आहे. मी प्रभारी आयुक्त म्हणुन बोलत आहे. मी काम करत होतो तेव्हा उपायुक्त फक्त ढाकरे साहेब होते. आयुक्त साहेबांनी आपणा सर्वांना विश्वासात घेऊन उपायुक्तांची मागणी शासनाकडुन केली. जेव्हा उपायुक्त येण्या अगोदर उपायुक्तांना विचारले होते की आपण इथे यायला तयार आहेत का? खास करून जे आयुक्त शहराचा विकास करण्याचा विचार करून इथे आले होते त्यांच्या आशा पुर्ण करण्यासाठी आम्ही आलो. जेव्हा माझी प्रथम नियुक्ती झाली तहसिलदार म्हणुन तेव्हापासुन मी या शहरास आपले मानतो. मला परत इथे उपायुक्त म्हणुन शहराची सेवा करण्याची संधी मिळाली. मी शिंदे साहेबांना म्हणालो की, मला जर उल्हासनगर शहरात नियुक्त केले जात असेल तर मी त्वरीत कामावर हजर होईल.मागच्या

--५५--

उपायुक्तांना सर्व संमतीने परत पाठवले होते. त्यावेळी सेक्रेटरी रीव्हेन्युव्ह आम्हाला इथे परत पाठवत नव्हते ते म्हणत होते की आपण तिकडे जाऊ नका उल्हासनगरचे नगरसेवक कधीही परत पाठवू शकतात.ही हकीकत आहे. श्री. शिंदे साहेबांनी आम्हाला समजवले की, अशी गोष्ट नाही मी आपली जवाबदारी घेतो. साहेबांना देखिल आम्ही विनंती केली होती की, साहेब आमचेही कुटुंब आहे. लोकशाही फक्त जनता किंवा इतरांसाठी नाही

अधिकारींसाठी सुध्दा आहे. आम्ही लोकशाहीचा खुप आदर करतो. आमच्या चारही उपायुक्तांचे कुटूंब आहे जे येणारे अधिकारी असतील त्यांचेही कुटूंब आहे. आम्ही जिथुन आलो तिथुन पूर्ण सामान घेऊन इथे आलो. मी यावेळी जरा भावनाप्रधान होत आहे. कारण की दत्ता भडकवाड यांचा विषय आल्यावर सभागृहाच्या वातावरणात जो बदल झाला. सर्व संमतीने मंजुर करत आहात. असे वाटल्यावर जरा आनंद झाला. लोकांनी मला जे प्रेम दिले त्याचे हे परिणाम आहेत. आम्ही अजिबात नाराज नाही आम्ही तडजोड करू. कारण की, तीस वर्ष नोकरी करायची आहे. कुठे ना कुठे तरी जावेच लागेल. या पदावर बसुन बोलतो याकरिता बोललो कारण की आयुक्त म्हणुन ज्या अडचणी मला आल्या. जो खर्च डी.एम.सी वर होणार आहे तो होणारच आहे.एकतर महापालिकेच्या कर्मचा-यांना पदोन्नती दिल्यावर खर्च होणार आहे किंवा इतर उपायुक्त आल्यावर खर्च होणारच आहे. यंत्रणा कधी कुणासाठी थांबत नाही. आम्ही उदयापण इथुन जाणारच आहोत महापालिका काय बंद होणार नाही. परंतु ज्या आशेने शिंदे साहेबांनी उपायुक्तांना आणले होते. मला वाटते जनतेच्या समाधानासाठी शहरासाठी आपला पुर्ण वेळ दिला नसेल. चांगले काम केले नसेल पण ज्यांनी चांगले काम केले त्यात मी श्री. सोनाळे साहेबांचा उल्लेख करतो कारण की स्वतःसाठी मी स्वतः बोलणे योग्य नाही. परंतु ज्या अधिकारींनी काम केले आहे त्यांना ठेवायचे की नाही याविषयावर हात वर करून दर्शाविले जाते तर अधिकारी म्हणुन खुप दुःख होते. जर आपण हे दुःख समजला असता तर चारही उपायुक्तांचा सर्व संमतीने प्रस्ताव पास झाला असता. महापालिकेत ३३ रस्त्यांचे जे काम सुरू केले आहे. त्यावर लक्ष देण्यासाठी तसेच परवा कॉलराची साथ आली तेव्हा दिवसरात्र पाचही उपायुक्त काम करत होते. पावसाळयात पुर आला महापौरांबरोबर रात्री तीन वाजेपर्यंत आम्ही उपायुक्त लोकांना पाण्यामधुन काढत होतो. यासर्वांचे मुल्य जर शुन्य ठरते तर हे आमचे दुर्दैव आहे असे मी समजतो. जरया भाभी म्हणाल्या वैयक्तिक स्वरूपात मी असे म्हणतो की, या शहरासाठी मला पूर्वीपासुन प्रेम आहे आणि पुढेपण राहील आणि यात काही शंका नाही. आयुक्त म्हणुन मी हे सांगतो की, आता जे मोरे सर म्हणाले की, चोवीस तासाच्या आत यांना पाठवण्यात यावे. जर कायदयाने पाहिले तर हा ठराव आयुक्तांना शासनाकडे पाठवावा लागेल कारण की तीन महिने आधी तरी शासनाला हे कळवावे लागते. कारण की, दोन उपायुक्तांना कुठे सुध्दा पोस्टींग मिळालेली नाही. कारण की त्यांनी आधी कळविले नव्हेत आणि त्यांचा पगार आपल्या महापालिकेला फुकटात दयावा लागला ते काम करत नव्हते तरी यासाठी मला आधी शासनाला कळवावे लागेल शासन त्यांना कुठे नियुक्त करावे याची व्यवस्था करेल तो पर्यंत हे उपायुक्त इथेच राहतील. पुढे जर तुम्ही इथल्याच अधिकारींना प्रमोशन देण्याचा प्रस्ताव आणला किंवा नविन अधिकारी जरी आणले तर प्रशासनाचे जनतेचा व शहराचा विकास करण्यासाठी आम्ही शासनाचे हात भक्कम करून आम्ही शहराचा विकास करू. अशी आशा करतो. चारही उपायुक्तांना तुम्ही जे प्रेम दिले आहे त्याबददल मी तुमचे आभार मानुन माझे दोन शब्द पुर्ण करतो.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.९ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा.महापौर, या योजनेमुळे आजुबाजूतील परिसरात काही त्रास होणार का? प्रदुषण वाढेल का? महापालिकेतर्फे कचरा डंपींगसाठी जो खर्च करत आहोत तो खर्च कोण करणार आहे. ग्रीन कोल ही



कंपनी करणार का महापालिका करणार? याचा पण खुलासा झाला तर बरे होईल.

मा.महापौरः-ग्रीन कोल साठी जो खर्च येणार आहे तो रिसोर्स रिट इ इ टी कंपनी करणार आहे. त्यानी काही प्रदुषण होणार नाही.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- महापालिकेची जागा म्हणजे कोणती जागा ?

मा.महापौर :- शांतीनगर विभागात जे डंपींग ग्राऊंड आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- गोषवा-यात जागा दाखवली गेली नाही.

मा.सदस्य श्री.भिमसेन मोरे :- महापौरजी, या प्रोजेक्ट विषयी सविस्तर माहिती महासभेला सांगाल तर बरे होईल. कोण अधिकारी आहे सांगणारा? जसे राजेंद चौधरीनी विचारले की प्रदुषण तर होणार नाही.

मा.महापौर :- आरोग्य अधिकारी आज उपस्थित नाहीत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबीः- आम्हाला सविस्तर माहिती हवी आहे.

मा.महापौर :- मला वाटते जी माहिती हवी ती सोबत जोडलेली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-आयुक्त साहेब खुलासा करतील.

मा.सदस्या श्रीमती.ज्योती कालानी :- मा.महापौरजी, मी या विषयावर बोलु इच्छिते ही जी जागा आपण देणार आहोत ती कायम स्वरूपी महापालिकेचीच असेल. यासाठी भाडे दर जे निश्चित केले आहेत ते प्रतिचौरस फुटासाठी आहे. व त्याप्रमाणे ४० ,४८०/-रू.आहेत ते प्रतिवर्षी आपल्याला मिळेल. पनवेलकरांना जो आपण ठेका दिला आहे व महापालिकेच्या हिशोबाप्रमाणे २ ते २. ५० करोड रूपये आपण गॉरबेज लिफ्टिंगसाठी खर्च करतो. महापालिकेचे अधिकृत जे खत्ते आहेत त्यात जो कचरा जमा होतो तो पनवेलकर उचलून डंपींग ग्राऊंडवर टाकतात. (सदनाने कृपया लक्ष दयावे).

काही विपक्ष सदस्य :- यावर पण वोटींग करू.

मा.सदस्या श्रीमती.ज्योती कालानी :- गरज पडली तर करू तुमचा सहयोग पाहिजे. हे शहरासाठी खुप चांगले काम होत आहे. जसे विपक्षांनी आता विचारले प्रदुषण वाढेल का? उलट प्रदुषण कमी होईल. कचरा शहरात जमा असतो त्याने प्रदुषण वाढते. हा कचरा वेळोवेळी उचलला जाईल. ज्यांना ठेका दिला आहे त्यांना ही अट पण टाकली जाईल की, यासाठी मजुरांवर पाण्यावर लाईटवर लागणारा खर्च ते स्वतः करतील? जिथुन कचरा उचलतील तेथे डि.डी.टी. पावडर पण टाकतील. आम्ही प्रस्ताव सदनासमोर मांडला आहे. २ ते २. ५० करोड रूपये. साफसफाईवर खर्च होतो. आपल्या कामगारांची पण बचत होईल. हे फायदे या कंपनीला ठेका दिल्यावर मिळतील. तुम्हाला हवे असेल तर काही अटी व शर्ती तुम्ही टाकू शकता.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-मा.महापौर, उपमहापौर नोव्हेंबर महिन्यात जेव्हा टाऊनहॉलचा मुददा आला होता तेव्हा त्यावेळी आम्ही आपणांस विनंती केली होती की सर्वांबरोबर चर्चा करून अटी व शर्ती ठरवा. ठरावात फक्त प्रमुख अटी घातल्या होत्त्या. नंतर जेव्हा पेपर मागविले गेले. तेव्हा त्यात अशा काही अटी



की त्या घातल्याच नव्हत्त्या. आपण आयुक्तांना अधिकार देतो की, इतर अटी तुम्ही तयार करा. आपण त्यात एक वाक्य टाकतो, आयुक्तांनी विर्निदिष्ट केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन. जसे टाऊन हॉलचा प्रस्ताव आला त्यात ज्या अटी व शर्ती होत्त्या त्या कायदेशिर नव्हत्त्या. त्याचा परिणाम हा

झाला की, विधानसभेत पण यावर विचारणा करण्यात आली व वर्तमानपत्रात देखील आले आहेत की शासनाने आदेश दिले आहेत की, सदरचा ठराव रदद करण्यात यावा. अशी स्थिती परत निर्माण नाही झाली पाहिजे. जर छोटेसे काम असते नाला बनवायचे वा शौचालय बनवायचे असेल तर शासनाच्या प्राकलनाप्रमाणे ते तयार केले जाते. हा एक खुप मोठा प्रकल्प आहे. त्यासाठी आधी प्रकल्प अहवाल तयार केला गेला पाहिजे. तज्ञ लोकांच्या कमीटीचा रिपोर्ट पाहिजे. सांगण्याचा अर्थ हा आहे की महापालिकेसमोर चांगला प्रकल्प रिपोर्ट पाहिजे. तुम्हाला माहित आहे त्यामध्ये कायकाय असते. हे सर्व आम्हांसमोर आले पाहिजे. इथे फक्त एक कागद गोषवारा म्हणुन दिला आहे. जे हवे ते दिले नाही. ती ऐरिया रिर्झव्हेशनमध्ये येते की नाही. त्याचा प्रकल्प अहवाल काय आहे हे काही लिहिले नाही काहीही खुलासा यात केलेला नाही. आपण दहा एकर जमिन त्यांना देत आहोत. एका एकरात जवळजवळ चार हजार वार असतात. १० एकरची जमीन आपण देत आहोत कमीत कमी त्याचा बाजारभाव किंमत ५० करोड रू. होईल. तर आम्ही ५० करोडची जमीन अशा कंपनीला देत आहोत त्याचा प्रकल्प अहवाल देखील नाही. कायदेशीर एक बाब अजुन आहे की, आपण हे सर्व विना निविदा मागवून करत आहात. कोणतीही कंपनी आपल्याकडे येते, चर्चा करते आणि आपण त्यांना प्रोजेक्ट देता असे आपण कायदयाने देखिल करू शकत नाही. आणि महाराष्ट्रात दुस-या महापालिकेतपण कोणकोणते प्रोजेक्ट कसे देण्यांत आले याचा अभ्यास देखिल आपण केला पाहिजे. विनानिविदा आपण कुणाला हा प्रकल्प देऊ शकत नाही आणि सर्व अटी व शर्ती टेंडर सेट महासभेसमोर आणला पाहिजे व त्यानंतरच विचार करून हा प्रस्ताव पारित केला पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

<u>मा.सदस्य श्री.नरेंद्र राजानी :-</u> मा.महापौर, हा शहराचा महत्त्वाचा विषय आहे. आणि सभेत वातावरण काय चालले आहे. असे वाटत नाही की महत्त्वाचा विषय आहे. की लोकांना यात काही रस आहे असे वाटत नाही. जर लोकांना यात रस वाटत नसेल तर त्यांना रस वाटेल तेव्हा हा विषय आणा. श्री. लाल पंजाबींनी सांगीतले की, हा प्रस्ताव शहरासाठी किती महत्त्वाचा आहे. भाभीजी म्हणाल्या की, साफसफाईवर होणारा खर्च २-२.५० करोड रूपये उरतील आणि ४०,०००/- आपल्याला उत्पन्न मिळेल. यासाठी जे काही केले पाहिजे ते आपण पुर्ण केले आहे का? जसे लालजी म्हणाले की, नियमा नुसार निविदा मागविल्या पाहिजेत. शासनाकडुन परवानगी घेणे. अंडर सेक्शन ६६(ब) अन्वये कंडीशन टाकणे. असा काही विचार आपण केला नाही. दुसरा मुददा असा की, ज्या जमिनीवर हा प्रकल्प चालु करू इच्छितो त्या जमिनिचे आरक्षण कशासाठी आहे. कुणी संबंधित अधिकारी मला सांगु शकेल का?

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- मा.महापौरजी, सात वाजले आहेत. वेळ वाढवण्याची आवश्यकता आहे.

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार) :-</u> साईट नं.२९ आहे. बागेसाठी आरक्षित आहे. त्याचा ऐरिया जवळ जवळ २५००० चौ.यार्ड आहे. म्हणजे ५ एकर आहे.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :- आपल्याला दहा एकर जमिन दयायची आहे ती जमिन पाच एकर आहे. ती पण बागेसाठी आरक्षण आहे. जर बागेसाठी आरक्षित आहे. ते जो पर्यंत आरक्षण हटवले जात नाही तोपर्यंत दुसरा हेतु तिथे आपण ठेऊ शकत नाही. अशा काही कायदेशिर अडचणी येतील.



<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार)</u> :-जर महासभेने मंजुर केले तर मॉडीफीकेशनसाठी बी.एम.आर.डी.ए.नां तसे कळवावे लागेल नंतर ही कार्यवाही पुर्ण होईल.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-पहिले आपण प्रस्ताव पारित करणार नंतर तो कलम ३७ अन्वये आरक्षण बदल करण्यासाठी म्हणुन पाठविणार.

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार)</u> :-३७ नियम हा फेरबदल करण्यासाठीच आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-प्रश्न असा आहे की, एखादया जमिनीचे आरक्षण एखादया हेतुसाठी असेल त्या आरक्षणात आपण बदल केलाच नाही. बी.एम.आर.डी.ए कडुन आपण मंजुरी घेतली नाही तर आपण प्रस्ताव कसा आणता.*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार)</u> :-म्हणुनच मी म्हणतो की, महासभेची मंजुरी आवश्यक आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u>समजा आम्ही मंजुरी दिली व बी.एम.आर.डी.ए ने मंजुरी दिली नाही तर तुम्ही ठरावाची अंमलबजावणी कशी करणार. इथे लिहिले आहे की, त्यांच्याबरोबर आपल्याला करार करायचा आहे.*

*<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार) :-</u>शिफारीस पाठवावी लागेल की, आम्ही हा प्रकल्प सुरू करू इच्छितो. त्यांना योग्य वाटले तरच ते करतील.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> म्हणजे आपण त्यांच्यावर अवलंबुन असणार म्हणजे त्यांना जर ही गोष्ट योग्य वाटली नाही त्यांनी नाही केली तर मग आपण जो त्यांच्या बरोबर करार करणार आहेत म्हणजे महापालिकेचा वेळ वाया जाईल. हा एक मुददा आहे जोपर्यंत आरक्षणात बदल करत नाही तोपर्यंत हा प्रस्ताव आणु कसा शकता. जोपर्यंत आरक्षण बदलत नाही तोपर्यंत त्या जमिनीचा दुस-या कशाला वापर करता येत नाही. दुसरा मुददा असा की मंजुरी नाही दिली तर तुम्ही काय कराल?*

*<u>मा.सदस्य श्री.प्रकाश महाडिक</u> :- सोनावणे साहेब, एक मिनिट. जेव्हा आम्ही रोड कटींग झाले. पुर्नवसनासाठी आम्ही दुस-या जागेवर लोक पाठवली तेव्हा हा प्रश्न तिथे आला होता. तेव्हा आम्हाला महासभेची परवानगी घ्यावी लागली होती. जे नरेंद्र राजानी म्हणाले ते बरोबर आहे. आरक्षण बदलण्यासाठी आधी महासभेची परवानगी घ्यावी लागेल. तसेच ज्या जागेसाठी जमिनीचा उददेश आहे त्या उददेशासाठी त्याचा वापर करावा असे शासनाचे आदेश आहेत. व त्यासाठी आम्ही महासभेची परवानगी घेऊन शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवला होता.तसेच राजानींचे म्हणणे आहे की, जागेच्या वापराच्या उददेशात जर बदल करायचा आहे तर तशी बी.एम.आर.डी.ए कडुन आधी परवानगी घ्या.*

*<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार):-</u> बरोबर आहे तेच मी म्हणत आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u>म्हणजे आधी बी.एम.आर.डी.ए. कडुन परवानगी घ्यावी लागेल.*

*<u>मा.महापौर</u> :- राजानीजी, जोपर्यंत एखादया भुखंडाच्या वापरात बदल करण्यासाठी आपण ठराव करत नाही. तोपर्यंत आपण बी.एम.आर.डी.ए कडे प्रस्ताव कसा पाठवणार? जर तुम्ही एखादया प्लानला मंजुरी दिली तर त्यांना तसे कळवता येईल. व भुखंड वापराच्या उददेशात बदल करता येईल.*

*--५९--*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी:-</u> हा जो प्रस्ताव आहे तो एका साधारण कामासाठी आहे. इथे आपण कंपनीशी करार करणार आहेत. आपण त्यावर सही कशी करणार? त्याला हो कसे म्हणणार? जोपर्यंत तुम्ही भुखंडाच्या आरक्षणात बदल करत नाहीत तोपर्यंत तुम्ही त्यांच्याशी करार कसा करणार? तुम्ही प्रस्ताव करार करण्यासाठी आणला आहे जमिनिच्या वापरात बदल करण्यासाठी नाही.मी मानतो जर आपण असे लिहिले असते की, सदर*

जमिनीचा बागेसाठी असलेल्या आरक्षणात बदल करून ग्रीन कोल साठी वापर करू आहोत यावर चर्चा करावी. तर विषय वेगळा झाला असता पण तुम्ही इथे करार करणार आहात.

<u>मा.महापौर</u> :- आधी तर महासभेला निर्णय घ्यायला लागेल ना? एकदा जर आपण निर्णय घेतला तर आरक्षणात बदल करण्याचा प्रस्ताव दुस-या सभेत येऊ शकतो.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> तो प्रस्ताव तुम्ही आणलाच नाही. कराराचा प्रस्ताव आधी आणतात. जमिनीचा नंतर. मुलाला तर आई-वडीलांच्या नंतरच जन्म घ्यावा लागेल ना? बोलण्याचा अर्थ हा आहे की, हा प्रस्ताव चुकीचा होईल कुठेना कुठे तरी फेटाळला जाईल. या प्रस्तावाला आव्हान कोणी तरी करेल आणि तो रदद करेल. दुसरा मुददा असा आहे की, असा प्रकल्प दुसरीकडे कुठे चालु आहे का? तुम्ही म्हणता प्रदुषण होणार नाही. यात लिहिले आहे झाडे वगैरे लावली जातील. का लावणार कारण कदाचित तिथे प्रदुषण होणार असेल. जर इथे एखादा अपघात घडला. गॅस लिक झाला. त्यात जबाबदारी कंपनीची असेल आपली नाही हे मी मान्य करतो. पण जर तिथे गॅस लिक झाला शांतीनगर परिसरात पसरला तर तिथे लोक मरतील त्याची जबाबदारी आपल्यावर येणार नाही आपण मोकळे होऊ. जबाबदारी कंपनी असेल पण लोक आपली मरतील. पण प्रदुषण होणार नाही असे बोलुन चालणार नाही.

<u>मा.महापौर :-</u> हा प्रस्ताव सभेत आणण्यापुर्वी सर्व पक्षीयांची बैठक घेतली होती. चर्चा केली होती. मला बोलु दया आता सर्वांचे बोलुन झाले आहे. त्यानंतरही जेव्हा कंपनीचा प्रस्ताव आमच्या समोर आला तेव्हा आयुक्तांना मी लिहिले होते की तुम्ही त्याचा कायदेशिर तपासणी करा. कायदेशिर तपासणी झाल्यानंतरच महासभेत आणले आहे. व त्यानंतरही विपक्षांना जर काही अडचणी आहेत तर दुस-या महासभेपर्यंत तो विषय आपण डिफर करू या.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :</u>- महापौरजी आम्हाला प्रोजेक्ट रिपोर्ट पहायचा आहे.

<u>मा.महापौर</u> :- ठिक आहे. नो प्रॉब्लेम. मी आयुक्तांना सांगतो की, प्रोजेक्ट रिपोर्ट घ्या. आणि सर्व पक्षीयांशी चर्चा करा.

<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-</u> मागील वेळी आयुक्तांनी आपली दिशाभुल केली होती असे आपले म्हणणे होते यावेळी ही चुक होऊ देऊ नका. टाऊन हॉलच्या प्रस्तावास आपला विरोध होता पण आपली आयुक्तांनी दिशाभुल केली.

<u>मा.महापौर :-</u> मी दिशाभुल वगैरे असे काही म्हणालो नव्हतो. आपण असेच आरोप लावत आहात.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :- आपली स्टेटमेंट आहे वर्तमानपत्रात.



<u>मा.महापौर :-</u> मी असे म्हणालो की, बार उघडणे विषयी जो मुददा होता त्याच्याविरोधात मी होतो. आयुक्त म्हणाले होते की, मी यासंबंधी सर्व पक्षीय विपक्ष यांच्याशी बोललो आहे. याशिवाय कोणी ठेकेदार या प्रस्तावाचा स्विकार करणार नाही.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> आपण बीयरबारच्या विरोधात होता पण दोष आपण दुस-या सदस्यांना देत आहात.

मा.महापौर :- दोष वगैरे काही देत नाही. असे काही नाही.

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- मे. रिसोर्स रिट इ. इ. टी (इंडिया) यांना महापालिकेच्या जागेवर घन कच-यापासुन ''ग्रीन कोल'' प्रकल्प उभारणेसाठी परवाना देणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र.१० वाचुन दाखवितात.

काही सदस्य :- पास. पास.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :- मा.महापौरजी, यात जो गोषवारा दिला आहे. यात बरोबर खुलासा केला नाही आहे.

मा.महापौर :- काय खुलासा नाही केला.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-तुम्ही मुदत वाढ करण्याचे म्हणत आहात
यात यापुर्वी कधी परवानगी दिली होती. कितीदा मुदतवाढ दिली आहे. किती वर्षासाठी दिली आहे? मुदत पुर्ण होऊन किती कालावधी झाला आहे.

मा.महापौर :- आयुक्तजी, आपण यावर खुलासा करा.
श्री. दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त):- पाटणकर साहेब.

श्री. पाटणकर (उपायुक्त) :- प्रस्तुत ठिकाणची जागा ठराव क्र.५६९ दिनांक,२१.१२.९०, नगरपालिका अस्तित्त्वात असताना झालेला होता. १०.५.९१ रोजी करार करण्यात आला होता. करारानुसार ५०००/-रू डिपॉझिट ठेवायचे होते. तीन वर्षासाठी तो करार करण्यात आला होता. व भुखंड क्र. १०६ साठी आजपर्यंत २,००,०००/- रू.देण्यात आले आहेत.

मा.महापौर :- अजुन काही आपल्याला माहिती हवी आहे काय?

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-हे असे थांबुन थांबुन बोलले काही समजले नाही.

मा.महापौर :-यांनी ठराव कधी पास झाला. किती वर्षासाठी झाला, किती रक्कम भरली हे सर्व सांगीतले.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-मी विचारले मुदत वाढ कधी संपली?



श्री. पाटणकर (उपायुक्त) :- प्रस्तुत ठिकाणची जागा ठराव क्र.५६९ दिनांक,२१.१२.९०, नगरपालिका अस्तित्त्वात असताना झालेला होता. १०.५.९१ रोजी करार करण्यात आला होता. करारानुसार ५०००/-रू डिपॉझिट ठेवायचे होते. तीन वर्षासाठी तो करार करण्यात आला होता.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-मला माहित आहे तीन वर्षासाठी करार केला होता. त्यानंतर परत कधी मुदत वाढ दिली, तीन वर्षांनी, पाच वर्षांनी ?

मा.महापौर :- यांचे म्हणणे आहे डिसेंबर १९९३ मध्ये यांना तीन वर्ष पुर्ण झाले त्यानंतर बहुतेक मुदत वाढ दिली नाही.

मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी :-म्हणजे चार वर्ष त्यांचे असेच गेले होते. म्हणजे सात वर्ष झाले आपण त्यांना मान्यता दिली नाही. मला हे समजत नाही की, महापौर जो पण मंचावर येतो अधिकारी तो गप्पच राहतो. तिथे काही आहे का ?कुणी उत्तरच देत नाही.

मा.महापौर :- मॅडम ही सरळ-सरळ गोष्ट आहे की, पुर्व नगरपालिकाने शाळेसाठी म्हणुन संस्थेला जागा भाड्याने दिली होती. त्यानंतर त्याची मुदत वाढ दिली नाही. आज मुदत वाढसाठी हा प्रस्ताव महासभेसमोर आला आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- महापौरजी, यांचा सरळ-सरळ प्रश्न आहे की, सात वर्षापर्यंत मुदतवाढीसाठी का नाही आणले. याचे सरळ सरळ उत्तर यावे ही अपेक्षा.

मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगे :- महापौरजी, हे मागील सात वर्षासाठी मुदतवाढ मागत आहे की २००१ ते २००३ साठी याचा तर खुलासा करा. सात वर्षाचा कालावधी कुठे जाणार ?९३ पासुन मुदत वाढ मागायला कुणीही आले नाही. सात वर्षाचा कालावधी कशात मोजणार ?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महापौरजी, आपण मला बोलण्याची परवानगी दिलीत.

मा.महापौर :- हो दिली.

मा.सदस्या श्रीमती.पन्ना वारिंगे :- मग मला बसायला तरी सांगा.

मा.महापौर:- तुमचे बोलणे संपल्यावर मी किशोरना बोलण्याची संधी दिली.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मुदत वाढ देण्यासाठी हा मुददा आला आहे. तो दोन शाळेसाठी आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- कार्यसुचीत एकच शाळा लिहिली आहे. तुम्ही दोन कसे म्हणता.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ऐका तर माझे तुम्ही आधी. यात या संस्थेची शाळा उल्हासनगर १ मध्ये पण आहे.

मा.सदस्य श्री. प्रकाश महाडिक :- ह्यांना सांगा विषय सोडुन बोलू नका.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- विषय धरूनच बोलत आहे. ९१ मध्ये जेव्हा मंजुर झाले तेव्हा सुचक मीच होतो. ९४ पर्यंत कालावधी होता. त्यानंतर शाळेने चारदा रिमाइंडर दिले आहे. आणि शासनातर्फे रेंट फिक्स

केले जाईल. पी.डब्लु.डी. फिक्स करेल तोपर्यंत पाच हजार ठरले होते. त्यांनी वेळोवेळी पैसे भरले आहेत. त्यानंतर हा मुददा आज प्रशासनातर्फे आला आहे. ती खुप चांगली शाळा आहे. लोक त्या शाळेचा फायदा घेतात. भरपुर विद्यार्थी आहेत. हे एक चांगले कार्य आहे. त्यांनी जे रिमाइंडर पाठवले ते पण त्यांच्याकडे आहे. त्या पत्रांवरूनच हा मुददा प्रशासनाने महासभेत आणला आहे. हे चांगले कार्य आहे. मेहरबानी करून सर्व संमतीने यास मंजुर करावे.

<u>मा.सदस्या श्रीमती.सुनिता राजवानी</u> :- मा.महापौरजी, आपल्या म्हणण्यानुसार मी किशोर वनवारींना मी बोलू दिले. जसे किशोरजी म्हणतात हे चांगले काम आहे तसे आम्ही पण म्हणतो. शाळा वाढल्या पाहिजे. माझा प्रश्न असा आहे की,

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे</u> :- विचारा १०६ साठी चर्चा चालु आहे ना.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :- सचिवजी, जरा सांगा १०६ साठीच चर्चा चालु आहे ना?

<u>मा.सचिव</u> :- विषय एकदम स्पष्ट आहे की, १०६ साठीच चर्चा चालु आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-जसे सभागृहनेत्ता म्हणाले की चारदा शाळेने रिमाइंडर दिले. आपण तशी प्रत इथे जोडायला पाहिजे होती. म्हणुनच मी म्हणाले की, गोषवा-यात खुलासा नाही केला.

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी</u> :-मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सदस्य उल्हासनगर ५ येथे शहीद दुनिचंद कालानी ट्रस्टतर्फे प्रायमरी आणि सेकंडरी शाळा इंग्रजी आणि हिंदी माध्यमाच्या चालतात. महापालिकेची संमती आहे. मी हे मानते सदनाला पुर्ण माहिती दिली गेली नाही. ९० मध्ये ठराव झाला. जसे किशोर म्हणाले ते सुचक होते. आणि मा. सतीश चहल हे शिवसेनेचे सदस्य होते. त्यांनी हा प्रस्ताव ठराव आणला होता. ९१ मध्ये या ठरावाची अंमलबजावणी झाली. व त्यावेळी करार देखील केला होता. पी.डब्लु.डी. ठाणा विभागाचे कार्यकारी अधिकारी यांना दर निश्चित करायचे होते. त्यावेळी तात्पुरते असे ठरवले होते की, <u>५०००/-</u> रू. भरले जावे. पैसे भरून शाळा सुरू करण्यात आली. तीन वर्षांनंतर शाळेने नगरपालिका व महापालिकेला रिमाइंडर पाठविले. की दर निश्चित केले जावे. व आम्हाला मुदत वाढ देण्यात यावी. पण नगरपालिका व महापालिका तर्फे त्यांना काही उत्तर देण्यात आले नाही. त्यानंतर ॲडव्हांन्स म्हणुन ९६-९७ मध्ये संस्थेतर्फे ४,००,०००/- रू. बी.एड.व डि.एड कॉलेज तर्फे भरले गेले त्याच्या पावत्या आमच्याकडे आहेत. महापालिकेच्या फाइलमध्ये ही माहिती नव्हती. ९६- ९७ मध्ये दोन दोन लाख संस्थेने भरले त्यानंर ऐकण्यासारखी गोष्ट आहे. ९९ मध्ये आमचे नितनवरे यांनी संस्थेला पत्र लिहिले की, ९९ पर्यंतचे ४०,००० भाडे आपणांस भरायचे आहे. १.२.९९ ला हे पत्र गेले आणि १३.२.९९ ला संस्थेने ४०,००० रू.भरले. त्यानंतर जुलै मध्ये त्याच नितनवरेंनी परत पत्र पाठवले की, शाळेशी झालेल्या करारानुसार आण फक्त पाच हजार रू. भरले आहेत आपण इथे येऊन भेटा. संस्थतर्फे काही लोक आले आणि पावत्या दाखवून निघुन गेले. त्यानंतर हा रेकॉर्ड महापालिकेने पाहिला नाही.



या सर्व पावत्या संस्थेकडे आहेत. वेळोवेळी ट्रस्ट तर्फे नोटीस पाठविली आहे. ज्युनिअर कॉलेज सुरू करण्याकरिता, लिज अमाउंट आहे ते कळवावे पण महापालिकेतर्फे काही लक्ष दिले गेले नाही. तर मा.सदस्य ही एक शैक्षणिक संस्था आहे. व राजकीय मुददा नाही की, यावर राजकारण खेळावे ही माहिती देऊन विनंती करते की, संस्थेने ३० वर्षाची मुदत मागीतली आहे. ती दिली जावी कारण महाविद्यालयाची तेथे मागणी आहे त्यासाठी करार होणे खुप जरूरी आहे. तीस वर्षाची मागणी केली आहे. आपणांस योग्य वाटेल तितक्या वर्षासाठी परवानगी दिली तर आम्ही आपले आभार मानु.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- मा.महापौरजी, या संस्थेचे आजच्या तारखेत चेयर पर्सन कोण आहेत?

मा. सदस्या श्रीम. ज्योती कालानी :- हे पहा, संस्थेविषयी येथे चौकशी करणे गरजेचे नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :- ज्या संस्थेला दयायचे आहे, त्याचे चेयर पर्सन कोण आहे हे कळणे आवश्यक आहे.

मा. सदस्या श्रीम. ज्योती कालानी :- आपल्याकडे जे पत्र आले आहे, ते मुख्यध्यापकांतर्फेच आले आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-मुख्याध्यापकांना परवानगी दिली नाही जात आपण संस्थेला परवानगी देतो, ती जबाबदार व्यक्ती असते.

मा. सदस्या श्रीम. ज्योती कालानी :- मीच त्या संस्थेची चेयर पर्सन आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-आपले म्हणणे असे आहे की, संस्थेतर्फे पत्र यायला पाहिजे होते, बरोबर राजानी जी....

मा. सदस्या श्रीम. ज्योती कालानी :- वेळोवेळी जो पत्र व्यवहार झाला आहे तो संस्थेच्या सेक्रेटरी तर्फे झाला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- यांना असे माहिती पडले आहे की, मुख्यध्यापकातर्फे पत्र व्यवहार केला गेला आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-म्हणजे मुख्याध्यापकांच्या पत्रावर हा प्रस्ताव येथे आणला . एक हा मुददा.. दुसरे किशोर म्हणाले की, १९९१ मध्ये ठराव पास झाला. १९९० मध्ये ठराव पास झाला आणि १९९१ मध्ये भाडे लागू केले गेले. १०.५.९१ ते आजपर्यंत पुर्ण भाडे भरले गेले आहे?

इथे श्रीमती. ज्योती कालानी उभे राहून उत्तर देत असतांना ....

मा.सदस्य श्री. नरेंद राजानी :-भाभीजी आपण उभे राहू नका, आपण इथे चेयर पर्सन नाही, आपण कशाला चिंता करता. हा महापालिकेच्या कामकाजाचा मुददा आहे, भाभीजी.....

मा. श्री दत्ता भडकवाड (प्रभारी -आयुक्त):- पाटणकर साहेब, आजची पोझिशन सांगा.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- मा. महापौरजी शैक्षणीक मुददा आहे, पास करा, मी विनंती करतो, नरेंद राजानींना की, शैक्षणीक मुददा आहे. यावर



जास्त चर्चा करणे उचित नाही. जेव्हा भाभींनी सांगितले पैसे भरलेत चार लाख रुपये भरले आहेत, जास्तीची माहिती आपण अधिकारीकडुन घेऊ शकतो. आणि जेव्हा सात वर्षाची मुददा येतो, तेव्हा सात वर्षात का नाही घेतले गेले तेव्हा ज्योती भाभींनी सांगितले की, चार वेळा त्यांना रिमांइडर पाठवले आहे.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :- यांना जर प्रश्नोत्तरे करायचे आहे तर माझ्याशी करायला सांगा.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-मला बोलु दया. माझे बोलणे कापु नका.

मा.सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-महापौरजी, मला यांच्याशी बोलण्याची परवानगी दयावी.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-हे सर्व संमतीने मंजुर केले जावे ही माझी विनंती आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- शैक्षणिक मुददा आहे हे मला माहित आहे. पण काही नियमांचे पालन तर झाले पाहिजे ना हा मुददा आहे?उजव्या हाताचे काम उजव्या हातानेच करावे. डाव्या हाताचे काम डाव्या हातानेच करावे. नियमांचे पालन झाले पाहिजे त्याप्रमाणे आपली कार्यप्रणाली पाहिजे. तिथे जाणा-या विद्यार्थ्यांना शिक्षण न मिळो तिथे काम करणा-या शिक्षकांना पगार न मिळो अशा काही अडचणी टाकण्याचा आमचा काही उददेश नाही. जे काम होते ते नियमांच्या आधारे झाले पाहिजे ही आमची भुमिका आहे. विपक्षाला लोकशाहीने दिलेली ही भुमिका आहे की, नियमानुसार चाला. त्याआधारावरच तर विपक्ष आहे.शैक्षणिक मुददा आहे पास करा हे ठिक आहे.

श्री.पाटणकर (उपआयुक्त):-जेव्हा नगरपालिकेचा ठराव झाला होता तेव्हा भाडेतत्त्वाने देण्याचे ठरले होते. जे दर ठरणार होते ते शासनाच्या पी.डब्लु.डी. विभागाकडुन निश्चित करण्यात येणार होते. ती अमांऊंट निश्चित केली गेली नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- जर दहा वर्षात अमाऊंट फिक्स नाही केली तर ती अमाऊंट तरी फिक्स केली पाहिजे.

मा.महापौर :- मी सांगतो जो ठराव झाला होता त्यात असे लिहिले गेले होते की, नरेंदजी आपण लक्ष दया. महाराष्ट्र शासनाचे बांधकाम विभागाचे जे कार्यकारी अधिकारी आहेत. ते दर ठरवणार होते. आणि त्यानुसार चार-पाच पत्र संस्थेतर्फे आली आहेत. तरी सुध्दा महापालिकेनी त्यांना उत्तर दिले नाही. तरीपण संस्था नियमितपण भाडे पुर्व नगरपालिकेत भरत होती. जेव्हा जेव्हा त्यांना नोटीस दिली त्यांनी पैसे भरले आहेत. जे दर निश्चित करायचे आहेत ते दर शासनाचे बांधकाम विभाग निश्चित करेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- एखादी मालमत्ता जेव्हा आपण भाडेपटटयाने देतो तेव्हा दर निश्चित करूनच देतो. त्यावेळी अशात-हेने कार्यभार चालला होता. १०५.९१ ते आजपर्यंत आपण दहा वर्षात दर निश्चित नाही करू शकत आणि जवळ जवळ ६७३१प्रति चौ.फुटाची बांधलेली जमिन व १,८१८ फुटाची मोकळी जागा जर आपण कुठल्याही संस्थेला शैक्षणिक असो वा कोणतीही देतो यावर माझी हरकत नाही. आज जर आपण या संस्थेला दिले तर उदया दुस-या संस्थेने मागणी केली तर आपण देऊ शकु का? हे आपले मापदंड आहे का? एकालाही दिले दर निश्चित न करता तर दुस-यालाही दयाल का? जर हे



आपण केले तर दुस-या संस्थानी आपल्याला आग्रह केला तर शाळेसाठी जमिन दया तर आपल्याला दयावी लागेल. विषय समोर ठेऊन हे सर्व मुददे मांडावे लागतात.

मा.सदस्या श्रीमती ज्योती कालानी :- आता काही वेळापुर्वी आरक्षणात बदल करण्याविषयी चर्चा झाली. तर मी आपणांला ही पण माहिती देते की, हि जागा शाळेसाठीच आरक्षित होती आणि शाळेसाठीच दिली गेली आहे. आणि आज ही फार मोठी समस्या आपल्या समोर आहे की, शिक्षकांची, विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. सिंधी माध्यमाच्या शाळा जवळ जवळ बंद झाल्या आहेत. हे आपणांस माहित आहे. असे खुप काही या विषयावर बोलु

शकतो. ही शाळा खुप चांगल्यात-हेने चाललेली आहे. त्या शाळेत बरेच विद्यार्थी आहेत. या शाळेचा प्रगती अहवाल चांगला आहे. विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. मी सांगीतले प्राथमिक शाळा सुरू केल्या नंतर माध्यमिक शाळा सुरू केली गेली आता उच्च माध्यमिक शाळा सुरू करण्याचा विचार चालु आहे. तिथे प्रगतीच होत आहे. त्यात काही दोष नाही. माझ्यामते मा.सदस्यांनी यासाठी परवानगी दयावी. व माझ्याकडे जी माहिती आहे ती मी देण्यास तयार आहे. तुम्ही पाहिजेतर ती पहा. आणि एक विशेष गोष्ट मी बोलते दर निश्चित करण्याचा जो मुददा आहे. मी महापौरांना विनंती करते की, शासन जे दर ठरवेल. पी.डब्लु.डी. विभागाचे अधिकारी दर निश्चित करतील. आमचे साडेचार लाख रू. भरलेले आहेत. जर आमचे काही उरले तर महापालिकेने दयावे व जर आमच्याकडुन बाकी काही येणे असेल तर ते आम्ही भरू. हे आश्वासन मी देते. आणि माझी इच्छा आहे हा विषय सर्व संमतीने पारीत करावा.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> मा.महापौरजी, मी एक खुलासा करू इच्छितो जसे राजानी म्हणाले हा मुददा कोणा वैयक्तिक संस्थेचा किंवा व्यक्तीचा नाही. दहा वर्षापासुन नगरपालिका असो वा महापालिका दर ठरवू नाही शकत. पंधरा-तीस वर्षानंतर हा मुददा परत आल्यावर तुम्ही दर ठरवणार का? कधी आपण दर निश्चित करणार? आता आपण देत आहोत तर कमीत कमी दर निश्चित करून दिले पाहीजे.

<u>मा.महापौर :-</u> मी आयुक्तांना निर्देश देतो की, लवकरात लवकर दर निश्चित करून दयावेत. शासनाच्या बांधकाम विभागाकडुन दर निश्चित करून घ्यावेत. जे दर ते ठरवतील ते भरण्यास संस्था बांधील राहील. या अटीने हा ठराव मंजुर करू या.संस्थेने तीस वर्षाचा कालावधी मागीतला आहे.

इकडे काही सदस्य उभे असताना...

<u>मा.महापौर</u> :- एक मिनिट मला बोलु दया.

<u>मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :</u>-हे सर्व चुकीचे चालले आहे. सदस्यांना बसायला सांगा. विपक्ष नेत्यांना आपण बोलु देत नाही.

<u>मा.महापौर</u> :- तीस वर्षासाठी भाडेपटटयाने मागीतले आहे. रेट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट पासुन मागीतले आहे. जसे सदन म्हणाले १५ वर्ष तरी आम्ही मुदत वाढवून देऊ.

<u>मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी</u> :-महापौरजी, सदस्यांना शांत बसायला सांगा मला काही गोष्टींवर प्रकाश टाकायचा आहे. जसे भाभी ज्योती कालानी म्हणाल्या खुप शाळा बंद झाल्या आहेत. मी त्यांना विचारू इच्छिते महापालिकेचे शिक्षण मंडळ कोणाच्या अधिकाराखाली आहे. त्याचे सभापती कोण आहेत. सर्वांना माहित आहे. श्री.दादा परसराम कालानी आहेत. त्या शाळेकडे त्यांनी लक्ष



दिले नाही. या शाळेचे दहा वर्षापासुन तुम्ही भाडे नाही ठरवू शकला. शिक्षण समिती चौदा वर्षापासुन तशीच आहे. माझ्याकडे यादी आहे. यात चार सदस्य आहेत त्यातील श्री. धुनिचंद कालानी आहेत ते स्वर्गवासी झाले. एकाने राजीनामा दिला. तिस-यास डिसक्वलिफाईड केले गेले. त्या शाळा अशाच पडुन आहेत आणि भाभीजी म्हणतात की, ब-याच शाळा बंद झाल्या आहेत. याशाळा बंद होण्यास कोण कारणीभुत आहे. मी प्रश्न पण टाकला आहे. मनसुलकर म्हणाले सात वर्षाचे पन्ना वारिंगे विचारतात तीला ते विचारण्याचा अधिकार आहे. जे दहा वर्षात भाडे नाही ठरवू शकले सात वर्ष असेच बसले होते. आता अचानक मुददा आला हे प्रश्न विचारण्याचा खुलासा घेण्याचा नगरसेवकांना अधिकार आहे. मग यांनी हरकत का घेतली?

मा.सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- मी हरकत घेतली नाही. आपण पहिले नीट ऐकत जा नंतर उत्तर देत जा. माझा तसा काही हेतु नव्हता.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-हा जो प्रस्ताव आला आहे. तो ट्रस्ट तर्फे आला आहे का प्रीन्सिपल तर्फे.

मा.महापौर :-सी अपलिकेशन इज ऑन बीहाल्फ ऑफ ट्रस्ट.

मा. सदस्या श्रीमती. सुनिता राजवानी :-म्हणजे अर्ज ट्रस्टने नाही केला.

मा.उपमहापौर :- मा.महापौर, मॅडम दोन मिनिटे. जसे महापौर म्हणाले भाडे निश्चित नाही झाले ते निश्चित करण्यासाठी शासनाला सांगु. जसे पन्नाजी म्हणाल्या सात वर्षाचा जो कालावधी आहे किंवा यापुर्वीचे जी दहा वर्ष गेली तरी भाडे निश्चित केले नाही. त्यासाठी जवाबदार असणा-या अधिका-यांवर काय कार्यवाही केली जाणार. काय असेच पुढेपण चालणार? महासभेत करणार त्यावर कार्यवाही केली जाणार? की सुचना करणार? जे जे जवाबदार अधिकारी आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही करणार हे प्रथम मला सांगा? त्यांची आपण एकीकडे प्रशंसा करतो. जसे किशोर वनवारी म्हणाले इथले स्थानिक अधिकारी सक्षम आहेत. त्यांना प्रमोशन दिले जावे. परंतु या स्थानिक अधिकारीमुळेच आपल्या महापालिकेची अशी स्थिती आहे. सर्व प्रस्तांवावर महापौरांना बोलावे लागले. एक विषय डिफर करावा लागला. हा प्रस्ताव पण तसाच आहे. शाळेवर किती खर्च झाला याची माहिती नाही. अटी व शर्ती कुणाला माहित नाहीत.फक्त महापालिकेची मालमत्ता संस्थेनी मागीतली आहे. अशा दहा संस्था आपल्याकडे आल्या तर त्यांना पण आपण अशीच परवानगी दयायची का? आपण परत टाऊन हॉल विषयासारखी चुक करत आहात.

इथे काही सदस्य बोलत असताना.

मा.महापौरः-उपमहापौरांना बोलु दयावे.

मा.उपमहापौर :- जसे राजानी व लालजी म्हणाले की, इतक्या मोठ्या कालावधीसाठी महापालिकेची मालमत्ता ज्याची किंमत आज करोडो रूपये आहे. मागील दहा वर्षापासुन दिली आहे. पुढे पण देण्याचा आपण विचार करीत आहात. त्याचा फायदा लोकांना होतो नाही होत यावर नियंत्रण ठेवणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. संस्थेला काही अटी व शर्ती त्यांनी घातल्या पाहीजेत. व त्यासहीत प्रस्ताव महासभेत आणावा. अशी मी आपणांस विनंती करतो.

मा.महापौर :- मी सदनाला असे सुचवू इच्छितो की, संस्थेतर्फे तीस वर्षाचा कालावधी मागीतला गेला आहे. जे काही देणे घेणे आहे त्याला संस्था बांधील राहील. जे दर शासनाचे बांधकाम विभाग ठरवेल ते ते फेडतील. तीस वर्षासाठी



जर सर्व संमतीने मंजुर केले तर बरे होईल. शैक्षणिक फायदा होईल. हे चांगले पाऊल आहे असे माझे सदनास निवेदन आहे.

मा.उप-महापौर :- महापौरजी, मी असे म्हणालो की, दहा वर्षाच्या कालावधीत दर निश्चित केले नाही, तर याला जवाबदार असणा-या अधिका-यांवर आपण काय कार्यवाही करणार?

मा. महापौर :- जवाबदार अधिकारींवर उचित कार्यवाही केली जाईल. सदर ठराव सर्वसंमतीने पास करायचा की, बहुमताने?

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :- किती वर्षासाठी?

मा. महापौर :- तीस वर्षाचा कालावधी संस्थेने मागितला आहे. सात वर्ष तर गेली, शैक्षणिक बाब आहे. माझे निवेदन आहे, तेवढा कालावधी दयावा.

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :- सात वर्ष तर मान्यता घेतली नाही, तीन वर्षाची घेतली होती, दहा वर्ष अशीच झाली. परत टाऊन हॉल सारखे परिणाम होतील.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसूलकर :- सारखे सारखे टाऊन हॉल-टाऊन हॉलचा उदाहरण कशाला देता? तयारी एवढीच झाली का?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते , ते समजत नव्हते.

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :- मनसूलकर आम्ही तशी तर तयारी खूप करुन आलो होतो, विदयार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे , तुम्हाला तयारी पाहिजे तर आम्ही विरोध करतो, या माझयाशी प्रश्न उत्तरे करा. या ना? विदयार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे, नाही तर तुम्हाला तयारी दाखविली असती.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :-मा. महापौर, सदर प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :-आम्ही विरोध करतो ज्याचे भाडे निश्चत नाही झाले तो प्रस्ताव सभेत आणतात.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमानी :- मा. महापौर , विपक्ष सर्वसंमतीने जर ठराव मंजूर करत असेल तर करुन घ्या.

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :-तुमचे कॉग्रेस गट नेता म्हणतात, तयारी करुन येतात, आम्ही कशाला तयार होऊन येऊ. आपले प्रपोजल चुकीचे आहे.हि सुनिता राजवाणी रात्री दिड वाजता जरी बोलाविले तरी आव्हान स्विकारायला तयार आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी सर्वांना विनंती करतो की, शांत बसा, कूणा सदस्यांचे मन दुखावले असेल तर मी क्षमा मागतो. हा शैक्षणीक मुददा आहे, मेहरबानी करुन सर्वसंमतीने पास करावा.



मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :-शैक्षणीक मुददा आहे, म्हणून आम्ही तीन वर्षाची परवानगी दिली, पण हे आम्हाला आव्हान करतात. मनसूलकरांना माहित नाही आम्ही आधीच तयार असतो. वुई आर ऑलवेज प्रिपेअरड. तुम्हाला कोणत्त्या प्रश्नाचे उत्तर हवे आम्ही दयायला तयार आहोत. उठा विचारा प्रश्न .. सुनिता राजवानीला आव्हान देऊ नका. विशेष करुन कायदयाच्या बाबतीत.

हि सुनिता राजवाणी रात्री दिड वाजता जरी बोलाविले तरी आव्हान स्विकारायला तयार आहे.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसूलकर :- विषय उगाच वाढवू नका.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते, ते समजत नव्हते.

श्रीमती.राजानी भारती ,जोनिता मटाई , आशा राधवानी ,रामचंद्र पारवानी हे सदस्य / सदस्या सभागृहातून बाहेर पडले / पडल्या.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- मा. महापौर, यांनी उगाचच आव्हानची गोष्ट काढली आव्हान देण्यासारखे काही घडले ही नाही आहे. जर लोकशाही मध्ये हे बोलू शकतात तर आम्ही पण बोलू शकतो.

श्री. राजु सोनावणे, इंदु भठिजा, गोप बहरानी ,बेबी वसीटा ,जयकुमार केणी हे मा.सदस्य / सदस्या सभागृहातून बाहेर पडले / पडल्या.

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :- तुम्ही आम्हाला आव्हान करतात.
मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- तुम्ही चॅलेंज स्विकारु इच्छितात तर आम्ही काय करणार?

मा. सदस्या श्रीम. सुनिता राजवानी :- मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :- घ्या-घ्या मतदान घ्या.

मा. सचिव :- जे हया ठरावाच्या विरोधात आहे त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरूध्द मत:-

१. श्री.भुल्लर राजेंद्र विरसिंह
२. श्रीमती.सोनावणे यमुना
३ श्रीमती.वेलकर सुरेखा
४ श्री. भांडे भगवान
५ श्री. तेजी कैलास
६ श्री. बोडारे धनंजय
७ श्री.चौधरी राजेंद्र
८ श्री. लांडे पांडुरंग
९ श्रीमती.ससाणे लक्ष्मीबाई
१० श्रीमती.सुनिता राजवानी
११ श्री. मोरे भिमसेन
१२ श्री. चव्हाण रमेश
१३ श्री. महाडिक प्रकाश
१४ श्री.उमाप रामदास
१५ श्री. जग्यासी राजु
१६ श्री. माखिजा प्रकाश
१७ श्री. राजानी नरेंद्र
१८ श्रीमती.आशा जेस्वानी



मा.सचिव :- व जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने :-

१ श्रीमती.ज्योती कालानी
२ श्रीमती. मिनु दासानी
३ श्री.टाले प्रमोद
४ श्री.वाधवा गिरधारी

५ श्री.तलरेजा विनोद
६ श्रीमती.वनवारी मोना
७ श्रीमती.कुंदनानी लविना
८ श्री.किशोर वनवारी
९ .श्री. यादव नरेश
१० श्रीमती.टेकचंदानी चंदा
११ श्रीमती.प्रवार पंचशिला
१२ श्रीमती.बगाडे सुनिता
१३ श्री.आढाव रामभाऊ
१४ श्री.मोरे भानजी भिकाजी
१५ श्रीमती.करोतिया मालती
१६ श्री.पुरस्वानी जमनु
१७ श्री.पंजाबी नारायण
१८ श्री.आयलानी कुमार
१९ श्री.वाघे शामु
२० श्री.ढेणववाल बनवारी
२१ श्री.ठाकुर सेवलदास
२२ श्री. वेहरानी ठाकुर
२३ श्रीमती.साधवानी जया
२४ श्री. मन्सुलकर सुभाष
२५ श्रीमती.गजवानी कांता
२६ श्री.रामरख्यानी मोहनदास
२७ श्री.माखिजा हरदास
२८ श्री.देवेंद्रसिंग दर्शनासिंग खेमाणी
२९ श्री. गुप्ता प्रभुनाथ
३० श्री. रोहडा श्यामसुंदर
३१ श्री.प्रमनानी ईश्वर

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- सचिव साहेब, पार्टिवाईज मतमोजणी का करता? भिती वाटते का कोर्टात वगैरे विषय जाईल. आधिच्या ठरावात तुम्ही अशी मतमोजणी नाही केली.

मा. सचिव :- या करीता की तुम्हाला मतमोजणी माहिती पडावी. एकुण १८ ...

मा. महापौर :-सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर-५, येथील आरक्षण क्र.१०६ मधील शहीद दुनिचंद कालानी मेमोरियल ट्रस्ट या संस्थेस भाडे पटट्यावर देणेबाबत.

--७०--

प्रस्तावना :-

ज्याअर्थी उल्हासनगर -५ येथील मंजुर विकास आराखड्यातील आरक्षण क्र.१०६ मधील महापालिकेची जागा शहीद दुनिचंद कालानी मेमोरियल ट्रस्ट या संस्थेस प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची शाळा चालविणे कामी यापुर्वीचे नगरपालिकेच्या ठराव क्र.५६९ दिनांक २१.१२.९० अन्वये तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपटट्याने देण्यात आली होती.

त्याअर्थी सदर संस्थेस दि.१३.९.९१ च्या भाडेपटट्याच्या करारानुसार सदरच्या जागेचा वापर करण्याचा हक्क संस्थेस देण्यांत आला, त्यामुळे करारानुसार भाडेकरू यांना रू.५०००/- सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन आगाऊ भरायची होती. तसेच प्रतिमहा घ्यावयाची भाडेपटट्याची रक्कम शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन निश्चित करून घेणे आवश्यक होते. परंतु पुर्वीचे नगरपालिकेचे संबंधित अधिकारी / मालमत्ता व्यवस्थापक

यांनी भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करण्याकामी काहीही पावले उचलली नाहीत. तसेच दि.१२.९.९४ रोजी ३ वर्षाच्या भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर संबधित विभागाच्या अधिकारी किंवा कर्मचा-यांनी भाडेपट्टयाच्या मुदतीचे नुतनीकरण करण्याची पावले उचलली नाहीत.

तसेच प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, सदरच्या संस्थेने भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करणे तसेच भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणे बाबत नगरपालिकेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही नगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांने त्याकडे लक्ष पुरविले नाहीत.

दि.१.२.९९ रोजी मालमत्ता व्यवस्थापक यांनी सदर संस्थेस रू. ४०,०००/- भरण्याबाबतचे पत्र दिल्यानंतर सदर संस्थेने दि.१२.२.९९ रोजी या रक्कमेचा नगरपालिकेस भरणा केला असे दिसते. तसेच यापूर्वी १९९६ व १९९७ मध्ये भाडेपट्टयापोटी संस्थेने एक-एक लाख रूपयांची तदर्थ रक्कम जमा केल्याचे कार्यालयीन दस्तऐवजांवरून दिसुन येते. या व्यतिरिक्त २५ फेब्रुवारी २०००रोजी मालमत्ता व्यवस्थापक यांनी सदर संस्थेस लिहिलेल्या पत्रात, आपण जर काही भरणा केला असेल तर त्याची पावती घेऊन यावी असे बेजबाबदारपणे पत्र लिहिले आहे.

भाडेपट्टयाच्या कराराचे ३० वर्षासाठी नुतनीकरण करण्याबाबत दि. ११.१२.२००० रोजी सदर संस्थेकडुन जेव्हा प्रस्ताव प्राप्त झाला तेव्हा या प्रकरणी मालमत्ता व्यवस्थापक / संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचा यापूर्वीचा निष्काळजीपणा उघडकीस आला आहे.

महापालिकेची सदरची जागा शिक्षणाचे प्रयोजनासाठी महापालिकेमध्ये निहित आहे. आणि ही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी धारण करण्यांत आलेली आहे त्यास बाध होणार नाही अशा रितीने शहीद दुनिचंद कालानी मेमोरियल ट्रस्ट या संस्थेस खालील अटी व शर्तीवर तीस वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्याचे प्रस्तावित आहे.

भाडेपट्टयाची मुदत तीस वर्षाची राहिल व ती दि.१३.९.९१ पासुन सुरू होत असल्याचे मानले जाईल.

१. सदर जमिनीचे वार्षिक भाडे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे किंवा सहाय्यक संचालक नगररचना ठाणे, यांचे कडुन सहा महिन्याच्या आत निश्चित करून घेणे ही जबाबदारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नगररचनाकार व मालमत्ता व्यवस्थापक यांची संयुक्तपणे राहील.



२. संबंधित विभागाकडुन भाडे निश्चित नंतर ते भाडे दि.१३.९.९१ पासुन लागु करण्यात येईल व ते भाडेपट्टयाच्या निश्चितीच्या तारखेपासुन सुरू होऊन प्रत्येक वर्षाच्या आगाऊ म्हणजे सुरवातीस दयावे लागेल. तसेच दि.१३.९.९१ पासुन भाडे निश्चितीच्या तारखे पर्यंतचे सर्व भाडे ट्रस्टने एकाचवेळी भरणे आवश्यक राहील. किंवा हि रक्कम समायोजित रक्कमेपेक्षा कमी असेल तर ती समायोजित केली जाईल. जर ही रक्कम जास्त असेल तर ट्रस्ट कडुन वसुल करणे बंधनकारक राहील.

३. ज्या उपयोगाकरिता जागा भाडयाने दिली असेल त्याजागे मध्ये काही दोष असेल तर तो महानगरपालिकेने भाडेकरूच्या नजरेस आणला पाहिजे.

४. महानगरपालिकेने जोपर्यंत ट्रस्ट वेळोवेळी भाडे देत असेल व इतर अटींचे पालन करत असेल तोपर्यंत ट्रस्टच्या वापराला अडथळा आणता कामा नये.
५. ट्रस्टला त्यांचा भाडेपट्टयाचा हक्क हक्कांतर करण्याचा अधिकार आहे. मात्र त्यामुळे त्यांची भाडे देण्याची जबाबदारी संपुष्ठात येणार नाही.
६. ट्रस्ट ने भाडे वेळच्यावेळी भरले पाहीजे.
७. भाडेपट्टा संपल्यावर ट्रस्ट ने सदरच्या जागेसह त्या जागेवर स्वखर्चाने बांधलेली इमारत महापालिकेस परत केली पाहिजे.
८. जागेसंबंधी कोणी दावा केल्यास अगर या जागेवर अतिक्रमण केल्यास त्याची माहिती महापालिकेला दिली पाहीजे.
९. भाडेपट्टयाच्या खतात अशी स्पष्ट तरतुद करण्यात येईल की, सदर जमिनीवर महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे कोणतीही इमारत बांधण्याचा ट्रस्टला हक्क राहील.
१०. भाडेपट्टयाची मुदत संपल्यावर अगर तो अन्य कारणाने संपुष्ठात आल्यावर सदर जमिनीवर रस्ते बांधलेली इमारत ट्रस्ट त्वरीत महापालिकेस हस्तांतरीत करेल. तसे न केल्यास तीवर ट्रस्टचा काहीही हक्क राहणार नाही.
११. सदर भाडेपट्टा देण्याला व त्याचे खत नोंदण्याला शासकीय किंवा अर्धशासकीय खात्त्याची अगर अन्य अधिका-यांची परवानगी लागत असेल,तर ती महानगरपालिकेने भाडेपट्टा सुरू होण्यापूर्वी घेतली पाहीजे.
१२. सदर जमिनीसंबंधीचे सर्व कर वगैरे भाडेपट्टयाच्या खात्त्यावर स्वाक्ष-या झाल्याच्या तारखेपासुन ट्रस्टला चुकते करावे लागतील.
१३. सदर जमिनीचा मालकी हक्क महानगरपालिकेकडे राहील.
१४. भाडे निश्चिती नंतर पूढील वर्षासाठी भाडे खत तयार करण्यात येईल व भाडेपट्टयाची या करारापासूनच सुरवात झाली आहे असे समजण्यात येणार नाही.
१५. सदर जागे संबंधी महापालिकेला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ अनुसार सर्व अधिकार वापरता येतील.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २९</u> <u>दि:-२०.१२.२०००</u>.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. सुभाष मनसुलकर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील मंजुर विकास आराखडयातील आरक्षण क्र.१०६ वरील महापालिकेची जमिन शहीद दुनिचंद कालानी ट्रस्ट या संस्थेस वर नमुद केलेल्या अटी व शर्तीवर आणि त्या व्यतिरिक्त आवश्यक वाटल्यास आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर व



भाडेपट्टयाचे निश्चितीस अधिन राहून तीस वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यास मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त निष्काळजीपणामुळे संबंधित गैरजबाबदार अधिकारी व कर्मचा-यांविरूध्द रितसर चौकशी करणे व जबाबदारी निश्चित करण्यास आयुक्तांना निर्देशित करीत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> एक आयत्त्यावेळचा विषय आहे. किर्लोस्कर योजनेबाबत आहे तो एक्झीक्युट करायचा आहे. आपण सर्वांना तशी माहिती दिली आहे.

<u>काही सदस्य</u> :- पास . पास.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :</u>- मला काही बोलायचे आहे.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> जर यावर चर्चा करायची असेल तर सभा स्थगित करा. आठ वाजलेत आता.

<u>मा.सदस्य श्री. भिमसेन मोरे :-</u> आपल्या सदस्यांना जायची घाई आहे. आमचे सदस्य चर्चा करू इच्छितात.

(श्री. जमनादास पुरस्वानी, श्रीमती. कांता गजवानी व श्री.कुमार आयलानी हे सदस्य /सदस्या सभागृहातून बाहेर पडले/पडल्या.)

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- हा विषय सात दिवसापुर्वी कार्यसुचीवर आणला पाहिजे होता. इथे लिहिले आहे की, मा.तिवारी यांच्याशी ३ डिसेंबर ला मिटिंग झाली. आपण आधी एका विषयात असे सांगीतले होते की, बारा तारखेला नोटीस निघाली. जर ३ तारखेला मिटींगमध्ये विषय निश्चित केला जातो तर कमीत कमी बारा तारखेला तो कार्यसुचीवर आला पाहिजे.
<u>मा.महापौर</u> :- पंजाबी साहेब, हा विषय काल माझ्यासमोर आला होता. १२ तारखेला तिथे सभा झाली होती.
<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :- महापौर, इथे ३ तारीख लिहिली आहे.

<u>मा.महापौर</u> :- ३ तारखेला मुंबईला मिटींग झाली असेल.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी</u> :-जर ३ तारखेला सभा झाली आहे तर १२ तारखेच्या कार्यसुचीवर विषय यायला पाहिजे होता.
<u>मा.महापौरः-</u>आम्हाला कालच महापालिकेला इंटीमेशन मिळाले आहे.

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-</u> ठिक आहे. परंतु हा जो टप्पा आहे तो दुसरा आहे. जेव्हा तो आपल्या समोर येतो तेव्हा मनात येते की, आम्ही मोठ्या आशेने इथे



पहिला टप्पा पास केला तो १८.८० कोटीचा होता. तेव्हा आम्ही इथल्या जनतेला चांगले स्वप्न दाखवले होते की हा प्रकल्प एका वर्षात पुर्ण होईल. पुर्ण शहरात पाईप लाईन पसरतील. भरपुर पाणी मिळेल पाण्याचा प्रश्न सुटेल. आज शहरात फिरताना आपण पहातो की, पहिल्या टप्प्याची स्थिती इतकी खराब आहे की दया येते.अडिच तीन वर्षानंतर देखील तो टप्पा पुर्ण नाही झाला. यापुर्वी पण हा विषय महासभेत आला होता व मी महापौर म्हणुन आपल्यालाही आग्रह केला होता की, याचा पहिला टप्पा पुर्ण का होत नाही. हा जो मुददा आहे यासंबंधी मंत्री महोदयांशी चर्चा करा. कारण की पहिला टप्पा अतिशय महत्त्वपुर्ण आहे आणि आपण अजुनही लक्ष दिले नाही, लोकांना असेच स्वप्न दाखवत राहीलो. फक्त कागदोपत्रीच आपले प्रकल्प राहतील त्यावर अंमलबजावणी होणार नाही. तर संबंधित अधिका-यांनी सांगावे की पहिला टप्पा जो आम्ही मंजुर केला होता त्याची जी अवस्था आहे ती कशी आहे. काम कधी पुर्ण होणार? त्याविषयी आम्हाला आधी माहिती पाहिजे.

श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि.):-पहिल्या टप्प्यातील १८८० कोटीची जी योजना आहे त्यात आठ टाक्या आहेत. त्या भरण्यासाठी लागणा-या पंपींग स्टेशनचा पण त्यात समावेश आहे. म्हणुन दुसरा टप्पा मागे राहिला आहे. हे पण त्याचवेळी व्हायला पाहिजे होते. समजा फक्त टाक्या ठेवल्या व त्या विभागात लोकसंख्येप्रमाणे पाईपलाईन नसतील तर पाण्याच्या टाकीतून निघणा-या पाईपलाईपन ६०० डायमीटरच्या असतील आणि पाईप लाईन तीन-चार इंचाच्या असतील तर ही जी पाणी वाटप योजना आहे. ही दुस-या टप्प्याची आहे म्हणुन हा प्रस्ताव ठेवला आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आम्हाला ही माहिती पाहिजे की, पहिल्या टप्प्यातील योजना कुठपर्यंत पाहोचली? किती टाक्यांचे काम चालु आहे? किती कामे पुर्ण झाली आहेत? ही सर्व माहीती आम्हाला दया.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि) :- पाहिल्या टप्प्यातील कामाचे सुपरविझन महाराष्ट्र जीवन प्राधीकरण करत आहे. परंतु यात आठ टाक्या आहेत. रमाबाई टेकडी येथील टाकीचे काम सुरू होणे बाकी आहे. आणि चौपडा येथील जलतरण तलावाच्याबाजुला त्याला जागा दिली आहे. व त्याचा पाया टाकला गेला आहे. बाकी इतर सहा टाक्यांचे काम चालु आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :-सहा टाक्यांचे काम किती टक्के पुर्ण झाले आहे. ५० टक्के ६० टक्के आणि कधी पर्यंत काम पुर्ण होण्याची शक्यता आहे.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- दशहरा मैदानाची टाकीचे काम चालु आहे.टाक्यांची कामे ३० टक्के झाली आहेत. आणि पाईप लाईनची कामे ५० टक्के झाली आहेत.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- हा कार्यक्रम केव्हा पर्यंत पुर्ण होण्याची शक्यता आहे?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि) :- पहिल्या टप्प्यांची कालमर्यादा नोव्हेंबर २००१ पर्यंत आहे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- कधी पर्यंत पुर्ण होणार?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- २००१ नोव्हेंबर पर्यंत पुर्ण होईल.

मा.महापौर :- त्यांना नोव्हेंबर २००१ पर्यंत पुर्ण करायचे आहे. माझ्यामते त्याप्रमाणे काम चालु आहे. जास्तीत जास्त डिसेंबर पर्यंत पुर्ण होईल. पंजाबी साहेब

--७४--

माझ्यामते हे काम चांगल्या त-हेने होत आहे. असे नाही की ते काम खोळंबले आहे. मध्ये थोडी निधीची समस्या होती तेव्हा काम मंदगतीने होत होते. पण आता परत तेज गतीने काम चालु आहे. आपण जर दुस-या टप्प्याला मंजुरी दिली तर शहराचे हित होईल.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- आम्ही विरोध नाही करत, पहिल्या टप्प्यातील कार्यक्रम हा योजनेनुसार झाला पाहिजे. याकरिता आपण आयुक्त, उपमहापौर यांनी याकडे लक्ष दिले पाहिजे की, दिलेल्या कालमर्यादेत हे काम पुर्ण झाले पाहिजे.

मा.महापौर :- बरोबर.

मा. उपमहापौर :-राजानी साहेब मला बोलु दया.

*__मा.सदस्य श्री. नरेश यादव__ :- पंजाबी कॉलनी येथील टाकी दहा वर्षापासुन बंद आहे ती का नाही भरली जात.*

*__श्री. दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त) :-__ पहिला टप्पा पुर्ण झाला की, जसे परवा महापालिकेचा काही दोष नसताना कॉलराची साथ आली व आम्हा महापालिकेवर डाग लावला गेला.एम.आय.डी.सी तर्फे त्यामध्ये क्लोरीन मिसळले नव्हते गेले त्यावेळी सचिवांसमोर हा मुददा उपस्थित केला गेला होता की, उल्हासनगरच्या जितक्या पण ग्राहक पाईप लाईनी आहेत त्या खुप जुन्या झाल्या आहेत, गंजल्या आहेत त्यामुळेही पाणी दुषित होते. पहिला टप्पा पुर्ण होई पर्यंत आपण दुसरा टप्पा नाही घेतला तर पहिल्या टप्प्याला काही अर्थ रहत नाही. सचिवांनी दिलेल्या सुचनेनुसार आम्ही दुसरा टप्पा आपणांसमोर आणला आहे. मला असे वाटते की पहिला टप्पा प्रयत्न करून आम्ही लवकर पुर्ण करू. व यास मान्यता देऊन पाणी पुरवठयाबाबत लोकांची जी तक्रार आहे ती दुर होईल म्हणुन हे मंजुर करावे अशी आयुक्त म्हणुन मी आपणांस विनंती करतो.*

*इथे श्री.बी.बी.मोरे बोलायला उभे असताना...*

*__मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-__मला बोलु दया. तुम्ही मला नेहमीच थांबवता. आधी मी परवानगी घेतली आहे.*

*__मा.महापौर :-__ राजानीजी तुम्ही नेहमी बोलता जरा सत्ताधारी पक्षांना बोलु दया.*

*__मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-__मी आपली परवानगी घेऊन बोलत आहे. आधी आयुक्तांनी बसविले आता मोरेजी, बसवत आहेत.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-__ सन्माननिय महापौरजी, आजचा जो विषय खुप चांगला आहे. म्हणजेच शहराच्या विकासाचा आहे. व आज पाण्याच्या समस्ये बाबत विषय आहे. याविषयाबाबत आमचे जे विपक्ष आहेत त्यांचे पण मत व्हावे असे आहे. असे नाही पण आता श्री.ध्रुत साहेबांनी सांगीतले की टाकीचे काम चालु आहे. मी सदनासमोर महापालिकेच्या अधिकारींना व महापौरांना विनंती करतो की, जसे सहा टाक्यांची काम जलद गतीने चालु आहेत तसेच रमाबाई आंबेडकर नगर आणि चौप्रा कोर्ट येथील देखिल टाक्यांचे काम लवकरात लवकर सुरू केले पाहिजे. ज्याकाही अडचणी आहेत त्या सारून लवकर काम सुरू केले जावे. दुसरी गोष्ट आजचे आमचे आयुक्त साहेब, वारंवार म्हणत आहेत की, या शहराला डाग लागला, कॉलरा झाला हेता. आम्ही काम केले. आतापण ते म्हणाले.*

*__श्री.दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त)__ :- मोरे साहेब, प्लीज मी आपणांस व्यत्त्यय आणत आहे. आपण नीट ऐकत नाही. मी असे म्हणालो की, एम.आय.डी.सी*



*वाल्यांनी चुकी केली पण आपल्याला दोष दिला की महापालिकेची पाईप लाईन खराब आहे.*

*__मा.सदस्य श्री.बी.बी.मोरे :-__ मी तेच म्हणत आहे. कॉलरा आत संपला आहे. आता तो विषय परत काढू नये. सुभाष नगर मध्ये जी मिटींग झाली त्यात पण मी सांगीतले की कॉलरा कोणत्त्या मौसमात येतो. तो पावसाळयात येतो . व पाण्याची जी लाईन बदलली गेली नाही याला जबाबदार कोण? याची जबाबदारी महापालिकेवर येते परंतु परत परत ते बोलणे योग्य नाही. म्हणुन पाण्याचा हा प्रश्न आहे लवकरात लवकर मंजुर करा. जसे महापौर म्हणाले तसे जलदगतीने काम झाले पाहिजे. तसेच आमचे जे दोन टाक्यांचे काम आहे ते पण लवकर झाले पाहिजे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-तसे पाहता जितके पण सदस्य आहेत ते ऐकण्याच्या स्थितीत नाही आहेत. मी मानतो की सर्वांचा इशारा हाच आहे की सभा लवकर पुर्ण करावी. पण मी दोन शब्द बोलतो. पहिल्या टप्प्यातील योजनेत आठ टाक्यांचे काम होते. १४ कोटी तर एल.आय.सी. चे लोन होते केंद्र सरकार तर्फे. महाराष्ट्र शासनाकडुन ४ कोटीचे अनुदान मिळाले. दुस-या टप्प्यातील किती कर्ज व किती अनुदान आपल्याला मिळाले.*

*<u>श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि)</u> :- किर्लोस्कर कंसल्टंनीने आधी सर्व्हे केला होता त्याला अपग्रेट करून करंट रेटने एस्टीमेंट तयार केले आहे. जेव्हा योजनेची किंमत वगैरे निश्चित केली जाईल. आर्थिक बाब दाखवली जाईल. त्यासाठी परत ठराव आणला जाईल.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-१८ कोटी मधुन किती कोटीचे काम झाले आहे. महाराष्ट्र सरकारने दिलेले अनुदान आपल्याकडे किती कोटी आहे.*

*<u>श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि)</u> :- अनुदानाचे डिटेल्स हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-आपण दुस-या टप्प्याचा विषय इथे आणला आहे. आयुक्तजी कॉलराचा विषय आहे. आपण तीन महीने अजुन आहात म्हणुन आपले नाव संबोधितो.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड(प्रभारी आयुक्त)</u> :-तीन महीन्यांची चिंता मला नाही. मी डेप्युटी कलेक्टर आहे, मी तिथे डेप्युटी कलेक्टर म्हणुनच जाणार तलाठी म्हणुन नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी</u> :-आपण जिथुन पाणी घेतो. म्हणजे आपल्या पाण्याचा जिथुन उगम आहे तेथे एक दुषित नाला आझाद नगर वरून वाहतो तिथुन येणारा एक प्रवाह नेहमी पाण्याला दुषित करतो. त्यासाठी यावर्षाच्या अंदाजपत्रकात नाला वळवणे साठी तरतुद पण केली आहे. तिचा वापर कॉलरासाठी पण झाला पाहिजे.दुस-या टप्प्यास कॉलराशी जोडणे आवश्यक नाही. कॉलराचे निर्मुलन करण्यासाठी श्री.तिवारी सचिव येऊन १५ लाख रू. अतिरिक्त बजेटच्या आधारे त्यांच्याकडुन देत आहेत. परंतु दुस-या टप्प्यात आपल्याला किती कर्ज घ्यायचे आहे यावर विरोध कोणी करणार नाही. आमची ही इच्छा आहे की किर्लोस्कर योजना त्वरीत कार्यान्वित व्हावी. ८४ ला तयार केलेला अहवाल अजुन अंमलात नाही आणला.तीन वर्षापुर्वी किर्लोस्कर निधी मंजुर झाला आहे अजुन तो पुर्ण नाही झाला. किर्लोस्कर कंन्सल्टंसीचे जे काम महाराष्ट्र जीवनप्राधीकरण कडे आहे त्यास आपला एखादा खास अभियंता त्यासाठी नियुक्त केला जाईल. दर महिन्याच्या सभेत त्यांनी प्रगती*



*अहवाल दिला पाहिजे की, हे काम कुठपर्यंत पोहोचले? कित्त्येक महिने गेले अजुन पाईप लाईनचे काम पुर्ण नाही झाले.टाक्यांची कामे पुर्ण नाही झाली. दुसरा टप्पा जो आपण सुरू करणार आहोत त्याचे कर्ज यायला व काम पुर्ण व्हायला अजुन दोन वर्ष लागतील. जर अश्याच गतीने आपण काम करत राहीलो तर या योजनेचा शहराला काहीही फायदा होणार नाही. दुसरे असे की, आपल्याला पाण्याचा उगम निर्माण करायचा आहे. कोणत्त्या जागेवर तो आपण निर्माण करणार? आपण असा अचानक दत्तक घेतात त्याप्रमाणे आपण आयत्त्यावेळचा विषय आणता आणि पास करा असे म्हणता. आम्ही मानतो की हा विषय आवश्यक आहे. परंतु यावर चर्चा तर झाली पाहिजे की दुस-या टप्प्यात काम काय आहे? आपणास माहित आहे दुस-या टप्प्यात आपणाला पाण्याचा उगम निर्माण करायचा आहे. तो उगम तुम्ही कुठे निर्माण करणार?*

*<u>मा.महापौर</u> :-आपल्याकडे जे आहे त्यात किती किलो मीटर नविन पाणी वाटप लाईन शहरात टाकल्या जातील. शहरातील पाणी वाटप योजना व्यवस्थित*

करण्यासाठी दुसरे असे की, पाणी पुरवठा व वाटप करणा-या ज्या लाईनी खराब झाल्या आहेत. त्यांना दुरूस्त करण्यासाठीपण दुस-या टप्प्यात तरतुद आहे. तिसरे आठ इ.एस.आर अजुन बनवले जातील. मी पाणी पुरवठा अधिका-यांना बोलावुन विचारले होते की, आठ या नव्या आहेत की, पहिल्या टप्प्यातील मिळून आहेत. ते म्हणाले की, या नवीन आहेत. म्हणजे एकुण सोळा रिझर्व्ह वायर असतील.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-आणि पाण्याचा उगम कुठून करणार?

मा.महापौर :-सोर्स ऑफ वॉटर रिमेन सेम.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-एम.आय.डी.सीच्या सोर्सशी आपण आपला उगम जोडणार आहेत का?

मा.महापौर :- मला असे नाही वाटत की असे योजनेत आहे.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-धुत साहेब, याचे किती टप्पे आहेत, तीसरा चौथा पण आहे का? दुस-या टप्प्यात उगम करण्याविषयी आहे की नाही. कोणी मला उत्तर देईल?

मा.महापौर :- आय डोन्ट थींग देयर इज सोर्स ऑफ वॉटर.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-मला व्यवस्थित उत्तर हवे आहे.

मा.महापौर :-सोर्स रिमेन्स द सेम.

मा.सचिव :- इट इज ऑनली फॉर डिस्ट्रीब्युशन परपझ.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :- तुम्हाला नक्की माहित आहे. खात्री आहे.

मा.सचिव :-सोर्स नाही यात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-धुत साहेब, महापालिका सचिव साहेब सांगत आहेत. सोर्स नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- जे नविन रोड झाले आहेत त्यांच्या आजुबाजुला पाणी वाटपासाठी खोदकाम करणार?



मा.महापौर :- राजानी आपण धुत साहेबांना गोंधळात टाकु नका.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :- आपल्याकडे पाण्याचा उगम नाही आहे त्यांचे म्हणणे बरोबर आहे.

मा.महापौर :- बरोबर आहे. पाण्याचा उगम असला पाहिजे. सोर्स आपल्या होण्यासाठी महापालिकेकडे कमीत कमी दिडशे ते दोनशे करोड रू.ची तरतुद करावी लागेल.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-किर्लोस्कर कंन्स्टंसी हॅज रिकमंडेट धीस ऑलसो की, आम्हाला आमचा उगम पाहिजे. तसा अहवालात आहे.

मा.महापौर :- आहे पण दुस-या टप्प्यात याविषयी काही नाही.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-तिसरा फेस आहे काय?

मा.महापौर :- मला नाही वाटत.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-तुम्हाला वाटत नाही असे म्हणुन चालणार नाही.

मा.महापौर :- ५६ करोड रू.ची योजना होती. तर हे १८ आणि ३८ करोड मिळुन पुर्ण होतात.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-हे तुम्ही एकदा नक्की करा.

मा.महापौर :- इट वॉज ऑनली फॉर डिस्ट्रीब्युशन सिस्टम ॲन्ड कंन्स्ट्रक्शन ऑफ इ.एस.आर.

मा.सदस्य श्री. नरेंद्र राजानी :-एकदा तुम्ही परत नक्की करा.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- महापौरजी, आज जितके पण ठराव पास झालेत त्यावर त्वरीत अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :- महापौरजी, मी एक वाक्य फक्त बोलु इच्छितो की, आपण बघतो की जेव्हा सभा संपते तेव्हा तुम्ही पहाल किती सदस्य बसलेले असतात. हे चांगले दिसत नाही वाईट गोष्ट आहे व सात वाजुन जातात. महिला नगरसेविका व इतर सदस्य निघुन जातात. आपल्या सर्वांवर ही जवाबदारी आहे. सात नंतर ते बसु नाही इच्छित. तर सभा ४.०० वाजता ऐवजी ३.०० वाजता बोलवा म्हणजे सर्व सदस्य बसतील. ही एक सुधारणा करा.

मा.महापौर :- यात हरकत घेण्यासारखे काही नाही.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- महापौरजी,चर्चा कमी झाली पाहीजे.

सर्व सदस्य :- पास.पास.

--७८--

मा.महापौर :- सदरचा ठराव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषयः-

विषय :- सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे तर्फे राबविण्या
कामी मान्यता देणे बाबत.

उल्हासनगर शहर हे अत्यंत जुने शहर म्हणुन ठाणे जिल्हयात ओळखले जाते. सन् १९४८ पूर्वी येथे लष्करी छावणीचे स्वरूप होते व त्या वेळेस सदर शहरास बदलापुर येथुन हेडवर्क मधुन पाणी पुरवठा होत होता. कालांतराने सदर शहराचे लष्करी स्वरूपातील बदल होऊन त्या जागी रहिवासी स्वरूप प्राप्त झाले. वेळोवेळी म्हणजे सन् १९६७ व सन् १९८१ मध्ये येथील लोकसंख्येच्या वाढीमुळे पाणी पुरवठ्याच्या योजनेत किरकोळ सुधारणा करण्यात आली.

सदर उल्हासनगर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून दिनांक१९.१२.१९९४ रोजी महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यात आली. उल्हासनगर शहर हे उंच सखल भागात विभागले असल्याने, शहरास आहे त्या स्थितीत सम प्रमाणात पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. त्या करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत किर्लोस्कर कन्सलंटसी यांच्या सहाय्याने सुधारित पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आली. त्यामधील पहिला टप्पा रक्कम रू. १८.८० कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे तर्फे सुरू करण्यात आला आहे. सदर टप्पा-१ योजनेत शहराच्या विविध भागात आठ उंच टाक्या बांधणे तसेच मुख्य जलवाहिन्या टाकण्यात येत आहेत व त्या अंतर्गत जवळपास ५० टक्के काम पुर्ण झाले आहे.

उल्हासनगर शहराची वितरण व्यवस्था अत्यंत जुनी झाली असल्याने तसेच खुप ठिकाणी सडली व गंजली असल्याने व हया कारणाने दुषित पाण्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने त्यावर वारंवार दुरूस्ती करावी लागत आहे. त्यामुळे देखभाल व दुरूस्तीचा खर्च दिवसेंन दिवस वाढत आहे. तसेच शहरातील लोकसंख्या मागील दहा वर्षा मध्ये दुपटीने वाढली असल्याने वितरण व्यवस्था अपुरी पडत आहे.

उपरोक्त सर्व अडचणीवर मात करण्याकरिता दि. ३.१२.२००० रोजी मा. श्री. रामानंद तिवारी प्रधान सचिव (नगरविकास) यांचे अध्यक्षतेखाली मा.आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेण्यात आली. त्यावेळेस उल्हासनगर शहरातील पाण्याची वितरण व्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीत प्रधान सचिव (नगरविकास) यांनी असे आदेश दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे व्दारे (रक्कम रू. ३४.४५ कोटी निव्वळ खर्च व रू४१.०० कोटी ढोबळ खर्च) उल्हासनगर सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा-२ त्वरीत राबवण्यात यावी ज्यामुळे उल्हासनगर शहराच्या रहिवासी यांना समप्रमाणात
मुबलक पाणी पुरवठा करता येईल परंतू जर वितरण व्यवस्थाची योजना हाती घेतली नाही तर टप्पा-१ हया चालु योजनेचा पुर्णपणे उपयोग होणार नाही.

त्याकरीता उल्हासनगर सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा-२ महाराष्ट्र जीवन, प्राधिकरण यांचे तर्फे राबवण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरी करिता महासभेपुढे सादर.



<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३०</u>                <u>दि:-२०.१२.२०००</u>.

सुचकाचे नाव :-श्री. रामभाऊ आढाव.

अनुमोदकाचे नाव :-श्री. पांडुरंग लांडे.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे तर्फे राबविण्यासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमण या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ९.२५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर श्री. हरदास माखीजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका